महाराजा सयाजीराव गायकवाड

चरित्रसंग्रह

भाग २


बडोद्याचे राज्यकर्ते

संपादक

यमाजी मालकर

सहसंपादक

सौ. मंदा हिंगुराव



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराजा सयाजीराव गायकवाड

चरित्रसंग्रह

भाग २



संपादक

यमाजी मालकर

सहसंपादक

सौ. मंदा हिंगुराव

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

पुस्तकाचे नाव : महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह : भाग २ बडोद्याचे राज्यकर्ते.

संपादक : श्री. यमाजी मालकर

सहसंपादिका : सौ. मंदा हिंगुराव

प्रथमावृत्ती : २०१८

प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रविंद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार.
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे - ४११ ००१.

किंमत : रुपये १३५/-



महाराजा सयाजीराव गायकवाड

संपादक व सहसंपादक अल्पपरिचय

यमाजी बाळाजी मालकर

दैनिक सकाळ, पुणे आणि औरंगाबादचे माजी संपादक. दैनिक दिव्य मराठीचे माजी सल्लागार संपादक. अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि अर्थपूर्ण मासिकाचे संपादक.

'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' या, अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा मराठी अनुवाद प्रसिद्ध, 'डेटलाईन' 'आहे, उत्तर आहे', 'मराठवाड्याच्या यशकथा' ही पुस्तके प्रसिद्ध. 'झपाटलेपण ते जाणतेपण' या पुस्तकाचे सहलेखक. 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' (२०१०) या कॉपी टेबल बुकचे संपादक. अर्थक्रांती चळवळीत सक्रिय. जागर ब्लॉगवर लेखन.

सौ. मंदा हिंगुराव

बडोदा येथील महाराजा फत्तेसिंहराव म्यूझियमच्या संचालिका. तसेच महाराष्ट्र शासनाच्या महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीच्या संशोधक अभ्यासक सदस्य. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षणविषयक कार्यांचा त्यांचा विशेष अभ्यास आहे. या विषयावर इंग्रजी-मराठीत लेखन प्रकाशित. 'महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण' हा महत्त्वाचा ग्रंथ मराठी व इंग्रजीत प्रकाशित. या ग्रंथात महाराजांनी स्त्रीशिक्षणासाठी मूलभूत डोळस कृती कशी आरंभली याची अभ्यासपूर्ण मांडणी या ग्रंथात केली आहे. महाराजा सयाजीराव इंग्रजी चरित्रग्रंथाचे संपादन. महाराजा सयाजीराव ट्रस्टच्या प्रमुख म्हणूनही बडोद्यात त्या कार्य करत आहेत.

अध्यक्षांचे निवेदन

महाराजा सयाजीरावांचे चरित्र अनमोल सांस्कृतिक वारसा

स्वातंत्र्यपूर्व काळात जनकल्याणाचा ध्यास घेत एक आदर्श सुप्रशासनाचे उदाहरण दाखवून देणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारताचे एक शिल्पकार आहेत. त्यांनी ज्ञानाची महती ओळखून तोच प्रगती अन् परिवर्तनाचा एकमेव मार्ग आहे हे ओळखले. त्यासाठी शिक्षणाची कास धरून रयतेला सक्तीचे मोफत शिक्षण दिले. देशाची नवनिर्मिती शिक्षण, नवतंत्रज्ञानातून होत असली तरी त्याला ज्ञानात्म प्रबोधनाची जोड दिली. एवढेच नाही तर वैचारिक, सामाजिक, राजकीय, शेती-उद्योगाच्या बांधणीत कल्याणाचा ध्यास घेतलेले ते एक प्रज्ञावंत दूरद्रष्टा राजा होते.

देशभरातील बहुतांश युगपुरुषांना त्यांनी जबाबदारीने मदत केली. त्यातील प्रमुखात पितामह दादाभाई नौरोजी, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित मदन मोहन मालवीय, लाला लजपतराय, श्यामजी कृष्ण वर्मा, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर वि. रा. शिंदे, न्यायमूर्ती महादेव गो. रानडे या काही आणि अनेकांना महाराजांनी मदत केली. एवढेच नाही तर या सर्व स्वातंत्र्यवीरांचे ते एकमेव राजा आहेत की, ज्यांनी आयुष्यभर क्रांतिकारकांचे पाठीराखे होऊन बलाढ्य सत्तेशी संघर्ष केला. सुप्रशासनाचे अनेक प्रयोग राबविले. कोणत्याही राष्ट्राची संपत्ती जशी शेती-उद्योग-धंद्यात असते, तेवढीच ती तेथील साहित्य, कला, संगीत, शिल्पकला या सांस्कृतिक वारशातही असते, हे ओळखून ते या सर्वांचे पोशिंदे झाले.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांची मराठी व इंग्रजीत सतरा चरित्रे प्रकाशित झालेली आहेत. महाराजांचे गुरुवर्य एफ.ए.एच. इलियट सरांनी या हिऱ्यास घडविण्याचे जसे काम केले तसेच The Ruler's of Baroda हा ग्रंथ लिहून १८७९ साली त्याचे एज्युकेशन सोसायटीज प्रेस, भायकळा, मुंबई येथे छापून प्रकाशन केले. या ग्रंथाचा 'बडोद्याचे राज्यकर्ते' हा मराठी अनुवाद विनायक बी. परांजपे यांनी केला आणि बडोदे सरकारी छापखान्यात १९०६ साली

ते छापले. या ग्रंथाचे संपादन सौ. मंदाताई हिंगुराव यांनी केले आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या **चरित्रसंग्रह भाग : २ 'बडोद्याचे राज्यकर्ते'** चे प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास आनंद होत आहे.

दि. २६/३/२०१८

बाबा भांड
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

संपादकांचे निवेदन

रयतेचा राजा सयाजीराव

भारताला दीडशे वर्षांनी इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळाले. त्यापूर्वी भारत शेकडो संस्थानिकांत विभागला गेला होता. या संस्थानांत प्रजेचे हित जपणाऱ्या राजवटी कमीच होत्या. शिवाय संस्थानांत जे संघर्ष सुरू होते, त्यातून त्या त्या राजवटीतील जनता अस्वस्थ होती. इंग्रज भारतात आले आणि त्यांनी संस्थानिकांना आपले मांडलिक बनविले. इंग्रजांचे हेतू आपला स्वार्थ साध्य करण्याचा असला तरी त्या माध्यमातून पश्चिमेकडील बदलाचे वारे देशात वाहू लागले. त्यामुळे संस्थानिकांच्या तुलनेत इंग्रजी राजवटीत होत असलेल्या बदलांचे देशात स्वागत होऊ लागले होते. व्यापार उदिमासाठी भारत वर्षानुवर्षे जगाशी जोडला गेला होता; पण सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा त्याच्याशी काही संबंध नव्हता. या पार्श्वभूमीवर बडोदा संस्थानाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या ६४वर्षांच्या कारकिर्दीत रयतेचा राजा म्हणून जे काम केले, त्याला इतिहासात तोड नाही. स्वतंत्र भारतात जे बहुजन हिताचे निर्णय आता तरी घेतलेच पाहिजे, असे आपण आज म्हणत आहोत, ते निर्णय घेण्याचे धाडस महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी केले होते. बडोद्याच्या गादीवर महाराज ज्या नाट्यमयरीत्या बसले, तेथपासून या संस्थानाने राजेशाहीचा एक आदर्श घालून दिला. समाजाच्या संक्रमणात आज बहुतेक देशांनी लोकशाहीचा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अंगीकार केला आहे; पण ज्यावेळी राजेशाही हाच राजमार्ग होता, तेव्हा रयतेचे कल्याण होण्यासाठी राजाचे चारित्र्यच महत्त्वाचे ठरत होते. राजा म्हणजेच सर्वसत्ताधीश, निरंकुश सत्ता हे सर्वमान्य केले जात होते आणि त्यात मिळणाऱ्या स्वातंत्र्यावर समाधान मानावे लागत होते. राजाचे चारित्र्य आणि राजघराण्यातील उलथापालथ हेच रयतेचे नशीब होते आणि याचा वाईट अनुभव बडोदा संस्थानातील जनताही त्यापूर्वी घेतच होती. यादरम्यान योगायोगाने राजपद मिळालेल्या सयाजीरावांनी जो राज्यकारभार केला तो त्या संस्थानाचा आज उज्ज्वल इतिहास तर झालाच; पण आदर्श राज्यकारभाराचे जगासमोर एक उदाहरण झाले आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी गादीवर बसण्यापूर्वी बडोदा संस्थानात अनेक उलथापालथी होऊन गेल्या होत्या. त्यातून राजघराण्याला वारस शोधण्याची वेळ आली आणि त्यातून सामान्य घरात जन्म घेतलेले सयाजीराव गायकवाड राजे झाले. बडोदा संस्थानात या ज्या घडामोडी घडत होत्या, त्या सर्वच अघटित होत्या; पण त्यांचा जन्म या संस्थानाचा उज्ज्वल इतिहास लिहिण्यासाठीच झाला होता.

रयतेचा राजा म्हणून सयाजीराव गायकवाड यांनी केलेले ऐतिहासिक कार्य आपण 'महाराजा सयाजीराव गायकवाड : चरित्रसंग्रह- भाग १' मध्ये पाहिले आहे. पण या कार्याला कोणत्या परिस्थितीत आकार आला, ते गादीवर बसण्यापूर्वी बडोदा संस्थानाचा कारभार कसा चालला होता, हेही समजून घेतले पाहिजे. सयाजीराव गायकवाड यांची मराठीतच आतापर्यंत सतरा चरित्रे लिहिली गेली आहेत. मात्र बडोदा संस्थानाची त्यापूर्वीची स्थिती ठळकपणे समोर आलेली नाही. खरे म्हणजे ही स्थिती हा सयाजीराव गायकवाड यांच्या चरित्राचाच एक भाग आहे. सुदैवाने महाराजांचे गुरुवर्य एफ. ए. एच. इलियट यांनी `The Ruler's of Baroda' हा ग्रंथ लिहून त्याचे १८७९ साली, म्हणजे सयाजीराव गायकवाड यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी दोन वर्षे आधी प्रकाशनही केले होते. या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद विनायक बी. परांजपे यांनी केला आणि तो १९०६ साली प्रसिद्ध झाला. त्याचे संपादन बडोदा येथील महाराजा फत्तेसिंग म्यूझियमच्या संचालिका सौ. मंदाताई हिंगुराव यांनी केले आहे. महाराजांचे गुरुवर्य एफ. ए. एच. इलियट यांनी बडोदा संस्थानाचा इतिहास लिहून ठेवला, याला महत्त्व आहेच; पण ज्या दृष्टीने त्यांनी हा इतिहास लिहिला, त्याच दृष्टीने त्यांनी, राजघराण्याचा वारसा नसलेल्या एका होतकरू मुलाला राजा म्हणून घडविले आणि त्यातून एका उज्ज्वल इतिहासाची मुहूर्तमेढ झाली. हा ग्रंथ मराठी वाचकांसमोर येण्याची गरज होती. ती गरज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि त्याचे अध्यक्ष श्री. बाबा भांड यांच्या प्रयत्नामुळे पूर्ण होत आहे, ही वाचक आणि अभ्यासकांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची गोष्ट आहे. बडोदा संस्थानाचा इतिहास आपण लिहिला पाहिजे, अशी इच्छा एका इंग्रज अधिकाऱ्याला व्हावी आणि त्याने इतिहास लेखनाची साधने वापरून लेखन करावे, ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. इतिहासलेखन करणाऱ्या अभ्यासकांच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा ऐवज ठरावा.

अतिशय सामान्य घरात जन्म घेऊन सयाजीराव गायकवाड यांना मिळालेले राजपद, त्या पदाला न्याय देण्यासाठी त्यांनी केलेले कष्ट, राजा आणि प्रजा यातील अंतर कमी करण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा बहुजनांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनात त्यांनी केलेले आमूलाग्र बदल, विकसित जग पाहून त्या जगातील चांगल्या गोष्टींची आपल्या राज्यात अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यांनी केलेली धडपड, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक संस्थांची उभारणी आणि त्यांचा देशभर प्रसार व्हावा यासाठीचे जाणीवपूर्वक प्रयत्न आणि बडोदा संस्थान हे अंतिमतः भारत नावाच्या स्वतंत्र होऊ घातलेल्या देशाचा भाग आहे, याचे एका राष्ट्रीय विचाराच्या राजाला असलेले भान अशा सर्व दृष्टीने सयाजीराव गायकवाड यांची कारकीर्द आधुनिक भारताच्या इतिहासात महत्त्वाची आहे.

आधुनिक भारताचा पाया रचणारे आणि तो रचणाऱ्या अनेकांना अडचणीच्या काळात उभे करणाऱ्या सयाजीरावांची ही यशस्वी कारकीर्द सतत भारतीयांच्या समोर असावी, अशी आहे. सयाजीराव गायकवाड यांच्या चरित्रसंग्रहाच्या पहिल्या भागाचे प्रकाशन त्यादृष्टीने महत्त्वाचे होते आणि आता त्यांच्यापूर्वीचा बडोदा संस्थानाचा इतिहास 'बडोद्याचे राज्यकर्ते' या ग्रंथाच्या रूपाने उपलब्ध होतो आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचा असलेल्या बडोदा संस्थानाचा हा इतिहास त्यामुळे वाचक आणि अभ्यासकांना एकसंघ असा उपलब्ध झाला आहे. काही मोजक्याच ग्रंथालयात उपलब्ध असलेला हा ठेवा सहज उपलब्ध व्हावा, ही गरजच त्यामुळे पूर्ण झाली आहे. वर्तमान समजून घेण्यासाठी, इतिहासाचे आडाखे बांधण्यासाठी इतिहास समजून घ्यावा लागतो. इतिहासपुरुष सयाजीराव गायकवाड यांचा आणि बडोदा संस्थानाचा हा इतिहास भारतीय समाजाला त्याच्या वाटचालीत वेळोवेळी समजून घ्यावा लागणार आहे. अशा प्रत्येकवेळी हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, अशी मला खात्री आहे.

५ एप्रिल २०१८ **यमाजी मालकर**

सहसंपादिकेचे मनोगत

◘

'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह - भाग २' या पुस्तकाचे लेखक, श्री. एफ. ए. एच. इलियट म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड (३ रे) यांचे खऱ्या अर्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवणारे त्यांचे इंग्रज (आयरीश) शिक्षक. गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो या इंग्लंडमधील अतिशय मान्यवर घराण्याचे ते नातेवाईक होते. त्यांचे वडील मद्रास प्रांतात राज्यपाल म्हणून सेवा करत होते. तरुण श्री. इलियट इंग्लंडमध्ये आय. सी. एस. परीक्षेत यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्यानंतर १८६०च्या दशकात भारतात आले आणि काही वर्षे रत्नागिरीत सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत राहिले, तिथेच त्यांचा श्रीमती बर्डवुडच्या बहिणीशी विवाह संपन्न झाला.

नंतर इलियटची बदली शिक्षण विभागात झाली आणि हळूहळू अकोला (बेरार) येथे शैक्षणिक निरीक्षक पदावरून ते शिक्षण विभागाचे कार्यवाहक संचालक (Officiating Director) झाले. याच सुमारास बडोदा येथे २७ मे १८७५ रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड (३ रे) यांना दत्तक घेण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या शिक्षणासाठी योग्य शिक्षकाचा शोध सुरू झाला आणि श्री. इलियट यांची निवड करण्यात आली. ही निवड किती योग्य होती याचा इतिहास साक्षी आहे. श्री. इलियट यांना आपल्या कामाची सुरुवात ताबडतोब म्हणजे २२ नोव्हेंबर १८७५ रोजी करावयास सांगण्यात आले. तेही तातडीने बडोद्यात आले. राजाच्या शाळेचे प्राचार्य, शिक्षक तसेच श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड (३ रे) यांच्या गव्हर्नरपदाची प्रमुख कर्तव्ये पार पडण्यास सुरुवात केली.

आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने इलियट विलायतेतील पब्लिक स्कूलच्या धर्तीवर अभ्यासक्रम आखला. भाषा, गणित, इतिहास, राज्य प्रशासन, शारीरिक व्यायाम, खेळ या संदर्भात महाराजांचे शिक्षण सुरू झाले. विद्यार्थ्यांची भाषा वेगळी असल्याने दुभाषांच्या मदतीने अभ्यासाचा श्रीगणेशा झाला. हळूहळू शिक्षक व विद्यार्थी एकमेकांत समरस झाले, गुरू-शिष्यांचे नाते दृढ झाले. उभयतांमध्ये एका वेगळ्याच नात्याची, बंधनाची, प्रेमाची वाढ झाली. महाराजांच्या मनात

शिक्षणाची आवड जोपासण्याचे, इतिहासातील जिज्ञासा वाढवण्याचे व प्रशासनातील कौशल्य वाढविण्यात त्यांच्या गुरूंचा मोठा वाटा आहे. प्रजाहित हे राजाचे पहिले कर्तव्य आहे; तसेच साहित्य कला संस्कृती हे तितकेच महत्त्वाचे आहे, हे त्यांच्या मनावर गुरूंनी बिंबवले.

२८ डिसेंबर १८८१ रोजी महाराजांनी प्रशासनाची सूत्रे हातात घेतली. श्री. इलियट यांची शिक्षकाची कर्तव्ये संपली होती; पण बडोदा गॅझेटियरचे महत्त्वाचे काम बाकी होते. ते पूर्ण करण्यासाठी १ जानेवारी १८८२ पासून त्यांना एक महिना अजून राहण्याची परवानगी देण्यात आली. स्वतः महाराजांना वेळोवेळी मार्गदर्शन व सल्ल्यासाठी श्री. इलियट यांची गरज भासू लागली. त्यांच्या सततच्या आग्रहाने श्री. इलियट यांची १३ एप्रिल १८८२ रोजी खास सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली.

पुढे सयाजीरावांनी ब्रिटिश सरकारला विनंती करून इलियट यांच्या कामाची मुदत वाढवून, १८८५ पासून त्यांना जमाबंदी कमिशनर (Survey and Settlement Commissioner) म्हणून नेमणूक केली. बारखळी प्रकरणाची तपासणी, सुधारणा आणि दुरुस्ती करण्याचे काम सोपवण्यात आले.

प्रिन्सेस स्कूलचे प्रिन्सिपल असताना श्री. इलियट यांना बडोद्यासारख्या महत्त्वपूर्ण राज्याच्या पूर्व इतिहासातील महत्त्वाच्या घटनांचा तपशीलवार इतिहास कुठेही लिहिला गेलेला नाही हे लक्षात आले. त्यातूनच श्री. इलियट यांनी हा बडोद्याच्या राज्यकर्त्यांचा इतिहास लिहिण्याचे ठरवले. यापूर्वी कर्नल वेलेस यांनी गायकवाड आणि ब्रिटिश सरकार यांचे संबंध हा विषय बडोदा गॅझेटियरचे काम करताना हाताळण्याचा थोडासा प्रयत्न केला होता. वरील पुस्तकातील गायकवाडांचा इतिहास सर्वसामान्य माणसास सहज उपलब्ध व्हावा या हेतूने श्री. इलियट यांनी The Ruler's of Baroda (राज्यकर्ते गायकवाड) हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात एकंदर चाळीस प्रकरणे आहेत. श्री. इलियट यांनी गुजरातच्या राजवटीचा खोलवर अभ्यास करून सन १८७६ पासून आपल्या पुस्तकास सुरुवात केली. पहिली तीन प्रकरणे चावला, चालुक्य, सोलंकी व वाघेला घराण्याच्या इतिहासापासून सुरू होतात आणि त्यात मुगल काळापासून व्हॉइसरॉयपर्यंतच्या इतिहासाच्या नोंदी आहेत. चौथ्या प्रकरणापासून एकोणतिसाव्या प्रकरणापर्यंत सेनापती आणि गायकवाड यांनी गुजरातवर सुरुवातीपासून केलेल्या स्वाऱ्यांच्या हकीकती दिलेल्या आहेत. तिसाव्या प्रकरणात महाराजा सयाजीराव तिसरे यांच्या राज्याभिषेकाचे व सर टी. माधवराव यांच्या प्रशासनाचे वर्णन, तर चौदाव्या प्रकरणात काठियावाडच्या मुलुखगिरी पद्धतीचे तपशीलवार वर्णन या पुस्तकात दिले आहे. एकविसाव्या प्रकरणात गायकवाड घराण्याची प्रारंभापासूनची तपशीलवार माहिती या पुस्तकात व्यवस्थित नमूद केलेली आहे. उरलेल्या दहा प्रकरणांत बडोद्याच्या शासकांद्वारे झालेला जमाखर्च; तसेच बडोद्याच्या दिवाणांची व रिजन्टची क्रमवार यादी नमूद केलेली आहे. तसेच इतिहासाच्या अभ्यासकांसाठी, संशोधकांसाठी परिशिष्टामध्ये गायकवाड घराण्याचा वंशवृक्षही देण्यात आलेला आहे. या पुस्तकाचा सरळ व सहज मराठी अनुवाद श्री. विनायक बी. परांजपे यांनी आपल्या राज्यकर्ते गायकवाड या पुस्तकात केला आहे.

दामाजीराव (१७२०)

१८व्या शतकात खंडेराव दाभाडे हे मराठा सरदार कर्तबगार निघाले. त्यास उत्तर गुजरात व काठियावाडमध्ये खंडणी गोळा करण्याचे काम सोपविले होते. दादाजींनी अहमदाबादेत महाकूबसिंह व चंद्रसेन जाधव यांच्याबरोबर जोरदार युद्ध केले. सातार्‍यास शाहू महाराजांकडे परत गेले. महाराजांनी त्याचा पराक्रम बघून मानाजी मोरेच्या जागेवर सेनापती म्हणून त्याची नेमणूक केली.

खंडेरावांच्या बरोबर दामाजी गायकवाड नावाचा एक शिपाई होता. त्याने आपल्या चांगल्या कामगिरीने व गुणवत्तेने शाहू महाराजांकडून समशेर बहादूर हा किताब मिळवला. त्याचबरोबर सैन्यातील दुसर्‍या क्रमांकाचे पद मिळवले. १७२१ च्या सुमारास बालनपूर येथील लढाईनंतर खंडेराव दाभाडे व त्यांचे साथीदार (lieutenant) दामाजी गायकवाड यांचे निधन झाले.

पिलाजीराव (१७२१-१७३२)

खंडेराव दाभाडेंच्या जागी त्यांचे चिरंजीव त्र्यंबकराव यांना घेतले. तसेच दामाजीरावांची जागा त्यांचा पुतण्या झिंगोजी गायकवाड यांचा मुलगा पिलाजीरावांनी घेतली. हे पिलाजीराव खर्‍या अर्थाने गायकवाड घराण्याचे संस्थापक ठरले. गायकवाड फार वर्षांपूर्वीच पुण्याजवळील दावडी हे आपले गाव सोडून दाभाड्यांबरोबर आपले नशीब अजमावायला बाहेर पडले होते. पिलाजींना सुरुवातीला ४०-५० तैनाती घोड्यांची पागा देण्यात आली. त्यांची नियुक्ती नवापूर येथे करण्यात आली. तेथून ते तळेगाव येथे सेनापतींकडे गेले. आपली हिंमत, जोम, उत्साह, बुद्धिमत्ता व सुरतेवरील यशस्वी छाप्यानंतर ते २००-३०० घोड्यांच्या पागेचे अधिकारी झाले; परंतु त्यांना बळजबरीने नवापूर येथून बाहेर पडावे लागले. प्रवेश करण्यास अवघड अशा घनदाट जंगलात पिलाजीरावांनी एका डोंगराची निवड केली. तेथे सोनगड किल्ला बांधला. हेच गायकवाडांचे राजधानीचे मूळ स्थान. हा डोंगर आधी मेवासी भिल्ल लोकांच्या ताब्यात होता. गायकवाडांच्या या मूळ स्थानाला बर्‍याच वर्षांनंतर गायकवाडांच्या सार्वभौम सत्तेच्या राजधानीचा मान मिळाला.

त्र्यंबकराव दाभाडेंच्या सूचनेनुसार पिलाजीराव गायकवाडांनी आपले लक्ष मुख्यतः सुरत अठ्ठाविसी (सुरतेची २८ परगाणे) कडे वळवले. मुघलांचा जुना दुश्मन असणार्‍या राजपिपळ्याच्या राजाशी युती करून स्वतःची ताकत वाढविली. १७२० साली त्यांनी उत्तर गुजरातवर स्वारी करून त्या प्रांताच्या चौथाईचा हक्क मिळवला. तसेच अहमदाबादच्या हवेलीमध्ये गुमास्था (एजन्टची) स्थापना केली. १७२३ मध्ये त्यांनी सुरतेवर स्वारी करून नवनियुक्त गव्हर्नर मोमीन खानचा पराभव केला. या युद्धानंतर, सुरतेच्या अठ्ठावीस परगण्यातील खंडणीची आकारणी अधिकच मजबूत व पूर्वीपेक्षा जास्त नियमित झाली.

गुजरातेत पिलाजीराव बावाप्यारा पास या भागाकडून प्रवेश करून कर्नाळीला पोहोचले. तेथे त्यांना बडोदा परगण्यातील पादरा, छाणी आणि भायली येथील देसाई, पाटील भेटले. या भागात मुसलमान लोकांचा त्रास खूप वाढला होता. होणार्‍या अपमानाला त्रासून या देसाई

लोकांनी पिलाजींना मदतीची व मुसलमानांचा बदला घेण्याची विनंती केली. पिलाजींनी या लोकांना फसवे आश्वासन दिले, आपला फसवा टेका दिला आणि आपल्या साथीदारांना फसवून अहमदखानशी गुप्तपणे संधान बांधले. जेव्हा युद्ध सुरू झाले तेव्हा पिलाजी गायकवाडांनी आपल्या साथीदारांना साथ तर दिली नाहीच; पण पायदळाचे नेतृत्व स्वतःकडे येताच ते रुस्तम अली खानच्या विरोधास वळले. अहमद खानकडून त्यांनी कांताजी कदमांना कबूल केलेली चौथाई गायकवाडांसाठी मिळवली. स्वाभाविकच या जमिनीच्या विभागणीने गायकवाड आणि कदम या दोन्ही सरदारांमध्ये वैर निर्माण झाले.

१७२६ रोजी महीच्या स्वारीत सरबुलंद खानला दिल्लीहून कुठलीही मदत न मिळाल्यामुळे पिलाजींना महीच्या दक्षिण भागाचा चौथाई वसूल करण्याचा अधिकार मिळाला; परंतु या अधिकारात एक नवा प्रतिस्पर्धी निर्माण झाला. प्रतिस्पर्धी होते बाजीराव पेशवे.

बाजीराव पेशवे हे पिलाजींचे मालक सेनापती त्र्यंबकरावांचे प्रतिस्पर्धी होते. बाजीरावाने आपल्या कट्टर अनुयायी पवार यांना पिलाजीस हद्दपार करण्यास सुचविले; पण त्यात त्यांना यश मिळाले नाही. यामुळे पिलाजी संतप्त झाले. त्याचप्रमाणे कदम बांडेच्या मनातही पेशव्यांविषयी मत्सर उत्पन्न झाला. त्यांनी पिलाजींच्या मोहिमेत सामील होऊन बडोदे काबीज करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

पिलाजींनी बडोदे जिंकण्याचे बरेच प्रयत्न केले. १७२४ आणि १७२६ साली बडोदे जिंकण्यात ते अयशस्वी झाले. शेवटी १७२७ मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले. बडोद्याची सत्ता स्वतःकडे ठेवता आली नाही.

सन १७३१ साली बाजीरावांनी बडोदे हस्तगत करण्याचा मनसुबा रचला; पण निझाम-ऊल-हक्क आपल्यावर चालून येत आहे ही बातमी लागल्यामुळे त्यांना आपला बेत बदलावा लागला. बडोदे शहरातून बाहेर कूच करत असताना बाजीरावांस पिलाजींच्या सैन्याने थोडा अटकाव केला आणि बाजीराव त्र्यंबकराव दाभाडेंच्या सैन्यावर चालून गेले. पेशव्याचे सैन्य थोडे होते; पण तरबेज होते. अगदी निकराचे युद्ध झाले आणि बाजीरावाचा जय झाला. त्र्यंबकराव दाभाडे यांनी लढाईत शर्थ केली. पिलाजींचे ज्येष्ठ चिरंजीव सयाजी व त्र्यंबकराव दोघेही या लढाईत मारले गेले. पिलाजी मोठ्या प्रयासाने दोन पुत्र दामाजी व खंडेराव यांना घेऊन सोनगडला पोहोचले.

एकूण बाजीरावांच्या मनात निझाम-ऊल-हक यांच्याशी सामना करायचा असल्याने व त्यांच्याकडे वेळ कमी असल्याने पेशव्यांनी त्र्यंबकराव दाभाडे यांचे अधिकार त्यांचा लहान मुलगा यशवंतराव यास दिले. त्यांना पुढील अटीवर गुजरात प्रांताची चौथाई वसूल करण्याचा हक्क देण्यात आला.

१. एकूण उत्पन्नातील अर्धे, पेशव्यामार्फत शाहू महाराजांकडे पोहोचवणे.

२. राज्यात सामील होणाऱ्या सर्व लहान-मोठ्या संस्थानांचा हिशेब ठेवणे.

यशवंतराव वयाने लहान असल्याने पिलाजीराव यांना सेना-खास-खेल (बादशाही तुकडीचा नायक) अशी पदवी देऊन कारभार पाहण्याची जबाबदारी सोपविली. पेशवे व गायकवाड यांच्यातील तीन युद्धांपैकी पहिल्या युद्धाचा असा शेवट झाला.

सेनापती पिलाजीरावांच्या हातात सत्ता आली. सोनगड, बडोदे आणि डभोई या भागांतील लोक, भिल्ल आणि कोळी या आदिवासींची मदत मिळू लागली. जमीनदारांची साथ मिळू लागली. अहमदाबादचे अभयसिंह यांनी प्रयत्न करून बघितले; पिलाजींनी त्यावर बाजी मारली. सैन्य बळाने शत्रू नाहीसा होत नाही हे बघून अभयसिंह यांनी विश्वासघाताने त्यांना मारायचे ठरवले. सन १७३२ रोजी छावणीतील एका फितूर मराठ्याकडून तंबूतच पिलाजींचा खून करण्यात आला. त्याच गडबडीत त्यांनी धोकालसिंहच्या हाताखाली लष्कर देऊन बडोदे शहर व डभोईचा किल्ला काबीज करून शीरखान बेबीच्या स्वाधीन केला.

दामाजीराव (१७३२-१७६८)

पिलाजींचे ज्येष्ठ पुत्र दामाजी यांना १७३२ रोजी वारसदार नेमण्यात आले. १७३४ रोजी दामाजीचा चुलता मालुजीने शीरखान बेबीकडून बडोदे पुन्हा हस्तगत केले आणि तेव्हापासून बडोदे शहर कायमस्वरूपी गायकवाडांच्या ताब्यात राहिले. दामाजी गायकवाडांनी स्वतः पूर्वेकडील पुष्कळ महत्त्वाची स्थळे काबीज करून जोधपूरलगतचा अभयसिंहचा वडिलोपार्जित प्रदेश इतका पेचात आणला की, अभयसिंहांना रतनसिंह नावाच्या हुशार माणसाला भंडारी नेमून गुजरातेतून पाय काढावा लागला. अभयसिंहला या यशाचा आनंद दीर्घकाळ मिळाला नाही. सन १७३७ रोजी दिल्ली दरबाराने त्याच्या जागी मोमीन खानची नेमणूक केली.

हळूहळू दामाजींनी सौराष्ट्रातील आपले बस्तान वाढवले. वीरमगाम सभोवतीच्या बंडखोर कोळी लोकांचा बीमोड केला. बांसा हस्तगत केले. निझामाच्या ताब्यातील भडोच पूर्ण ताब्यात घेता आले नाही, तरी भडोचच्या उत्पन्नाचा काही भाग मिळवण्याच्या कामी त्यांना यश मिळाले.

दामाजी आता मोठ्या प्रांताचे व मराठा सरदारातील एक बाणेदार नायक बनले. यशवंतराव दाभाडे हे नामधारी सेनापती होते. कठीण प्रसंगात लागणारे नेतृत्वगुण त्यांच्यात नव्हते. तसेच पेशव्यांचे प्रतिस्पर्धी राघोबा भोसले दामाजींचे स्नेही होते; परंतु बाजीराव खूपच शक्तिमान झाले होते. शिंदेंचे आणि होळकरांचे सैन्य त्यांनी आपल्या ताब्यात घेतले होते. दिल्लीपर्यंत जाऊन ते धडकले होते. आपला जुना शत्रू निझामाचा पाडाव करून त्याचाशी बाजीरावांनी तह केला. या विजयाच्या शिखरावर असतानाच दुर्दैवाने १७४० रोजी बाजीरावांचा किरकोळ आजाराने अचानक मृत्यू झाला.

बाजीरावांचे चिरंजीव बालाजी गादीवर आले. त्यांनी आनंदराव पवारास धारमध्ये कायमचे ठाण मांडून गायकवाडांच्या हालचालीवर नजर ठेवण्यास सांगितले. राघोजी भोसले आणि व दामाजी दक्षिणेत शिरले; पण पेशव्यांनी ताबडतोब माघार येऊन राघोजींच्या सैन्याची दाणादाण उडवली.

सन १७४९ रोजी साताऱ्यास शाहू महाराज मरणोन्मुख असताना खूपच उलटसुलट कट कारस्थाने सुरू झाली. राणी सरकारबाई बाळाजीची कट्टर दुश्मन होती. ती कोल्हापूरच्या गादीवर मालकी सांगू लागली. दामाजी तिला मिळाले. १७५० रोजी बाळाजींनी पुण्यास दामाजींना मुतालिक म्हणून बोलविले तेव्हा त्यांनी पुण्याला जाण्यास चक्क नकार दिला. पुढे बाळाजीच्या हाताखाली मंडळी जमली. त्यांनी पुणे शहर मराठ्यांची राजधानी केली.

सन १७५१ रोजी पेशव्यांनी यशवंतराव दाभाड्यांकडे अर्धाईची मागणी केली. दामाजींनी ती उघडपणे नाकारली. याच वर्षी राणी ताराबाईने त्यांना साताऱ्याच्या राजास बोलावले. बाळ राजास पेशव्यांच्या बंदिवासातून सोडविण्यासाठी मदत करा म्हणाल्या. दादाजी मदतीस धावून आले. बरोबर १५००० सैन्य घेतले. सालीच्या मार्गी कूच केले. निम येथे पेशवे सैन्याची गाठ पडली. वीस हजार सैन्यांचा पराभव केला.

पराभवाची बातमी ऐकताच पेशवे औरंगाबादेहून परत आले. त्यांनी दामाजीरावास ताबडतोब पुण्यास बोलवले. गुजरातेतील थकलेली बाकी आणि प्रांतातील थोड्या भागाची मागणी केली. तेव्हा दामाजीने मी दाभाड्यांचा फक्त मुतालिक आहे. मला ही मागणी कबूल करता येत नाही, असे पेशव्यांना सांगितले. चिडून पेशव्यांनी दाभाडे आणि गायकवाड यांच्या नातेवाइकांना तळेगाव येथे पकडले. त्यात दामाजींचा मोठा मुलगा सयाजीपण होता. पुढे त्याला मंगळवेढ्याला अटकेत ठेवण्यात आले. दामाजींची दुसरी दोन मुले गोविंदराव व फत्तेसिंग, राणी ताराबाईकडे सुरक्षित होती. दामाजींची छावणीही लुटण्यात आली.

"राज्यकर्ते गायकवाड" या पुस्तकातील चिटणिसांच्या नोंदीनुसार, दामाजी स्वतः पेशव्यांना शरण गेल्याचा उल्लेख आहे. सन १७३१च्या पराभवानंतर पिलाजींनी जिंकलेल्या त्या मुलखाच्या उत्पन्नाचा अर्धा भाग पेशव्याच्या मार्फत राजाला देऊ असे कबूल केले होते; पण पिलाजींनी किंवा दामाजींनी तो करार कधीच पाळला नाही. मध्ये मध्ये काही रकमा त्यांनी भरल्या होत्या. अर्थात हा करार करण्यापूर्वी दामाजींनी अधिकारी लोकांना लाच देण्यामध्ये एक लाखावर रुपये उधळले होते. नवीन कराराप्रमाणे दामाजींनी पुढील अटी मान्य केल्या :

१. थकलेल्या बाकीची फेड करण्यासाठी १५ लक्ष रुपये देणे. त्यांच्या सुटकेनंतर त्यांनी ७,९०,००० रुपये दिले.

२. १०,००० घोडे बाळगून पेशवे बोलावतील तेव्हा त्यास मदत करण्यास यावे लागेल. त्यासोबत वार्षिक खंडणी ५,२५,००० रुपये ठरली गेली.

३. दाभाड्यांच्या कुटुंबाच्या पोषणासाठी काही रक्कम निश्चित करण्यात आली.

४. पुढे जो मुलूख अथवा तिजोरी मिळकत होईल, त्याचा अर्धा हिस्सा पेशव्यांना दिला जाईल. मोगलांना अहमदाबादेतून पळवून लावावे. या कामी पेशव्याकडून मदत केली जाईल.

दामाजीरावांचे भाऊ खंडेराव हे पेशव्याच्या कैदेत होते. खंडेरावांचे प्रधान रामचंद्र अटकेतून निसटून गेल्यापासून त्यांच्यावरचा पहारा कडक झाला. त्यांना बेड्या घातल्या गेल्या. त्यामुळे तुरुंगातून सुटण्याची त्यांना काळजी वाटू लागली. पेशव्यांनी अर्ध्या गुजरातच्या सनदा सेनापतीला

दिल्या, तेव्हा त्याचा हक्क राजाने कबूल केल्यावर आपला अधिकार संपेल अशी खंडेरावांची खात्री झाली. एकट्याने मुगलांपासून गुजरात जिंकणे अशक्य आहे, हेसुद्धा त्यांना माहीत होते. इकडे राघोबाचे अपयश बघून पेशवे ही तडजोड करायला तयार झाले. म्हणून या दोन सरदारांनी वरील करारनामा केला. त्याचा गुजरातच्या इतिहासाशी जवळचा संबंध आहे.

पुन्हा गायकवाड पराधीन आणि खंडणी देणारे बनले. पुणे दरबारातील वरिष्ठ मानल्या जाणाऱ्या संस्थानिकांमध्ये ते कधी मनापासून मिसळले नाहीत किंवा त्यांचा पेशव्यांशी पूर्ण सलोखा झाला नाही. वास्तविक पेशव्यांशी संघर्ष झाला, तेव्हा दामाजी व फत्तेसिंग रघुनाथरावास मिळाले. पुढे इंग्रज पेशव्यांशी प्रतिपक्ष करू लागले, रघुनाथराव इंग्रजास मिळाले. ब्रिटिश सरकारने गोविंदरावास राजकीय आपत्तीतून वाचवले आणि त्यांच्या आधिपत्यातील शिंदे, होळकर किंवा पेशव्यांचे राज्य स्वाधीन होण्याऐवजी इंग्रजांच्या ताब्यात गेले. हे विषयांतर, एवढा वेळ वर्णिलेला कलह आणि भाऊबंदकी किती तीव्र होती आणि त्यांचे परिणाम किती खोलवरचे होते, हे लक्षात येण्यासारखे आहे.

दामाजीच्या सुटकेनंतर गुजरातची वाटणी लगेचच झाली. १७५३ रोजी दामाजी, रघुनाथराव, होळकर, जयाजी शिंदे, पवार आणि विठ्ठल शिवदे, नारोशंकर वगैरे एकंदर मराठी सरदारांच्या सैन्यांनी अहमदाबादेस वेढा घातला. जवानमर्दखान बाबीला अहमदाबाद सोडणे भाग पाडले. अशा रीतीने १७५४ रोजी दामाजी गुजरातचे स्वतंत्र राजे झाले.

मराठी सैन्याने अहमदाबाद जिंकले. दामाजीने एक दरवाजा ताब्यात ठेवून सगळे अहमदाबाद श्रीपतराव नावाच्या सरदाराच्या स्वाधीन केले. आणि राघोबा दादा हिंदुस्थानच्या मोहिमेकडे वळले. इकडे दामाजींनी लवकरच शेरखान बाबींकडून कापडगंज काढून घेतले. आसपासच्या कोळ्यांना ताब्यात आणण्याची मोहीम सुरू केली. इतक्यात खंबातच्या नवाब मोमीनखानाने पेशव्यांच्या कामगाराला हाकलून अहमदाबाद हस्तगत केल्याची वार्ता त्यांच्या कानावर आली. तेव्हा शहराला पुन्हा वेढा देणे भाग पडले आणि मोमीनखानाला हाकलून देण्याऐवजी त्याच्याकडून खंडणी बांधून घेतली.

सन १७६०च्या पानिपत येथील घनघोर संग्रामात ज्या अनेक सरदारांनी भाग घेतला होता त्यात दामाजीपण एक होते. दामाजी जखमी न होता रणांगणातून परतलेल्या थोड्या सरदारांपैकी होते. दामाजींनी या रक्तरंजित नाटकाच्या शेवटच्या अंकात आपले काम फार हुशारीने केले. सुरुवातीला त्यांनी आणि अहमदखानच्या घोडदळाने रोहिल्यांचे ८००० लोक कापले. मल्हारराव होळकर रण सोडून गेल्यानंतरच त्यांनी रणांगण सोडले.

दामाजी गुजरातमध्ये पूर्ण जोशात परत आले. कित्येक वर्षे अव्याहत लढाया मारण्यात त्यांनी घालवली. शेवटास मराठ्यांविरुद्ध इतरांबरोबर उभे राहिलेल्या बाबी घराण्याला त्यांच्या वडिलोपार्जित शामी राधनपूरच्या मिळकतीखेरीज बाकी सगळ्या मुलखातून हाकलून दिले. सर्वप्रथम त्यांनी मोमीनखानला शिक्षा करणाऱ्या पेशव्याच्या मुनिमाला मदत केली. पुढे विशालनगरास आपले मुख्य ठाणे करून खेडा घेतले. नंतर पाटणवर जाऊन तेथून जवानमर्दखानला हाकलून लावले आणि अनहिलवाडला ते पोहोचले. सोनगडच्या जागी अनहिलवाडला राजधानी केली.

सन १७६३ ते सन १७६६ दरम्यान कमलउद्दीन बाबीच्या मुलांकडून पाटण, वडनगर, विशालनगर, खेरालू, विजापूर व दुसरी छोटी शहरे ताब्यात घेतली. या जिंकलेल्या ९ प्रांतांपैकी खेरालू, रोझनपूर, बिजापूर, घमणी आणि मोजपूर पेशव्यांनी गायकवाडांना सरंजामासाठी दिले. पाटण, वडनगर, विशालनगर आणि सिद्धपूर हे पेशव्यांनी आपल्याकडे ठेवले. यामुळे काही उत्तम प्रांत गायकवाडांच्या राज्याला जोडले गेले. एवढ्या लढाया करूनही दामाजी थांबले नाहीत. सन १७५१ मध्ये दामाजींनी अभयसिंगाचे नातेवाईक इडरच्या राठोड राजांचा पराभव केला आणि आपल्या वडलांच्या खुनाचा बदला घेतला.

दामाजींचा स्नेह हळूहळू रघुनाथरावांशी वाढत गेला. पानिपतच्या पराभवानंतर बाळाजी बाजीराव फार दिवस जगले नाहीत. त्यांच्या मागून त्यांचा १७ वर्षांचा मुलगा बाजीराव याची नेमणूक झाली. रघुनाथरावांचे जोखड काढून टाकण्याचे त्याच्या मनात असून त्यास यश आले नाही. या अपयशातच राघोबा व त्याच्या भावाच्या कुटुंबांतील वैमनस्याचा भक्कम पाया घातला गेला तरीही निझामाचा वध करण्यासाठी चुलते-पुतणे एकत्र येऊन त्यांनी मुसलमानाच्या स्वारीला अटकाव केला. गोदावरीच्या काठी तांदुळजा मुक्कामी निझामाचा पराजय होऊन सन १७६३ रोजी मोहिमेचा शेवट झाला.

दामाजीने सगळ्या लढाईंत रघुनाथरावांच्या पाठीशी राहून हैद्राबादच्या आसपास लूट करण्यात त्यांना मदत केली. या पराक्रमातून नाव मिळविले. दामाजीच्या सैन्यातील एका शिपायाने निजामाचा मुख्य प्रधान राजा प्रतापवंताला ठार केले. या शूर कृत्यासाठी साताऱ्याच्या राजाने दामाजीस सेना-खास-खेलची पदवी दिली.

सन १७६८ रोजी रघुनाथरावाने धोडप येथे १५,००० सैन्य जमा केले. दामाजीने आपला मुलगा गोविंदराव व घोडदळ त्याच्या मदतीस पाठवले. आता पेशवे आणि रघुनाथराव यांच्यातला तंटा उघडउघड होता. पेशव्याच्या सैन्यांनी रघुनाथरावांना घेरले आणि त्यांना धोडपच्या किल्ल्यात जोमाने कोंडून शरण आणले. रघुनाथराव आणि गोविंदराव या दोघांस कैद करून पुण्यास आणले.

पेशव्यांनी गायकवाडांचा केलेला हा तिसरा पराभव होता. या पराभवानंतर टाकलेल्या अटी खूप गंभीर होत्या; पण याहून ही वाईट संकट गायकवाडांवर ओढवले. तह कायम होण्याच्या आधीच सोने बनवण्याची एक रासायनिक प्रक्रिया करत असताना झालेल्या अपघातात दामाजींना देवाज्ञा झाली. एक हुशार, ख्यातनाम, सक्षम व महत्त्वाकांक्षी राजा गायकवाड संस्थानाने गमवला. गादीच्या वारसा हक्काच्या भांडणांत संस्थान सापडले.

सन १७६५ साली दामाजींना सेना-खास-खेल हा किताब बहाल करण्यात आला होता. दामाजींनी नाशिकमध्ये एक टाकसाळ सुरू केली होती. ही गायकवाडांच्या स्वतंत्र नाण्यांची सुरुवात झाली. या नाण्यांची दामाशाही नाणे अशी ओळख राहिली. दामाजी फक्त शूर योद्धाच नव्हते तर त्यांनी जनतेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. त्यांनी डभोईचा किल्ला व शहर दुरुस्त केले. दावडी या गायकवाडांच्या मूळ गावाला मजबूत तटबंदी केली. बडोदे शहरामध्ये मांडवी नावाची भव्य इमारत बांधली. काठियावाडमध्ये गोपीतलाव बांधला. तसेच

वेगवेगळ्या गावांत बऱ्याच तलावांची निर्मिती केली. अहमदाबादमध्ये एका हवेलीचे बांधकाम केले. ते भगवान शिवाचे उपासक असल्याने त्यांनी बऱ्याच मंदिरांच्या बांधकामासाठी आणि दुरुस्तीसाठी पुष्कळ मदत केली. त्याच्या देखरेखीसाठीही मुक्त हस्ताने पैशांचे वाटप केले.

गोविंदराव (१७६८-१७७१), सयाजीराव (१७७१-१७७८), फत्तेसिंगराव (१७७८-१७९०), मानाजीराव (१७९०-१७९३) आणि गोविंदराव (दुसऱ्यांदा) (१७७९-१८००).

दामाजीनंतर काही काळ गायकवाडांच्या सत्तेची वाढ खुंटली. कुठल्याही नव्या मुलखाची भर पडली नाही. आहे तेच जपून ठेवणे अवघड झाले. दामाजीरावांना चार मुले होती - गोविंदराव, सयाजीराव, फत्तेसिंगराव आणि मानाजीराव. दामाजींचे ज्येष्ठ पुत्र सयाजीराव हे द्वितीय पत्नीपासून आणि गोविंदराव हे प्रथम पत्नीपासून होते. त्यामुळे गादीवर दोघेही हक्क सांगू शकत होते. फत्तेसिंगराव आणि मानाजीराव ही दामाजींच्या तृतीय पत्नीची मुले होती. फत्तेसिंगराव हे अतिशय महत्त्वाकांक्षी, चपळ, चाणाक्ष होते. कुठलीही लष्करी मोहीम आपल्या बाजूने पार पाडण्यास समर्थ होते. बाकीच्या गायकवाड बंधूंमध्ये मूळ संस्थापकाचे कर्तृत्व व दूरदर्शीपणा नव्हता, त्यामुळे गायकवाडांच्या घराण्यात भाऊबंदकीने फाटाफूट झाली. गायकवाडांचा इतिहास हा गृहकलहाचा इतिहास झाला. गायकवाडांनी राजाचे अधिकार स्वीकारले होते; परंतु राजसीमा आणि छोट्या संस्थानांकडून खंडणी वाढविण्याची शक्ती आणि इच्छा असलेल्या मराठा योद्ध्यांची त्यांना मदत मिळाली नाही.

धोलपच्या पराभवानंतर गोविंदराव पुण्यात होते. त्यांनी आपल्या पुणे वास्तव्याचा फायदा घेऊन पेशव्यांकडून आपला वारसा मंजूर करून घेतला. त्याच्या मोबदल्यात त्यांनी केलेल्या बंडाबद्दल दंड, गेल्या वर्षीची खंडणी, २० लक्ष रुपये नजराणा, १ लक्ष बाबीच्या महलांबद्दल, आणि ५०,००० अधिकारी मंडळीस वाटण्यासाठी साडेपन्नास लक्ष रुपये पेशव्यांना देण्याचे कबूल केले.

दामाजीच्या मृत्यूच्या वेळी फत्तेसिंग गुजरातेत होते. भावांच्या मृत्यूची बातमी ऐकून ते ताबडतोब बडोद्यास परतले. कारभाऱ्यांना हाती घेऊन बडोदा गादीवर स्थानापन्न झाले. त्यांचे बंधू गोविंदराव पुण्यात होते. त्यांनी पेशव्यांशी हातमिळवणी अगोदरच केली होती. त्यावर मात करण्यासाठी फत्तेसिंगांनी पुण्यात पेशव्याचे न्यायाधीश रामशास्त्री यांची भेट घेतली. या देवघेवीच्या भेटीत फत्तेसिंग यांनी आपल्या बाजूने निर्णय पदरात पाडून घेतला. फत्तेसिंगांनी दुसरे भाऊ सयाजीराव यांनाही आपल्या बाजूने ओढले. या भाऊबंदकीचा खेळ करणाऱ्या पेशव्यांनी सयाजीरावांना सेवा-खास-खेल हा किताब बहाल केला आणि अशा प्रकारे सयाजीराव पहिले बडोदा गादीवर आले. अशा प्रकारे पेशवे बडोदा भाऊबंदकीत स्वार्थाची भूमिका बजावत होते.

अशा रीतीने भाऊभाऊ एकमेकांचे वैरी झाले. या गृहकलहात भर घालायला पिलाजींचे चिरंजीव खंडेरावही सामील झाले. खंडेरावांकडे पिलाजींनी कडीची जहागीर होती. पेशव्यांनी दिलेला हिंमत बहादूरचा किताब होता. तसेच पिलाजींकडून लबाडीने मिळवलेला बोरसद व नडियाद प्रांतही होता. स्वार्थासाठी खंडेराव कुठल्याही पुतण्यास साथ देण्यास तयार होते.

पुण्याच्या दरबाराने मान्य करून दिलेल्या शर्तीला फत्तेसिंगाने वरवरची मान्यता दिली असे दाखवत होते; पण त्यांचा पेशव्यांवर विश्वास नव्हता. यावर तोड म्हणून हळूहळू त्यांनी इंग्रजांची मदत मिळवण्याची खटपट सुरू केली. इकडे पुण्यामध्ये सन १७७२ रोजी एक भयंकर विलक्षण घटना घडली. माधवराव पेशव्यांना देवाज्ञा झाली. थोड्याच दिवसांत त्यांचा धाकटाभाऊ आणि वारसदार नारायणरावांचा खून झाला. या मागे रघुनाथरावांचे कारस्थान होते. १७७४ ला नारायणरावांचा मुलगा माधवरावांचा जन्म झाल्याने रघुनाथरावांना पेशव्यांची गादी मिळाली नाही.

पेशव्यांचे वारसदार नारायणरावांचा खून झाला होता; पण त्यांना लागलीच पुत्ररत्न झाल्याने, पेशव्यात कुटुंब कलह वाढला. प्रधानांनी बालक माधवरावांच्या बाजूने एकजूट केली. धोडप येथील लढाईत त्यांचे साथीदार असणाऱ्या गोविंदरावाने रघुनाथरावांचा पक्ष घेतला. तसेच १७७३ साली गोविंदरावांना रघुनाथरावांनी सेना-खास-खेल हा किताब दिला होता. त्यामुळे बडोद्यावरील ताबा ठेवणे गोविंदरावांना निकडीचे वाटले. त्यात सगळे मराठा राजे रघुनाथरावांच्या विरुद्ध गोळा होऊ लागले होते.

दुसरीकडे ६ मार्च १७७५ रोजी बॉम्बे सरकारचे जनरल केटिंगनी तहाच्या अटी स्पष्ट केल्या. सुरतेचा नामांकित तह कायम झाला. या तहाप्रमाणे वसई व सुरतेच्या आसपासचे प्रांत रघुनाथरावांनी इंग्रजांना द्यावा. भडोच येथील गायकवाडांचा हिस्सा ब्रिटिशांना द्यावा आणि त्याच्या मोबदल्यात इंग्रजांनी रघुनाथरावांना मदत करावी, असे नक्की झाले.

या तहाने इंग्रज व मराठ्यांतील संघर्ष संपुष्टात आला नाही; पण तो केवळ लांबणीवर ढकलला गेला. आपल्या थकलेल्या सैन्यानिशी आणि रिकाम्या पडलेल्या कोषागारानिशी दोघे गायकवाड बंधू मराठ्यांशी लढत होते. अर्थात, मराठ्यांना आणि इंग्रजांना माहीत होते की, या लढाईत गायकवाडांचा त्यांना बहुमोल आधार होणार आहे. फत्तेसिंगांनाही हे चांगले माहीत होते. म्हणूनच त्यांनी या संधीचा चांगलाच फायदा करून घेतला. एकदा हा खेळ सुरू झाल्यावर तो कुठे थांबेल हे सांगता येत नव्हते. या सुमारास १७७८ च्या फेब्रुवारीत पेशव्यांनी फत्तेसिंगांना सेना-खास-खेलचा किताब देण्याची खेळी केली.

नाना फडणवीस यांचा फत्तेसिंगांना पेशव्यांच्या पक्षात राहण्याचा आग्रह चालला होता. पेशवे आणि इंग्रजाच्या छोट्या-मोठ्या लढाया चालूच होत्या. गव्हर्नर हॉर्नबी यांनी फत्तेसिंगांचा गुजरातच्या स्वारीत उपयोग करून घेण्याचे नक्की केले. इंग्रजांना समुद्रमार्गाने आल्यावर गुजरातेत आल्यावर रस्ते चांगले होते. दक्षिणेसारख्या कठीण घाटाची आडकाठी नव्हती. इतर मराठ्यांपेक्षा इंग्रजांना गायकवाड जवळचे वाटले; कारण ते इतरांपासून अलिप्त होते. पेशवे पडले तर देशाची वाटणी होईल, महीच्या उत्तरेकडील मुलूख गायकवाडांकडे जाईल आणि तापीच्या दक्षिणेकडील मुलूख आपणास मिळेल असे इंग्रजांचे राजकारण होते.

सन १७८०च्या सुमारास इंग्रजांनी पेशव्यांकडून डभोई हिसकावून घेतले. इंग्रजांशी जवळीक असल्याने २६ जानेवारी १७८० रोजी फत्तेसिंगांनी डभोईचा (कांदिला) तह केला, त्याच्या अटी पुढीलप्रमाणे ठरल्या :

१. पेशव्यांशी अलिप्त राहून इंग्रजांना ३००० घोडेस्वारानिशी मदत करावी.

२. गुजरातची कंपनी सरकारबरोबर वाटणी करावी

३. पेशव्यांकडून गायकवाडांसाठी अहमदाबाद घेतल्याबरोबर सुरत अठ्ठाविसीतील काही मुलूख व सिनोर हे कंपनी सरकारला द्यावे असे ठरले.

गुजरात सांभाळण्यासाठी ही मदत फत्तेसिंगांनी खुशीने आणि हुशारीने केली. मोहीम संपेपर्यंत फत्तेसिंगांनी ५००० घोडेस्वारांची तुकडी मानाजीरावांच्या हाताखाली देऊन त्यांना इंग्रजांकडे रवाना केले.

पुढील काही वर्षांत फत्तेसिंगरावांकडे असणाऱ्या पूर्ण मुलखाची मालकी त्यांच्याकडे आली. लढाईच्या खंडणीची पेशव्यांनी माफी केली; पण लष्करी नोकरी बजावून घेण्याचा हक्क प्राप्त केला. भडोच गायकवाडकडून शिंद्यांकडे गेले. काही काळ फत्तेसिंगांनी स्वतःच्या मुलखाचा उपभोग घेतला. दामाजीरावांनंतर गायकवाड घराण्यात फत्तेसिंगरावच कर्तृत्ववान निघाले. मात्र, दि. २१ डिसेंबर १७८९ रोजी राजवाड्याच्या वरच्या मजल्यावरून पडून त्यांचा अपघाती मृत्यू झाला. आता गोविंदरावांना कोणी प्रतिस्पर्धी राहिला नाही. पुण्याच्या दरबाराने मानाजीरावांचा हक्क कबूल करून सयाजीरावांची कारभारी म्हणून नेमणूक केली. अर्थात यासाठी त्यांना खूप मोठा नजराणा मोजावा लागला, हा आतापर्यंतचा सर्वांत मोठा नजराणा होता.

मानाजीरावांचा मृत्यू ऑगस्ट १७९३ रोजी झाला तरीही गोविंदरावांना गादी मिळवण्यासाठी पेशव्यांच्या अनाठायी मागण्यांना मान द्यावा लागला. बडोदा कुटुंबात कलह लावून, याचे तुकडे तुकडे करावेत, असा नाना फडणवीस यांचा डाव होता; पण इंग्रजांची साथ मिळाल्याने हा डाव उधळला गेला.

१९ डिसेंबर १७९३ रोजी गोविंदरावास सरतेशेवटी सेना-खास-खेल हे पद देण्यात आले; परंतु त्यांच्या राजधानी प्रवेशास विरोध झाला. गोविंदरावांच्या काळात काही ना काही कारणांनी राज्यात अशांतता राहिली. धर्मपूरच्या राजपुत्रीपासून झालेल्या त्यांचा स्वतःचा अनौरस पुत्र कानोजीनेही त्यांना अतिशय त्रास दिला. कडीचे खंडेराव गायकवाडांचा पुत्र मल्हारराव कानोजीस मिळाला आणि या दोघांनी पुष्कळ वर्षे बडोदा संस्थानाचे नुकसान केले. यात भर घालायला पेशव्याचे उपराज्यपाल शेलूकरांची प्रगतीपण कारणीभूत होती. या परिस्थितीने गोविंदराव बेजार झाले होते. काही कारणाने अहमदाबादचा पराभव झाला, शेलूरकरांना तुरुंगात टाकण्यात आले आणि अहमदाबाद गायकवाडांना ५ वर्षांच्या खंडणीने मिळाले.

अहमदाबादेची ५ लक्ष रुपयांची वार्षिक खंडणी, पेशव्यांना दोन वर्षांपासून देण्यात येणारे ६० लक्ष रुपये या कारणांनी गायकवाडांची तिजोरी रिकामी झाली होती. आपापसातल्या कलहाने, गायकवाड कुटुंबातील फूट वाढत चालली. बहुतेक सर्व महाल सावकारांकडे गहाण पडले होते. थोडे जे प्रांत शिल्लक होते त्याची वहिवाट अविचारी लोकांच्या हातात पडली होती. जुलमाने पैसे जमा केले जात होते. सर्व सत्ता लुटारू आणि जुलमी अशा अरब सैन्याच्या हातात गेली. अरबांचा हेतू फक्त स्वतःच्या स्वार्थापुरताच मर्यादित होता. सैन्याच्या निर्वाहाचा खर्च

तिजोरीत जमा झालेल्या पैशापेक्षा वाढला होता. राज्यव्यवस्थेकडे आणि न्यायव्यवस्थेकडे कोणाचेही अजिबात लक्ष नव्हते. अशा विचित्र परिस्थितीतच सन १८०० साली गोविंदरावांना देवाज्ञा झाली.

गोविंदराव, आनंदराव व युवा फत्तेसिंग हे कमकुवत पुरुष होते. त्यांच्या कालखंडात सर्व सत्ता कारभाऱ्यांच्या हातात गेली. या कारभाऱ्यांची महत्त्वाकांक्षा आणि परस्पर स्पर्धा संस्थानास घातक ठरली. दामाजींनी आणि त्यांच्या भावांनी एकमेकांचे नुकसान केले. त्याप्रमाणे कित्येक वर्षे गायकवाड घराण्यातील फत्तेसिंग, गोविंदराव आणि मानाजी हे आपसातल्या भांडणाने आपले शत्रू असलेल्या पेशव्यांच्या हातातले खेळणे बनले होते.

आनंदराव (१८००-१८१९)

गोविंदरावांच्या निधनानंतर गोविंदरावांचे ज्येष्ठ औरस पुत्र आनंदराव यांना गादीवर बसविण्यात आले. ते स्वभावतःच दुर्बल मनाचे आणि अफूच्या व्यसनाच्या आधीन होते. रावजी अप्पाजी फणसे त्यांचे दिवाण झाले आणि राज्यकारभार चालवायला लागले.

या समयी कडीचे जहागीरदार आणि खंडेरावांचे पुत्र कानोजी कारागृहात होते. सत्ता मिळवण्याची ही चांगली संधी बघून वेषांतर करून ते बडोद्यात पोहोचले. आपल्या दुर्बल; पण सुस्वभावी अशा मोठ्या भावाच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन त्यांनी आनंदरावांवर आपला पगडा बसवला. कानोजी स्वतः मुतालिक असल्याचा आव आणू लागले. रावजी अप्पाजींना कारभारी पदावरून काढून टाकायची त्यांची इच्छा होती; पण ते त्यात फारसे यशस्वी झाले नाही.

कानोजीचे आचरण त्यांच्या आप्तांना हळूहळू असह्य होऊ लागले. अरबांना संतुष्ट ठेवण्यासाठी कानोजी आप्तांकडून बळजबरीने आणि हिंसक मार्गाने पैसे काढत असत. त्याने प्रत्यक्ष जणू राजांनाच अटकेत ठेवले आणि त्यांच्या बायका, आप्त आणि नोकर लोकांना निर्दयी वागणूक दिली. फत्तेसिंगाच्या पत्नी, मुलीला तसेच मानाजींच्या बायकोलाही फार वाईट वागणूक दिली. कानोजींच्या वागणुकीने अरब पण त्रासले होते. रावजींचे आमिष अरबांना जास्त आवडले. त्यांनी कानोजींनाच पकडून आनंदरावाकडे हजर केले. पुढे कानोजींना रानपूरच्या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवण्यात आले.

रावजींच्या हातात पूर्ण सत्ता आली. मात्र अरबांना काबूत ठेवणे आता अधिक कठीण होत चालले. एकदा तर स्वतः रावजी इंग्रजांना भेटून खंबातहून परत येत होते. अरबांनी त्यांच्या पालखीवरच हल्ला केला. गोळ्या झाडून पालखीवाहकांना ठार मारले. सगळीकडून परिस्थिती बिकट होत चालली. यातून सुटका करून घेण्यासाठी रावजींनी ब्रिटिश सरकारची मदत घेण्याचे ठरवले. यातून सन १८०२ साली मेजर वॉकरची नियुक्ती बडोद्याचे रेसिडेंट म्हणून करण्यात आली. त्यानंतर बऱ्याच वर्षांपर्यंत रेसिडेंट हाच बडोद्याचा खरा शासक बनला.

आनंदराव गायकवाड यांनी दिवाण रावजी अप्पाजी फणसे यांच्या मदतीने ६ जून १८०२ मध्ये ईस्ट इंडिया या ब्रिटिश कंपनीबरोबर मित्रत्वाचा करार केला. १७७९ साली पेशव्यांची इंग्रजांशी लढाई झाली. त्यावेळी बडोद्याच्या फत्तेसिंहांनी ब्रिटिश जनरल गार्डर्ड यांच्याशी धोरणाने

वागून कंपनीशी बचावाचा व चढाईच्या स्वरूपाचा मैत्रीचा तह केला. यामुळे बडोदेकर ब्रिटिशांचे दोस्त ठरले. पेशव्यांना शह देण्यासाठी गायकवाड ब्रिटिशांचे मित्र ठरले. या तहाने पेशव्यांचे बडोद्यावरील वर्चस्व कमी होऊन, मित्र झालेल्या ब्रिटिशांनी गायकवाडांच्या रक्षणाचा भार इंग्रजांनी पत्करला. एक प्रकारे इंग्रजांचे काही प्रमाणात वर्चस्व स्थापित झाले. गायकवाडांच्या रक्षणाचा भार इंग्रजांनी पत्करला व गादीच्या उत्तराधिकाराची संपूर्ण हमी इंग्रजांनी घेतली; तसेच पेशव्यांशी होणाऱ्या वाटाघाटीत मध्यस्थांचे स्थानही इंग्रजाने घेतले. १८०२ च्या तहाद्वारे पेशव्यांची गायकवाडांवर नाममात्र सत्ता राहिली. सन १८०२ च्या तहाला मंजुरी देताना आनंदरावांनी माझ्या स्वातंत्र्याविरुद्ध व माझ्या आयुष्याविरुद्ध दुष्ट बुद्धीची पुष्कळ अरब मंडळी असल्याने माझ्या प्रजेने माझ्या हुकमाकडे लक्ष न देता मेजर वॉकरच्या हुकमाचे पालन करावे; तसेच माझ्याविरुद्ध कोणीही दुष्टबुद्धीच्या व्यक्तींनी अवाजवी किंवा अयोग्य वागण्याचा प्रयत्न केला, जर मी स्वतः किंवा माझ्यानंतर गादीवर येणाऱ्या कोणीही; तसेच माझे दिवाण किंवा त्याचे नातेवाईक हे अयोग्यरीतीने अथवा अन्यायाने वागतील तर इंग्रज सरकारला हस्तक्षेप करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे अधिकृतपणे त्यांनी जाहीर केले.

इंग्रज लोकांना अशा प्रकारचे अधिकार मिळाल्यावर त्यांनी बडोदाच्या दिवाणाच्या प्रत्येक कामात व वसुलीवरही बारकाईने लक्ष ठेवले. महाराज राज्यकारभार चालवण्यास अकार्यक्षम आहेत, असे ठरविल्यामुळे ते राज्यकारभारात अजिबात हात घालत नसत. राज्यकारभार पाहण्यास प्रधान मंडळ नेमले होते, त्यात रेसिडेंट किंवा त्यांचा स्थानिक प्रतिनिधी असल्याशिवाय सर्व कारभार रद्द असे समजले जात असे.

बडोद्यात कारभार दोन पक्षात विभागला गेला. गंगाधरशास्त्री यांचा इंग्रज सरकारच्या मेहरबानीवर पूर्ण विश्वास होता. हा एक पक्ष होता. दुसरा पक्ष तख्ताबाई या आनंदरावांच्या पत्नींचा होता. त्या बदनाम झालेल्या दिवाण सीतारामाच्या बाजूच्या होत्या आणि राजवाड्यातील मंडळी दिवाणाच्या बाजूचे होते.

सन १८१७ साली बडोदे आणि इंग्रजात पुन्हा पुरवणीदाखल एक तहनामा झाला होता. त्याच्या ८व्या कलमाप्रमाणे गायकवाडांनी नियमितपणे रेसिडेंटचा पगार देऊन व योग्य रीतीने हिशोब ठेवून ३००० शिपायांचे हत्यारबंद सैन्य रेसिडेंटच्या अधिकाराखाली तसेच प्रदेशाच्या देवाणघेवाणीसंबंधी कपडवंज, भालेज, करोड व दुसरी काही खेडी इंग्रजांना दिली. त्याच्या बदल्यांत विजापूर व कडी येथील तप्पासमा इंग्रजांकडून घेतले. कंपनी सरकारने भेटस्वरूप ओखामंडळ, द्वारका व बेट गायकवाडांना दिले; कारण या दोन्ही ठिकाणी हिंदू देवस्थाने होती. यालाच १८०२ नंतरचा निश्चित करार असे म्हटले जाते.

काही दिवसांनंतर अहमदाबाद जिल्ह्याची गायकवाडांची हवेली, दसकोरी त्याच्या इनामगावासह दुमालगामची मागणी इंग्रजानी फत्तेसिंगांकडे केली. सन १८१८ रोजी ही गावे देऊन पेटलादमध्ये काही जमीन, सुरत अठ्ठाविशीतील मुघलाईच्या नावे असलेली व तरकसिर परगणा इंग्रजांकडून घेतले. पुढे पेटलादमधील जो पेशव्यांचा भाग होता तो घेऊन त्या बदल्यात उमरेठ पेशव्यांना देण्यात आले. सिद्धपूर हे क्षेत्र असल्याने ते गायकवाडांनी ठेवले.

सन १८१८ रोजी अवघ्या २६ व्या वर्षी क्षुल्लक ताप येऊन फत्तेसिंगचा (रिजंट) मृत्यू झाला. लगेचच सयाजीरावांची रिजंट म्हणून नेमणूक झाली; पण २ ऑक्टोबर १८१९ ला आनंदरावांना देवाज्ञा झाली.

आनंदराव मुळातच दुर्बल व कमजोर व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांचे दोन भाऊ फत्तेसिंग व सयाजी त्यांचे रिजन्ट म्हणून राहिले. रावजी अप्पाजी फणसे, सीताराम, बाबाजी, विठ्ठलराव भाऊ आणि गंगाधरशास्त्री या पाच दिवाणांनी यांच्या कारकिर्दीत राज्यकारभार सांभाळला. शिवाय इंग्रज सरकारने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. श्री. चिं. वि. जोशी यांनी बडोदा ब्लू बुक, १९४४ मधील एका लेखात असे नमूद केले आहे की, आनंदरावांच्या काही हुकमातून त्यांचा उदार व १२५ वर्षे जुन्या सामाजिक रीतिरिवाजाच्या बंधनातून बाहेर पडण्याचा दृष्टिकोन दिसून येतो.

सयाजीराव दुसरे (१८१९-१८४७)

सन १८१९ च्या सुमारास सयाजीराव दुसरे गादीवर आले. या कालखंडात एक वेगळा इतिहास निर्माण झाला. सयाजीरावांनी आर्थिक अडचणीची व्यवस्था एकहाती करण्याचा प्रयत्न केला. कुठल्याही परक्या-इंग्रजी हस्तक्षेपाला हुसकावून लावले. यात सैनिक वर्गाचा जास्त फायदा झाला नाही. मंत्र्यांच्या प्रभावाला झुगारून टाकायचा निर्णायक प्रयत्न करण्यात आला. गोविंदरावांच्या कारकिर्दीत मंत्र्यांशिवाय कुठलेही काम पुढे सरकत नव्हते. आपल्या २८ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीच्या शेवटी सयाजीरावांनी रेसिडेंट, मंत्री आणि जबाबदार रयतेशिवाय एकट्याने राज्य करायची फार मोठी किंमत मोजली. सयाजीरावांना स्वतःचे राज्य दुसऱ्यांच्या हस्तक्षेपाने चालवणेच मान्य नव्हते आणि कारभाऱ्यांच्या सल्ल्याने पण आपला निर्णय सहजासहजी बदलणारे ते नव्हते.

सयाजीरावांच्या कारकिर्दीस सुरुवात झाल्यापासून त्यांचे त्यांच्या बलाढ्य स्नेह्यांशी तंटे व्हावे असे विधिलिखितच होते. फत्तेसिंगांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी राधाबाई यांनी सती जाण्याची धमकी दिली; परंतु गायकवाड घराण्यातील पण गादीला वारस होणार नाही अशा लांबच्या एका मुलाला दत्तक घेण्याची परवानगी देऊन त्यांचे मन वळवण्यात आले. या दत्तक मुलाला आपल्या वडलांची खासगी मालमत्ताच वारशाने मिळेल असेही स्पष्ट करण्यात आले. आनंदरावांच्या विधवा तख्ताबाईला मुले होती; पण त्या आनंदरावांची विवाहित पत्नी नव्हती. तख्ताबाईने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर राधाबाईचीच युक्ती वापरली. सती जाण्याची धमकी दिली; परंतु तिच्या पोकळ धमकीकडे कोणी लक्ष दिले नाही. रेसिडेंटने तिला समजावून सांगितले की, अशा प्रकारच्या आपल्या मुलांच्या बाबतीतले अविचारी हक्क जर सयाजीरावांना समजले तर त्याचे परिणाम वाईट होतील. या खोट्या हक्काखेरीज तख्ताबाईंनी मुख्य तिजोरीच्या खोलीच्या किल्ल्या त्या आपल्या नवऱ्याचा खासगी वारसा आहे असे सांगून स्वतःकडेच ठेवल्या होत्या. सयाजीरावांनी ही संस्थानाची मालमत्ता आहे अशी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण त्या मानायला तयार नव्हत्या. शेवटी, इंग्रज गव्हर्नर बॉम्बेहून येऊन या वादाचा निकाल लावेपर्यंत काही महिने ही तिजोरीची खोली इंग्रज शिपायांच्या पहाऱ्यात राहिली. इंग्रज

सरकारच्या जामीनकीवर या राणी आणि तिच्या दोन मुलांसाठी नेमणूक करून दिली गेली. फत्तेसिंगांच्या विधवेने परत आपला मुलगा गोविंदराव याचा गादीवरील हक्क मागितला; पण इंग्रजांनी जमीनकी रद्द करून १८२६ ला त्यांना पण नेमणूक करून दिली. अशा घरगुती कलहांना तोंड देत सयाजीरावांचे राज्य सुरू झाले.

बॉम्बे सरकार आता सयाजीरावांचे बाह्यतः चांगले मित्र बनले. १८३५ च्या अखेरीस मिस्टर विल्यम्स हे गुजरातचे पोलिटिकल कमिशनर म्हणून बडोद्यात आले. १३ फेब्रुवारी १८३८ ला कोर्ट ऑफ डायरेक्टर्स मागील चूक सुधारून पोलिटिकल कमिशनरांनी बडोद्याचे दरबारी राहावे आणि महाराजांमध्ये व्यक्तिगत संपर्क साधावा. अशा तऱ्हेने बॉम्बे सरकारने या कौटुंबिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याचा चांगला निर्णय घेतला.

राज्यकारभारात रेसिडेंटचा कोणत्याही प्रकारचा सक्रिय सहभाग नव्हता तथापि विशेष प्रसंगी पैशाच्या सर्व व्यवस्थेसंबंधी त्यांना माहिती देणे आवश्यक होते. विशिष्ट प्रसंगी त्यांना सल्ला देण्याचा आणि तो सरकारला कळवण्याचा हक्क इंग्रजांना होता. अशा तऱ्हेने नेटिव्ह एजंटचे स्थान दुय्यम झाले. महाराजांना परराष्ट्र व्यवहाराव्यतिरिक्त इतर व्यवहारात पूर्ण स्वातंत्र्य होते. तसेच इंग्रजांच्या सल्ल्याने स्वतःच दिवाणही निवडण्याची पूर्ण मुभा होती. थोडक्यात, सयाजीरावांच्या (२ रे) कारकिर्दीचा प्रारंभ भरभराटीने झाला. त्यांना कर्ज होते; पण ते फेडण्याचे मार्ग सरळ आणि सोपे होते. काही दिवाण आणि सावकारांना इंग्रजांमार्फत करारनामे दिले होते; परंतु ते फारसे अवघड नव्हते. निदान दुसऱ्या गायकवाडांनी दिलेल्या वचनांपेक्षा ही सरळ व सोपी होती. राजा अगदीच स्वतंत्र नव्हता; पण त्याच्या पूर्वजांपेक्षा पुष्कळच स्वावलंबी होता. इंग्रज सरकारशी संघर्ष न होऊ देता सलोख्याने पुढे जाणे शक्य होते.

सयाजीरावांनी रेसिडेंटनी हमी दिलेली कर्जे मात्र परत केली नाही. सयाजीराव महसूल वसूल माफ करण्याबद्दल आणि गुन्हेगारांना दंडाची माफी करण्याबद्दलही नजराणे घेत. महाराजांनी पैसा गोळा केला; परंतु त्याचा योग्य विनयोग केला नाही. त्यांनी जो मार्ग पत्करला होता तो सकृद्दर्शनी जरी लबाडीचा, फसवणुकीचा होता तरी त्यांचा मुख्य उद्देश कदाचित ब्रिटिश सरकारची ढवळाढवळ व देखरेख, परक्यांची जामीनकी; तसेच बाह्य मदतीवर अवलंबून असलेल्या सावकारांच्या वर्चस्वातून सुटका असे असण्याचा संभव आहे. अर्थातच, महाराजांनी अलीकडे काढलेली कर्जे फेडण्याचे वचन पाळले नाही. याचा परिपाक महाराजांची खासगी तिजोरी भरत चालली होती मात्र राज्याची तिजोरी रिकामी होत चालली होती. हे ओळखून इंग्रज रेसिडेंटने कर्जाचा काही भाग खासगी तिजोरीतून भरावा असा सल्ला दिला; परंतु महाराजांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला.

सयाजीराव (२ रे) महाराजांनी पुष्कळ सामाजिक सुधारणा केल्या. एकदा मिस्टर सादरलँड या रेसिडेंटने रत्नागिरीच्या एका ब्राह्मणाची बायको सती गेल्याची बाब सयाजीरावांच्या नजरेस आणली. सयाजीरावांनी लगेच १३ एप्रिल सन १८४० रोजी सती जाण्याचे कामी मदत करणे कायद्याने गुन्हा आहे असे घोषित केले. त्यांनी घालून दिलेले उदाहरण रेवाकांठच्या महाराजांनी लगेचच गिरविले.

इंग्रज रयतेपैकी कोकी जातीचा एक मनुष्य बडोदा कॅम्पमध्ये राहत होता. त्याने आपली ६-७ वर्षांची मुलगी आपल्या पत्नीच्या अनुमतीशिवाय आपल्या जातीतील एका मनुष्यास विकली. असेच एक दुसरे उदाहरण पण घडले. याच्या परिणामी हिंदूंची मुले मुसलमानांना विकू नयेत आणि असल्या प्रकारची कोणतीही विक्री हुजुरांच्या हुकमाशिवाय होऊ नये असा २६ जून १८४९ रोजी १८०५ च्या तहाच्या कलम प्रमाणे ९ आणि १८२७ च्या नोंदणी क्रमांक १४ प्रमाणे असा हुकूम काढला.

आपल्या आश्रयास राहिलेल्या गुलामास, बायकांस, त्यांच्यावर हक्क सांगणाऱ्यांच्या स्वाधीन होण्याचे नाकारण्याचा आणि सिव्हिल कोर्टाकडे दाद मागण्याचा हक्क २४ मे १८५३ साली देण्यात आला. याप्रमाणे या सौम्य गुलामांच्या व्यापारावर दाब व देखरेख ठेवण्यात आली. बडोद्यात गुलाम म्हणून जी मुले विकण्यात येत असत, त्यांना चांगल्या रीतीने वागविण्यात येत असे आणि त्यांना जन्मभर घरनोकराची जागा मिळत असे.

सयाजीराव मूलतः एक सशक्त व बलवान व्यक्ती होते. आपल्या संपूर्ण आयुष्यभर त्यांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. आपल्या सगळ्या समस्यांचे निराकरण त्यांनी स्वतःच्या पक्षात करून घेतले. सयाजीरावांचा रयतेवर धाक होता. कुठलेही गुप्त कारस्थान त्यांचे नाव ऐकूनच गायब होत होते. लुटारू त्यांची लूट घेऊन जाण्याच्या ऐवजी ठेवून जायचे.

ब्रिग यांच्या 'द सिटीज ऑफ गुजरात' या पुस्तकातील नोंदीनुसार, सयाजीराव वस्तुतः एक व्यावसायिक माणूस होते. कुठल्याही प्रसंगी अचूकपणा ही त्यांच्या कारभाराची विशेष ओळख होती. हे स्वभाववैशिष्ट्य खासगी जीवनामध्ये पण दिसून येते. त्यांच्या घरातील प्रत्येक नवजात औरस अथवा अनौरस बालकांच्या जन्माच्या वेळी २४ तासांच्या आत त्यांचा वाटा, हक्क कार्यालयाच्या सूत्राप्रमाणे नक्की करण्यात येत असे. आणि नंतर त्या बालकांबद्दल अधिक विचार करण्याची पालकांना जरूर राहत नव्हती. ते वडील म्हणून अचूक होते, जज म्हणून कडक शिस्तीचे होते आणि राजा म्हणून दूरदर्शी, विवेकी होते.

सन १८४५ रोजी असिस्टंट रेसिडेंट श्री. अगिल्व्ही, महाराजांच्या खासगी मालमत्तेचा अहवाल देताना म्हणतात :

१. सयाजीरावांचे नजराण्याचे सालिना उत्पन्न दोन लक्ष रुपये होते. प्रत्येक शेतकरी भाडेपट्टी धारण करणाऱ्या महसुलात रुपये १५,००० पासून ४०,००० पर्यंतचा नजराणा देत असे. शेतकऱ्यांवर काही गुन्हा लागू झाला अथवा त्यांनी दडपशाही केली तर त्याने पैसे दिले की, त्याची शिक्षा माफ होत असे. वारसांकडून आलेले नजराणे खासगी तिजोरीत जमा होत असत. बडोद्यात येणाऱ्या जिनसावरील जकातीच्या पैशाचीपण हीच गत होती. सारांश, जुन्या गायकवाडांच्या संस्थानाच्या सर्व युक्त्या सयाजीरावांना अवगत होत्या.

२. त्यांची खासगी खेडी एक लाखाची होती.

३. त्यांचा खासगी गवताच्या जमिनी, जळाऊ लाकडे वगैरेवरील कर आणि सरकारात जमा झालेली पेन्शने यातून त्यांना ४०,००० रुपये मिळत.

४. याशिवाय सयाजीराव सावकारीही करत होते. सन १८२९ मध्ये बडोद्यातील गणेश ईश्वराची मुख्य पेढी चालू झाली. त्याची राजवाड्यात दोन खाती होती. त्यातून त्यांना १,२५,००० रुपये मिळत होते. शहरातील या पेढीचे उत्पन्न ८,००० रुपये होते आणि साद्रा, कडी, पेटलाद आणि राजकोट या प्रत्येक शहरात १-१ पेढी असून सालिना त्याचे उत्पन्न ५००० रुपये होते. याप्रमाणे त्यांनी आपले खासगी उत्पन्न सालिना पाच लक्ष केले होते.

यातले खर्च करून वाचलेले पैसे ते आप्तांना व आश्रितांना देण्यात, खेळ-तमाशात, लाच देण्यात आणि गुप्तचरांना देण्यास खर्च करत होते.

बडोदा गॅझेटियरमध्ये लिहिल्याप्रमाणे सयाजीरावांमध्ये असाधारण सामर्थ्य, आत्मसमर्पण, ठाम मत आणि उद्देशाबद्दल विलक्षण दृढता होती. जो कोणी त्यांना विरोध करेल किंवा त्यांच्या सत्तेवर विश्वास ठेवणार नाही, अशा लोकांचा ते प्रदीर्घ द्वेष करून आकसाने वागायचे. सत्तेची आवड आणि त्याहीपेक्षा त्यांना जास्त पैशाची आवड होती. मंत्र्यावर अविश्वास ठेवणारे तरीही दुर्दैवाने त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्रकारच्या कुटिल मार्गाने ते जात. भित्रे व स्वाभाविकपणे थाटामाटाची आवड असणारे असले तरी अतिशय खंबीरपणे कुठल्याही बाजूची १ इंचही जमीन न जाऊ देत नसत. उपलब्ध पैशाच्या संचयापुढे स्वतःच्या खर्चाला दुय्यम स्थान देणारे होते. सयाजीरावांना रयतेनी आतापर्यंतच्या सर्व गायकवाडांपेक्षा सर्वांत जास्त मान व आदर दिला. सयाजीराव रयतेबद्दल कनवाळू होते. तसेच सयाजीराव खासगी आयुष्यात विलक्षण नीतिवान होते.

दामाजीरावांच्या नंतर गायकवाड कुटुंबात उदयास आलेले सयाजीराव दुसरे हे अतिशय उल्लेखनीय राजा होते. सयाजीरावांची राजवट दीर्घकालीन होती. सयाजीरावांना सन १८४७ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या नंतर गादीवर त्यांचे ज्येष्ठ पुत्र गणपतराव आले.

गणपतराव (१८४७-१८५६)

सयाजीरावांना पाच औरस पुत्र होते, त्यापैकी पहिले चार प्रथम पत्नी चिमणाबाईंपासून होते. त्यांना ३ अनौरस पुत्रपण होते. गादीचा वारस सयाजीरावांचे ज्येष्ठ पुत्र गणपतरावच होते. सयाजीरावांच्या मृत्यूसमयी गणपतरावांचे वय ३० वर्षांचे होते, तर द्वितीय चिरंजीव खंडेरावांचे वय २० वर्षांच्या जवळपास होते.

गणपतराव अशक्त, व्यसनी आणि अशिक्षित होते. त्यांचे आपल्या वडिलांशी पटत नसे. वडलांना पदच्युत करण्यापर्यंतची कारस्थाने त्यांनी केली. ते आपल्या कारभाऱ्यांच्या प्रचंड प्रभावाखाली होते. कप्तान फ्रेंच या ॲक्टिंग रेसिडेंटनी गणपतरावांना पुस्तके वाचण्यास, मोठ्या प्रमाणावर प्रवास करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे खूप प्रयत्न केले. पुढे पुढे त्यांनी थोडा प्रवास केला. आगगाडी काय असते हे समजण्यासाठी कॅप्टन फ्रेंचनी त्यांना आगगाडीच्या इंजिनचे मोठे खेळणे भेट दिले. त्याच अधिकाऱ्यांनी गुजरातमध्ये रेल्वेची ओळख आणि प्रसार करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तेव्हापासून संस्थानाच्या व्यापारात, राज्यकारभारात आणि चालीरीतीत रेल्वेमुळे पूर्णपणे क्रांतिकारी परिवर्तन झाले.

गणपतरावांनी मांडवी येथील अस्तित्वात असलेल्या इमारतीवर एक मजला बांधला. तेथे एक घड्याळ लावले. सन १८५३ रोजी काही इंजिनिअर लोकांनी रेल्वेचा रस्ता करण्याच्या उद्देशाने बॉम्बे आणि गुजरातमधील प्रदेशाची पाहणी करण्याचे सुरू केले. सुरतेत जेव्हा काम सुरू झाले तेव्हा हा रस्ता बडोदे संस्थानातून नेणे जरूर आहे, असे आढळून आले. गणपतरावाबरोबर पत्रव्यवहार सुरू झाला. खासगी जमिनीच्या मालकांना मोबदला देण्याचा आणि आवक-जावकमुळे जकातीच्या उत्पन्नाचे बडोदे सरकारला जे नुकसान होईल त्याची व्यवस्था करण्याचा ठराव १८५६ रोजी पास झाला. गणपतराव महाराजांनी स्वखुशीने लागेल तितकी जमीन रेल्वेसाठी दिली. वरील अटी कबूल झाल्या. खासगी जमिनींच्या मालकांना मोबदला दिला गेला. मात्र आवक-जावकच्या जकातीपासून संस्थानाच्या होणाऱ्या तोट्याबद्दल मोबदला ठरवणे कठीण होते.

पुढे सन १८५९ साली इंग्रज सरकारकडून आवक-जावकीमुळे जकातीच्या तोट्याचा मोबदला इंग्रज सरकारकडून दरवर्षी घेण्याचे खंडेरावांनी कबूल केले. तथापि रेल्वे सुरू झाल्यावर कस्टमच्या जकातीचे उत्पन्न वाढवून आणि सीमा शुल्कच्या व्यापारात भरभराट होऊन बडोदे संस्थानाला मोठ्या प्रमाणात नफा झाला. अर्थात, या दोघांची सरासरी काढणे अवघड आहे. कालांतराने आवक-जावकच्या जकातीबद्दलचे सर्व हक्क राज्याने सोडून दिले.

अशा प्रकारे बॉम्बे बडोदा आणि सेंट्रल इंडिया रेल्वेची पहिली गाडी सन १८६० च्या मध्यास सुरू झाली. या रेल्वेकरिता संस्थानाचा पैसा खर्च झाला नाही आणि या रेल्वेपासून संस्थानाला प्रत्यक्ष फायदाही झाला नाही. मात्र उलट रेल्वेकरिता जेवढी जमीन लागली त्यावरील आपला अधिकार आणि दिवाणी व फौजदारी हक्क संस्थानाला सोडावे लागले. सन १८७७ रोजी अहमदाबादपासून राजपुतान्यापर्यंत रेल्वे वाढवण्याचे जेव्हा इंग्रज सरकारच्या मनात आले तेव्हा बडोदे संस्थानाने ती जमीन इंग्रज सरकारला फुकट दिली. या जमिनीवरील राज्याच्या मालकीचे सर्व हक्क आणि अधिकार, व्यापारावरील कर रेल्वे असेपर्यंत सोडून देण्यात आले. अशा तऱ्हेने रेल्वेची ही लाईन, मीटर गेज पद्धतीने बांधण्यात आली.

गणपतराव महाराजांनी काही सामाजिक सुधारणा केल्या. लहान मुलांच्या विक्री आणि बालहत्येवर प्रतिबंध घालण्यात आला. लहान मुलांच्या लसीकरणाला प्रोत्साहन देण्यात आले. त्यांनी आपल्या राज्यात पक्के रस्ते बांधले. दोन्ही बाजूला झाडे लावून रस्ते सुशोभित केले. मोतीबाग राजवाडा बांधला. स्वभावाने ते दयाळू होते. आपल्या प्रजेकडे त्यांनी मातृप्रेमाने पाहिले. १९ नोव्हेंबर १८५६ रोजी महाराजा गणपतरावांना देवाज्ञा झाली.

महाराजा खंडेराव (१८५६-१८७०)

गणपतराव महाराजांना औरस पुत्र नसल्याने त्यांच्या नंतर त्यांचे भाऊ खंडेराव गादीवर आले. खंडेराव महाराजांची शारीरिक आणि मानसिक शक्ती प्रचंड होती शिवाय ते स्वच्छंदी, चतुर व चौकस होते. त्यांची स्मरणशक्ती चांगली होती. राजकारण आणि प्रशासनात त्यांचा मोठा सहभाग होता. स्वभावाने ते खूप प्रेमळ आणि उदार हृदयाचे होते. खंडेराव महाराजांना

खेळांची आणि शिकारीची खूप आवड होती. शिकारीच्या आवडीसाठी त्यांनी शहराच्या बाहेर मकरपुऱ्यामध्ये आलिशान राजवाडा बांधला. हा राजवाडा अतिशय काळजीपूर्वक राखलेल्या हरणाच्या रानाच्या जवळ होता.

खंडेराव महाराज तीव्र बुद्धीचे व दूरदृष्टीचे होते; तसेच त्यांची निरीक्षणशक्ती खूप चांगली होती. त्यांचे शिक्षण हे त्यांच्या पूर्वजांसारखेच अपूर्ण होते. त्यांनी सैन्याची पुनर्रचना केली तसेच जमाबंदी आणि न्यायपद्धतीत सुधारणा केली. मोठमोठी लोकोपयोगी कामे सुरू केली. या सर्वांतून त्यांचा जनकल्याणातील रस दिसून येतो. दुर्दैवाने त्यांचे कारभारी आणि सल्लागार अकार्यक्षम होते. काही काहीतर फारच कपटी होते. त्यांनी सुरू केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करण्याचे कौशल्य या कारभाऱ्यांमध्ये नव्हते. महाराजांना स्वतःला प्रजेच्या कल्याणापेक्षा डामडौलाची जास्त आवड होती. नाहीतर त्यांची कारकीर्द फारच उल्लेखनीय झाली असती.

खंडेराव महाराजांना तीन राण्या होत्या. त्यांच्या दुसऱ्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी सन १८६६ रोजी १३ वर्षांच्या जमनाबाईसाहेबांशी लग्न केले. महाराजसाहेब गादीवर बसल्याबरोबर (१८५७) बंगाल प्रांतात बंडास सुरुवात झाली आणि काही दिवस हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता कायम राहते का नाही, याबद्दल शंका उत्पन्न झाली होती. अशा बिकटसमयी हिंदुस्थानातील सर्व राजेरजवाड्यांपेक्षा गायकवाड सरकारांनी इंग्रज सरकारला मदत केली. सन १८५७ रोजी कवायती इंग्रज सैन्य गुजरातेतून काढल्यामुळे माही आणि रेवाकांठामधल्या बंडखोर लोकांनी दंगा केला; परंतु खंडेराव महाराजांनी आपल्या जवळच्या सैन्याच्या मदतीने हे बंड मोडून काढले.

सन १८५८ रोजी खंडेराव महाराजांनी केलेल्या मदतीबद्दल हिंदुस्थान सरकारने पुढील ठराव प्रसिद्ध केला. खंडेराव महाराजांनी ज्या सैन्यांना मदत दिली- त्यांच्या मदतीशिवाय आमची सत्ता बहुतेक नाहीशी झाली असती- त्याच्या मोबदल्यात गुजरातेतील बिनकवायती घोडेस्वाराच्या खर्चाकरिता दरसाल जे तीन लक्ष रुपये घेण्यात येत असत, ते ब्रिटिश सरकारने माफ केले आहेत. महाराज साहेबांच्या गादीवर बसल्यापासून जितके पैसे घेतले असतील, तितके परत देण्यात येतील. हा दंड खंडेराव महाराजांच्या वडिलांवर सन १८३९ रोजी केला होता आणि तो त्यांच्यावर एक जाहीर कलंकच होता.

याशिवाय महाराजांच्या विनंतीवरून त्यांना मोराच्या पिसांनी बनवलेली मोरचेल नजर करण्यात आली. ११ मार्च १८६२ रोजी त्यांना एक सनद देण्यात आली आणि त्या अन्वये त्यांना दत्तक घेण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला.

१८६१ साली खंडेराव महाराजांनी नवीन फौजदारी कोर्ट स्थापले. भाऊ शिंदेंना त्याचे पहिले अध्यक्ष (फौजदारी कामदार) नेमले. त्या कोर्टात खटल्यांचे तीन भाग करण्यात आले. १. चोरी आणि दरोडा २. मोठी दुखापत ३ अब्रुनुकसानी.

गुन्हेगार अपराधी ठरला तर त्याला पहिल्या अपराधाबद्दल त्याच्या मालमत्तेच्या द्वादशांश दंड, दुसऱ्या अपराधाबद्दल दशांश आणि तिसऱ्या अपराधांबद्दल एकअष्टमांश दंड होत असे. गुन्हेगार हा दंड न देण्याइतका जर गरीब असेल, तर त्यास चार वर्षांची किंवा सहा किंवा सात वर्षांची कैदेची शिक्षा होऊन त्याच्या पायात बेड्या पडत असत. काही गुन्ह्यांची विशेष चौकशी

होत असे - उदाहरणार्थ धान्याची चोरी, अब्रुनुकसानी आणि व्यभिचार. सर्वांत मोठा दंड व्यभिचाराबद्दल रुपये ५०० हा होता.

सन १८६३-६४ रोजी गुजरात दुष्काळाने होरपळून निघाला. वस्तूंच्या किमती आभाळाला पोहोचल्या. खंडेराव महाराजांनी दुष्काळग्रस्तांना उदारपणे मदत केली नसती तर हजारोंनी लोक मेले असते. महाराजा खंडेरावांनी डॉक्टर स्ट्रॅटेन यांच्या देखरेखीखाली दोन दवाखाने उघडले. नंतर द्वारका आणि धारी येथे सैन्याची देखभाल करण्यासाठी दोन इंग्रजी पद्धतीचे दवाखाने उघडले. २० लक्ष रुपये खर्चून त्यांनी मकरपुऱ्याला राजवाडा बांधला. त्यांना दागिन्यांची खूप आवड होती. आपल्या कारकिर्दीत त्यांनी सोन्याची अंबारी, दोन चांदीच्या तोफा, मोत्याची चादर व सुप्रसिद्ध हिरा स्टार ऑफ साउथ विकत घेतला होता.

१४ वर्षे राज्य केल्यानंतर खंडेराव महाराज अचानक त्यांच्या ऐन उमेदीत मकरपुरा राजवाड्यात २० नोव्हेंबर १८७० रोजी स्वर्गवासी झाले. कर्नल ब्रार, खंडेरावांची कारकीर्द सुधारणेची व प्रगतीची होती असे वर्णन करतात. सुधारणा करण्याचे प्रयत्न खूप झाले; पण त्यात कौशल्य आणि पूर्णता नसल्याने त्यांना यश मिळू शकले नाही. त्यांचा कारकिर्दीचा शेवटचा भाग त्यांच्या अकार्यक्षम कारभाऱ्यांमुळे प्रजेला जाचक झाला. त्यांच्या कारकिर्दीत शेती चांगली झाल्याने प्रजेवर त्यांनी भरमसाट कर लावले. या कराच्या बोजाखाली प्रजा भरडून गेली. सयाजीराव दुसऱ्यांनी अति काटकसरीने जपून ठेवलेले पैसे खंडेरावांनी तमाशात, कबुतराच्या लग्नात, अवाजवी खर्च; तसेच अपात्र लोकांना पैसे देऊन उधळून लावले.

महाराजा मल्हारराव (१८७०-१८७५)

मल्हारराव २५ वर्षांचे असताना सन १८५७ साली कोळी लोकांच्या मदतीने अहमदाबाद लुटण्याचा त्यांनी थोडा फार प्रयत्न केला. राजधानीच्या उत्तर भागातील लोकांना बंड करायला लावून बडोद्यावर स्वारी करून खंडेराव महाराजांना पदभ्रष्ट करण्याचा प्रयत्न केले. सन १८६३ साली खंडेराव महाराजांवर विषप्रयोग आणि त्यांना गोळ्या घालून ठार मारण्याचा प्रयत्नही केले. परिणामस्वरूपे मल्हाररावांना बडोद्यापासून थोड्या अंतरावरील पादरा गावात संस्थानिक कैदी म्हणून अटकेत ठेवण्यात आले. अटकेतूनही सन १८६७ साली त्यांनी खंडेराव महाराजांना मारण्याचा अजून एक अयशस्वी प्रयत्न केला.

खंडेराव महाराजांना अचानक देवाज्ञा झाली. त्यांना पुत्र नसल्याने त्यांचे धाकटे आणि एकुलते एक बंधू मल्हाररावांना बडोद्यात गादीवर आणण्यात आले. त्यावेळी त्यांचे वय ३३ वर्षांचे होते. खंडेरावांच्या राणी जमनाबाई महाराणींनी आपण गरोदर आहोत, असे जाहीर केल्याने मल्हाररावांना रिजेन्ट म्हणून नेमण्यात आले. या काळात जमनाबाईंवर विषप्रयोग करण्याचा, त्यांना जीवे मारण्याचे अतोनात प्रयत्न मल्हाररावांनी केले गेले. सन १८७१ जुलै ७ रोजी महाराणी जमनाबाईंनी कन्यारत्नाला जन्म दिला आणि शेवटी मल्हारराव गादीवर आले.

सुरुवातीला त्यांनी इंग्रजांशी सलोखा करण्याचा प्रयत्न केला. गोपाळराव मैराळासारख्या हुशार आणि प्रतिष्ठित माणसाला दिवाण नेमले. दुर्दैवाने मैराळांचा लवकरच मृत्यू झाला.

मल्हारराव महाराजांनी आरंभी शहराच्या मध्यभागी सूरसागर तलाव, एक हायस्कूल आणि दुसऱ्या काही देशी शाळा बांधल्या. नजरबाग राजवाडा बांधला आणि दोन सोन्याच्या तोफांची निर्मिती केली. त्यांनी त्यांच्या भावाच्या कुटुंबीयांना, त्यांच्या मर्जीतल्या लोकांना, त्यांच्या आश्रितांना खूपच वाईट, क्रूर वागणूक दिली. अशा लोकांना नोकरीवरून दूर करण्यात आले. त्यांचा दोष कितीही मोठा असला तरी हे लक्षात ठेवायला पाहिजे की, सात वर्षांच्या लांब व कठीण कारावासात राहिल्याने ते मानसिकदृष्ट्या दुर्बल झाले होते. अचानक मिळालेल्या राज्याच्या सर्वोच्च पदाची जबाबदारी सांभाळणे त्यांना कठीण गेले.

युनायटेड स्टेट्समधील बंडाच्या वेळी हिंदुस्थानातील कापसाचा भाव अतिशय वाढला, तो इतका की, एक किंवा आणा पौंडाचा भाव १ रुपया झाला. बडोदे संस्थानातली जमीन कापूस पिकण्यालायक होती आणि कापसाचा भाव वाढल्याने कापसाची लागवड खूपच झाली आणि त्या पिकामुळे शेतकऱ्यांचे कर देण्याचे सामर्थ्य वाढले होते. सन १८६४ साली जी जमाबंदी झाली त्या वेळी कापसाचा भाव फार येत असल्यामुळे त्याच्या धोरणावर सारा ठरवण्यात आला. संस्थानाचा खर्चही फार अवाढव्य वाढला होता. अमेरिकेची लढाई संपल्यावर कापसाचा भाव उतरला; पण जमीन महसूल कायम राहिला. लोकांना ते हळूहळू जड जाऊ लागले आणि तो वसूल करण्याकरता सरकारचा अंमल कडक झाला. त्यामुळे पुष्कळ चांगली जमीन लोकांना सोडून द्यावी लागली. मल्हाररावांना, सारा वसूल करण्याची असलेली रानटी पद्धत बंद करून योग्य आणि नेमस्त सारा बसवून लोक नाखूश राहणार नाहीत, अशी तजवीज करण्याबद्दल रेसिडेंटनी उपदेश केला.

मल्हाररावांनी आपल्या लहानशा कारकिर्दीत त्यांच्या बंधूंनी लादलेले जबरदस्त सारे तसेच ठेवले, एवढेच नाहीतर पैसे उकळण्याकरिता अनेक निंद्य उपाय योजले. आधीच कराने दडपून गेलेल्या रयतेवर राज्यारोहण नजराणा नावाचा आणखी एक मोठा कर बसविला, तशाच प्रकारचा एक कर वहिवाटदारांवर पण बसवला. अशा प्रकारच्या वागणुकीने साधारण प्रजाजन, सरदार लोक, लष्करी लोक, पेढीवाले तसेच श्रीमंत लोक मल्हाररावांच्या विरुद्ध झाले आणि या सर्व लोकांची ओरड इंग्रज सरकारच्या कानी गेली.

१८७३-७४, मिड कमिशनचा निकाल झाल्यावर मल्हाररावांना आपल्या राज्यकारभारात सुधारणा करण्याची समज देण्यात आली होती, तिला अनुसरून त्यांनी सुधारणा करण्याचा बेत केला. राज्यकारभारात दादाभाई नौरोजी या हुशार व्यक्तीला दिवाणपदी घेण्याचा निर्णय घेतला. दादाभाई नौरोजी बडोद्याचे दिवाण म्हणून आले. यांना पूर्ण अधिकार देऊन त्यांच्यामार्फत सुधारणा करावी अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. त्या उद्देशाने यापूर्वी मल्हाररावांनी त्यांचा सल्ला घेण्यासाठी विलायतेहून बोलाविले होते; पण रेसिडेंटला आपल्या स्वतःच्या अधिकाराचे आकुंचन होण्याच्या भीतीमुळे सदर नेमणूक नापसंत होती. त्यांच्या दुर्दैवानं हीच गोष्ट त्यांच्यात आणि कर्नल फेअर यांच्यामध्ये तुंबळ युद्ध माजवण्यास कारणीभूत झाली.

दादाभाई नौरोजी यांचे नाव हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जागृतीच्या अर्वाचीन इतिहासात अग्रभागी चमकत आहे. मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांनी प्रोफेसर म्हणून काम केले होते. त्यानंतर राष्ट्रीय जागृतीसाठी एक वर्तमानपत्र सुरू करून त्याद्वारे ते सामाजिक आणि राजकीय बाबतचे शिक्षणही हिंदुस्थानच्या जनतेला देत असत. त्यानंतर ते व्यापाराच्या निमित्ताने विलायतेस गेले आणि तेथे असताना आपल्या असाधारण बुद्धिमत्तेचे व प्रामाणिकपणाने त्यांनी पुष्कळ कीर्ती संपादन केली होती. त्यांना मनुष्य-स्वभावाची उत्कृष्ट पारख असून, सरकारांतही त्यांचे वजन मोठे होते. अशा स्थितीत त्यांना अधिकारस्वातंत्र्य मिळाले असते, तर त्यांनी बडोद्याच्या राज्यव्यवस्थेच्या अनागोंदी व्यवहारास चांगले वळण दिले असते. परंतु दैवयोग तसा नव्हता; कारण त्यांच्या दिवाण म्हणून झालेल्या नेमणुकीच्या प्रारंभापासून कर्नल फेअर यांनी त्यांच्याशी वैर सुरू केले.

ता. ११ ऑगस्ट १८७४ रोजी रेसिडेंटसाहेब यांनी मुंबई सरकारास उद्दामपणाचा रिपोर्ट केला, त्यात म्हटले आहे की, 'माझे मत विचारात घेतले तर मी निश्चयपूर्वक असे सांगू शकतो की, दादाभाई आणि त्यांचे साथीदार यांच्यात राज्यकारभार चालविण्याची पात्रता आणि कुवत नाही.'

२४ ऑगस्ट १८७४ रोजी मुंबई सरकारने उत्तरादाखल असे कळवले, 'तुम्ही गायकवाडांस असे कळवावे की, आपण दादाभाई यास दिवाण नेमीत असाल, तर त्याला काही हरकत करण्याची आमची इच्छा नाही. याप्रमाणे त्यांना कळवून दिवाणांना तुम्ही शिरस्त्याप्रमाणे लष्करी सन्मान द्यावा.'

रेसिडेंटच्या त्यावेळच्या वागण्यासंबंधी अशा परिस्थितीत ४ सप्टेंबर १८७४ या पन्नासाव्या वाढदिवशी दादाभाईंनी दिवाणपदाची जबाबदारी स्वीकारली. खुद्द दादाभाई यांनी लिहिलं आहे की, 'सरदार, शिलेदार आणि दुसऱ्या लोकांनी राजा-दिवाणांकडं यावं आणि आपल्या इच्छेस येईल ते मागावं, आणि आम्ही ते कबूल केलं नाही की, लागलीच रेसिडेंटसाहेब याकडे जाऊन तक्रार करावी, असे चालले आहे.'

कर्नल फेअरचे मल्हाररावांबद्दल चांगले मत नव्हते. दादाभाईंची दिवाणपदी नेमणूक झाल्याने तर त्यात आणखी भर पडली. दादाभाई हे महाराजांस आपल्याविरुद्ध सल्ला देतात, अशी फेअरची पक्की समजूत होती. वस्तुतः दादाभाई यांच्यावरही महाराजांचा विश्वास नव्हता. त्यांना वाटे की, कर्नल फेअर यांना काढून टाकण्याच्या प्रयत्नात यश मिळाले, तर नंतर आपण दादाभाई यांनाही काढून टाकू. सदरचा प्रयत्न निष्फळ झाला, तर कर्नल फेअर यांच्या संमतीने दादाभाई यांस आपण अगोदरच रजा देऊच!

९ नोव्हेंबर १८७४ रोजी कर्नल फेअर यांना आपल्यावर विषप्रयोग झाला असल्याचा संशय आला. त्यांना रोज सकाळी सरबत घेण्याची सवय होती, काही वेळापर्यंत त्यांचे डोके अतिशय जड झाले. त्यांना मळमळायला लागले. विषाचाच हा परिणाम असावा असे त्यांना वाटू लागले. एकदम मळमळायला लागले म्हणून ते उठले आणि ग्लासात राहिलेले सरबत त्यांनी फेकून दिले, ग्लास खाली ठेवल्यावर त्यांना तळाशी थोडा गाळ जमलेला दिसला. त्यांनी लगेच

रेसिडेंट सर्जन डॉक्टर सीवॉर्ड यांच्याकडे तपासणीस पाठवला. तपासाअंती ते पांढरे सोमल व हिऱ्याच्या पुडीचे मिश्रण निघाले. मल्हारराव आपले ऐकण्यासारखे नाहीत, असे दादाभाईंच्या लक्षात आले.

याप्रमाणे प्रकरण विकोपास जात आहे असे पाहून रेसिडेंटसाहेबांनी दिवाण दादाभाई नौरोजी यांना राजीनामा देण्याचा सल्ला दिला. दादाभाईंनी राजीनामा देऊ नये असे मल्हारराव विनंती करू लागले; पण दादाभाईंनी ११ जानेवारी १८७५ रोजी राजीनामा दिला. बडोदा सोडून मुंबईत परतले. पुढे सयाजीराव गादीवर आले. सयाजीराव महाराज यांनी वेळोवेळी दादाभाई नौरोजींना मदत केली. ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळेस तसेच त्यांच्यावर झालेल्या खटल्याच्या कोर्टाच्या खर्चासाठी आणि नंतर बडोदा राज्याकडून त्यांना आयुष्यभर पेन्शनही देण्यात आली.

यादरम्यान सर लुविस पेली बडोद्यात आले आणि त्यांना एकंदर सर्व परिस्थिती फारच स्फोटक असल्याचे जाणवले. शेतकरी कराने अतिशय बेजार झाले होते; तसेच गायकवाड आणि सरदार यांच्यातले तंटे वाढले होते म्हणून सर लुविस पेले यांनी राजसूत्रे हातात घेतली. मल्हाररावांनी एका शिपायाला लाच देऊन कर्नल फेअर यांच्यावर विषप्रयोग करण्याचा प्रयत्न करविल्याचा पुरावा मिळाला. १३ माहे जानेवारी १८७५ रोजी हिंदुस्थान सरकारने जाहीरनाम्याद्वारे गायकवाडांना कैद केल्याचे प्रसिद्ध केले आणि मल्हारावांच्या वागणुकीबद्दल चौकशी होऊन त्याचा निकाल लागेपर्यंत राणी व्हिक्टोरियाच्या वतीने संस्थानाची राज्यव्यवस्था आपल्या हातात घेतली असल्याचे प्रसिद्ध केले.

चौकशी आयोग नेमण्यात आला. आयोगाचे अध्यक्ष बंगालचे चीफ जस्टिस सर रिचर्ड होते. सर रिचर्ड मिड, मिस्टर मेलविल हे दोन युरोपियन सभासद; शिंदे सरकार आणि जयपूरचे महाराज हे दोन संस्थानिक व प्रतिष्ठित व्यक्ती सर दिनकरराव हे सभासद होते, मल्हाररावांच्या कपट कारस्थानाचा हा परिणाम असल्याचे इंग्रज सदस्यांचे स्पष्ट मत होते, तर मल्हाररावांना किरकोळ कारणावरून अपराधी ठरविण्यात येत आहे असे मत स्थानिक संस्थानिकांचे होते. १५ एप्रिल, १८७५ रोजी मल्हाररावांना पदच्युत करण्यात आले आणि सर टी. माधवरावांना राज्यकारभार चालविण्यास बोलवले गेले; तसेच १८७५ च्या बंडाच्या धामधुमीत ज्यांनी आपली निष्ठा दाखविली त्या खंडेराव महाराजांच्या पत्नी महाराणी जमनाबाई यांना दत्तकाचा अधिकार बजावण्याची मुभा दिली.

१९ एप्रिल, १८७५ रोजी एका जाहीरनाम्याद्वारे मल्हाररावांना पदच्युत करून मद्रासला रवाना करण्यात आले. गायकवाडांची खासगी मालमत्ता कोणती आणि संस्थानाच्या खर्चाकडे कोणता वसूल लावावयाचा, यामधील अंतर इतके कमी होते की, ज्यावेळी मल्हाररावास कैद केले त्यावेळी सरकारी तिजोरीत फक्त काही हजार रुपये आणि राजवाड्यात लपवून ठेवलेले ४० लक्ष रुपये सापडले आणि पुष्कळ पैसे खासगी रीतीने चोरून बाहेर पाठविण्यात आले, हेही उघडकीस आले.

महाराणी जमनाबाई

बडोद्यामध्ये गादीसाठी उचित वारस न मिळाल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील गायकवाडांच्या कवळाणा शाखेतून प्रतापरावांच्या वंशजाला दत्तक घेण्याचे नक्की झाले. महाराजा खंडेरावांना दत्तक घेण्याचा हक्क इंग्रजाने दिला होता तो हक्क बजावण्यासाठी त्यांच्या विधवा पत्नी महाराणी जमनाबाईसाहेबांना बडोद्यात परत आमंत्रित करण्यात आले. २ मे १८७५ रोजी त्या बडोद्यात आल्या. त्यांनी कवळाणा शाखेतील गोपाळरावांची निवड केली. या अचूक निवडीबद्दल प्रत्येक बडोदेकराने पिढ्यान्पिढ्या महाराणी जमनाबाईविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

खान्देशातील एका दूरच्या लहान खेड्यातील एक १२ वर्षांचा अशिक्षित मुलगा बडोद्यात येतो आणि दैवयोगाने एका मोठ्या संस्थानाचा दत्तकपुत्र बनतो, ही एक मोठी विलक्षण घटना होती. सामान्य घरातून आलेले हे गोपाळराव अचानक एका मोठ्या सत्तेचे आणि धनाचे अधिपती बनले.

समयच ठरवेल की, ही निवड योग्य आहे की नाही या अभिप्रायाने श्री. एफ. ए. एच. इलियट हे आपले 'राज्यकर्ते गायकवाड' हे पुस्तक संपवतात. अर्थातच याच्या पुढचा इतिहास आपण जाणतोच. एका अशिक्षित व लहान मुलाला दत्तक घेण्यामागे इंग्रज सरकारचा मुख्य हेतू त्यांच्या मर्जीप्रमाणे वागेल असा राजा घडवायचा होता; पण झाले वेगळेच. पहिल्या दहा वर्षांत महाराजांनी राज्य सुधारणा आणि सर्व क्षेत्रांत केलेली प्रगती इंग्रज सरकारला पुढे खुपू लागली. महाराजांचे मार्गदर्शक इलियट यांना इंग्रज सरकारने परत बोलवून विजापूरला कलेक्टर या कमी दर्जाच्या पदी त्यांची नेमणूक केली. महाराजांचा आपल्या गुरूबद्दलचा आदर शेवटपर्यंत टिकून होता, ते नेहमीच आपल्या पत्रात त्यांचा उल्लेख My Dear Sir असे आदराने करत. १९१० ला श्री. इलियट हे जग सोडून गेले.

महाराजा सयाजीराव तिसरे (१८७५-१९३९)

दिवाण सर टी. माधवराव आणि श्री. इलियट यांनी सयाजीराव महाराजांच्या अभ्यासक्रमाची रूपरेखा बनवली. सयाजीराव महाराजांची मनन आणि निरीक्षण शक्ती निसर्गतःच चांगली होती. श्री. इलियट यांच्या काळजीपूर्वक मार्गदर्शनाने हळूहळू सुधारली. राजे जलदगतीने Principal of Conduct शिकले, ज्याचा त्यांना पुढील आयुष्यात बहुमोल उपयोग झाला. महाराजांना विविध प्रकारच्या शारीरिक व्यायामात, कुस्ती, घोडस्वारी आणि सगळ्या प्रकारच्या खेळात सातत्याने रस होता. कधीकधी ते आणि मिस्टर इलियट जवळपासच्या शिकारीच्या सफरीवर जात असत. श्री. इलियट यांचा कल या बाबतीत महाराजांना जास्त उत्तेजित करण्यापेक्षा प्रतिबंधित करणे यावर होता.

श्री. एफ. ए. एच. इलियट यांचे नाव इतिहासात नेहमीच आदराने घेतले जाईल. त्यांनी महाराजांना दाखवलेल्या मार्गावर महाराज आयुष्यभर चालले. महाराणी जमनाबाई व श्री. इलियट यांनी बडोदे शहराने कधीही न विचार केलेल्या समृद्ध युगाचा पाया घातला. 'राज्यकर्ते

गायकवाड' हे पुस्तक इतर पुस्तकांपेक्षा अतिशय वेगळे असल्याचे कारण या पुस्तकात आपल्याला गायकवाडांच्या गुजरातेत स्थापन झालेल्या वंशाच्या वृद्धीचा इतिहास प्रथमच बघायला मिळाला.

दामाजीरावांनी आपल्या ताकदीने आणि कौशल्याने गायकवाडांच्या राज्याची सीमा वाढवली. खंडेरावांनी निरनिराळ्या सामाजिक सुधारणा करून गायकवाड वंशाची उन्नती केली; पण राज्यक्रांती अजून यायची होती. १८७५-८१ च्या महाराजांच्या किशोरावस्थाच्या राजवटीच्या वेळेस अनेक दुरुपयोगी गोष्टींमध्ये सुधारणा करण्यात आल्या आणि जेव्हा महाराजांची राजवट खऱ्या अर्थाने चालू झाली तेव्हा राज्यात पद्धतशीर, शिस्तबद्ध व संस्मरणीय सुधारणा झाली. ती अविरत चालू राहिली आणि त्या योगे बडोद्याची ओळख, नाव आणि प्रतिष्ठा दूरदूरच्या देशात आणि भारतातील इतर अनेक राज्यांमध्ये वाढली.

१८८१ साली सयाजीराव महाराजांचे शिक्षण पूर्ण झाले. त्यांच्या राज्याभिषेकानंतर त्यांच्या किशोरावस्थेत विस्तृतपणे विशेष शिक्षण देण्यात आले. त्यांच्यासाठी राजाला आवश्यक असा एक असाधारण अभ्यासक्रम बनवण्यात आला होता. त्यांच्या पूर्वजांना चांगल्या शिक्षणाचा फायदा न मिळाल्याने आणि त्याचे नुकसान डोळ्यादेखत बघितल्याने कदाचित महाराणी जमनाबाईंनी ठामपणे त्यांचा सर्वांगीण शिक्षणाचा आग्रह ठेवला होता. शिक्षणाने त्यांना एक कणखर व्यक्ती बनवले. त्यांची निवेदने नेहमीच प्रामाणिक व स्नेहभावी असायची. त्यांना प्रयत्नपूर्वक योग्य मार्गावर ठेवण्याची जबाबदारी राजवाड्यात महाराणी जमनाबाई आणि शाळेमध्ये श्री. इलियट यांनी पार पाडली. त्यांच्या शारीरिक प्रशिक्षणाकडे पण काळजीपूर्वक लक्ष देण्यात आले.

सन १८८१ मध्ये त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर एक भव्य समारंभ करून महाराजांना सार्वभौम सत्ता सोपविण्यात आली. या वेळेस त्यांचे वय अवघे १८ वर्षांचे होते. या सुमारास देशात सांस्कृतिक जागृती आकार घेत होती. अनेक समाजसुधारक व महापुरुषांद्वारे सांस्कृतिक जागृतीची आंदोलने सुरू झाली होती. त्यात आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज आणि रामकृष्ण मिशनची अहम भूमिका होती. पश्चिमेच्या शिक्षणाने आणि सभ्यतेने समाजाच्या शिक्षित वर्गावर बराच प्रभाव पडला होता. त्यामुळे हा शिक्षित वर्ग सामाजिक जीवनातील मध्यकालीन अंधश्रद्धा आणि परंपरेतून बाहेर पडण्यास उत्सुक होता. तसेच देशात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी संघर्ष आणि देशभक्तीच्या भावनेचा प्रस्फोट झाला होता. अशा तऱ्हेने संपूर्ण राष्ट्र एका नव्या दिशेकडे चालले होते.

धर्म, संस्कृती, साहित्य, इतिहास इत्यादी जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रात नवीन अंगाने विचार सुरू झाले होते. आपल्या धर्माची परिस्थिती अतिशय विकृत होऊन केवळ अंधश्रद्धा, परंपरा यालाच महत्त्व देण्यात येत होते. पुरोहित वर्ग सर्वेसर्वा होऊन सामाजिक आणि धार्मिक गोष्टींमध्ये आपल्या स्वार्थाच्या दृष्टिकोनातून परंपरेची व्याख्या बनवत होते. त्यामुळे धर्म हा अपरिवर्तनीय बनला होता आणि सामाजिक विकासाला बाधक ठरत होता. जातिप्रथा, अस्पृश्यता, बालविवाह, विधवा-विवाह प्रतिबंध, पडदाप्रथा, स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवणे, शिक्षणाविषयी उपेक्षा या सगळ्या वर्षानुवर्षे चालत असलेल्या परंपरांमुळे समाज आपला आत्मविश्वास हरवून बसला

होता. जवळजवळ सगळ्याच सामाजिक संघटना समाजाला या विकृतींमधून सोडवण्याचा प्रयत्न करत होत्या. तसेच देशात राजनैतिक जागृती आणण्याचा प्रयत्न करत होत्या. देशातील जनतेत इंग्रजांविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण झाला होता आणि स्वातंत्र्याचा भाव जागृत झाला होता.

महाराजांनी जेव्हा राज्याची सूत्रे हातात घेतली तेव्हा ते युवा अवस्थेत होते. अमर्याद सत्ता आणि अमर्याद पैसे हातात आल्यावर कोवळ्या वयात वाईट मार्गाला लागण्याची शक्यता जास्त होती; पण शिक्षण, महाराणी जमनाबाईंचा प्रभाव, दिवाणांची देखरेख यामुळे वैचारिकदृष्ट्या ते प्रौढ झाले होते. त्यांच्यावर कुलीनतेचे संस्कार होते. छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठ्यांची शौर्य परंपरा यांचा गौरवशाली वारसा त्यांना मिळाला होता. दत्तक विधानाच्या समारंभाच्या वेळेस दिलेली अभिवचने आणि आश्वासन पूर्ण करण्याचा मनोमन दृढ संकल्प त्यांनी केला होता आणि म्हणूनच त्यांनी राज्यारोहणानंतर प्रजेच्या जीवनाचे अवलोकन करून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ते आपल्या राज्याच्या प्रवासाला निघाले.

सन १८८२-१८८७ जवळजवळ ५ वर्षांच्या या कालखंडात त्यांनी कडी, नवसारी, बडोदा आणि अमरेली या चार प्रांतांचा प्रवास केला. आपल्या प्रवासात त्यांनी घोडेस्वारी आणि बैलगाडीचा उपयोग करून कुठल्याही थाटामाटाशिवाय एका सामान्य नागरिकाप्रमाणे, रयतेचा विश्वास संपादन करत त्यांच्या सुख-दुःखात भाग घेत ते फिरले. आपली प्रजा सुखी राहील आणि उत्तरोत्तर त्याची सुख समृद्धी वाढेल अशी हार्दिक इच्छा ते व्यक्त करत होते. या प्रवासात त्यांनी गावातील शाळांना, सरकारी कार्यालयांना आणि सार्वजनिक स्थळांनाही भेटी दिल्या.

वरील प्रवास हा महाराजा सयाजीरावांना (३ रे) आपले राजेपद सार्थक करण्याकरिता नांदीरूप होता. याची फलश्रुती म्हणजे त्यांनी आपल्या राज्यकारभारात आणि राज्यात केलेल्या लोकजीवनाच्या सर्वांगीण विकासाच्या असामान्य सुधारणा आणि या सुधारणा सफलतापूर्वक लागू करण्यामुळे महाराजांनी असाधारण लोकप्रियता, रयतेचा विश्वास संपादन केला.

महाराजांच्या शासन काळात धर्म, समाज आणि प्रशासनाच्या विविध भागांत अनेक सुधारणा झाल्या. या सुधारणांच्या मागे अर्थातच राजनैतिक वातावरण हे प्रमुख कारण असले तरी महाराजांनी वारंवार केलेल्या विदेश यात्रा पण महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. प्रवास हा ज्ञानवर्धनाचा उत्तम मार्ग आहे हे महाराजांनी दाखवून दिले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत २६ वेळा परदेश गमन करून संपूर्ण युरोप, अमेरिका आणि आशिया खंड पाहिला. तेथील ज्या ज्या गोष्टी चांगल्या वाटल्या त्या त्या गोष्टी त्यांनी आपल्या राज्यात अमलात आणल्या. या यात्रेत त्यांनी पश्चिमी जगताचा इतिहास, त्यांच्या वैज्ञानिक व औद्योगिक प्रगतीचा, सामाजिक जीवन आणि चालीरीतींचा सूक्ष्म अभ्यास केला. आपल्या राज्यात सुधारणा करताना हा अनुभव त्यांना खूपच कामी आला. विदेश यात्रेत पण ते मानसिक रूपाने सदैव आपल्या राज्याशी जोडलेले असत. हा प्रवास त्यांनी कधीच मनोरंजनासाठी न करता, रयतेचे कल्याण या एकाच हेतूने केला.

सुधारणेविषयी त्यांना आंतरिक प्रेम होते, ते बीज त्यांच्यात बिंबलेले होते. पश्चिमेची हवा लागून ते अंकुरित झाले व बहरून उठले; परंतु पश्चिमेच्या या प्रभावाचे त्यांनी जसेच्या तसे अनुकरण केले नाही. ते अनुकरण, नक्कल करण्याच्या विरुद्ध होते. सुधारणा सामाजिक असो

की राजकीय, प्रशासकीय ती करण्याआधी आपल्या समाजाचा आणि राज्याच्या परिस्थितीचा अनुकूलतेचा विचार करणे महत्त्वाचे होते. प्रगतीच्या या पश्चिमी रूपाचे भारतीयकरण करण्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांचे मन पूर्णतः भारतीय होते. इथला इतिहास, संस्कृती, जीवनशैली परंपरागत चालत आलेले रीतिरिवाज आणि भारताच्या प्राचीन शासनप्रणालीचे त्यांना सखोल ज्ञान होते. हिंदुस्थानातील मुलांना युरोप, अमेरिका, जपान या विकसित देशांमध्ये औद्योगिक प्रशिक्षणासाठी पाठवले पाहिजे. अर्थात हे करताना आपला प्रयत्न आपली परंपरा जपण्याचा असावयास हवा, असे त्यांचे ठाम मत होते.

पुढे जाऊन त्यांनी पंचायती राज्याच्या व्यवस्थेला पुनरुज्जीवित केले; तसेच जनतेला धारासभा अर्पण करून राज्यतंत्राच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण केले. यात त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

सयाजीराव महाराजांच्या पूर्व युगात हिंदुस्थानची जनता शिक्षण, विचार आणि जीवनशैली इत्यादी सगळ्या बाबतीत मागासलेली होती. इंग्रजी शिक्षणाचा थोडाफार प्रसार झाला होता. युरोपियन जीवन आणि संस्कृतीचा प्रभाव लोकांच्या जीवनावर दिसून येत होता; परंतु हे सगळे प्रभाव सीमित होते आणि समाजातील खूप छोटासा हिस्सा यांचा लाभ घेत होता, बाकीचे लोक मध्यकालीन जड परंपरांनी जखडले गेले होते. अशा समयी कुठल्याही प्रकारच्या सुधारणा करणे आणि त्यांना लागू करणे कठीण होते. या सुधारणा कायद्याच्या एका झटक्याने होऊ शकत होत्या; पण त्यासाठी समाजाच्या मोठ्या विरोधाला तोंड द्यावे लागले असते. भारतवर्षामध्ये कुठलीही सामाजिक सुधारणा करण्याआधी जनतेच्या मनाची सुधारणा स्वीकार करण्याची पूर्ण तयारी असणे आवश्यक आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. समाज मानसिक रूपाने जेव्हा तयार होईल तेव्हाच सुधारणा करणे योग्य आहे आणि त्यासाठी दीर्घ काळ थांबण्याची त्यांची तयारी होती.

सामाजिक प्रथेच्या विरुद्ध जाण्याचा परिणाम दंग्यात, बंडात होऊ शकतो हे महाराज जाणून होते. म्हणून त्यांनी रयतेच्या भावनांना ठेच लागल्याशिवाय शांती आणि सलोख्याचा लांबचा रस्ता अवलंबला. समाजसुधारणेसाठी त्यांनी संतांची व्याख्याने, प्रवचने ठेवली. साक्षरता अभियान चालवले, वेळोवेळी लक्ष्मीविलास राजवाड्यात अस्पृश्यता निवारण्यासाठी सहभोजन आयोजित केले, राज्यातील तरुणांना विदेशी पाठवून त्यांच्या बुद्धीची कक्षा वाढवण्याचा प्रयत्न केला. राज्यात संगीत, कला आणि साहित्याचे कार्यक्रम आयोजित करून जनमानसाची मने संस्कारित करण्याच्या प्रयत्न केला. वस्तुतः सयाजीराव महाराजांचे व्यक्तिमत्त्व हे एक राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व होते, त्यांची वाणी आणि कार्य राज्यात सीमित न राहता संपूर्ण देशाला प्रभावित करत होते. आपल्या राज्याची सुधारणा हे त्यांचे ध्येय नव्हते. त्यांचे ध्येय समग्र राष्ट्रोन्नतीचे होते. ते भारतमातेचे खरे सुपुत्र होते. देश आणि समाजाची एकता त्यांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची होती. आपल्या कुठल्याही कार्याने ही एकता ते बिघडवू इच्छित नव्हते. भारतमातेचे पूर्ण आणि अखंड रूपच त्यांचे आराधना केंद्र होते. त्यांच्यासाठी समाज आणि सुधारणा दोन्ही जरुरी होते. सुधारणेसाठी कायदे करून, दंड लावून, तुरुंगात टाकून त्या करणे त्यांना शक्य होते; पण त्यांनी

तसे केले नाही. समाजात सुधारणा करण्याचा विचार त्यांचा मनात पहिल्यापासून होता; परंतु कायदे करायला त्यांना अनेक वर्षे लागली.

धार्मिक सुधारणा

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाज मध्यकालीन धार्मिक अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेला होता. ब्राह्मणवर्ग, पुजारी आणि पुरोहितांचे वर्चस्व वाढले होते; पण हे पुरोहित अल्पज्ञानी, अशिक्षित आणि पाखंडी होते. आपल्या स्वार्थासाठी हे पुरोहित समाजाला मनात येतील त्या रूढींचे पालन करायला लावत होते तसेच अनावश्यक कर्मकांडाचे स्तोम माजले होते. समाज अशिक्षित होता आणि धर्मग्रंथाचे ज्ञान त्यांना नव्हते. हे धर्मगुरू त्यांचे शोषण करत होते. महाराजांनी जेव्हा आपल्या राज्यातील ही परिस्थिती बघितली तेव्हा ती बदलण्याचा विचार त्यांनी पक्का केला. काही नियम, कायदे बनवले. उभय पक्षाला सुधारण्याचा हा एकच मार्ग त्यांना दिसला. राज्यात श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी ब्राह्मणांना दान दक्षिणा देण्याची प्रथा होती. याचा फायदा अशिक्षित आणि अज्ञानी ब्राह्मणही घेत होते; तसेच गैरब्राह्मणही जानवे घालून दक्षिणेसाठी हात पसरत होते. ही कुप्रथा दूर करण्यासाठी श्रावणमास दक्षिणा परीक्षा घेण्याची महाराजांनी सुरुवात केली. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी वेद वेदांत, दर्शन, ज्योतिष आणि वैद्यकशास्त्रांचा अभ्यास करणे आवश्यक होते. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ब्राह्मणांनाच दक्षिणा घेण्याचा अधिकार बहाल करण्यात येत असे.

याच सुमारास (१९१५) राज्याकडून आर्थिक साहाय्य घेणाऱ्या मंदिरांसाठीही कायदा बनवण्यात आला. ज्या मंदिराचे हिशेब लिहिण्यासाठी व्यवस्थापक असेल आणि हिशेब राज्याचे अधिकारी तपासतील आणि त्यानंतरच त्या मंदिरास साहाय्य मिळेल. या कायद्यातील दोन महत्त्वाचे पैलू होते, एकतर पौरोहित्य कर्म करण्यासाठी सरकारची अनुमती, दुसरा आणि महत्त्वाचा म्हणजे समाजातील कुठल्याही वर्गातील वा समाजाच्या कोणत्याही व्यक्तीला ही परीक्षा देण्याचा अधिकार होता.

राज्याकडून १९१३-१४ मध्ये देवस्थान सहायकाची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या विभागाकडून यज्ञोपवीत, विवाह तसेच श्राद्ध कर्माच्या संबंधित प्रादेशिक भाषेमध्ये पत्रके काढून लोकांना या क्रियांचे स्वरूप आणि माहिती स्पष्ट केली. त्याच प्रकारे राज्याकडून धर्मोपदेशकाचीही नियुक्ती केली. धर्मोपदेशकाचे काम मंदिरांमध्ये तसेच लहान लहान गावांत फिरून उपदेश आणि प्रवचने देणे, हे होते. या प्रवचनांचा उपयोग अंत्यजोद्धारासाठी पण करण्यात आला. १९१७-१८ मध्ये धर्माध्यक्षाचे स्थान बनवण्यात आले, हे पण प्रवचन करत फिरायचे. पूर्वी राजमहालात पण धार्मिक कर्मकांड पौराणिक पद्धतीने होत होते. महाराजांना पौराणिक पद्धती जातीजातीत भेदभाव निर्माण करणारी आणि उच्चनीच भेदभावास प्रोत्साहन देणारी वाटली, म्हणून त्याचा त्याग करून वेदोक्त विधीचा स्वीकार करण्यात आला.

सामाजिक सुधारणा

सामाजिक सुधारणांमध्ये अस्पृश्यता निवारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महाराजांनी केले. हे कार्य त्यांनी सत्ता सांभाळल्यानंतर लगेच दोन वर्षांनी चालू केले. या प्रयत्नांना त्यांना लवकरच सफलता मिळाली. त्यांच्या या कार्याची प्रशंसा त्या वेळेच्या मोठ्या समाजसुधारकांनी केली. १९२१ मध्ये त्यांना परोपकारी सभेद्वारा पतित पावन या उपाधीने सुशोभित करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांनी अस्पृश्य समाजाच्या मुलांसाठी शाळा आणि छात्रालये उघडली. त्यांना अध्यापनासाठी आवश्यक सोयी केल्या, लक्ष्मी-विलास राजवाड्यात सहभोजन आयोजित केले ज्यात महाराज स्वतः उपस्थित राहत असत. प्रतिभाशाली मुलांना स्कॉलरशिप देऊन विदेशी पाठवणे, त्यांना राज्यात नोकरी देणे; तसेच राज्यातील धारासभेतही त्यांना प्रतिनिधित्व देणे, हे सर्व प्रयत्न त्यांनी समाजातील लोकांच्या मनात आत्मविश्वास आणि आत्मसन्मान निर्माण करण्यासाठी केले. अस्पृश्यता मानणे त्यांच्या दृष्टीने एक पूर्णतः अमानवी प्रथा आणि राष्ट्रीय कलंक होता.

या बाबतीत आपले विचार व्यक्त करताना ते म्हणतात, ही एक राष्ट्रीय समस्या आहे, जी कोण्या एका राजाशी अथवा व्यक्तीशी जोडलेली नाही, की फक्त तोच याचा निर्णय घेऊ शकेल. जर हिंदू समाजाला आपल्या राष्ट्राची उन्नती पाहिजे असेल तर त्याला दलित जातीचा सामाजिक तथा राष्ट्रीय स्तर उंचावणे भाग आहे. आपण आपल्या जातीची जाणीव विसरणे अत्यंत गरजेचे आणि जरुरी आहे, नाहीतर आपण आपले सत्त्व म्हणून, एक राज्य म्हणून, एक माणूस म्हणून या द्रुतगतीने पुढे जाणाऱ्या संस्कृती आणि मानवी वंशापुढे टिकू शकणार नाहीत.

या समाजाच्या पुरोहितांना गरोडा म्हणत. महाराजांनी त्यांना उत्तम प्रकारची विवाह आणि धार्मिक क्रियांची माहिती दिली व १९१३ मध्ये ४००० रुपयांची राज्याची सहायता देऊन एक संस्कृत पाठशाळा सुरू करून तेथे या गरोडा लोकांना कर्मकांड आणि पुरोहित कर्माचे प्रशिक्षण देण्यात आले. अर्थातच या मुळेच अंत्यज यजमानाला धर्मनीती आणि सदाचाराचे शिक्षण देऊ शकले. बडोदा राज्यात या लोकांच्या मुलांसाठी आर्यकुमार शाळा होत्या.

त्यांच्या शासनातील बहुचर्चित सुधारणा मुख्यतः स्त्रियांच्या उन्नतीसाठी करण्यात आली. १९०४ मध्ये बालविवाहला प्रतिबंध कायदा, १९०१ मध्ये विधवा विवाह कायदा, उपजाती आंतरविवाहाला कायद्याने मान्यता, धार्मिक स्वातंत्र्यतेचा कायदा, १९०६ मध्ये सक्तीचे आणि मोफत शिक्षण वगैरे कायदे त्यांनी केले. स्त्रीशिक्षणाचे महत्त्व जाणतानाचे त्यांचे उद्गार खूप महत्त्वाचे आहेत, एक राष्ट्र जे आपल्या अर्ध्या समाजाला (शिक्षणाच्या) अंधारात ठेवते त्याला सुधारण्याची अपेक्षा ठेवण्याचा काहीही अधिकार नाही.

महाराजांनी राज्यातील गावागावांत फिरती वाचनालये काढली. त्यांची ही योजना सक्तीचे आणि मोफत शिक्षणाला पूरक होती. मोफत शिक्षणाचे वय संपल्यानंतर आणि ज्यांना परिस्थितीने शिक्षण मिळू शकले नाही त्यांच्यासाठी ही योजना खूपच उपयोगी ठरली. या योजनेत अशीच पुस्तके पाठवली जायची की, जिच्यामुळे वाचणाऱ्यांवर उच्चकोटीचे संस्कार होतील. याचा

परिणाम असा झाला की, महाराजांच्या समोरच राज्यात अशी पिढी निर्माण झाली जी अत्यंत कर्तव्यपरायण आणि उदात्त जीवनमूल्याने उद्विग्न झालेली होती.

सन १८९० मध्ये गुजराती भाषेत तांत्रिक औद्योगिक शिक्षण देणाऱ्या कलाभवनाची स्थापना करण्यात आली. महाराजांचे असे स्पष्ट मत होते की, औद्योगिक शिक्षण हे देशी भाषेतच असावे तरच त्याची मुळे खोलपर्यंत रुतून त्याची भरभराट होईल. बडोद्याव्यतिरिक्त अमरेली, नवसारी, पेटलाद आणि पाटण येथेही अशा औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था होती. त्या औद्योगिक संस्थांशी पण जोडलेल्या होत्या. देशी भाषेतल्या या संस्था संपूर्ण भारतवर्षात प्रसिद्ध होत्या. प्रादेशिक भाषेला शिक्षणाचे माध्यम बनवणे आणि त्यांना उद्योगाशी जोडणे हे दोन्ही निर्णय त्यांचे देशप्रेम आणि दूरदर्शीपणा दाखवते. अशाच तऱ्हेने आर्ट्स कॉलेज, व्हर्नाक्युलर स्कूल, गर्ल्स हायस्कूल, संस्कृत पाठशाळा, मेल तथा फिमेल ट्रेनिंग कॉलेज, उद्योग आणि गायन शाळा अशा अनेक संस्था बडोदे राज्यात अस्तित्वात आल्या, ज्यामुळे जनतेला शिक्षण मिळवता आले आणि समाज सुसंस्कृत झाला.

प्रशासनिक सुधारणा

महाराजांनी आपल्या प्रशासन काळात बऱ्याच महत्त्वपूर्ण प्रशासकीय सुधारणा केल्या ज्यामुळे जनमानसात ते खूपच लोकप्रिय झाले. न्यायपालिका आणि कार्यपालिकेची कार्यक्षेत्रे त्यांनी वेगळी केली. ग्रामपंचायतीची व्यवस्था पुनरुज्जीवित केली, राज्यधारासभेची त्यांनी स्थापना केली आणि गुजरातीला राज्यभाषेचा मान दिला. राज्यारोहणानंतर लगेच त्यांनी कृषी विभागाची स्थापना करून शेतकऱ्यांच्या जमिनीचे मापन करून त्यानुसार त्यांच्यावर कर निश्चित केला, यालाच रयतवारी पद्धत म्हणतात. यात सरकार आणि शेतकरी यांचा सरळ संबंध असतो. महाराजांनी शेतीवरील बाकीचे सर्व कर व नजराणे माफ केले.

१९०४ मध्ये गाव आणि तहसील स्तरावर नगरसेवकांची नियुक्ती करून त्यांना दिवाणी आणि फौजदारी खटल्यांचा निकाल लावण्याचा अधिकार दिला. अशा तऱ्हेने जनतेला जलद आणि स्वस्तात न्याय मिळण्याची व्यवस्था केली. बडोद्यात न्याय आणि शासन व्यवस्था एकच होती, त्याचे विकेंद्रीकरण करून त्यांनी तहसीलदाराला शासन व्यवस्था आणि नगरसेवकाला न्यायविभाग सुपूर्द केला. त्यांच्या या प्रशासकीय सुधारणांची प्रशंसा इंग्रज रिजंटनी पण केली.

१९०३ मध्ये पंचायतीचे गठन, पंचांची योग्यता-अयोग्यता, त्यांचे अधिकार आणि कर्तव्य तथा हिशेबासंबंधीचा समावेश होणारा कायदा केला. एक हजारांपेक्षा अधिक जनसंख्येच्या गावात ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली, त्यांची अनुदान राशीही वाढवण्यात आली. तसेच कलेक्टरांनाही त्यांना उचित वाटेल तिथे ग्रामपंचायतीची स्थापना करण्याचा अधिकार दिला. त्यामुळे छोट्या छोट्या गावात ही पंचायतीची स्थापना झाली. काही पंचायतींना तर दिवाणी फौजदारी खटले मिटवण्याचा अधिकार देण्यात आला. १९३० पर्यंत राज्यात २११८ ग्रामपंचायती होत्या. या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचा प्रचार केला, पुस्तकालये चालवली; लोकशिक्षण आणि लोकजागृतीची भूमिका या संस्थेची कायमची राहिली.

राज्यात धारासभेची स्थापना करून महाराजांनी दुसरी एक महत्त्वपूर्ण सुधारणा केली. या धारासभेत आधी १७ सदस्य होते; पण १९१३ पर्यंत त्याची संख्या २६ पर्यंत पोहोचली. गुजराती भाषेला जरी राज्यभाषेचा मान होता तरी १९१०-११ ला त्यांनी हिंदी विषय प्राथमिक शाळेत अनिवार्य केला. हिंदी राष्ट्रभाषा व्हावी अशी त्यांची खूप इच्छा होती. बडोदा स्टेट गॅझेटमध्ये गुजरातीच्या बरोबर हिंदी भाषेचाही वापर होत असे. त्यांनी संस्कृत भाषेच्या प्रचाराचा खूप प्रयत्न केला, संस्कृत पाठशाळा उघडल्या. त्यांचा विश्वास होता की, आपली मूळ भाषा संस्कृत आहे, ती आपण गमावता काम नये. कारण संस्कृत साहित्य आपल्या देशाची सभ्यता, संस्कृती आणि शिक्षा यांनी भरलेले आहे. याशिवाय बाळ कैद्यांचे शिक्षण फौज आणि पोलीस विभाग सुधारणा, रेल्वेलाइनचा विस्तार आणि कृषी सुधारणा या सगळ्या क्षेत्रांत त्यांनी बऱ्याच सुधारणा केल्या.


याशिवाय राइट बंधूंच्या अगोदर पुणे येथील संस्कृत पंडित श्री. शिवकर बापूजी तळपदे या संस्कृत पंडिताने एप्रिल १८८५ रोजी केलेल्या जगातील पहिल्या विमानोउड्डाण प्रयोगाला महाराजांची मदत होती.

महाराजांच्या कारकिर्दीत भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी संपूर्ण देशातील क्रांतिवीर एकत्र झाले. स्वतंत्र भारताची मागणी जोर धरत होती, महाराज या सगळ्यावर बारीक नजर ठेवून होते. स्वतः एक राष्ट्रप्रेमी असल्यामुळे त्यांना क्रांतिकाराबद्दल विशेष आस्था होती आणि अशी इच्छा पण होती की, बडोदा राज्यातही देशभक्ती वाढावी. त्यांनी स्वतःही या प्रवृत्तींना प्रोत्साहन देण्यास आणि आर्थिक साहाय्य करण्यास सुरुवात केली. इंग्रज सरकार त्यांच्या हालचालीवर नजर ठेवून होते; पण त्याची चिंता न करता ते सतत अशा क्रांतिवीरांच्या संपर्कात राहिले. संपूर्ण देशात तसेच परदेशात विविध नेत्यांबरोबर देशाच्या स्वातंत्र्याबद्दल आपली मते मांडून ते चर्चा करत असत. त्यांच्या या ध्येयात त्यांच्याबरोबर केशवराव जाधव, बॅरिस्टर केशवराव देशपांडे, प्रोफेसर माणिकराव आणि महर्षी अरबिंदोसारखे देशभक्त होते. महर्षी अरबिंदोंना बडोद्याच्या महाराजांचा भरपूर आधार होता, महाराजा सयाजीराव हे एक मोठ्या राष्ट्राची अंमलबजावणी करण्यात सक्षम आहेत आणि सध्याच्या परिस्थितीत भारतवर्षात असा कोणीही राजा नाही जो त्यांच्याशी तुलना करू शकेल असे महर्षी अरबिंदो यांचे ठाम मत होते.

महाराजांचे विचार बडोदा राज्यापर्यंत मर्यादित नव्हते. संपूर्ण भारतवर्षाचे एक सक्षम, सदृढ, संपन्न अभिनव राष्ट्र हे विशाल स्वप्न त्यांनी आजीवन पाहिले आणि त्यासाठी ते सदैव कार्यरत राहिले. राजा काळ घडवितो की काळ राजाला घडवितो, अशा अर्थाचे संस्कृत वाचन आहे. सयाजी महाराजांनी बडोद्याच्या रूपाने परंपरा आणि नवता, संस्कार आणि ज्ञान एवं विशिष्ट संस्कृती आणि आधुनिकता, देशीयता आणि आंतरराष्ट्रीयता, विज्ञान आणि कला इ. च्या सामीलनातून आपल्या समकालाला एक विशिष्ट आकार देत, मानवतेच्या कल्याणाचे आदर्शवत वाटेल, असे प्रारूप आपल्यासमोर ठेवले. त्यातील अनेक घटक आजही आपल्यासाठी चैतन्यवंत असून त्यांचे चिंतन, मनन आणि निर्मितीशील कृतिरूप आपणासाठी नितांत आवश्यक आहे. महाराजा सयाजीरावांचे गुरुवर्य एफ.ए.एच. इलियट यांचा हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य

आणि संस्कृती मंडळातर्फे पुनर्प्रकाशित होत आहे. याबद्दल मंडळ आणि अध्यक्ष बाबा भांड यांचे मनापासून आभार.

महाराजा फत्तेसिंह म्यूझियम **सौ. मंदा हिंगुराव**
संचालिका, लक्ष्मीविलास पॅलेस परिसर,
जवाहरलाल नेहरू मार्ग, बडोदे -३९०००००१.
मो. ०९८२४१६५८६३



गुरुवर्य इलियट आणि सयाजीराव -
दुसरी युरोप सहल १८८८

My dear Maharaja Saheb.

Allow me to present you with a copy of the "Rulers of Baroda". While writing this book you were seldom out of my mind long, and I need scarcely tell you why. Few words are best: and your tutor will here only ask you to remember the lines you learnt in school:

"Love thyself last: cherish those hearts that hate thee;
"Corruption wins not more than honesty.
"Still in thy right hand carry gentle peace,
"To silence envious tongues. Be just, and fear not:
"Let all the ends thou aim'st at be thy country's,
"Thy God's and truth's."

Your sincere Friend
F. A. H. Elliot.

मूळ इंग्रजी ग्रंथ 'बडोद्याचे राज्यकर्ते' इलियट यांनी सयाजीरावांना भेट दिला.

मिस्टर एफ.ए.एच.इलियट : एक अल्पपरिचय

◘

सयाजीराव महाराजांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवण्यात त्यांचे गुरू, मित्र, सल्लागार मिस्टर इलियट या आयरिश इंग्रज अधिकाऱ्याचा सिंहाचा वाटा होता. मि. एफ. ए. एच इलियट यांनी इंग्लंडमध्ये आय. सी. एस. ची परीक्षा पास करून ते साठाव्या दशकाच्या शेवटी शेवटी भारतात आले. मि. इलियट यांचे वडील पूर्वी मद्रास इलाख्याचे ॲक्टिंग गव्हर्नर म्हणून काही कालपर्यंत कार्य करीत होते व ते लॉर्ड मिंटो यांच्या घराण्याशी, त्याचप्रमाणे केम्ब्रिज युनिव्हर्सिटीचे प्रमुख डॉक्टर बटलर यांच्या नात्यातले होते. रत्नागिरीत असिस्टंट कलेक्टरच्या जागेवर ते काम पाहू लागले. इथेच त्यांचा विवाह डिस्ट्रिक्ट जज श्री. बर्डवुड यांच्या मेहुणीशी झाला. बर्डवुड कुटुंब भारतात सुप्रसिद्ध होते. या कुटुंबातील बहुतेक सदस्यांनी बडोद्याच्या कारभारात खूप रस घेतला होता. थोड्या काळासाठी जनरल बर्डवुडने हे बडोदा आर्मीचे सेनापती होते. मि. इलियट यांनी आपले प्रशासनाचे क्षेत्र बदलले व त्यांची बदली त्यानंतर वऱ्हाडात अकोला (बरार) येथे शिक्षणखात्यांत झाली. हळूहळू ते शिक्षण खात्याचे डायरेक्टर या प्रमुख हुद्द्यावर पोहोचले. १८७५च्या सुमारास त्यांना दरमहा रुपये ८५० वेतन मिळत होते.

याच सुमारास बडोद्यात महाराजा सयाजीरावांना दत्तक घेण्यात आले होते व त्यांना चांगले शिक्षण देऊ शकेल अशा योग्य शिक्षकाचा शोध चालला होता. दिवाण सर टी. माधवरावांनी, गव्हर्नर जनरलचे एजन्ट मि. मेल्व्हिल यांना असा शिक्षक शोधण्यास विनंती केली. मि. मेल्व्हिल यांनी जज बर्डवुड यांच्याशी सल्लामसलत केली व त्यांनी इलियट यांची शिफारस केली. त्यांच्या शिफारशीवरून मि. मेल्व्हिल यांनी मि. इलियट यांना ताबडतोब पत्र लिहून त्यांची अनुमती व अटी कळवण्यास विनंती केली. आणि मि. इलियट यांनी बडोद्याची सेवा करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. त्यांना आपले काम सुरू करण्याचा आदेश २२ नोव्हेंबर १८७५ ला देण्यात आला. ६ वर्षांच्या नोकरीचा करार झाला व रुपये १,१२५ दरमहा वेतन ७५ रुपयांच्या वार्षिक वाढीसह नक्की करण्यात आले जे राज्याच्या तिजोरीतून देण्यात येत असे. या

पगाराबरोबरच त्यांना राहण्यासाठी एक घर देण्यात आले. अकोला येथून त्यांनी स्वतःची घोडागाडी मागवून घेतली. मि. इलियट १० डिसेंबर १८७५ ला बडोद्यात आले व त्यांनी राजाच्या शाळेचे, शिक्षक व सयाजीराव महाराजांचे पालक अशी जबाबदारी स्वीकारली.

महाराजांचे शिक्षणासाठी एका शाळेचे बांधकाम चालू होते म्हणून त्यांनी जवळच असलेल्या उद्यानातील छोट्याशा बंगल्यात शाळा सुरू केली. त्यांच्या अभ्यासक्रमात इंग्लिश, मराठी, गुजराती व उर्दू या चार भाषा व इतिहास, भूगोल व गणित शास्त्रांचा तसेच मोडी भाषेचापण समावेश होता. अभ्यासक्रमाचा बोजा एवढा मोठा होता की, १२ वर्षांच्या मुलाला अभ्यासाबद्दल एकतर कायमचा तिटकारा निर्माण होईल किंवा त्या बोजाखाली तो मोडून जाईल. इलियट यांना सुरुवातीला महाराज, वर वर पाहता खरोखर मंद वाटले (apparently and actually dull) याचे कारण हे असावे. अर्थात एका अतिशय वेगळया वातावरणातून, आपले आई-वडील, घरदार, मित्रमंडळी यांना सगळयांना सोडून आलेल्या मुलाला दुसऱ्या नवीन वातावरणाशी जुळवून घ्यायला थोडा वेळ आवश्यक होता.

पण दैवयोगाने त्यांना थोड्याच दिवसांत कळून आले की, हा सगळा त्यांच्या अभ्यासाच्या अतिरिक्त बोजाचा दोष आहे आणि हे लक्षात येताच त्यांनी तो बोजा थोडा कमी केला आणि मग त्यांच्या या विद्यार्थ्यांच्या मेहनती व हुशारीबद्दल त्यांच्या तोंडून कायम प्रशंसाच ऐकायला मिळाली.

मि. इलियट महाराजांना शिकवू लागले, त्या वेळी पहिली अडचण ही उपस्थित झाली की, मि. इलियट यांना महाराजांना समजेल इतके मराठी येत नव्हते व शिक्षकाचे बोलणे समजेल इतके इंग्रजी महाराजांना येत नव्हते. मध्यप्रांतात राहिल्यामुळे मि. इलियट यांना थोडे थोडे मराठी समजत असे. त्यामुळे ही अडचण घालवण्यासाठी सुरुवातीला केशवराव पंडित हे मि. इलियट व महाराज या उभयतांस धडे देत व ते दोन्ही भाषेत समजावून सांगत. अशा रीतीने अंदाजे वर्षभर प्रक्रिया चालल्यानंतर शिक्षक व विद्यार्थी या दोघांची भाषेची अडचण दूर झाल्यामुळे महाराजांची प्रगती जास्त जोराने होऊ लागली. एक वर्षाच्या अखेरीस त्यांच्या अभ्यासाची परीक्षा तिऱ्हाइताकडून करविण्यासाठी मि. इलियट यांच्या मागून वऱ्हाडांत शिक्षण खात्याचे डायरेक्टर झालेले रा. श्रीराम भिकाजी जठार यांना बडोद्यास बोलाविण्यात आले. त्यांनी महाराजांच्या अभ्यासाबद्दल चांगला अभिप्राय दिला.

इलियट साहेबांचा स्वभाव, त्यांची मुद्रा व त्यांचे वर्तन हे आपल्या कामास सर्वस्वी योग्य होतं. त्यांचा उंच व सडपातळ बांधा, भव्य व सरळ कपाळ, तरतरीत नाक, मोठाले व लांबट डोळे, झोकबाज मिशा व प्रसन्न चेहरा ही सर्व त्यांच्या उदात्त स्वभावाची व तीव्र बुद्धीची साक्ष देत. त्यांच्या नेत्रांत एक प्रकारची विनोदी चमक असे व त्यांच्या मुद्रेवर नेहमीच हास्य दिसून येई. त्यांनी व्हिक्टोरिया महाराणींच्या काळच्या प्रघाताप्रमाणे गालापर्यंत केस ठेवलेले असल्यामुळे, त्यांच्या चेहऱ्याला एक प्रकारचा रुबाबदारपणा आला होता. त्यांचा स्वभावही उदार, प्रेमळ व मनमोकळा असा असे व याशिवाय पाश्चात्त्य पद्धतीच्या शिष्य शिक्षकांमधील संबंधांच्या कल्पनेप्रमाणे ते आपल्या विद्यार्थ्यांशी गोट्या, लिंगोरच्या वगैरे खेळ खेळून, शिक्षकाच्या नात्यांतील औपचारिकपणा

नाहीसा करून टाकीत. या सर्व गुणांमुळे त्यांची छाप महाराजांच्यावर पडण्यास वेळ लागला नाही. या उभयतांच्या मध्ये लवकरच जिव्हाळ्याचा संबंध उत्पन्न झाला व महाराजांना त्यांच्याबद्दल प्रेम व आदर वाटू लागला.

मि. इलियट यांच्या हाताखाली चार शिक्षक होते. आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी विलायतेतील पब्लिक स्कूलच्या धर्तीवर अभ्यासक्रम आखला. भाषा, गणित, इतिहास, राज्य-प्रशासन, शारीरिक व्यायाम, खेळ यासंदर्भात शिक्षण सुरू झाले. तरुण इलियट आपल्या विद्यार्थ्यांत समरस झाले. आपल्या शिष्याचे कौतुक करताना आपल्या रिपोर्टमध्ये मि. इलियट म्हणतात, एकदा शिकलेला कुठलाही विषय ते सहसा लवकर विसरत नसत. पुढे ते असेही म्हणतात की, माझ्यावर एकदाही महाराजामध्ये दोष काढण्याचा प्रसंग आला नाही. याच्यापेक्षा चांगला व जास्त प्रेमळ विद्यार्थी शोधूनही सापडणार नाही. यावरून हे लक्षात येते की, आपल्या शिष्यामध्ये असलेली गुणवत्ता पारखण्याची वृत्ती मि. इलियट यांच्या ठायी प्रकर्षाने होती. तसेच मि. इलियट हे एक हाडाचे शिक्षक होते. स्वभावाने ते सौम्य, सहनशील व दुसऱ्याचा दृष्टिकोन समजून घेण्यास नेहमीच उत्सुक असत.

गुरूंच्या व्यक्तिमत्त्वाची छाप तरुण सयाजीरावांवर पडत गेली. गुरू-शिष्यांचं नातं दृढ होत गेलं. उभयतांत आदर, प्रेम आणि जिव्हाळा वाढत गेला. सयाजीरावांत शिक्षणाबद्दल जिज्ञासा, इतिहासाबद्दल आवड आणि प्रशासनातील दूरदृष्टी विकसित करण्यात गुरूचा फार मोठा वाटा आहे. आपल्या विद्यार्थ्यांतील उद्योगप्रियता हा गुण मि. इलियट यांनी ओळखला. प्रजाहित हे राजाचं पहिले कर्तव्य आहे. साहित्य, कला, संस्कृती, संवर्धन हेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासोबत स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची ज्योत त्यांनी महाराजांच्या मनात प्रज्वलित केली.

इलियट यांनी १८७९ मध्ये राजाच्या शाळेचे हेडमास्तर असताना (Rulers of Baroda) बडोद्याच्या राज्यकर्त्यांचा इतिहास - १७२० ते १८७५ हे पुस्तक लिहिले आणि त्या पुस्तकाची एक प्रत त्यांनी महाराजांना दिली. त्याच्या पहिल्या पानावर ‘flyleaf’ या ओळी लिहिल्या होत्या व त्या त्यांनी महाराजा सयाजीरावांना मुखोद्गत करायला लावल्याः

मम प्रिय महाराजसाहेब,

‘रूलर्स ऑफ बरोडा’ हे पुस्तक आपल्याला भेट देण्याची मला परवानगी द्या. हे पुस्तक लिहिताना तुम्ही क्वचितच दीर्घकाळपर्यंत माझ्या मनात नव्हता. का हे मी तुम्हाला सांगायची गरज नाही. कमी शब्द हेच नेहमी चांगले असतात. आणि इथे आपला शिक्षक आपल्याकडे एवढेच मागतो की, या शाळेत शिकलेल्या ओळी नेहमीच स्मरणात ठेवा.

स्वतःवर शेवटी प्रेम करा, आधी त्यांच्या वर करा जे तुमचा तिरस्कार करतात,
भ्रष्टाचार जिंकू शकतो; पण सत्यापेक्षा जास्ती नाही
तरीसुद्धा आपल्या उजव्या हातात शांती धरा,
मत्सरी लोकांना शांत करायला घाबरू नका पण खरे रहा,
आपले सगळे लक्ष, आपली भूमी, आपला देव,

आणि सत्य हेच असले पाहिजे
आपला प्रामाणिक मित्र,
एफ.ए.एच. इलियट

My Dear Maharaja Saheb,

Allow me to present you with a copy of the "Rulers of Baroda". While writing this book you were seldom out of my mind long, and I need scarcely tell you why. Few words are best, and your tutor will here only ask you to remember the lines you learnt in school.

"Love thyself last: cherish those hearts that hate thee;
"Corruption wins not more than honesty.
"Still in thy right hand carry gentle peace,
"To silence envious tong's. Be just, and fear not;
"Let all the ends thou aim'st at, be thy country's
"Thy God's and Truth's.'

Your sincere Friend
F. A. H. Elliot

विल्यम शेक्सपिअर यांच्या 'The Fall of CardinalWolsey' या नाटकातील या ओळीमध्ये कुठलेही नावीन्य नाही. एका पित्याने आपल्या मुलाच्या मनावर बिंबवण्यासाठी सांगितलेली ही गोष्ट आहे. आपल्या राज्याबद्दलचा कुठलाही मोठा बडेजाव नाही, तर एका राजाला आपल्या पवित्र कर्तव्यांची, बंधनाची करून दिलेली ही ओळख आहे. अशी ओळख जी सर टी. माधवराव किंवा मि. मेल्व्हिल (गव्हर्नर जनरलचे एजंट) यांनी कोणीही मंजूर केली नसती; पण इलियट सरांच्या शिष्याने ती मंजूर केली.

'The Rulers of Baroda' (१८७९) या पुस्तकात मि. इलियट लिहितात, महाराजांच्या अंगी, उद्योगिता, दृढ निश्चय, आत्मसंयमन व नियमाधीनता हे स्थायी स्वरूपाचे गुण दिसून येतात; तथापि त्या गुणांच्या परिणामाबद्दल त्यांनी भविष्यकाळावरच हवाला ठेविला होता. आणि पुढे या पुस्तकाचा शेवट करताना ते म्हणतात, ''ज्यांना तारीख १ जानेवारी सन १८७७ रोजी दिल्ली येथे फर्झनन्द-इ-खास व दौलत-इ-इंग्लिशिया या पदव्या बहाल करण्यात आल्या, त्या सयाजीरावांची खरी योग्यता काय आहे ते भविष्यकाळच दर्शवील. त्या भविष्यकाळाचा सांप्रत भूतकाळ झाला आहे व त्याने महाराजांची खरी योग्यता सर्व जगाला सिद्ध करून दाखवली आहे..

महाराजांचे शिक्षण सुरुवातीला ९ वर्षांचे म्हणजे त्याच्या वयाचा २१ वर्षांपर्यंत पूर्ण करायचे असे ठरले होते. पण नंतर भारत सरकारने त्यांना अठराव्या वर्षी राज्याचे अधिकार देण्याचे नक्की केले. आणि म्हणूनच इलियट सर आपल्या नेमून दिलेल्या कामगिरीबद्दल म्हणतात की, त्यांच्या शिक्षणास फार उशिरा सुरुवात झाली - सुरुवात जी संपूर्णतः श्री

गणेशापासूनच होती. जबाबदारी खूप मोठी होती. त्यांना त्यांच्या शिष्याला ६ वर्षांत एक सक्षम राजा बनवायचे होते - जो दोन लाख लोकांवर सुशासन करू शकेल. मूळ योजनेप्रमाणेच वेळ कमी होता. अविरत कठीण परिश्रमाची व रविवारच्या सुट्टीतही अभ्यास करण्याची जरूर होती. आता तर ती सुट्टी पण दोन आठवड्यांनी घ्यायची व शिकारीसाठी वापरायची असे ठरले. मि. इलियट आणि सर टी. माधवराव यांनी त्यांच्या शिक्षणाचे शेवटचे ९ महिने प्रशासकीय शिक्षणासाठी ठेवायचे नक्की केले. या महिन्यात संपूर्ण लक्ष फक्त त्यांना एक उदार, ज्ञानी, कार्यक्षम, कर्तृत्ववान राजा बनवण्यास केंद्रित केले. भाषा सोडून बाकीचे विषय गाळून टाकण्यात आले. महाराजांना वेगवेगळया विभागांच्या प्रमुखांनी तो-तो विषय समजण्यासाठी प्रदीर्घ भाषणे दिली. सुयोग्य प्रशासनाची भाषणे माधवरावांनी देऊन या भाषणांच्या मालिकेची सुरुवात केली. स्वतः मि. इलियट हेही बऱ्याच भाषणात आपल्या शिष्यासोबत असायचे.

महाराजा फत्तेसिंहराव आपल्या पुस्तकात, Sayajirao of Baroda The Prince and the Man मध्ये म्हणतात की, सर टी. माधवराव, मि. मेल्व्हिल व इलियट सरांनी मिळून एका राजाला आदर्श नागरी सेवक बनवले. त्यांनी महाराजांच्या मनावर कोरले होत की सामान्यतः भारतातील लोक व विशेषतः राजे लोक आळशी, शांत व बेजबाबदार असतात आणि म्हणून त्यांनी महाराजांना मेहनती, बारीक-सारीक गोष्टींकडे पण दुर्लक्ष न करणारा, संघटना व व्यवस्थापन यात कुशल बनवले. या भक्कम व साधेपणाने दिलेल्या शिक्षणामुळे महाराजांना अकुशल - अप्रामाणिक, स्वच्छंदी, जुलमी, अनियंत्रित सत्ताधीश होण्यापासून वाचवले.

सर्व्हे आणि सेटलमेंट कमिशनर कारकीर्द

महाराजांना मुखत्यारी मिळण्यापूर्वी त्यांचे शिक्षण संपल्यामुळे, त्या कार्यासाठी खास नेमणूक करण्यात आलेले त्यांचे शिक्षक मि. इलियट हे सन १८८२च्या वर्षारंभापासून त्या कामावरून निवृत्त झाले तथापि त्यांचा व महाराजांचा लोभ इतका जडला होता की, त्यांना सोडणे महाराजांना कठीण वाटले, वेळोवेळी महाराजांनी इंग्रज सरकारकडे मि. इलियटच्या सेवेची मागणी केली. शेवटी १८८५ मध्ये मि. इलियट यांची नियुक्ती 'सर्व्हे आणि सेटलमेंट कमिशनर' म्हणून करण्यात आली. महाराजांना त्यांच्या विषयीच्या लोभामुळे या उभयतांनाही पुढे एका प्रकरणी पुष्कळ त्रास भोगावा लागला, तरी मि. इलियट यांना ठेवून घेता आल्याबद्दल या वेळी महाराजांना समाधान वाटले. स्वतः मि. इलियट हे आपल्या कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींत लक्ष घालीत नसत. मि. इलियट हे एक अधिकारी असण्यापेक्षा जास्त एक सभ्य गृहस्थ होते. दैनंदिन राज्यकारभारात ढवळाढवळ न करण्याची ते खूप काळजी घेत असत. ते महाराजांना, त्यांनी विचारल्याशिवाय कधीच सल्ला देत नसत आणि जो द्यायचा तो एक मित्राच्या नात्याने, त्यात अधिकाराचे नाते नसावयाचे. मि. इलियट यांनी अधिकारी व मित्र या नात्यामध्ये एक सीमा नेहमीच आखलेली असायची असे दिसते. कारण महाराजांच्या राज्यारोहणप्रसंगी पुण्याच्या सार्वजनिक सभेने त्यांच्या नावे लिहिलेल्या पत्राचा जबाब त्यांनी तारीख २५ सप्टेंबर १८८१ रोजी पाठवला होता. त्यांत त्यानी लिहिले होते की, "तुमच्या पत्रातील कलमांसंबंधाने मला असे कळवावयाचे

की, महाराजांना राज्यकारभाराचा कामात कोणत्याही प्रकारचा सल्ला देण्याची मला मोकळीक नाही. तथापि महाराजांचे आणि त्यांच्या संस्थानाचे हित व्हावे, अशी माझी फार इच्छा आहे...तुम्ही महाराजांना पत्र लिहिलं, त्यात अशा प्रकारची पुष्कळ कलमे आहेत, त्यांना माझे पूर्ण अनुमोदन आहे व महाराजांना राज्यप्रकरणी योग्य उपदेश करण्याचा ज्यांना अधिकार आहे त्यांची नजर तुमच्या सूचनांकडे गेलीच असेल, अशी मला आशा आहे."

२८ डिसेंबर, १८८१ मध्ये महाराजांनी त्यांच्या कारभाराची सूत्रे हातात घेतली व मि. इलियट यांच्या सेवेची समाप्ती जानेवारी १८८२ला झाली; परंतु त्यांना बडोदा गॅझेटियर पूर्ण करण्यासाठी महिनाभर राहण्याची मुभा देण्यात आली आणि जानेवारी महिन्यासाठी त्यांना वेतन देण्यात आले. या समयी महाराजांचे वय लहान आणि ते अननुभवी असल्याने त्यांना काही काळ मार्गदर्शन आणि सल्ला देण्यासाठी मि. इलियट यांच्या सेवेची गरज भासली. महाराजांच्या या वारंवार आग्रहमुळे मि. इलियट यांची नेमणूक विशेष कर्तव्य अधिकारी म्हणून करण्यात आली. १३ एप्रिल १८८२ पासून त्यांचे वेतन दर महा २,२३२ रुपये नक्की करण्यात आले. त्यांचे वेतन आतापर्यंत शिक्षक आणि पालक या नात्याने शैक्षणिक खात्याकडून दिले जात होते; पण आता विशेष कर्तव्य अधिकारी या नात्याने ते राजवाड्याच्या खर्चातून होऊ लागले.

मि. इलियट यांनी आपल्या कामाची मर्यादा योग्य रीतीने पाळली होती, तरी महाराजांवर त्यांचे अयोग्य वजन आहे, असा गवगवा त्या वेळी झाला होता. इलियट यांच्या महाराजांवरील प्रभावाबद्दल बडोद्याच्या रयतेमध्ये तसेच इंग्रज अधिकाऱ्यामध्ये बरीच प्रतिकूल टीका होऊ लागली. अशीही कुजबुज चालू झाली होती की, महाराजांचे खासगी सल्लागार म्हणून त्यांच्याकडे इतर कोणत्याही अधिकाऱ्यांपेक्षा जास्त सत्ता गाजवण्याचा अधिकार आहे व ते हळूहळू महाराजांना नास्तिक बनवत आहेत. तर इंग्रज अधिकाऱ्यांना असे वाटत होते की, ते नेहमीच रेसिडेन्सीच्या बाजूने उभे राहण्याऐवजी महाराजांच्या बाजूने उभे राहतात. तथापि वस्तुस्थिती अशी होती की, महाराजांना पुढील राज्यकारभाराची सर्व जबाबदारी आपल्या स्वतःवरच घ्यावी लागेल. त्या वेळी आपल्याला एखाद्या एतद्देशीय हुशार व चतुर पुरुषाची मदत मिळावी अशी महाराजांची इच्छा होती.

बारखळी प्रकरण

खंडेराव महाराजांच्या (१८५६-१८७०) वेळी राज्यातील जमिनीची मोजणी करण्याचा एक लहानसा प्रयत्न करण्यात आला होता; परंतु तो पुढे तसाच अर्धवट राहिला. त्या प्रयत्नाचा काही उपयोग करता येईल असे वाटत होते; परंतु ती आशा निष्फळ झाली. कारण त्या वेळी केलेली मोजणी अगदींच स्थूल स्वरूपाची होती, तिला कोणतीच शास्त्रीय पद्धती लागू करण्यात आलेली नव्हती. शिवाय तिची अंमलबजावणी बेशिस्तपणे होत असल्यामुळे, कागदोपत्री सरकारी महसुलाची बाकी लाखोंनी चढत असून, प्रत्यक्ष वसुलीच्या नावाने शून्यच होते. यानंतरच्या काळात श्री. मल्हारराव महाराज (१८७०-१८७५) यांनी या अल्पस्वरूप सुधारणाही झुगारून

देऊन उघड उघड जमिनीचे मक्ते (भाग) देण्यास सुरुवात केली. त्यांच्या मेहरबानीतील लोकांना हे जमिनीचे मक्ते देण्यात आल्याकारणाने, ते मक्तेदार लोक कुळांकडून मनमानेल तशी रक्कम वसूल करीत व सरकारला ही रक्कम कमी दाखविण्यासाठी हिशोबाचे खोटे चोपडे तयार करीत. यानंतर सर टी. माधवराव हे दिवाण झाल्यानंतर त्यानी ही बेबंदशाही नाहीशी करून जमिनीची मोजणी, आकार ठरविण्याचा प्रयत्न सुरू केला. तथापि त्यांच्या दिवाणगिरीत या प्रयत्नाला पूर्ण स्वरूप येऊन शकले नाही.

यानंतर महाराजांना पूर्ण अधिकार मिळाल्यानंतर त्यानी प्रथमतः या कामासाठी एक स्वतंत्र खाते काढून त्यावर मुख्य अधिकारी म्हणून मि. इलियट यांची नेमणूक केली. ही नेमणूक मि. इलियट हे महाराजांचे पूर्वीचे शिक्षक होते, म्हणून केलेली नव्हती, तर मि. इलियट यांनी स्वतः महाराजांचे शिक्षक असताना बडोदे राज्यातील लोकांची, त्यांच्या चालीरीतींची, सरकारी कामकाजाची, जमीनधाऱ्याच्या पद्धतीची, वगैरे अनेक प्रकारची माहिती मिळवली होती. याशिवाय स्थानिक पक्षभेदाचा अभाव हा त्यांच्या ठिकाणी हे काम करण्यास अवश्य असणारा विशेष गुण होता. जमिनीची पद्धतशीर मोजणी करणे, हा त्या कालीन राज्यात नवीन प्रकार असल्याने अज्ञानी प्रजा त्याच्यामुळे आपल्या हक्कांविषयी साशंक झाली होती व स्थानिक अधिकारी जाणून-बुजून पूर्वग्रहामुळे आपले नुकसान करतील अशी लोकांना भीती वाटत होती. अशा वेळी मि. इलियटसारख्या परस्थ पण माहीतगार मनुष्याची नेमणूक करण्याने लोकांच्या शंकेला आळा बसण्यासारखा होता.

बारखळीची जमीन ही पिढ्यानूपिढ्या न सुटणारी एक अवघड समस्या होती. जमिनीतील पीक खळयावर एकत्र करून त्याचे हिस्से पडून त्यातून ठरलेले हिस्सा राजाने कराप्रीत्यर्थ वसूल करण्याचा प्रघात त्या कालीन असे. या व्यतिरिक्तच्या इनाम, बक्षीस वगैरे दिलेल्या जमिनींचे पीक खळ्यावर आणण्यात येत नसे, हा भेद ध्यानात घेऊन या दुसऱ्या प्रकारच्या जमिनींना खळ्याबाहेरच्या अथवा 'बहारखळी' असे नाव मिळाले. त्याचेच पुढे 'बारखळी' असे रूपांतर झाले. ज्या जमिनीवर कुठल्याही प्रकारचा कर लागत नव्हता त्या जमिनीला बारखळी जमीन म्हणायचे. पूर्वीच्या गायकवाडांद्वारे आणि कधी-कधी काही अधिकाऱ्यांनी तसे अधिकार नसताना न्यायालयांच्या मर्जीत किंवा मंदिरे, मशीद आणि संत पुरुषांना भेटीपोटी दिलेल्या जमिनीचा मोठा भाग धर्मादाय दिला होता. हा राज्याच्या जमिनीचा जवळजवळ दहावा भाग होत होता. महाराजांनी या अतिक्रमणांवर जोरदार हल्ला केल्यामुळे त्यांच्या राज्यातील काही अत्यंत प्रभावशाली कुटुंबात असंतोष निर्माण झाला. या जमिनीस एकसमान कार्यकाळात आणण्यासाठी आठ वर्षे लागली व अशाप्रकारे त्याच्या काळातील हे महान आणि महत्त्वाचे काम पूर्ण केले. इलियट बारखळी सेटलमेंटचे स्थापती होते आणि इलियट एक जवळचे आणि विश्वासू मित्र होते.

या विभागाची निर्मिती, दुरावलेल्या जमिनीच्या नोंदीची चौकशी करून त्याच्या मिळकतीच्या मुदतीत थोडाफार योग्य अनुक्रम आणणे यासाठी झालेली होती. बडोद्यातील राजांनी आणि राण्यांनी पूर्वी अविवेकी औदार्याने मोठेमोठे जमिनीचे तुकडे आपल्या मर्जीतील लोकांना भेट दिले होते. ज्यांचा जमिनीवरील हक्क बनावटी किंवा असमर्थनीय आहे त्यांच्या मालकीबद्दल

कायदेशीर प्रकारची काळजीपूर्वक चौकशी या जमिनीच्या मालकात असंतोष निर्माण करणारी होती. बारखळी खात्याचा हेतू कधीच मालमत्ता सरकार जमा करण्याचा नव्हता, तर जमिनीवरील कर सरकार जमा करण्याचा होता; पण तरीही बऱ्याच लोकांनी रेसिडेन्सीमध्ये खात्याच्या कठोर वर्तणुकीची तक्रार केली.

युरोपच्या प्रवासातील सोबत

सन १८८८ मध्ये विलायतच्या स्वारीत महाराजांचे शिक्षक मि. इलियट यांनी आपल्याबरोबर यावे अशी महाराजांची इच्छा होती व म्हणून त्यांनी हिंदुस्थान सरकारास तसे लिहिले होते. मि. इलियट हे मूळचे ब्रिटिश नोकर असल्यामुळे अशी परवानगी मिळेल किंवा नाही याबद्दल महाराजांना स्वतःला शंका वाटत होती. जरी मि. इलियट यांनी आतापर्यंत जवळ-जवळ १२ वर्षं बडोद्यात नोकरी केली असली तरी त्यांचे मूळ मालक ब्रिटिश सरकार असल्यामुळे सयाजीराव महाराज त्यांना युरोपला जाण्यासाठी इंग्रज सरकारला विनंती करू शकत होते; पण आग्रह करू शकत नव्हते. तसेच ब्रिटिश सरकारने तुम्ही प्रकृतीच्या कारणाने युरोपात जाता आहात तर तुम्हाला पोलिटिकल ऑफिसरची काय गरज आहे असेही विचारले होते. सन १८८८च्या जूनमध्ये मि. इलियट यांना लिहिलेल्या एका पत्रात महाराजा म्हणतात :

माझ्याबरोबर कोणता अधिकारी येणार, हे जाणण्याविषयी मी फार उत्सुक झालो आहे. मी तुमचे नाव सुचविले आहे व तुम्हाला परवानगी मिळेल अशी मला आशा आहे. मी ज्या हेतूसाठी विलायतेस जात आहे, त्यास तुमच्याबरोबर येण्याने फार मदत होणार आहे. कदाचित सरकारने माझ्याबरोबर दुसरा कोणी अधिकारी पाठविला, तरी तुमची हरकत नसल्याने माझे मित्र म्हणून तुम्हास सोईस्कर वाटेल तेथपर्यंत राहावे, अशी माझी इच्छा आहे. हल्लीचा सर्वच प्रकार अगदी अनपेक्षित आहे. मला जर त्याची पूर्वी कल्पना असती तर या प्रवासाचा बेत करण्यापूर्वी मी जास्त विचार केला असता; कारण माझी सांप्रतची सफर गैरसोयीची असून ती करण्याची माझी मनापासून इच्छा नव्हती.

महाराज ख्यालीखुशालीसाठी विलायतेस जात नसून ज्ञानार्जनासाठी जात होते. मौजेसाठी करावयाच्या सफरीचा हेतू मि. इलियट यांच्या बरोबर येण्याने विशेष साध्य होण्यासारखा होता असे नाही, तर ज्यांनी सात वर्षांपर्यंत प्रेमाने महाराजांना शिक्षण दिले व पाश्चात्त्य ज्ञानाची गोडी लावून दिली त्यांचा सहवास या सफरीत महाराजांना ज्ञानसंपादनाच्या कामी अधिक उपयुक्त होईल, असाच महाराजांच्या लिहिण्याचा आशय असला पाहिजे. दुसरी गोष्ट या पत्रावरून अशी दिसून येते की, परदेशाच्या या सफरी महाराजांना पुष्कळ वेळा गैरसोयीच्या वाटत, तथापि प्रकृतीच्या कारणाने व काही अंशी माहिती मिळविण्याच्या दृष्टीने ते त्या अंगीकारीत असत. त्याशिवाय या पत्रावरून मि. इलियट व इंग्रज अधिकारी यांचे संबंध कसे तणावाचे झाले होते, तेही दिसून येते. वस्तुतः मि. इलियट हे जातीने इंग्रज असून ब्रिटिश इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील नोकर होते. त्यामुळे ते इंग्रज सरकारच्या विश्वासाला पात्र नव्हते, असे नाही. तथापि बडोद्यास राहिल्यावर त्यांचा महाराजांवर फार लोभ जडला व महाराजांनीही कृतज्ञतेने त्या लोभाचा परत

अहेर त्यांना केला होता. मि. इलियट यांच्या उपदेशाने महाराज राज्यात अनेक प्रकारच्या सुधारणा करण्यास उद्युक्त झाले होते, या गोष्टीचे सर्वांनाच कौतुक वाटून त्यामुळे त्यांना आनंद व्हावयास पाहिजे होता. परंतु तसा तो न होता, उलट मि. इलियट यांच्याबद्दल त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची वृत्ती साशंक झाली व महाराजांची विद्यार्थिदशा संपल्यावर पुढे मि. इलियट यांनी बडोद्यास न राहता इंग्रजी नोकरीत परत हटावे, अशी तजवीज त्यांच्याकडून चालली होती.

मि. इलियट यांना आपल्याबरोबर युरोपला रेसिडेन्सी यांच्या मर्जीविरुद्ध असतानाही घेऊन जाण्यात सयाजीराव महाराज यशस्वी झाले, तरी सेंट जोन्स (एजन्ट ऑफ गव्हर्नर जनरल) यांना बारखळी विभागाचे प्रमुख म्हणून मि. इलियटचे राहणे मान्य नव्हते. त्यांच्या मते, हे काम करण्याची मि. इलियट यांच्याकडे कुठल्याही प्रकारची खास योग्यता नव्हती. पुढे ते असे म्हणतात की, दोन घटना ज्या माझ्यासमोर आल्या त्यामध्ये मि. इलियट यांनी ब्रिटिश सरकारच्या हितसंबंधांबद्दल थेट विरोधी सल्ला दिला आहे. ते बडोद्यामध्ये बराच काळ राहिले आहेत आणि महाराजांच्या वैयक्तिक हितसंबंधात इतके गुरफटले आहेत की, ते स्वतःच्या सरकारप्रति कर्तव्य आणि तो तरुण मुलगा ज्याला त्यांनी शिकवले त्याच्या प्रतिचे काल्पनिक कर्तव्य यातील भेद विसरून गेले आहेत; कारण त्या तरुण मुलाबद्दल त्यांना प्रेम व आदर वाटतो. सेंट जोन्स यांना या गुणात प्रशंसनीयता दिसत नाही उलट बडोद्यातून काढून टाकण्यासाठी त्यांना हे एक कारण पुरेसे वाटते ते मि. इलियट बदल म्हणतातः बडोदामध्ये त्यांचे राहणे स्पष्टपणे त्यांच्या स्वतःच्याच फायद्यासाठी आहे.

सन १८८९च्या मार्च महिन्यात मि. इलियट यांनी रजा मागितली, त्या वेळी महाराजांनी त्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, काही काळ तुम्ही येथून जाणार, यामुळेच मला खेद वाटत आहे. तुम्ही माझ्या हिताविषयी आजपर्यंत जे प्रेम दाखविले त्याबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहे. त्याची फेड मजकडून केव्हाही होऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे तुम्ही माझ्या प्रजाजनांच्या हिताची आजपर्यंत जी योग्य काळजी घेतली आहे, तिच्यामुळे त्यांनाही तुमच्या जाण्याने फार वाईट वाटेल. या तुमच्या प्रेमाबद्दल मी तुम्हांला देत असलेल्या आदराचा तुम्ही स्वीकार कराल, अशी मला आशा आहे.

९ मे १८९१ला इलियट सरांना लिहिलेल्या पत्रामध्ये महाराज म्हणतात, मि तुम्हाला प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, आणखीन काही वर्षं तुम्ही बडोद्यात राहावे अशी माझी इच्छा आहे; कारण तुम्ही राज्यासाठी फार उपयोगी, कार्यक्षम आहात.

ग्रामव्यवस्था

सन १८८५ साली नेमलेल्या कमिटीच्या अहवालावरून सन १८९१ साली महाराजांनी या ग्रामसंस्थांत पुन्हा जीव आणण्याकरिता एक योजना घडवली. या संस्थांसाठी स्वतंत्र निधी निश्चित करून त्यातून गाव कामदारांचे पगार देण्यात यावेत. या कंडरात पटेल, तलाठी, शाळामास्तर, रखा, भंगी, हजाम, कुंभार, सुतार, लोहार व वेठिया इतक्या लोकांचा समावेश करण्यात आला.

या पंचायतींकडे गावातील गुरांसाठी पाणी पाजण्याचे हौद, सार्वजनिक इमारती, विहिरी, तलाव, गौचर जमिनी, रस्ते, वगैरेंची व्यवस्था व दुरुस्ती आणि गावातील देवस्थाने व पीरस्थाने यांची देखरेख, इतकी कामे सोपण्यात आली. गावकामदारात शाळामास्तराचा समावेश करण्यात प्राथमिक शिक्षणाला उत्तेजन देण्याचा त्यांचा हेतू होता, कारण याच सुमारास सक्तीचे व मोफत शिक्षण करण्याची योजना त्यांच्या डोक्यात घोळत होती.

या प्रमाणे केलेल्या योजनेचा अनुभव घेताना तिच्या उपयुक्तेची साक्ष त्या वेळचे सर्व्हे ऑफिसर मि. इलियट यांनाही पटली. मि. इलियट हे ब्रिटिश मुलखात मुलकी खात्यातील सिव्हिल सर्व्हंट असल्यामुळे, त्यांना तिकडील राज्यव्यवस्थेचाही अनुभव होता. यामुळे त्यांना या प्रकरणी तुलनात्मक अभिप्राय देता येण्यासारखा होता. तसा अभिप्राय त्यांनी पाद्रा तालुक्याच्या अहवालात दिला आहे, त्यात ते म्हणतातः

गाव कामगारांच्या चाकरीपेक्षा वतनाकडे मुंबई सरकारने फाजील लक्ष दिले, तसे आम्ही करीत नाही. वरतणिया, रखा, भंगी, घेड, हजाम, वगैरे कामगारांच्या चाकरीची इंग्रजी अधिकाऱ्यांना प्रवासात फारशी जरूर लागत नव्हती, म्हणून ते लोक त्यांना निरुपयोगी व फुकटखाऊ वाटले, हे स्वाभाविक आहे; परंतु वस्तुतः देशी अधिकाऱ्यांना त्यांचा फार उपयोग होतो.

अशा प्रकारे ग्रामसंस्थांच्या पुनर्घटनेची योजना करून तिचा अनुभव पाहिल्यावर, तिचा विस्तार करण्याचा बेत महाराजांनी निश्चित केला. सन १८९४ साली त्यानी आपल्या दिवाणांना लिहिलेल्या एका पात्रातही आपली इच्छा स्पष्टपणे दर्शविली आहे. त्या पत्रात ते म्हणतातः

मि. इलियट हे जाण्यापूर्वी त्यानी निदान शंभर खेड्यात लोकांनी निवडलेल्या कामदारांमार्फत गावाचा कारभार करणाऱ्या संस्था निर्माण कराव्या, असे तुम्ही त्यांना सांगावे. या योजनेवर माझी फार भिस्त आहे व ती सर्व राज्यभर लागू करण्याची माझी इच्छा आहे.

कर्नल बिडुल्फ आणि मि. इलियट

कर्नल बिडुल्फ हे बडोद्याचे एजन्ट ऑफ गव्हर्नर जनरल (१८९३-१८९५) होते. ते एक मुत्सद्दी, सुसंस्कृत व एक उत्कृष्ट विद्वान होते- ज्यांनी भारतावर व इतर विषयांवर बरीच पुस्तके लिहिली होती. ते स्वभावाने दुर्बोध, द्वेषी व क्रूर होते. आपल्या नेमणुकीच्या वेळीच त्यांनी सयाजीराव महाराज व मि. इलियट यांना बडोद्यातून काढून टाकण्याचा निश्चय केला होता.

कर्नल बिडुल्फ यांनी एक नव्वद पानी हस्तलिखित अहवाल अतिशय सुंदर अक्षरात कुठलीही खाडाखोड न करता लिहिला आहे. (CRR२३९/R/१/२२/६६ या नंबर) त्याच्याबरोबरच त्यांनी १० वर्षाआधी सेंट जोन्स (एजन्ट ऑफ गव्हर्नर जनरल) यांनी लिहिलेल्या द्वेषपूर्ण अहवाल जोडलेला आहे. कर्नल बिडुल्फचा अहवाल हा पूर्वग्रहदूषित व कटकारस्थानाने युक्त असा होता. या अहवालातून हे स्पष्ट कळते की, कुठलीही गोष्ट विरोधकांच्या नजरेने किती प्रचंड वेगळी दिसू शकते आणि तसेच एका सभ्य चांगल्या प्रामाणिक माणसाला मूर्ख, मत्सरी, अप्रामाणिक आणि सगळ्यात भयानक म्हणजे राष्ट्रद्रोही दाखवले जाते. या अहवालात सयाजीराव महाराजांबरोबरच मि. इलियट यांनाही त्यांच्या हल्ल्याचे लक्ष बनावे लागले. वास्तविक तेही एक

इंग्रजच होते. असे वाटते की, कर्नल बिडुल्फ आणि सेंट जोन्स यांचा काहीतरी व्यक्तिगत द्वेष या मागे असू शकतो. हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे की मि. इलियट यांना या अहवालात त्यांच्याबद्दल इतक्या द्वेषपूर्ण गोष्टी लिहिल्या गेल्या आहेत यांची काहीच माहिती नव्हती व त्यांना कधी या आरोपाचे खंडन करायची संधी पण देण्यात आली नाही आणि तरी सुद्धा या लोकांनी त्यांचे परीक्षण केले आणि त्याचे परिणाम कुठलाही दोष नसताना मि. इलियट यांना भोगावे लागले.

आपल्या रिपोर्टमध्ये कर्नल बिडुल्फ लिहितात, मि. इलियट प्रथमपासूनच असे वागत आले की, त्यांच्या मनात खालील हेतू असल्याची खात्री होते -

१. तरुण राजावर संपूर्ण प्रभाव मिळवणे.

२. इतरांच्या बाबतीत अविश्वास निर्माण करून त्यांचा राजावरील प्रभाव दूर करणे.

३. स्वतःला गायकवाडांच्या नजरेत अपरिहार्य बनवले.

४. स्वतःच गायकवाडांच्या नावाखाली शासकीय अंमल चालवणे.

निदान परिणाम स्वरूपात तरी हेच पहायला मिळते.

वास्तविकता असे काहीच नव्हते. मि. इलियट यांना असे काहीच करायचे नव्हते. या संदर्भात महाराजा फत्तेसिंहराव आपल्या पुस्तकात (Sayajirao Gaekwad III Prince and the Man) म्हणतात, "खरे तर मि. इलियट हे सर्वसामान्य इंग्रज ऑफिसरात अपवाद होते. ते सर्व गोष्टी वंशविद्वेषी साम्राज्यवादींच्या दृष्टिकोनातून पाहत नव्हते. सुरुवातीला त्यांनी शिक्षकांचीही नियुक्ती केवळ व्यावसायिक हेतूने स्वीकारली होती. जेव्हा मि. इलियट यांच्या लक्षात आले की, सयाजीराव महाराज आपल्याकडे गुरू म्हणून पाहत आहे तेव्हा हळूहळू ते आपल्या शिष्याच्या कल्याणासाठी त्यांच्यामध्ये भावनिकदृष्ट्या गुंतत गेले. इंग्रजांच्या नजरेत त्यांच्या सर्वांत मोठा गुन्हा हा होता की, जेव्हा जेव्हा गायकवाड व ब्रिटिश सरकार यांच्यामध्ये मतभेद झाले तेव्हा तेव्हा मि. इलियट गायकवाडांच्या बाजूने उभे राहिले. महाराजांमधील भावनिक गुंतवणुकीची मि. इलियट सरांना फार मोठी किंमत द्यावी लागली. कर्नल बिडुल्फ यांनी मि. इलियट यांच्यावर असाही आरोप केला की, सुरुवातीपासून मि.इलियट यांनी रेसिडेन्सीच्या सर्व शिस्तीची अवाज्ञा केली. या ऑफिसची नोंद अशी दाखवते की, त्यांनी सर्व महत्त्वाच्या बाबींची सतत व उघडपणे उपेक्षा केली आहे."

थोडक्यात, मि. इलियट हे गायकवाडांना शिस्त लावण्यासाठी रेसिडेन्सीचे हत्यार बनले नाही हे या सगळ्याच्या मागचे महत्त्वाचे कारण होते, मि. इलियट यांच्या गैरवाजवी वर्तनाची यादी कर्नल बिडुल्फ वाढवतच गेले. मि. इलियट यांच्यावरही असाही आरोप करतात की सर टी. माधवरावांच्याबद्दल महाराजांचे मन मि. इलियट यांनीच कलुषित केले आणि म्हणूनच सर टी. माधवराव नोकरी सोडून गेले नाहीतर सर टी. माधवरावांनी आपली आज्ञाधारकता रेसिडेन्सीला दाखवून दिली असती. एवढे आरोप करून न थांबता कर्नल बिडुल्फ पुढे असे म्हणतात की, गायकवाड पुण्याच्या बुद्धिवाद्यांच्या दबावाखाली गेले आहेत. महाराजांची विद्यार्थिदशा संपायच्या थोड्याच आधी जून १८८१ मध्ये एक सामान्य पत्रक 'बडोद्याचे दुःख' (The Groans of

Baroda) प्रसिद्ध झाले होते त्यात बडोद्याच्या सर टी. माधवरावांच्या काळातील प्रशासन पद्धतीस बदनाम करण्यात आले होते. हे एक निनावी पत्रक होते; पण कर्नल बिडुल्फ यांनी त्याच्या लेखनाचे खापर बऱ्याच जणांवर थोपले. श्री. रानडे (बॉम्बे हायकोर्टचे जज), श्री. टिळक (मराठा वृत्तपत्राचे संपादक), श्री. वि. वि. समर्थ, (बडोद्याचे सुभा), मि. इलियट यांच्या संरक्षणाखाली अवलंबून असलेले वासुदेव सदाशिव बापट व श्री. जी. वि. आठवले (पूर्वीचे नायब दिवाण) या दोघांनाही बडोद्यास आणण्यास मि. इलियट जबाबदार होते. बडोद्यात असे सामान्यतः मानले जाते की, गायकवाडांच्या खर्चातूनच हे सर्व घडत आहे.

श्री. लोकमान्य टिळक हे तर इंग्रज सत्तेचे सरळ-सरळ शत्रू होते आणि मि. इलियट यांच्यासारख्या इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या सरळ माणसावर एका इंग्रज विरोधी पत्रिकेचा सहलेखक होण्याचा आळ घेणे म्हणजे त्यांना देशद्रोही म्हणण्यासारखेच झाले. मि. इलियट यांच्या भारतातील सन्माननीय नोकरीचा शेवट लज्जास्पदपणे व्हावा हा कर्नल बिडुल्फ यांचा हेतू होता, आणि दुर्दैवाने त्यात ते यशस्वी झाले. आपल्या अहवालात ते पुढे असा ही आरोप करतात की, मि. इलियट आणि महाराज कुठल्याही दिवाणांना टिकू देत नाहीत व या सर्व दिवाणांची कारकीर्द यांच्याशी भांडणातच पूर्ण झाली आणि शेवटी कर्नल बिडुल्फ हे मि. मेल्व्हील यांनी लिहिलेलं एक टिपण समोर आणतात, त्या टिपणानुसार मि. मेल्व्हिल यांनी शिक्षकाच्या नोकरीच्या समाप्तीनंतर मि. इलियट यांची नोकरी पुढे चालू ठेवण्यास विरोध दाखवला होता.

महाराजांनी जेव्हा मि. इलियट यांची सेवा १८८१ नंतर पुढे थोड्या वर्षांसाठी वाढवून मागितली तेव्हा त्यांना विरोध करण्यात मि. मेल्व्हिल यांचा मोठा वाटा होता. ही मोठीच विडंबना आहे की, 'मि. इलियट यांना बडोद्यात आणणारे मि. मेल्व्हिलच होते. त्यांनी सरकारकडे अशी शिफारस केली, 'मि. इलियट यांची सतत उपस्थिती ही महाराजा सयाजीरावांसाठी चांगली नाही, ती रेसिडेंसीचा योग्य प्रभाव कमी करेल. पण सुदैवाने मि. मेल्व्हिल यांची निवृत्ती जवळ आली होती व त्यांचे उत्तराधिकारी जनरल व्हॉटसन यांना यात आक्षेप घेण्यासारखे काहीच वाटले नाही व सरकारने हा ठराव मंजूर केला. पुढे कर्नल बिडुल्फ असे म्हणतात की, 'गायकवाडांनी गादीवर आल्यानंतरच्या पहिल्या ६-७ वर्षांत प्रशासकीय सुधारणांच्या नावाने जी तोडमोड करून त्या जागी एक निष्फळ प्रसाशन पद्धती तयार केली आहे, जी गायकवाडांना ब्रिटिश भारतातील सर्वांत उत्तम पद्धती वाटते. ते दोन शब्द कौतुकाचे ही बोलतात, 'खूपसे बदल फायद्याचेही होते, पी.डब्ल्यू.डी. ची स्थापना, एका मोठ्या शिक्षण पद्धतीची स्थापना झाली...' कर्नल बिडुल्फ यांच्या मते, या सुधारणा प्रसाशकीय स्थिरतेला एक मोठा धक्का होता व बडोद्यात नवीन अडचणी येण्याची खात्री होती.

या सगळ्या सुधारणा गायकवाडांनी केल्या असे दाखवण्यात आले; पण वास्तविक मि. इलियट यांनीच त्या केल्या होत्या असे कर्नल बिडुल्फ म्हणतात. तसेच या सगळया सुधारणा तातडीने, लहान सहान बारकावे बघून करण्यात आलेल्या होत्या. हे सर्व तपशील कर्नल बिडुल्फ

यांना हास्यास्पद वाटले व त्यातील कामाच्या बोजाने घाबरलेल्या ऑफिसरवर हे सर्व थोपण्यात आले. असे अनुमान कर्नल बिडुल्फ काढतात. हा संपूर्ण रिपोर्ट लिहिण्यास कर्नल बिडुल्फ यांना जो वेळ लागला ही गोष्ट बडोद्यामधील प्रशासकीय सुधारणेच्या ताकदीची कार्यक्षमता दाखवून देते.

मि. इलियट यांना नेहमीच विरोधकांना तोंड द्यावे लागले. कर्नल बिडुल्फ तक्रार करतात की, सयाजीरावांनी १८८१ मध्ये उघडपणे मि. इलियट यांना सगळ्या खात्यावर देखरेख करायला सांगितले होते; पण तेव्हा मि. एच. फेंडरगास्ट यांनी त्यांना विरोध केला.

खरे बघायला गेले तर मि. इलियट हे एक वरिष्ठ आय. सी. एस. अधिकारी होते, जी सेवा मूलतः राज्यातील घडामोडी पाहत असते. महाराजांनी त्यांना वैधरीत्या ही जबाबदारी देण्यामध्ये काय अवाजवी आहे हे समजत नाही. मोठ्या-मोठ्या राज्याचे दिवाण आय. सी. एस. अधिकारी नेहमीच राहिले होते आणि नंतर बडोदा स्टेटमध्ये सुद्धा दिवाण म्हणून आय. सी. एस. अधिकारी आले. वास्तविकतः ए.जी.जी. ना मि. इलियटच नको होते. त्यांच्यामध्ये आवश्यक योग्यता नाही म्हणून नाही तर ते रेसिडेन्सीच्या मर्जीप्रमाणे पुरेसे आज्ञाधारक नव्हते व रेसिडेन्सीच्या शिस्तीचे उघडपणे विरोध करणारे त्यांना वाटले.

मि. इलियट यांची शिक्षण पद्धती पण कर्नल बिडुल्फ यांना चुकीची वाटत होती. त्यांच्यावर असा आरोप करण्यात आला होता की, त्यांनी जाणून-बुजून अशी शिक्षणपद्धती बनवली की, त्यांचा शिष्य इंग्रज सत्तेविरुद्ध उभा राहील आणि त्याच वेळी संपूर्णतः त्यांच्या वर्चस्वाखाली राहील. मि. इलियट यांनी गायकवाडांना मॅकिवलीचे ‘द प्रिन्स’ पुस्तक दिले. जे त्यांनी आपले राजकीय मार्गदर्शक बनवले. अनुवाद करून प्रकाशित केले व त्याची प्रस्तावना स्वतः लिहिली.

या पुस्तकावरची ब्रिटिश सरकारच्या नजरेतील समीक्षा दोषदर्शी स्वरूपाची आहे. निर्विवादपणे मि. इलियट यांनी दिलेल्या मॅकिवलीच्या शिक्षणाचा परिणाम रूपे महाराज इंग्रज सरकारच्या कह्यात राहिले नाहीत आणि त्यांची धोरणे, असंबद्ध व असमंजस बनली अशी कर्नल बिडुल्फ तक्रार करतात. अशा अनेक दुष्ट प्रतिमा व काल्पनिक घटना त्यांनी महाराजांच्या मनावर बिंबवल्या व त्यांना अप्रामाणिक बनवले, असे कर्नल बिडुल्फ यांना वाटते. बिचारे मि. इलियट रेसिडेन्सीच्या भडिमार टीकेचे नेहमीचं लक्ष बनले. कर्नल बिडुल्फ त्यांचे वर्णन बडोद्यावरची एक मोठी आपत्ती व गव्हर्नमेंट ऑफ इंडियाची प्रतिष्ठा कमी करणारा माणूस असे करतात व पुढे सर ऑलिव्हस सेंट जोन्स यांनी लिहिलेला रिपोर्ट नमुनादाखल म्हणून जोडतात. जो म्हणतो, मि. इलियट यांनी इंग्रज सरकारच्या सरळ-सरळविरुद्ध सल्ला दिला.

वास्तविकतः रेसिडेन्सीच्या एवढ्या विरोधानंतर महाराज मि. इलियट यांना युरोपात घेऊन गेले म्हणून रेसिडेन्सीला तो फार मोठा अपमान वाटला व त्याचा बदला घेण्यासाठी ते काही ना काही कारण काढून मि. इलियट व महाराजांना बदनाम करण्याचे प्रयत्न करत होते.

बडोद्यामध्ये गुजराती आणि मराठी असे दोन गट पडले होते, हे दोन्ही गट महाराजांशी एकनिष्ठ होते आणि महाराजांच्या उपस्थितीने त्यांच्यावर नेहमीच प्रभाव पडत असे. गेल्या काही वर्षांपासून महाराज आपल्या राज्यातून वारंवार गैरहजर राहण्यामुळे हा विवाद आता स्पष्ट दिसू

लागला होता आणि रेसिडेन्सीमधील लोक वाट बघत होते की, केव्हा महाराज परत परदेशी जातात व आपण या भांडणाचा फायदा घेऊन महाराजांसाठी व त्यांच्या मार्गदर्शक आणि गुरू मि. इलियटसाठी अडचण निर्माण करू.

मि. इलियट यांनी आपल्या पालक सेवेकडे परत जाण्याऐवजी महाराजा सयाजीरावांना सेवा देण्याचे निवडले होते. त्यामुळे अगोदरच त्यांना आपले आय.सी.एस सेवेतील योग्य ज्येष्ठ स्थान मिळाले नव्हते; परंतु मि. इलियट यांचा आयसीएस सेवेकडे परत जाण्याचा कोणताही हेतू नसल्यामुळे, त्यांना फारसा फरक पडत नव्हता. कर्नल बिडुल्फ यांनी नक्की केले होते की, त्यांना बडोद्याच्या सेवेतून बाजूला काढावयाचे व आय.सी.एस. मध्ये खालच्या श्रेणीवर पाठवायचे. आपल्या मोहिमेची त्यांनी सुरुवात केली.

कर्नल बिडुल्फच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी बडोदा प्रशासनाबद्दलच्या या तक्रारी, ब्रिटिश सरकारकडे कार्यवाहीसाठी पाठवण्याशिवाय काहीच केले नाही. तर कर्नल बिडुल्फ यांनी आपल्या वरिष्ठांना सल्ला देऊन बारखळी डिपार्टमेंटचा उद्देश आणि पद्धतींचा अहवाल मागविला. मि. इलियटने आपल्या खात्याचा सविस्तर अहवाल संकलित केला. या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर भारत सरकारने निष्कर्ष काढला की, बडोद्याचे जमिनीबद्दलचे धोरण त्यांच्यापेक्षाही अधिक सौम्य आहे.

आपला अहवाल ब्रिटिश सरकारकडे सुपूर्द करून व उपसंचालक वासुदेव सदाशिव बापट यांना आपल्या खात्याचा अधिकार देऊन मि. इलियट समाधानाने इंग्लंडला रजेवर गेले. आणि अचानक बापट यांना लाच घेण्याच्या आरोपावरून निलंबित करण्यात आले व त्यांच्या जागी त्यांचे सहायक मि. मेकॅनोकी यांची नेमणूक करण्यात आली. पुढे बापट यांच्यावर केस चालवण्यात आली; पण सर्व गोष्टीची बारीक माहिती असलेल्या खात्याचे मुख्य अधिकारी इलियटसाहेबांची साक्ष घेण्यास कोर्टाने नकार दिला व पुराव्याअभावी बापट निर्दोष सुटले.

बडोद्यातून मि. इलियट यांना काढावयाचा आराखडा, त्यांचे प्रशासन भ्रष्ट व अकार्यक्षम आहे आणि म्हणून त्यांना रेसिडेन्सीच्या कठोर नियंत्रणाची जरूर आहे या भूमिकेवर तयार झाला होता. मि. इलियट स्वतः इंग्लंडमध्ये प्रकृती अस्वास्थ्यामुळे रजेवर होते. रॉबर्ट फायरेनी महाराजा मल्हाररावांना पदच्युत करते वेळी जशी चौकशी सुरू केली होती तशीच चौकशी कर्नल बिडुल्फ यांनी मि. इलियट विरुद्धची आपली बाजू मजबूत करण्यासाठी सुरू केली.

इंग्लंडमध्ये रजेवर असताना मि. इलियट यांना फॉरेन ऑफिसकडून टेलिग्राम आला की, त्यांची नोकरी मुंबई सरकारकडे बदलण्यात आली आहे. त्यांनी बडोद्यात २० वर्षं नोकरी केल्यावर आणि निवृत्तीला काही महिनेच बाकी असताना राहिलेला थोडा वेळ ज्या लोकांना त्यांच्याबद्दल प्रेम व आदर आहे, जे त्यांच्या कामाचे महत्त्व जाणतात अशा लोकांबरोबर त्यांना व्यतीत करणे जास्त आवडले असते; पण मुंबई सरकारने मि. इलियटवरील आपली नाराजगी व्यक्त करण्यासाठी त्यांची नेमणूक विजापूर येथे डिस्ट्रिक्ट कलेक्टर म्हणून केली. ही जागा त्यांच्या अनुभवाच्या दृष्टीने कनिष्ठ दर्जाची होती व विजापूर डिस्ट्रिक्टमध्ये बदली करणे एखाद्याला

शिक्षा देण्यासारखे समजले जायचे. मि. इलियट यांनी अशा रीतीने आपल्या आयुष्यातली काही वर्षं छोट्या जागेवर नोकरी केली.

या पूर्वी मि. इलियट यांना बडोद्याहून काढण्याची खटपट महाराजांच्या खास आग्रहामुळे थांबली; तथापि त्यांचे शल्य मात्र नाहीसे झालेच नाही. कारण यानंतर काही वर्षांनी ते पुन्हा सलू लागून, त्याचा अखेर परिणाम मि. इलियट यांच्या जाण्यातच झाला. त्या संबंधाची हकीकत खुद्द मि. इलियट यांनी महाराजांना सन १८९५च्या डिसेंबर महिन्यात लिहिलेल्या पत्रावरून समजते. या पत्रात ते लिहितात :

बहुतेक लवकरच मी हिंदुस्थान सोडून जाईन. माझी नोकरी बडोदे सरकारास बऱ्याच वर्षांपूर्वी उसनी देण्यात आली होती व तेव्हापासून मध्यंतरीच्या एका लहानशा अवधीखेरीज ती सतत चालत आली. परंतु दोन महिन्यांपूर्वी मला हिंदुस्थान सरकारकडून अशी तार मिळाली की, तुमची नोकरी मुंबई सरकारकडे सोपवण्यात आली आहे. यासाठी मी आपल्याला नम्रतापूर्वक विनंती करतो की, माझी बदली करण्याचे कारण काय आहे याचा तपास करून मला ते कळविण्याची आपण कृपा करावी. माझ्या ऐकण्यात असे आले आहे की, मजविरुद्ध गतवर्षी रेसिडेंट कर्नल बिडुल्फसाहेबांनी रिपोर्ट केला आहे. वास्तविक त्या रिपोर्टांतील मजकूर मला कळविण्यात आला नाही. म्हणून वर म्हटल्याप्रमाणे माझी विनंती आपण मान्य करावी.'

या पत्राचे उत्तर महाराजांनी पाठविले. त्यात ते लिहितात की, तुम्ही परत येऊन आणखी काही काळापर्यंत काम करावे, अशी माझी इच्छा आहे. जर मुंबई सरकारला अधिकाऱ्यांची कमतरता पडत असेल, तर तुम्ही ब्रिटिश नोकरीतून निवृत्त झाल्यावर माझ्या नोकरीत यावे अशी माझी इच्छा आहे व अशा रीतीने तुम्हांस येथील नोकरी करण्याची परवानगी देण्यास काही हरकत आहे की काय, याचा खुलासा मी मागितला आहे.

या पत्रव्यवहारावरून एकंदर परिस्थितीची कल्पना येऊन शकते. मि. इलियट हे महाराजांना अयोग्य सल्ला देत नसून उलट राज्यात अनेक प्रकारच्या प्रजाहिताच्या बाबतीत प्रोत्साहन देत होते. अशा स्थितीत राजा या नात्याने आपले कर्तव्य करीत असताही आपल्यावर व आपल्या विश्वासू सल्लागारांवर सरकारने संशय दृष्टी ठेवावी, याचा महाराजांना स्वाभाविक रीतीने खेद वाटला.

मि. इलियट यांना कधीही कळले नाही की, त्यांना असे का वागविण्यात आले; कारण एकच होते की ते वांशिक आणि सरकारी खात्याचा निष्ठेच्या बाहेर ते गेले. महाराजांनी त्यांचीही बदली रद्द करण्याची विनंती ब्रिटिश सरकारला केली. पण त्याला उत्तरादाखल सरकारने दुसरा आय.सी.एस. ऑफिसर देण्याची तयारी दाखवली व मि. इलियट यांच्या निवृत्तीनंतर त्यांना बडोदा येथे नोकरी करण्याची परवानगी मागितल्यावर कार्यपद्धतीचा विलंब दाखवून थोडे वर्षं उत्तरच दिले नाही आणि कागदोपत्री उत्तर देण्याऐवजी असे स्पष्ट केले की, मि. इलियट यांच्या सेवेची वारंवार मागणी केल्याने त्यांचे (महाराजांचे) व रेसिडेन्सीचे बिघडलेले संबंध अजूनही बिघडतील.

महाराज आपले मित्र लॉर्ड रे यांना लिहितात, ज्या पद्धतीने त्यांना जावे लागले त्याचा प्रशासनावर निराशाजनक परिणाम झाला आहे. आता अशी लोक काम करण्यास मिळत नाहीत जी प्रामाणिकपणे व न कचरता धीटपणे काम करतात.

मि. इलियट यांच्या सेवानिवृत्ती संबंधाने महाराज असेही म्हणतातः

''त्यांच्या जाण्याने मला फार खेद होत आहे. विशेषतः त्यांना जाणे भाग पडण्याच्या कारणामुळे माझा अधिकारीवर्ग नेहमीपेक्षा अधिक भित्रा होऊन माझ्या एकंदर नोकरवर्गाची दानत बिघडविण्यासारखा परिणाम झाला आहे. त्यांच्या जाण्याचे बाह्य कारण म्हणून बापट प्रकरणातील त्यांचे वर्तन दाखविण्यात येते; परंतु हा प्रत्यक्ष परिणाम घडून येण्यापूर्वीपासून ही माझ्या व त्यांच्या संबंधावर कडक नजर ठेविण्यात येत असे.''

अशा प्रसंगावरून त्यांनी एके ठिकाणी असे उद्गार काढले आहेत की,

देशी संस्थाने व त्यांचे नामधारी राजे यांची स्थिती एखाद्या वाजविण्याच्या ढोलाहूनही वाईट असते. वाटेल त्या कारणावरून व वाटेल त्या रीतीने त्यांना दोष देण्यात येतो. जर त्यांनी आपल्या राज्यात सुधारणा करण्याचा जोराने प्रयत्न केला, तर ते अंधानुकरण करण्याबद्दल अप्रिय होतात व जर ते तसेच रखडत मागेच राहिले तर कालमानाप्रमाणे पुढे न जाण्याबद्दल त्यांना दोष देण्यात येतो. ही स्थिती फार चमत्कारिक आहे व हिच्यात योग्य ती सुधारणा झाली पाहिजे.

महाराजांच्या या अभिप्रायाला त्याच सुमारास मि. इलियट यांनी लिहिलेल्या एका पत्राने पुष्टी मिळते. मि. इलियट लिहितात की, राज्यात असलेली पण राज्याचा भाग नसलेली अशी एखादी प्रबळ सत्ता जर राज्याविरुद्धच्या तक्रारी ऐकण्याची तत्परता दाखवेल, तर त्याचा परिणाम कायम होईल! अर्थातच हजारो तक्रारी एकदम येतील व तशा त्या या वेळी आल्याही. त्यापैकीच्या पुष्कळशा घडघडीत खोट्या होत्या व अर्ध्याहून अधिक तर निव्वळ मूर्खपणाच्या होत्या. उरलेल्यातील मूर्खपणा प्रथमदर्शनी दिसण्यासारखा नव्हता, तरी तो विचारांती कळण्याजोगा होता. या दरेक तक्रारींबद्दल मी योग्य तो खुलासा दिलेला होता; परंतु मला लवकरच कळून आले की, या प्रकरणी जे काही अपेक्षित होते, ते खुलासे नसून दुसरेच काही होते. माझी कल्पना अशी आहे की, आपण आजपर्यंत जे सुधारणांचे कार्य दृढतेने केले, त्याबद्दल आपल्यावर सांप्रतची टीका होत आहे. आपण वर्षानुवर्षे नुसते कायदे करीत राहिला असता, इमारती व इतर कामे करीत राहिला असता, अथवा वाटेल तितका पैसा अकारणी खर्च करीत राहिला असता, तरी आपल्याला कोणी दोष दिला नसता; पण आपण इनाम पद्धतीतील दोष सुधारणांचे काम हाती घेताच आपल्या विरुद्ध आरडाओरड सुरू झाली.

या प्रकारमुळे महाराज आपल्या पूर्वोक्त पत्रात म्हणतातः

अशा वेळी लोक आश्चर्याने असेही विचारू लागतात की, आपल्या राज्यात मोठासा सुपरिणाम घडवून आणण्याचे श्रेय न मिळविता निष्कारण कष्ट व त्रास करून घेणाऱ्या हल्लीच्या राजांपेक्षा जुन्या काळचे दारू व स्त्रिया यात गर्क असलेले राजे काय वाईट होते? अशा प्रकारच्या एकंदर

परिस्थितीमुळे प्रगती करता न आल्यामुळे जुन्या चाकोरीत कुजत पडण्याची वृत्ती मात्र अंगी निर्माण होते.

ज्यांच्याकडून इमानी व विश्वासू नोकरीची अपेक्षा करण्याचा मला अधिकार आहे त्यांच्या कडून तशी नोकरी केली गेली नाही. मि. इलियट यांना हा आपला अभिप्राय कळविताना २ मार्च १८९५ ला महाराज म्हणतात की, रेसिडेन्ट बिडुल्फ यांनी पुष्कळ उपद्व्याप केला व त्याचा परिणाम बराच कालपर्यंत राहील. त्यांच्या वर्तनाने माझी सत्ता व माझा दर्जा फार दुर्बल झाला आहे व त्यामुळे राज्यात सुव्यवस्था करणे अशक्य नसले, तरी अत्यंत कठीण झाले आहे. अशा परिस्थितीमुळे राज्यातील अधिकारी भित्रे झाले असून, लोकांच्या दृष्टीने त्यांच्या तक्रारींना रेसिडेन्सीचा आधार मिळतो.

कर्नल बिडुल्फ यांनी आपल्या अहवालात मिसेस इलियट यांनाही लक्ष केले होते. १८९४त निसमध्ये मिसेस इलियट महाराणी चिमणाबाईंच्या सोबती (companion) म्हणून सयाजीराव महाराजांच्या युरोप सफरीत सामील झाल्या होत्या. कर्नल बिडुल्फ यांना अतिशय वाईट वाटत होते की मि. इलियट व त्यांची पत्नी महाराजांबरोबर अतिथी म्हणून ऐशआरामात सर्वोत्तम हॉटेलमध्ये राहत आहेत. त्यांना मिसेस इलियटना किती पगार आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता होती. त्याबद्दल त्यांनी पूर्व सहमती न घेतली म्हणून असा पगार त्यांना मिळू नये अशी त्यांची इच्छा होती व आपल्या प्रयत्नात ते यशस्वी झाले.

मिसेस इलियट यांनी महाराजांच्या हाताखाली पगारी नोकरी करायला नको होती असा दृष्टिकोन कर्नल बिडुल्फ यांनी आपल्या रिपोर्टमध्ये घेतला होता. दुर्दैवाने तो ब्रिटिश सरकारने मान्य केला.

सयाजीराव महाराज आपल्या पत्रात मि. इलियट यांना कळवतात, ''आपल्याला मिसेस इलियट यांच्या मानधनाविषयीचा निर्णय कळलाच असेल त्यांनी ते अमान्य केले आहे. हे खूपच दुःखदायी आहे. त्यांना परत संदर्भ देऊन काही चांगले घडणार नाही. खूप वर्षांनंतर जेव्हा मिसेस इलियट भारतीय सरकारच्या नियंत्रणाखाली नव्हत्या तेव्हा महाराजांनी त्यांची उदारपणे भरपाई केली.

आपले पूर्वीचे शिक्षक मि. एफ. ए. एच. इलियट यांच्या कुटुंबासाठी काही करायची महाराजांची फार इच्छा होती; पण मिसेस इलियट यांचा पत्ता मिळत नव्हता. पुढे जागतिक-युद्धाच्या सुरुवातीला जेव्हा महाराज इंग्लंडमध्ये होते तेव्हा त्यांनी इलाला (मि. इलियटची मुलगी) पत्र लिहिले, ''मी तुला व तुझ्या आईला भेट म्हणून पैसे पाठवण्याचा प्रयत्न केला; पण तुझ्या आईचा पत्ता मला मिळत नव्हता.'' नंतर त्यांना कदाचित मिसेस इलियट यांचा पत्ता मिळाला असावा; कारण त्यांनी मिसेस इलियटला पैसे पाठवले व कळवले की, या पैशाने तुम्ही तुमची इच्छा होती तो व्यवसाय चालू करा व आपले उर्वरित आयुष्य आरामात घालवा.

इलियट सरांना बेनेट (Bennett), हिलेन (Heliane) आणि इला (Eilla) या तीन मुली होत्या व टेड (Ted) नावाचा एक मुलगा होता. हे सगळे पत्ररूपाने महाराजांच्या शेवटपर्यंत संपर्कात राहिले.

निवृत्तीनंतरही मि. इलियट यांच्याशी पत्ररूपाने आदानप्रदान

सयाजीराव महाराज व इंग्रज रेसिडेन्सी यांच्यामधील पहिला तीव्र व उघड मतभेद मि. इलियट यांच्या बडोद्यातील नेमणूक हलवण्यावरून झाला अर्थात बडोद्याची नेमणूक सोडल्यानंतर त्यांच्यामधील जिव्हाळयाचे संबंध तसेच दृढ राहिले. त्या नंतरही महाराजांनी त्यांना बडोद्यात दोन वेळा राहण्यास बोलवणे व आपल्याबरोबर युरोप ट्रिपमध्ये सहभागी करून घेतले. विशेषतः जेव्हा-जेव्हा महाराजांना इंग्रज अधिकाऱ्यांचा राग येत असे, कौटुंबिक जीवनात आनंदाचे प्रसंग येत; तसेच दुःखाचे प्रसंग येत तेव्हाही ते इलियट सरांना तक्रार करत असत, सल्ला मागत असत व मन हलके करत असत. काही पत्रात ते इलियट सरांना त्यानी लिहिलेल्या लेखांवर (Notes on Famine Tour and My Ways and Days In India and Europe) अभिप्राय मागतात, छोट्या सुधारणा करायची विनंती करून प्रूफरीडिंगचे काम त्यांच्यावर सोपवतात. त्यांचे गुरुजी म्हणून लहानपणी महाराजांना मि. इलियटना सर म्हणून संबोधण्यास शिकवले होते. महाराज त्यांच्या नंतरच्या आयुष्यातही ःसर म्हणून संबोधायचे. त्यांना वारंवार लिहिलेल्या भावनाप्रधान पत्राचा मायना मात्र औपचारिक "My Dear Sir" असाच असायचा. अशा काही पत्रांचे विविध विषयांचे नमुने खाली नोंद केले आहेत.

महाराजांची बहीण सौ. ताराबाबा हिचा मृत्यू १५ जून १८९७ला झाला ही दुःखकारक वार्ता महाराजांनी मि. इलियट यांना पत्राने कळविताना, त्याच पत्रात मातुश्री जमनाबाईसाहेब यांची प्रकृती गंभीर असून त्यांना कर्नाळीहून बडोद्यास मोतीबागेत आणल्याबद्दल लिहिले होते.

जून १८९८ रोजी मि. इलियट यांना लिहिलेल्या पत्रांत महाराजांनी पिलवाई प्रकरणासंबंधाची हकीकत कळविली आहे, त्यात ते स्पष्ट लिहितात की,

‘‘या सर्व दंग्यांचे मुख्य कारण जमिनीची मोजणी करणे इतके साधे होते. गावातील लोकांना दिवाणांनी स्पष्ट रीतीने लेखी कळविले होते की, गावचा आकडा वाढविण्यापूर्वी तुमचे म्हणणे रीतसर ऐकण्यात येईल; तथापि दंगेखोरांनी न ऐकता लढाईची तयारी केली. खुद्द पिलवाई गावातील भाट लोकांनी गणकाऱ्यांच्या पूर्वजांची रसभरित वर्णने करून, ब्रिटिश सरकारच्या परवानगीशिवाय बडोदे सरकारास एक बंदूकही उचलता येणार नाही असे सांगून त्यांना चिथविले व आमच्या अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे दंगेखोरांना अधिकच जोर चढला. तथापि सुदैवाने अखेरीस प्रकरण थोडक्यात निभवले

इलियटसाहेब नोकरीतून निवृत्त होऊन विलायतेत जाऊन राहिले, तरीही पत्रव्यवहाराने व प्रत्यक्ष भेटीने हा उभयतांमधील संबंध त्यांच्या मृत्यूपर्यंत वृद्धिंगत होत गेला. अखेर ते २८ मार्च १९१० रोजी इंग्लंडात निवर्तले.

१८८५ मध्ये मि. इलियट सयाजीराव महाराजाबरोबर युरोप टूरवर गेले व ९ ऑक्टोबर १८८८ला ते परत आले आणि आपल्या कामाची सुरुवात त्यांनी त्याच दिवशी केली. नंतर १५ मार्च १८८९ ते १ एप्रिल १८९० ते रजेवर गेले. १५ एप्रिल १८९३ला ते रजेवर गेले व १ नोव्हेंबर १८९३ला परत आले. परत १ मे १८९४ला ते रजेवर गेले आणि १६

ऑक्टोबर १८९५ला ते सरळ विजापूर येथे कलेक्टरच्या नोकरीवर रुजू झाले. तिथून १८९६ला ते निवृत्त होऊन इंग्लंडला परतले. ऑक्टोबर १८९५ पर्यंत २० वर्षं त्यांनी बडोदे राज्याची इमानदारीने नोकरी केल्यानंतर थोड्याच काळासाठी त्यांना परत इंग्रज सरकारकडे जावे लागले. बडोदा सोडताना त्याना वेतन दरमहा २,६४० रुपये होते ज्यामध्ये ४४० रुपये पेन्शनचा समावेश होता.

श्री. इलियट यांनी आपल्या कारकिर्दीत केलेले महत्त्वाचे काम म्हणजे सयाजीराव महाराजांचे शिक्षण, बारखळी मापदंड आणि राज्यभरातील सर्व भूभागांचे सेटलमेंट, ज्यांनी काही काळ बडोद्याच्या राजकारणात आंदोलन निर्माण केले. श्री. इलियट यांनी महाराजांच्या धोरणाची अंमलबजावणी आवेशाने आणि आपुलकीने केली. त्यामुळे ब्रिटिश सरकारची नाराजी पत्करून आपली नोकरी त्यांना गमवावी लागली.

आपले उर्वरित आयुष्य मि. इलियट सरांनी इंग्लंडमध्ये ७७, किंग्स्टन गार्डन या आपल्या जुन्या निवासस्थानी घालवला. बडोद्याच्या कार्यामध्ये शेवटपर्यंत त्यांनी रस घेतला. १९०२ मध्ये युवराज फत्तेसिंहराव ऑक्सफर्डमध्ये असताना; तसेच १९०१ ते १९०८ या कालावधीत महाराज कुमार जयसिंहराव हॅरोमध्ये असताना या दोघांवरही लक्ष देण्याचे काम त्यांनी केले. स्वतः महाराजांना मि. इलियट यांचा जसा उपयोग झाला, तसा त्यांच्या राजपुत्रांना झाला नाही. देणाऱ्या इतकाच घेणाराही सक्षम असणे जरुरी असते. तथापि, महाराजांचे इलियट सरांविषयीचे मत उत्तम होते, असे दिसून येते. १९०० साली पॅरिस एक्झिबिशनला महाराजांनी भेट दिली तेव्हा काही काळ ते व मिसेस इलियट महाराजांबरोबर इंग्लंडमध्ये सोबती म्हणून राहिले.

सेवानिवृत्तीच्या काळात मि. इलियट दोन वेळा बडोद्यात अतिथी म्हणून आले व त्यांनी आपल्या लाडक्या शिष्याने केलेल्या सुधारणांचे अवलोकन केले. २८ मार्च १९१० मध्ये महाराजांचे प्रेमळ शिक्षक, विश्वासू मित्र व इमानी सेवक इलियट सरांचे निधन लंडन येथील आपल्या निवासस्थानी झाले. १५ दिवसांनी महाराज युरोपच्या दौऱ्यासाठी निघणार होते. इलियट सरांच्या मृत्यू त्यांच्यासाठी एक खूप मोठा आघात होता. महाराजांनी त्यांच्या आयुष्यात फार कमी लोकांवर विश्वास ठेवला व प्रशंसा केली. मि. इलियटबद्दल त्यांच्या मनात अतिशय प्रेम होते, आपल्या घरातील एका व्यक्तीच्या मृत्यूएवढेच दुःख त्यांना झाले.

मि. इलियट व सयाजीराव महाराज यांच्या गुरु-शिष्य नात्याला अनेक परिमाणे होती. वसाहतवाद, स्वातंत्र्यपूर्वकाळ, संस्थाने व ब्रिटिश सत्ता यांचे परस्परसंबंध ही त्यातील महत्त्वाची प्रभावशाली सूत्रे असली तरी ती काही प्रमाणात उल्लंघून जात. एक आधुनिक दृष्टीचा सामाजिक, राजकीय सजगता असलेला भविष्यदर्शी, प्रजाहितदक्ष राजा घडविण्याचे मि. इलियट यांचे कार्य अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे हे मान्य करावे लागते.

- सौ. मंदा हिंगुराव

संदर्भ :

१. दाजी नागेश आपटे (१९३६) 'श्री महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचे चरित्र खंड १-३' दाजी नागेश आपटे, बडोदे.

2. Fatesinghrao Gaekwad (2007)'Sayajirao of Baroda-The Prince and the Man' Popular Publication, Mumbai.

3. G. S. Sardesai (1923) 'An account of education of His Highness the Maharaja Sayaji Rao Gaekwar June 1875 to December 1881' Jagruti Press, Baroda.

4. G. S. Sardesai (1923) 'Selected Letters of His Highness the Maharaja Sayaji Rao Gaekwar Volume I. Letters 1 to 612, 1886 to 1901.' Laxmi Electric Press, Baroda.

बडोद्याचे राज्यकर्ते

एफ. एच. ए. इलियट

‘द रुलर्स ऑफ बरोडा’ वरून

भाषांतर करणार

विनायक बी. परांजपे



पहिली आवृत्ती

१९०६

श्रीमंत गायकवाड सरकारचें देशी शिक्षण खातें.

बडोद्याचे राज्यकर्ते.

श्रीमंत सरकार महाराज श्री सयाजीराव गायकवाड

यांच्या आज्ञेवरून

' रुलर्स ऑफ बरोडा ' वरून

भाषांतर करणार

विनायक बी. परांजपे.

बडोदें 'सरकारी छापखान्यांत' छापिलें.

संवत् १९६२ इ. स. १९०६

किं. रु. १-६-०

प्रस्तावना

◘

या लहानशा इतिहासास 'बडोद्याचे राज्यकर्ते' हे नाव देण्यात आले आहे. दीड शतकात ज्या व्यक्तींनी किंवा वर्गांनी गुजरातच्या बऱ्याच भागावर आपला अधिकार चालविला आहे त्यांचे राजकीय चरित्र त्यात दाखविले आहे- गायकवाड राजे, त्यांचे आप्त, त्यांचे दिवाण, लष्करी बडे लोक, सावकार, वसुली इनारदार व धर्माधिकारी वर्ग- यांचा त्यात समावेश आहे. पेशवे, ब्रिटिश रेसिडेंट, त्यांचे नेटिव एजंट व ज्या दुसऱ्या कोणी गायकवाडांच्या अधिकारात घेतला ते व जे मराठे त्यांच्या पाठीमागे असत ते- या सर्वांबद्दल थोडाफार या पुस्तकात उल्लेख आहे. गुजरातची देशस्थिती, लोक, त्यांच्या रीतिभाती, त्यांची शहरे व दिव्यस्थाने- यांजबद्दल विशेष काहीच सांगितलेले नाही.

सरकारी नोकरांना कोशाच्या ठिकाणी व जीवनकलहात पडणाऱ्या विद्यार्थिजनास माहितीचे ठिकाण म्हणून उपयोग होण्यासाठी या पुस्तकाचा उद्देश आहे. या दुसऱ्या प्रकारच्या लोकांना क्षुद्र बाबींचा कंटाळा येऊ नये किंवा गडबडून जाऊ नये म्हणून हिशेबाच्या, खर्च व उत्पन्नाच्या व इतर बाबींच्या यादी टिपांत दिलेल्या आहेत, त्यांजकडे विशेष माहितीची इच्छा असेल त्यांनी लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे मोठ्या लोकांची लहान लहान चरित्रे संशयात्मक किंवा अजमासाच्या गोष्टी व क्वचित क्वचित केलेले ऊहापोह टिपेत बारीक टाइपात एकवटून दिले आहेत.

हे पुस्तक लिहिण्याची मुख्य कारणे साधी आहेत. बडोद्यासारख्या संस्थानाच्या इतिहासातील मुख्य मुख्य गोष्टींचे क्रमवार संविधानक कोठे नसावे ही दुःखाची गोष्ट आहे. अशा तऱ्हेचा इतिहास साधारणपणे कर्नल वालेसचे ''गायकवाड व त्याचे ब्रिटिश सरकारशी संबंध'' या पुस्तकात आहे व लवकरच बडोदे गॅझेटियर नावाचे पुस्तक बहुशः निर्माण होईल. परंतु यांपैकी एकही ग्रंथ ज्यांच्यासाठी हे पुस्तक लिहिले गेले आहे त्यांना उपलब्ध होणे शक्य नाही. शिवाय या पुस्तकात काही दोष असोत. हल्लीच्या वेळी या पुस्तकासारखा प्रयत्न करणे इष्ट आहे. कारण

गत गोष्टींच्या जागी नवीन येत आहेत व त्यांची आठवण अंधूक होण्यापूर्वी त्या पुस्तकद्धारा कायम करून ठेवणे जरूर आहे.


या पुस्तकातील माहितीची स्थाने ही होत : टाडचे राजस्थान, फोर्बसचे रासमाला, गुजरातच्या गॅझेटियरचा मेजर वॉटसनचा लेख, ग्रांट डफचा मराठ्यांचा इतिहास, फोर्बसचा ओरियंटल मेमायर्स, मेजर वालेसचा इतिहास, बडोदा रेसिडेन्सीतील दफ्तरे, ब्ल्यू पुस्तकांचा भारा, दोन-तीन लिखित इतिहास व अनेक दुसरे ग्रंथ गुजरात गॅझेटियरचा मि. बेनचा लेख तयार असता तर त्याचा उपयोग केला असता. काही मराठी कागद-पत्रांचा व संस्थानच्या दफ्तरांतील लेखांचा उपयोग केलेला आहे व थोड्याशा मुद्द्यावर काही नेटिव गृहस्थांच्या मतांचा फायदा करून घेतलेला आहे. पण बहुतेक माहिती इंग्रजी आधारावरून घेतलेली आहे. मराठी कागदपत्रांवरून कोणी नेटिव गृहस्थ संस्थानचा इतिहास कधी लिहिला जाईल, तर तो जास्त मूल्यवान होईल यात शंका नाही.

बरेच भाग यातील अगदी नवीन असल्या कारणाने पुस्तकात बरेच महत्त्वाचे भाग गळले असतील व दोषही बरेच राहिले असतील. कोणी वाचक असे दोष ग्रंथकर्त्यास दाखवील तर तो त्यांचा फायदा दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी घेईल. यातील इतिहासाचे काही भाग अपुरे व मुग्ध राहिले आहेत व याचे कारण ग्रंथकर्त्यास जरूर साधने उपलब्ध झाली नाहीत. गिराशांचा इतिहास, काठेवाडांत न मोडणाऱ्या मांडलिक संस्थानचा हळूहळू झालेला पाडाव; तसेच गुजरात व दक्षिण कोकणातील ब्राह्मणांचा पाडाव याचा इतिहास व इतर काही बाबी या पुस्तकात अर्धवटच सोडून दिलेल्या आहेत.

- विनायक बी. परांजपे

अनुक्रमणिका

◘



गुरुवर्य एफ.एच.ए.इलियट

प्रकरण १ ले

गुजराथचे हिंदू राजे

चावडा, चालुक्य किंवा सोलंकी आणि वाघेला घराणी

◘

सोम वंशातील यादव कुळापैकी कुशलस्थली द्वारकानगरचा अधिपती कृष्ण याने महा प्रतापी पंडू पुत्रास (पांडवांस) भारत युद्धामध्ये सर्वस्वी साहाय्य करून कुरू पुत्रांचा (कौरवांचा) समूळ नाश करविला. नंतर युधिष्ठिर आणि बलदेव यासह तो स्वराजधानीप्रत परत येऊन भिल्लांबरोबर लढाई करीत असता देवलोकी गेला.

विक्रम शक ७५२ (इ.स. ६९६)

सौराष्ट्र द्वीपकल्पाच्या अगदी टोकास द्वारका आहे आणि त्याच्या किनाऱ्यावर देवबंदर नावाचे शहर आहे. हे शहर सौर ऊर्फ चावडा वसतिस्थान होय. हे लोक सूर्योपासक होते आणि सोमनाथाचे देऊळ आणि बलनाथ अगर सूर्यनारायणाची जी दुसरी देवालये आहेत ती बहुतकरून याच सौर ऊर्फ चावडांनी स्थापन केली असावीत. वल्लभीपूर नावाच्या प्राचीन राजधानीत ज्या सूर्यवंशीय राज्यांनी राज्य केले त्यांच्याशी या घराण्याची मंडळी आपला संबंध लावीत. वल्लभीपूरच्या महान प्रतापी शिलादित्य राजावर जेव्हा संकटे येऊन कोसळली तेव्हा तेथले काही लोक पंचासूर येथे पळून गेले; चावडा राजा जयशेखर यांच्यापैकी होता. तो आणि त्याची स्त्री रूपसुंदरी यांची कारकीर्द प्रजाजनांस फारच सुखावह आणि भरभराटीस आली. राज्ञी बंधू शूरपाल याच्या एकनिष्ठेने तर या कारकिर्दीस विशेषच बळकटी आली. परंतु कल्याणचा सोलंकी राजा भूवर याच्या मनांत मत्सरभाव उत्पन्न होऊन दोघांमध्ये रणसंग्राम माजला. या कामी जयशेखर मोठ्या शौर्याने लढला आणि पंचामुराचे संरक्षणाकरिता त्याने आपला रणात बळी दिला. शूरपालही त्याचे बाजूने लढून आपल्या देहाची आहुती देण्यास तयार होता. परंतु आपण मेलो तर चावडा घराण्याचा वंश खुंटेल हा विचार मनात येऊन आपला पहिला संकल्प रद्द केला आणि आपल्या गरोदर बहिणीस बरोबर घेऊन तो अरण्यात गेला. रूपसुंदरीचे दिवस भरले असल्यामुळे ती त्या भयंकर आणि घोर अरण्यातच प्रसूत झाली व तिला पुत्र झाला. वनामध्ये जन्मलेला म्हणून तिने त्या बालकाचे नाव वनराज ठेविले.

वनराज आपल्या उत्तम गुणांच्या जोरावर एका राज्याचा व राजघराण्याचा संस्थापक झाला. संवत ८०२ (इ.स. ७४६) मध्ये त्याचा आश्रित अनाहिल याचे पसंतीचे एकाठिकाणी अनहिलवाडा किंवा अनहिलपूर (पाटण) नावाने राजधानी वसवली आणि त्याचा प्रधान जंबा किंवा चांपा याने चांपानेर नगर वसविले.

इ. स. ९४२

वनराजाच्या घराण्याने गुजरात प्रांतावर एकंदर १८४ वर्षे राज्य केले; सामतसिंग राजा हा या घराण्यातील शेवटला राजा होय. हा निव्वळ मूर्ख होता. याच्या बहिणीने कल्याणचा सोलंकी राजा भूवर याच्या एका वंशजाचा पुत्र राजा याजबरोबर लग्न लावले. या राजकन्येचा प्रसूतीतच अंत झाला. झालेल्या मुलाचे नाव मूळराजा असे ठेवले. त्याला पुढे त्याच्या मामाने पाळले.

परंतु मोठा झाल्यावर या कृतघ्न मूळराजाने राजास राज्य भ्रष्ट करून त्यास ठार मारले आणि आईकडील जेवढे संबंधी होते त्या सर्वांचे त्याने खून केले; तरी त्याचे राज्य भरभराटीतच होते आणि हाच या देशात आजपर्यंत जी राजघराणी होऊन गेली त्या सर्वांपेक्षा मोठ्या राजघराण्याचा संस्थापक झाला. अजमीर व तेलंगणच्या राजांकडून जे हल्ले संगनमताने करण्यात आले होते. त्यात याने केव्हा शत्रूचा पराजय केला व केव्हा ते हल्ले मुळातच मोडून टाकले आणि जेव्हा पुन्हा शांतता झाली तेव्हा त्याने श्रीस्थळ (सिद्धपूर) येथे एक उंच रुद्रमाळा बांधली. या त्याच्या कृत्याबद्दल शंकर प्रसन्न झाले व त्यास सोराथचे राज्य दिले आणि यालाच पुढे त्याने नर्मदेच्या दक्षिणेचा लाथ नावाचा भाग जोडला. वृद्धनपणी मूळराजास आपल्या पूर्ववयाच्या पापाबद्दल पश्चत्ताप झाला आणि खंबायत जवळील खेडी व जमिनी ब्राह्मणास देऊन टाकून; तसेच सिहूर आदिच्या ब्राह्मणास अर्पण करून आपण श्रीस्थळी जाऊन रामराम करीत राहिला.

इ.स. ९९७ त त्याचा मुलगा चामुंड त्याच्या गादीवर बसला. त्या बिचाऱ्याचे राज्य चांगले सुरळीतपणे चालले असते; परंतु गिझनीच्या क्रूर सुलतान महम्मदाने एकाएकी नेंडेरवाल्यावर (मुसलमान लोक अनहिलवाड्यास नरवाला असे म्हणतात) हल्ला करून ते शहर काबीज केले. हा शत्रू इतकेच करून थांबला नाही. संपत्तीने भरलेले असे जे प्राचीन सोमनाथचे देऊळ ते लुटून फस्त करण्याचा त्याचा मुख्य उद्देश होता; परंतु गुजराथचा पुढील वारस वल्लभ व त्याचा पुतण्या भीमदेव यांनी शत्रूच्या लष्करावर जिवावर उदार होऊन हल्ला केल्यामुळे त्या पवित्र स्थानावर आलेली संक्रांत लांबणीवर पडली. काही वेळपर्यंत सुलतानच्या लष्कराचा जणू काय अगदी चुराडा होऊन जातो की काय असे वाटले; परंतु अखेरीस दैवबले करून त्यासच यश मिळाले व सोमनाथावर गदा आली. परंतु गंडबाचे किल्ल्यातून भीमदेवास हाकलून दिल्यावर महम्मद अनहिलवाडा येथे परत आला. तेथे बरेच दिवस मुक्काम करून वल्लभास कैद केले व त्याच्यापेक्षा कमी कडक प्रकृतीचा त्याचा भाऊ दुर्लभ यास गादीवर बसविले. आणि शेवटी सुलतान जेव्हा

१. ब्रिग्जप्रमाणे, संवत ९८७ (इ.स. ९३१) त चावडांचा शेवटला पुरुष भोज राजा यास गादीवरून काढून जयसिंग सोलंकीचा मुलगा मूळराजा यास गादीवर बसविले.

लुटीसह गिझनीस परत जाऊ लागला तेव्हा अजमीरच्या राजाच्या मदतीने भीमदेवाने त्यास आपला मार्ग बदलण्यास लावले. त्यामुळे त्याला सिंधची ओसाड राने ओलांडून जाण्याचे भाग पडले व या मार्गात दुष्काळ व कष्ट यांनी ग्रासिल्यामुळे सुलतानाचे बहुतेक लष्कर प्राणास मुकले.

या स्वारीनंतर गुजरातला पुष्कळ वर्षेपर्यंत शांतता मिळाली. तीत तेथे भरभराटी झाली आणि अनहिलवाड्याचे वैभव वाढले. मुसलमान लोकांविरुद्ध कट करणाऱ्या मंडळीत सामील होण्याचे भीमदेवाने नाकारिले. त्याबद्दल अजमीरचा चोहनराजा विशाल याने भीमदेवास पुष्कळ त्रास दिला. या विशाल राजाने आपल्या वर्चस्वाच्या स्मरणार्थ गुजराथेत विशालनगर[१] नावाचे एक गाव स्थापिले. या विशालने धारचा राजा भोज याच्या ताब्यातील काही भाग जिंकला व त्याच्यानंतर गादीवर बसविलेल्या कुराणने गुजरातेतील भिल्ल व महार किंवा कोळी यांच्या ताब्यात असलेल्या मेवा जमिनी स्वाधीन करून घेतल्या. या लोकांच्या सरदारांपैकी एकास जिंकल्यानंतर त्याने हल्ली जेथे अमदाबाद आहे तेथे एक शहर वसविले. कुराणसिंगने एक मोठा तलाव बांधला. त्यास कुराणसागर (कुंडसागर) असे म्हणतात. आनंदराव महाराजांच्या कारकिर्दीपर्यंत हा तलाव कायम होता. त्याचप्रमाणे त्याने मोघेरपूर (मोघेरा)जवळ एक सुंदर देवालय बांधले. याच नावावरून मोघब्राह्मण हे नाव निघाले.

या शेवटच्या धर्म कृत्यार्थ बक्षीस म्हणून देवांनी असा वर दिला की, त्याच्या दानशूर मैनलदेवीस एक पुत्र होईल व तो गुजराथेत आजपर्यंत झालेल्या सर्व हिंदू राजांपेक्षा विशेष प्रख्यात होईल. हा सिद्धराज नावाने अनहिलवाडा येथे एक सहस्रलिंग सरोवर बांधणारा होईल; इतकेच नाही तर श्रीस्थळाचा पुनर्संस्थापकही होईल. (म्हणून श्रीस्थलास सिद्धपूर असे म्हणतात). माळवा, बढवान व गिरनार किंबहुना सर्व सोराथ प्रांत हा जिंकील. याच्या कारकिर्दीत राज्य अगदी राजवैभव व भरभराटी यांच्या शिखरास जाऊन पोहोचले. उत्तरेस अचलगड आणि चंद्रावती, पश्चिमेस चांपानेर आणि डभई हे राज्याचे स्तंभ होते. त्यावेळी सर्व भरतखंडात अनहिलवाडा हेच काय ते संपतीचे माहेर घर होते आणि तेथील बाजार (पुण्य स्थळे), टाकसाळी, राजवाडा, विद्यालये आणि बागा यासंबंधाने विलक्षण गोष्टी सांगतात. त्या बागांत उत्तम सुवासिक वृक्षांच्या छायेत बसून विद्वान लोकांचे तत्त्वज्ञान व धर्म वगैरे विषयांचे अध्ययन, अध्यापन चालत असे. या राज्यात सोराथ आणि माळवा यांचाच फक्त समावेश झाला होता, असे नाही; तर कच्छ व कदाचित सिंधू नदीपर्यंत भिडलेले प्रांत व इकडे कोल्हापूर संस्थानच्या हद्दीपर्यंतचा दक्षिणेचा भाग आणि उत्तरेस गंगानदी व हिमालय पर्वतापर्यंत पसरलेले प्रांत, यांचाही त्यात समावेश होता.

---

१. कदाचित वाघेला राजा विशाळदेव याने हे शहर वसविले असावे किंवा चंद्रावतीचा विशालदेव मंडालेश्वर याने हे पुना पूर्वस्थितीवर आणले असावे. वडनगरचे ब्राह्मण मूळ विशाळ नगरीच राहत असत. पुढे विशाळदेवाने दक्षिणेसाठी जेव्हा त्यास निमंत्रण दिले तेव्हा त्याजपासून दक्षणा घेण्याचे त्यांनी नाकारिले; आणि आपला एक नवीनच पंथ काढून ज्या गावावरून सांप्रतचे नाव त्यांनी धारण केले आहे त्या गावात ते जाऊन राहिले.

इ.स. १२२८

दानशूर सिद्धराजास औरस पुत्र मुळीच नव्हता. सिद्धराज जेव्हा इ. स. ११४३ त स्वर्गस्थ झाला तेव्हा चोहन घराण्यातला कुमारपाल नावाचा एक लांबचा संबंधी दत्तक घेतला. हा आणि त्याचे वंशज गादीवर एका मागून एक बसले. शेवटच्या राजाचे नाव वेडा भीमदेव होते. याच्याबरोबर हा वंश नष्ट झाला. असो. कुमारपालाने आपल्या पूर्वजाप्रमाणे बुद्ध धर्मास आश्रय दिला. अजमीरच्या राजाने त्याचा पराभव केला. वस्तुतः दोघांचाही सामान्य शत्रूकडून निकाल होईपर्यंत या दोन्ही राज्यामध्ये परस्पर रण चाललेलेच असे. महम्मद घोरीने जी स्वारी केली होती त्या स्वारीत भीमदेवाने मोठ्या यशाने इ.स. ११७८ त त्यास हटविले; परंतु त्या बादशहाचा सेनापती कुतुबद्दिन याने त्याबद्दल जो सूड काढला त्यात हा बळी पडला. कुतुबद्दिनाने इ. स. ११९४ त आपल्या जुन्या प्रतिस्पर्ध्यास जिंकून त्याच्या राजधानीतून त्यास हाकून लावले. भीमदेव युद्ध केल्यावाचून काही पडला नाही आणि मुसलमान लोकांना हा अनहिलवाडा पुनरपी जिंकावा लागला आणि मग त्यावर शीवबंदी केली. परंतु काही वर्षे सरल्यावर परस्थांच्या स्वारीची भरती ओसरून पुन्हा वाघेले नामक हिंदूचे राज्य वसलेले व पूर्वीचे वैभव नाही तरी पुन्हा अनहिलवाडा त्या राज्याची राजधानी झालेली आढळून येते.

वाघेला घराणे

वाघेला घराण्याचा पहिला पुरुष विशालदेव हा सिद्धराजाचा अप्रसिद्ध वंशज होता. आणि शेवटला राजा घेलू कुराण हा होता. ज्याला खूनी असे म्हणत. त्या उल्लाउद्दीन खिलजीच्या लष्कराचा याजवर सपाटा बसला. त्याने आपला चुलता जलालुद्दीन याचा खून केल्यावर एक वर्षाने आपला सेनापती अफजलखान यास गुजराथेत पाठविले. कुराणने चांगल्या शौर्याने त्याला अटकाव केला; परंतु त्याचा प्रयत्न निष्फळ झाला; यावेळी मात्र मुसलमान लोकांनी आपला शह चांगलाच बसवला आणि पुष्कळ वर्षांनंतर मराठे लोक सूड उगवीपर्यंत मुसलमानांचा तो शह कायम राहिला. काही काळपर्यंत रजपूत राजाचा ऱ्हास झाला होता किंवा कानाकोपऱ्यात दडून राहिले होते. कुराणची बायको व मुलगी या दिल्लीचा बादशहा व त्याचा पुत्र यांच्या राण्या झाल्या. सुंदर शहरे अगदी धुळीस मिळून गेली. प्राचीन देवालयांचा नाश होऊन त्यांच्या दगडांनी मशिदी बांधल्या गेल्या आणि सर्वच नवीन व्यवस्था झाली.

●●●

प्रकरण २ रे

मुसलमानी कारकीर्द

पूर्वीचे राज्याधिकारी – अहमदाबादचे राजे

आता आम्ही सांगणार या गुजरातच्या इतिहासाचे कालमानाने तीन भाग होतील. (पहिला) एक शतकापेक्षा अधिक कालपर्यंत गुजरात हा दिल्लीच्या साम्राज्यापैकी एक प्रांत होता. खिलजी व तुघलख घराण्याचे वेळी हा प्रांत भरभराटीच्या अगदी शिखरास जाऊन पोहोचला होता. नंतर तो मोडकळीस आला. (दुसरा) दोन-तीन शेवटल्या राजप्रतिनिधींना मुख्याधिकारांच्या दाबाचा कंटाळा आला आणि पंधराव्या शतकाचे आरंभाला सदरहू एका बलाढ्य सुभेदाराने आपले स्वातंत्र्य प्रतिपादून अहमदाबादेस राजघराण्याची स्थापना केली. पुढे कित्येक हुशार राजांच्या अमदानीत या राज्याची सत्ता व संपत्ती इतकी वाढली की, साम्राज्याच्या होर हे एक बलिष्ट राष्ट्रच बनले. (तिसरा) पुढे मोगल घराण्यातील दुसऱ्या बादशहाबरोबर अवेळी लढाई होऊन या राज्याचा नाश झाला व शेवटी सोळाव्या शतकाच्या अखेरीस अकबरने हे राज्य सहज आपल्या साम्राज्यास जोडून घेतले. मोगलाईत एकंदर सर्वत्र भरभराटीच होती; परंतु अखेरीस हे फाजील विस्तार पावलेले साम्राज्य. अठरावे शतकाच्या प्रारंभाला व औरंगजेबाच्या उतरत्या काळी मोडले गेले. आणि औरंगजेब मेल्यावर लवकरच मराठ्यांनी गुजरातवर स्वारी करण्यास आरंभ केला. याच मराठ्यांच्या पक्षांत गायकवाड होते.

(१) (पहिला काळ) गुजरातेवर स्वारी केल्यावर अलफखानाने (१२९७-१३१७) वीस वर्षे त्या प्रांताची सुभेदारी केली. त्यावेळी गुजरातेत अनहिलवाडा, सुरत, भडोच व खंबायत ही मोठी शहरे होती त्यास अलाउद्दीनने परत बोलाविले व त्याचा खून करविला. त्याच्या मागून जे अधिकारी झाले त्यांच्यात याच्यासारखा जोम व शहाणपणा मुळीच नव्हता आणि पुष्कळ वर्षेपर्यंत हा देश बंडांनी अगदी व्यापून गेला होता. एवढेच नाही तर बादशहा किंवा त्याचा प्रतिनिधी यांच्याविरुद्ध येथील प्रबळ सरदारांची कारस्थाने चालू असत. दिल्लीस अविश्वास पसरला होता व पट्टणास अराजनिष्ठा वाढली होती. याचवेळी आसपासच्या काही हिंदूराजांनी आपले नष्ट स्वातंत्र्य अंशतः मिळविले आणि ज्या कोणास बाहेरील शत्रूने गुजरातकडे हाकून

दिले त्यांनी तिकडेच कायमचे ठाणे दिले. याप्रमाणे ईडरचे राठोड, पेरीममध्ये येऊन रहिलेले उत्तरेकडील गोहिली, पारमार आणि सिंघचे काठी लोक हाकून लावल्यामुळे गुजरातेत नवीन येऊन राहिले. त्याचवेळी अनहिलवाडा येथील राजांनी ज्यास पूर्णपणे जिंकलेले नव्हते असे भिल्ल व कोळी वगैरे डोंगरखोऱ्यातील लोकांनी एकसारखा पुंडावा माजविला होता. तथापि या ऐतिहासिक काळात या देशाचे काही भाग चांगले सुपीक झाले होते आणि व्यापार व शिल्पकलांची भरभराट होऊ लागली होती.

(१३४७) एके प्रसंगी अमीर लोकांचे बंडावे, मसलती मोडून टाकण्याकरिता महम्मद तुघलखने माळव्याचा सुभेदार अझीझ याला पाठविले. त्याचा अमिरांनी पराभव केला. तेव्हा बादशहाने स्वतः गुजरातेवर स्वारी केली. तीत सुरत व खंबायत ही शहरे उद्ध्वस्त केली व त्याचवेळी गोहिली लोकांना गोगोमधून हाकून लाविले. परंतु बादशहा जेव्हा दौलताबादेस जाण्याकरिता निघाला तेव्हा सरदार मलिक टोघनच्या पुढारीपणाखाली हे सर्व सरदार लोक पुन्हा उठले. तेव्हा बादशहा परत फिरला. त्याची व याची काडीजवळ गाठ पडून लढाई झाली. तीत बादशहास पूर्ण यश मिळाले; परंतु पुढे काठेवाडांत व पलीकडे देश जिंकीत जात असताना वाटेतच त्यास ताप येऊन तो इ. स. १३५१ त स्वर्गस्थ झाला.

फऱ्हाद उल्मुल्क हा दुसरा राज्याधिकारी होता. तो पुष्कळ लौकिकास चढला होता. साम्राज्याची स्थिती बहकलेली असल्यामुळे आणि त्याचे लष्करात पुष्कळ हिंदू लोक असल्यामुळे व तो त्यांच्याशी मिळून मिसळून राहत असल्यामुळे तो बलाढ्य बनला होता. त्यामुळे त्याने इ. स. १३९१ पर्यंत बहुतेक स्वतंत्रपणे राज्य केले. तथापि सरतेशेवटी झाफीरखान[१] नावाच्या एका फार हुशार माणसास त्याच्या जागेवर पाठविण्यात आले. हा मूळचा रजपूत असून पुढे मुसलमान झालेला होता. झाफीरखानाने आपल्या प्रतिपक्षाचा पाडाव केला; एवढेच नाही तर जुनागड, देलवाड आणि झालवाड वगैरे मुख्य मुख्य हिंदू राजापासून खंडणीही घेतली आणि सोमनाथांचे देऊळही त्याने लुटले तथापि ईडरवर त्याने जे हल्ले केले ते मात्र काही कारणामुळे अगदी फुकट गेले; कारण ज्या मैदानातील अरुंद पट्टीवर त्याचा अंमल होता. त्याच्या पूर्वेकडे ईडरचे संस्थान होते. त्याचे दक्षिणेस सगळ्या डोंगरावर भिल्ल आणि कोळी वगैरेचा सुळसुळाट होता. तोच पश्चिम व उत्तर यांच्या दरम्यान झालोर आणि शिरोही या शहरच्या राजांनी त्याला त्रासविले होते आणि सगळ्या सोराथच्या द्वीपकल्पांतील निदान नऊ-दहा हिंदू जातींचा त्याला मार पडतच होता.

(२) इ. स. १४०३त झाकीरखानाच्या मुलाने राज्यपद धारण करून गुजरातवर स्वतंत्र रीतीने राज्य केले. त्याच्या मरणानंतर काही वर्षांनी झाकीरखानाने स्वतः मुझफर या नावाने अहमदाबादपासून सर्व प्रदेशावर राज्य केले. अहमदाबादेस त्यावेळी असावल असे म्हणत असत. झाकीरखान बहुतेक पटणासच राहत असे. त्याच्या मुलाप्रमाणे त्यालाही अखेरीस तेथेच

---

१. ब्रिग्ज. टेक रजपूत सेहवानचा झाफीर हा मुलगा होता व हा स्वार्थत्यागी होता. त्याचा नातू अहमद याने त्यास मारेकरी घालून मारविले.

मूठ माती देण्यात आली. ज्याने आपले नातेवाईक खरे पण शत्रूच बडोदे व सुरत या शहराचे राज्याधिकारी, त्याचा पराभव करून असावल शहरास अहमदाबाद हे नाव दिले तो झाकीरखानच्या पश्चातचा जोमदार अहमदशहा होय. अलफखानाने पट्टणपासून भडोचपर्यंत सर्व गुजरातभर आपल्या धर्माचा ज्याप्रमाणे प्रसार केला त्याचप्रमाणे अहमदशहाने जुनागडचे राव व खंडणी देणारे सोराथचे दुसरे राजे यांस मांडलिक करून काठेवाडपर्यंत आपल्या धर्माचा प्रचार केला. चापानेर, नांदोद, ईडर आणि झाकियावाड या शहरच्या हिंदुराजावर याने अहमदाबादचे वर्चस्व अधिक वाढविले. पुनःपुन्हा चांपानेरच्या सभोवतालच्या प्रदेशावर त्याने हल्ला केला आणि ईडरचा निकाल लावण्याकरिता अहमदनगरचा किल्ला त्याने बांधला व रावास भारी खंडणी देण्यास भाग पाडले. याखेरीज त्याने माळव्याचा मुसलमान राजा जो हिंदू राज्यांच्या पक्षाकडला होता त्याचा पराभव करून महाराष्ट्राच्या बहामणी राजास त्याच्या ताब्यातील उत्तर कोकणातील माहीम येथे मागे हटविले; तसेच त्याच्या ताब्यातील बागलाणापैकी जो काय थोडासा भाग होता तेथूनही त्यास हाकलून लावले. दोन उपायांच्या परिणामामुळे या राज्याचा अस्त विस्तार झाला. कायम लष्कराच्या उपजीवनाकरिता जहागिरी दाखल जमिनी तोडून दिल्या हा पहिला उपाय होय. हिंदू जमीनदारांस त्यांचा वाटा किंवा त्यांच्या खेड्यांचा चौथा हिस्सा देऊन त्यांचा स्नेह करून घेतला हा दुसरा उपाय होय.

याच्या मरणानंतर आठ वर्षांनी म्हणजे इ. स. १४५९त या घराण्यात जे राजे होऊन गेले त्या सर्वांत प्रसिद्ध महम्मद बेगड (दोन किल्ले) या राज्याच्या कारकिर्दीस आरंभ झाला. त्याने इ. स. १४७२ रात गिरनार व जुनागड हस्तगत केले व सोराथ आपल्या राज्यात सामील केले. नंतर त्याने जगतच्या (द्वारकेच्या) देवळाचा नाश केला आणि इ. स. १४८४त चांपानेरचा किल्ला हस्तगत करून घेतला. हिंदू राजांचा बलवान जेता व मुसलमान धर्माचा खरा पाठीराखा असा हा महम्मद बेगड राजा होता.

महम्मद बेगड इ. स. १५१३ त स्वर्गस्थ झाला. नंतर त्याच्या मुलाने[१] माळवा, ईडर व चितूर यांजवर परंपरागत स्वाऱ्या करण्याचा क्रम सुरू ठेवला; परंतु महत्त्वाकांक्षी राजा बहादूर हा गादीवर बसेपर्यंत (इ.स. १५२६-१५३६ पर्यंत) विशेष लक्षात ठेवण्यासारखा फेरफार झाला नाही. स्वाऱ्या करून आपले ऐश्वर्य वाढविण्याच्या उद्देशाने याने पुष्कळ मोठे सैन्य पदरी ठेवले व एकंदर उत्पन्नाचा लष्करी खर्चाकडेच फन्ना उडविला आणि प्रांताचा वसूल मक्तेदारांकडून घेण्याची पद्धत अमलात आणल्यामुळे प्रजाही खटू झाली. आजपर्यंत कधी वाढली नाही इतकी लांब राजे बहादूर याने आपल्या राज्याची मर्यादा वाढविली. खुद्द गुजरातेतील अहमदाबाद,

---

१. हा राजा वारंवार बडोदे येथेच राहत असे. या शहराचे नाव याने दौलताबाद ठेवले. ब्रिग्ज या शहराची आणखी काही प्राचीन नावे खालीलप्रमाणे सांगतात – चंदनवटी-रजपुतांच्या डोर जातीपैकी चंदन याने जैनांपासून हे शहर बलात्काराने घेतले म्हणून त्यास चंदनवटी असे नाव देण्यात आले. त्यावर काही शतकानंतर वरावटी असे नाव होते. नंतर वारपत्र, चंदनकाष्ट, योद्धे व भार झडाच्या पानाचे शहर हे नाव देण्यात आले होते.

पाटण, बडोदे, भडोच, राजपिंपळा (नांदोद), सूरत, चांपानेर वगैरे मिळून नऊ प्रांताखेरीज राजपुतान्यांत जोधपूर, झालोड, नागोर आणि शिरोहि, माळव्यांत डोंगरपूर व बांसवाडा, खानदेश व वागलाणा यांचा काही भाग, कोकणात जंजिरा, मुंबई, वसई आणि दमण, पश्चिमेकडील द्वीपकल्पांत सोमनाथ, सौराष्ट्र व नवानगर आणि शेवटी यापलीकडील कच्छ प्रांत त्याच्या राज्यात सामील झाले होते.

अहमदनगर, विजापूर, वऱ्हाड, गोवळकोंडे आणि बऱ्हाणपूरचे राजे त्यास कधी कधी खंडणी देत असत. खरोखर हिंदुस्थानचे दक्षिणेस हे सर्वांत प्रबळ राज्य होते यात शंका नाही. त्यावेळी अहमदाबाद, त्याच्याच शेजारचे महमदाबाद व चांपानेर यांचे हे वैभव फार चमकू लागले; परंतु सर्वांत जास्त सुरत व खंबायतच्या बंदरांची भरभराटी तर अवर्णनीयच झाली; कारण मुसलमानांनी व्यापारात इतका पैका व उत्कर्ष मिळविला की गावंढळ मराठ्यांना त्यांचा नाश करता आला; पण तो पूर्व स्थितीवर आणवला नाही.

माळव्याची राजधानी जी मांडू ती काबीज करून व चितूर छापा घालून घेतल्यानंतर उत्तरेकडील मोगल हुमायूनच्या वज्रदेही शिपायांशी सामना देण्याचे साहस करून बहादूर राजाने आपणास संकटात मात्र ओढून घेतले. इ. स. १५३५ त बादशाही सैन्य गुजरातवर लोटले, परंतु दुसरेच वर्षी राजे बहादूराने आपले राज्य पुन्हा संपादन केले. नंतर त्याचा उपभोग मात्र त्यांनी अवघा एकच वर्ष जेमतेम घेतला; कारण गुजरातच्या लगतचे समुद्राचे जे धनी पोर्तुगीज लोक त्यांच्याशी लढाई करीत असता इ. स. १५३६ त तो दीव येथे मरण पावला. त्याच्या मरणाने राज्याची निकृष्ट स्थिती उघडकीस आली; त्याच्या मागून जे गादीवर बसले त्यांच्या हाती फक्त नामधारी सत्ता मात्र राहिली आणि जे अजेय थोडेसे प्रमुख सरदार होते त्यांच्यामध्ये हा देश विभागला गेला; हे सारे परस्परांचा सूड घेण्याकरिता एकसारखा प्रयत्न करीत होते. अखेरीस दिल्लीचा प्रबल बादशहा अकबर याचीच मदत घेण्याचा एक त्यास मार्ग राहिला होता. त्याचा स्वीकार झाल्यावर अकबर बादशहाने तो फांकावलेला देश आपल्या राज्यास जोडून त्याची व्यवस्था लावली. तथापि बरेच दिवस तेथे शांती नव्हतीच.

●●●

प्रकरण ३ रे

मोगल राजप्रतिनिधी

(३) अकबराने आपल्या नेहमीच्या परिपाठाप्रमाणे उत्तम रीतीने जतन करून ठेवण्यासारख्या गोष्टी कायम राखण्यापेक्षा नवीन नवीन फेरफाराकडे कमी लक्ष्य ठेवले यावेळीही देशाचे दोन भाग होते. राजप्रतिनिधी हा अहमदाबादच्या राजाऐवजी राजप्रतिनिधीच्या अमलात जो एक भाग व दुसरा फक्त खंडणी देणारा प्रदेश.

खंडणी देणारी जी संस्थाने होती त्यावर ज्या खंडण्या लादण्यात आल्या होत्या त्या ज्यावेळी स्वारी होऊन अटी झाल्या त्याचप्रमाणे कायम करण्यात आल्या व त्यांशी संस्थानाच्या स्थितीचा मुळीच संबंध जाणण्यात आला नाही. खंडण्या नियमित जमा होत नसत आणि पुढे मराठ्यांनी अमलात आणलेल्या व वाढवलेल्या मुलूखगिरीच्या नादाने लढाई वगैरेचा दामदपटशा दाखवून जबरीने अहितकारक खंडण्या वसूल केल्या जात असत. अनहिल वाड्याच्या जुन्या हिंदू राजांच्या अमदानीप्रमाणे जहागिरी संस्थांच्यावर कमाल वसुलाच्या बाबी दोन प्रकारे असत. एक जमीन व पिकांतील काही भाग प्रत्यक्ष शेतकऱ्यापासून दलालांमार्फत किंवा जमीनदारांकडून वसूल केला जाई. आणि दुसरी बाब - व्यापाऱ्यांवर आवक-जावक करांची होती.

अहमदाबादच्या राजांच्या उत्तम कारकिर्दीप्रमाणे अकबराने सरकारी प्रांतात प्रत्येक सुभेदाराच्या जोडीला एक हिशेबी अधिकारी ठेविला असे. तो अंतर्व्यवस्थेवर चांगला दाब ठेवी. त्याचा दर्जा दिवाणासारखा असून सुभेदारच्या खालोखालच असे.

बहादूर राजाने मक्तेदारांपासून वसूल जमा करण्याची वहिवाट अमलात आणली आणि त्यांच्या लष्करी सरदारांनीही आपल्या जमिनीच्या व्यवस्थेत तोच कित्ता गिरविला. या योगाने वसूल जमा काही वेळ अधिक वाढली; पण या नवीन पाठामुळे राज्याच्या व्यवस्थेत मात्र पुष्कळ घोटाळा झाला. या पद्धतीचा अकबराने अगदी नायनाट करून टाकला हे सांगण्याची काही आवश्यकता नाही. मराठ्यांच्या अमदानीत ही घातक पद्धत पुन्हा सुरू झाली.

अहमदाबादच्या राजांच्या कारकिर्दीत रहमतरी म्हणून देण्यात आलेली परत घेतली अन् हळूहळू लष्करी सरदारांच्या हवाली झाल्या. वरील वेळी हे सरदार काही दाबात असत; परंतु महत्त्वाकांक्षी राजे बहादुरांच्या कारकिर्दीत सैन्य अगणितच वाढले, तेव्हा लष्करी सरदार बहुतेक स्वतंत्र झाले. औरंगजेबाचे मरणानंतर आणि महाराजांच्या स्वारीचे दरम्यानपर्यंत मोगल बादशहांनी या जहागिरांना पुन्हा कह्यात आणले होते; परंतु औरंगजेब मेल्यावर मराठ्यांच्या स्वाऱ्यांमध्ये ते पुन्हा स्वतंत्र झाले. बाकीचे घराणे आणि सुरत व खंबायतचे नबाब यांच्या उदाहरणावरून हे पुढे कळून येईलच.

सरकारी जमिनी आणि ज्यायोगे बहुतके भाग व्याप्त झाला होता अशा मोठ्या जहागीरदारांच्या जमिनी याखेरीज आणखी जमीनदारांच्या जमिनी होत्या. या दुसऱ्या जमीनदारांची राजे, राव आणि रावळ अशी नावे असत व ते अर्धवट स्वतंत्र असत. अकबराने या सरदारांस रवानगी दळणावळणाने व सभ्य वागणुकीने आपलेसे करून घेण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाही तर त्यास कोणत्याही प्रकारे दुखविले नाही. वाट्याची पद्धत जरी अलीकडे मोडली होती तरी अहमदशहाने ठरविल्याप्रमाणे अकबराने या लहान हिंदू जमीनदारांच्या वाट्याचा हक्क चालू ठेवला. याखेरीज जेव्हा मुसलमानी सत्तेचा ऱ्हास होऊ लागला व मराठे हळूहळू प्रदेश काबीज करू लागले तेव्हा गिराशे नावाचे अधिक बंडखोर लहान जमीनदार जुलूम व लुटालूट यांच्या धमकावण्याने आपल्या अधिक शांतताप्रिय शेजाऱ्यावर देशातील सुनियंत्रित अस्तित्व असलेल्या अवस्थेवेळी ज्यांचे मुळीच अस्तित्व नव्हते अशा राज्यात एक जुलमी कर लादण्यास प्रवृत्त झाले.

महापराक्रमी अहमदाबादच्या राजाच्या हातात गुजरात नावाखाली जेवढा विस्तीर्ण मुलूख होता तेवढा मोगलांच्या हातात नव्हता. तथापि, मोठ्या कुळांतले राजप्रतिनिधी नेहमी पाठविण्यात येत, यावरून त्या प्रदेशाचे महत्त्व मोगलांना केवढे वाटत होते याचा अंदाज सहज करता येईल.

अकबराने दुसऱ्या वेळी जो अधिकारी पाठविला तो त्याचा मुख्य प्रधान बहिरामखान याचा मुलगा होय. बहिरामखान मक्केच्या यात्रेकरिता प्रवास करीत असता पाटण येथे एका मारेकऱ्याच्या हातून मारला गेला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. या तरुण अधिकाऱ्याच्या अमलात प्रख्यात राजा तोडरमलने केलेल्या जमाबंदीच्या पद्धतीचा लाभ मध्य गुजरातच्या काही भागाला मिळाला. ही धारेबंदी मुसलमानी सत्तेचा चांगला किंवा वाईट मागमूस मराठ्यांनी नाहीसा करीपावेतो अमलात होती. ज्या ठिकाणी जमीन मोजण्याची राहिली असेल त्या जमिनीवर पाहणी करून सालाची रक्कम पैशाच्या किंवा धान्याच्या रूपाने ठरविण्यता येत असे.

अहमदाबाद राजापैकी शेवटला राजा व त्याचा पुत्र यांनी गुजरात प्रांत पुन्हा मिळविण्याचा जो कलह केला तो सतराव्या शतकाचे आरंभापर्यंत टिकला. राजपिंपळा येथील हिंदू राजा व काठेवाडचे कित्येक लोक या राजास येऊन मिळाले होते व मदत करीत होते. आणि इ.स. १६०९ नंतर लवकरच ज्या बडोदे शहरात मोगल राजप्राप्ती परागंदा राजा यामध्ये कलह माजू लागला होता, त्या शहरांवर निजामशहाच्या दरबारचा सरदार व दौलताबादचा मलिक अंबर याने स्वारी केली; परंतु या सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट ही की ज्या शहरी फक्त पोर्तुगीज लोकांसच आजपर्यंत प्रवेश करू दिला होता त्या सुरत शहरी इंग्लंड व हॉलंडचा प्रतिस्पर्धी व्यापाऱ्यांनी कारखाने स्थापन करण्याची परवानगी मिळविली.

इ. स. १६१६त राजपुत्र शहाजहान हा राजप्रतिनिधी होता. त्याने आपला बाप जहांगीर त्याजपासून स्वतंत्र होण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. शहाजहान याने अहमदाबादची हवा पसंत केली व त्या स्थळी शाहीबाग नामक सुंदर राजवाडा बांधला. इ. स. १६२७त शहाजहान जेव्हा बादशहा झाला तेव्हा त्याने त्या राजवाड्याचे पुनःदर्शन घेतले. त्याच्या अझमखान राजप्रतिनिधीने जोमदार अमलात गुजरातचे कोळी आणि काठी लोक सुव्यवस्थित राहावे म्हणून पुष्कळ प्रयत्न केले आणि त्याच्या मागून आलेल्या सुभेदाराने गुजरातेत वसूल जमा करण्याची भागवटाई पद्धत अमलात आणली.

परंतु वरील हुशार अधिकाऱ्यानंतर राजपुत्र औरंगजेब इ. स. १६४४त अधिकारी बनले व त्यांनी दोन वर्षांत आपल्या धार्मिक सहिष्णुतीने सर्व देश अगदी हतदिल करून सोडला. इ.स. १६५४ त राजपुत्र मुराद राजप्रतिनिधी झाला आणि तीन वर्षांनंतर राजपद मिळविण्याचा जो सर्वांनी मिळून बेत केला होता तो पार पाडण्याकरिता तो गुजरात सोडून औरंगजेबास येऊन मिळाला. औरंगजेबाने आपला कावा जेव्हा साध्य केला तेव्हा त्याने त्या भोळसट मुरादास तुरुंगात टाकले हे सर्वश्रुत आहेच; परंतु असे करण्यापूर्वी शहानवाझचा जो सासरा होता त्यास त्याने गुजरात प्रांताचा राजप्रतिनिधी नेमून टाकले. या शहानवाझने मुरादला सोडवण्याकरिता पळपुटा राजपुत्र दारा याजवर चाल केली; पण त्याचा पराभव झाला. नंतर औरंगजेबाने शहानवाझचा अधिकारी आपला पूर्वीचा शूर प्रतिस्पर्धी जो महाराजा जयवंतसिंग त्यास दिला. औरंगजेबाच्या कारकिर्दीतील इ.स. १६६४, १६६६ व १६७० ही तीन वर्षे शिवाजीच्या सुरत शहर लुटण्याने व त्याने वरचेवर हल्ले केल्याने विशेष स्मरणीय झाली आहेत. भावी फेरफारीची ही चिन्हेच होती असे म्हणावयास काहीच हरकत नाही. या शेवटल्या प्रकरणानंतर चार वर्षांनी गायकवाडांचा भावी मुख्य प्रतिस्पर्धी जो होणार त्याच्या घराण्याचा उदय होण्यास सुरुवात झाली. शेरखान बावीच्या एका मुलास कडी प्रांताचा सुभा नेमला. काही दिवसांनी सफदरखान बेबी यास प्रथम पाटणचा व नंतर विजापूरचा सुभा नेमण्यात आले.

इ.स. १९०५ मध्ये धनाजी जाधवाच्या प्रभुखत्वाखाली मराठ्यांनी गुजरातवर कित्येक रीतीने स्वारी केली आणि रतनपूर येथे प्रथम सफदरखानने त्यांचा पराभव करून त्यास कैद केले व नंतर राजप्रतिनिधीने सैन्याचा पराभव केला; या यशानंतर लवकरच नर्मदेवरील गावाहून पाय उताऱ्यावर जय मिळाला. तेथे त्या वेळचा राजप्रतिनिधी सफदरखानाचे पुत्र पळून गेले किंवा त्यास कैद करण्यात आले असे म्हणतात. औरंगजेबाने आपल्या महम्मद राजपुत्रास राजप्रतिनिधी पाठविले ते फुकट गेले. त्याचे मरण जवळ आले होते, राष्ट्राचे तुकडे तुकडे होण्याची पाळी येऊन ठेपली होती आणि मराठे समुद्राच्या अनिवार्य लाटेप्रमाणे सर्व हिंदुस्थानभर पसरू लागले होते. याप्रमाणे ज्या कालात दिल्लीचे बादशाह व अहमदाबादचे राजे यांच्या अमलात गुजरातची भरभराटी उच्च शिखरास जाऊन पोहोचली आणि दूरच्या देशातील प्रवाशांचा गुजरातेतील शहरे हा एक बोलण्याचा व कौतुकाचा मोठा विषय होऊन बसला तो काल निघून गेला.

गुजरातेत मराठी राज्याचे अस्तित्व कसे आले म्हणून त्याची हकीकत देण्याचे जर योजिले तर संक्षिप्त हकीकत दर्शविण्यात आली आहे त्याप्रमाणे ज्या दीर्घकालात हिंदू राजांनी जैन आणि ब्राह्मण धर्म अबाधित ठेवले, लोकांच्या स्वभावानुसार व हवामानास योग्य अशा जुन्या चाली

कायम केल्या आणि अशा कळीवर राज्यसूत्र चालविले की, ती कळ टाकून देणेच आवश्यक होते. तो काळ ध्यानात आणला पाहिजे. एकंदर प्रजेची स्थिती अशा पद्धतीने सुधारली होती की, ती टाकून देणे अशक्य होते. इतकेच नाही; पण हेही लक्षात आणले पाहिजे की, चार शतकांपर्यंत मुसलमानांचे वर्चस्व होते ते त्यांच्या ऱ्हासानंतर स्थापिलेल्या ज्याच्या मानाने बाहेरून कितीही जरी भपकेदार, कितीही जरी सुधारलेले व उत्तम दिसत होते तरी ते लोकांना मुळीच आवडले नव्हते हे सत्य होते.

मुसलमानांनी राज्य जरी फार दीर्घकालपर्यंत चालले तथापि महंमद गझनीने हिंदुस्थानावर स्वारी केल्यानंतर तीन शतकांपर्यंत काही राज्यांस आरंभ झाला नाही हे लक्षात ठेवले पाहिजे; आज दिल्ली येथे सर्व सत्ता कायम होऊन सर्व सुधारणा उच्च शिखरास जाऊन पोहोचल्यावर सर्व मार्ग सुरक्षित ठेवण्यासाठीच काय त्या राज्याचे अगदी तुकडेनूतुकडे होऊन गेले. मोगली घराण्याच्या स्थापनेला जागा झाली.

या गोष्टींचे परिणामही उघड दिसून येत आहेत. पूर्वीचे राजप्रतिनिधी हिंदू जमीनदारांपासून वारंवार मदत मागत असत; अहमदाबादचे समंजस राजे त्यांचे हित बघत असत; त्यापैकी कमी समंजस राजे होते ते आपणाकडे विस्तृत साम्राज्याच्या एका भागाचाच अंमल आहे असे न मानता, एक स्वतंत्र साम्राज्याचे आपण धनी आहो, त्याचे कल्याण आपणास बघितले पाहिजे असे समजत. ज्यांनी राज्यातील हिंदू लोकांच्या कल्याणाची काळजी वाहिली त्या अकबर बादशहाचे दोन वंशज यांच्या कीर्तीचे परिणाम. औरंगजेबाच्या उलट वर्तनक्रमामुळे दक्षिण हिंदुस्थानाने परकीय सत्तेचे जूं झुगारून देण्याइतके नाहीसे झाले नाही आणि शेवटी गोवलेल्या मोठ्या चक्रातून निघून जाण्यासाठी नेहमीच्या तत्पर जो गुर्जर देश तो अशा लोकांस सोपविण्यात येऊ लागला की, ते आपले स्वार्थ साधण्यात मदत व्हावी म्हणून आपला स्वतंत्र किंवा परतंत्र प्रजेशी मिसळत असत.

गुजरातच्या मूळ रहिवाशांस हिंदुराजांनी शांत व टेकड्यांवर हाकून लावले होते; पण त्यांचा समूळ नाश कधीही झाला नव्हता व पूर्णपणे ते जिंकलेही गेले नव्हते. मुसलमानी राजे व राजप्रतिनिधी यांची मजलही हिंदू राजापुढे फारशी गेले नाही. म्हणून जेव्हा मराठे चमकू लागले तेव्हा त्यांनी मूळ रहिवासी भिल्ल व कोळी लोकांची एकदम मैत्री केली. एकादे बंडखोर सैन्यापासून आपल्या बेकायदा सवयी योग्य राज्यांत घोटाळा उत्पन्न होण्यासारखा असेल त्या सैन्याचे बाजूस जाऊन मिळण्यास हे लोक सदैव तयार असत.

अनहिलवाड्याची मोठाली घराणी तर नाहीशी होती; परंतु गुजरात आसपासच्या मैदानात व दूरच्या डोंगराळ प्रदेशात लहान लहान रजपूत राजांनी आपापली राज्ये स्थापिली होती व ती चांगली भरभराटीत होती. या रजपूत राजांच्या मुसलमानांची मैत्री कधीही होणे शक्य नव्हते. म्हणून पादाक्रांत सेनापतीस चालावयाचा असल्यामुळे त्यास गुजरातपासून वहिवाटीने स्थापन झालेल्या रकमेच्या कारभारीपणाचा सातारच्या राजाने अधिकार दिला हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

●●●



दामाजीराव गायकवाड (पहिले) (१७२०)

प्रकरण ४ थे

गुजरात प्रांतातील चौथाई वसूल करण्याचा हक्क संपादन करण्याविषयी अनेक मराठे सरदारांतील कलह

⊡

इ.स. १७२७


तेव्हा सरते शेवटी सरबुलंदखानास मराठ्यांचे जे दोन पक्ष होते त्यापैकी एकाशी सलोखा करणे भाग पडले. पेशव्यांचा पक्ष प्रबल वाटल्यावरून त्याने त्यास सुरत व त्याच्या लगतच्या प्रांताखेरीज इतर ठिकाणची सरदेशमुखी म्हणजे जमिनीची जमाबंदी व इतर बाबींच्या वसुलातीपैकी शेकडा दहा टक्के रकमेप्रमाणे वसूल व तसेच वरप्रमाणे सुरत खेरीज बाकी गुजरातमध्ये चौथाई म्हणजे जमीन मेहसूल व इतर जकात बाबींचा चौथा भाग आणि अमदाबाद शहराच्या उत्पन्नापैकी शेकडा पाच टक्केप्रमाणे वसूल देण्याचे कबूल केले. बिथरलेले जमीनदार व सार्वजनिक शांतता मोडणारी दुसरी मंडळी यांस पेशव्यांनी मदत करू नये हाच काय तो मुख्य करार होता. या सुमारास भिल्ल आणि कोळी लोक यांचा साथीदार पिलाजी याने बडोदे व डभई व कंताजी याने चांपानेर घेतले होते तेव्हा कंताजी व पिलाजी या दोघांची गणना सरबुलंदखानाने या बिथरलेल्या मंडळींत केली होती हे उघडच आहे.

इ. स. १७२९

करार इ. स. १७२९ पर्यंत अमलात आला नाही. यावेळी पुष्कळ दिवसांच्या यशस्वी मोहिमेत पेशव्याने निजामउल्मुल्कास कमजोर केले होते. आपणास मिळालेल्या चौथाईच्या हक्काने देशाचे संरक्षण आपले हातून होणार नाही, असे पिलाजीने दाखविले होते व पेशव्याचे भाऊ चिमणाजीआप्पा याने जी पेटलाद परगण्यात नासधूस केली तिजवरून पेशव्याचा जोर फार आहे असे सरबुलंदखानास कळून आले. तथापि, वरील करारामुळे दोन ठिकाणी पुष्कळ असंतुष्टता उत्पन्न होऊन आश्चर्यही झाले.

इ. स. १७३०

सरबुलंदखानाने मदत मागितली असून ती आली नाही, असे असता दिल्लीदरबार त्याजवर नाहक कोपाविष्ट झाले व जोधपूरमधील दुष्ट राठोड महाराजा अभयसिंग यास त्याच्याबद्दल



पिलाजीराव गायकवाड (१७२१-३२)

राजप्रतिनिधी नेमिले. बेबीच्या साह्याने सरबुलंदखानाचा अहमदाबाद शहराजवळील अडालज येथे पराभव केल्यानंतर दुसरी एक लढाई जिंकून अभयसिंग राजधानीत आला व राज्य कारभार पाहू लागला. यावेळी त्यानी मोमीनखान यास खंबायतचा सुभा नेमला. ज्यानी गुजरात प्रांत आपले खाद्य आहे असे मानले होते त्या मराठे सरदारांच्या क्रोधाची कल्पना करता येईल. तो राग पेशव्याचा शत्रू निजामउल्मुल्क याने जागृत ठेवला. त्यानेच ब्राह्मण पक्षाच्याविरुद्ध एक आपल्या बाजूची मंडळी उत्तेजन देऊन स्थापन केली होती. चिमणाजीपंत, पवार, कंताजी कदम, पिलाजी गायकवाड, आणि सेनापती त्रिंबकराव दाभाडे ही मंडळी पक्षात होती.

इ. स. १७३१त बाजीरावाने प्रथम बडोदे हस्तगत करून घेण्याचा निश्चय केला; पण सरबुलंदखानाच्या अटी अभयसिंगने कायम ठेवल्यावर त्याच्याबरोबर गुजरात प्रांतावर त्याने स्वारी केल्यानंतर निजामउल्मुल्क आपणावर चालून येत आहे अशी बातमी लागल्यामुळे त्यास आपला बेत शेवटास नेणे तहकूब ठेवावे लागले. बडोदे शहरातून परत कूच करीत असता बाजीरावास पिलाजीच्या लष्कराने थोडासा अटकाव केला; परंतु त्यामुळे बाजीरावास त्रिंबकराव दाभाडे यांच्या सैन्यावर चाल करून जाण्यास काही अडथळा झाला नाही. बडोदे व डमई या दोन शहरांमधील बेलपाड गावी त्रिंबकराव दाभाडे याने तळ दिला होता व त्यास कंताजी व पिलाजी हे दोघे येऊन मिळाले होते. प्रतिपक्षाच्या सैन्यापेक्षा पेशवे याचे सैन्य थोडे होते; पण विशेष तरबेज होते. अगदी निकराचे युद्ध झाल्यावर बाजीरावास पूर्ण यश प्राप्ती झाली. त्रिंबकराव दाभाडे याने लढाईत मोठी शर्थ केली. पण तो आणि पिलाजीचा वडील पुत्र सयाजी हे दोघेही लढाईत पडले. पिलाजीसही जबर जखमा झाल्या व त्याने मोठ्या प्रयासाने आपल्या दुसऱ्या जिवंत राहिलेल्या दामाजी व खंडेराव या पुत्रांसह सोनगड येथे निसटून जाण्याची व्यवस्था केली. जानोजी दाभाडे व मालोजी पवार हेही इतरांप्रमाणे मारले गेले होते व उदाजी पवार व चिमणाजी यास कैद करण्यात आले. आनंदराव पवार जखमी झाले होते.

दैवयोगाने या पक्ष्याच्या मंडळीच्या सुदैवाने बाजीरावाच्या मनातून निजामउल्मुल्काशी सामन्याच्या नात्याने वागण्याचे होते म्हणून त्यास त्याशी फार निष्ठुरपणे वागता येईना. तेव्हा त्याने त्रिंबकराव दाभाडे यांचा अधिकार त्यांचा लहान पुत्र यशवंतराव यास दिला आणि यापुढे एकंदर उत्पन्नापैकी अर्धे उत्पन्न पेशव्यामार्फत शाहू महाराजांकडे पाठवायचे व जी कारभार देणारी संस्थाने राज्यास सामील करण्यात येतील त्याचाही हिशेब देण्यात यावा, अशा अटींवर गुजरात प्रांताची चौथाई वसूल करण्याचा हक्क त्यास देण्यात आला. यशवंतराव अगदी लहान असल्यामुळे मुतालिक या नात्याने व सेनाखासखेल, 'खास म्हणजे बादशाही तुकडीचा नायक' या जोड पदवीने पिलाजीने त्याचा सर्व कारभार पाहावा असे बाजीरावाने ठरविले'[१]. पेशवे व गायकवाड यांजमध्ये जी एकंदर तीन युद्धे झाली त्यापैकी पहिल्या युद्धाचा शेवट अशा प्रकारे झाला.

●●●

१. ही पदवी मूळ सेनापतीस देण्यात आली होती व त्याबरोबर क्वचित थोडासा अधिकारही देण्यात आला असेल. शेवटी ही पदवी राज्यकर्ते गायकवाड यांस विशेष मान म्हणून मिळाली. प्रत्येक वंशजास ही पदवी धारण करण्याबद्दल पेशवे यांस नजराणा करावा लागत असे. (परिशिष्ट पाच पहा)

प्रकरण ५ वे

दामाजी गायकवाड मोगलांवर सरशी करतो; पण पेशव्यांकडून जिंकला जातो

▣

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे बाजीराव पेशव्यांच्या मनात पिलाजी गायकवाड व तरुण सेनापती यांच्याशी निष्ठुरपणे वागण्याचे नव्हते हे सुदैवच होते. कारण संकटात सापडले तरी तो ज्या उमेदीने शत्रूला तोंड देऊन त्यास जिंकण्याइतके धैर्याची माणसे पुढारीपण न घेत तर ज्या आणीबाणीच्या प्रसंगांतून तो गायकवाडाचा पक्ष जात होता त्या प्रसंगात त्याची इतिश्रीच झाली असती.

इ.स. १७३२

सेनापतीची सर्व साधने पिलाजी गायकवाडाच्या स्वाधीन होती. सोनगड, बडोदे व डमई या शहराचा तो अधिपती होता. भिल्ल व कोळी लोकांचा साह्यकारी होता आणि जमीनदाराचा मित्र होता. तेव्हा महाराज अभयसिंग याने पुष्कळ विरुद्ध प्रयत्न केले तरी पिलाजीने महाराजांवर वर्चस्व ठेवले. शिवाय त्याला इतका त्रास दिला की, सैन्य बलाने शत्रू नाहीसा होत नाही तेव्हा विश्वासघात करून त्याला नाहीसा करण्याचा अभयसिंगाने निश्चय केला. पिलाजी डाकूर[१] येथे तंबू देऊन राहिला असता एका मारवाड्याकडून तंबूतच त्याचा त्याने खून करविला आणि त्यावेळच्या धांदलीत त्याने घोकलसिंगच्या हाताखाली लष्कर देऊन ते त्वरेने नेले व बडोदे शहर व किल्ला हस्तगत करून घेतले व शीरखान बेबी याच्या स्वाधीन केले.

---

१. लौकिक दंतकथा अशी आहे की, पिलाजीस मारण्यासाठी डाकूरला पाठवलेले दोघा मारवाड्यांनी गायकवाडची स्वारी चालली असता एकमेकाशी भांडणाचे सोंग केले. गायकवाड स्वाभाविकपणाने भांडण तोडण्यास आला. त्याबरोबर ते दोघे त्याच्यावर उलटले व त्यास त्यांनी ठार केले.

परंतु या निंद्य कृत्याचा अधिक लाभ अभयसिंग यास काहीच झाला नाही. डबईस जाताना वेढ्याशी चांगला टिकाव धरला. पिलाजीचा मित्र पाद्रा येथील पाटील याने देशातील सर्व कोळी व भिल्ल लोकांस उठविले. योग्य वारसदार व वडील पुत्र जो दामाजी तो सावळी येथे बापाचा दहनविधी सारून प्रथम सोनगड येथे गेला. नंतर कै. सेनापती यांचे कुटुंब उमाबाई यांनी दामाजीस चांगला आश्रय दिल्यामुळे कंताजी कदम[१] याला मदतीस घेऊन दामाजीने अहमदाबादवर हल्ला केला. तो थोडाचा फलद्रूप झाला. या मोहिमेत उमाबाई स्वतः बरोबर होत्या. नंतर दामाजी गायकवाडचा चुलता मालोजी किंवा महादाजी गायकवाड यांनी जे मोगलांचे सैन्य जंबुसरहून महीनदी उलटून गेले होते त्यावर चाल करून इ. स. १७३४त शीरखान बेबी याजपासून बडोदे शहर पुन्हा हस्तगत करून घेतले. वेढा पडला तेव्हा शीरखान बालशिनोर येथे नव्हता व शहराच्या बचावाकरिता कूच करून गेल्यावर त्याचा पराभव झाला. त्या वेळेपासून आजतागायत बडोदे शहर गायकवाडांच्याच ताब्यात आहे. पुढे दामाजी गायकवाड स्वतः गुजरातच्या पूर्वेकडील पुष्कळ महत्त्वाची स्थळे काबीज करून जोधपूर लगतच्या प्रदेशाकडे सरकला व त्याने अभयसिंगचा वडिलोपार्जित प्रदेश इतका पेचात आणला की, त्यास रतनसिंग नावाच्या एका चपळ हुशार माणसास आपला भंडारी नेमून ठेवून गुजरात प्रांतातून पळ काढावा लागला.

पण अशा या चळवळीच्या वेळी दामाजीचे एकट्या मोगलाशीच लढाई करून भागले नाही. कारण पवार, बांडे व होळकर यांना पक्के समजून चुकले होते की, गुजरात प्रांताचा वाटा मिळविण्याची ही संधी आहे, यापुढे अशी संधी मुळीच सापडणार नाही. म्हणून त्यांनी साहस केले; पण त्यात त्यास हार खावी लागली.

दामाजी मारवाड्यास हाकलून लावीत असता त्यांनी प्रतिनिधी रंगोजी याचा आनंदमोगरीच्या मैदानात बांडे यांच्याशी सामना झाला. त्यात रंगोजीने बांडे यांचा पराभव करून पुष्कळ नुकसान केले. नंतर त्याने मोमीनखानापासून महीनदीच्या उत्तर प्रांताची चौथाई संपादन केली. लवकरच दामाजी त्यास मिळाला व दोघांनी मिळून विरमगावात शिरून तेथल्या कसबाती लोकांस हद्दपार केले. परंतु दामाजी जेव्हा आपल्या सफरीचे हेतू तडीस नेण्याकरिता काठेवाडात गेला, तेव्हा रंगोजीचा विरमगावाजवळच रतनसिंग भंडारी याने पराभव केला व त्यायोगे रंगोजीची पुढील गती खुंटली आणि मोमीनखान मदत करण्यास जर चुकला नसता तर रतनसिंगाने अधिक डाव साधला असता. त्याची कारणे लवकरच देण्यात येतील.

दरम्यान, दामाजीचा सूड उगविण्याकरिता पेशव्यांचा पक्ष स्वीकारून कंताजी कदम बांडे याने मल्हारराव होळकरासह उत्तर गुजरातवर स्वारी केली; परंतु वडनगर व पालनपूर लुटण्याखेरीज त्याच्या हातून दुसरे काही विशेष झाले नाही. घोळका गावाच्या आसपास त्यावेळी जे सैन्य होते व ज्याने नंतर काठेवाड व गोहिलवाड येथील सौराष्ट्र सरदारांपासून खंडणी ठरविण्याचे कामी दामाजीस मदत केली होती, त्या देवाजी तापकिराच्या व दामाजीचा भाऊ प्रतापराव गायकवाडाच्या

---

१. यावेळी कंताजीचा गुजरातच्या वसुलात भाग होता.



दामाजीराव गायकवाड (दुसरे) (१७३२-६८)

सैन्याशी सामना देण्यास बांडे व होळकर कदाचित भ्याले असावेत. पवारानेसुद्धा गुजरातच्या लुटीपैकी काहीतरी लाट साधावा म्हणून प्रयत्न केला; पण लढाईत त्याचा पराभव होऊन तो मेलाच.

इ.स. १७३७त अभयसिंग गुजरातेतून जोधपूरकडे जात असता दिल्ली दरबाराने त्यास दूर करून त्याचे जागेवर खंबायतचा सुभा मोमीनखान याची नेमणूक केली. परंतु दामाजीच्या मदतीखेरीज मारवाड्यांस हद्दपार करता यावयाचे नाही असे आढळून आल्यामुळे व कसेही करून स्वतंत्र राजे व्हावे अशी उत्कंठा असल्यामुळे मोमीनखानाने अहमदाबाद व त्याच्या लगतच्या काही जमिनी व खंबायतचे बंदराखेरीज गुजरातच्या उत्पन्नापैकी अर्धे उत्पन्न मराठ्यास देऊन त्यांची मैत्री त्याने संपादन केली. याशिवाय पुढे अहमदाबाद शहराचे विरमगावच्या सर्व प्रांताचे अर्धे उत्पन्नही त्याने देऊ केले. मोमीनखान इ.स. १७४३ मध्ये मरण पावला; तोपर्यंत जरी मध्यंतरी पुष्कळ चांगल्या व वाईटप्रसंगी मराठे व मुसलमान यांत परस्परांविषयी साहजिकपणे संशय उत्पन्न झाले व झटापटीही झाल्या तरी एकंदरीत हे जे विलक्षण सख्य जुळले होते ते कायम राहिले होते.

इ.स. १७३८

या सर्व सहायांनी मिळून प्रथम अहमदाबादेस वेढा दिला व अभयसिंगचा प्रतिनिधी रतनसिंग भंडारी यास हाकलून दिले व अर्धे शहर व शहराचे काही दरवाजे याचा ताबा रंगोजीस देण्यात आला. नंतर दामाजीने सौराष्ट्रातील आपले वजन वाढविण्याचा व विरमगावासभोवतीच्या कोळी लोकांचा मोड करून टाकण्याचा प्रयत्न केला; त्याने बांसा हस्तगत करून घेतले आणि त्यावेळी निजामाच्या ताब्यात असलेले भडोच काबीज करण्यास जरी सापडले नाही तरी दामाजीने भडोचच्या उत्पन्नापैकी काही भाग मिळविण्याचे कामी यश मिळविले.

इ. स. १७४०

तथापि, एकंदरीतच गुजरातेत जे प्रांत मिळविले त्याकडे दामाजीचे यावेळी फारसे लक्ष नव्हते. त्यांच्या रक्षणाची व त्यात भर घालण्याची सर्व व्यवस्था चपळ रंगोजी याजकडे त्याने सोपवली होती. आपल्या सोनगडच्या डोंगरी किल्ल्यातून त्याची सर्व दक्षिणेतील हालचालीवर नजर होती व पेशवे व ब्राह्मण पक्ष यांच्याशी पुन्हा एकदा तरवारीचे एक दोन हात करण्याची संधी केव्हा येत आहे याची मात्र प्रतीक्षा करीत होता. दामाजी धिक्कार करण्यासारखा प्रतिपक्षी नसून मोठ्या प्रांताचा मालक व आपल्या पक्षाचा बाणेदार नायक होता; कारण यशवंतराव दाभाडे जरी नामधारी सेनापती होता तरी तो अर्धवट असून कठीण प्रसंगी नायकाला लागणारे गुण त्याच्या अंगी बिलकूल नव्हते. शिवाय त्यावेळचा पेशव्यांचा जबर प्रतिस्पर्धी राघोजी भोसला त्याचा स्नेही होता. परंतु बाजीराव यावेळी फार जोरावर होता. स्वतःच्या सैन्याखेरीज होळकराचे व शिंद्याचे सैन्य त्याचे ताब्यात होते व तो दिल्लीच्या दरवाजाजवळ जाऊन धडकला होता. त्याचा जुना शत्रू निझाम याचा अगदी पाडाव होऊन त्याच्याशी तह झाला होता. फक्त नदीरशहाच्या

स्वारीने त्याचा विजयाचा प्रवाह प्रतिबद्ध झाला होता. अशा विजयाच्या शिखरावर असता तो १७४० च्या एप्रिल महिन्यात एकाएकी मृत्यू पावला व दामाजीला आशा उत्पन्न झाली की, ज्या वेळेची आपण वाट पाहत होतो ती वेळ आली.

इ.स. १७४२

बाजीरावाच्या एक संबंधी परंतु शत्रूचा पेशवे पदाला हक्क पुढे करण्याच्या कामात राघोजी भोसल्याला दाभाजी मिळाला. हा माणूस वपूजी नाईक नावाचा बारामतीचा एक मोठा सावकार असून त्याचे पेशव्याकडे कर्ज थकले असल्यामुळे तो निराश झालेला होता. पुष्कळ हरकत झाली असता बाजीरावाचा मुलगा बाळाजी हाच रिकाम्या पडलेल्या जागेवर आला आणि दामाजीने माळव्यामध्ये लूट करून आपले समाधान करून घेतले. राघोजी भोसल्याने त्याचे हे काम करण्यास मन वळवल्याचा परिणाम असा झाला की, बाळाजी पेशवा व आनंदराव पवार यांचे सख्य जमले व बाळाजीने पवारास धारमध्ये कायमचे ठाणे ठेवण्यास सांगून त्यास गावाकडच्या माळव्यातील चळवळीवर नजर ठेवण्यास सांगितले.

इ. स. १७४३

पुढल्या वर्षी पेशवा बंगाल्यात गुंतला असताना राघोजी भोसला व दामाजी एकाच वेळी उलट दिशांनी दक्षिणेत शिरले; परंतु पेशव्याने ताबडतोब परत येऊन राघोजीच्या सैन्याची दाणादाण उडवून दिल्यामुळे त्या दोघा स्नेह्यांचे सगळे बेत संपले व पुढे थोडक्या वेळात त्या दोघांपैकी जास्त जबर शत्रूस दक्षिण बंगल्यात चौथाई गोळा करण्याची परवानगी देऊन त्यास पेशव्याने आपलासा करून घेतला. दामाजी पुढे काही दिवस दक्षिणेत राहिला; पण त्यास काही फायदा झाला नाही आणि त्यास आपल्या देशी जाणे जरूर पडले.

बापूजी नाईकाची व पेशव्याची पुढे तडजोड होऊन नाईकाने गुजरातेत स्वारी करून सोनगडावर हल्ला केला व किल्ला जाळून टाकला. परंतु रंगोजी येताच त्यास फिरावे लागले, मोमीनखानही मेला आणि त्याचे जागेवर नेमलेला सुभेदार फिदाउद्दीन याने मुफ्तखीरखान व शेरखान बाबी यास मदतीला घेऊन रंगोजीवर हल्ला करून त्याचा पराभव केला आणि त्यास बाहेर रसद व विरमगाव परत देण्यास लावले.

दामाजी परत येण्याच्या सुमारास परिस्थिती थोडी सुधारली. फिदाउद्दीन पळून गेला, रंगोजीने पेटलाद जिंकले आणि खंडेराव गायकवाडाने आपल्या भावाचा शह अहमदाबादेत बसवला. इ.स. १७४४त जवानमर्दखान बाबी हा मराठ्यांच्या विरुद्ध सरसवला. हा मोमीनखान मेल्यावर गुजरातेत प्रबळ सरदार बनला होता व मुफ्तखीरखानाची सुभेदारी कबूल करीत नव्हता. त्याने जुनेरचा सरदार अब्दुल अजीझखान यास मदतीला घेतले व अब्दुलने मल्हारचा किल्लेदार फतेयाबखान व रस्तमराव मराठा यांनिशी गुजरातवर स्वारी केली. परंतु देवाजी तापकर याने अंकलेश्वर येथे त्यांच्यावर छापा घालून त्यांच्या सैन्याची दाणादाण केली व अब्दुल अझीझला ठार मारला. पुढे फखरुद्दौला हा प्रतिनिधी झाला; परंतु रंगोजीशी सख्य करून जवानमर्दखान बाबीने त्यास कैद केले. दामाजीने परत आल्यावर रंगोजीला फजित केले,

फखरुद्दौलाबरोबरचे पूर्वीचे सख्य कायम केले आणि त्याचा भाऊ खंडेराव गायकवाड हा आपल्या आपलपोट्या वागणुकीमुळे बक्षिसाऐवजी शिक्षेस पात्र असता त्यास, फकरुद्दौलाने स्वाधीन केलेला बोरसदचा किल्ला व बोरसद आणि नडियादचा प्रांत दिला. रंगोजीबद्दल एवढेच आता सांगण्यासारखे आहे की, इ.स. १७४९ मध्ये तो पुन्हा फखरुद्दौला यास मिळाला व त्याने बोरसदचा किल्ला परत कब्जात घेतला आणि तेथेच दोघा गायकवाड बंधूंनी त्यास कैद केले.

इ.स. १७४९, इ.स. १७५० व इ.स. १७५१

पण पुढे ज्या काही गोष्टी घडणार होत्या त्यामुळे दामाजीस पेशव्यांबरोबर लढावे लागणार होते. इ. स. १७४९ मध्ये साताऱ्यास शाहू मरणोन्मुख असता पुष्कळ उलटसुलट कट सुरू होते. राणी सकवारबाई (शाके) बाळाजीची कट्टी दुष्मन होती व ती गादीला कोल्हापूरच्या राजाची मालकी सांगू लागली. दामाजी तिला मिळाला. इ.स. १७५०मध्ये जेव्हा त्यास पुण्यास निर्बल सेनापतीचा मुतालिक म्हणून बोलावण्यात आले तेव्हा त्याने लख्ख येण्याचे नाकारले; पण बाळाजीच्या हाताखाली मंडळी जमली व शेवटी एक झालेल्या मराठे राजांची राजधानी पुणे शहर झाले. त्यास त्याला अटकाव करता आला नाही. इ.स. १७५१ मध्ये पेशव्याने यशवंतराव दाभाड्याकडे गुजरातेतील मालकीच्या ठिकाणांच्या अर्धाईचे मागणे केले. ते दामाजीने उघडच नाकबूल केले. त्याचवेळी राणी ताराबाईने त्यास सातारच्या लहान राज्यास पेशव्यांच्या बंदीतून व सर्व मराठी राज्यास ब्राह्मण पक्षाच्या वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी बोलावणे केले आणि त्याने ताबडतोब ते बोलावणे मान्य केले.

दामाजी पेशव्यांच्या कैदेत कसा पडला, अहमदाबाद घेण्यात आणि गुजरातेतून मोगलांना काढून टाकण्यात त्याला मदत झाल्यास आपल्या ताब्यातील अर्धा मुलूख परत करण्याचे त्याने कसे कबूल केले, बाबीच्या ताब्यातील मुलूख त्यांच्याकडून त्याने कसा काढला आणि मरणापूर्वी काही अगोदर दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडेपर्यंत त्याने आपली सत्ता एकंदरीने कशा चांगल्या तऱ्हेने चालविली ही सर्व हकीकत पुढील प्रकरणात सांगण्यात येईल.

●●●

प्रकरण ६ वे

दामाजी मोगलांवर वर्चस्व करतो; पण पेशवा त्यास आपल्या ताब्यात आणतो

◘

इ.स. १७५१

राणी ताराबाईने दामाजीला आपल्या मदतीला बोलावून शाहूचा गादीचा वारस म्हणून म्हणून ठरवलेला आपला नातू राजाराम यास पकडले आणि पेशवा औरंगाबादला गेला आहे अशी संधी पाहून आपण साताऱ्याच्या किल्ल्यात जाऊन राहिली. दामाजी १५,००० सैन्य घेऊन सोनगडाहून साल्पीच्या घाटने उतरला व तिचे मदतीस त्वरित गेला. पेशव्यांचे २०,००० सैन्य होते; पण दामाजीने निंब येथे त्यास गाठून त्याचा पराजय केला. नंतर तो राणीस येऊन मिळाला आणि प्रतिनिधीला आपल्याकडे वळवून घेतला. ही बातमी ऐकल्याबरोबर पेशवा औरंगाबादेहून परत आला; परंतु आल्यावर पाहतो तो तो भीत होता ते घडून आले होते. नाना पुरंदरे याने गुजराथी सैन्यास जोरखोऱ्यांकडे हटवले होते व आपल्या देशातून कूमकेची व प्रतिनिधीने कबूल केलेल्या मदतीची फुकट वाट पाहत राहिला होता. कोकणचा सुभेदार शंकराजीपर्यंत जवळ आला तेव्हा दामाजी घाबरला आणि पेशव्यांशी सल्ल्याचे बोलणे त्याने लावले. पेशव्याने वचने देऊन त्यास आपले हद्दीत आणले आणि मग त्यास कैद करण्याचे जुळवले. सेनापतीकडे थकलेली गुजरातपैकी बाकीची फेड व्हावी व आपल्या प्रांतापैकी थोडा भाग द्यावा असे जेव्हा दामाजीने म्हटले तेव्हा तळेगाव येथे असलेल्या दाभाड्याच्या व गायकवाडाच्या काही नातलगांना पेशव्याने पकडले आणि दामाजीची छावणीही लुटवली. दुर्दैवी नायक व त्यांच्या प्रधान यांना पुण्यास अटकेत ठेवले. त्याचा मोठा मुलगा सयाजी यास मंगळवेढ्यास रवाना केले. फक्त गोविंदराव व फत्तेसिंग हे लहान म्हणून ताराबाईजवळ साताऱ्यास होते ते तिच्यापाशी सुखरूप राहिले.

पिलाजी मेल्यावर असा प्रसंग गायकवाडावर आलेला नव्हता; पण त्याच्या वेळेप्रमाणे आताही त्यांनी धीर सोडला नाही. प्रधानाचा चुलत भाऊ बाळाजी यमाजीने सोनगड्यास पागा, पटके, कामवीसदार जमा केले आणि केदारजी गायकवाडला त्यांचा नायक केला.

भडोचचा वसूल जमा केला. सुरतेच्या वसुलापैकी तिसरा हिस्सा, मराठ्यांच्या मदतीने झालेला तेथील अधिकारी सफदारखान याजपासून काढला खरा, तथापि त्यांपैकी अर्धा भाग राघोबाने खात्रीने दुसऱ्या वर्षी पेशव्याकडे जमा करविला. पुढे १७५९ मध्ये त्या शहराला द्यावी लागत असलेली वार्षिक कराची रक्कम पेशवे, गायकवाड आणि इंग्रज या तिघांमध्ये वाटली गेली. वसईचा सुभा शंकराजी केशव फडके यांनी सुरत अल्लाविशीवर स्वारी करून पार्नेरला वेढा दिला; पण फजिती पावून परत गेला. शेवटी गुजरात पादाक्रांत करण्याचा पेशव्याचा रघुनाथराव[1] याने मोठ्या हिमतीने केलेला प्रयत्न निष्फळ झाला; पण रेवा व महीकांठा प्रांत त्याने काबीज केले. दामाजीचा सखा भाऊ खंडेराव दाभाडे यांच्या वर्तनाने काळजी उत्पन्न होऊन दामाजीच्या पक्षाचा घोटाळा उडाला. तेव्हा कैदेतून सुटून जाण्याची त्याला उत्कंट इच्छा झाली व त्याची कैदही त्याचा प्रधान रामचंद्रराव अटकेतून निसटून गेल्यापासून जरा कडक झाली होती. त्याला बेड्या घातल्या होत्या. पेशव्याने अर्ध्या गुजरातच्या सनदा सेनापतीला तेव्हा दिल्या होत्या. तेव्हा त्याचा हक्क राजाने कबूल केल्यावर आपला अधिकार नाहीसाच झाला. अशा विचारावर त्याची आता घोका खरा आहे अशी खात्री झाली. आणखी कदाचित त्याला असेही वाटले की, आपल्या एकट्याच्याने मोगलापणापासूनच गुजरात जिंकणे अशक्य आहे. इकडे राघोबाची साधारण मानाने फजिती झालेली पाहून पेशवेही तडजोड करण्यास तयार झाला होता. तेव्हा दोनही सरदारामध्ये करारमदार झाले. त्यांच्या गुजरातेच्या पुढील सगळ्या इतिहासाशी चांगला संबंध आहे.

या ठरावातील शर्ती सांगण्यापूर्वी हे सांगितले पाहिजे की, पिलाजीने १७३१ मध्ये अपजय झाल्यानंतर असे कबूल केले होते की आपण जिंकू त्या मुलखांच्या उत्पन्नांचा अर्धा भाग पेशव्यांच्यामार्फत राजाला देऊ; पण पिलाजीने किंवा दामाजीने तो करार कधीच पाळला नव्हता मात्र केव्हा केव्हा काही रकमा त्यांनी भरल्या होत्या. हेही ध्यानात ठेवले पाहिजे की सल्ला करण्यापूर्वी दामाजीने अधिकारी लोकांना लाच देण्यामध्ये एक लाखावर रुपये देण्याचे त्याने कबूल केले. (त्याची सुटका झाल्यावर त्याने ७०,९०,००० रुपये दिले.) तसेच १०००० घोडा बाळगून पेशवा बोलवील तेव्हा त्यास मदत करण्याचे कबूल केले. त्याची वार्षिक खंडणी पाच लाख पंचवीस हजार रुपये ठेवली, शिवाय दाभाड्याच्या कुटुंबाच्या पोषणासाठी काहीं रक्कम ठरविली. शिवाय आपले राज्यापैकी अर्धा मुलूख व पुढे जे आपण जिंकू किंवा द्रव्य मिळवू त्यापैकी अर्धा हिस्सा देण्याचे त्याने ठरवले. त्याचा मोबदला पेशव्याने दामाजीला अहमदाबाद जिंकण्याच्या व मोगली राज्य गुजरातेतून नाहीसे करण्याच्या कामी मदत करण्याच्या कामी मदत करण्याचे कबूल केले.

चौथ्या परिशिष्टात या ठरावाप्रमाणे गायकवाडच्या वाट्याला कोणते मुलूख आले याची यादी दिली आहे. त्यांचे उत्पन्न पेशव्यांच्या अर्ध्या वाट्यापेक्षा जास्त होते व यांचे कारण हे की,

---

१. रघुनाथरावाला येथे काही ठिकाणी राघोबा असे म्हटले आहे. राघोबा किंवा दादासाहेब या नावाने तो इंग्रजास चांगला माहीत आहे.

पेशव्याला गायकवाडाला इतकी त्या मुलखांची माहिती नव्हती. यांपुढे गायकवाड खंडणी वेळेवर देत असे. कधी कधी ती थके तेव्हा तिचा बरोबर हिशेब ठेवण्यांत येईल आणि वेळोवेळी योग्य कारणे दाखविल्यास ती माफही केली जात असे. येणेप्रमाणे गायकवाडाची पराधीनता अगदी स्पष्ट झाली; परंतु ती पक्की ठाम होण्यास आणखी एका लढाईचा व पराजयाचा अवकाश होता. हा योग दामाजीच्या मृत्यूपूर्वी घडून आला; पण त्यानंतर दर नवीन गायकवाडच्या नेमणुकीची सनद पेशव्याने देण्याचा प्रघात पडला व दरवेळी पेशवा त्या सनदेबद्दल नजराणा चोपीत असे.

याप्रमाणे गायकवाड जरी पराधीन व खंडणी देणारे बनले; तथापि पुण्याचे दरबार वरिष्ठ मानणाऱ्या संस्थानिकाच्या जुटीमध्ये ते मनापासून कधी मिसळले नाही किंवा पेशव्यांशीही पूर्ण सलोखा त्यांचा कधी झाला नाही. वास्तविक पेशव्याही शत्रुत्व करण्यात दामाजी व फत्तेसिंग रघुनाथरावास मिळाले व इंग्रज पेशव्याही प्रतिपक्ष करू लागल्यावर रघुनाथराव इंग्रजास मिळाला. राजकीय नाशांतून गोविंदराव ब्रिटिश सरकारने वाचविले आणि त्याच्या वारसाचे राज्य शिंदे, होळकर किंवा पेशवे यांच्या स्वाधीन होण्याऐवजी इंग्रजांच्या ताब्यात गेले. हे विषयांतर एवढा वेळ वर्णिलेला कलह किती तीव्र होता आणि त्याची फळे किती महत्त्वाची होती हे समजण्यास आवश्यक होय.

इ. सन. १७५३, ग्रांटडफच्या मते इ. स. १७५५

गुजरातची वाटणी दामाजीची सुटका होताना किंवा सुटकेनंतर लागलीच झाली आणि १७५३ मध्ये दामाजी, रघुनाथराव होळकर, जयाजी शिंदा, पवार आणि विठ्ठल शिवदे, नारोशंकर वगैरे एकंदर मराठ्यांच्या सैन्यांनी मिळून अहमदाबादेस वेढा घातला. मुसलमान राज्याच्या व मोगली सुभेदाराच्या या राजधानीचे रक्षण करण्यासाठी जवानमर्दे खान बाबी फार शौर्याने लढला. तेव्हा रघुनाथरावला आपल्या तीस, चाळीस हजार घोडेस्वारांनिशी दक्षिण व पश्चिम बाजूने गोपाळ हरीला पूर्वेकडून आणि दामाजीला उत्तरेकडून त्याजवर हल्ला करणे भाग पाडले. जवानमर्दखान वेढ्याच्या आरंभी शहरात नव्हता. त्याचा आत शिरकाव न होऊ देण्याची खटपट निष्फळ झाली; पट्टणहून येणारी कुमक वाटेत अटकावण्याची हिकमत वाया गेली, तटाच्या आत सातशे मराठे बसवून ठेवले. त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण त्यांना कापून टाकले; तटबंदी सुरुंगाने उडवून दिली तेही निरर्थक झाले; परंतु शस्त्रास्त्राचा जेथे उपयोग झाला नाही तेथे अन्नाच्या व पैशाच्या दुष्काळाने काम केले. पुष्कळ महिने वेढ्याला टक्कर दिल्यानंतर आपण व आपल्या भावाच्या ताब्यात असलेल्या जमिनी बिगर खंडणीने जशाच्या तशा कायम राहाव्या या कबुलायतीवर जवानमर्दखान बाबीने अमदाबाद शेवटी स्वाधीन केले. त्यावेळी मोहोबतखानाकडे काठेवाडातील जुनागड, खान दोरानखानाकडे खेडा, सरदार महमदखानाकडे बालशिनोर आणि खुद्द जवानमर्दखानकडे पंच महाल, पाटण, विशालनगर, वडनगर, विजापूर, शमी राघनपूर आणि अहमदाबादच्या पूर्वेकडील आणखी काही मुलूख[१]

---

१. म्हणजे मौजपूर, वराड, खेरालू, भरवार वगैरे.

जहागीर म्हणून होता. हा सगळा मुलूख मराठ्यांनी बाबी घराण्याकडे शपथेवर राहू दिला आणि याप्रमाणे मोगल व गुजरात यांचा संबंध समूळ तुटला. दामाजीच्या वाट्यास आलेल्या मुलखाचे उत्पन्न २४, ७२, ५०० रुपये होते; शिवाय त्याच्याकडे त्याच्या कुटुंबाला दिलेल्या ३,००,५०० रुपये उत्पन्नाच्या जमिनी आणि काठेवाडच्या खंडणीपैकी अर्धा भाग राहिलाच.

इ.स. १७५५ अथवा १७५७

अहमदाबाद जिंकून सर्व व्यवस्था झाल्यावर एक दरवाजा दामाजीच्या ताब्यात ठेवून बाकी सगळे अहमदाबाद श्रीपदराव नावाच्या माणसाच्या हवाली केल्यावर राघोबा हिंदुस्थानच्या मोहिमेकडे वळला. इकडे दामाजीने लवकरच शेरखान बाबीकडून कपडवंज काढून घेतले व आसपासच्या कोळ्यांना ताब्यात आणण्याच्या खटपटीत व्यर्थ गुंतला होता. इतक्यात खंबायतचा नवाब मोमीनखानाने पेशव्याच्या कामगाराला हाकलून देऊन अहमदाबाद हस्तगत करून घेतले, अशी वार्ता त्याच्या कानावर आली. तेव्हा शहराला पुन्हा वेढा देणे भाग पडले आणि मोमीनखानाला हाकलून देण्याऐवजी त्याच्याकडून शहर विकत घेतले. या चळवळीवरून मुसलमानांत इतःपर मराठ्यांची गुजरातेतील सत्ता ढासळण्याची इच्छा किंवा ताकद राहिली होती असे समजण्याचे कारण नाही.

इ. स. १७६० त पानिपत येथील घोर संग्रामात ज्या अनेक सरदारांचे अंग होते व जे थोडेबहुत आपल्या देशी तेथून परत निभावून आले त्यापैकी दामाजी एक होता. त्याने त्या रक्तस्रावाच्या नाटकाच्या शेवटच्या अंकात आपले काम फार हुशारीने केले. मल्हारराव होळकर रण सोडून गेल्यानंतर त्याने रण सोडले. आणि सुरुवातीला त्याने आपल्या घोड्यानिशी अहमदशाह अब्दालीच्या रोहिल्यांनी धरलेल्या उजव्या बाजूवर छापा घालून रोहिल्यांचे आठ हजार लोक कापले.

दामाजी गुजरातेत आल्यावर त्याची उमेद भरपूर होती आणि कित्येक वर्षे अव्याहत लढाया मारण्यात त्याने घालवली. शेवटी पेशव्यांच्या संकटाच्यावेळी इतरांबरोबर उभे राहिलेल्या बाबी घराण्याला त्यांच्या वडिलोपार्जित शामी राधनपूरच्या मिळकतीखेरीज बाकी सगळ्या मुलुखांत हाकून दिले. प्रथम मोमीनखानाला दंडण्यात त्याने पेशव्यांच्या मुनिमाला मदत केली. पुढे विशालनगरास आपले मुख्य ठाणे करून खेडा घेतले. नंतर पाटणवर जाऊन तेथून जवानमर्दखानाला हाकलून लावले आणि अनिलवाडा राजांचे जुने राजस्थान सोनगडच्याऐवजी आपले राजधानी शहर केले. सारांश इ. सन. १७६३ व १७६६ च्या दरम्यान कमालुद्दीन बाबीच्या मुलांपासून पाटण, विशालनगर, वडनगर, खेराळू, विजापूर आणि जे दुसरे काही त्यांच्या ताब्यात होते ते हिसकून घेतले. याप्रमाणे जिंकलेल्या नऊ प्रांतांपैकी खेराळू, रोझनपूर, बिजापूर, धमणी, आणि मोजपूर पेशव्याने गायकवाडला सरंजामासाठी दिले आणि पाटण, वडनगर, विशालनगर आणि सिद्धपूर हे पेशव्याने आपण ठेवले. याप्रमाणे अजून ताब्यात असलेले काही उत्तम प्रांत गायकवाडाच्या राज्याला जोडले गेले; पण एवढ्या लढाया करून दामाजी थांबला नाही. त्याचा काठेवाडातील पराक्रम दुसरीकडे सांगण्यात येईल. पितृद्रोही दुष्ट अभयसिंगाचा नातेवाईक इडरचा राठोड

राजावर इ. स. १७५१ मध्ये त्याने जय मिळविला. आणखी पेशव्यांच्या मत्सरामुळेच तो मुलूख खालसा[1] झाला नाही हे पक्के वाटते.

तूर्त या लढाया सोडून देऊन दामाजीने आपल्या मुलुखाबाहेर काय केले, त्याचा रघुनाथरावाशी अहमदाबादच्या वेढ्यात जमलेला स्नेह कसकसा वाढत गेला, त्याचा शेवटी परिणाम तिसरा मोठा कलह होऊन त्यात गायकवाडचा पेशव्याने अपजय कसा केला आणि शेवटी गायकवाडाच्या रघुनाथराव व त्याचा मुलगा बाजीराव यांच्या स्नेहामुळे त्यांचे पुढे कसकसे वाईट झाले या गोष्टीकडे आपण वळू.

पानिपतच्या अनर्थानंतर बाळाजी बाजीराव फार दिवस जगला नाही, हे सर्वश्रुत आहे. त्याच्यामागून त्याचा मुलगा बाजीराव त्याच्या जागी आला. त्यावेळी तो केवळ १७ वर्षाचा मुलगा होता; पण कारभारी रघुनाथरावांचे जुखड काढून टाकण्याचे त्याच्या मनात असून, त्या योग्य उमेद त्याच्या अंगी खेळत होती. प्रथम त्यास यश आले नाही; पण त्या अपयशांतच राघोबा व त्याच्या भावाच्या कुटुंबातील वैमनस्याच्या भक्कम पाया घातला गेला.

या भांडणाचा व एकंदर मराठ्यावर जो अनर्थ गुदरला होता त्याचा लाभ करून घेण्याचा निजामाने प्रयत्न केला; पण चुलते पुतणे त्या वेळेपुरते एक झाले आणि मुसलमानांच्या स्वारीला अटकाव केला.

गोदावरीच्या कांठी तांदुळजा मुक्कामी निजामाचा पराजय होऊन ७६३ च्या मोहिमेच्या शेवट झाला. दामाजी जो सगळ्या लढाईत रघुनाथरावांच्या पाठीशी होता व हैदराबादच्या आसपास लूट करण्यात त्याला मदत करीत होता. त्याने या वेळी नाव मिळविले; कारण त्याच्या एका शिपायाने निजामाचा मुख्य प्रधान राजा प्रतापवंताला ठार केले. या शूर कृत्यासाठी साताऱ्याच्या राजाने त्यास सेनाखासखेलची पदवी दिली, असे काहींचे म्हणणे आहे.

हा धोका ओटापल्यावर चुलत्या पुतण्याचे वैमनस्य जास्त झाले. कारण पेशव्यांच्या मनांत कर्नाटकावर स्वतः स्वारीला जावयाचे आणि राघोबादादाला त्याची बायको आनंदीबाई सर्व प्रकारचे मोठमोठे बेत करण्यास भर घालीत होती. दामाजी आपल्या जुन्या वहीवाटीप्रमाणे रघुनाथरावास मिळाला आणि घोडनदी जवळ मिरजकर (पटवर्धन) आणि जानोजी भोसले यांचे हाता खालील पेशव्यांचे सैन्याचा त्याने पाडाव केला काही दिवसांनी त्याच्या उघड शत्रुत्वामुळे

१. अहमदाबाद घेण्याच्यावेळी इदरचा राजा रायसिंग याने पेशव्याचे वर्चस्व कबूल केले. रघुनाथरावाला प्रांतिज, विजापूर, मोरावा, बादर व हर्सोलचा अर्धा भाग दिला असे दिसते. याच्यापूर्वी रायसिंग याने आपला शत्रू जवानमर्दखान यास मिळून मराठ्यांचा अटकाव केला होता; पण बोरसदवर हल्ला करण्यास जात असता तो दंग्यात सापडला आणि दमाजीने त्यास कैद केले. इकडे त्याचा भाऊ आनंदसिंग इडरच्या रेवार रजपुतांशी लढताना मेला. तेव्हा संस्थानची स्थिती अगदी वाईट झाली. काही दिवसांनी रायसिंग दमाजीच्या अटकेतून पळाला आणि इ. सन १७४० मध्ये इडर पुन्हा त्याने मिळविले. परंतु पानिपतहून परत आल्यावर दमाजीने इडरच्या संस्थानिकास जिंकून त्यास खंडणी देणाऱ्या संस्थानिकांच्या बरोबरीला आणून ठेवले. पुढे १७८८-८९ मध्ये संस्थान जे थोडेसे जिंकले गेले त्याची हकीकत फॉर्बसच्या रास मालेत दिली आहे.

माधवराव पेशव्याचा त्याचेवर फार राग झाला. हा पेशवा एकंदर पेशव्यांत फार हुशार असल्याने दामाजीला जबर शिक्षाही लवकर झाली.

मध्यंतरी गुजरातची वाटणी गायकवाडाला जास्त फायदेशीर झाली अशा मुद्द्यावर त्याच्याकडून दोन लाख चौपन्न हजार रुपये उत्पन्नाचे सहा महाल काढून घेतले.

इ.स. १७६८ मध्ये रघुनाथरावाने घोडप गावी १५००० सैन्य जमा केले. दमाजीने आपला मोठा मुलगा गोविंदराव याच्या हाताखाली काही घोडेस्वार त्याच्या मदतीस पाठविले.

पेशव्यांचे सैन्य त्यांचे अंगावर कूच झाले आणि त्यांना घोडप किल्यांत हाकलून देऊन निमूटपणे शरण आणले व रघुनाथराव आणि गोविंदराव या दोघांस कैद करून पुण्यास आणले.

हा गायकवाडला पेशव्याचे हातचा शेवटचा व तिसरा मोठा तडाका बसला आणि जो तह झाला त्यात अटीही फार जबर घातल्या. बंडाबद्दल २३,२५,००० रुपये दंड द्यावा; मागील तीन वर्षांची थकलेली बाकी म्हणून १५,७५,००० रुपये द्यावे; नुकते त्याजकडून काढून घेतलेले सहा महाल त्यास परत दिले; पण खंडणीची रक्कम ५,२५,००० रुपये होती ती ७,७९,००० देत जावी. त्याची तीन किंवा चार हजार घोडेस्वारांची मसनद ठरवून त्याने लष्करी नोकरी खरोखर बजावली पाहिजे व खंडणी कधी थकता कामा नये असे ठरविले.

पण याहून अधिक वाईट प्रसंग गायकवाडावर गुदरला. तो असा की, हा तह कायम होण्यापूर्वी काहींच्या मते रासायनिक[१] प्रयोग करता करता अपघात होऊन दामाजी मरण पावला. इतका हुशार व महत्त्वाकांक्षी राजा संस्थानने गमावला आणि गादीच्या वारसाच्या हक्काच्या भांडणांत संस्थान सापडले.

●●●

१. लौकिक दंतकथेप्रमाणे दामाजी आपल्या शत्रूंच्या कटाला बळी पडला. या शत्रूंनी त्याचेकडे एक पुज्य दिसणारा म्हातारा पाठविला. त्याने सोने उत्पन्न करण्याचा मार्ग दाखविण्याचे कबूल केले. त्याने दामाजीस एका कोळशाची धुणी पेटलेल्या खोलीत कोंडून घेण्यास सांगितले. त्यात कोंडून घेतल्यामुळे साहाजिकच गुदमरून दामाजी मेला.

प्रकरण ७ वे

गोविंदराव आणि फत्तेसिंग यांचा गादीसाठी तंटा–फत्तेसिंगाचा जय– त्याचें पेशव्याविरुद्ध इंग्रजांशी सख्य

दामाजीच्या मरणाबरोबर काही वेळेपर्यंत गायकवाडांच्या सत्तेची वाढ बंद पडली. त्याच्या राज्यास नवीन मुलुखाची भर पडली नाही. ज्या अंतस्थ रोगाने बडोद्याचे राज्य बहुतेक लयास गेले त्याच रोगाने पेशवे जरी गांजलेले होते तरी त्यांनी हळूहळू त्या राज्यास निव्वळ परतंत्रतेच्या स्थितीस आणून पोचविले. फत्तेसिंग जरी कावेबाज व दूरदर्शी राजा होता तरी त्याच्या आड येणाऱ्या शत्रुत्वामुळे त्याच्या हुशारीचा जोर फार कमी झाला व दुसरे गायकवाडी पुरुष तर मूळ स्थापकाचे मानाने व अक्कल हुशारीमध्ये फारच कमी होते. राज्याचा लय जो आम्ही सांगणार तो होण्याचे कारण निःसंशय हे आहे की, यापुढे गायकवाडाचे घराण्यात फाटाफूट झाली होती व त्याचा इतिहास म्हणजे गृहकलहाचा इतिहास होय. दुसरी एक पंचाईत अशी होती की, गुजरातचे राज्य मराठ्यांनी त्यांच्या अंगात उत्तम तऱ्हेने वसत असलेल्या क्षत्रिय गुणांनी मिळविले. परंतु मिळविलेला प्रांत कायम राखण्यास लागणारे दुसऱ्या गुणांची भर मुळीच नव्हती. दक्षिणेतील लष्करी साहसी लोकांचा प्रवाह बंद झाला तेव्हा मराठी शिपायांच्याऐवजी अगदी क्षुद्र दर्जाचे निव्वळ पैशाचे भाडोत्री जमा झाले. राज्यांचे उत्पन्न बहुतेक लष्करी खर्चाकडेच वेचले जात असे. पण तो वर्ग अगदी तेजहीन झाल्यावर ते उत्पन्न त्याच अनुदात्त कामाकडे लागेनासे झाले. हे खरे की यामुळे राज्यनायकीचा भपका वाढला; कारण गायकवाड आता पूर्वीसारखा निव्वळ सैन्यावरील अधिकारी नसून राजा झाला होता व राजाचे अधिकार त्याने स्वीकारले होते; परंतु राजसीमा आणि खंडणी वाढविण्याची शक्ती व इच्छा असलेले मराठे योद्ध्यांची आता मदत राहिली नाही. आणखी असेही खरे आहे की, गोविंदराव गायकवाडाने आपल्याबरोबर ब्राह्मण चातुर्य आणले; पण प्रजेचे कल्याण वाढेल अशा तऱ्हेचे साधारणपणे चांगले राज्य म्हणवून घेण्याइतके म्हणजे ते चातुर्य होते की नाही ही शंकाच आहे. राज्यामधील वसूल बरोबर करणे, राज्याबाहेरील लहान लहान राजांकडून खंडणी गोळा करणे, वसूल झलेल्या पैशाचा व्यवस्थित खर्च करणे, दिवाणी व फौजदारी न्यायाची व्यवस्था, सार्वजनिक हिताची कामे वाढविणे व तत्संबंधी दुसऱ्या अनेक बाबी



सयाजीराव गायकवाड पहिले (१७६८-७८)

राज्यास पुष्टी येईल अशा रीतीने गायकवाडी राज्याने हातात घेतल्या होत्या काय? गुजरातेत व इतर ठिकाणी पेशव्यांचे जागी इंग्रज सत्तेने आपले ठाणे ठेवले त्याकाळापर्यंत जाताना या सर्व गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे.

दामाजीचा ज्येष्ठ मुलगा सयाजी हा काशीबाईचा म्हणजे दुसऱ्या बायकोच्या पोटचा होय. आणि गोविंदराव हा त्याची पहिली बायको मनूबाई हिच्या पोटी झालेला होय. तेव्हा दोघांनाही गादीला हक्क होता व ही गोष्ट पुण्यास ध्यानांत घेतली जायचीच. त्याप्रमाणेच या गोष्टीचा लाभ घेऊन आपणास फायदेशीर त्या तऱ्हेने नेमणूक करण्याचे पेशव्याचे हातात होते. सयाजी हा कुचकामी होता आणि गोविंदराव जरी कोत्या व अस्थिर मनाचा होता तरी सयाजीला गोविंदरावाशी बरोबरी करताना; परंतु त्याचे हक्काला फत्तेसिंग म्हणून जो त्यांचा धाकटा भाऊ होता त्याने स्वार्थबुद्धीने आपले पाठबळ दिले. हा फत्तेसिंग फारच महत्त्वाकांक्षी, चपळ, चाणाक्ष आणि निकराचा राजपुत्र असून, लष्करी मोहीम पार पाडण्यात जेवढी हुशारी दाखवील तेवढी राजकीय कलहात दाखवून आपले बाजूची सरशी करील असा होता.[१]

दामाजी मरण्याच्यावेळी फत्तेसिंग गुजरातेत होता तो ताबडतोब बडोदे हस्तगत करण्यासाठी धावत आला आणि हस्तगत झाल्यावर त्याने त्याजवरील आपला ताबा कधी सोडला नाही.

पुढे घडून आलेल्या गोष्टीमुळे दोन्ही पक्षांचे बडोद्यावर लक्ष राहिले व शेवटी ते त्या संस्थानचे राजधानी शहर बनले. गोविंदराव पुण्यास अजून अटकेतच होता; पण मोकळा होता आणि वेळीच हजर असल्यामुळे त्याने पेशव्याकडून आपला वारसा मंजूर करवनू घेतला व त्याबद्दल बंडाबद्दल दंड, गेल्या वर्षीची खंडणी, वीस लाख रुपये नजराणा, एक लाख बाबीच्या महालांबद्दल आणि ५०,००० अधिकारी मंडळीस वाटण्यासाठी मिळून एकंदर साडेपन्नास लाख रुपये त्याने पेशव्यास दिले.

परंतु १७५१ त फत्तेसिंग देशी बळकटी केल्यावर पुण्यास आला व त्याने वरील ठराव फिरवून घेतला. गोविंदरावाने कबूल केलेल्या शर्तीवरच त्याने सयाजीरावाला सेनाखासखेल नाव देविले व आपल्याला मुतलिक नाव ठरवून घेतले.[२]

याप्रमाणे भावाभावांत कडे वैमनस्य उत्पन्न झाले आणि त्यांना दुसरा एक भाऊबंद मिळाल्यामुळे ते शत्रुत्व वाढले. पिलाजी गायकवाडला खंडेराव म्हणून एक मुलगा होता. त्याने दामाजीला पुष्कळ वेळा त्रास दिला होता. पिलाजीने यास कडीची जहागिरी दिली होती आणि पेशव्याने त्यास हिमत बहादूर ही पदवी दिली होती. त्याने लुच्चेगिऱ्या करून दामाजीपासून नाडियाद व

१. वालेस म्हणतो की, सयाजीराव आणि फत्तेसिंगची आई काशीबाई होती आणि दामाजीची तिसरी बायको गंगाबाई हिला पिलाजीराव, मानाजीराव आणि मुरारराव असे तिघे मुलगे होते. फॉर्बसचे म्हणणे असे की, फत्तेसिंग मानाजीचा सख्खा भाऊ होता.

२. गायकवाडाने पुणे दरबारची मदत विकत घेतली खरी; पण यानंतरच्या गायकवाडच्या तहात वाईट गोष्ट ही आहे की, त्याने पेशव्याची मदत ज्यांच्याविरुद्ध मागितली त्यांच्याशी खरोखरी शत्रुत्वाऐवजी स्नेह असावयास पाहिजे होता. याचा अर्थ एवढाच की, गायकवाड राज्याच्या कमकुवतपणाचा उगम तेथील अंतस्थ अव्यवस्थेत होता.

बोरसद प्रांत घेतले होते. अशा भावांपैकी ज्याच्याकडून आपला फायदा होईल त्यास मिळण्याचा विचार केला.

१७७२ मध्ये फत्तेसिंग गुजराथेत परत आला; पण येण्यापूर्वी त्याने पेशव्याकडून एक सोडवणूक करून घेतली. तीजमुळे दरसाल पुण्यास आपले नावांचे सैन्य पाठविण्याची त्यास जरुरी राहिली नाही. जेव्हा जेव्हा त्यांचे सैन्य बाहेर देशी लढाईस बोलविले जाणार नसेल तेव्हा तेव्हा त्याने पेशव्यास त्याचे मोबदला पावणेसात लाख रुपये देण्याचे ठरविले आणि काही दिवसांनी तर हा दाखलाच पडून गेला की, गायकवाडाने सैन्य नोकरीला पाठवू नये. वास्तविक नोकरी माफ झाल्याबद्दल व खंडणीदाखल मिळून १४,५४,००० रुपये रोकड त्याने पेशव्याकडे भरवावे.

पुण्याच्या दरबाराने मान्य करून दिलेल्या शर्तीला आपण राजी आहो असे बाह्यात्कारी फत्तेसिंगने दाखविले खरे; पण खरोखर त्याला त्या ब्राम्हण पक्षाचा विश्वास नव्हता आणि पुढे मागे आपल्यावर केलेली मेहरबानी फिरवून तीच ते आपल्या भावावर करतील अशा भीतीने त्याने इंग्रजाची मदत मिळविण्याची खटपट चालविली. त्याचा कारमारी बापूजी याने सुरतेचा अधिकारी प्राइससाहेब हयांचेजवळ मुंबई सरकारकडून सैन्य मिळवून देण्याची खटपट केली व त्याबद्दल मोबदला म्हणून ब्राम्हणांना कबूल केलेला सुरत परगण्याचा वाटाही इंग्रजास देण्याचे कबूल केले. ही खटपट त्यावेळी फत्ते झाली नाही तरी लवकरच गायकवाड व इंग्रज यांच्यादरम्यान तह झाला असे सांगण्यात दिसून येईल.

१७७२ च्या नोव्हेंबरच्या १८ तारखेस ब्रिटिशांनी हल्ला करून भडोचचा किल्ला घेतला आणि शहरच्या नवाबाला हाकलून दिले. फत्तेसिंगच्याही मनांत भावांशी लढण्यास आपल्या जवळ एखादे चांगले ठाणे असावे म्हणून भडोच घेण्याचे होते आणि भडोचवर हल्ला करून हस्तगत करण्याची गायकवाडाची फार दिवसांनी मनीषा होती. पिलाजीने जिंकलेल्या मुलुखापैकी काही मुलूख भडोच येथील आवक-जावक कर बाबींपैकी दोनपंचमांश भागावर कबूल होवून सोडून दिला होता.[१] दामाजीने निजामापासून भडोच येथील आवक-जावक कर बाबींपैकी दोनपंचमांश भागावर कबूल होऊन सोडून दिला होता. दामाजीने निजामापासून भडोच हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु नेक आलमखान याने मोठ्या शर्तीने किल्याचा बचाव केला आणि आयत्यावेळी नर्मदा नदीस तुफान होऊन त्याला वेढा काढावा लागला. त्यामुळे त्याचा प्रयत्न फसला. त्याने पुन्हा आणखी एकवेळ प्रयत्न केला असता; परंतु भडोच येथील जमीन

---

१. भडोचच्या वसुलातीपैकी भाग गायकवाडाला मिळाल्याचे वर्ष कोणी १७४४ सांगतात, कोणी १७५३ सांगतात. ह्यापूर्वी बरीच वर्षे सुरत, भडोच व खंबायत येथे इंग्रजांनी कारखाने घातले होते. सुरतच्या हक्काच्या सनदेवर २५ जून १६६७ तारीख आहे आणि या सनदेत दिलेले हक्क मोडल्याबद्दल कित्येक राजांशी व विशेषतः जंजिऱ्याच्या सिंध्यांशी तंटे झालेले आहेत. दर्यावर्दी-व्यापार रक्षण करण्याचे काम बादशहाने याच्याकडे सोपले होते; पण वास्तविक हे निव्वळ याचे होते. १७५० मध्ये मुंबईचा गव्हर्नर मि. बोरशिअर याचे त्या चाच्यांचे बंड मोडण्यासाठी पेशव्यांचे साह्य मिळविण्याची खटपट केली; परंतु आंग्र्यावरील स्वारीखेरीज एकी झाली नाही आणि शेवटी इंग्रजांनी सुरतेचा किल्ला हस्तगत केला.

वसूल व दर्यावर्दी इतर बाबींपैकी तीनपंचमांश व जंबूसर आणि आमोदपैकी अर्धा हिस्सा त्याला देण्याचे कबूल केल्यामुळे त्याने तो प्रयत्न केला नाही मात्र कबूल केलेली रक्कम त्याला एक दोन वर्षापेक्षा जास्त मिळाली नाही. शेवटी गुजरातची वाटणी झाली तेव्हा भडोच व कोरळ गायकवाडच्याच वाट्याला आली. या कारणासाठी फत्तेसिंगाने भडोचबद्दल सहा लाख आणखी आपल्या सुरतेच्या वाट्यांपैकी साठ हजार रुपयांचा वसूल दरवर्षी ब्रिटिशांना देण्याचे कबूल केले; परंतु ब्रिटिश लोकांनी या शर्ती नापसंत करून सत्राशे बहात्तरच्या जानेवारीच्या बारा तारखेस त्याच्याशी वर निर्दिष्ट केलेला तह मुकरर केला. त्या तहाप्रमाणे गायकवाडाकडे तीन पंचमांश हिस्सा कायम राहिला. या हिश्याची किंमत एल्फिन्स्टन साहेबाच्या मताप्रमाणे सहा लाख आणि कप्तान कर्नाकच्या मताप्रमाणे नऊ लाख होती.

मध्यंतरी १७७२ आणि १७७३ या दोन सालांत दोन्ही गायकवाड भाऊ गादीसाठी एकमेकांशी लढत होते आणि ज्या मोठ्या सत्ताधीशांनी पुढे त्याच्या भानगडीत त्याला नुकसानकारक अशा रीतीने विशेष लक्ष घातले. त्यांनी कोणत्याच भावाला मदत केली नाही आणि या भांडणात कडीचा जहागीरदार खंडेराव गायकवाड याने पहिल्याने स्वीकारलेला फत्तेसिंगाचा पक्ष सोडून देऊन गोविंदराव यांस पाठबळ दिल्यामुळे फत्तेसिंगाची फार हलाखी झाली.

इकडे दक्षिणेमध्ये मोठाल्या गोष्टी घडून येत होत्या. १७७२चे नोव्हेंबरात शहाणा पेशवा माधवराव मरण पावला आणि त्याचे मागून त्याच्या गादीवर बसलेला त्याचा भाऊ नारायणराव याचा, त्याचा चुलता रघुनाथ याच्या चिथवणीने म्हणा अथवा त्याच्या अनुमोदनाने म्हणा, खून झाला. रघुनाथरावाच्या मनात पेशव्याची गादी अशा रीतीने अनियंत्रितपणे मिळविण्याची असती तर त्याची निराशाच व्हावयाची होती. कारण १७७४ च्या एप्रिल महिन्यात धाकटा माधवराव जन्मास आला आणि नारायणरावाच्या या त्याच्या मरणानंतर झालेल्या मुलाचे हक्क सांभाळण्यासाठी प्रधानांचा जोरदार पक्ष बनला. पुण्यास आपसांत लढाई सुरू झाली आणि गायकवाडाप्रमाणेच पेशवा पेशव्याशी लढू लागला. कारभारी गंगाबाई हिने उभारलेल्या व सखारामास बापू आणि नाना फडणवीस या दोन प्रधानाने चालविलेल्या पक्षापुढे रघुनाथराव पळाला आणि १७७५चे जानेवारीच्या तिसऱ्या तारखेस रघुनाथराव शिंदे व होळकर या दोन मोठ्या सरदाराने त्यास सोडून दिल्यामुळे जे थोडेसे सैन्य गोळा झाले ते घेऊन बडोद्यास येऊन पोहोचला आणि तेथे जहागीरदारानिशी भावाला कोंडमारा करण्यात गुंतलेल्या गोविंदरावाला मिळाला. गोविंदरावाने घोडप येथील लढाईमध्ये रघुनाथरावाला मदत केली होती, इतकेच नाही तर १७७३चे अखेरीला रघुनाथराव कुलबुर्ग्यास असता व वेगळेपणाने कर्नाटकांत स्वारी करण्याचा बेत करीत होता त्यावेळी त्यास पेशवेपदाचा गंध प्राप्त झाला नसूनही गोविंदरावास सेनाखासखेल ही पदवी त्याने दिली होती.

गोविंदराव आणि दादासाहेब जेव्हा एक झाले तेव्हा उघडच त्याच्या भावाने प्रधान मंडळाची मदत मागितली व त्याप्रमाणे त्यांनी काही घोडे त्याचे मदतीस पाठविले. दौलतराव शिंद्याने प्रथम गोविंदरावास मदत करण्याचे कबूल केले होते; पण त्यानेही आता त्याची बाजू सोडली. म्हणून सार्वत्रीकरण सुरू होण्यापूर्वीच बडोदे आपल्या ताब्यांत येणे फार जरुरीचे आहे असे त्यास वाटले

व ते साध्य करण्यासाठी त्याने इंग्लिशांकडे मदतीसाठी विनंती केली. रघुनाथराव सुद्धा खुशीने त्यांच्याकडेस मदतीसाठी वळला कारण; यावेळी तो नुसता पळत होता. त्याच्याबरोबर मूठभर फौज होती आणि सगळे मराठे सरदार एक होऊन त्यांच्याविरुद्ध झाले होते. मुंबई सरकारच्या मनात तहाच्या अटी स्पष्ट करावयाच्या होत्या. म्हणून १७७५ चे मार्च महिन्याच्या सहाव्या तारखेपर्यंत त्यांनी तह केलाच नाही, त्यादिवशी सुरतच्या नामंकीत तह कायम झाला. त्या तहाप्रमाणे वसईसाठी व सुरतचे आसपासचे प्रांत रघुनाथरावाने इंग्रजास द्यावे व भडोच येथील गायकवाडचा हिस्सा गोविंदरावाकडून त्यास त्याने द्यावा आणि त्याबद्दल त्यांनी त्यास मदत करावी हा त्या तहाचा इत्यर्थ होता.

आधी सांगितलेच आहे की, पेशवा व गायकवाड हे दोघे ही सुरत, भडोच व खंबायत या बंदरास फार महत्त्व देत होते आणि तेथील वसुलातीच्या हिस्सा मिळण्यासाठी दोघांनी फार श्रम केले व पुष्कळ नुकसान सोसले. हे करण्याचे कारण असे की, तेथील बंदर वसूल फार असे व बंदरेही भव्य होती; पण त्यांना व्यापाराची माहिती होती किंवा त्याची किंमत समजत असे. किंवा तो वाढविण्याची अक्कल होती म्हणून बंदरासाठी खटपट होती असे मुळीच नव्हे. युरोपियन लोकांचे त्याच्या अगदी उलट होते त्यांना बंदरांचे महत्त्व कळत होते आणि त्यांची हिंदुस्थानातील सत्ता वाढवण्याचा पाया किनाऱ्यावरील सोयिस्कर बंदरे ताब्यात घेण्यातच त्यांनी घातला. राघोबाने मुंबई सरकारला देऊ केलेले बक्षीस अगदी उत्तमच होते; पण राघोबाला ते आपणास देण्याची सत्ता किंवा हक्क नव्हता अथवा आपला काही संबंध नसता आपण या अंतंस्थ लढाईत हात घालत आहो व आपले करणे अविचाराचे व अनीतीचे आहे किंवा अन्यायाचे व मूर्खपणाचे आहे. असा विचारच त्यांनी केला नाही. त्यांनी आपला हात असा घातल्यावर लवकरच मुंबई सरकारचा कलकत्त्यांचे वॉरन हेस्टिंग्स व त्याच्या मंडळीशी बेबनाव झाला व थोड्या दिवसांनी ब्रिटिश, पेशवे व गायकवाड एकमेकांच्या उरावर बसू लागले; पण कोणालाच आपणास पुढे प्रांत काय करून घ्यावयाचे याची कल्पना नव्हती, अशी लढाई म्हणजे निवळ मूर्खपणाची व निष्फळ असावयाची.

तारीख १७ फेब्रुवारी सन १७७५

आपला या लढायापैकी गायकवाड बंधूंनी काय केले त्यांच्याशीच संबंध आहे. शिंदे व होळकर यांनी पाठविलेल्या व पुण्याच्या सैन्यानिशी हरिपंत फडक्याने रघुनाथराव व गोविंदराव यास बडोद्याचा वेढा उठविण्यास भाग पाडले. माघारी जाणाऱ्या सैन्याचा त्यांनी पाठलाग केला. एक दिवशी महिनदीपासून काही अंतरावर अडासच्या मैदानात वासद येथे राघोबाचा तळ पडलेला असता त्यांनी त्याच्या छावणीवर समोरून व बाजूने हल्ला केला आणि त्याच्या सैन्यास पिटाळून लाविले. फत्तेसिंगाच्या हुशारीमुळे व प्रांताच्या माहितीमुळे हा जय मिळाला. त्यामुळे ताबडतोब त्याचा मान व त्याची अशा वाढली. रघुनाथरावाच्या सैन्याला या पराभवाचा जो धक्का बसला तो संबंध लढाईमध्ये निघाला नाही. नायक खंबायताला पळून गेला आणि तेथून सुरतेस येऊन इंग्लिशला मिळाला आणि गोविंदराव व खंडेराव यांनी पळ काढून खंडेरावाच्या

कपडवंजच्या किल्ल्यात येऊन दडून राहिला. तेथे राहून त्यांनी फत्तेसिंगने भराभर दिलेले तडाखे चुकविले. याप्रमाणे हा दूरदर्शी सरदार आपल्या चुलत्याचे नाडियादच्या आसपासचे मुलूख खालसा करून स्वस्थ बसला. कारण हे मुलूख महत्त्वाचे होते. तसेच इंग्लिशाशी असे वर्तन ठेविले की, आपण एक दिवस त्यांचे पक्षास मिळू असे त्यांस भासावे.

कर्नल कीटिंग थोडेशे सैन्य घेऊन १७७६ च्या एप्रिल च्या ४ थ्या तारखेस खंबायत येथे राघोबाला येऊन मिळाला. राघोबाचे सैन्य मोठे होते; पण त्यांचा पगार थकलेला होता व त्यांना लष्करी कवाईत शिकविलेली नव्हती. गोविंदरावही ८०० पायदळ व थोडे थोडे स्वारानिशी त्यास मिळाले. फत्तेसिंगाने कडीच्या जहागीरदारास आपले पक्षास मिळविण्यास भाग पाडले आणि ते दोघे हरिपंत फडक्याच्या घोडेस्वाराच्या सैन्याला येऊन मिळाले.

मे महिन्याच्या तिसऱ्या तारखेस कर्नल किटिंग खंबायतपासून तीस मैलावर होता. या सुमारास दोन्ही शत्रूंची गाठ पडली. साबरमतीवर काही चकमकी झाल्या. एक वात्रक नदीवर झाली व राघोबा व इंग्रज खेड्यात शिरण्यापूर्वी एक झाली. पुढे हैदराबाद येथे एक लढाई झाली. या सुमारास लढाईचे स्वरूप उघड झाले. इंग्रजाचे पायदळ व्यवस्थेशीर वागे. त्याचा तोफखाना शत्रूंच्यापेक्षा चांगला असे आणि त्यांच्या बाजूचा नेहमी जय होत असे; पण त्याचा पुढे फायदा झाला नाही. पेशव्यांच्या फौजेने माघार घेतली आणि आसपास हिंडत राहिली. हेतू हा की, रघुनाथरावांच्या सैन्याचा दाणाफाटा बंद करावा. रघुनाथरावाच्या सैन्याने त्याच्या सैन्याची कितीही दाणादाण केली तरी त्याचा पाठलाग करण्याची किंवा इंग्लिशांच्या तोफेच्या मदतीशिवाय स्वतंत्रपणे त्यांच्यावर पडण्याची त्या सैन्याची छाती नव्हती.

मे महिन्याच्या तारीख ८ला साथीदार नडियादला गेले आणि जहागीरदाराच्या राजधानीवर ४०,००० रुपये दंड बसवला. एकूण खंडेरावची गत द्रोही लोकांना योग्य अशीच झाली. शिवाय रघुनाथरावाने पैसे गोळा करण्यासाठी घोर क्रूर कृत्ये केली आणि पैसे गोळा करण्यात एक आठवडा घालविला.[१] अहमदाबाद काबीज करण्याचा विचार राघोबाने आता सोडून दिला. कर्नल कीटिंगच्या पुण्यावर स्वारी करण्याच्या विचारास संमत्ती दिली; परंतु त्याचा उशीर घातक झाला. त्यांनी महीवर कूच केला; पण तिच्या काठी अडासच्या मैदानात मेच्या अठराव्या तारखेस ब्रिटिश सैन्य अडचणीच्या जागी असता त्यावर धापा पडला. या अडचणीत तर कसाबसा निघून कर्नल कीटिंग रघुनाथराव बरोबर मेच्या २५ ला भडोचला गेला. येथे दादासाहेबांचे सैन्य थकलेल्या पगारासाठी विसरले आणि गोविंदराव बडोदे हातात पडेपर्यंत गुजरात सोडून जाण्यास कबूल होईना. तेव्हा कर्नल कीटिंगला पुण्यावर स्वारी करण्याचा आपला बेत कायम रहित करावा लागला. त्याची जी काही उमेद बाकी राहिली होती ती खचून वावपिरासमध्ये तळ दिलेल्या पेशव्यांच्या सैन्यावर नर्मदा ओलांडून जाऊन त्याने अवचित छापा घालण्याचा प्रयत्न

---

१. या स्वारीचे हुबेहूब चित्र फोर्बसने आपल्या ओरियंटल मेमायर्समध्ये दिले आहे. चिलखत पांघरलेल्या घोडेस्वारांचे वर्णन, नडियाद येथे मारांनी एक जात केलेला त्रागा आणि कित्येक मजेदार गोष्टी व माणसे यांची वर्णने वाचण्यालायक आहेत.

केला; परंतु रघुनाथरावाच्या सैन्याचा त्याला इतका अडथळा झाला की, त्याला छापा घालता आला नाही. तथापि हरिपंताला कूच करावे लागले व त्याने गुजरात कायमचे सोडले. नंतर पावसाच्या सुमारात बुडलेले इंग्रजांचे सैन्य डमईला सैन्य कसेबसे गेले आणि त्यांचे मराठे साथीदार बडोदे व बेलपाडच्या दरम्यान कायमचे राहिले.

पेशव्यांचे सैन्याचा पत्ता कायम नाहीसा झाला व साथीदार राजधानीच्या आसपास होते. पावसाळा सुरू झाल्याबरोबर गोविंदरावाने त्यास बडोदे काबीज करण्यास सांगितले; परंतु फत्तेसिंग आपली धोक्याची स्थिती समजून होता व त्याने आता आपली बाजू फिरवण्याचा निश्चय केला. राज्यरीतीमध्ये तसाच लढाईच्या कामी फत्तेसिंग आपल्या दुर्बल वडीलभावापेक्षा फार हुशार होता. त्याने रघुनाथरावाचे व कर्नल कीटिंगचे गोविंदरावाचा पक्ष सोडून देण्यास स्पष्टपणे नकार देण्यास मन वळविले. इंग्लिश अधिकाऱ्यास वाटले की, हा मोठा मुत्सद्दी आहे आणि ८ जूनला त्यांशी त्याने तह केला. त्यात ३००० घोड्यानिशी रघुनाथरावाला पाठबळ करण्याचे आठ लाख खंडणी त्यास देण्याचे आणि गोविंदरावाने आपल्यावरील हक्क सोडल्यास इंग्रजास भडोच चिखली, वारीयाव आणि कोरल परगणे देण्याचे कबूल केले. या सर्वांनी सोडल्यास दक्षिणेत दहा लाखाची जहागीरदार आपल्यास देता येईल, तेव्हा देण्याचे रघुनाथरावाने अभिवचन दिले इतर देणग्याबरोबरच सव्वीस लाख रुपये साठ दिवसांत रघुनाथरावास देण्याची स्वतः हमी घेतली. या वेळी तर बहुतेक त्या जवळ ही रक्कम नसावी अशी स्थिती होती.

●●●

प्रकरण ८ वे

इंग्रज व मराठे यांच्या कलहात झालेली गायकवाडांची स्थिती – फत्तेसिंग – मानाजी – गोविंदराव

◘

वॉरन हेस्टिंगने हुकूम सोडला की, ही अन्यायाची व धोक्याची व आपले जबाबदारीवर सुरू केलेली लढाई एकदम बंद करावी व त्या लढाईत मिळवलेल्या मुलूख परत करावा. त्याचा तो हुकूम त्या वेळेपुरता मोठ्या नाखुशीने पाळला गेला; पण हुकूमच्या अर्ध्या भागापर्यंतच तो पाळला गेला; परंतु चेंडू एकदा गरगरत चालला म्हणजे तो केव्हा आणि कोठे बंद होईल हे सांगता येत नाही. इंग्रज मराठ्यांची झटापट संपली नव्हती, फक्त ती लांबणीवर पडली होती. तूर्त दोघे गायकवाड बंधू आपल्या थकलेल्या फौजेनिशी व रिकाम्या झालेल्या खजिन्याची मदत चांगली कामी पडेल. गायकवाडालाही ते कळले होते, तेव्हा त्याने त्या गोष्टींचा चांगला फायदा करून घेतला.

रघुनाथराव व कर्नल कीटिंग यांनी गुजरात सोडण्यापूर्वी गोविंदरावाची समजूत करण्याची खटपट केली; पण वेड्या लोकांच्या सांगणीवरून त्याने अहमदाबाद आपणास मिळण्याचा फारच आग्रह धरला. त्याचेजवळ सहा परगणे होते; पण बडोदे संस्थानाच्या एकतृतीयांश वसूल व दक्षिणेत पाच लाखांची जहागीर घेऊन ते परत देण्याचे तो कबूल करीना. ऑक्टोबरात फत्तेसिंगाने त्याच्यापेक्षा चांगल्या शर्ती केलेल्या त्याने नाकारल्या आणि राजधानीच्या आसपास बारीकसारीक लढाया सुरू राहिल्या. १७७६ च्या फेब्रुवारीत पेशव्याने फत्तेसिंगला सेनाखासखेलची पदवी दिली.[1] फत्तेसिंगाने मुंबई सरकारच्याविरुद्ध जाऊन पेशव्यास अथवा नाना फडणविसास मिळविण्यासाठी त्यास सर्व सवलत कबूल करण्यात आली. त्याने त्या कबूल केल्या. ही पदवी मिळाल्यामुळे त्याने केलेल्या नजराणा अगदीच थोडा होता व पाच लाखाच्या आत होता. त्याने खंडणीच्या थकलेल्या रकमेबद्दल साडे दहा लाख रुपये दिले आणि पुण्याच्या दरबारी अधिकाऱ्यांना भेटी म्हणून एक लाख रुपये खर्च केले हे खरे; परंतु लष्करी नोकरीच्या ऐवजी त्याने दंड देऊ नये आणि इंग्रज गुजरातेत असतील तोपर्यंत चार लाख खंडणी द्यावी असे ठरले. म्हणजे त्याला

१. सयाजीराव यावेळी यात होता.



फत्तेसिंगराव गायकवाड (१७७८-८९)

दरवर्षी दहा लाख रुपये माफ झाले. गोविंदराव १७७२ मध्ये पुण्यास गेला. तेथे फार तर त्याची जहागीरदार समजूत करण्यात आली असेल आणि १७७८ त फत्तेसिंगाने कबूल केलेले दोन लाख रुपये मिळाले की नाही कोण जाणे. इकडे गिरदारानेही आपल्या पुतण्यास आंवळा दाखविला.

परंतु भडोचच्या वसुलतीचा फत्तेसिंगाचा वाटा नाहीसा झाला तो त्याला मिळविता आला नाही. कारण १७७६ च्या मार्च १ली च्या पुरंदरच्या तहाने भडोच शहर व परगण्यापैकी मराठ्यांचा हिस्सा, आसपासचा तीन लाखांचा मुलूख ईस्ट इंडिया कंपनीला विकून वरियाव गाव आणि चिखली व कुराळ परगणे कंपनीने ओलीस ठेवले. एवढे मात्र ठरले होते की, गायकवाडाने अशी खात्री करून द्यावी की, पेशव्यांच्या परवानगीशिवाय सदरहू मुलूख तोडून देण्याचा आपणास अधिकार नाही. म्हणजे सयाजीने अगर फत्तेसिंगाने दिलेले मुलूख कंपनी परत देईल. फत्तेसिंग असा बचाव केल्यामुळे पेशवेच त्याचा फायदा खाऊन जाईल अशी त्यास भीती होती. तेव्हा त्याने अशी शक्कल योजिली की, राघोबाकडे मदतीसाठी मुलूख दिलेले होते. पण ती मदत काही मिळाली नाही सबब ते मुलूख परत व्हावे व त्याच आधारावर कर्नल कीटिंगने आपलेकडून जबरीने काढलेली सव्वीस लाख रुपयांपैकी रक्कम परत मागितली; पण त्यास यांपैकी काहीच मिळाले नाही. मात्र सावळी मिळाले आणि पालनपूर तुमोरी बालशिनोर आणि वीरपूरचे अभिवचन मिळाले; परंतु पेशव्याने आपले वचन पाळले नाही. हा वाद आणखी चाळीस वर्षे पेशवाईचा निकाल लागेपर्यंत चालला होता.

१७७९ च्या मार्चच्या ३० व्या तारिखेस पेशवे आणि कंपनीमध्ये लढाई सरू झाल्यावर व मुंबई सरकारची थोडी फजिती, थोडा जय झाल्यावर गव्हर्नर हॉर्नबी याने स्वारीत गुजरातचा उपयोग करून घेण्याचा विचार केला. कारण ब्रिटिश तारवांना समुद्र मार्गाने गुजरातेत जाणे सोपे असून, दक्षिणेतून आत जाण्यास कठीण घाटांची आडकाठी नव्हती. इतर मराठे सरदारांपेक्षा गायकवाड हा चांगला स्नेही; कारण तो इतरांपासून अलिप्त होता आणि पेशवा पडल्यास त्याच्या देशाची वाटणी होईल, महीच्या उत्तरेकडील मुलूख आपणास मिळेल असा इंग्रजांचा विचार होता. पुढे काय काय व्हावयाचे हे फत्तेसिंगाने व इंग्रजांनी आपापल्या मनांत ठरवून टाकले होते. वॉरन हेस्टिंगला हा बेत पसंत पडला आणि १७८० च्या उघाडीला पेशव्यापासून त्याने डभई हिसकावून घेतले. कर्नल कीटिंगपेक्षा कर्नल गोदर्द हा निराळ्या तऱ्हेचा मनुष्य होता. पेशव्याचे बाजूने जोर धरून राहण्यास नाना फडणवीस फत्तेसिंगाच्या पाठीस लागला होता. आणि त्याच्या मनात काही असले तरी इंग्रज जवळ असल्याकारणाने १७८० च्या जानेवारीच्या २६ तारखेस त्याने त्यांच्याशी तह केला. पेशव्यांपासून अलिप्त राहून इंग्रजास तीन हजार घोडे स्वारानिशी मदत करावी व गुजरातच्या कंपनीबरोबर वाटणी करावी. पेशव्यांकडून अहमदाबाद घेतल्याबरोबर सुरत अठ्ठाविशीतल्या काही मुलूख व सिन्नर कंपनीला द्यावी असा तहनामा होता.[१]

---

१. वरिष्ठ सरकार व फत्तेसिंग यांच्यामध्ये या तहाबद्दल अदलाबदल झाली नव्हती. हा तह साल्बईच्या तहाने रद्द झाला.

या तहावर सह्या झाल्याबरोबर १७८० च्या फेब्रुवारीच्या १५ व्या तारखेस गोदर्दने अहमदाबादेवर हल्ला करून ते घेतले आणि फत्तेसिंगच्या स्वाधीन केले त्याजबद्दल त्याने सोनगड खेरीज सुरत अठ्ठाविशीपैकी काही मुलूख इंग्रजास दिला. नंतर फेब्रुवारीच्या अखेरीला नर्मदा उतरून आलेल्या शिंदे होळकरांच्या सैन्याला सामना देण्यास गोदर्द वळला व जाताजाता डभईवर हुलकावणी दिली; पण तिचा उपयोग झाला नाही बडोद्याच्या आसपास शिंदे व गोदर्द यांच्या परस्परास हुलकावण्या झाल्या आणि एप्रिलच्या दुसऱ्या व एकोणिसाव्या तारखेस बडोदे ज्या मैदानात वसलेले आहे ते वीस मैलावरून दिसणाऱ्या पावागड नावांच्या किल्ल्याजवळ तळ दिसत त्याचेवर रात्रीचा छापा घालण्याचा प्रयत्न केला. त्यास साधारण यश आले पार्नेर व दमणजवळचे दुसरे एक दोन किल्ले घेण्यापलीकडे विशेष महत्त्वाचे या वर्षाच्या पावसापूर्वी काही घडले नाही; पण पावसानंतर पुन्हा लढाई सुरू झाल्यावर गुजरात सांभाळण्यासाठी मदत फत्तेसिंगाने खुशीने व हुशारीने केली. मोहीम संपेपर्यंत फत्तेसिंगाने ५००० घोडेस्वाराची तुकडी तानाजी गायकवाडाच्या हाताखाली देऊन इंग्रजाचे स्वाधीन केली होती.[१]

१७८१ मध्ये कोकणात इंग्रजांना बरेच अनर्थ घडले आणि मागले वर्ष संपण्यापूर्वीच वसई हस्तगत केले होते. तथापि कंपनीला एक नवे वर्ष भय उत्पन्न झाले. इंग्रजावर नुकताच जय मिळवलेला हैदरअल्ली, निजाम व मराठे सरदार इंग्रजाविरुद्ध फोडावे म्हणजे बाकी शत्रूंशी सामना देण्यास सुलभ पडेल असा बेत करणे इंग्रजांना भाग पाडले.

फत्तेसिंग व राघोबाच्या मदतीने जनरल गोदर्द गुजरातेत बलाढ्य झालेला होता. तेव्हा त्याच्यामार्फत नाना फडणविसांशी फायदेशीर तह करण्याचा त्यांचा काही दिवस इरादा होता. परंतु हे अवघड काम फत्ते करण्याला दुसरेच एक जास्त चांगले साधन महादजी शिंद्यांच्या अपयजामुळे त्यास सुदैवाने मिळाले. महादजी शिद्यांचा पराभव झाल्यावर त्याने ब्रिटिशांशी स्वतःपुरता तह केला व आपले शत्रू व पुणे दरबार यांचेमध्ये मध्यस्थी करण्याचे त्याने कबूल केले. त्या योगाने मराठ्यांच्या इतका किंवा जास्त दर्जा आपला होईल असा त्यांचा हे काम पत्कारण्याचा मतलब होता. त्यातून १७८२ च्या मेच्या १७ स साल्बाईचा तह निष्पन्न झाला. यावर दोन्ही पक्षांच्या सह्या मागून झाल्या व त्या तहापासून फत्तेसिंगाच्या काही फायदा झाला नाही. हा तह ब्रिटिशांच्या पुष्कळ फायदेशीर व होण्याचे मुख्य कारण हे की, त्यांना गायकवाडांबरोबर झालेला करारनामा रद्द करावा लागून अहमदाबाद शहर पेशव्यास द्यावे लागले. या पाच वर्षांच्या धामधुमीची फत्तेसिंगला निष्पत्ती झाली ती एवढी की, लढाईच्या सुरवातीस त्याजवळ जे मुलूख होते ते व पुरंधरच्या तहात जे मुलूख त्यास देण्यात आले ते यांच्यावर त्याची मालकी झाली. लढाईमध्ये जी खंडणी द्यावयची तीची बाकी पेशव्याने त्यास माफ केली, मात्र यापुढे पेशव्याला त्याच्याकडून लष्करी नोकरी बजावून घेण्याचा हक्क प्राप्त झाला. भडोच गायकवाडला न मिळता शिंद्याला मिळाले, त्यांची व्यवस्था भास्कररावांकडे सोपण्यात आली.

---

१. बडोदे दरबारी कप्तान अर्ल यास यावेळी प्रथम रेसिडन्ट नेमले. साल्बाईच्या तहानंतर त्यास परत बोलावून नेला. त्याच्या थोड्या अमदानीत महत्त्वाचे काहीच घडून आले नाही.

पुढील काही वर्षे फत्तेसिंगाने आपल्या मुलुखाच्या उपभोग सुखाने घेतला आणि या मुदतीत त्याने आपल्या मुलुखाची व्यवस्था हुशारीने व पुढल्या मागल्या विचाराने केली असे मानण्यास काही हरकत नाही. त्याचा एक मोठा दोष हा की, त्याने अति दरिद्रीपणाची काटकसर केली. दुसरा मोठा दोष हा की, त्याने अरब वगैरे परकीय भाडोत्री नोकरीस ठेविले व त्यांनी लवकरच राज्यावर अनर्थ ओढून आणिला. मत्सर, क्रूरता हे गुण त्यांच्या स्वभावात थोडेसे होते; पण एकंदरीने त्यांच्या अमलात गायकवाडी घराणे भरभराटीस आले यात काही शंका नाही. त्याने आपले तारू मोठ्या धोक्यातून सुरक्षितपणे बाहेर काढले व थोडक्याशा नुकसानीने मोठ्या संकटातून ते बचावले.

फत्तेसिंग आपल्या वाड्याच्या मजल्यावरून पडून १७८९ च्या डिसेंबरच्या ता. २१ ला मरण पावला. त्यावर गोविंदराव बसावयाचा; पण या दुर्दैवी व थोड्याशा मूर्ख माणसाने पुष्कळ ओरड केली असता व त्यास शिंद्यांचे पाठबळ असता पूर्ण दरबारने मानाजी गायकवाडाचे हक्क कबूल केले व सयाजीचा कारभारी म्हणून त्यासच नेमण्यात आले. त्याला ही जागा फुकट मिळाली नाही. ३३,१३,००० रुपयांचा नजराणा, सुमारे छत्तीस लाख रुपये फत्तेसिंगच्या वेळची थकलेली खंडणी मिळून साठ लक्षांची रकम दरवर्षी पंधरा लाखप्रमाणे चार वर्षांत फेडण्याचे त्याने पेशव्यांना या जागेबद्दल कबूल केले.

शिंद्याने पुढे गोविंदरावाची बाजू सोडली तरी गोविंदरावाने मानाजी १७९३ च्या ऑगस्ट १लीला मरेपर्यंत आपल्या हक्काची ओरड कायम ठेविली होती. पुढे सुद्धा गोविंदराव गादीवर अडथाळ्याशिवाय आला नाही; कारण पुणेकरांनी पुढील भयंकर शर्ती तो कबूल करीपर्यंत त्यांस तेथे अडकावून ठेवला होता मानाजी अजून २० लाख रुपये देणे होता ते देणे होता ते देणे याने अंगावर घ्यावे. फत्तेसिंगाचा नजराणा अगदी थोडा होता, तसा याचा अतिशय म्हणजे रु. ५६,३८,००० रुपये ठरला. गेल्या तीन वर्षांत खंडणी दिलेली नव्हती, किंवा लष्करी नोकरी ऐवजी दंडही दिला नव्हता, ती रक्कम १४,५४,००० दर वर्षास याप्रमाणे ४३,६२,००० रुपये देणे थकले होते, तेव्हा त्यास असा हुकूम झाला की, राजवाड्यात जेवढे जवाहीर, पैसा, उंची वस्त्रे असतील तेवढी त्याने दरबारीत भरावी. फत्तेसिंगाला दिलेला सावळी गाव द्यावा. पेशव्याला तीन हत्ती, पाच घोडे आणि एक लाख रुपयांचे जवाहीर द्यावे. शिवाय तापीच्या दक्षिणेस असलेला सगळा मुलूख आणि सुरतच्या आवकजावक जकातीचा आपला हिस्साही पेशव्याला द्यावा. हे शेवटले कलम विशेष ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

सारांश - बडोद्याचे तुकडे पाहून गायकवाड कुटुंबाचा नाश करण्याचा नाना फडणविसाने निश्चय केला होता. आणि त्याचे जुने स्नेही ब्रिटिशमध्ये पडले नसते तर त्याने तो निश्चय पार पाडला असता त्याने पुणे दरबारास साफ लिहून कळविले की, साल्बाईच्या तहाप्रमाणे गायकवाडच्या मालकीच्या मुलुखात हात घालावयाचा नाही असे ठरले आहे, तरी त्यांच्या मुलुखापैकी काही सुद्धा भाग खालसा करण्याचा विचार त्यांनी सोडूनच दिला पाहिजे. पेशव्याला आपल्या पुरातन शत्रूंचे नुकसान करण्याची संधीच आली नाही. ब्रिटिशांनी बडोद्याची पुढे पुष्कळ कामगिरी केली; पण वरील कामगिरी इतकी ती दांडगी नव्हती व ह्याचा मोबदला कधी दिला नाही, किंवा बडोद्यास कधी देताही आला नसता.

●●●

प्रकरण ९ वे

गोविंदरावाची कारकीर्द

◘

फत्तेसिंगाची जोरदार आणि काटकसरीची कारकीर्द जर आणखी काही दिवस चालली असती तर गायकवाडी संस्थानावर जी पुढे अरिष्टे आली, त्यांपैकी बरीच टळली असती; परंतु त्याच्यानंतर गादीवर बसलेले गोविंदराव, आनंदराव आणि लहान फत्तेसिंग हे राजे नेमले असल्यामुळे त्यांच्यावेळी सर्व खरी सत्ता कारभाऱ्याच्या हाती गेली. या तिघांच्यानंतर गादीवर बसलेल्या निश्चयी सयाजीरावाच्या अति अप्पलपोटेपणापेक्षा या कारभारी लोकांची परस्पर स्पर्धा आणि महत्त्वाकांक्षा संस्थानास फार घातक झाली. परंतु गायकवाडांच्याच घरच्या लोकांनी त्यांच्या सल्लागारांच्या म्हणण्याप्रमाणे नीच आणि दुष्टपणाची कारस्थाने करून जे नुकसान केले त्यापेक्षा आपमतलबी मंत्राच्या उपदेशाने कमी झाले. दमाजीने आणि त्याच्या भावाने एकमेकांचे नुकसान केले. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे कित्येक वर्षे फत्तेसिंग, गोविंदराव आणि मानाजी हे आपापसांतल्या भांडणांमुळे त्यांचे शत्रू जे पेशवे यांच्या हातात खेळत होते; परंतु त्यांच्या आमदानीनंतर हे अरिष्ट फार वाढले. मुलगा बापाचे विरुद्ध, चुलत भाऊ चुलत भावाचे विरुद्ध कट करू लागले. बायका आणि आया आपले नवऱ्याचे व मुलाचे वतीने न्यायास गुंडाळून ठेवून व एकंदर घराण्याचे सर्वसाधारण हिताची काळजी न बाळगून खटपटी करू लागल्या. म्हणून आता जो इतिहास सांगावयचा आहे तो अंदाधुंदीचा आहे.

गोविंदरावाच्या कारकिर्दीतील मुख्य गोष्टी सांगण्यापूर्वी एक गोष्ट चांगली ध्यानात ठेवली पाहिजे की, ते गादीवर बसल्याने जो फेरफार झाला तो बहुतेक राज्यक्रांतीचे तोडीचा होता. गोविंदराव आणि त्याचे बंधू एकमेकांशी पुष्कळ वर्षे भांडत होते आणि फत्तेसिंग व मानाजी यांच्या मरणाने त्यांच्या पक्षाचे विचार जेव्हा रसातळात गेले, तेव्हा नवीन राजाकडून आपल्यावर काही दया दाखविण्यात येईल, ही आशा त्या पक्षास मुळीच राहिली नाही. गोविंदरावानेही जुन्या कारभारी लोकांना घालवून दिले. पुण्याचे दरबारी तो पूर्वी एक लहानसा कामगार होता व दक्षिणेत तो बरेच दिवस राहिला होता. तेथून येताना त्याने आपल्यासोबत पुष्कळ नवे नोकर

आणिले. त्यामध्ये हल्लीच्या सरदारांपैकी कित्येकांचे मुजुमदार तसेच फडणवीसांचे पूर्वज होते. एका परभू घराण्यास मोठ्या नावलौकिकास चढण्यास त्यांनी मार्गही करून दिला. त्या घराण्याचे पहिले प्रसिद्ध पुरुष दिवाण रावजी आपाजी आणि त्यांचा भाऊ बाबाजी हे होत. हा भाऊ काही दिवसांनी संस्थानाच्या फौजेचा सेनापती झाला. पेशव्यांचे हुकूम बडोदे संस्थान पूर्वीपेक्षा आता जास्त मानू लागले. पेशवे आणि ब्रिटिश सरकारच्या भांडणामध्ये काही कारणांमुळे गायकवाडास ब्रिटिशांचा पक्ष धरावा लागला. तसे जर झाले नसते तर त्यांचा हा आज्ञाधारकपणा जास्त स्पष्ट झाला असता. गायकवाड ब्रिटिश सरकारच्या बाजूने झाले म्हणून त्यांचा कायमचा फायदा झाला ही स्वतंत्र गोष्ट आहे; पण अशी नीच स्थिती येण्याचे मुख्य कारण गोविंदरावाच्या कारकिर्दीमध्ये संस्थानाला पैशांच्या अडचणी सारख्या वाढत होत्या हे होय. आणि पेशव्यांचे जे भंयकर कर्ज संस्थानाकडे होते त्यामुळे या अडचणी उत्पन्न झाल्या होत्या. उदा., सन १७९७ साली जो ठराव झाला त्याच्याप्रमाणे गोविंदरावाने पेशव्यास ७८,३३,२१२ रुपये दिले. ६० लाखांची त्यांना सूट मिळाली होती, तरी संस्थानाला अद्यापि ३९,८२,७८९ रुपये देणे होते.

१८व्या शतकाचे दुसऱ्या अर्ध्यात हिंदुस्थानात ज्या मोठमोठ्या लढाया चालल्या होत्या, त्यांचा या इतिहासात जागेच्या कमतरतेमुळे उल्लेख करता येत नाही. तथापि, प्रत्येक गोष्टीचा गायकवाडाच्या इतिहासावर परिणाम झालेला आहे. मध्यंतरी ब्रिटिश सरकारच्या तिऱ्हाईतपणे हात न घालून वागण्याच्या लहरीत पुण्याच्या दरबाराचा पगडा गायकवाडावर फार बसला होता. म्हैसूरमध्ये ब्रिटिश सैन्यास पूर्ण जय असल्यामुळे पेशव्यांशी लढाई करून जय मिळविण्याची आणि गुजराथेमधील त्यांची (पेशव्यांची) जागा पटकाविण्याची त्यांस ताकद आली. खुद्द महाराष्ट्रामध्ये अनेक गोष्टी महादजी शिंदे आणि नाना फडणवीस यांच्यामध्ये लागलेल्या चुरशीच्या निकालावर अवलंबून होत्या; कारण मराठ्यांच्या गोटात फूट होऊन का होईना, स्वतःचे महत्त्व वाढविण्याची महादजीची दृष्टी होती आणि पुण्यात ब्राह्मण पक्षाच्या हाती मुख्य सत्ता ठेवण्याकरिता नाना फडणवीस झटत होता. महादजी सन १९९४ मध्ये वारला आणि माधवरावाच्या अकालिक मृत्यूपर्यंत नानास आपले जाळे विणण्यास चांगले सापडले. या रिकाम्या झालेल्या गादीवर माधवरावाचा चुलतभाऊ बाजीराव आला. हा कारभाऱ्याचा आणि त्यांच्या पक्षाचा फार तिरस्कार करीत असे. त्यामुळे गायकवाडास एक मोठा प्रांत कौलाने देण्यात आला. हे आपल्यास पुढे कळलेच; परंतु गुजराथेतील अधिपत्याबद्दल आणि गायकवाडावरील सार्वभौमत्वाबद्दल जे भांडण ब्रिटिश सरकार आणि या तरुण पेशव्यामध्ये उत्पन्न झाले ते या इतिहासात फारच महत्त्वाचे आहे.

ता. १९ डिसेंबर, सन १७९३ रोजी गोविंदरावास सरतेशेवटी सेनाखासखेल हे पद देण्यात आले; परंतु त्यावेळीदेखील राजधानीत शिरताना त्याला हरकत झाल्याशिवाय राहिली नाही. धरमपूरच्या राजकन्येपासून त्याला कानोजी नावाचा जो अनौरस पुत्र झाला होता, त्याला आपल्या आईपासून आणि शिंद्यांच्या भडोच येथील वकिलापासून काही सैन्य मिळाले आणि दोन हजार आरब व सहाशे पठाण घोडेस्वार घेऊन तो बडोद्यामध्ये शिरला. या भाडोत्री सैन्याचा स्वार्थासाठी विश्वासघात करण्याचा विलक्षण नियमितपणा दिसून येतो. ह्यावेळी संस्थानाच्या



गोविंदराव गायकवाड (१७६८-१७७१, १७९३-१८००)

भांडणात पडल्यानंतर त्यांनी आपल्या पुढाऱ्यास गोविंदरावाचे स्वाधीन केले. कानोजीस अटकेत ठेविले; परंतु बायकोच्या वेषाने आपली सुटका करून घेऊन तो डोंगरात पळाला. येथे त्याला भिल्ल लोक येऊन मिळाले ही फार वाईट जूट झाली आणि त्यामुळे पुष्कळ वर्षेपर्यंत बडोदे संस्थानास नुकसान व त्रास पोहोचला.

खंडेराव सन १७८५ मध्ये वारला होता आणि मल्हाररावाच्या वडिलोपार्जित मालमत्तेमध्ये ३ लाखांचा कडी प्रांत, १ लाखाचे कपडवंज आणि देहगाव प्रांत होते. नडीआद फत्तेसिंगाने मागेच खालसा केले होते. फत्तेसिंगाशी ठराव केल्याप्रमाणे बडोद्यास ४०० घोडेस्वार देण्याऐवजी दरसाल एक लाख वीस हजारांच्या पेशकश या जहागीरदाराने देण्याचे ठरले होते; परंतु त्याची ही सूट मागण्याची तऱ्हा अशी राग आणण्यासाठी होती, की गोविंदरावाने ती देण्याचे नाकारले. याचा परिणाम असा झाला, की जहागीरदाराची निराशा होऊन तो कानोजीस मिळाला. कडीचे शेजारी लढाईस सुरवात झाली आणि गोविंदरावाच्या सैन्यास कानोजीच्या अचाट शक्तीमुळे तीन वेळा मागे हटावे लागले. कानोजीस जय मिळाला म्हणून त्याचे नातेवाईक आणि स्नेही मल्हारराव याची त्याचेवरील मर्जी लवकर उडाली. हे जे वैमनस्य उद्‌भवले त्याचा गोविंदरावाने फायदा घेऊन कानोजीच्या मनातून विश्वासघात करावयाचा आहे, अशा मजकुराचे कानोजीकडील एक बनावट पत्र तयार करून ते जहागीरदाराच्या हाती पाठवून त्या दोघांमध्ये उघड द्वेष पाडिला. त्या बिचाऱ्या कानोजीस पुन्हा सातपुडा पर्वतामध्ये पळून जावे लागले. तेथून त्याच्या बापाने खोटी वचने देऊन फूस लावून आणिले आणि पुढे त्यास अटकेत ठेविले. सन १९९४ साली पेशकश १,१५,००० रुपये ठरला व ५ लाख रुपये देऊन जहागीरदाराने पुनः तह संपादन केला. या ठरावाच्या शर्ती काही दिवसपर्यंत बरोबर रीतीने पाळल्या जात होत्या; कारण आबा शेलूकराशी जी लढाई झाली तींत त्याने मदत केली. या लढाईचे परिणाम फार महत्त्वाचे झाले आणि त्याचा इतिहास आता आपण पाहू. सन १९९४ मध्ये गोविंदराव खंबायत घेण्याच्या अगदी बेतात होता; परंतु ब्रिटिश सरकारच्या कानउघाडणीमुळे त्याने तसे करण्याचे सोडून दिले. खर्डा येथील लढाईत मरठ्यांनी जो निजामावर मोठा जय मिळविला, त्यामध्ये गायकवाडाची मदत होती. सरजोन शोअर हे सर्वत्र शांतता करण्याबद्दल फार उत्सुक असल्यामुळे त्यांनी निजामाचा पक्ष सोडून दिला होता. ह्याशिवाय या कारकिर्दीत विशेष गोष्टी काही घडल्या नाहीत.


नाना फडणवीसास शिंद्यांच्या गोटात कैद केले असताना अमदाबादेतील पेशव्याचे प्रांतावर चिमणाजीपंताचे (आप्पासाहेब) जागी सुभ्याचे काम करण्याकरिता बाजीरावाने नेमलेल्या ह्या नानाच्या बाजूच्या आबा शेलूकराची नानासारखीच अवस्था झाली. त्या प्रांताची मामलत करण्यास गोविंदरावास हुकूम झाला आणि पेटलाग त्याने काबीज करून घेतले; परंतु यावेळी गोविंदरावाचे आणि त्यांचे नोकर रावजी आपाजी व बाबाजी यांची मने आबा शेलूकराबद्दल चांगली होती. त्यांनी त्याच्याबद्दल मध्यस्थी केली आणि दहा लाख रुपये घेऊन त्यास अहमदाबादेत परत करण्याची परवानगी मिळाली. ही रक्कम परभू कारभाऱ्याची (रावजी आप्पाजीनी) उभारली आणि ती परत मिळण्याकरिता जमीनकी म्हणून पेटलाद परगणा आपला भाऊ बाबाजी याचे

स्वाधीन करावा, अशी शर्त ठरावात घातली. परंतु, या व्यवहारामुळे आबा आपले प्रांतात जाण्यापूर्वी व तो कारभाऱ्याचे घरी पाहुणचार खात असतानाच बडोद्यास भांडणे सुरू झाली.

महाराजास अर्ज करून त्याने (आबाने)च भांडणात तेल घातले आणि दोघांचाही झाकलेला राग बाहेर पडून भडकला. लढाईस सुरवात कशी झाली हे सांगणेच कठीण आहे; परंतु आबा हा फार दुष्ट आणि बिनकाळजाचा मनुष्य होता. दुसऱ्यास राग आणण्यास तो कधीही कमी करीत नसे. एकदा तर त्याने बडोदे संस्थानातून जाणाऱ्या गोसाव्यांच्या एका तांड्यास लुटले आणि आलेली लूट महाराजास देण्याचे नाकारले. या अपमानाचा सूड घेण्याची महाराज तयारी करीत असताना अहमदाबादेत जे गायकवाडाचे सैन्य होते त्यावर त्याने हल्ला केला. गोविंदरावाने एकदम लढाईची तयारी केली.[१] खंडेरावाने पेशव्यास आपली तक्रार सांगण्याकरिता जासूद पाठविला; परंतु असे झाले, की बाजीरावास ही बातमी कळते तोच नाना फडणवीस वारला आणि ज्या नानाचा इतके दिवस द्वेष केला त्याचे पक्षाचे लोकांचा सूड घेण्यास आपण मोकळे झालो, असे या तरुण पेशव्यास वाटले. त्याने वरील भांडण आपले अंगावर घेऊन आबास घालवून देण्यास आणि अहमदाबादची मामलत स्वतः करण्यास गोविंदरावास सांगितले. या हुकमाचा एक परिणाम असा झाला, की पेशव्याकडे जी अर्धी उत्तर गुजराथ होती तिची वहिवाट गायकवाडाकडे आली. दुसरा परिणाम असा झाला, की गायकवाडांनी या स्वारीच्या खर्चाची पेशव्याकडे मागणी केली; परंतु त्या लढाईमुळे मिळालेली अहमदाबाद जिल्ह्यांची मालमत हे बक्षीस बस्स आहे, असे सांगून गायकवाडाची ही मागणी पेशव्यांनी नाकारली. दरम्यान, लढाई जोराने चालूच होती. बाबाजीने स्वतःचे सैन्याचे तुकडीनिशी आबा शेलूकराचे सैन्यावर बांटवा येथे छापा घालून त्याच्या सैन्याची कत्तल हुकूमविली. दुसरे दिवशी जी चकमक उडाली त्यावेळी बहुतेक माघार घ्यावी लागली असती; परंतु त्याचे शिल्लक राहिलेले सैन्य त्यास वेळेवर येऊन मिळाले आणि थोडावेळ जी वाताहत झाली होती, ती मोडून त्याचा जय झाला. नंतर मराठ्यांच्या सैन्याने अहमदाबादेत नेहमीच्या अव्यवस्थित रीतीने वेढा घातला आणि आबा शेलुकराचा दुसऱ्या लढाईत पराभव झाला. कानोजीच्या सैन्याप्रमाणे लढाई सुरू झाल्यानंतर चार महिन्यांनी आबा शेलूकराच्या भाडोत्री आरब सैन्याने आपल्या पुढाऱ्यास बाबाजीच्या स्वाधीन केले. बाबाजीने यास गोविंदरावाकडे पाठवून दिले. त्याच्या भांडखोर वागणुकीमुळे महाराजास त्यास बडोदे येथे तुरुंगात ठेवणे भाग पाडले. तेथून त्यास बोरसदेस नेले व तेथे तो पुष्कळ वर्षेपर्यंत अटकेत होता.

---

१. ब्रिटिशांची मदत मिळविण्याची गोविंदरावाने केलेल्या खटपटींचे वर्णन फॉर्ब्स असे करतात : - १८००त मुंबईचा गव्हर्नर मि. टंकन सुरतेस आला, तेव्हा गोविंदरावाकडून आलेल्या काही वकिलांची त्याने गाठ घेतली. त्यांचा मूळ इरादा शेलूकराचा पाडाव करण्यासाठी ब्रिटिशची मदत मागण्याचा होता. गायकवाडाने चौऱ्याऐंशी परगणा व सुरतेची चौथाई ब्रिटिशांना द्यावी असे डंकनने मागणे केले; पण शेलुकराच्या विरुद्ध केलेल्या अर्जाबद्दल तो मुग्ध राहिला. पेशव्याला ब्रिटिशांना प्रांत देण्याची गोष्ट कबूल झाली नाही व हा बेत तसाच राहिला तरी १८०२च्या मार्चच्या १५वीस केलेल्या ठरावातील ३ऱ्या कलमात असे आहे : ''गोविंदरावाच्या पत्राप्रमाणे व ठरावाप्रमाणे चौऱ्याऐंशी परगणा व सुरतेची गायकवाडी चौथाई कंपनीला दिल्यावरून वगैरे''.



मानाजीराव दामाजीराव (दुसरे) गायकवाड (१७९०-९३)

पुढे त्यापासून कोणासही त्रास व्हावयाचा नाही अशा स्थितीला तो येऊन पोहोचल्यानंतर ब्रिटिश सरकारने त्याची सुटका करविली.

अहमदाबादची मामलत सालीना पाच वर्षेपर्यंत महाराजाच्या भगवंतराव नावाच्या आवडत्या व अनौरस मुलाकडे चालू होती. दुर्दैवेकरून असे झाले, की पहिल्या दोन वर्षांचे उत्पन्न म्हणजे दहा लाख पेशव्यांच्या हुकमाप्रमाणे शिंद्यास देण्याचे कबूल केले होते. आजपर्यंत मामलतीचे उत्पन्न सारे साडेतीन लाखच असे; परंतु पाच लाखांस घेण्याचे योग्यतेची ती होती; कारण आजपर्यंत दोन राज्ये असल्यामुळे व सीमा ठरलेल्या नसल्यामुळे आणि कित्येक ठिकाणी त्या एकमेकांत गुरफटल्या असल्यामुळे ज्या मानगडी उपस्थित होत त्या एकदम बंद झाल्या. मामलत आपलेकडे ठेवण्याबद्दलची गायकवाडांची काळजी, अशी व्यवस्था ठेवण्यात मुंबई सरकारचा फायदा आणि अहमदाबादची व्यवस्था आपलेकडे घेऊन बडोदे आपल्या मुठीत ठेवण्याची बाजीरावाची खटपट, या सर्व कारणांनी पुढे दोघांत कलह माजला. त्यात बाजीरावाचा पाडाव झाला व गायकवाड स्वतंत्र झाले, ही हकीकत पुढे येईलच.

●●●

प्रकरण १० वे

आनंदराव महाराज – मुंबई सरकारास मध्यस्थी करण्यास कारण झालेल्या गोष्टी

◘

अहमदाबादच्या मामलतीचे पैसे भरण्याकरिता ते गोळा करण्याचे खटपटीत गोविंदराव होते. त्यांनी मोठ्या मिनतवारीने पाच लाखांची रक्कम गोळा केली होती आणि रावजी आपाजीच्या मोठ्या शक्तीचा प्रतिकार करण्याकरिता शिंद्यांचा आवडता कारभारी जाधवराव भास्कर याचे भावास भगवंतरावाचे मामलतीचे काम करण्यास सांगून आपले नोकरीत ठेवण्याच्या उदेशाने गोविंदरावाने पत्रव्यवहार चालविला होता. पण तो ता. १९, माहे सप्टेंबर सन १८०० रोजी मरण पावला व शेवटी ती जागा रावजीचा चुलतभाऊ रघुनाथ महिपतराव ऊर्फ काकजी यास देण्यात आली.

याचेपूर्वी दोन वर्षे पेशव्यात साठ लक्ष रुपये दिल्याने संस्थानाची अगदी दारिद्र्यावस्था झाली होती आणि पुन्हा एकदा आपापसांत कलह सुरू झाला. त्यांच्या त्रोटक इतिहासावरून संस्थानाची इतक्या लवकर झालेल्या वाईट स्थितीची कल्पना करणेही कठीण आहे, तथापि थोड्या ठळक-ठळक गोष्टीच देणे शक्य आहे. तिजोरी अगदी रिकामी झाली होती. बहुतेक सर्व महाल सावकाराजवळ गहाण ठेविले होते आणि थोडे जे प्रांत शिल्लक राहिले होते, त्याच्या मामलती अविचारी लोकांच्या स्वाधीन केल्या होत्या. ते लोक घाईघाईने जुलमाने पैसे काढीत होते. मांडलिक राजांना त्यांच्यावर स्वारी झाल्याशिवाय खंडणी न देण्याची सवय पडल्यामुळे त्यांनी आपल्या खंडण्या निर्भयपणे शिलकेत ठेविल्या. गायकवाडाच्या घराण्यात पक्ष झाले. आपल्या घराण्याची तुंबडी भरण्याचाच ज्याचा मुख्य हेतू अशा एका परकीय मनुष्याचे हाती राज्यसूत्रे होती. न्यायव्यवस्थेकडे, लोकांच्या रक्षणाकडे व अशाप्रकारच्या गोष्टींकडे मुळीच लक्ष देण्यात येत नव्हते. खरे म्हटले म्हणजे राज्य असे काही तेथे नव्हतेच; कारण सर्व सत्ता लुटारू आणि जुलमी अशा अरब सैन्याच्या हाती होती. खाजगी व सार्वजनिक व्यवहारात कोणी विश्वासू किंवा खरा माणूस सापडेल असा कोणालाच सराव नसे. त्यात सरकारवर तर बिलकुल विश्वास नसे. इकडे शिंदे आणि पेशवे व होळकरसुद्धा ह्या विल्याकडे स्वार्थदृष्टीने टपून बघत होते आणि

या संकटातून सुटण्यास संस्थानास ब्रिटिशांची मध्यस्थी करण्यास विनंती करण्याचा एकच शेवटचा तरणोपाय उरला होता.

संस्थानामध्ये पगारी परकी सैन्य ठेवण्याची पद्धत फत्तेसिंगानी हात राखून सुरू केली होती. गोविंदरावाने मरणापूर्वी ही भाडोत्री संख्या दुप्पट वाढविली होती आणि पुढे येणाऱ्या संकटात रावजी आप्पाजीने त्यांची संख्या फार वाढविली आणि त्यांस जास्त सत्ता व हक्क दिले. या भाडोत्री लोकांपैकी १३,१२६ पायदळ आणि ३,७३१ घोडेस्वार होते. संस्थानास त्याचा दरमहा खर्च २,९९,६४२ रुपये येत होता. यापैकी अरब तसेच अशियातील लांबच्या देशातून म्हणजे बगदाद आणि अबिसिनिया अशा ठिकाणांहून आलेल्या लोकांची फार चाह असे. कारण उत्तर हिंदुस्थानातील लढाऊ भागातील पठाण वगैरे लोकांप्रमाणे ह्या लोकांचे या देशात जन्मलेले वंशज कमी शूर आणि कसबी निघत असा समज असे. काही अरब हिंदुस्थानात एकटे आणि पायी चालत आलेले व काही आपले बरोबर घोडे व आश्रित घेऊन आलेले होते आणि त्यांच्या शूरत्वाप्रमाणे त्यांचा पगार ठरविण्यात आला होता. या परदेशीय लोकांस नुसते बडोद्यास चाकरीत ठेवण्यात आले होते असे नाही; कारण यावेळी बहुतेक प्रत्येक संस्थानाच्या दरबारी भाडोत्री सैन्य ठेवण्यात आले होते. या लहानशा इतिहासात सुद्धा त्यांनी नुसते बडोद्यासच नव्हे, तर धार आणि पालनपूर या ठिकाणी केलेल्या नुकसानीचे भाग सापडतील. यावेळी अरबाच्या हातात बडोदे, बोरसद, संखेडा आणि दुसरे काही किल्ले होते. त्यांच्यात बहुतेक दोन पक्ष असत; परंतु कोणतेही आणीबाणीचे प्रसंगी कोणी परकीय त्यांचे हक्काविरुद्ध गेल्यास ते एक होत असत. स्वभावतः ते अप्पलपोटे व उच्छृंखल असत आणि त्यांचे सावकार मंगळ पारख आणि साभळबेचर यासच ते वळत. हे दोघे एकेका पक्षाचे पुढारी होते. जो राजा त्यांस जास्त पैसा देईल त्याच्या कारभारात मदत करण्यास ते तयार असत. दरबारामध्ये सरदार लोक यांच्या (अरबांच्या) आडदासपणास फार त्रासले होते. बाहेरचे लोक यांच्या जुलमीपणास भीत असत, तथापि सांगण्यासारखी गोष्ट अशी आहे, की त्यावेळी कोणाचा कोणावर विश्वास होता. एखाद्या भाटाने किंवा चारणाने जामीनकी घेतल्याशिवाय राजपूत किंवा कोळी गिराशाला गुजराथेमध्ये सावकार पैसे देत नसत, तसेच अरब लोकांनी सरकारपासून वचन घेतल्याशिवाय सरकार आपण दिलेली वचने पाळील किंवा शांतता राखील असा गायकवाडी प्रजेला विश्वास येत नसे. ह्या गोष्टीची हल्लीच्या स्वस्थतेच्या काळी आपल्याला कल्पनाच होत नाही. या जमीनकीचे पद्धतीस बहादरी म्हणत आणि यामुळे सरकार व त्यांचे बडे-बडे अधिकारी यामध्ये ढवळाढवळ करण्याची या भाडोत्री लष्करी लोकांस किंवा त्यांचे पुढाऱ्यास बहुतेक अबाधित सत्ता मिळालेली होती.

जेव्हा गोविंदराव वारले त्यावेळी दिवानजी रावजी बाहेरगावी होते; परंतु बाबाजी, मीर कमीलुद्दिन आणि अरबचे आणि जमादारांचे म्होरकेवरील दोन सावकार त्यांनी राणी गेहणाबाईचे तीस मदत करण्याची खात्री देऊन सती न जाण्याबद्दल मन वळविले. आपले नवऱ्याचे हयातीत या बाईची सत्ता फार मोठी होती आणि आपले वजन कमी होऊ देण्याची तिची इच्छा नव्हती. गोविंदरावाचे वडील व औरस पुत्र आनंदराव गादीवर बसल्यास तसे होण्याची फारशी भीती



आनंदराव गायकवाड (१८००-१८१९)

नव्हती; कारण तो स्वभावतःच दुर्बल मनाचा, आफू खाण्याच्या सवयीमुळे बहुतेक वेडसर झालेला होता. त्याचप्रमाणे आनंदरावास गादीवर बसविले आणि रावजी बडोद्यास परत आल्यावर त्यांच्याबद्दल त्याने राज्यकारभार चालविला.

परंतु, अद्याप अटकेत असलेल्या कानोजीने पाहिले, की ही संधी सत्ता मिळविण्यात चांगली आहे. तेव्हा वेश पालटून तो बडोद्यास आला, आपल्या दुर्बल; परंतु सुस्वभावी थोरल्या भावाजवळ शिरकाव करून घेतला आणि हळूहळू त्याचेवर इतका पगडा बसविला, की आपण मुतालिक आहोत असे तो दाखवू लागला आणि खरोखरीच रावजीची सत्ता काढून घेतली.

२७ जानेवारी १८०१

याप्रमाणे काही दिवसांपर्यंत चालले; परंतु कानोजी किती जरी माथेफिराऊ होता तरी त्याच्या इच्छेप्रमाणे भाडोत्री लष्करी लोकांस त्यास वळविता आले नाही. गोविंदरावानी जे पैसे गोळा करून ठेविले होते, ते खर्च करूनही त्या लोकांस त्याला रावजीपेक्षा जास्त अनुकूल करून घेता आले नाही. ह्या परकीय कारभाऱ्याच्या गायकवाडाचे घराण्याचे मनांत द्वेष होता. कानोजीची त्या घराण्यातील पुष्कळ लोकांशी जी वागणूक होती, ती लवकरच असह्य झाली होती; कारण आरब लोकांस खूष ठेवण्याकरिता तो आप्तांकडून बळजोराने पैसे काढू लागला. त्याने प्रत्यक्ष राजास अटकेत ठेविले, त्यांच्या बायका, आप्त आणि नोकर लोकास निर्दयीपणे वागवू लागला, आणि फत्तेसिंगाच्या बायकोला व मुलीला आणि मानाजीच्या बायकोला फार वाईट रीतीने वागविले. सरशेवटी अरब लोकांना त्याचा फार कंटाळा आला आणि रावजीने त्यास दिलेली वचनेही फार सरळ होती, तेव्हा एके दिवशी रात्री बेत करून त्यांनी कानोजीच्या घरास गुप्तपणे वेढा घातला आणि त्यास कैद करून आनंदरावाचे स्वाधीन केले. आनंदरावाने त्याची योग्य पूजा करून त्यास रामपूर रोटिआमध्ये अटकेत टाकविले.

पुन्हा रावजीच्या हातात सत्ता आली; परंतु पूर्वीपेक्षा आता अरब लोकांस हातात ठेवणे जास्त कठीण झाले होते. एकदा तर खंबायतहून परत आल्यावर बडोद्यात शिरतेवेळी त्याच्या पालखीवर त्यांनी गोळ्या सोडल्या आणि बहुतेक पालखीवाल्यांना ठार मारले किंवा जखमी केले. खंबायताला लष्कराची मदत मागण्यासंबंधी मुंबई सरकारशी बोलणे करण्यास गेला होता व अरबांनी बहुतेक ताडले होते की ज्या दिवशी ब्रिटिशांना बोलावण्यात येईल, त्या दिवशी आपल्याला संस्थानाच्या बाहेर घालविले जाईल. परंतु आरब लोकांशिवाय गायकवाडी कुटुंबांचे टुमणे पाठीमागे होते. त्या प्रत्येकाला रावजीपासून काहीतरी मिळण्याची आशा होती; परंतु रावजीजवळ त्यांस देण्यास काहीच नव्हते. या सर्वांमध्ये अग्रणी कडीचा जहागीरदार मल्हारराव गायकवाड होता. त्याने पेशकशीची माफी मिळवण्याकरिता फार ओरड केली आणि त्याची मागणी नाकबूल झाल्यावर ज्याने कानोजीस कैद करण्यास संमती दिली होती त्याच मल्हाररावास कानोजी परकी मनुष्याच्या जाचात आहे असे वाटू लागले. फत्तेसिंगाची मुलगी गजराबाई त्यास चिथवू लागली आणि त्यास राजाचा धाकटा व अनौरस भाऊ मुकुंदराव येऊन मिळाला. हा मुकुंदराव डाकोरच्या यात्रेला जाण्याचा बहाणा करून आपली सर्व जंगम मालमत्ता बरोबर घेऊन बडोद्याच्या बाहेर पडला.

पुढे कानोजीस न्याय देण्याच्या आणि आनंदरावास मोकळे करण्याच्या दांभिक उद्देशाने मल्हारराव लढाईस तयार झाला व आपण आनंदरावाच्या हुकमाने वागत आहोत, असा आव आणला. रावजीनेही आपण जे करतो ते राजाज्ञेवरूनच करतो, असे तितक्याच जोराने प्रसिद्ध केले आणि त्याने व मल्हाररावाने आपल्या वादाचा निवाडा लावण्यास मुंबई सरकारास पंच नेमले. आबा शेलूकराशी लढाई करण्याचे तयारीचे वेळी गोविंदरावाने इंग्लिशांस त्यांचे मदतीबद्दल जी चौऱ्याऐंशी आणि सुरत चौथाई देण्याचे नुसते कबूल केले होते, ती चौऱ्याऐंशी आणि चौथाई या दोघांनाही यावेळी इंग्रजांना देण्याचे कबूल केले.

याचेशिवाय गजराबाईने चिखली देण्याचे कबूल केले. मुंबईचा गव्हर्नर मि. डंकन हा मध्यस्थीची घाई करीत नव्हता. बाकी बडोद्याचे स्थितीबद्दल पुढे-मागे त्यास विशेष काळजी होती; कारण शिंद्यांशी किंवा बाजीरावाशी लढाई करण्याचा प्रसंग आल्यास गायकवाड आपल्यास बहुतेक येऊन मिळेल तेव्हा याची राजसत्ता कमी होणे किंवा त्या दोघा मराठे राजांची सत्ता त्या मानाने वाढविणे हे दोन्ही अहितकारक आहे, अशी त्यास काळजी होती. तथापि, शेवटी मल्हारराव व रावजी या दोघांचा तंटा मिटविण्याकरिता मेजर आलेक्झांडर वॉकर यास त्याने पाठविले. त्यांचेबरोबर पाठबळासाठी २००० सैन्य खंबायतला पाठविले; परंतु तेवढे सैन्य पुढे अपुरते झाले.

सन १८०१च्या अखेरीला गोष्टी फार निकरावर आल्या. बाबाजीचे सैन्य अमदाबादेत निघाले होते आणि जहागीरदाराने आपले सैन्य कडीहून रवाना केले होते. त्यांचे अधिपत्य त्याचा भाऊ हनमंतराव आणि शिवराम नावाचा एक जुना गायकवाडी कामदार यांचेकडे होते. हा शिवराम दिवाणचे विरुद्ध त्यांस मिळालेला होता. गायकवाडाच्या काही प्रांतांवर त्यांनी स्वाऱ्या केल्या आणि शत्रूंशी एक लहानशी चकमक उडाली. या वेळची रावजीची स्थिती फार आणीबाणीची होती; कारण तो आणि त्याचे नातेवाईक हे बरेच अरबांच्या तावडीत होते आणि त्या अरबांनी इंग्लिशांची मदत मागितल्यामुळे याजवर संतापलेले होते. तथापि, रावजी नुसत्या मुंबई सरकारच्याच मदतीवर अवलंबून राहिला नव्हता. शिंद्यास दहा लाख रुपये किंवा अमदाबादच्या मामलतीचे दोन वर्षांचे उत्पन्न देण्याचे कबूल केले होते आणि गोविंदरावांनी गोळा केलेले पैसे कानाजीने उधळून टाकले होते, हे मागे सांगितलेच आहे. आता शिंद्याचे कारभारी गोविंदराव भास्कर (याच्या भावाचीच मागणी गोविंदरावाने मागे एकदा केली होती) हा रावजीचा जुना स्नेही होता. तो स्नेह पुढील चमत्कारीक गोष्टीवरून घडला. यादवराव हा पूर्वी बडोदे संस्थानातील खंडोपंतनाना नावाच्या एका वसुली इजारदाराचा कारकून होता. तेथून तो फत्तेसिंगाचा दिवाण झाला; परंतु फत्तेसिंगाच्या मृत्यूनंतर मानाजीने त्याचा आणि त्याचे बंधू रामचंद्र आणि लक्ष्मण यांचा पैसे खाल्याच्या काही आरोपावरून छळ केला आणि शेवटी गोविंदराव जेव्हा गादीवर बसला तेव्हा रावजीच्या स्नेहभावाने त्याची तुरुंगातून सुटका झाली. आजच्या प्रसंगी त्याचेवर आणि त्याचे भावावर शिंदे सरकारची फार मेहरबानी होती आणि रावजी इंग्रज सरकारच्या मदतीची जी खटपट करीत होता त्याचेऐवजी आपले यजमानाची मदत मागण्यास जरी त्याने सांगितले नाही तरी त्यास (शिंद्यास) निदान दहा लाख रुपये देण्याचा तो रावजीस फार आग्रह करीत होता

आणि त्याच्या उपदेशास रावजी वळला होता. शिंद्याची स्थिती खरोखरच भीती बाळगण्यासारखी होती; कारण आबा शेलूकरापासून जशी गायकवाडांनी अहमदाबादची मामलत काढून घेतली, त्याचप्रमाणे पेशव्यांचे अनुमतीने गायकवाडांजवळून ती शिंद्यास हिसकावून घेता येत होती.

मेजर वॉकर बडोद्यास ता. २९, माहे जानेवारी सन १८०२ रोजी पोहोचला आणि त्याने वेळ फुकट न घालविता महाराजांची गाठ घेतली. आनंदराव शांत आणि शुद्धीवर असता त्याचेजवळ संथपणे चौकशी करता त्यास समजले, की तो आपले भावास तुरुंगात ठेवण्यास जरी नाखूश असला तरी जहागीरदाराला केवळ स्वार्थाकरिताच खटपट करीत आहे असे मेजर वॉकर यास वाटले; परंतु या महत्त्वाकांक्षी माणसाने विसनगर आणि विजापूर ही घेतलेली ठाणी परत देण्याचे साफ नाकारले, तेव्हा मध्यस्थीने तंटा तुटणे अशक्य आहे असे त्यास आढळून आले.

तेव्हा कारभाऱ्याच्या बाजूने जहागीरदाराशी लढाई करण्यापलीकडे त्यास दुसरा मार्ग नव्हता. जहागीरदारांचे सैन्य बारापासून पंधरा हजारांपर्यंत होते आणि त्यापैकी उत्तम किंवा कवायती सैन्य शिवरामाचे सातशे हिंदुस्थानी लोक तेवढे होते. खंबायतेहून ता. २३ फेब्रुवारीपर्यंत ब्रिटिश सैन्य हलले नाही आणि बाबाजीसह कडी प्रांतात १० मार्चपर्यंत शिरले नाही. आपण काही तडजोड करण्यास तयार आहोत, असे जहागीरदार खोटेच भासवित होता व मेजर वॉकर पुढे येत होता. येता-येता सोळा तारखेस त्याने कडी गाठली. दुसरे दिवशी शहराचे भीतीखाली जो शत्रूचा गोट होता त्याचेवर ब्रिटिश सैन्याने हल्ला केला. मेजर वॉकर याचे सैन्य मध्यस्थानी असून दोन्ही बाजूस बाबाजी आणि कमालउद्दीन यांचे सैन्य होते. ते फार सावकाशीने चालत असल्यामुळे लढाईच्या जागी मेजर वॉकर याचे सैन्य एकटेच सापडले आणि शत्रूची बळकटी फार असल्यामुळे त्यास शेजारीच एका उंचवट्यावर परत फिरणे भाग पडले आणि तेथून तो आपले छावणीत परत गेला. येथे ते खंदक खणून राहिले आणि मुंबईहून कुमक मागविली ती त्यास ता. २४ एप्रिलरोजी पोहोचली. त्याचा सेनापती सर विल्यम कार्क होता. तेव्हा आता तारीख ३० रोजी हल्ला करून शत्रूचा गोट फोडला.[१] ता. ३ मेरोजी स्वतः मल्हारराव मेजर वॉकर यास शरण आला आणि त्याच्या राजधानीचे दरवाजे उघडिले. नंतर जहागीरदारास दरवर्षी सव्वालाखाचे नेमणुकीवर नाडियाद येथे राहू देण्याची परवानगी दिली; परंतु पुढे तो पळून गेला आणि त्याने पुन्हा दंगा करण्यास सुरवात केली; परंतु सरतेशेवटी यावेळी त्याचा प्रांत बडोदे संस्थानास जोडून टाकिला. अशा रीतीने बडोदा संस्थानास पाच लाखांच्या महालाची भर पडली. इतकेच नाही, तर आज दोन पिढ्यांपर्यंत ज्याच्या स्वार्थबुद्धीमुळे आणि दुटप्पीणामुळे बडोद्यास अतिशय नुकसान झाले अशा एका बहुतेक स्वतंत्र राजाच्या आस्तित्वाचा शेवट झाला, ही गोष्ट फारच महत्त्वाची होती.

ब्रिटिश सैन्याने दुसरी जी कामगिरी बजाविली तीही अशाच प्रकारची होती. गणपतराव गायकवाड नावाच्या एक पिलाजीचा वंशज संखेडा आणि बहादपूरचा जहागीरदार किंवा मामलेदार

---

१. पहिल्या चकमकीत मेलेले व जखमी झालेले मिळून १४६ लोक होते. छावणीवर हल्ला केला त्यात युरोपियन १०४, नेटिव्ह ५८ व मोठे कामगार ४ जखमी झाले व मेले.

याने पुढील जून, जुलै महिन्यात बंडांचे निशाण उभारिले आणि आजपर्यंत त्याच्या ज्या किल्ल्यानी गायकवाडाच्या सैन्यास दाद दिली नाही, तो किल्ला जुलैच्या सातव्या तारखेस काबीज झाला. नंतर गणपतराव आणि मुराराराव गायकवाड हे धारेस आनंदराव पवाराचे राज्यात पळाले आणि आता तेथे बडोद्यास नव्या राज्यव्यवस्थेविरुद्ध खटापटीचे मुख्य स्थान बनले.

ब्रिटिशांनी आनंदरावास केलेली मदज फुकट केली नाही. उलट ब्रिटिश सैन्याने केलेली नोकरी जशी उत्तम प्रकाराची होती तसा त्याबद्दल मिळालेला मोबदलाही फार मोठा होता, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. मुंबई सरकाराशी खलबत करून खंबायतेहून परत येताना कारभाऱ्यास अरब लोकांनी बहुतेक ठारच केले होते ही गोष्ट लक्षात असेलच. तेथे असे ठरण्यात आले होते, (ता. १५ मार्च, सन १८०२) की मुंबई सरकार जर मध्यस्थी पडले तर त्यांस चौऱ्याऐंशी परगणे आणि सुरतमधील गायकवाडाचा चौथाई भाग बक्षीस द्यावा. जहागीरदाराशी केलेल्या लढाईचा खर्च द्यावा आणि सुरत अठ्ठाविशी किंवा त्यांपैकी गायकवाडाचा जो प्रांत असेल तो ब्रिटिशास द्यावयाच्या रकमेबद्दल त्यांचेजवळ गहाण ठेवावा आणि शेवटी कडीची लढाई संपल्यानंतर आणि भाडोत्री अरब सैन्य घालविल्यानंतर दोन हजार ब्रिटिश शिपाई आणि युरोपीय तोफखाना गायकवाडाने आपले खर्चाने आपले पदरी ठेवावा, असे ठरले होते. या सैन्याचा दरमहा खर्च ६५००० रुपये आकारण्यात आला होता आणि तेवढ्या किमतीचे प्रांत स्वाधीन करावयाचे असे ठरले.

इनामांची किंमत

चौऱ्याऐंशी - रु. ९०,०००, सुरत चौथाई - रु. ५०,०००, चिकली - रु. ७६,०००, खेडा - रु. ४२,०००, एकूण - २,५८,०००

सन १८०२च्या सबसिडीअसे तहाचे हे मुद्दे होते; परंतु रावजीने जे देण्याचे कबूल केले होते त्याच्याशिवाय तारीख ४ जूनरोजी ब्रिटिश सरकारला चिखली परगणा नजराण्यादाखल देण्यात आला. ता. ३ माहे मे १८०३ रोजी खेड्यांची जहागिरी आणि किल्ला दिला. बडोदे संस्थान बहुतेक गहाणवट स्थितीत पडलेले असल्यामुळे सैन्याच्या खर्चाच्या रकमेऐवजी द्यावयाचे प्रांत देणे सन १८०३ पर्यंत लांबणीवर पडले; परंतु दरम्यान त्याजबद्दल काठेवाडाचा आणि कडीचा वसूल लावून देण्यात आला होता. फौजेचा पहिल्या वर्षाचा खर्च ७,८०,००० रुपये झाला आणि त्याच्यावर शेकडा नऊ टक्केप्रमाणे व्याज होते. सरतेशेवटी सन १८०३ च्या जानेवारी महिन्यात ह्या खर्चाबद्दल पुढील प्रांत देण्यात आले - घोळका ४-१-२ लाख, नाडियाद १-३-४ लाख, विजापूर १,३०,०००, कडीचा टप्पा २५,०००, एकंदर ७,८०,००० रुपये. गायकवाडांनी सन १८०५, जून महिन्यापर्यंत पैसे परत देण्याचे कबूल केल्यास ब्रिटिश सरकारने अरब सैन्याची मागील सर्व बाकी देण्याचे कबूल केले आणि तोपर्यंत बडोदे, कोरल, शिनोर, पटलाद आणि अहमदाबाद परगण्याचा वसूल ब्रिटिशांकडे लावून दिला.

ही व्यवस्था मुंबई सरकारास बडोदे संस्थानाकरिता अवश्य अशी फार चांगली दिसली असावी; परंतु सालबीच्या तहनाम्याप्रमाणे बडोदे संस्थानाचे विभाग करता येईनात किंवा ते संस्थान कमी करता येईना आणि गोविंदरावाशी अशा तऱ्हेने वागताना नाना फडणवीसास ब्रिटिशांनी अटकाव केला होता. तेव्हा वरील व्यवस्था बाजीरावास पसंत पडली असल्याबद्दल शंका आहे.

●●●

प्रकरण ११ वे

बडोदे येथील अरब लोक व पेशवे यांची जागा इंग्रजांच्या हाती कशी आली?

◘

भाडोत्री अरबी सैन्य संस्थानाकडून काढून टाकून त्याच्याऐवजी संस्थानाच्या पैशाने कवाईत शिकलेले इंग्रजांचे सैन्य ठेवण्याबद्दलची योजना, खंबायत येथे रावजीने केलेली व्यवस्था व तद्नंतरचा तह या दोहोंमध्ये झाला होता हे आपल्यास कळलेच आहे; परंतु मागे निर्दिष्ट केल्याप्रमाणे अरब लोकांची त्यावेळची सत्ता विचित्र होती. कारण हजारो बाबतीत प्रजेच्या विशिष्ट जातीला किंवा व्यक्तींना जी वतने सरकारने देऊन टाकलेली होती किंवा त्यांची कामे करण्याचे अंगावर घेतलेले होते ती सरकारकडून पार पाडण्याबद्दलची सर्व हमी ह्यांनी घेतलेली होती. आता ज्यावेळेस मुंबई सरकाराने अरबांची कल्याणकारी व्यवस्था आपल्याकडे घेतली, शिवाय काही मोठ्या कर्जाची फेड करण्याची हमी घेतली त्यावेळेस त्याचा स्वाभाविक परिणाम काय झाला? मुंबई सरकारने असे गृहीत धरले, की या बयाणदारीमुळे गायकवाड सरकारच्या राज्यकारभारातील आंतरव्यवस्थेत व मग ज्याशी बयाणदारीचा प्रत्यक्ष संबध नाही अशा बाबतीतसुद्धा अव्याहत व पद्धतवार हात घालण्याचा अधिकार आपणास मिळाला आहे. कंपनीला बहुतेक अति महत्त्वाच्या राजकीय कामांत हात घालण्याचा आधिकार मिळाला आहे अथवा कर्नल वॉकरच्या लिहिण्याप्रमाणे अति महत्त्वाच्या राजकीय कामांत हात घालण्याचा अधिकार मिळाला आहे अथवा कर्नल वॉकरच्या लिहिण्याप्रमाणे अति महत्त्वाच्या बहुतेक राजकारणात प्रमुखपणाने ढवळाढवळ करण्याचा व त्यांचे अपराधाबद्दल त्यांस शासन करण्याचा अधिकार कंपनीला मिळालेला आहे.

सन १८०२ सालच्या तहाला आपली संमती देताना आनंदराव यांनी सरकारी रीतीने असे लिहिले, की माझे स्वातंत्र्याविरुद्ध, माझे जीवित्वाविरुद्ध कारस्थाने केलेली दुष्टबुद्धी अरब लोकांत पुष्कळ मंडळी असल्यामुळे मी असे सांगतो, न ''माझ्या प्रजेने हुकुमाकडे लक्ष न देता मेजर वॉकरच्याप्रमाणे चालावे'' आणि रावजी आप्पाजी व त्याचे नातलग आणि मुजुमदार वगैरे मोठ्या अधिकाऱ्यांच्यासंबंधानेही त्यांनी साफ लिहिले आहे, की जर मी स्वतः किंवा माझ्या पाठीमागून

गादीवर बसणारे लोक अयोग्यरीतीने किंवा अन्यायाने वागतील, तर इंग्रज सरकारला मध्ये हात घालण्याचा पूर्ण अधिकार आहे.

इंग्रज लोकांना अशा प्रकारचे अमर्यादित अधिकार मिळाल्यावर त्यांनी बडोद्याच्या दिवाणाच्या प्रत्येक कामात बारकाईने चौकशी ठेविली व त्याबरोबर वसुलावरही आपला शह ठेवला. महाराज राज्यकारभार चालविण्यास नालायक आहेत, असे ठरविल्यामुळे ते राज्यकारभारात मुळीच हात घालीत नसत. तो पाहण्यास प्रधान मंडळ नेमले होते. त्यांत रेसिडेंट किंवा त्यांचा एतद्देशीय मुतालिक एक कामगार असे व त्यांच्याशिवाय सर्व कारभार रद्द असे समजले जात असे.

एकंदरीत कर्नल वॉकरने लिहिल्याप्रमाणे इंग्रजांची राज्याकारभारातील ढवळाढवळ खटपटीची होती; मात्र एवढे निःसंशय होते, की ही ढवळाढवळ करणारांचे हेतू चांगले असून काही अंशी न्याय्यही होते. वॉकर, कार्नाल आणि विलियम्स हे चतुर व चांगले अधिकारी होते व काही काळापर्यंत गंगाधरशास्त्रीसारख्या मनुष्याची त्यांना मदत होती. शिवाय संस्थान कर्जमुक्त होऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याइतके कुवतदार झाले, म्हणजे बयाणदारी संपून राज्यकारभारात हात घालण्याचे कमी व तद्नंतरचा नेहमी विचार असे; परंतु कोणत्याही कारणामुळे म्हणा, ह्या ढवळाढवळीचा उपयोग अखेरीस चांगला झाला नाही. इतके खरे, की काही काळापर्यंत संस्थानाच्या तिजोरीची स्थिती सुधारली व ज्या अडचणींतून मदतीशिवाय पार पाडता आले नसते अशा काही अडचणींपासून संस्थानाची मुक्तता झाली. पण राजाच्या मनाप्रमाणे ही ढवळाढवळ लवकर संपेचना, तेव्हा कृतज्ञतापूर्वक स्नेह वाढविण्याऐवजी विरोध मात्र उत्पन्न झाला व तो नाहीसा होण्यास बराच काळ लागला. पाहिल्याने बराच स्नेहभाव होता व त्यावेळीच घडलेल्या गोष्टी नमूद करून ठेवणे हे इष्ट आहे. हा स्नेहभाव म्हटला, म्हणजे बिचारा, वेडा आनंदराव अथवा तरुण फत्तेसिंग आणि रेसिडेंट यांच्यामध्ये होता अथवा रेसिडेंट आणि रावजी बाबाजी यांची मंडळी यांमध्ये होता. बाकी बहुतेक प्रारंभापासून एका बाजूला बडोदे येथील रेसिडेंट आणि त्याच्या पक्षाचे लोक व दुसऱ्या बाजूला गायकवाड घराण्याचे लोक यांच्यामध्ये वैरभावाशिवाय दुसरे काहीही नव्हते. त्यामुळे कारस्थाने, बंडे व लढाया सुरू झाल्या व या सर्वांचा कळस गंगाधरशास्त्र्याच्या खुनात झाला. आणि ह्या शोचनीय गोष्टींशी संबंध असलेल्या दुसऱ्या अनेक गोष्टी घडल्या, त्यांचा परिणाम अजून अनुभवास येत आहे.

बडोदे संस्थानाच्या इतिहासाची माहिती देण्याला प्रारंभ करण्यापूर्वी ही गोष्ट येथे सांगून ठेविली पाहिजे, की इंग्रजांचा तेथे शिरकाव होत असताना शिंदे व होळकर हे पेशव्याला न पकडण्याच्या खटपटीत होते. १८०२ साली यशवंतराव होळकराने आपल्या प्रतिस्पर्ध्याचा पुण्याजवळ पराभव केला. त्यात बाजीरावाने इंग्रजांची मदत मागितली होती व त्याचा परिणाम ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजी झालेला वसईचा तह हा होय. त्याचा बडोदे संस्थानाशी बराच संबंध असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष पुरविणे फार अगत्याचे आहे. एलफिन्स्टन साहेबांनी म्हटल्याप्रमाणे रावजीची खंबायत येथील ठरविलेली व्यवस्था व ता. २९ जुलै १८०२ चा बडोद्याचा तह ह्यांच्या योगाने एकंदर स्थिती कशी बदलली हे पेशवा ओळखून होता. त्याच्या योगाने पेशव्याचे बडोदे येथील वर्चस्व नाहीसे होऊन इंग्रजांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. गायकवाडच्या रक्षणाचा भार इंग्रजांनी पत्कारला. पेशव्यांनी होणाऱ्या दळणवळणात हात घालण्याचा आधिकार

त्यासच मिळाला आणि गादीच्या वारसी मालकीचे सगळे जोखीम त्यांनीच अंगावर घेतले. ह्या शब्दांचा सूक्ष्म विचार केल्यावर असे दिसून येईल, की पेशव्यांची गायकवाडीवर फक्त नामधारी सत्ता राहिली व सर्व खरी सत्ता इंग्रजांच्या हाती गेली. पुणे येथील दरबाराचे पुष्कळ देणे होतेच, खंडणीही पुष्कळ दिवसांपर्यंत तुंबून राहिली होती. देण्याघेण्याचे लढे मिटवायचे होते; परंतु ह्या सर्व भानगडीची अखेरची तडजोड लावण्याचे काम सर्वथैव इंग्रजाकडे आले होते. आता नियमित अशी काही खंडणी मात्र पेशव्यास मिळवायची; परंतु बडोद्याच्या राज्यकारभारात हात घालण्याची त्यांजकडे सत्ता राहिली नाही, ती सर्व इंग्रजांकडे सत्ता आली. हे काम त्याच्या शक्तीबाहेर गेले होते ह्याचे प्रत्यंतर पुढे येईल.[१]

अरबांना रजाच द्यावयाची, निदान त्यांची संख्या बरीच कमी करावयाची व सैन्याबद्दल होत असलेला खर्च कमी करावयाचा किंवा निदान फत्तेसिंगाच्या अमदानीतल्या प्रमाणावर आणून ठेवण्याचा ह्या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरविणे हे खंबायत येथील करार व बडोद्याचा तह ह्यांमुळे इंग्रजांचे कर्तव्य होते व त्यांना त्याच्यापासून मिळालेल्या सैन्याच्या मदतीबद्दल मुलूख तोडून दिलेला होता. अरबांची राजकीय सत्ता कशी मोडून काढली व त्यांना अखेरीस घालवून कसे दिले हा मजकूर या भागात येईल. लष्कराचा खर्च कमी करण्याचे काम फारच जोखमीचे पडल्यामुळे ते ताबडतोब पार पाडणे अशक्य होते. जोपर्यंत उत्पन्नापैकी पाऊण हिस्सा सैन्याकडे खर्च होत असे तोपर्यंत संस्थानाच्या वसुलीची स्थिती सुधारणे शक्य नव्हते, मुळीच संशय नव्हता. हे रेसिडेंटला पूर्णपणे माहीत होते; कारण वस्तुस्थिती अशी होती, की थोड्याशा लष्करी बहादरांनी गुजराथ जिंकिला होता. स्वदेशबांधवांच्या नाशावर गायकवाडची सत्ता वाढत होती आणि परदेशीय सैनिकांच्या बळावर गादीची मालकी कायम ठेविली जात होती. त्यामुळे संस्थानाच्या उत्पन्नाच्या मानाने लष्करी खर्च अतिशय दांडगा झाला व या लष्करी खर्चाचे पुरस्कर्ते बलाढ्य असल्यामुळे तो कमी होऊ शकला नाही. कडीवर स्वारी झाली तर मेजर वॉकर बडोद्यास रेसिडेंट होऊन तारीख ११ जुलै १८०२ रोजी आला आणि तेव्हापासून गुपचूपपणे सैन्य कमी करण्याची योजना करू लागला. अरब शिवबंदीबद्दल दरवर्षी संस्थानाला जवळजवळ ३६ लाख रुपये खर्च येत असे आणि बाबाजीच्या नवीन शिवबंदीबद्दल (असे नाव पडले होते) सुमारे बारा लाख रुपये खर्च येत असे, तेव्हा त्याने ठरविले की अरबाच्या शिवबंदीचा दरवर्षाचा खर्च १५ लाख रुपये करावा आणि बाबाजीच्या शिबंदीचा दरमहा १५००० रुपये कमी करावा. हा उपाय योग्य आहे असे रावजी आप्पाजीलाही वाटले होते; परंतु काही काळ लोटल्यावर वार्धक्य जेरीस येऊन तो वृद्ध मनुष्य अरबांशी तंटा करण्यास भिऊ लागला.

सन १८०२ च्या ऑक्टोबर महिन्याच्या सुरवातीला अरबाचे सैन्य इतके शिरजोर झाले, की ते बंद करण्यासही प्रवृत्त होईल अशी चिन्हे दिसू लागली. त्यांना जोरही चांगला होता; कारण शहरातील सर्व दरवाजे त्यांच्या ताब्यात नेमून महाराजा शहरात कैदेत असल्यासारखा

---

१. हेही ध्यानात ठेवावे, की वसईच्या तहाच्या १० कलमांप्रमाणे पेशव्यांनी आपला सुरतेच्या चौथाईचा हक्क व चौऱ्याऐंशी आणि चिखली परगण्यातील सर्व हक्क इंग्रजांस देऊन टाकले होते. शिवाय गायकवाडानेही त्या भागातला आपला हक्क त्यांस बहाल केला होता. त्यामुळे गुजराथच्या ह्या भागावर इंग्रजांची पूर्ण मालकी झाली होती.

होता. रामी यांनी अटकेत असलेल्या कानोजीला मुंबईस घेऊन जाण्यासाठी काही विवक्षित लोकांच्या स्वाधीन करण्याचा जेव्हा महाराजांनी हुकूम सोडला तेव्हा तर आणिबाणीची वेळ आली. हा हुकूम घेऊन जाणारा जासूद सुलतान जाफर नावाच्या एका अरब जमादाराचा पुतण्या होता. त्याने स्वतः कानोजीच्या पाहरेकऱ्यांना तो हुकूम मोडण्याचा आग्रह केला आणि ह्या कामात त्याला झेझा आणि लंगडा आबूद नावांच्या बडोद्यातील दोन मुख्य अरबांचे सहाय होते. सुलतान जाफरचा या कामात सल्ला घेतलेला नव्हता व हे करणे त्याला पसंत पडले नाही म्हणून अरब लोकांच्या दोहो पक्षांत इतके निकराचे भांडण सुरू झाले, की नोव्हेंबरच्या १६व्या व १७व्या तारिखेस तटबंदीच्या आत लढाई उघडपणे सुरू होते की काय अशी शहरातील लोकांना भीती पडली. सरतेशेवटी उच्छृंखल पक्षाची सरशी झाली. त्या पक्षाला ता. १० डिसेंबररोजी सुलतान जाफरही जाऊन मिळाला. त्यापूर्वीच कानोजीला तेथून पळविला व राजाला राजवाड्यात अटकेत ठेविले. आपणहोऊन आपल्यावर संकट आणले असे पाहून अरबांची रोजी चुकवणारे अधिकारी घाबरले व शहरातून पळून गेले, तेव्हा ता. १८ डिसेंबररोजी त्या किल्याभोवती इंग्लिश सैन्याने वेढा घातला. लहरीपुरा दरवाजा, चंपानेर दरवाजा, पाणी दरवाजा यांवर अनुक्रमे बेन, हैदर, जाफर आणि झेझा हे होते आणि बऱ्हाणपूर दरवाजा आबूद वगैरे जमादारांनी संभाळला होता. ह्या सर्व दरवाजांवर अमीन साहेब ह्यांनी आपापले मोर्चे ठेवले. कर्नल वुडिंग्टनचे चाळीस-पन्नास लोक प्रथम मेले; परंतु रात्री अठरापौंडी पाच तोफा लहरीपुरा दरवाजावर नेम धरून अशा उभ्या करून दिल्या, कि दरवाजा सहज उडविला जावा. अरब लोक शरण येतील आणि शहराला धक्का पोचणार नाही अशा आशेवर दोन दिवसांपर्यंत लढाई तहकूब ठेविली होती. शेवटी लढाई सुरू होऊन २५ तारखेपर्यंत चालली. ता. २६ रोजी अरबांनी तट खाली करून दिला व पगाराची बाकी चुकती करून देऊन आणि गुजराथेतून सुरक्षितपणे बाहेर जाण्याची तजवीज झाल्यास आम्ही देशाबाहेर जाऊ असे त्यांनी कबूल केले व अशा सुलभ अटीवर त्यांनी शहर सोडले. शहर कब्जात घेण्यात सात आधिकाऱ्यांसकट एकंदर १५० लोक इंग्रजांकडे जखमी झाले व कामाला आले. लहरीपुऱ्यावर इंग्रजांचा संत्री पहारा ठेविला गेला. आंनदरावाने ह्या धामधुमीत शहराबाहेर पळ काढला होता. तो सन १८०२च्या डिसेंबरच्या २७ तारखेला मोठ्या डामडौलाने लहरीपुऱ्याच्या दरवाजाने शहरात आला. अरब लोक पुन्हा येणार नाहीत असे म्हणून गेले खरे; परंतु पुढे आपणास कळलेच की पुष्कळ अरबांनी आपली वचने मोडली आणि लंगड्या अबूदच्या हुकुमाने आणि कानोजीच्या नामधारी प्रमुखाने पुष्कळ दिवसापर्यंत देशाला उपदेश दिला होता, कसेही असो. ब्रिटिश लोकांनी संस्थानाची एक कामगिरी बजावली व ती ही की, आपल्या पुष्कळ लोकांसह छापा घालून व बंडखोर सैन्याचा पगार चुकता करण्यासाठी वेळी पैशांचीही मदत करून संस्थानाला भयंकर झोटिंग बादशाहीच्या भीतीतून मुक्त केले.

●●●

प्रकरण १२ वे

संस्थानाचे अंतर्बाह्य धामधुमीतून निष्क्रमण

◘

रामी येथून अटकेतून सुटका झाल्यावर कानोजी राजपिंपळ्यास पळून गेला. तेथे फारशी पंचाईत न पडता त्याने कोळी लोकांचे मोठे सैन्य जमविले आणि लवकरच बडोद्याच्या वेढ्यानंतर अरब आणि सिंधी लोकांची एक टोळी येऊन त्याला मिळाली. मेजर होम्स सीतारामाच्या सैन्याला जाऊन मिळाल्यावर त्याची व कानोजीची ता. ११ जानेवारी सन १८०३ रोजी वजीरा मुक्कामी गाठ पडली व त्यांनी त्याच्या छोट्या सैन्याला पळवून लावले. त्याच्या मोठ्या प्रयासाने पाठलाग करिता करिता पुन्हा सावळी येथे ता. ६ फेब्रुवारीरोजी दोघांची गाठ पाडून चकमक उडाली तीत इंग्रजांचे पुष्कळ लोक गमावले; कारण अरब लोक मजबूत ठिकाणावर होते व इंग्रजांना अरबांनी काबीज केलेली आपली तोफ परत मिळवायची होती; पण चकमक एकंदरीत सणसणीत उडाली. कानोजीचे खजीना व सैन्य रोडावले. त्याला पूर्वी मिळालेले गणपतराव व मुरारराव गायकवाड हे दोघेही जखमी झाले. कानोजी पळून गेला. पुढे संस्थानाचे जबर नुकसान करण्याचे जरी त्याच्या अंगी सामर्थ्य राहिले नव्हते, तथापि तो सरहद्दीवर घिरट्या घालून आणि शिंदे अथवा होळकरांना राज्यावर हल्ला करण्यास सामील होण्याचा धाक घालून संस्थानाला त्रासात व धाकात ठेवित होता. कडी लढाईतून आलेला शिवराम नावाचा एक जुना गायकवाडी नोकर त्याला मिळाल्याने आणि लंगडा अबूद नावाने प्रसिद्धीस आलेला अरब लोकांतील एक अट्टल बंडखोर हाही, जीत नीम्म्याहून अधिक अरब होते, अशा पाचशे लोकांच्या तुकडीनिशी त्याला मार्च महिन्यात मिळाल्यामुळे त्यास जास्त जोर आला. कोराल येथून कानोजीला हाकून लावल्यावर, चोपड्यातील आलोवास खेड्याजवळ त्याच्या मेवासी सैन्याचा मेजर होम्सने ता. २ मार्चरोजी पराभव केला. तेव्हा पुन्हा गुजराथ सोडून जाणे त्याला भाग पडले आणि बारिआ, डंगरपूर, सोंढे, लुनावाडा व इतर लहान-लहान संस्थानांना त्रास व दहशत देऊन लुटालूट करून एक वर्ष त्याने काढले. सरतेशेवटी त्याला अति त्रास झाल्यामुळे ती सर्व संस्थाने ह्याच्याविरुद्ध उलटली. त्याच्या लोकांनी मांडलेल्या पुंडाव्यात बिचाऱ्या कानोजीचे काही अंग

नव्हते; कारण तो स्वतःच लंगड्या अरबाच्या मुठीत होता. पुढे त्याच्या तडाक्यातून निसटून जाण्याला संधी मिळाली तेव्हा आनंदाने तेथून पळून गेला. त्याठिकाणी त्याला तूर्त आपण सोडून सैन्याची सुधारणा करण्याचे, अरब लोकांना हाकलून देण्याचे आणि कानोजीला ताळ्यावर आणण्याचे मेजर वॉकरचे प्रयत्न चालू असताना सन १८०२ व १८०६ साली महाराष्ट्रात जास्त महत्त्वाच्या गोष्टी घडून येत होत्या. त्यामुळे बडोदे संस्थानातील राज्यकारभारात भानगडी होतील अशी भीती पडली. मागील भागात सांगितल्याप्रमाणे यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे आपापले वर्चस्व स्थापण्यासाठी व बाजीरावाला पकडण्यासाठी झगडत होते. त्याचे सैन्य मध्य हिंदुस्थानावर पसरलेले होते आणि त्यांची गुजराथ प्रांतावर नजर होतीच. सन १८०२च्या सप्टेंबरात होळकरांच्या पेंढाऱ्यांनी सुरत अठ्ठाविशी प्रांतात प्रवेश केला. तेथे पराभव झाल्यामुळे फारसे नुकसान न करता तेथून ते गेले; परंतु शिंद्यांचे कारस्थान जास्त भयंकर होते. मागे सांगितलेच आहे, की अहमदाबादच्या मक्त्यापैकी दहा लक्ष रुपये त्याला घेणे होते व ते वसूल करण्याकरिता धारच्या आनंदराव पोवाराला नामधारी सेनापती करून बारा-चौदा हजार लोकांनिशी त्याला उत्तर गुजराथेकडे रवाना केले. हा दुर्दैवी तरुण राजपुत्र गोविंदराव गायकवाडच्या एका मुलीचा मुलगा असून त्याच्याच दरबारी त्याचा बाप खंडेराव ह्याच्या मरणानंतर त्याचे संगोपन करण्यात आले होते. सन १७९७ मध्ये सतरा वर्षांचा असताना त्याने बडोदे सोडले व स्वदेशी परत आला. तेथे त्यावेळी रंगराव दुरेकर नावाच्या एका कारस्थानी प्रधानाने त्याला हरकत केली व बलाढ्य शिंदे व होळकर यांनीही त्याला धमकावले. स्वतःच्या राज्यात त्याचे महत्त्व नव्हते; परंतु परदेशी त्याच्या नावाला व घराण्याचा मान चांगला असे. त्यामुळे रावजी आपाजी व इंग्लिश लोक ह्यांना त्रासलेले गायकवाडी पुरुष ह्यांच्याच भोवती जमा होतील असे ठरलेले होते. तेव्हा शिंद्याने बहुतेक असा तर्क बांधला, की त्याला जर गायकवाडाला हाकलून लावण्याच्या कामी यश आले, तर मग पेशव्याकडून आपणास अहमदाबाद प्रांताचा मक्ता मिळेल व शिवाय बडोदे येथील गृहकलहांत हात घालावयास सापडून आपला बराच फायदा होईल त्याचा दिवाण भास्कर याने आपला जुना मित्र रावजी आपाजी याला हकिकत कळविली व त्याची पक्की पाचावर धारण बसविली. लढाई उद्भवल्यास काय नुकसान होईल याचा अंदाज मेजर वॉकरला होता. तेव्हा त्याने मुंबई सरकारजवळ मदत मागण्याचा विचार केला. आता मुंबई सरकारचे बारा लक्ष रुपये घेणे होते. तथापि त्याचा दुसरा हप्ता घेण्याचे शिंद्यांचे कर्ज देण्याकरिता दिवसगतीवर टाकले. सुरत अठ्ठाविशी महाल गहाण लावून घेता येत नव्हता; कारण भडोच येथील शिंद्याचा वकील परभुदास याने संस्थानाला वीस लाख रुपये दिलेल्या कर्जाबद्दल तो महाल त्याजकडे गहाण होता व ज्या कर्जापैकी पाच लक्षांची अजून फेड होणे राहिलीच होती. शिवाय सुरत अठ्ठाविशी महालातून संस्थानाला साडेतीन लक्षांपेक्षा जास्त उत्पन्न नसे; कारण त्याच्या उत्पन्नापैकी बराच भाग रावजी अघाजी व त्याच्या कुटुंबाचे स्वाधीन केला होता म्हणून शिंद्याला पैसे देण्याबद्दल परभुदासाचे मन वळवून त्या कर्जाची फेड करण्याबद्दलची जामीनगत मुंबई सरकाराने आपण स्वतः पत्करली. येणेप्रमाणे अर्ध्याच असलेल्या वसुलीच्या शोचनीय स्थितीत जो बहुतेक लढाईचा दुसरा प्रसंग येणार होता व ज्यातून पार पडण्याचे संस्थानाला सामर्थ्यच नव्हते, तो टळला.

सन १८०३च्या जुलै महिन्यात रावजी आपाजी मृत्यू पावला.[१] त्या वृद्ध प्रधानाने इंग्लिश लोकांचे साह्य घेतल्यामुळे कदाचित गायकवाडची मोठी कामगिरीच केली म्हणावयाची त्याने आपल्या एकंदर कारकिर्दीत राज्यचातुर्य व प्रसंगावधान ह्यांची उणीव कधीही दृष्टीस पडू दिली नाही. गोविंदराव गादीवर असताना त्याला गादी सुरक्षित राखण्याकरिता बिकट प्रसंगी त्याने मदत केली ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु वाईट गोष्टीही त्याने बऱ्याच केल्या. अरब लोकांचे सैन्य त्यानेच बिनदिक्कत वाढविले. दारिद्र्याने संस्थान त्रस्त झाले असतानाही आपली व आपल्या कुटुंबाची तुंबडी भरण्याकरिता खटपट करण्यास त्याने मागे पुढे पाहिले नाही. अरब लोकांनी केलेल्या बंडाच्या दुर्धर प्रसंगी हाच भयभीत होऊन कचरला. त्याच्याच अति दिरंगाईमुळे सुधारणेचे महत्त्वाचे काम दिवसगतीवर पडले. त्याचा वृद्धापकाळ व दुर्बलता ह्याकडे पूर्ण लक्ष देऊन विचार केला तरी त्याची अति प्रशंसा करणे शक्य नाही. परंतु तत्कालीन मुंबई सरकारवर त्याने बरेच उपकार केल्यामुळे त्या सरकारने त्याच्याकडे व त्याच्या वारसांकडे दिवाणगिरीची जागा कायम ठेवण्याचे अभिवचन दिले होते. म्हणून मरणापूर्वी थोडे दिवस त्याने दत्तक घेतलेला त्याचा पुतण्या सीताराम याची त्या मोठ्या महत्त्वाच्या जागेवर झालेली नेमणूक मुंबई सरकारला मंजूर करणे भाग पडले; परंतु सीताराम हा त्या जागेला अगदी अयोग्य होता. बडोदे संस्थानाचे नुकसान करण्यास तो पुष्कळअंशी कारण झाला हे लवकरच पुढे दृष्टीस पडले.

दोन बारीक गोष्टी ज्या येथे सांगावयाच्या आहेत त्यामुळे विषयांतर होण्याचा जरी संभव असला तरी त्या ह्या ठिकाणी सांगितल्या असता बरे पडेल. ता. २३ सप्टेंबररोजी रावजीचा जुना मित्र यादव भास्कर हा आपला धनी शिंदा ह्याच्या पक्षात लढाईत पडला. रावजीच्या मरणापूर्वी काही महिने म्हणजे ता. २ फेब्रुवारी, सन १८०३ रोजी रेसिडेंट आणि दरबार ह्यांच्यामधील विश्वासू वकिलाच्या जागेवर गंगाधरपंत शास्त्री पटवर्धन याची दरमहा शंभर रुपयांवर नेमणूक झाली.

आपणास माहीतच आहे, की सन १८०२ साली शिंदे आणि होळकर ह्यांच्यादरम्यान लढाई जुंपली असताना होळकरांचा जय झाल्यामुळे बाजीरावाला इंग्लिश लोकांना आपल्या मदतीस बोलावणे भाग पडले व त्याबद्दल त्याला वसईचा तह करावा लागला. तो तह त्यालाच लागू होता असे नाही. अप्रत्यक्ष रीतीने शिंद्याला व इतर काही कारणांमुळे वऱ्हाडाचा राजा राघोजी भोसले यालाही लागू झाला. त्यामुळे त्या दोघांची ब्रिटिशांबरोबर लढाई जुंपली व दक्षिणेत आसई व आरगाव, उत्तरेस दिल्ली, आग्रा आणि लासवारी या ठिकाणी शिंद्यांच्या

---

१. सन १८०२च्या तहाच्या १०व्या कलमाप्रमाणे दिवाणगिरी रावजीला व त्याच्या कुटुंबाला देण्यात आली. बिटिशांकडून त्याला चौऱ्याऐंशीपैकी भाटा नावाचे मौल्यवान खेडे मिळाले व गायकवाडाकडून ४००० ची नेमणूक मिळाली. त्या म्हाताऱ्या कारभाऱ्याला एवढ्याने तृप्ती न होऊन तो आपल्या कुटुंबातील लोकांना व विशेषकरून नवसारीच्या देशमुखाला देणग्या देत सुटला. त्यामुळे अठ्ठाविशी तर खालावलीच व कडीच्या जहागीरदाराकडून काढलेल्या जमिनीपैकी एवढा मोठा तुकडा अपहार केला की शेवटी यामध्ये इंग्रज सरकारला हात घालावाच लागला.

सैन्याचा पूर्ण पराभव झाला आणि पुष्कळ किल्ले व तटबंदी शहरे, गुजरातेतील भडोच आणि पावनगड[1] ही सर्व इंग्रजांच्या हस्तगत झाली. या घडामोडी चालल्या असता सन १८०२ मध्ये शिंदे आणि होळकर ह्यांच्यादरम्यान चाललेल्या लढाईत एक मोठी गोष्ट घडून आली व तिचा गायकवाड घराण्यातील एका मनुष्याच्या दैवावर विलक्षण परिणाम घडला. गोविंदराव गायकवाडचा मुलगा फत्तेसिंग ह्याला त्याने खंडोबाच्या सेवेला अर्पण केले होते. सन १८०२च्या अखेरीस होळकरांच्या एका कारागिराने त्याला कैद केले व पेंढारी लोकांच्या सैन्याचा त्याला नामधारी सेनापती करून दंगाधोपा माजविण्याकरिता गुजराथेत पाठवितील अशी भीती असल्यामुळे गायकवाड सरकाराने मेजर वॉकरच्या संमतीने त्याच्या सुटकेकरिता द्रव्य देण्याचे कबूल केले. अशाप्रकारे पडलेली धास्ती केवळ निराधार नव्हती असे दिसते; कारण सन १८०३ मधील जून महिन्यात मोठ्या सैन्यानिशी व त्या तरुण राजाला आपल्या छावणीबरोबर घेऊन अमीरखान सोनगडापासून थोड्या मैलाच्या अंतरावर येऊन धडकला; परंतु अविर्भाव करून विशेष नुकसान न करता निघून गेला.

सन १८०३ मधील ऑगस्ट महिन्यात होळकराचा मदतगार अमीरखान ह्याच्याजवळून फत्तेसिंग निसटला, आणि मी आपली सुटका ५० हजार रुपये देण्याचे कबूल करून करवून घेतली, असे त्याने बडोद्यातील दरबारास कळविले. पठाण लोकांची लहानशी टोळी बरोबर घेऊन तो परत आला. त्या पठाणांनाही काही द्रव्य देण्याचे त्याने कबूल केले आणि ऑक्टोबरच्या दुसऱ्या तारखेस राजधानीत त्याने प्रवेश केला आणि राणी गहेनाबाईच्या येथे राहिला. ह्याप्रसंगी शिंद्यावर केलेल्या मोहिमेमुळे बडोद्यात सैन्य शिल्लक राहिले नव्हते आणि मेजर वॉकरला ह्या पठाणांचा बिलकुल भरवसा नव्हता; कारण कोणत्याही चिथावणीने हे तेव्हाच गडबड करण्यास उद्युक्त व्हावयाचे अशी त्यास भीती होती.

ते लोक आपल्या एका किंवा दोघाही नायकांशी तंटा करून नोव्हेंबर महिन्यात बडोद्यातून चालते झाले. मेजर वॉकरच्या मनात त्याच्याबद्दल आलेली शंका चुकीची नव्हती; पण ते गेल्यानंतर थोड्याच दिवसांनी एक कास्थान बाहेर कळालेच. गोविंदरावाची लाडकी बायको तखतबाई हिने दुबळ्या आनंदरावावर आपला पूर्ण पगडा बसविला होता. ही महत्त्वाकांक्षी व महाकारस्थानी होती. हिने लाच देऊन आपल्या बाजूस वळवून घेतलेल्या काही घोडेस्वार आणि वरील पठाण यांच्या सल्ल्याने रेसिडेंट व सीताराम यांना पकडण्याचा व राज्याची उलथापालथ करण्याचा व्यूह रचला. ह्या कटात आणखी काही लोकांचे अंग होते, परंतु ते लोक हलक्या दर्जाचे, कुचकामी असे होते. बिचाऱ्या महाराजालाही या कटात गोवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता; परंतु तो सर्वथैव फसला.

फत्तेसिंगाला सोडविण्याकरिता रेसिडेंटाने आपण स्वतः जामीनगत पत्करून पन्नास हजार रुपयांची रक्कम जमा करून सीतारामाच्या स्वाधीन केली व त्या थोर माणसाच्या म्हणण्याप्रमाणे त्याने त्या पैशांची होळकराकडे भरपाई केली. परंतू पुढे मेजर वॉकरला असे समजले, की त्याने

---

१. ता. २९ ऑगस्टला भडोच व ता. १७ सप्टेंबरला पावनगड हातात आला. सन १८०३च्या ता. ३० डिसेंबरच्या तहानंतर पावनगड शिंद्यास परत केले. गायकवाडाकडील आपले सगळे सोडून देण्याचे शिंद्याने कबूल केले.

ती रक्कम होळकराकडे पोचती केली नाही व गंगाधर शास्त्र्याचा दरबार बंद झाल्यावर त्याने ती रक्कम गुपचूपपणे गिळंकृत केली किंवा खर्चून टाकली.

आम्ही सांगितलेच आहे, की सन १८०३च्या अखेरीस शिंद्यांचे बळ मोडले आणि ज्या होळकराला आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या हातात सत्ता असताना त्याचा पक्ष घेऊन लढण्याची इच्छा होईना, तो आता ज्या सरकाराने त्याच्या प्रतिस्पर्ध्याचा एका वर्षाच्या आत चुराडा करून टाकला, त्या सरकाराबरोबर लढण्यास तयार झाला. ही लढाई दोन वर्षांपर्यंत चालू होती. माळव्यात ब्रिटिश लोकांना गायकवाडांची साथ होती; परंतु ते लोक दूरच्या मोहिमेवर जाण्याला नाखूष होते व त्यांच्या नायकांचा आपल्या सहवाशांशी स्नेहभावही नव्हता. एकंदरित त्या एवढ्याशा सैन्याचे वर्तन इतके लाजिरवाणे होते, की जे सैन्य कमी करण्याची आवश्यकता फार दिवस वाटत होती ते त्याप्रमाणे कमी करण्याचे काम रेसिडेंटाने ताबडतोब हाती घेतले. ज्यामुळे संस्थानवर काळिमा आली तो भाग ह्या इतिहासात जास्त सविस्तरप्रमाणे सांगण्याची आवश्यकता नाही. सैन्याची सुधारणा यापूर्वीच का झाली नाही, ह्याजबद्दल विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे.[१]

●●●

---

१. ता. १७ मे सन १७९८ ला मार्किस ऑफ वेलस्लीची हिंदुस्थानातील कारकीर्द सुरू झाली. त्याचेमागून त्याचे जागी लॉर्ड कॉर्नवॉलिस ता. ३० जून सन १८०५ ला आला. तो ता. ५ ऑक्टोबरला मेल्यावर त्याचे विचार सर जॉर्ज बार्लीने अमलात आणिले. वेलस्लीची कडक आमदानी जाऊन तिचे जागी दुसऱ्या कारभारात हात न घालण्याची पद्धत अमलात आली. पुष्कळ दिवस चाललेल्या लढाया एकदम बंद करून टाकल्या गेल्यामुळे जी फुरसद मिळाली तीत पेशवा, नागपूरकर, भोसले, होळकर, शिंदा यांना पुढील सन १८१७ तील युद्धासाठी चांगली जमवाजमव करता आली. सन १८०५ मध्ये मार्किस ऑफ वेलस्लीने तह करून गायकवाडचा कायम निकाल केला. त्याचा पुढील भाग १८१७ मध्ये मार्किस ऑफ हेस्टिंग्सने पुरा केला. दरम्यान, तह वगैरे काही झाले नाहीत; पण बाजीरावाने बडोद्यास आपले वजन पुन्हा स्थापित होण्यासाठी कारस्थाने केली.

प्रकरण १३ वे

काठेवाडातील मुलूखगिरी पद्धत

◘

सैन्याचा खर्च कमी केल्याने संस्थानावरचे ओझे हलके होईल म्हणून ती सुधारणा करण्याचे मेजर वॉकरच्या मनात आरंभापासूनच होते; परंतु त्याच्या करण्याला लढाया आणि लष्करी लोकांचे वजन हीच आड येत होती असे नाही. त्याचा विचार काठेवाडात जास्त काळापर्यंत सैन्य ठेवून तेथून बराच वसूल काढावयाचा होता. ह्या वाक्याचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता त्या संस्थानाच्या इतिहासाच्या ज्या भागाचा आम्ही मुद्दाम आजूनपर्यंत निर्देशच केला नाही, त्या संपूर्ण भागाचे अवलोकन करणे जरूर आहे व ह्याकरिता ज्याप्रमाणे आमचा विषय पूर्ण अवगत होण्याकरिता आम्हास मागे वळले पाहिजे त्याप्रमाणे आमचा इतिहास सन १८०५च्या पुढेही ढकलला पाहिजे.

काठेवाडाचे द्वीपकल्प अथवा ज्याला मराठे लोक तेथे येण्यापूर्वी सौराष्ट्र असे म्हणत असत. त्याचे काही कारणाकरिता कमी-जास्त क्षेत्रफळाचे दहा जिल्हे केले आहेत, त्याची नावे येणेप्रमाणेः हल्लाद हा झाडेज जातीच्या ताब्यातील; मच्छकांटा हा कच्छचा अर्वाचीनकाळी जे लोक आले त्यांच्या ताब्यातील प्रदेश अथवा झाल लोकांचा प्रदेश. गोहेलवाड हा गोहेल रहिवाशांचा उंदसूर्वेय हा ज्या रजपूत लोकांची सत्ता पूर्वी ह्या देशावर होती त्यांचे ठिकाण; बाब्रिआवाड हा बाब्रिया लोकांचा. सोराठ ह्यात कोळी व कुणबी लोकांची वस्ती असून शिवाय जुनागडच्या मुसलमान नबाबाची ठिकाणे होती. बाडी हा जेठवा रजपुतांचा देश; ओखामंडल हा चाचे लोकांचा मुलूख आणि काठेवाड म्हणजे काठी लोकांचा देश. काठेवाडाच्या इतिहासात कोणत्याही काळी ह्या जिल्हांवरून काठेवाडातील राजकीय स्थितीचे निदर्शने होणारे नव्हते कारण बारीकसारीक असंख्य पोटभेद गणले नाही. तरी त्या द्वीपकल्पाचे कमीत कमी २९२ भिन्न किंवा निरनिराळे विभाग होते. त्यांतील राहिवासी एकमेकांशी नेहमी लढत असल्यामुळे एकजुटीने कोणत्याही स्वारी करणाराचा प्रतिकार त्यांनी केलाच नाही. तथापि, त्या द्वीपकल्पाच्या विचित्र रचनेमुळे गुजराथेतील कोणत्याही राजाने अथवा यवन

राजाने किंवा त्याच्या प्रतिनिधीने तो प्रदेश कायमचा असा कधीही काबीज केला नाही. मात्र वेळोवेळी त्यातील निरनिराळ्या परगण्यांची ते लुटालूट करीत. हीच रीत मराठ्यांनाही फार सोयवार पडे.

गुजराथेत प्रथम छापे घालीत सेनापती काठेवाडात पोहोचला व त्याबरोबर दामाजी गायकवाडही तिकडे गेला. लोलीयानाथ शहरातील देवळावर खाली लिहिलेला लेख दृष्टीस पडतो. "श्री शिवाच्या पादुकांची मनोभावाने दामाजी गायकवाड सतत अर्चा करितो." दामाजी प्रांत काबीज करण्याच्या पलीकडे गेला नाही खरा; पण इतर गायकवाडाचा थोडा भाग काबीज केला व ते असे घडून आले.

एका सय्यदाची महंमद बेगड्यापासून अमरेळीमध्ये वंशपरंपरेने आलेली जमीन होती. त्या सय्यदाला काठी लोकांकडून फार त्रास होऊ लागल्यामुळे त्याने दामाजी गायकवाडला आपल्या मदतीस बोलाविले. नंतर लवकरच लाथी नायकाच्या मुलीशी गायकवाडाने लग्न लावल्यामुळे त्याने आपल्या मुलीला स्त्रीधन म्हणून दामनगर ज्याला 'चोबाविया' असे पूर्वी म्हणत, ते आसपासच्या दहा खेड्यांसकट त्याच्या स्वाधीन केले आणि याप्रमाणे काठेवाडात म्हणजे अमरेळी आणि दामनगर येथे गायकवाडीचा पाया पडला. बाराव्या शतकात राठोड लोकांनी मारवाड देशातून घालवून दिल्यावर काठेवाडात आलेल्या गोहेल रजपुतांचा नाईक जेजक याचा दुसरा मुलगा सरंजे याचा हा लाथी नाईकवंशज होय. लाथी नाईकाच्या ताब्यात एकंदर ३७४ खेडी होती. त्यांपैकी आता काय ती ११ खेडी त्याचेजवळ आहेत. दमाजीनेही जुनागडच्या नबाबापासून काही प्रांत हस्तगत करून घेतले; परंतु त्यात त्याच्या वंशजांनी भर घातली नाही. उलट फत्तेसिंगाने कसबातींवर पूर्ण भरवसा टाकला व अखेर त्यांनी त्याला फसविले त्यामुळे त्यांच्या प्रांतापैकी काही प्रदेश त्याच्या ताब्यातून जाऊन ते नबाबाला परत मिळाले. मराठ्यांना तेथील प्रांत काबीज करण्याची इच्छा नव्हती आणि उपलब्ध आहे तीवरून सर्व द्वीपकल्पात त्यांनी सारी सात कायमची ठाणी केली. दमाजीने लाथी, अमरेली आणि कदाचित कोडीनार मिळविले. सयाजी गायकवाडने सन १७६५-६६ साली शियानगर अथवा ज्याला मरूड म्हणतात ते घेतले. रावजी आपाजीचा भाऊ बाबाजी याने सन १८०५-०६ साली भीमकट्टा ठाणे आणि लकतर ही काबीज केली. दमाजीने मिळविलेले प्रांत व त्याच्या लग्नाच्या वेळेस स्त्रीधनाबद्दल स्वाधीन केलेले प्रांत ह्याशिवाय लहान-लहान काठी गिराशांनी बलाढ्य मराठ्यांच्या आश्रयाखाली राहण्याच्या इच्छेने आपापली गावे त्याचे स्वाधीन करून दिली. दुसऱ्याचे गाव गायकवाडाने हिसकावून घेतले म्हणजे पूर्वीच्या २९२ विभागांपैकी जवळजवळ ऐंशी अमरेली प्रांतांत सामील झाले. दुसरीकडे असे दाखविले आहे, की जुनागडच्या नबाबाने कोडीनारचा परगणा सन १८११ मध्ये गायकवाडाला दिला आणि सन १८१७ मधील नोव्हेंबरच्या ६व्या तारखेस इंग्रजांबरोबर झालेल्या पुरवणी तहाने त्याला ओखामंडळ मिळाले.

मराठ्यांनी काठेवाडात मोठमोठाले प्रांत जरी हस्तगत करून घेतले नाहीत, तथापि मुलूखगिरी नावाच्या चमत्कारीक पद्धतीने तेथून त्यांना पुष्कळ उत्पन्न वसूल होत असे.

काठेवाडातील एखाद्या छोट्या राजाच्या प्रदेशावरील पहिल्या मोहिमेच्या वेळेस मराठे लोक खंडणीबद्दल त्याच्याजवळ पैशांची मागणी करीत. ती त्याची ऐपत पाहून न करिता त्याच्याशी

टक्कर देण्याला त्यांच्यात जितके सामर्थ्य कमी असेल त्याप्रमाणे करीत असत. बळी तो कान पिळी हे तत्त्व ह्यावेळीही अमलात येत असे. पुढे दरवर्षीच नाही तर केव्हा केव्हा सैन्य पाठवून पाहिल्याने जितकी खंडणी घेतली असेल त्या हिशेबाने एकंदर बाकी रकम वसूल करीत असत. सूट कधीच मिळत नसे. थकलेल्या रकमांचा हिशोब पुरेपूर होत असे. कधी कधी राजा पैसे देई व कधी कधी देत नसे. खंडणी गोळा करण्याकरिता पाठविलेले सैन्य कमकुवत असल्यास राजाने जर खंडणी दिली नाही, तर त्याचा सन्मान होऊन नावलौकिकही होत असे. राजाने सर्व खंडणी देण्याचे कबूल केल्यास अथवा स्वारी करणारांना कबूल होईल असा काही तिचा भाग दिल्यास त्याच्या मुलखाचे काळजीपूर्वक रक्षण होत असे. खंडणी देण्यापूर्वी एखाद्याची लढाई करण्याची मर्जी असल्यास मराठे लोक नेहमी पिकांचा नाश करीत व ते स्वाऱ्या ऐन पिकाच्या हंगामाच्या वेळेसच करीत असत. लाकडाची कमतरता असल्यामुळे उघडी खेडी व तुटक वसलेली घरेदारेही जाळून फस्त करीत. अशाप्रकारे खंडणी देणाऱ्या दुराग्रही राजाला ताळ्यावर आणण्याकरिता व त्याची रग मोडण्याकरिता लुटालूट व नासधूस करून त्याचे फार नुकसान करीत असत. साधारण मजबुतीच्या तटबंदी किल्ल्यावर हल्ला करण्यापुरते सामर्थ्य या शतकाच्या आरंभापर्यंत त्यांच्या सैन्याच्या अंगी नव्हते. हेही कबूल केले पाहिजे की स्वारी करण्याकरिता निघालेले सैन्य मांडलिकांच्या फक्त मालमत्तेचीच नासाडी करी, त्यांच्या शरीराला कधीही त्रास पोचू देत नसे. या निंद्य मुलूखगिरीच्या पद्धतीमुळे प्रजेचे फार हाल होत आणि काठेवाडातील मांडलिकांची व विशेषकरून जुनागडच्या नवाबाची मराठ्यांच्या मुलूखगिरीपेक्षा कमी विस्तृत, परंतु जास्त क्रूरपणाची अशी मुलुखगिरी असे. इंग्रज लोक मध्ये पडू लागेपर्यंतसुद्धा काठेवाड द्विपकल्पातील राजे साधेल तेव्हा अमदाबाद बडोद्याच्या आसपासपर्यंत मराठ्यांच्या मुलखावर उलट स्वाऱ्या करीत. ह्या गोष्टी दुःखदायक पद्धतीला जोडल्या म्हणजे ज्ञानाने नियमित न झालेली मनुष्यांतली क्रूर पशुबुद्धी किती नुकसान करू शकेल, याची अटकळ करिता येईल.

आम्ही म्हटलेच आहे, की मराठ्यांचे स्वराज्य वाढविण्याचे धोरण नव्हते; परंतु पैशांच्या मागण्या वाढविण्याची त्यांची सतत इच्छा होती. काठेवाडमधून मिळत असलेला वसूल निम्मा कमी झाला; कारण सन १७५२-५३ मध्ये दमाजीला सोरात, हल्लाड, गोहलवाड आणि काठेवाड ह्यांची वाटणी करावी लागली व ह्याचवेळी पेशव्याची ह्या प्रांतातील वाटणी अमदाबाद जिल्ह्यावर सोपवून दिली गेली. ही गोष्ट बाजूला ठेवली तरी एवढे खरे, की प्रथम गायकवाड, --दामाजी कां ध्याना-- मुलूखगिरीवर जाताना बरोबर नुसते दोन-चार हजार लुटारू सैन्य घेऊन तोफा किंवा छावणीचा लवाजमा न घेता असा जायचा. शिवबंदी पायदळ घेऊन व्यवस्थित रीतीने मोहीम करण्याचे स्वरूप मुलूखगिरीला मागाहून आले. द्वीपापासून मिळालेल्या वसुलाची संस्थानच्या उत्पन्नाला भरपूर मदत होते. अशी समज झाली आणि माजी आधिकाऱ्यांपेक्षा काहीतरी त्या संस्थानिकांपासून जास्त वसूल आपण काढू, असा प्रत्येक नवीन अधिकाऱ्याला अभिमान वाटत असे. अगदी अलीकडे नेहमीच्या खंडणीला खाराजती किंवा खेरियात म्हणजे फाजील बाबीची भर पडली. ही बाबाजीची शक्कल होती. असो नियमित खंडणीला ही जी नावे दिली ती अनर्थक होती; कारण मुसलमानांना तुर्कवेरा आणि जुनागडच्या नबाबाचा बाबीवेरा,

ह्याशिवाय ''नालबंदी'' अथवा घोड्यांना नाल मारण्याला लागणाऱ्या खर्चाबद्दलचा मोबदला आणि ''घासदाणा'' अथवा गवत आणि दाणा याबद्दलचा पैसा अशा आणखी बाबी होत्या. वास्तविक म्हटले, म्हणजे हा घासदाण्याचा कर ज्या ठिकाणी मुलूखगिरी वसूल करण्याचा गायकवाडचा हक्क असे त्या ठिकाणाकडे जाताना गायकवाडचे सैन्य वाटेवरील खेड्यांतील लोकांकडून त्या खेड्यांवर खरोखर सत्ता पेशव्यांची असूनही घेत; परंतु पेशवे ह्याकडे बळजबरीने लक्ष देत नसत. कारण त्याचे स्वतःचे सैन्य जेव्हा गायकवाडाच्या प्रांतातून जाई त्यावेळेस तेसुद्धा गायकवाडी खेड्यांकडून तसाच जुलमाने घासदाणा घेत. ह्या विलक्षण कराची उत्पत्ती बहुतेक अशी आहे पण पुढे हा कर नियमित करांपैकी पटी होवून बसला व ह्या रूपांतराचा गायकवाडलाच विशेष फायदा झाला; कारण त्यांचे ह्या प्रांतात सैन्य पुष्कळ असे आणि पेशव्यांचा वसूल त्यास पुष्कळदा जमा करावा लागे व त्यामुळे धन्यापेक्षा नोकराला घासदाण्याचा फायदा जास्त होत असे.

गायकवाडी नोकर शिवराम याने थकलेली बाकी व्यवस्थितपणे वसूल करण्यास प्रारंभ केला व त्याच्या चार-आठ वर्षांच्या अधिकारांत मुलूखगिरीचा क्रूरपणा वाढला; पण त्याच्यामागून आलेला बाबाजी याने त्याचेवर कडी केली. मुलूखगिरी कशी वाढविली याबद्दल थोडी उदाहरणे दिली म्हणजे पुरे होतील. संवत १८१५ ते संवत १८६० इतक्या अवधीत पूर्वीच्या छोट्या संस्थानापासून मुलूखगिरी पेशव्याला म्हणा अथवा गायकवाडला म्हणा पाचपट वाढली. ४६ वर्षांत जवळजवळ आठ लक्ष रुपये मिळाले व त्यापैकी जवळजवळ आठ लक्ष रुपये अखेरीच्या नऊ वर्षांत जमा झाले. संवत १८४१- ४२-४३ मध्ये मुलूखगिरी ७०,००० रुपये होती. शिवरामने ती ८०,००० केली व बाबाजीने ९८,००० रुपयांपर्यंत वाढवली. कोट्रा संस्थानातून मिळत असलेला वसूल फार थोडा होता; परंतु शिवरामने तो १७,००० रुपयांपर्यंत वाढविला. याप्रमाणे बाबाजीने पैसे घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे ते छोटे संस्थान अगदी खालावले. इतके की त्या संस्थानाच्या राजाला केलेल्या कराराप्रमाणे वागण्याचे सामर्थ्य न राहिल्यामुळे आपला मुलगा व पाच रजपूत ओलीस ठेवावे लागले. जुनागडचा नबाब प्रथम फक्त ३१,००० रुपये खंडणी देत असे; परंतु १७८५ मध्ये त्याचा बलाढ्य प्रधान उमराजीचा त्याने खून केल्यावर जेव्हा त्याचेवर घोरपड आली त्या वेळेस त्याला ५०,००० रुपये द्यावे लागले. पुढे जबरी करूनही ४०,००० ची रक्कम जेव्हा जमली नाही तेव्हा सहा वर्षांची सरासरी ७५,००० पासून ७६,००० रुपये बाबाजीने ठरविले. बांटवा संस्थान ह्याच पद्धतीमुळे अखेर रसातळाला जाऊन पोचले व त्याची वाट सदरहूप्रमाणेच केली. मेजर वॉकर मध्यस्थी पडला त्यावेळेस सर्व गोष्टींचा कळस झाला होता; पण त्याने पुढे केलेल्या जगप्रसिद्ध व अखेरच्या निकालापूर्वीच ज्या गोष्टी घडून आल्या त्याची सविस्तर हकिकत देणे आवश्यक आहे.

आबा शेलूकराबरोबर लढाई झाल्यानंतर सन १८०० मध्ये गोविंदराव गायकवाडयाने पेशव्यांच्या अमदाबाद जिल्हाचा इजारा घेतला आणि अशा रीतीने सगळ्या द्वीपाची मुलूखगिरी त्यास मिळाली. १८१५ मध्ये नवा इजारा केला नाही. त्या वेळेपर्यंत स्वतःच्या आणि पेशव्यांच्या मांडलिकांशी वाटतील त्या शर्ती करण्याची गायकवाडास मुभा होती; परंतु पेशव्याबरोबर ठराव

केल्यानंतर लवकरच गोविंदरावाचा मृत्यू झाला आणि नंतर मागे लिहिल्याप्रमाणे दंगे सुरू झाले. याचा एक परिणाम असा झाला, की काही दिवस मुलूखगिरीची मोहीम बंद पडली, तथापि जेव्हा ब्रिटिशांनी आनंदरावाला गादीवर पक्के बसविले आणि रावजी आप्पाजीची कारकीर्द चालू ठेवण्याचे आंगावर घेतले, तेव्हा संस्थानाला द्वीपात पुन्हा वसूल गोळा करण्याचा जोर आलासा वाटले, तथापि मुलूखगिरीसंबंधाने राज्याचे व रेसिडेंट मेजर वॉकर यांचे विचार एक नव्हते. दिवाळे वाजलेल्या संस्थानात खंडणीच्या थकलेल्या वास्तविक रकमांची भर पडावी अशी वॉकरची इच्छा खरी, आणि तेवढ्याकरीता खंडणीच्या वसुलीकरीता गुंतलेले गायकवाडचे मोठे साम्राज्य ठेवणे त्यास बरोबर वाटले, नाहीतर तहनाम्याप्रमाणे अनेकांस त्याने रजा दिली असती व द्यावयास भाग पाडले असते; परंतु मुलूखगिरी कायमची पद्धत करण्याची त्याची इच्छा नव्हती. उलट थोडासा तोफखाना, युरोपियन फौजेची एक तुकडी आणि नेटिव पायदळांची दोन सैन्ये ठेवून मागील बाकी वसूल करण्याचे कामी गायकवाडास मदत करावी व काठेवाडच्या राजापासून गायकवाडांनी जी खंडणी द्यावयाची तिचेबद्दल खंडणी देणाऱ्यास जड नाही व घेणारांचे नुकसान नाही असा कायमचा बंदोबस्त करावा, असा की तो दोघांपेक्षा नियंत्रक होऊन लष्करी स्वाऱ्या, लुटालूट आणि नासाडी या गोष्टींची जरूर राहू नये, अशी त्यांची फार इच्छा होती. त्यात थोडी स्वाभाविक स्वार्थबुद्धीही होती. ती अशी, की भावनगर, जुनागड, नवानगर, गायकवाड आणि पेशवे यांचेपासून होणाऱ्या जुलमापासून रक्षण करण्याची काठेवाडच्या ज्या राजांनी ब्रिटिशांजवळ मागणी केली होती, अशास आपले छत्राखाली घेऊन ब्रिटिशांचे वजन कच्छपर्यंत वाढावे या उद्देशाने आपल्या मध्यस्थीप्रमाणे चालण्यास निरनिराळे राजे कितपत खूष आहेत हे पाहण्याकरिता त्यांनी मौलवी महंमदअली यास १८०३च्या जुलै महिन्यात काठेवाडात पाठविले; परंतु याच सुमारास मध्य हिंदुस्थानात लढाई सुरू झाल्यामुळे सर्व काम १८०७च्या मे महिन्यात तहकूब राहिले.

दरम्यान, दिवाणाचा भाऊ बाबाजी याने गायकवाड सरकारतर्फे चालू आणि मागील खंडणी गोळा करण्याचे काम मोठ्या जोराने चालविले होते. आरंभी त्यास पुष्कळ अडचणी आल्या; कारण आपले जुने स्नेही कडीचे जहागीरदार मल्हारराव गायकवाड यांनी आपला देश चालविल्यावर त्यांस चांगली नेमणूक देऊन नाडियादमध्ये ठेविले होते; परंतु ता. ४ डिसेंबर १८०२ रोजी पहारेवाल्यांचा डोळा चुकवून तो कच्छ-भूजला पळाला आणि तेथून त्या द्वीपातील राजांना गायकवाडाविरुद्ध उठविण्याची त्यांनी गुप्त रीतीने खटपट चालविली. काही दिवसांपर्यंत मोरवी, ध्रांगध्रा, जुनागड आणि पातळी येथील राजे आपल्या पक्षाचे करून घेण्याचीच त्याने खटपट केली. त्याचा आप्त मुकुंदराव याने अमरेळी घालविल्यानंतर दामनगर येथे आपली स्वतःची बळकटी केली; परंतु जून महिन्यामध्ये मल्हारराव कच्छ सोडून द्वीपात आले. ५००० सैन्य जुळवून जुनागडच्या नबाबाची मदत मिळविली आणि धारीच्या बाजूने येऊन अमरेळी घेण्याचा प्रयत्न केला; पण तो फत्ते झाला नाही.

नंतर बाबाजीचा वख्त आला. सन १८०३च्या सप्टेंबरपर्यंत वांकानेर, राजकोट, गोंडळ, कोटलात, नवानगर, ठाण, मरव्ही, मालिआ, वढवाण आणि दुसऱ्या काही संस्थानांचे राजे व त्याचप्रमाणे काठी, बुमिया यांशी जुळवून त्यांस आपलेतर्फेचे करून घेतले होते. तारीख ११ ऑक्टोबररोजी विठोबा पिलाजी (दिवाणजी) याने धारीच्या किल्यास वेढा दिला. मल्हारराव तेथून निसटला; परंतु विठोबाने त्यास गाठून ब्राबीवाडमधील साबरकंडाळा येथे त्याचा पराभव केला. शेवटी पालिटाण्याचे डोंगराळ प्रदेशात काही जुळवाजुळव करून भावनगरचा राजा वखतसिंग याच्या मदतीने निसटून जाण्याची एकवार खटपट केली; पण त्या राजाने मदत केली नाही व तो पकडला गेला. नंतर या दुर्भागी मनुष्यास त्याने गायकवाड संस्थानास याचे पुढे त्रास देऊ नये म्हणून मुंबईस पाठविण्यात आले आणि तेथे त्याला राजकैदेत ठेविले, याउपर गायकवाड संस्थानास त्याचेपासून त्रास बंद झाला.

बाबाजीला अजून जुनागड, जौतपूर आणि भावनगर या तीन बलिष्ठ संस्थानांचा समाचार घ्यावयाचा होता. याच ऑक्टोबर महिन्यामध्ये भावनगरवाल्याने तीन सालांची खंडणी एकदम देऊन मागील सगळया बाकीचा निकाल केला; कारण सर्व रक्कम लढाई आणि त्रासाशिवाय मिळवायचा संभव नसल्यामुळे त्याच्यापैकी थोडा भाग घेऊन मांडूनवाळण्यास रेसिडेंटाने बाबाजीस वळविले होते. जुनागडच्या नबाबाच्या वरटोळी किल्यास वेढा घातला असताना सन १८०३च्या डिसेंबर महिन्यात बाबाजीला प्रथम अटकाव झाला. या नबाबापासून अडीच लाख रुपये द्यावयाचे होते. हा काठेवाडातील राजास एक करून कनोजीस त्यांचा नायक करण्याची खटपट करीत होता. पुन्हा याचवेळी मरव्ही, वांकानेर आणि जोरिआ बंदर यांनी मध्यस्थी करण्यास मेजर वॉकर यांस विनंती केली. बाबाजीही ब्रिटिश सरकारची मदत मागेल अशी वॉकर साहेबाची आशा होती; परंतु सन १८०४च्या मार्च महिन्यापर्यंत या अधिकाऱ्याचे आणि नबाब साहेबांचे ठराव झाले आणि मग बाबाजी पोरबंदरच्या राजाशी ठराव करण्याचे कामाकडे लागला. यास नवानगरच्या निजामाची मदत मिळाल्यामुळे त्याने पैसे देण्याचे नाकारले होते. याने बाबाजीच्या अटी एकदा कबूल केल्या; पण पुन्हा उलटला. कसेही असो बाबाजीच्या पहिल्या मुलूखगिरीचा जसा आरंभ झाला होता तसाच शेवटही झाला. सन १८०५च्या एप्रिल महिन्यात जी त्याने मुलूखगिरीची दुसरी मोहीम हाती घेतली, तिच्यामध्येही काही व्यत्यय आला नाही. या मोहिमेतील ठळक गोष्ट म्हणजे वढवाणचा वेढा होय. तिसरी मुलूखगिरी बाबाजीने केली नाही. त्याचे हाताखालील विठ्ठलराव दिवाणजी याने केली, हाच पुढे काठेवाडच्या सरसुभा झाला. या मोहिमेत फार पैसे मिळाले; परंतु तिन्हीपेक्षा या मोहिमेत फार जुलूम झाला.[१]

बाबाजीला ब्रिटिश सैन्याची जरी फारशी मदत मिळाली नाही तरी ब्रिटिशांच्या स्नेहाचा जो काही अंतस्थ त्यास आधार होता त्यामुळे गायकवाडी आधिकाऱ्यांना जय मिळाले, असा मुंबई सरकारचा समज होता व तो यथार्थ होता. याचेशिवाय द्वीपकल्पातील राजे-रजवाड्यांनी ब्रिटिश सरकारचा आश्रय आणि मध्यस्थी मागितली होती, तेव्हा बडोदे संस्थानाच्या उत्पन्नाशी ज्या

१. बाबाजीच्या मुलूखगिरीच्या तिन्ही स्वाऱ्या मिळून मागील बाकी सकट ५१ लाख रुपये जमा झाले.

बाबींचा कायमचा संबंध असेल त्यासंबंधी संस्थानच्या करण्यात नियमन करण्याचा आपला अधिकार आहे, असे ब्रिटिश सरकार समजत होते. म्हणून सन १८०७ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये कर्नल वॉकर आणि बाबाजी यांच्या अधिपत्याखाली ब्रिटिश आणि गायकवाडी सैन्यांनी काठेवाडात प्रवेश केला, तेव्हा गायकवाडाच्या मुलूखगिरी हक्कांच्या कायमच्या व्यवस्थेच्या शर्तीचा ऊहापोह करण्याकरिता मोरवी तालुक्यात गुतू मुक्कामी आपल्यास आणि बाबाजीस भेटण्याकरिता द्वीपकल्पातील मुख्य मुख्य राजांना बोलवावे अशी कर्नल वॉकर यास आतून सांगी होती. ता.१५. माहे मे सन १८०८च्या सुमारास व्यवस्था लागली. कर्नल वॉकरचे हे काम कठीण होते; कारण गायकवाडास घालवून देण्याचा ब्रिटिश सरकारचा हेतू असावा, शिवाय आपला जोर व्यवस्थेला मिळाल्यास आपणास सवलती मिळतील असे भूतिका (जमीनदार) लोकांना वाटत होते आणि काठेवाडच्या खालावलेल्या स्थितीच्या मानाने गायकवाड सरकारच्या मागण्या तर जबर होत्या. या कायम व्यवस्थेने गायकवाड सरकारास ९,७९,८८२ रुपये येण्याचे ठरले. ही रक्कम शिवरामने १७९८ मध्ये गोळा केलेल्या रकमेपेक्षा थोडी जास्त आणि बाबाजीच्या पहिल्या मुलूखगिरीपेक्षा थोडीशी कमी होती.[1] शेवटी कर्नल वॉकरने केलेली ही व्यवस्था फिरवावी लागली; कारण खंडणीची नियमित पोच करणे संस्थानिकांच्या शक्तीबाहेर होते; परंतु काठेवाडातील पुढे झालेल्या व्यवस्थांना ही पायाभूत झाली. तीजपासून जो मोठा चांगला परिणाम झाला तो हा की तो देश हळूहळू सर्वत्र शांतता आणि व्यवस्था भोगू लागला. स्वाऱ्या बंद झाल्या व शहरे जाळणे, लुटणे बंद झाले. जुलूम नाहीसा झाल्यामुळे उलट दंगेही उत्पन्न झाले नाहीत. हळूहळू कर्नल वॉकर यांची आशा होती त्याचेपेक्षा फारच अवकाश हे खरे – आडेजा आणि जेटवा रजपूत लोकांमध्ये असलेला कन्या वधाचा प्रघात बंद झाला. समुद्रकाठच्या लहान-लहान संस्थानांतून चांचेपणाचा व नासधूस करण्याचा धंदाही बंद झाला.

इतर लहान-लहान संस्थानांमध्ये आणि कोठेवाडच्या निरनिराळ्या आडदांड जातींमध्ये जी शांतता करण्यात आली ती रक्तपाताशिवाय व खर्चाशिवाय झाली नाही हे सहज ध्यानात येईल. जेथे सतत अस्वास्थ्य तेथे चिरकाल शांतता आली हे जे स्थित्यंतर झाले, ते होताना अनेक दंगे-धोपे झाले; परंतु ब्रिटिशांनी जे काम आपले अंगावर घेतले होते ते तडीस नेण्यास त्यांनी कोणतेही प्रयत्न कमी केले नाहीत हे कबूल करणे जरूर आहे. कर्नल वॉकर याने केलेली व्यवस्था अफल रीतीने अमलात आली. याचे मुख्य कारण असे, की पोरबंदरचा कंडोरना हा बळकट किल्ला त्याने नेटाने घेतला. सन १८०८ मध्ये कच्छच्या बलाढ्य फत्तेमहंमदाने मोरवीच्या राजाच्या मदतीने नवानगरवर स्वारी करण्याचा विचार चालविला; परंतु ब्रिटिश सरकारच्या कानउघाडणीमुळे त्यास तो तहकूब करावा लागला. सालमजकुरी आणि पुढील साली अमरेळीमधील काही लोकांनी बाबापुऱ्याची आणि कोडिनारच्या कसब्याची नासाडी उडविली. त्यास खांदाघर

१. ह्या रकमेत अमदाबादच्या मक्त्यापैकी पेशव्याचाही भाग आला. सन १८४२मध्ये गायकवाडची वाटणी ३,७६,१२१ रु. होती; परंतु भावनगरची खंडणी ब्रिटिशांना तैनाती सैन्याच्या पगाराऐवजी देण्यात आली होती.

नावाच्या बळकट ठिकाणच्या राजाची मदत होती. याचवेळी उखामंडळातील चांचे संस्थानिकांनी फार त्रास दिला आणि विशेषतः पोसिट्रा येथील एका लहान किल्ल्यासाठी फार त्रास दिला. याचा दोनदा म्हणजे सन १८०९ आणि सन १८११ मध्ये विध्वंस केला. मालिआ शहर आणि किल्ला काबीज केला तो फार शर्थेने. तो घेताना ब्रिटिश सैन्याचा पुष्कळ नाश झाला. सन १८१२मध्ये नवानगरचे जामचे राजधानीभोवती लष्करी लोकांचे प्रदर्शन करून त्या राजास ताळ्यावर आणावे लागले.

काठवाडच्या इतिहासात सन १८१३ हे साल फार वाईट होते. दुष्काळाने सर्व प्रदेश उजाड करून टाकला आणि नंतर रोगराई सुरू झाली. या झपाट्यात तेथील लोकसंख्येपैकी एक चतुर्थांश लोक बळी पडले असा समज आहे. बाबाजीच्या मुलूखगिरीने ते (काठेवाड) संस्थान बरेच दरिद्री झाले होते. मेजर वॉकर यांनी जी व्यवस्था केली, तीजमुळे खंडणीची जबर रक्कम कायम झाली. गायकवाडी अधिकाऱ्यांनी दपटादपटीची पद्धत सुरू केली. विठ्ठलराव दिवाणजी यास सन १८११मध्ये सरसुभे करण्यात आले; पण खंडणीच्या कायमधाऱ्याच्या व्यवस्थेपासून तो तेच काम करीत असे. असे म्हणतात, की प्रत्येक राजाच्या दिवाणाचे कचेरीत त्याने आपले लोक घुसवले होते आणि त्यांच्या मदतीने तो संस्थानिकांना पिळीत असे. या सर्वांचा परिणाम असा झाला, की सन १८१३नंतर काही वर्षांनी "फार भरभराटीच्या स्थितीतून काठेवाड फार दारिद्र्यावस्थेप्रत पावले" असा शेरा मारावा लागला.

या शोचनीय स्थितीचे – अशी स्थिती येईल अशी कर्नल वॉकर यास मुळीच कल्पना नव्हती- एक कारण असे होते, की तो प्रदेश एका राज्याच्या अमलाखाली राहिला नव्हता. काठेवाडात राजे आणि गायकवाड यांचेमध्ये कायमधारा करताना त्या द्वीपकल्पाचे बऱ्याच भागावर मुलूखगिरीचा हक्क गायकवाड स्वतःचा म्हणून नव्हे तर पेशव्याच्या जमाबंदीचा मक्तेदार या नात्याने चालवीत असे. ही गोष्ट मुंबई सरकाराच्या ध्यानातून चुकली होती. ह्या ठरावाने आपले हक्क बुडले म्हणून बाजीराव रागावला आणि अहमदाबादच्या मक्त्याचा कौलनामा जेव्हा संपला त्यावेळी आपले स्वतःचे कामदार त्यांनी तेथे नेमले. या लोकांनी तेथे लवकरच नुकसान केली. या लोकांचे कारस्थानामुळे जुरिआ आणि अमराणच्या राजांनी नवानगरचे राजाविरुद्ध सन १८१४मध्ये बंड केले. दुसरे वर्षी कर्नल ईस्ट याने ते मोडले. त्याचवेळी उखामंडळचे वाघेर लोक रण उतरून आले. कुमारिआच्या ठाकुराच्या मदतीने त्यांनी पुष्कळ नासाडी केली, नंतर गोविंदराव मामाने त्यास हाकून लाविले, त्यात त्याच्या मदतगार ठाकुराचा प्राण आणि किल्ला गेला.

सन १८१४पासून १८१६पर्यंत पेशवे कामदारांच्या हात घालण्याने सर्व गोष्टींचा घोटाळा झाला. गायकवाडी राज्याचा अंत झाला आणि स्थाईक ठराव आता निरुपयोगी झाला अशाही गप्पा त्यांनी राजेलोकांमध्ये पसरविल्या. त्याने तर घोटाळा फारच माजला. शिवाय अहमदाबादच्या मक्त्याची मुदत जेव्हा संपली तेव्हा गायकवाडांनी आपले अर्धे सैन्य साहजिकच परत बोलाविले. हे लष्करी लोक पोलिसांचे काम करीत असत आणि कठीण प्रसंगाकरिता ब्रिटिश सैन्याची एक तुकडी ठेविली होती. देशाच्या संरक्षणाकरिता पेशवा काहीच व्यवस्था करीना. अशा तऱ्हेची कोणतीही बळकटी नसता, आणि पेशव्याचे कामदार काढून टाकण्याकरिता मुंबई सरकाराने

सन १८१६मध्ये कोणताही खर्च न घेता ठरावाप्रमाणे पेशव्याची खंडणी गोळा करून देण्याचे कबूल केले; आणि गायकवाडापेक्षा यांची जमाबंदी सुमारे तीन हजार रुपयांनी जास्त भरली. ती ५,६२,९५९ रुपये झाली होती. यानंतर थोडकेच दिवसांनी मुंबई सरकारची अडचण एकाएकी नाहीशी झाली. पुण्यास झालेल्या व्यवस्थेप्रमाणे आणि पुरता बिघाड होऊ नये म्हणून बाजीरावाने ब्रिटिश सैन्य आपले तैनातीत ठेवण्याचे कबूल केले आणि या सैन्याच्या पगारापैकी काही भागाबद्दल काठेवाडातील आपले हक्क नामदार कंपनीला सोपवून दिले. गायकवाडांनी जी जास्त इंग्रजी फौज तैनातीस ठेविली होती तिच्या पगारापैकी काही भागाबद्दल आपल्या मुलूखगिरीच्या खंडणीचा काही भाग देण्याबद्दल मुंबई सरकारानी फत्तेसिंगास फार आग्रह केला. त्याने ही मागणी फार खंबीरपणाने नाकारिली; परंतु त्याचा भाऊ सयाजीराव जेव्हा गादीवर बसला तेव्हा काठेवाडची सर्व व्यवस्था ब्रिटिश सरकारावर टाकण्याविषयी मि. एलफिन्स्टन याने त्याचे मन वळविले. म्हणजे मेजर वॉकर यांच्या (दुरुस्त केलेल्या) व्यवस्थेप्रमाणे राजे लोकांच्या खंडणीचे उत्पन्न वेळेवर देण्याच्या शर्तीवर गायकवाडांनी जेथे त्यांची पूर्ण राजसत्ता असेल त्याठिकाणाशिवाय सर्व काठेवाडामध्ये हात घालण्याचे आपले सर्व हक्क इंग्रजास देऊन टाकिले. याप्रमाणे सरसुभे विठ्ठलराव दिवाणजी यांच्या गुप्त खटपटीमुळे गायकवाडांची काठेवाडामध्ये मुलूख वाढविण्याची सत्ता नाहीशी झाली. त्याचा राजाधिकार काहीसा गेला; परंतु काही खर्चाशिवाय व मोहिमेच्या जरुरीशिवाय जास्त वसुलाची खात्री झाली.

माळव्याच्या लढाईत जे गायकवाडांचे सैन्य होते, त्यापैकी थोडी फौज काठेवाडात होती. ता. २१, माहे एप्रिल सन १८०५च्या तहनाम्यातील चौथ्या कलमान्वये "तैनाती सैन्यापैकी एक तुकडी किंवा कामाकरिता जेवढे सैन्य लागेल तितके खरोखर जरूर असेल तेव्हा काठेवाडात जावे असे झाले होते." जरुरी किती आहे हे ठरविण्याचे काम मात्र मुंबई सरकाराचे होते. म्हणजे त्या देशामध्ये व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी ब्रिटिशांनी आपलेवरच घेतली होती.

काठेवाडातील गायकवाडाच्या उत्पन्नाची यादी ८व्या परिशिष्टात दिली आहे.

●●●

प्रकरण १४ वे

सीताराम कसा पडला – फत्तेसिंग कसा मुखत्यार (रिजेंट) झाला आणि संस्थानाची बहुतेक ऋणमुक्तता कशी झाली?

इ.स. १८०४

अहमदाबादचा वसुलाचा इजारा वर्षास साडेचार लाखाला दहा वर्षांच्या करारावर नावाला भगवंतराव गायकवाडाला ता. २ ऑक्टोबर सन १८०४मध्ये पुन्हा देण्यात आला. पेशव्याने आपली अनुमती फार नाखुषीने दिली; कारण इंग्रजांबद्दल त्याचा मात्सरभाव त्याच्या इंग्रजाच्या सत्तेच्या भयापेक्षा अधिक प्रबल होता.

ता. २१ एप्रिल १८०५ रोजी हा पुरवणी तह कायम झाला. या तहात इ. स. १८०२ साली झालेल्या तहाचा समावेश झाला असून तो वसईच्या तहाच्या अनुरोधानेच होता.

यावेळी गायकवाड सरकारास ४१,५८,७३२ रुपये नामदार कंपनीचे देणे होते आणि त्या रकमेची फेड होईपर्यंत काही प्रांतांच्या रसदी कबूल करून दिल्या होत्या. मदतगार पगारी सैन्यामध्ये ३,००० पायदळ व काही गोरे गोलंदाज ठेवण्यात आले. ब्रिटिश सरकारच्या मताप्रमाणे ज्यावेळी जरूर लागेल तेव्हा काठेवाडात आणखी जास्त सैन्य ठेवण्याचे ठरले. या सैन्याच्या खर्चाकरिता चौऱ्याऐंशी, चिकली, सुरत, चौथाई आणि खेडा याचेशिवाय ११,७०,००० रुपये उत्पन्नाचे प्रांत कंपनीस लावून द्यावयाचे होते. यात ४।। लक्ष रुपयांचा घोळका, १।।। लक्ष रुपयांचा नडियाद, विजापूर आणि मीर प्रत्येकी एक लक्ष तीस हजार रुपये, एक लक्ष दहा हजार रुपयांचा मोंडे हे होते. याखेरीच कडी टप्पा पंचवीस हजार रुपये आणि खीम, कथोडोर पन्नास हजार रुपये, हेही प्रांत देण्यात आले. बाकी एक लक्ष रुपयांच्या फेडीकरिता थोड्या मुदतीस्तव काठेवाड खंडणीवर देण्यात आले. नंतर या रकमेच्या फेडीकरिता प्रांत खंडणीऐवजी रोकड रुपये स्वीकारण्याविषयी गायकवाड सरकाराने कंपनी सरकारची पुष्कळ विनंती केली; पण त्यापासून काहीच निष्पन्न झाले नाही. गायकवाड सरकारचे असे म्हणणे होते, की या प्रांतापैकी पुष्कळ प्रांत व विशेषतः घोळका याची मागील तीन वर्षांच्या सरासरी वसुलावरून जी आकारणी करण्यात आली आहे त्यापेक्षा त्याचे उत्पन्न फारच अधिक आहे; परंतु यावर दुमाला

आणि इनामी खेडी बाद करिता जे काय उत्पन्न होते त्याने ठरीव रक्कम जेमतेमच कशीबशीतरी मरून येते, असे मुंबई सरकाराने रडगाणे गाईले. म्हणून जुलै १८०८मध्ये वरील प्रांताखेरीज आणखी १,७६,१६८ रुपयांच्या वसुलाचे प्रांत लावून द्यावे लागले. भावनगरचा घासदाणा ७४,५०० रुपये, नडियादेतील वरात ५०,००० रुपये, सोखरा, साद्रा, माक्टेज १,४५० रुपये व हैदराबाद १,००० रुपये याप्रमाणे आकारणी होती. घोळका प्रांतातील १५,८०८ रुपयांची, मोघेरांतील ९०० रुपयांची, मातरांतील ९,२५० रुपयांची, विजापुरातील ६,७०२ रुपयांची, आणि रानगर घाटातील ३,७५० रुपयांची काही दुमाला (तोडून दिलेली) खेडी पुन्हा परत घेण्यात आली. त्याखेरीज सेटवा मातरमधील ९५० रुपये किमतीची सुभानजी पोळची जमीन आणि मोघेप्यातील त्याची ११,८६० रुपये किमतीची खेडीही पुनः घेण्यात आली. पेशव्यांचा पराभव होण्याच्या थोड्या वेळेपूर्वी प्रांताच्या ज्या काही अदलाबदल्या झाल्या त्यांचा पुढे उल्लेख करण्याचे अजून बाकीच आहे.[१]

इ. स. १८०६

तेराव्या प्रकरणात सांगितलेच आहे, की रेसिडेंटाने सैन्याची सुधारणा करण्याचे मागेच ठरले होते; पण काठेवाडातील मुलूखगिरीची संपण्याची व सैन्याचा पगार, संस्थानचे कर्ज देण्यासाठी

---

१. या शतकाच्या पहिल्या वीस वर्षांत गायकवाड सरकारास किती नफा-नुकसान झाले याचा खरा आढावा काढणे फार कठीण आहे. परकीय सैन्यास पगाराने ठेविले होते आणि लष्करी खर्च जितका लवकर कमी करावयास पाहिजे होता तितका लवकर कमी न झाल्याचा दोष मुंबई सरकारावर येत नाही. दुसऱ्या लहान संस्थानाप्रमाणेच काठेवाडचा वसूलही एकदाच कायमचा ठरविण्यात आला होता; आणि म्हणून त्यात पुष्कळ दिवसपर्यंत अधिक वाढ करिता येईना. परंतु उलटपक्षी त्यांचा वसूल अगदी नियमितपणे वसूल होत असे. गायकवाडाने माळवा युद्धात जी मदत दिली ती जरी खर्चाची होती तरी निष्फळ होती. तिजबद्दल त्यास प्रांताची प्राप्ती काहीच झाली नाही; परंतु जेव्हा पेशव्यांच्या हातातून गुजरातचा काही भाग गेला तेव्हा याची सर्व खंडणीपासून सुटका झाली आणि पेशवे व गायकवाड यांमध्ये जे काय पुष्कळ दिवसांचे देणे घेणे होते त्याचाही निकाल झाला. पेशव्यांस सत्ता जर असती तर जुन्या प्रतिस्पर्धी गायकवाडास चिरडून टाकण्यास त्यांनी कमी केले नसते. इंग्रज सरकारच्या मदतीने काठेवाडातून मोठ्या बाकी राहिलेल्या रकमा वसूल करण्यास त्यास सामर्थ्य आले आणि कर्जाऊ रकमा देण्यात व खर्चाची योग्य व्यवस्था करण्यात जी वेळेवर सतत इंग्रज सरकाराने मदत केली त्यामुळे भयंकर पैशांच्या अडचणीतून संस्थानचा बचाव झाला. बडोद्याच्या एका रेसिडेंटाने इ. स. १८०१-१८२० मधील गायकवाडाच्या प्रांतिक उत्पन्नाचा खालीलप्रमाणे अंदाज केला आहे- कडी साडेपाच लक्ष रुपये, कपडवंज ५२,००० रुपये, देहगाव १,८७,००० रुपये; संखेडा एक लक्ष रुपये; कोडिनार ८०,००० रुपये; आणि काही वेळपर्यंत नवानगर व सूर्य बंदर यांची खंडणी एक लक्ष रुपये; बेट आणि ओखामंडळ २५,००० रुपये. खंडणीची जी वाढ झाली तिचा अंदाज खाली दिल्याप्रमाणे आहे. काठेवाड १, ७७, ००० रुपये, धारी २३,००० रुपये, पालनपूर २५,००० रुपये, खंबायतचा अनियमित येणारा घासदाणा ५,००० रुपये. जरी यापुढे शांतता होती असे नाही तरी बडोदा संस्थानास इंग्रज सरकारच्या दोस्तीपासून एकंदरीत पुष्कळ फायदा झाला यात शंका नाही.

थकलेल्या मोठ्या रकमा कशा गोळा होतात हे समजण्याची तो वाट पाहत होता. सैन्य सुधारण्याचे कामी आणि खरोखर सर्व खर्चाच्या सुधारणांत दिवाण सीताराम त्याचेआड येतो असे त्यास आढळून आले. या दिवाणाच्या कृतीने रेसिडेंट व मुंबई सरकार इतके नाखूष झाले की त्यांनी त्याच्या मोठ्या अधिकारापासून त्यास पराङ्गमुख करण्याचा निश्चय केला. हा हेतु साधण्यासाठी त्यांनी प्रथम महाराजांच्यातर्फे जे कमिशन राज्यकारभार चालवित होते त्यात महाराजांचा धाकटा बंधू फत्तेसिंग याची भर घालावयाची व त्यास प्रतिनिधी किंवा मुतालिक ह्या नावाने जाहीर करावयाचे असे त्यांनी ठरवले. म्हणजे उघडच मुतालिक ही जागा खालच्या दर्जाची झाली व तिच्याबरोबर रेसिडेंटापेक्षा जास्त सत्ता राहिली नाही. याप्रमाणे ता. ३ एप्रिल १८०६ रोजी खंडोबा देवापासून तुलादान समारंभ करून त्यास विकत घेण्यात आले. त्याचे चांदी व सोन्याच्या नाण्यांनी वजन केले ते साडेचार हजार रुपये व शंभर मोहरा झाले. ते ब्राह्मणांस वाटून टाकले. नव्या कमिशनाचे देखरेखीखाली पहिला दरबार ता. ३ फेब्रुवारी सन १८०७चे सुमारास भरला आणि फत्तेसिंग त्यास मे महिन्यात जाऊन मिळाला.

दुसरी त्यांनी अशी युक्ती केली, की काठेवाडातून बाबाजीस परत बोलावून त्याचा पुतण्या सीताराम याचे अधिकार हळूहळू काढून ते त्यास द्यावे. त्याप्रमाणे त्याची खासगीवाल्याच्या जागी नेमणूक केली व त्याचा स्वतःचा व त्याच्या कचेरीचा मिळून १,२२,९०१ रुपये पगार ठरवून टाकला.

इ.स. १८०७चे आरंभी सैन्याच्या सुधारणेस अंशतः आरंभ झाला. मुंबईचे गव्हर्नर मि. जोनाथन डंकन यांनी असा अजमास केला की इंग्रज येण्यापूर्वी संस्थानास सैन्याप्रीत्यर्थ साठ लक्ष रुपये खर्च लागत असे. आपल्या कारकिर्दीत ती रक्कम परकी पगारी सैन्य ठेववून आपण बारा लक्षांवर आणून ठेवू, अशी त्यांची आशा होती. कर्नल वॉकरने बडोद्याच्या अरबांची मागील बाकी चुकवून त्यांस काढून दिले; परंतु मध्येच माळव्यांतील युद्ध व बाबाजींची मोठी मुलूखगिरी निघाली आणि सगळी बाकी देणे अशक्य असल्यामुळे त्याने आपल्या सुधारणा तितक्याच तहकूब ठेवल्या होत्या. ह्या विलक्षण वाक्यांचे स्पष्टीकरण करणे अति कंटाळवाणे आहे. इ.स. १८०४-१८०५मध्ये साडेअडतीस लक्षांवर जे देणे होते ते इ.स. १८०७मध्ये साडेत्र्याहत्तर लक्षांजवळ झाले. कारण रुपयाचे बाराआणेप्रमाणे बाक्या देऊन टाकल्या आणि पुष्कळ मागण्या इतक्या खोट्या होत्या की रेसिडेंटाने सर्व मागण्यांचा निकाल तीस लक्ष रुपयांत लावावयाचा असे ठरविले. इतके म्हटले असता पुरे होईल, की इ.स. १८०७मध्ये इंग्रज सरकारच्या जामीनगिरीने कर्ज काढून सर्व बाक्यांची फेड केली. बाबाजीच्या मुलूखगिरी सैन्याप्रीत्यर्थच ही वेळपर्यंत संस्थानास मोठमोठ्या रकमा खर्च कराव्या लागल्या. इतके असूनही हे सैन्य खऱ्या युद्धप्रसंगी चांगले उपयोगी पडेल असेही नव्हते. या सैन्यात ८ तोफा, एक हजारावर अरब व हिंदुस्थानी, ७,२०० पायदळ आणि ५,२४० घोडेस्वार वगैरे लोक होते. याबद्दल १८०३ व १८०४मध्ये दरसाल सत्तावीस लक्ष रुपये खर्च झाला व इ. स. १८०६मध्ये त्याहीपेक्षा अधिक झाला. खरोखर बडोद्याचे अरबलोक कमी केल्यानंतरही दरसाल सैन्याचा खर्च सुमारे त्रेचाळीस लक्ष रुपये होत होता; परंतु इ.स. १८०७-०८च्या सुधारणेने हा खर्च चोवीस लक्षांवर थोडासा

अधिक किंवा काही आकड्यांप्रमाणे तेवीस लक्षांपैकी कमी या मानावर येऊन ठेपला. ही काटकसर पुष्कळच झाली यात शंका नाही; परंतु अजूनही पुष्कळ काटकसर करणे जरूर होते. सैन्यास वर्षातून दोनदा नियमितपणे पगार द्यावयाचा व ज्या मुख्य अधिकाऱ्यांस साडेपास लक्ष रुपये किमतीच्या जमिनीच्या नेमणुका करून दिल्या होत्या त्याही त्यांजपासून हळूहळू परत घ्यावयाच्या असे आता ठरले.

दिवाण सीतारामाने या सुधारणेच्या हितावह उपायांत जितके अडथळे आणावयाचे होते तितके आणण्यात काही कमी केले नाही. त्याच्या अशा आचरणामुळे त्याच्यात अन् बाबाजीत पुष्कळ फरक आहे, असे दिसून आले. बाबाजीच्या इ.स. १८०७ सालच्या कारकिर्दीत मागील तीस लक्ष रुपयांची अफरातफर उघडकीस आली. हाफीज गुलाम हसनबरोबर एक विश्वासघातकी पत्रव्यवहार चाललेला उघडकीस आला तेव्हा सीतारामाचे दिवस भरले असे ठरले.

इ.स. १८०८मध्ये कर्नल वॉकरने यापुढे संस्थानातील निरनिराळे किल्ले मामलेदारांचे ताब्यात न ठेवता किल्लेदारांच्या ताब्यात द्यावे असे ठरविले म्हणून त्याने बाबाजीला विसनगर व विरा यांचा आणि सीतारामास संखेडा, पाटण, अहमदाबाद आणि इतर स्थळे यांचा ताबा सोडण्यास सांगितले. बाबाजीने आज्ञा मान्य केली; परंतु सीताराम यास त्याच्या मूर्ख मित्रांकडून व सखाराम आणि काकाजी या आप्तांकडून आणि त्याच्या बंडखोर शिबंदी सैन्याकडून उत्तेजन मिळाल्यामुळे आपणास थकलेल्या बाकीचे सोळा लक्ष रुपये मिळाल्याखेरीज किल्ले सोडण्याचे नाकारले. अशा समयास सैन्याची आवश्यकता आहे, असे दिसून आल्यावरून मुंबईहून नवीन सैन्य मागविण्यात आले होते; परंतु अखेरीस शिबंदी लोकांस आठ लक्ष रुपये व सीतारामास तीन लक्ष रुपये मुंबई सरकारमार्फत देऊन प्रकरण मिटविण्यात आले.

त्याला संस्थानचे जे देणे होते ते त्याने देण्याचे नाकारले. तो असे म्हणे, की "मी जे स्वाहा केले आहे ते बाहेर देणे अशक्य आहे." तथापि, किल्ले स्वाधीन झाले आणि मार्च १८०९मध्ये दिवाणाच्या तीन पागाही त्याजपासून घेण्यात आल्या व त्याला महिकांठ्यास जावयास सांगितले; पण त्याने नाकारले. तेव्हा आणि बडोद्यातील त्याच्या बारगिरांपैकी जे पाचशे बारगीर चाकरीतून कमी करण्यात आले होते, ते बंड करतील असे धोरण होते, त्यांना हा सामील होऊ नये म्हणून त्यास अटकेत ठेविले. त्याचा दीड लक्ष रुपये पगारही बंद केला व त्याच्या आप्तांस दूर प्रांती पाठवून देण्यात आले. राणी गहिनाबाईची पुतणी मैनाबाई हिचे भ्रतार आनंदराव मरण पावल्यामुळे ही निराश्रित होऊन यशवंतराव पवाराची अनौरस संतती मुरारराव यास अधिकार न मिळता आपल्या तान्ह्या बालकास अधिकार मिळावा म्हणून जी भांडत होती तिला पाठबळ देण्याकरिता राणी गहिनाबाईच्या विनंतीवरून सखाराम धारीस गेला, सखारामाची योजना फलद्रूप होण्यापूर्वी सखाराम यमलोकी गेला आणि ते काम दिवाण घराण्याशी संबंध असलेल्या बापू रघुनाथ नावाच्या एका गायकवाडी अधिकाऱ्याने पुढे चालवले.[१] परंतु, कानोजीस ज्या महंमद अबूद नावाच्या लंगड्या अरबाने गांजले होते त्याच्या तडाक्यात हे संस्थान सापडले. याप्रमाणे सैन्याची

१. राणी गहिनाबाईंनी कौटुंबिक हिताकरिता म्हणून धार येथील भांडणात मध्यस्थी केली; परंतु गायकवाडाने संस्थानास मदत केल्याबद्दल विशेष तगादा लावला ह्याची शंका नाही. जर इंग्रज सरकाराने हात घातला नसता तर कदाचित बडोद्याच्या चुलतभावाने या लहानशा पवार राजपुत्रास तेव्हाच गिळंकृत केले असते.

थोडी सुधारणा होऊन सीतारामाची अप्रतिष्ठा झाली. सीताराम हा इंग्रज सरकाराचा व त्यांच्यातर्फेच्या बडोद्यांतील पक्षाचा पक्का शत्रू झाला. ह्या पक्षाचा गंगाधरशास्त्री प्रमुख होता. सीतारामाने ह्या पक्षास कसा त्रास दिला व कसे आडते घातले, हे पुढे समजेल.

ता. २८ नोव्हेंबर १८१० रोजी फत्तेसिंगरावास "इंग्रज सरकाराने आपणावर केवढी मेहेरनजर केली आहे याबद्दल सर्व गोष्टी नीट ध्यानात ठेवा" अशाप्रकारचा गोड व करुणरसभरित उपदेश करून बाबाजी आप्पाजी स्वर्गस्थ झाले.[१] त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा विठ्ठलराव भाऊ यास नेमण्यात आले व त्याने तो अधिकार दोन वर्षे चालविला; परंतु पुढे चालविण्यास तो नालायक झाला. म्हणून गंगाधरशास्त्र्याची त्या अधिकारावर योजना केली. त्यास इ.स. १८१३मध्ये मुतालिक हा किताब मिळाला व साठ हजार रुपये त्यास नेमणूक करून देण्यात आली.

विठ्ठलराव दिवाणजीने कडी येथील युद्धात व मोठ्या मुलूखगिरीत विशेष पुढाकार घेतल्यामुळे त्यास काठेवाडची सरसुभेगिरी देण्यात आली.

ता. १२ (किंवा २९) फेब्रुवारी १८१२चे सुमारास गायकवाड सरकाराने कंपनीचे सगळे कर्ज फेडले. त्याचे सर्व श्रेय कर्नल वॉकर व त्याचे जागी आलेला कॅप्टन कारन्याक[२] यांना असून त्यांचे चांगले सल्ल्याबद्दल त्यांचे फार आभार मानले पाहिजेत. आता मुंबई सरकाराने संस्थानाच्या कारभारात कोणत्याही प्रकारचा पुढारीपणा घ्यावयाचा नाही असा बहुतेक ठराव केला होता. पण काही अकल्पित गोष्टी दरम्यान घडून आल्याने हा संकल्प अमलात आणण्याचे लांबले.

ज्या सैन्यास खर्चाकरिता प्रांत लावून देण्यात आले नव्हते त्या सैन्याच्या खर्चाकरिता, बडोद्यातील दंगेखोर आरबांचे बाकी रकमेची फेड करण्याकरिता, अहमदाबादच्या इजाऱ्यावरील शिंद्यांचा हक्क मोकळा करण्याकरिता, फत्तेसिंगाची खंडणी देऊन सुटका करण्याकरिता, लष्कराची राहिलेली बाकी देऊन टाकण्याकरिता, मल्हाररावाच्या पोटगीकरिता, असे वेळोवेळी मिळून इंग्रज सरकाराने एकंदर ६७,०८,०३४ रुपये गायकवाडास कर्जाऊ दिले होते, आणि आता त्या सर्व रकमेची फेड करून टाकण्यात आली होती.

परंतु या संस्थानातील इतिहासात ज्या काही विशेष महत्त्वाच्या बऱ्याच गोष्टी घडून आल्या, त्यांपैकीच पैशांच्या अडचणीतून संस्थानाची सुटका झाली ही एक ठळक गोष्ट आहे. तेव्हा ती कितीही कंटाळवाणी वाटली तरी तिचा थोडक्यात वृत्तांत देणे अत्यावश्यक आहे.

इंग्रज सरकारचा प्रवेश होण्यापूर्वी संस्थानचा वसूल पंचावन्न किंवा सत्तावन्न लक्ष रुपये होत असे आणि काही वेळपर्यंत सैन्याबद्दल साठ लक्ष रुपये जवळजवळ खर्च होत असे. एकंदर खर्च सुमारे त्र्याऐंशी लक्ष रुपये होत असे. म्हणजे एकंदर संस्थानी खर्च उत्पन्नापेक्षा सरासरी तीस लक्ष रुपये अधिक होत असे. बहुतेक सर्व सावकारांकडे हा देश गहाण पडला होता. एवढेच

---

१. अनुभवशीर राज्यकार्यधुरंधर रणशूराने तरुण राजप्रतिनिधीस अंतसमयी केलेला उपदेश फारच हृदयवेधक आहे.

२. कर्नल वॉकरने इ.स. १८०९ चे प्रारंभीच आजारीपणाची रजा घेऊन बडोदे सोडले. तो थोडे दिवसांनी परत आला; परंतु इ.स. १८१०मध्ये याने हिंदुस्थानास कायमचा सलाम ठोकला. कर्नल वॉकरने आपले नाव इतके गाजविले की या संक्षिप्त इतिहासास त्याचे योग्य अभिनंदन करणेही अधिकच होईल.

नाही; पण खुद्द राजेसाहेब व त्यांचे प्रतिनिधी यांनी आपापल्या आप्तांस व नाकाचे जे बाल होते अशांस मोठमोठे व सुपीक प्रांतही सोपवून दिले होते. अशा या देशस्थितीपेक्षा आणखी शोचनीय स्थितीची कल्पनासुद्धा होणे अशक्य आहे. संस्थानांचे राजे निराशेमुळे अगदी उदासीन होऊन गेले असता या दुःखदायक स्थितीतून संस्थानाची सुटका करण्यात आली; ही जी सुटका झाली ती शांततेच्या वेळी झालेली नाही. शांततेच्यावेळी एवढ्या मोठ्या राज्यास आपली सुटका करून घेता आली असती; पण ज्यावेळी खंडांतील सर्व राज्यांची उलटापालट होत होती अशा आणीबाणीचे वेळी ती झाली.

नामदार कंपनीने स्वतः रक्कम देऊन शिवाय बहादरी पद्धतीने संस्थानचा हितसंबंध पुष्कळ साधला. या पद्धतीचे वर्णन मागे करण्यात आले आहेच. सावकारांनी ज्या अगाऊ कर्जाऊ रकमा दिल्या होत्या त्या परत मिळण्याबद्दल कंपनी जामीन राहिली होती. एकेवेळी हे कर्ज ८८,४८,५१० रुपये झाले होते. ज्या कर्जाबद्दल नामदार कंपनी जामीन राहिली होती. त्याखेरीज आणखी काही सावकारांचे व विशेषतः हरिभक्तीचे एकंदर एकतीस लक्ष रुपयांपेक्षा अधिक कर्ज होते.

अशा या संकटांतून मुक्तता होण्याला योजलेल्या उपायांची संक्षिप्त हकिकत दिल्यास चालेल. मुख्य उपाय म्हटला म्हणजे अतिकाटकसरीचा होता. या उपायाने खर्च इतका कमी झाला, की पूर्वी जो उत्पन्नापेक्षा तीस लक्ष रुपये खर्च जास्त होता, तो आता उत्पन्नाच्या आत पुष्कळ होऊ लागला. तथापि, देश फारच गहाणाने ओढग्रस्त झाल्यामुळे काटकसरीची कातर बेतानेच चालत होती आणि नंतर काही वेळपर्यंत तर शिंदा, पेशवा व होळकर यांच्याशी लढाईमुळे खर्चच पुष्कळ झाला. इ.स. १८०१-०२ मध्ये मुलूखगिरीच्या वसुलाशिवाय कडी, देहगाव, वगैरे ठिकाणच्या नवीन वसुलाच्या रकमा जमा धरता एकंदर वसूल अठ्ठावन लक्षापेक्षा अधिक झाला; आणि एकंदर खर्च साडेचौपन्न लक्षांपेक्षा थोडासा अधिक झाला; परंतु या अठ्ठावन्न लक्ष रुपयांतून इनामी व सैन्याकरिता लावून दिलेल्या प्रांताची चौदा लक्ष रुपयावर व सावकारांस हंगामी लावून दिलेल्या प्रांताची एकोणीस लक्ष रुपये वसूल वजा जाता यावर्षी सुमारे अठ्ठावीस लक्षांची तूट आली व पुढील वर्षी (१८०२-०३) सुमारे चोवीस लक्षांची तूट आली.

यानंतर ही स्थिती सुधारू लागली. आणि इ. स. १८०८चे अखेरीस नामदार कंपनीचे देणे तेवीस लक्ष रुपयांच्या आत आणि जामीनकी दिलेल्या सावकारांचे देणे साडेबारा लक्ष रुपयांपेक्षा थोडेसे अधिक राहिले. इतर सर्व फालतू पुष्कळ दिवस तुंबून राहिलेले कर्ज कमी करण्याकरिता कर्नल वॉकर यांनी एक मोठी रक्कम इ.स. १८०७-०८मध्ये कर्जाऊ काढली आणि त्याचवेळी एक विलक्षण उपाय अमलात आणला. तो असा की, दरवर्षी नवीन कर्ज काढावयाचे व ते आणि संस्थानचे उत्पन्न मिळून मागील सालची कर्जबाकी चुकती करून संस्थानचा चालू खर्च होईल तितका भागवायचा व राहिलेल्या रकमेची फेड पुढील वर्षी पुन्हा कर्ज काढून करावयाची. याप्रमाणे इ.स. १८०७-०८मध्ये काढलेले कर्ज सव्वाएकाहत्तर लक्षांवर गेले आणि इ.स. १८०८चे अखेरीस कंपनी देणे व जामीन दिलेल्या इतर सावकारांचे कर्ज मिळून संस्थानचे एकंदर कर्ज १,५५,९८,३३९ रुपये झाले. यानंतर इ.स. १८११-१२ पर्यंत दरवर्षी २,०५,३२,००० रुपयांपेक्षा अधिक रुपयांच्या नवीन रकमा कर्जाऊ काढण्यात येत. व

त्यावेळेपर्यंत संस्थानास एकंदर कर्ज ३,६१,३१,००० रुपयांपेक्षा अधिक झाले; परंतु त्या मुदतीत सालोसाल मिळून ३,२२,१४,००० रुपयांवर कर्जाची फेड करण्यात आली. याप्रमाणे इ.स. १८१२मध्ये संस्थानाचे एकंदर कर्ज अठ्ठावीस लक्ष रुपयांवर येऊन ठेपले. इ.स. १८०८-०९मध्ये सोळा लक्ष रुपये, दुसऱ्या वर्षी सुमारे एकोणीस लक्ष रुपये, तिसऱ्या वर्षी सुमारे साडेबावीस लक्ष रुपये व चवथ्या वर्षी साडेएकोणीस लक्ष रुपये असा दरवर्षी उत्पन्नापेक्षा कमी खर्च करीत गेले. अतिशय काटकसर करून खर्च उत्पन्नाच्या आत आणिला तेव्हा हे कर्ज वारले गेले. या मुदतीतदेखील जसा खर्च हळूहळू ५० लक्ष रुपयांवरून ५१॥ लक्षांपर्यंत वाढला, तसा वसूलही ६६॥ लक्षांवरून ७०.७२॥ लक्षांपर्यंत वाढला.

खरोखर निकराचा प्रयत्न करण्यात आला व त्याला चांगले यशही मिळाले होते; पण दुर्दैवाने यानंतर पुन्हा स्थिती उलटली व संस्थान आस्ते आस्ते संकटात गुरफटून गेले. ते कसेही असो. ही संकटदशा व्यवस्थितपणे पार पडली व त्याचे सर्व श्रेय कर्नल वॉकर व त्याचा हस्तक गंगाधरशास्त्री यांनाच आहे.

संस्थानच्या निरनिराळ्या खात्यांच्या खर्चाकरिता व मुख्य अधिकाऱ्यांच्या पगाराकरिता ज्या रकमा ठरविण्यात आल्या होत्या, त्यावरून पहिल्या रेसिडेंटाच्या काटकसरीची कल्पना होईल. उदाहरणार्थ : मुलकी खात्याचे नेमणुकीस २,७५,००० रुपये खर्च होत असत; परंतु ही रक्कम लवकरच चार लक्ष रुपयांजवळ गेली. गायकवाडच्या कुटुंबाकरिता ४,२३,००० रुपये ठरविण्यात आले. वसुलीचा खर्च, धर्मखर्च आणि पेन्शन यांचा खर्च साडेपाच लक्ष रुपयांच्या आत ठेवावा असे ठरले. इ.स. १८१२पर्यंत या रकमांत काही विशेष वाढ झाली नाही ही एक नवलाचीच गोष्ट आहे. या कायद्याचे जो कोणी उल्लंघन करील – मग तो कोणीही असो – त्याची विचारपूस होत असे. जेव्हा फत्तेसिंगाने आपली पागा वाढविली तेव्हा त्याची कानउघाडणी करण्यात येऊन त्यास पागा कमी करण्यास लावले. जेव्हा सीतारामाने रेसिडेंटाने केलेल्या व्यवस्था झुगारून देण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याचीही अप्रतिष्ठा करण्यात आली. ही सुधारणा खर्चातच काटकसर करून अमलात आणिली असे नाही; तर वसूल गोळा करण्याच्या पद्धतींत फेरफार करून वसूल गोळा करताना ज्या लुच्चेगिऱ्या होत असत त्या पकडून, बंद करून व वसुलांचे मक्ते बंद करूनही सुधारणा झाली.

●●●

प्रकरण १५ वे

बडोद्यास दोन पक्ष कसे झाले आणि पेशवे व ब्रिटिश यांचे भांडणाचा संस्थानावर कसा परिणाम झाला – गंगाधर शास्त्र्यांचा खून

◘

नामदार कंपनीच्या ऋणांतून गायकवाड सरकार मुक्त झाल्यावर संस्थानचा व आपला संबंध तोडून टाकण्याची मुंबई सरकाराने इच्छा प्रदर्शित केली होती; परंतु काही विशेष गोष्टी घडून आल्यामुळे त्यास तसे करता आले नाही हे वर सांगितलेले आहे.

सन १८१२

कानोजीस बडोदे संस्थानात परत येऊन पद्र्यास राहण्याची परवानगी मिळाली होती. हे गाव राजधानीपासून लांब नाही आणि थोडे वर्षांपूर्वी तेथे मल्हारराव गायकवाडास पुष्कळ दिवस अटकेत ठेविले होते. सन १८१२मध्ये या कारस्थानी माणसाने संस्थानास त्रास देण्याचा शेवटचा प्रयत्न केला. राणी तखताबाईसुद्धा पुन्हा एकदा खटपट करू लागली, आणि त्यांच्या बेतांत सामील झाली. यांच्यामध्ये अध्वर्यू नवानगरचा जाम जेसाजी होता. जामचे व ब्रिटिश सरकारचे वाकडे असल्यामुळे गुजराथेमध्ये दंगा उपस्थित करून ब्रिटिशांचे लक्ष तिकडे लावण्याची त्याची इच्छा होती, म्हणून त्याने कानोजीस द्रव्याची आणि सैन्याची मदत देण्याचे कबूल केले आणि त्यास जय मिळाल्यास विजापूरजवळचे प्रांत बक्षिसादाखल मागितले; परंतु ब्रिटिश सरकाराशी जेव्हा त्याचे जुळले तेव्हा लागलीच त्यांनी आपल्या मूर्ख भागीदारास सोडून दिले. सीतारामास वरील कारस्थान माहीत होते; परंतु त्यासही ते शेवटास जाणार नाही असे वाटले. राणी गहिनाबाईही तिकडे काही लक्ष देईना. त्या कारस्थानाची मुख्य दिशा अशी होती : मीरखान पठाणाला आणि माळवा व गुजराथमधील सैन्याला जामच्या पैशाने नोकरी द्यावयाची. लुनावाड्याहून रामदिन पठाण आणि धारेहून महमुद अबूद यांनी मदत करावयाची. गुजरातमधील कोळी बंड करण्यास तयार होईनात; परंतु एक हजार नवीन अरबांनिशी जमादार उमार आणि बलाढ्य ठाणेदार अब्दुल रहेमान यांनी मदत देण्याचे कबूल केले. महीवरील कोळ्यांस त्यांच्या दुसऱ्या भाउबंदासारखे वागण्यास प्रत्यवाय नव्हता. पद्र्यास कानोजीजवळ १२५ घोडेस्वार आणि १५० पायदळ तयार होते आणि नवानगरहून काही आरब लोक येण्याची त्यांची आशा होती.

रेसिडेंट काठेवाडात असून राजधानीमध्ये मुळीच सैन्य नव्हते. कोळी लोकांनी कारभाऱ्याचे घरावर आणि अरब लोकांनी रेसिडेन्सी व त्याच्याच शेजारी शास्त्र्याचे घर होते त्याच्यावर हल्ला करावयाचा आणि तखताबाईने एक दिंडी उघडून त्याचे वाटे कानोजीस आणि त्याचेबरोबरचे लोकांस शहरात घ्यावयाचे असे ठरले होते; परंतु हळूहळू या कारस्थानाची सर्व बातमी रेसिडेन्सीमध्ये कळली होती. रेसिडेन्सीवर स्वारी करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी थोडे दिवस कॅप्टन बॅलंटाईन यांनी थोड्याशा सैन्यानिशी पद्म्यास वेढा घालून कानोजीस कैद केले, आणि सर्व कारस्थान फसले. नंतर थोड्या दिवसांनी कानोजीस सुरतेस पाठविले, तेथून मुंबई आणि तेथून मद्रासेस पाठविले व तेथून तो परत आला नाही. या वेळेपासून राणी तखताबाईवर कडक नजर ठेवली. तीस काही दिवस अटकेतही ठेवण्यात आले होते आणि तुलसीपत्र हातात घेऊन तिने शास्त्र्याजवळ शपथा वाहिल्या तरी तिच्यावर व तिच्या वकिलाच्या शिष्टाईवर विश्वास ठेवण्यात आला नाही; परंतु महाराजांचे तिच्यावर फार प्रेम असल्यामुळे तीस जिवंत ठेवले. तिची जी अप्रतिष्ठा झाली तीजमुळे ती अतिशय संतापली आणि तिने लवकरच यावेळी सीतारामाच्या मदतीने शास्त्र्याचा पाडाव करण्याचा घाट घातला; तो तिला अर्धी मदत देण्यास कबूल होता. कारण बाजीराव पेशव्यांच्या मदतीने बडोद्याची ब्रिटिश पक्षाचा पाडाव करून आपली पूर्वीची जागा पटकाविण्याची त्याची आशा होती.

पेशवे आणि ब्रिटिश भानगडी अगदी निकरास येऊन ठेपल्या होत्या. सर्व मराठी राज्यावर पेशव्यांचे जे एकदा वर्चस्व होते ते वसईच्या तहाने बाजीरावाने घालविले. नंतर काही वर्षांनी ही आपली गेलेली सत्ता पुन्हा मिळविण्याचे इच्छेने त्याने आपली वागणूक बदलली ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. या सर्वसाधारण प्रश्नाबरोबर, बाजीरावाची गायकवाडांशी कशी वर्तणूक होती याचा आपण विचार करू. या (गायकवाड) राजाची राज्यनिष्ठा आपलेकडे घेण्याची त्याची फार इच्छा होती. प्रत्यक्ष गायकवाडाशी त्यास आता पत्रव्यवहार करता येत नसे, तर तो रेसिडेंटाच्यामार्फतच करावा लागे. गायकवाड अजून त्यास काही ठराविक रक्कम देत असे; पण तिला खंडणीचे स्वरूप राहिले नव्हते व तो सैन्याची मदत आता देत नसे. गायकवाडास राज्याभिषेक झाल्यावर तो अद्याप नजराणा पाठवी; परंतु तो पेशव्याच्या मर्जीनुरूप ठरत नसे. गायकवाडाच्या गादीवर कोणी बसावे हे ठरविण्याचे काम पुण्याचे दरबारचे हाती राहिले नव्हते. ही गेलेली सत्ता पुन्हा मिळविण्यास त्यांचे हातांत दोन शस्त्रे होती. सन १८१४मध्ये अहमदाबादचा शेजारा संपवायचा होता आणि तो पुन्हा सुरू केला नाही म्हणजे गायकवाडाच्या राज्यात हात घालण्यास त्यांना हजारो मार्ग झाले असते. शिवाय मुलूखगिरीच्या भागामध्ये सांगितल्याप्रमाणे, काठेवाडातील पेशव्यांचे हक्क खंडणीच्या कायम व्यवस्थेमुळे आणि इतर काही रीतीने पुष्कळ गेले होते आणि या झालेल्या अपमानाचा त्याला सूड घ्यावयाचा होता. दुसरे, पेशव्यांच्या गायकवाडावर काही पैशांच्या मागण्या होत्या आणि त्याचा बेताबाताने उपयोग करून बडोद्याचे पूर्वीचे संबंध पुन्हा सुरू करण्याबद्दल आपल्याला विनंती करण्यास गायकवाडाचे मन वळवावयाचे असा त्याचा विचार होता.

प्रत्यक्ष बडोद्यामध्ये दोन तट झाले होते. एका पक्षास ब्रिटिश सरकारचे स्नेहसंबंधावर भरवसा होता व त्याचा अध्वर्यू गंगाधरशास्त्री होता. दुसऱ्या पक्षास एका दृष्टीने स्वदेशाभिमानी

म्हणता येईल. त्याचे मुख्य बदनाम झालेला सीताराम आणि राणी तखताबाई होती. त्यांस राजवाड्यांतील लोकांचे चांगले पाठबळ होते. या राजकीय भांडणाचे स्वरूप जेव्हा जोरावत चालले, तेव्हा महाराज स्वतःबद्दल जबाबदार आणि ते आपल्या आवडत्या राणीचे हातातले बाहुले नसून आपल्या हिमतीवर वागणारा होता. असे धरले तर त्याने पेशव्याकडे वळण्याची आपली इच्छा दाखविली आणि पेशवा उघडपणे असे म्हणू लागला, की आनंदरावाचा ब्रिटिश सरकाराशी स्नेहभाव नसल्यामुळे त्यांनी आनंदरावाचा अधिकार योग्य रीतीने काढून घेतला.

मुखत्यारच्या नात्याने काम करू लागल्यावर आरंभी काही वर्षे फत्तेसिंग अगदी शास्त्र्यांच्या सांगण्याप्रमाणे वागे; परंतु पुढे त्याची चलबिचल आणि हलकट चैनी करण्याची व मूर्ख स्नेहाच्या नादी लागण्याची इच्छा दिसू लागली. त्यामुळे रेसिडेंटाच्या भीती पडून त्याच्यावरील कडक देखरेख अर्धी कमी करण्याचा मुंबई सरकारचा जो विचार होता तो काही दिवस रहित ठेवण्यास त्याने त्यास सांगितले. तथापि, शास्त्री पुण्यास वकिली करण्याकरिता गेले असताना, फत्तेसिंगावर जरी कडक नजर होती तरी त्या वकिलीविरुद्ध त्याने काही चिन्ह दाखविले नाही. उलट या वकिलीची फत्ते होईल अशाच धोरणावर तो वागत होता. तथापि, आपल्यास मुंबई सरकाराजवळून जी मदत मिळण्याचा हक्क आहे असे त्यास वाटत होते, ती मुंबई सरकाराने त्यास केली नाही, यामुळे त्याची निराशा झाली असेल. तथापि, आपल्या नोकराचा अयोग्य रीतीने खून झाल्याबद्दल त्यांना कितीही दुःख वाटले असले व राग आला असला तरी राजवाड्यातील जोरदार पक्षाच्या भीडेने आणि बहुतेक गहिनाबाईच्या उपदेशाने त्याच्या पुढील वागणुकीवर खास परिणाम झाला. तखताबाईच्या मनात द्वेष वागत होता तशी सीतारामाच्या मनात महत्त्वाकांक्षा होती; कारण बाजीराव हळूहळू बडोद्याचा दिवाण नेमण्याचा आपला जुना अधिकार आहे, असे प्रपादू लागला आणि त्या जागेकरिता सीताराम खटपट करीत होता.

सीतारामाच्या पक्षाचे अथवा स्वतः सीतारामाचे पुणे आणि मुंबई या दोन्ही ठिकाणी लोक होते. पहिले ठिकाणी गोविंदराव, बंडोजी गायकवाड आणि माजी महाराजांचा पुत्र भगवंतराव हे होते. भगवंतरावास गहिनाबाई पैसे वगैरे पुरवी आणि दुसऱ्या ठिकाणी हाफिज महमद दाऊद आणि गोविंदरावाचा मेहुणा महिपतराव हे होते. महिपतराव हरिभक्तीच्यामार्फत पूर्वीच्या कारभाऱ्यांशी पत्र्यवहार करी आणि मुंबईच्या सेक्रेटरीअटमधील अतिशय गुह्य माहिती त्याच्याकरिता मिळवी. खुद्द बडोद्यामध्ये सीताराम वेष पालटून तखताबाईकडे रात्रीचा जाई आणि महाराजास कसे वळवावे याबद्दल तिच्याशी बेत करीत बसे. एकदा तर पुण्यास जाण्याची तयारी करण्याला तो गरीब बिचारा आनंदराव तयार झाला. ही तयारी फत्तेसिंगाच्या विनंतीवरून रेसिडेंटाने लागलीच बंद केली. सर्वांपेक्षा पुण्याच्या रेसिडेंटाचा सरकारकून खरसेटजीशेठ मोदी यास शास्त्री फार भीत असे. अहमदाबादची मामलत विठ्ठल नरसिंह ऊर्फ त्रिंबकजी डेंगळे यास नावाची द्यावयाची असून खरोखर ती त्या सरकारकुनास देण्याचे ठरले आहे असा त्यांचा समज होता.

सन १८१४

बापू मैराळ नावाच्या फत्तेसिंगाच्या वकिलास बाजीरावाशी ठराव करण्याचे कामी यश न आल्यामुळे सन १८१४ मध्ये गंगाधरशास्त्री ब्रिटिशांचे संरक्षणाखाली त्या कामाकरिता पुण्यास गेला. याचेबरोबर मोठा लवाजमा होता आणि अहमदाबादचा मक्ता पुन्हा मिळवायचा व पैशांच्या काही हक्कासंबंधाने निकाल करावयाचा हे दोन उद्देश होते. पहिला हेतू आरंभापासूनच असाध्य होता; कारण आजपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या त्यावरून मामलत तिसऱ्यांदा सुरू केल्यास पैशांच्या भरण्याबद्दल तेवढा प्रांत सोडून दिला आहे, असा कदाचित समज होईल अशी पेशव्यांस भीती पडली; परंतु पेशव्यांचे हक्क, ते काय होते? यास साधक उत्तर द्यावयाचे म्हणजे धोडपच्या लढाईपासून ते ब्रिटिश येईपर्यंत जो गायकवाडांचा इतिहास आहे त्याची आवृत्ती करावयास पाहिजे. तथापि, थोडक्यात सांगतो – माउंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन १८१६मध्ये पुण्यात रेसिडेंट असता त्यांनी असे सिद्ध केले की, गायकवाडाने पेशव्यांस द्यावयाची खंडणी त्रेपन्न वर्षे सुरू होती आणि त्याच्यापैकी त्रेचाळीस वर्षे ती कमी-जास्त झाली नाही. म्हणजे पहिल्या तेहतीस वर्षांपैकी एकवीस वर्षांची खंडणी देण्यता आली आणि दहा वर्षांची माफ झाली. याचवेळी फत्तेसिंगाने ब्रिटिश सरकाराचे बाजूस जाऊ नये म्हणून (दोन वर्षांची दफ्तरे हरविली किंवा नाहीशी केली) त्याच्याशी गोडीगुलाबीने वागण्यात येत होते आणि नोकरीची जी सूट दिली त्याचेबद्दलही असेच म्हणता येईल. सन १७९८ साली तडजोड केली त्यावेळी असे आढळले, की पूर्वीच्या सालाबद्दल एकंदर ४,०२,५१,९३४ रुपये देणे होते, पैकी २,९६,९८,६४४ रुपये दिले होते व ६५,७०,५०० रुपये माफ केले होते. तेव्हा त्यावेळी बाकी देण्याची रक्कम ३९,८२,७९० रुपये राहिली होती. या वर्षानंतर गायकवाडांनी एक पैसुद्धा पेशव्यांस दिली नाही आणि पेशव्यांचे म्हणणे असे होते, की प्रत्येक वर्षी ७,७९,००० रुपये खंडणी म्हणून आणि ६,७६,००० रु. नोकरीची सूट दिली म्हणून अथवा अठरा वर्षांबद्दल एकंदर २,६१,७२,००० रुपये आपल्यास मिळाले पाहिजेत; परंतु कामगिरीची सूट दिल्याबद्दल पैसे देण्याचे फत्तेसिंगांनी नाकारिले; कारण आपल्यास ब्रिटिश सरकारचा पाठिंबा होता, पेशव्यांचा नव्हता असे त्यांचे म्हणणे पडले होते. गंगाधर शास्त्र्यांनी या मागण्यांची सत्यता कबूल केली आणि पेशव्यांचा अधिकार आटोपला नसता, तर या मागण्या बहुतेक अमलात आल्या असत्या. पुढे बाबीपासून जिंकून घेतलेल्या प्रांताबद्दलच्या खंडणीदाखल वर्षास एक लाखाप्रमाणे पन्नास वर्षांची अर्ध्या कोटीची खंडणी पेशव्याने मागितली. त्यावर फत्तेसिंगाचे असे म्हणणे होते, की या मारवा मेवासी देशामध्ये आबादी ठेवण्याच्या खर्चाचा विचार झालेला नाही आणि बाबीमहाल आपल्यास कायमचे देऊन टाकले होते. हे विधान बहुतेक खरे होते; कारण त्याच्या समर्थनार्थ सह्या केलेली लेखी कागदपत्रे पुढे आणण्यात आली होते. शेवटी आनंदराव गादीवर बसल्यावर पेशव्यांस काही नजराणा मिळाला नव्हता म्हणून गोविंदरावचे वेळी ५६,३८,००१ रु. नजराणा घेतला होता, तेवढी रक्कम नजराण्यादाखल पेशव्यांनी मागितली. ही रक्कम आजपर्यंत घेतलेल्या रकमेपेक्षा मोठी होती. ह्यावर फत्तेसिंगाने संस्थानाच्या गरिबावस्थेची सबब सांगितली आणि या गोष्टीचा आजपर्यंत नेहमी विचार होत असे. याचेशिवाय तीन हत्ती आणि पाच घोड्यांपासून ते

अर्धकोटीपर्यंत दुसऱ्या किरकोळ मागण्या बऱ्याच होत्या. एकंदरीत पेशव्यांच्या मागण्या साडेचार कोटींपेक्षा जास्त होत्या; परंतु गंमत अशी होती, की तितकीच रक्कम फत्तेसिंग उलट पेशव्यांकडे काढीत होता. त्याची सर्वांत मजेची मागणी भडोचच्या वसुलांतील आपल्या हिश्श्याची होती. हा वसूल त्यांनी दरसाल साडेपाच लाख आकारिला होता आणि आपले मर्जीविरुद्ध पेशव्याने भडोच गायकवाडाकडून ब्रिटिश सरकाराला दिले होते. त्यांच्यापासून ते शिंद्याकडे गेले होते. पेशव्यांचे सांगण्यावरून आबा शेलूकराविरुद्ध जी लढाई केली त्याबद्दल तो १,६५,००० रु. मागित होता. पेशव्याचे ह्या दुसऱ्या मागणीचेविरुद्ध असे म्हणणे होते, की अहमदाबादची मामलत पुष्कळ दिवस गायकवाडाकडे ठेविल्याने त्याचे सर्व नुकसान भरून आले; परंतु पहिल्या मागणीबद्दल त्यास काही बोलता येण्यासारखे नव्हते; कारण भडोचची मालकी बदलली हे योग्य झाले नाही असे त्याने लेखी कबूल केलेले आहे.

याप्रमाणे वादामध्ये पडलेली रक्कम फार मोठी होती, आणि गायकवाडाच्या अगदी उलट निकालाने ते संस्थान आपल्या अडचणींतून बाहेर पडते आहे तोच पुन्हा रसातळास गेले असते. फत्तेसिंगाची खात्री होती, की ब्रिटिशांचा आपल्यास आश्रय आहे व ते आपले नुकसान होऊ देणार नाहीत. शिवाय दोन्ही पक्षांचा जर समेट झाला नाही तर सन १८०५च्या तहनाम्यामधील स्पष्ट कलमाप्रमाणे निकाल लावण्याचे या सरकाराकडे होते; परंतु या कामात हात घालण्यास ब्रिटिश फार नाखूष होते, कारण यावेळी बाजीरावास निकरावर आणण्याचे त्याचे मनात नव्हते. म्हणून या प्रकरणाची आपसात व्यवस्था लावण्यास त्यांनी गायकवाडास व पेशव्यास उत्तेजन दिले.

पेशव्यांचे सर्व हक्क ५० लाखांत मांडून वाळण्याची आणि दरसाल ८ लाखांच्या फार वाढलेल्या दराने अहमदाबादची मामलत पाच वर्षे चालू ठेवण्यास त्याचे मन वळविण्याची गंगाधरशास्त्र्याची इच्छा होती. पेशव्यांनी दुसऱ्या प्रश्नामध्ये फारसे मन घातले नाही आणि ऑक्टोबर महिन्यात इजाऱ्याचा कौल त्याने त्रिंबकजी डेंगळ्यास दिला. या वादविवादाचे आरंभी त्यांनी शास्त्र्याबद्दल फारच तिरस्कार दाखविला व सीतारामास पुन्हा अधिकार देण्याचा विचार करण्याचा आव घातला. पूर्वीच्या दिवाणाने आपला वकील बंडोजी याचेमार्फत पेशवा मागेल ते कबूल करून शास्त्र्याची खटपट वाया जाऊ देऊ नये म्हणून बडोद्यास सप्टेंबरात अटकेत ठेविले होते. ऑक्टोबर महिन्यात एल्फिन्स्टन साहेबांनी या वकिलास आणि भगवंतरावास घालवून देण्याची अथवा शास्त्र्यास परत जाऊ देण्याची पेशव्यास विनंती केली. इकडे गंगाधरशास्त्र्याने परत जाण्याची विनंती केली. इतक्यात बाजीरावाने आपले डावपेच एकदम सुरू केले. पेशव्यांनी त्या वकिलाबरोबर गुप्तपणे बोलणे सुरू करून त्याला हे बोलणे ऐकविण्याची एल्फिन्स्टन साहेबाने परवानगी दिली होती. मागील बाकीची फेड यासह एकोणचाळीस लाख रुपयांवर करण्याची त्याचेकडून कबूल करून घेऊन दुसरे सर्व हक्क एक कोट रुपये आणि दरसाल दहा लक्षांची खंडणी एवढ्यावर तोडण्याचा त्याने आव घातला. याचेऐवजी शास्त्र्यांनी सालीना सात लाखांचा मुलूख तोडून देण्याचे कबूल केले आणि (मे सन १८१५) फत्तेसिंग या ठरावास कबूल होणार नाही असे वाटून त्याने मन वळविण्यास एल्फिन्स्टन साहेबांस विनंती केली.

गंगाधरशास्त्र्याच्या अभिमानाचा उपयोग करून घेण्याचा लबाड पेशव्याने प्रयत्न केला. प्रांत तोडून देण्याचे म्हणण्याचा विचार करतो असे पेशव्यांनी दाखविले आणि वरवर त्याच्या बुद्धिचातुर्याची फारच स्तुती केली. आपल्या (पेशव्याच्या) बायकोच्या बहिणीचे व त्याच्या मुलाचे लग्न लावण्याचे बोलणे चालविले. याचेहीपेक्षा जास्त म्हणजे त्यांनी (शास्त्र्यांनी) फत्तेसिंगास सोडून पुण्यास दिवाण होण्याकरिता येण्यासही त्यास सांगितले. गरीब बिचाऱ्या शास्त्र्यांनी ही लग्नाची गोष्ट पहिल्याने कबूल केली. नाशकास समारंभाची तयारी पुष्कळ झाली होती; परंतु फत्तेसिंगाकडून काही बातमी न आल्यामुळे भीतीने शास्त्री माघार घेऊ लागले आणि पेशव्यांचे वाड्यात – बदकर्माचे हे माहेरघरच होते – आपल्या बायकोस पाठविण्याचे नाकारून त्याने पेशव्यास चिडवले. याचा सूड ता. १४ जुलैच्या रात्रीपर्यंत लांबणीवर टाकण्यात आला. शास्त्र्याचा मित्र बापू मैराळ याचे सल्ल्याविरुद्ध शास्त्री एकटाच पंढरपूरला गेला आणि तेथे बाजीराव त्याच्याशी सायंकाळी फार सलगीने बोलला. बापू मैराळ त्यांच्याबरोबर नव्हता; परंतु त्याच्या नकळत सीतारामाचा दलाल बंडोजी हा जवळपासच होता. याचेजवळ सशस्त्र लोक होते व त्यास त्यांनी पुष्कळ पैसे चारले होते आणि त्रिंबकजी याला पूर्ण सामील होता. "शास्त्री बडोद्याचा रस्ता पुन्हा केव्हाही पाहणार नाही" या मजकुराचे बंडोजीने राणी तखताबाईला पाठविलेले पत्र यावेळी शास्त्र्याजवळ होते. देवळात काही समारंभ होता, त्यास रात्री येण्याबद्दल त्रिंबकजी डेंगळ्याने फार आग्रह केला. त्यांनी न येण्याबद्दल पुष्कळ सबबी सांगितल्या; परंतु शेवटी तो गेला. परत एकटा येत असता चार-पाच मारेकरी त्याच्या अंगावर तुटून पडले व त्याचे तुकडे-तुकडे केले. ह्यांनी त्यास आधी पाहून ठेवलेले होते.[१]

बापू मैराळ आणि शास्त्र्यांच्या कुटुंबास आपली सुटका अशा भयंकर स्थितीमधून करून घेण्यास किती कठीण पडले, मारेकरी लोक शोधून काढण्यास त्रिंबकजीने खरा प्रयत्न कसा केला नाही, बाजीराव या प्रकरणात सामील आहे असा त्यावर आरोप करण्यास रेसिडेंट जरी तयार नव्हता, तरी आपल्या आवडत्या माणसावर पांघरूण घालण्याची इच्छा आणि ब्रिटिश सरकाराशी फाटण्याची भीती या दोहोंमध्ये बाजीराव कसा झोके खात होता, या गोष्टी येथे सांगण्यात काही अर्थ नाही. सरतेशेवटी त्रिंबकजीस स्वाधीन केले आणि त्यास ठाण्यास तुरुंगात टाकिले व भगवंतराव आणि बंडोजी यांस फत्तेसिंगाकडे पाठविले (माहे नोव्हेंबर सन १८१५).

---

१. मिल हिंदुस्थानच्या इतिहासात लिहितो – खरा प्रकार असा आहे की, ह्या घोर कृत्यात बंडोजी मुख्य कर्ता होता; परंतु त्यास पेशव्याचे अनुमत व त्रिंबकजीची मदत होती. ह्या खुनांतील बंडोजीच्या भागाबद्दल बडोद्यात शंका नव्हती. शास्त्र्याच्या खुनाच्या प्रकरणात बडोदे दरबारने घेतलेला भाग इतर ठिकाणी विशेष लक्षात घेतला नाही, याचे कारण तेथे निव्वळ एल्फिन्स्टनच्या लिहिण्याकडेच विशेष लक्ष दिलेले आहे. शास्त्र्याची स्तुती करण्यात शब्द खर्च करण्याची आवश्यकता नाही. तो कर्नल वॉकरचा उजवा हात होता. संस्थानातील सर्व सांपत्तिक सुधारणा त्याने योजिल्या किंवा अमलात आणिल्या व त्याच्याचमुळे बडोदे सीतारामाच्याने पेशव्यांस देवविले नाही. त्यांचे चरित व त्याचा मृत्यू त्याच्या हुशारीची व चोख वर्तनाची साक्ष देतात. बडोद्यास अथवा पुण्यास हा अडथळा गुप्त रीतीखेरीज अन्यरीतीने कोणी दूर करू शकला नाही.

(टीप - १ पुढील पानावर)

या खुनाची हकिकत ज्यावेळी फत्तेसिंगास कळली तेव्हाही तो काही वेळपर्यंत दुःखाने आणि रागाने अतिशय चवताळला होता. निदान तो तसा आव दाखवित होता आणि शास्त्र्याचे कुटुंबाचे समाधान करण्याकरिता त्याने कारभाऱ्याचे जागी त्याचा धाकटा मुलगा भीमाशंकर याची नेमणूक करून काम मात्र यशवंतराव दादाकडून चालविले; परंतु आपल्यास मोठा जय मिळाला अशा रीतीने राजवाड्यातील बळकट पक्ष वागत होता. सीतारामाची त्या जागेवर नेमणूक करण्याचे काम उरकून घेण्यास बिचाऱ्या आनंदरावानीसुद्धा यावेळी बंडोजीस लिहिले. त्या पत्रात त्याने आणखी अशी शिफारस केली, ''तुम्ही सरकारचे मोठे इनामी नोकर आहात व योग्य होते तेच तुम्ही केलेत''. याचवेळी बंडोजीने सीतारामाचे काकाजी नावाच्या एका नातेवाइकास लिहिले, ''येथील सर्व काम उरकले, तुम्ही दिवाणाचे काम करू लागा.'' माजी कारभाऱ्याला राणी गहिनाबाई आणि राणी तखताबाई या दोघींचेही पाठबळ होते. बाबू रघुनाथ नावाचा त्याचा जो एक नोकर होता त्याचीही काही दंगा झाल्यास गुजराथेवर स्वारी करण्याची तयारी होती. आणि अहमदाबादेस जी एकंदर स्थिती होती त्यावरून हा प्रसंग येईल असा अजमास होता; कारण तेथील मामलत बाजीरावाकडे परत केल्यापासून उत्तर गुजराथेत आणि काठेवाडात सर्व घोटाळे आणि दांडगाई सुरू झाली होती. सीतारामाचेविरुद्ध काम चालविण्यास बडोद्याचे रेसिडेंटाने फत्तेसिंगास सांगितले; परंतु त्याच्याच मनात ते ठसले नाही. याचे कारण वर सांगितल्याप्रमाणे तो एकटाच पडला होता हे कदाचित असेल. तथापि, ता. २० सप्टेंबररोजी माजी दिवाणास त्याचे घरातच इंग्लिश सैन्याच्या पहाऱ्यामध्ये कोंडून ठेविले व नंतर त्यास सन १८१६च्या एप्रिल महिन्यात मुंबईस पाठवून दिले. तेथून काही वर्षे तो परत आला नाही.

तथापि, तरुणपणास अनुरूप अशा हलकेपणाशिवाय फत्तेसिंगाचेविरुद्ध कोणताही आरोप नव्हता. सर्व जुने सल्लामसलतगार नाहीसे होऊन, त्याचेजागी बेचर माणेकदास आला होता. त्याने राजास चैनीकरिता पुष्कळ पैसे उसने दिले, म्हणून धाकजी दादाजीस रेसिडेंटाचा नेटिव्ह वकील म्हणून (फेब्रुवारी १८१६) नेमण्यात आले; परंतु त्याच्यावर आरंभी राजाची मर्जी नव्हती. फत्तेसिंग तखताबाईबरोबर भांडला. त्यांनी लष्करी खर्च वाढविला. काही दिवस संस्थानाचे

शास्त्र्याची आणखी थोडी माहिती येथे देतो. त्याचा बाप कृष्णा पटवर्धन याने आपल्या फडक्याशी असलेल्या गोत्र संबंधामुळे पेशव्यांकडून गोविंदराव गायकवाडाला महाराज ही पदवी देवविल्याबद्दल त्यास १७९४मध्ये गायकवाडाने वंज खेडे इनाम दिले. गंगाधर प्रथम दक्षिणेत प्रसिद्धीस आला व मीर कमालुद्दिन याने त्याची मेजर वॉकरजवळ अशी शिफारस केली, की त्याने त्यास बडोद्यास आपला अवलकारकून अथवा मुखत्यार म्हणून आणावा. शिवाय शास्त्र्याची विद्वत्ता गव्हर्नर डंकनला चांगली माहीत होती. नेटिव्ह एजंटच्या जागेवरील त्याच्या नोकरीबद्दल ब्रिटिशांनी त्यास दिंडोली गाव इनाम करून दिले आणि गायकवाडाने तीन लहान खेडी दिली. कप्तान कार्ल्याकचा शास्त्र्याच्या चोख वर्तनाबद्दल फार चांगला ग्रह होता. त्याच्या मृत्युपत्रांत विशेषकरून बाबाजीचा व इतर नजराणा घेतल्याबद्दल जो उल्लेख आहे त्यावरून त्याचा ग्रह पुष्ट झाला. बाबाजीकडून आलेला जुर्माना भरण्यापूर्वी परत करावयाचा अशाबद्दलही उल्लेख आहे. ह्या घराण्यातील मुख्य पुरुष बळवंतराव विनायक असून त्याच्या बापाच्या अंगात त्याच्या पूर्वजांची विद्वता कमी होती असे नाही.

हिशेब रेसिडेंटास पाहू देण्याचे त्यांनी नाकारिले. संस्थानाच्या हिताविरुद्ध व्यवस्था करण्याकरिता त्याने पैसे घेतले - एकंदरीत तो अशारीतीने वागला, की संस्थानावरील प्रत्यक्ष देखरेख काढून टाकण्याचा जो मुंबई सरकारचा खरोखर विचार होता तो त्यांनी सोडून दिला. फत्तेसिंगाने बनारसला जाण्याची तयारी केली असे त्यांना कळले तेव्हा त्यांना बरेही वाटले.

●●●

प्रकरण १६ वे

गायकवाडी आणि ब्रिटिश प्रांताची अदलाबदल, रीजेंट फत्तेसिंगाचा मृत्यू आणि त्याचा धाकटा बंधू सयाजीराव यांची त्याच्या जागी नेमणूक

◘

दरम्यान, पुण्याची प्रकरणे माजतच होती. शास्त्र्यांच्या खुनामुळे गायकवाडाकडील मागण्यांत फेरफार होऊ नये असे गव्हर्नर जनरलने ठरविले. फत्तेसिंगाचे म्हणणे की, त्यात फरक व्हावा आणि इकडे बाजीराव तर सात लाखांचे मुलखापेक्षाही जास्त मागू लागला; कारण हा वाद पाच वर्षे चालला होता. त्या अवधीत खंडापैकी मुळीच पैसे देण्यात आले नव्हते, परंतु आता तंटा होऊन लढाईचा प्रसंग यावयाचा होता व त्यात मागणारा व त्याच्या मागण्या या दोन्हींचा फन्ना व्हावयाचा होता.

तारीख १२, माहे सप्टेंबर सन १८१६ रोजी त्रिंबकजी डेंगळ्या ठाण्याच्या तुरुंगातून पळाला आणि असे लवकरच कळले की त्यास बाजीराव सैन्य गोळा करण्याकरिता पैशांचीच मदत करीत होता व शिवाय ब्रिटिश लोकांस हाकून लावण्याकरिता तो होळकर, शिंदा, नागपूरचा राजा यांच्याशी आणि दुसऱ्या लोकांशी खलबते करीत होता आणि शिंद्याच्या दरबारी गोविंदराव गायकवाड त्याचा वकील होता. या कारणास्तव शेवटचे उपाय योजावे लागल्यामुळे रेसिडेंटानी त्रिंबकजी आणि तीन पहाडी किल्ले आमचे स्वाधीन करा, अशी मागणी केली आणि तारीख १० मे सन १८१७ च्या सुमारास पेशव्याने त्यावेळपर्यंत लढाईची तयारी चालविल्यावर, ती मागणी कबूल केली.[१] तारीख १३ मेरोजी पेशव्यांच्यावतीने आलेले मोरो दीक्षित आणि बाळाजी लक्ष्मण यांस एल्फिन्स्टन साहेब भेटला आणि त्यांचे विचाराने एक तहनामा तयार केला, त्या तहाप्रमाणे दुसऱ्या गोष्टीबरोबर (कलम ५ प्रमाणे) गायकवाडावरील यापुढील सर्व हक्क सोडून देऊन (कलम ७ प्रमाणे) मागील सर्व हक्कांबद्दल सालीना चार लाख रुपये घेण्याचे कबूल केले. काठेवाडातून त्यास जी खंडणी येत असे ती ब्रिटिश सरकाराला दिली आणि (कलम १५ प्रमाणे) आजपर्यंत देत आलेल्या साडेचार लाखाला अहमदाबादचा इजारा कायमचा

---

१. गोविंदराव, बंडूजी गायकवाड आणि भगवंतराव यांस गायकवाड सरकारच्या हस्तगत केले, दोघांना कैदेत टाकले, आणि पहिला जन्मभर तापी नदीवरील गंडिश्वर किल्ल्यात कैदेत होता.

गायकवाडाला देण्याचे कबूल केले. शेवटी अहमदाबाद, ओलपाड आणि गायकवाडाकडून सालीना येणारी खंडणी याचेशिवाय गुजराथेतील पेशव्यांचे सर्व हक्क ब्रिटिश सरकाराला देण्यात आले. यांच्यामध्ये जंबुसर, अमोड, देसबोरा, डमई, बहादरपूर आणि सावळी हे प्रांत आले (कलम ४ प्रमाणे) गायकवाडाची स्वतंत्रता कायमची मान्य करण्यात आली आणि त्यास सालीना खंडणी, चाकरीचा मोबदला अथवा नजराणा देण्याची जरुरी राहिली नाही. एकंदरीत मि. एल्फिन्स्टन यांचे म्हणण्याप्रमाणे "आपले दिवाणाचे खुनाचा" मोबदला म्हणून गायकवाडाला पुष्कळ नफा मिळाला.

तारीख २५, माहे जून सन १८१७ रोजी अहमदाबादच्या कायमच्या इजाऱ्याची एक सनद तयार केली (आणि एका महिन्याचे आत ती अमलात आणली); परंतु त्याच दिवशी, संस्थानाच्या सैन्याचा सालीना खर्च बेचाळीस लाख जरी होता (कारण लष्करी खर्च पुन्हा या बेतास येऊन पोचला होता) तरी ते वास्तविक निरुपयोगी असल्यामुळे काठेवाडातील जी खंडणी गायकवाडांना माफ झाली आहे तिच्यातून घोडेस्वारांच्या दोन पलटणी आणि पायदळाची एक पलटण अशी परकी पगारी फाजील फौज गायकवाडास ठेवण्यास सांगावे की नाही, याचा विचार मुंबई सरकार करीत होते. फत्तेसिंगाने परकी पगारी फौज वाढविण्याचे कबूल केले; परंतु काठेवाडातील मिळालेले उत्पन्न घालविण्यास तो कबूल नव्हता त्यास सांगितल्याप्रमाणे आपले सैन्य कमी करून १२ हजारांवर आणून ठेवण्याचेही त्याने नाकारिले. तथापि, पेशव्यास दरसाल चार लाख रुपये देण्याकरिता तेवढा खर्च कमी करण्याची खटपट करण्याचे त्याने कबूल केले. म्हणून वाढविलेल्या परकी बिटिश सैन्याच्या खर्चाकरिता अहमदाबाद जिल्ह्यातील कायमचा इजारा त्याने ब्रिटिश सरकारच्या ताब्यात दिला. मात्र त्यात अशी अट घातली की, त्यांनीच पेशव्यास दरसाल साडेचार लाख रुपये द्यावेत; त्या प्रदेशाचे उत्पन्न १७,११,९६९ आकारिले होते, म्हणजे नक्की उत्पन्न जवळजवळ १२,६२,००० रुपयांचे झाले.[१]

पहिली देवघेव

बाजीरावाने ब्रिटिश सरकाराला जो मुलूख नुकताच दिला होता त्यापैकी काही आपण घेऊन त्याचे मोबदला आपला काही मुलूख त्यास देण्यास फत्तेसिंग खूष होता. त्याप्रमाणे त्यांनी अहमदाबाद जिल्ह्यातील (हवेली, दसक्रोई आणि महिकांठा शिवाय करून) १,६५, ३१३ रुपयांचा आपल्यापैकी मुलूख आणि पेटलादपैकी २,०७,९१८ रुपयांचा भाग दिला. त्याच किमतीचे डमई, बहादरपूर आणि सावळी हे प्रांत त्यास मिळाले. या अदलाबदलीचे योगाने उत्तर गुजराथेतील ब्रिटिश लोकांचे ताब्यातील भाग एके ठिकाणी झाले; कारण तारीख १९ माहे सप्टेंबररोजी पेशव्यांनी आम्ही अहमदाबाद जिल्ह्यावरील सर्व हक्क कंपनी सरकारास दिले आहेत असे गायकवाडास कळविले, म्हणजे त्यांनी सालीना साडेचार लाख रुपये न देता, पेशव्यांनी आपले पदरी असलेले ब्रिटिश सरकारचे पगारी सैन्य वाढविले.

---

१. बाजीरावाने अहमदाबादचा इजारा पुन्हा परत न देण्याच्या इराद्याने घेतला; पण फारच कमी किमतीला तो पुन्हा गायकवाडाच्या हातात कसा आला हे ध्यानात धरण्यासारखे आहे.

ही पहिली प्रदेशाची देवघेव फारच सढळपणाने झाली आणि त्याचेयोगाने गायकवाडांचा प्रत्यक्ष फायदा झाला; कारण अहमदाबाद शहराच्या गायकवाडी वसुलापैकी एक तृतियांश भाग अशा तऱ्हेचा होता, की ब्रिटिश सरकारास तो वसूल करून घेताच येईना आणि गायकवाडांना मिळालेली शहरे ऐतिहासिक महत्त्वाची होती. उदाहरणार्थ - अगदी पूर्वी मिळालेले डमई तसेच सावळी येथे गायकवाडांच्या मूळ पुरुषाचा अंत्यविधी झाला होता. दुसरे आणखी असे सांगितले पाहिजे, की ब्रिटिश आणि गायकवाड सरकार हे गुजराथची जुनी राजधानी म्हणून अहमदाबादेस फार महत्त्व देत असत. ज्यास ते शहर मिळाले त्याचा मोठा फायदा झाला असे समजले जाई; परंतु आज आम्हास त्याची मुळीच अटकळ होत नाही.[१]

दुसरी देवघेव

सन १८१७ सालचा पुरवणीदाखल जो तहनामा झाला त्यातील एका कलमाबद्दल लिहावयाचे आहे; ते कलम आठवे. त्याचेप्रमाणे १ हजार लोकांचे सैन्य चांगले हत्यारबंद, त्यास नियमित पगार देऊन रेसिडेंटाच्या अधिकाराखाली ठेवण्याचे गायकवाडांनी कबूल केले. आता दुसऱ्यावेळी देवघेव काय झाली ती पाहू. गायकवाडांनी कपडवंज, मालज, कडोद आणि दुसरी काही खेडी दिली आणि त्याच्या मोबदल्यात त्यांना विजापूर आणि कडीचा टप्पा समा हे मिळाले. बक्षीस म्हणून कंपनी सरकाराने गायकवाडास उखामंडळ आणि बेट ही नजर केली; कारण त्यांच्यात दोन हिंदू देवस्थाने होती.

तिसरी देवघेव १८१८

काही दिवसांनंतर अहमदाबाद जिल्ह्यातील गायकवाडांची हवेली व इनामगाव दुमालगावसहित दसक्रोई फत्तेसिंगाजवळ ब्रिटिश सरकारने मागितली. सन १८१८मध्ये त्यांनी ती गावे देऊन पेटलादमधील काही जमीन, सुरत अठ्ठाविशीमधील काही ठिकाणी ज्यांस मोगलाई असे म्हणत असत, आणि पुढे मोता कसबा व तरकसीर परगणा एवढे घेतले. पुढे पेटलादमधील जो पेशव्यांचा भाग होता तोही उमरेठ त्यांना देऊन गायकवाडांनी घेतला आणि सिद्धपूर हे क्षेत्र असल्यामुळे ते त्याला देण्यात आले.

ही जी शेवटची देवघेव झाली तेच बहुतेक फत्तेसिंगाच्या हातचे शेवटचे राजकीय कार्य होय. नुसता पाच दिवसांचा ताप येऊन तारीख २३, माहे जून सन १८१८ रोजी २६व्या वर्षी तो मरण पावला. याचे मरण काही विश्वासघाताने झाले असावे असा संशय आहे. या तारखेपासून बडोदे संस्थानाच्या इतिहासाच्या नव्या स्वरूपाची सुरुवात झाली.

सन १८१७

परंतु, या गोष्टीपासून आपणास दुसऱ्या मोठ्या आणि सार्वत्रिक महत्त्वाच्या गोष्टीकडे काहीवेळ वळले पाहिजे. तारीख ६, माहे नोव्हेंबर सन १८१७ रोजी पेशव्यांनी रेसिडेंटावर

---

१. मराठे व ब्रिटिश कसे शांतपणे गावाची अदलाबदल करीत होते हे बघण्यासारखे आहे. मुख्यत्वेकरून लोकांचे हित बघण्यात येत नसे; पण कोणत्या गावचा वसूल जास्त होईल इकडे लक्ष जात होते.

आणि पुण्यास जी काही थोडी ब्रिटिश फौज होती तिच्यावर एकदम हल्ला केला. त्यापुढे आठ-दहा दिवसांच्या आतमध्येच ब्रिटिश सैन्य त्याच्या राज्यात शिरले व तो फरारी झाला.

त्या महिन्याचेच अखेरीस नागपूरचे राजानेही तसाच प्रयत्न केला आणि त्याचा परिणामही तसाच झाला. डिसेंबर महिन्यामध्ये मल्हारराव होळकर उठले आणि महिदपूर येथे पेंढारी लोकांचा पाडाव करण्याकरिता दक्षिणेत जमविलेल्या मोठ्या फौजेच्या हातून पराभव पावून बसले. त्यावेळी ब्रिटिश सरकाराला जेवढी मदत मिळेल तेवढी पाहिजे होती. फत्तेसिंगाने त्यास चांगली मदत दिली; कारण गुजराथेतील सर डब्ल्यू. केर यांच्या सैन्याला मदत करण्याकरिता त्यांनी माणसांकडे व पैशांकडे पाहिले नाही. प्रसिद्ध केहमाल-उद्दीन यांचे अधिपत्याखाली दोन हजार घोडेस्वारांची मदत दिली. केहेमालउद्दीन या मोहिमेत मरण पावला.

तेव्हा मागील भागांतून आम्ही ज्या गोष्टीचे वर्णन केले आहे त्याच्या अर्थाचा (महत्त्वाचा थोडासा) विचार करणे योग्य होईल. आम्ही संस्थान हा शब्द संस्थानामध्ये राज्य करणारे मंडळ याअर्थी वापरला आहे आणि राज्यक्रांती हा शब्द त्या मंडळात एकदम आणि अपूर्व असा झालेला मोठा फेरबदल याअर्थी योजिला आहे. मराठ्यांनी गुजराथेवर स्वाऱ्या करून तो देश काबीज केला तेथील लोक स्वभावाने इतके गरीब आणि आज्ञाधारक असत, की त्यांचे भासण्यासारखे वजन त्यांच्या राज्यकर्त्यावर केव्हाही पडले नाही. म्हणून बडोदे संस्थानच्या या त्रोटक इतिहासामध्ये लोकांच्या शक्तीची व्याख्या देणे कठीण आहे; तथापि कर्नल वॉकर यांनी जे एक वाक्य लिहून ठेवले आहे त्यास पूर्णपणे लक्षात घेतले पाहिजे. ते वाक्य पुढे दिल्याप्रमाणे आहे – ''नेटिव्ह सरकारांचे अधिकार प्रत्यक्ष नियमांनी किंवा कायद्यांनी जरी बद्ध नव्हते, तरी राज्यकारभार चालीरीतींनी बांधला गेला होता. त्याचे योगाने जुलूम जरी थांबला नाही, तरी त्यांची मर्यादा ठरली गेली होती; कारण लोकांचे जे काही सामान्य मत असे त्यातच राजवचन अंशभूत झालेले होते, की लोरिवाजाचे सरकार उल्लंघन करणार नाही. याचे योगाने मिळणाऱ्या संरक्षणाचे माप अशाश्वत व अव्याख्ययित असे; परंतु सामान्यतः त्यामुळे सरसट्टा व घोर अशा जुलमाला प्रतिबंध होतच असे. मराठ्याकडे पाहिले पाहिजे म्हणजे असे आढळून येते की ते गुजराथेत लष्करी वेषाने आले. त्यांचेपैकी दाभाड्यांकडे त्यांचे कुटूंबांतून त्यांचा हस्तक दामाजी गायकवाड यांचे मुख्य अधिकार जाईपर्यंत सेनानायकत्व होते, तेव्हा आरंभी गायकवाड म्हणजे सारख्या दर्जाच्या लोकांचा नुसता आग्रणी होता; परंतु एखादे धामधुमीचे वेळी जर एखाद्या हुषार आणि हिंमतदार पुरुषास संधी मिळाल्या तर त्याचा उत्कर्ष फार त्वरित होतो. दामाजी हा अशा तऱ्हेचा मनुष्य होता आणि त्याचा उत्कर्ष होत असताना लष्करी वर्गाचे माहात्म्य (बळ) जरी फार होते तरी त्यांनी आपल्याबरोबर गुजराथेत आलेल्या लोकांचा अभिमान काढून टाकिला. परंतु पुष्कळ माणसांचा प्रभाव आणि एका व्यक्तीची शक्ती यांच्यात अंतर एवढेच असते, की संघशक्ती ही एकोपा व परस्पर विश्वास यांवर अवलंबून असते. दमाजीचे राज्य त्याचेपुरते जरी बळकट होते तरी त्याच्याभोवती पेशव्याच्या अधिक बळकट शक्तीचा गराडा पडला होता. दामाजी जेव्हा वारला तेव्हा त्याचे घराण्याचे पुष्कळ पक्ष झाले आणि त्या भांडणांत फत्तेसिंग हुशारीने जरी

काहीवेळ जय पावला, तरी तो मरेपर्यंत अशा संकटांत गुरफटलेला होता, की त्यांत लष्करी लोकांस सत्ता मिळविण्यास चांगली संधी होती; परंतु त्या लोकांत एकोपा नव्हता. भाड्याने आणलेल्या परकीय शिपायांना त्यांनी ती सत्ता मुकाट्याने घेऊ दिली. तथापि, लष्करी लोकांचे वजन कायम होते आणि पेशवे जरी रोडावत चालले होते तरी त्यांची सत्ता फत्तेसिंगाचे मरणापासून ते आनंदराव गादीवर बसेपर्यंत वाढतच चालली होती. गायकवाडांच्या या निःसत्वस्थितीमध्ये भाडोत्री लोकांचा उर्मटपणा वाढला. इतकेच नाही, तर कर्जदार लोकांचा कावेबाजपणाचा व्यवहारही फार वाढला; परंतु ब्रिटिश लोकांस हात घालण्यास जी उलथापालथ झाली ती या भाडोत्री वर्गाला, पेशव्याला आणि काही काळापर्यंत लष्करी आणि सावकार लोकांना घातक झाली. याचा मुख्य परिणाम असा झाला, की महाराजांचा अधिकार अनियत होऊन त्यांचेवर ठराविक कोणतेच बंधन राहिले नाही. ब्रिटिशांच्या पगारी सैन्याची स्थापना झाल्यावर थोड्या दिवसांत येथील लष्करी वर्गाचा नायनाट व्हावयाचाच होता. एरवी या स्वतंत्र राजास ज्या शक्तीने संकटांतून मुक्त केले होते आणि जिच्या आश्रयाने तो अजून गादीवर होता त्या एका शक्तीची काळजी करणे होती. काही वर्षांपर्यंत म्हणजे मुंबई सरकारच्या मध्यस्थीचा राग तर नसेच येत; पण उलटा तिचा चांगल्या रीतीने स्वीकार होत असे. म्हणजे लष्करी अरब लोकांना काढून टाकण्यात येत होते; घराण्यांतील विरुद्ध पक्ष दाबून ठेवण्यात येत होता. सावकारांचा शह दूर करण्यात येत होता. जुना यजमान व शत्रू जो पेशवे त्यांचा नाश होत चालला होता आणि सैन्याची संख्या कमी केल्यामुळे लष्करी वर्ग निर्जोरी होत चालला होता तोपर्यंत अशा प्रकारची वस्तुस्थिती, या शतकाचे पहिले वीस वर्षांत ब्रिटिश लोकांच्या मध्यस्थीने झालेल्या राज्यक्रांतीच्या आरंभी होती. पुढे ज्या गोष्टी घडून आल्या त्यामुळे या क्रांतीचा ओघ बदलला आणि त्यामुळे तिचा एकाएकी शेवट झाला. माळव्याच्या लढाईने लष्करी लोकांमध्ये नवीन आवसान आले, निदान तसा आमास होता आणि राजकीय व सांपत्तिक भय आणि अडचणी जसजशा नाहीशा होऊ लागल्या तसतसे परकीयांची या स्वतंत्र राजास पूर्वी सोसत असलेली मध्यस्थी खपेनाशी झाली. लहानपणी फत्तेसिंग कर्नल वॉकर आणि गंगाधरशास्त्री या समर्थ माणसांचा उपदेश ऐकत असे; परंतु पहिले गृहस्थ जेव्हा हा देश सोडून गेले व गंगाधर शास्त्री मेले, तेव्हा आपली स्वतंत्रता स्थापित करण्याचे त्यांनी प्रयत्न चालविले. त्यामुळे काटकसरीने राहण्याचा व लष्करी खर्च कमी करण्याच्याऐवजी कर्जदारांशी अंतस्थ व्यवहार करण्याकडे आणि लष्करी सुधारणा थांबविण्याकडे प्रवृत्ती झालेली दृष्टीस पडते. ही प्रवृत्ती पुढे इतकी प्रबळ झाली, की ढवळाढवळ करण्याचे सोडून देण्याचा आपला बेत मुंबई सरकाराने रद्द केला आणि पूर्वीची पद्धत कायम ठेवण्याचा त्यांनी निश्चय केल्यावर दोघांमध्ये सलोखा न होता, स्नेहभाव तुटला. नवीन राजाचे स्वभावामुळे अशी गोष्ट घडून आली आणि त्याची सत्ता वाढली असल्यामुळे पूर्वीपेक्षा आता त्यांच्यावर स्वाभाविकपणे फार अवलंबून होते – सयाजीराव गादीवर आल्यापासून इतिहासात झालेला फरक आम्हास दिसतो- पैशांच्या अडचणीची व्यवस्था स्वतः एकट्याने करण्याचे आणि परकीयांची ढवळाढवळ उडविण्याचे प्रयत्न राजा चालवितो; परंतु त्याचेपासून राजाची इच्छा

असेल त्याचेपेक्षा जास्त फायदा लष्करी लोकांचा होत नाही. कारभाऱ्यांचे वजन कमी करण्याकरिता जारीचा प्रयत्न सुरू होता, ज्याचेशिवाय गोविंदराव गादीवर बसल्यापासून राजांचे चालत नसे. रेसिडेंट, कारभारी आणि जामिनी मिळालेले प्रजाजन यांचे मदतीशिवाय एकट्याने राज्य करण्याचे नेटिव राजाने मनावर घेतल्यास त्याला किती दुःख व नुकसान सोसावे लागते, हे सयाजीरावाने आपल्या पुष्कळ मोठ्या कारकीर्दित चांगले सिद्ध करून दाखविले.[१]

●●●

१. सयाजीने ब्रिटिश सरकारच्याविरुद्ध वागण्याचे सुरू केले व त्याचा अनिष्ट परिणाम झाला. ह्याबद्दल विचार करताना हे लक्षात ठेविले पाहिजे की अठराव्या शतकाच्या शेवटच्या भागात व १९व्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांशात हिंदुस्थानात राजकीय स्थित्यंतर फार विलक्षण व जोराने चालले होते. पहिल्या फत्तेसिंगाची दोस्ती जोडण्यास पेशवा व इंग्रज या दोघांची फार इच्छा असे. सयाजीच्यावेळी ब्रिटिशांनी पेशव्याच्या जागी आरोहण केले होते, इतकेच नाही तर त्यांच्या हाती इतकी सत्ता आली होती, की त्याचा दहावा हिस्सा गायकवाडाजवळ नव्हता. गायकवाडाची स्वतंत्रता निव्वळ नावाची राहिली होती. ही स्वतंत्रता पाळण्याचे कामी कितीही प्रयत्न ब्रिटिशांनी खरेपणाने केले तरी संस्थानचा दर्जा खालच्या पायरीचा झाला होता व तो किती खाली गेला होता याची चाणाक्ष सयाजीलाही कल्पना नव्हती.

प्रकरण १७ वे

माउंट स्ट्युअर्ट एल्फिन्स्टन यांनी सयाजीरावास त्यांच्या वडिलांपेक्षा जास्त स्वतंत्र कसे केले ?

◘

फत्तेसिंग वारल्यानंतर त्याची पत्नी राधाबाई हिने सती जाण्याचा विचार केला; परंतु गायकवाड घराण्यातील, पण गादीला वारस होणार नाही इतका लांबचा एक मुलगा[1] दत्तक घेण्याची तीस मेजर कार्न्याक याने परवानगी देऊन तिचे मन फिरविले व स्पष्टपणे असे ठरविण्यात आले होते, की त्या दत्तकमुलाला आपल्या बापाची खासगी मालमत्ता वारसाने मिळावी. तखताबाईला मुले होती; परंतु आनंदरावाची ती लग्नाची बायको नसल्यामुळे त्या मुलांचे काहीच हक्क नव्हते. फत्तेसिंगाचा धाकटा बंधू सयाजीराव हा गादीचा खरा मालक होता. त्यावेळी त्याचे वय १९ वर्षांचे होते आणि त्यास रीजेंट म्हणून कबूल करण्यास मुंबई सरकाराने मुळीच आढेवेढे घेतले नाहीत. राधाबाई आणि तखताबाई यांनी हरकती काढल्या; परंतु त्या नाकबूल करण्यात आल्या. राधाबाईच्या महत्त्वाकांक्षेस दिवाण विठ्ठलराव भाऊ, दुसरे कारभारी, दरकदार लोक या सर्वांनी आणि राणी गहिनाबाईंनीसुद्धा उत्तेजन दिले. ह्याचे कारण असे होते, की सयाजीराव स्वतःच्या मनाप्रमाणे राज्य करील आणि आपल्या कोणाच्या उपदेशाची त्याचेकडे चीज होणार नाही हे या लोकांनी सयाजीच्या लहानपणातच ओळखिले होते.

त्याचे अनुमान बरोबर होते; कारण आजपर्यंतच्या एकंदर गायकवाडापेक्षा याची अधिकारावर आसक्ती विशेष होती. आजपर्यंत तो फार अभ्यासू, ममताळू आणि शांत वृत्तीचा या स्वरूपाने रेसिडेंटास माहित होता. दीर्घोद्योग व खानगी चरितांतील नियमितपणा हे गुण त्याच्यामध्ये सतत वागत होते. आणखी त्याचा दृढनिश्चय किती वाढत जाईल, परिवाराबद्दल त्याची किती

---

१. गोविंदराव गणपतराव गायकवाडाचा मुलगा व पिलाजी गायकवाडाचा भाऊ मालोजी याचा नातू व संखेड्याचा पहिला जहागीरदार होय. ह्याची गावमत्ता शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांनी हिसकून घेतल्यावर हा धारेस आश्रय धरून राहिला होता; व तेथे वेडा होऊन मेला. नंतर गणपतरावाचे कुटूंब बडोद्यास परत आले व फत्तेसिंगाने त्यास थोडीशी नेमणूक करून दिली, पण गोविंदरावाच्या दत्तकाने सयाजीस राग आला व त्यानंतर त्याला किंवा त्याच्या कुटुंबाला सुखाचा दिवस कधीच गेला नाही.



सयाजीराव गायकवाड - दुसरे (१८१९-१८४७)

साशंक वृत्ती राहील, त्याची प्रदर्शनासक्तीपेक्षा संचयप्रीती जास्त असल्यामुळे त्याची लोभाविष्टता किती दूरवर जाईल अथवा परिमित शिक्षणाने विकसित पावलेल्या दृढकर्तृक बुद्धी व हुशारीचा काय परिणाम होईल, याची अटकळ त्यावेळी कोणास होती?

सयाजीरावाच्या कारकिर्दीस सुरुवात झाल्याबरोबर त्यांचे त्यांच्या बलाढ्य स्नेह्यांशी तंटे व्हावे असे विधिलिखितच होते असे दिसते. त्यांचा द्वेष करणाऱ्या स्त्री-पुरुष समूहात तो एकटा होता आणि मुंबई सरकार आपल्यास मदत देण्यास तयार नाही असे त्यास वाटत असे. त्याची अशीही समज होती, की पेशव्यांचा पाडाव झाल्यावर बडोदे संस्थानास योग्य न्याय मिळालेला नाही. या दुसऱ्या मुद्याचा संबंध पूर्वीच्या गोष्टींशी असल्यामुळे त्याचा विचार प्रथम करू. पेशवे, नागपूरचे राजे आणि पुढे होळकर यांचे जेव्हा ब्रिटिश लोकांशी शेवटचे युद्ध झाले, तेव्हा फत्तेसिंगापासून मदत घेण्यास ते फार खूष होते. माळव्यामध्ये परकी पगारी सैन्यापैकी पुष्कळ सैन्य कामावर लावले होते असे नाही, तर लढाई चालली असता व त्याचेनंतरही संस्थानाच्या खर्चाने गायकवाडी घोडेस्वार पुष्कळ ठेवण्यात आले होते. सन १८१७-१८ मध्ये लढाईत ४० लाख खर्च करून दिलेल्या मदतीबद्दल लढाईत मिळालेल्या प्रांतामधील भागावर पूर्वीच्या तहनाम्यातील एका स्पष्ट कलमान्वये आपला हक्क आहे असे गायकवाडास वाटत होते; परंतु त्यास फायदा जो काय झाला तो एवढाच की पेशव्यास द्यावी लागत असलेली चार लाखांची खंडणी माफ झाली. पेशव्यांचे राज्य गेल्यामुळे हा अप्रत्यक्ष फायदा झाला होता, लढाईमुळे झालेला नव्हता. संस्थानाचा दुसरा एक मोठा अप्रत्यक्ष फायदा मुंबई सरकार दाखवित असे, तो हा की यानंतर संस्थान परकी राजांचे स्वारीपासून किंवा लुटीपासून मुक्त झाले.

सयाजीच्या असंतोषाच्या दुसऱ्या कारणाचा उल्लेख आम्ही केलाच आहे. या राजपुत्रास तारीख २, माहे ऑक्टोबर सन १८१९ रोजी मुखत्यारीचा अधिकार दिल्यावर लवकरच बिचारा आनंदराव मरण पावला. मरणापूर्वी काही दिवस यांनी अफू खाण्याचे सोडिले होते. मरणसमयी काही धार्मिक कार्यक्रमाकरिता यांचे डोके एका धोंड्यावर ठेविले होते आणि त्यांचे डोळे या जगातील त्यांचे अत्याभिलाषेची जी वस्तू त्या तिजोरीच्या खोलीकडे लागून राहिले होते. त्या तिजोरीच्या खोलीभोवती कुटुंबातील माणसांचे भांडण एकदम सुरू झाले आणि ते भांडण इतके वायफळ, क्षुल्लक व लांबलचक होते, की त्याचा नुसता उल्लेख करणेच पुरे आहे. सती जाण्याची भीती दाखविल्यामुळे राधाबाईचा काही फायदा झाला. तखताबाईंनी आपला नवरा मेल्यावरही तीच भीती घातली; परंतु त्याकामी त्यांचा खरोखर उल्हास नाही अशी समजूत झाल्यामुळे, त्यांच्या भीतीकडे कोणी लक्ष दिले नाही. आपल्याबद्दल व आपल्या मुलांबद्दल जो तोतयेपणाचा हक्क ती सांगत होती तो सयाजीस कळू न देण्याबद्दल रेसिडेंटाने तीस सांगितले. या खोट्या हक्काखेरीज वर सांगितलेल्या तिजोरीवर आपल्या नवऱ्याची खासगी जिंदगी म्हणून ती वारसा सांगू लागली; परंतु ती संस्थानाची मालमत्ता आहे असे सयाजीने सांगितले. काही महिन्यांपर्यंत ती खोली ब्रिटिश शिपायांच्या पहाऱ्यात होती (परंतु त्या खोलीस एक चोरदरवाजा होता आणि त्याचा उपयोग गुप्तरीतीने राजा करीत असे). पुढे मुंबईचे गव्हर्नर बडोद्यास येऊन त्यांनी या प्रकरणाचा आणि दुसऱ्या काही घरगुती तंट्यांचा निकाल लाविला. ब्रिटिश सरकारच्या

जामीनकीवर राणीस आणि तिच्या दोन मुलांस काही नेमणूक करून दिली आणि आईच्या मृत्यूनंतर मुलांनी एकंदर मालमत्तेचे विभाग करून घेतले. या दोघांपैकी बळवंतराव, जो यावेळी (१८१९-२०) गादीवर आपला हक्क सांगत होता तो अगदीच निरुपयोगी मनुष्य होता. तो आपल्या कामाची फारच हयगय करीत असे, आणि चैन मारण्यामध्ये त्याने स्वतःस कर्जही पुष्कळ करून घेतले होते. मरणकाळापर्यंत त्याने आपल्या ब्रिटिश पालकांस अतोनात त्रास दिला. दुसरा पिलाजी हा सयाजीचा कारभारी वेणीराम याच्या रागास बळी पडला; कारण पिलाजी त्यास लाच देईना. त्याने तो चांगला नागावला व आपले माणसांकडून हुकमाने त्याचे दोन नोकरही ठार मारविले. या वेणीरामासंबंधाने आपल्यास पुढे जास्त ऐकावयास सापडेल. अशारीतीने सयाजीच्या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांचा शेवट वाईट रीतीने लागला.

सयाजीशी जे लोक वाकडे गेले त्यांचे कोणाचेही चांगले झाले नाही आणि सूड उगविण्याचे कामात तो मनुष्य किती आग्रही होता याचे पुढील एक उदाहरण आहे. कै. फत्तेसिंगाच्या बायकोने आपल्या दत्तक घेतलेल्या (गोविंदराव) मुलाचा हक्क गादीवर सांगितला. तो खरा गायकवाड असल्यामुळे त्याच्या हक्कांत काही अर्थ होता, त्यामुळे सयाजीस फार भीती उत्पन्न झाली व त्यास फार कंटाळा आला. गोविंदरावास दत्तक घेतल्यामुळे त्यांचा गादीवर हक्क पोहोचत नाही हे ती वेडी बाई आणि तिचे मसलतगार यांस कबूल नसल्यामुळे, सयाजीला त्यांचा राग आला. त्याने पुष्कळ दिवसांपर्यंत तिची आणि तिच्या मुलाची नेमणूक बंद केली. ब्रिटिश सरकाराने आपली जामीनकी काढून घेतली. सन १८२६ साली राधाबाईने आणि गोविंदरावाने आपला हक्क सोडून दिला आणि मग त्यांस त्यांची नेमणूक मिळाली; परंतु सयाजीने आता आपण दिलेली वचने पाळण्याचे नाकारिले आणि गोविंदरावाचे नोकर पकडून त्यास कैदेत ठेविले. सरतेशेवटी या दोन्ही चुलतबंधूंचे भांडण मारामारीपर्यंत आले. गोविंदरावांनी आपल्या पहारेकऱ्यांची संख्या वाढविली आणि शिंद्यांच्या घराण्यांतील एका बाईशी त्याचे लग्न जुळविण्याबद्दलची शिष्टई तो ऐकू लागला. इकडे सयाजीरावांनी त्यास शहरात येऊ देण्याचे बंद केले. यामुळे ता. २२, माहे जुलई सन १८२९ रोजी एक चकमक उडाली. गोविंदराव हे रेसिडेन्सीशेजारी कॅप्टन बॅलेंटाईन यांचे एक घर होते त्यात आश्रय धरून बसले. त्यांनी सुमारे ८००-१००० लोक जुळविले आणि सयाजीराव आपल्या सैन्याने तेथे त्यांचा कोंडमारा करू लागला. अशी स्थिती सहा महिनेपर्यंत चालली. रेसिडेंटाने मध्ये पडण्याचे व गणपतीचे आणि दसऱ्याचे स्वारीकरिता त्या बाजूने रस्ता करून देण्याचे नाकारिल्यामुळे स्वाऱ्या निघाल्या नाहीत. सरतेशेवटी सरजॉन माल्कम हे सन १८३०मध्ये बडोद्यास आले आणि त्यांनी गोविंदरावाच्या लोकांचे पैसे चुकते करून त्यास बडतर्फ करण्याचा व गोविंदरावास सुरतेस नेण्याचा हुकूम केला. त्यांचे कर्ज वारण्याकरिता त्यांनी आपल्या एका नोकराचा हालहाल करून प्राण घेतला असल्यामुळे त्यांस जो दंड झाला होता तो देण्याकरिता त्यांचे नेमणुकीतील पैसे कापून घेऊन त्यांची बाकीची नेमणूक सुरू झाली. पुढे काही वर्षांनी (सन १८३५) त्यांस अहमदाबादेस नेले. तेथे त्यांच्यात आणि साजीरावांत जास्त भांडणे सुरू झाली आणि सयाजीरावाने फत्तेसिंगाच्या दोही बायकांची मालमत्ता आपल्या कब्जांत घेतली. तेथे ते कैदेतच होते आणि सन १८५३ साली

बंडखोर शिपायांच्या थापांवर त्यांनी विश्वास ठेविल्यामुळे त्यांस गायकवाड सरकारच्या स्वाधीन केले. त्यासमयी तो फारच गरिबीच्या स्थितीत होता आणि रक्तपितीची व वेडेपणची त्याचेवर चिन्हे दिसत होती. अशारीतीने सयाजीच्या आणखी एका शत्रूचा शेवट झाला.

आता आपण यांच्या कारकिर्दीकडे वळू. खरे म्हटले तर आनंदरावाच्या मरणापूर्वी तिची सुरुवात झाली होती. दरबारातील सर्व लोक त्यांचे शत्रू होते आणि आपल्यास कोणाचाही पाठिंबा नाही असे त्यांस वाटत असे. साधारण पोरसौदाच असल्यामुळे सयाजीरावास एखादा मसलतगार पाहिजे होता आणि दुर्दैवेकरून हिंदुस्थानातील एका हुशार बदभाषाची त्यांनी त्या जागेकरिता निवड केली. याचे कारण त्यांच्या हुशारीने तो चकीत झाला होता किंवा त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा असा समज होता की, त्यांचे रेसिडेंट मेजर कार्न्याक यांचेजवळ चांगले वजन होते आणि ह्या अयोग्य माणसावर त्याचा लोभ होता हेही खरे. गंगाधरशास्त्र्याच्या मागून धकजी दादाजी आला आणि पहिल्याच्या गुणावर दुसऱ्याच्या लुच्चेगिरीचे असे झकण पडले की, सन १८२० मध्ये एल्फिन्स्टन साहेबांनी पुढील शेरा केला –'गायकवाडाचे जे बोलणे होते ते केव्हाकेव्हा रेसिडेंटाच्या वर्गाच्या कारभाऱ्यामार्फत होत असते आणि सर्व तऱ्हांपेक्षा ही तऱ्हा बिलकुल इष्ट व उपयोगी नाही.' घडलेल्या गोष्टीवरून असे दिसते, की ब्रिटिश सरकार आणि सयाजीराव यांचेमध्ये जे सारखे वैषम्य चालू होते ते या पक्षाचे किंवा दुसऱ्या पक्षाचे गैरसमजुतीमुळे उत्पन्न झाले व वाढले. या गैरसमजुतीमुळे एका कवडी किमतीचे मनुष्यास दोन सरकारांस फसविणे संभवनीय झाले.

धाकजी दादाजी हा पहिल्याने बडोद्यास सन १८१६ साली एप्रिल महिन्यात आला. कॅप्टन कार्न्याकचे बापाची मुंबईस एक पेढी असे. त्याचा याचे घराण्यावर चांगला लोभ होता. म्हणून रेसिडेंटाने शास्त्र्याचे जागी नेटिव्ह एजंट म्हणून याची नेमणूक केली आणि फत्तेसिंगाला जरी तो प्रथम आवडत नसला तरी त्यास रेसिडेंटाचे पाठबळ असल्यामुळे दरबारात वजन लवकरच बसले. त्याने रेसिडेंटाची अशी समजूत केली, की आपण संस्थानचे ४० लाख रु. कर्ज होते ते पुढे सन १८१६ सालाअखेरीस ९४ लाख रुपये झाले, ते त्यांनी ५५ लाखांपेक्षा कमीवर आणून ठेवले असा समज होता. त्यावेळी पोतदारीची पद्धत सुरू होती व मागे सांगितल्याप्रमाणे, मागील सालाचे कर्ज फेडण्याकरिता व चालू सालाचे खर्चाकरिता संस्थान दरसाल कर्ज काढीत असे. हे कर्जाऊ पैसे हरिभक्ती किंवा संस्थानातील दुसऱ्या मोठाल्या पेढीवाल्यांपासून घेण्यात येत. हे पेढीवाले जे पैसे देत त्याचेवर शेकडा १२ टक्के व्याज घेत आणि त्याचेवर कसलीही जोखीम नव्हती. हे लागणारे पैसे बाहेरून आणण्याची भीती घालून, धाकजीने पेढीवाल्यांस शेकडा १२ बद्दल ९ व्याज घेण्यास लाविले. तो आणखीही एक पायरी गेला; कारण फत्तेसिंगाचे मर्जीविरुद्ध आपल्यास पोतदार करण्याबद्दल अणि मग मैराळ नारायण आणि हरिभक्ती यांस व्यापारामध्ये आपल्याइतका भाग घेण्याची परवानगी देण्यास रेसिडेंटाचे मन वळविले. असे त्यास करावे लागले; कारण स्वतःजवळ मुद्दल मुळीच नव्हतो आणि तो घालण्याचा विचारही नव्हता. खऱ्या पेढीवाल्यांनी जेव्हा साडेआठ लाख रुपये व्यापारात घातले त्यावेळी याने काहीच घातले नाही. त्याने रतनजी कानदासच्या भागीत काठेवाडची पोतदारीही याचप्रमाणे मिळविली आणि माळव्यामध्ये

जी मदतीसाठी फौज होती तिला रोख पैसे पुरविण्याचे महत्त्वाचे कंत्राटही त्यानेच घेतले. संस्थानाचा शेकडा तीन टक्के नफा झाला असे जरी दिसत होते तरी या सर्व धाटांची लबाडी अशी होती, की धाकजी प्रत्येकास लुटून आपली पिशवी भरीत होता. वसुलाचे कंत्राटदारास त्या वसुलाचे पैसे बरोबरवेळी भरण्याची हमी देऊन त्यांच्याजवळून शेकडा काही टक्के बटाई मारून मक्तेदारांना फसवी, सार्वजनिक पैसे स्वतःच्या खाती जमा करून आणि पुष्कळ बटई मिळाल्याशिवाय दरबारचा हिशेब नक्की न करून संस्थानाला बुडवित असे, असेच दुसरे प्रकार असत.

या मनुष्यास सयाजीरावांच्या मनातून कारभारी करावयाचे असे आले; परंतु दोन्ही सरकाराचे नोकर होण्यास मुंबई सरकार परवानगी देईना. म्हणून सन १८१९ साली सप्टेंबर महिन्यात धाकजीने महाराजांचीच नोकरी करण्याचे पत्करले आणि ता. १२, माहे ऑक्टोबर सन १८१९ रोजी तो दिवाण झाला. त्यास ३०००० रुपयांची इनामी गावे मिळाली आणि त्याच्या एकंदर पगाराची रक्कम १ लाख रुपये झाली. राधाबाई आणि तखताबाई यांचेविरुद्ध व सयाजीरावाचे तर्फेचे आपण आहोत असे दाखविण्याचा जरी त्याने आव घातला तरी त्याची कारकीर्द फार दिवस टिकली नाही; कारण त्याचेविरुद्ध फार तक्रारी सुरू झाल्या, तेव्हा मुंबई सरकाराला (त्यांना ही नेमणूक मुळीच पसंद नव्हती) संशय येऊ लागला आणि त्यांनी दिवाणाच्या जागेबद्दल आपला हक्क सोडला नसल्यामुळे सन १८२०च्या जानेवारी महिन्यात महाराजास सुचविले, की याने कामावरून दूर व्हावे. सयाजीरावाने हे म्हणणे आनंदाने कबूल केले; कारण धाकजी रेसिडेन्सीमध्ये म्हणण्यासारखे वजन नाही असे त्याला आता वाटू लागले होते. पैशांच्या पंचायती व दुसऱ्या काही कारणांमुळे मुंबईच्या कित्येक गव्हर्नरांनी बडोद्याचे भेटीची लक्षात घेण्यासारखी मालिका लावली. या मालेपैकी पहिल्या भेटीची यावेळी जरूर पडली. एल्फिन्स्टन साहेबांच्या भेटीची हकिकत देण्याकरिता धाकजीचा इतिहास सध्या बाजूला ठेवू.

वर्ष	एकंदर वसूल	खर्च
१८१२-१३	**६९,५३,४७९**	**६६,४१,४११**
१८१३-१४	**७४,९७,८७८**	**५९,२१,०४५**
१८१४-१५	**७३,६३,२५५**	**५८,१५,९८१**
१८१५-१६	**६७,१०,४१३**	**५७,३७,५०८**

संस्थानास झालेल्या जबर कर्जातून ज्या खुबीदाररीतीने मुक्त करण्यात आले तिची मागे हकिकत दिलीच आहे; परंतु कर्ज नाहीसे झाले नाही. पहिल्याने सावकाश व पुढे लवकर याप्रमाणे आता स्थिती वाईट झाली. सन १८१२-१३पासून सन १८१५-१६पर्यंत एकंदर वसूल ६ लाखांनी वाढला; परंतु एकंदर खर्च सुमारे ४० लाख रुपयांनी वाढला. ही स्थिती अधिक वाईट कशी झाली नाही याचेच आश्चर्य आहे. सन १८१२-१२मध्ये भयंकर दुष्काळ पडल्यामुळे गुजरात चोपून निघाले. आणि काठेवाड तर ओसाड पडले. अर्थात वसुलाचे उत्पन्न कामी आले आणि सन १८१४मध्ये पेशव्यांनी अहमदाबादचा महत्त्वाचा इजारा परत घेतला. यानंतर दोन सरकार आणि ब्रिटिश सरकार यांचेमधील राजकीय घासाघासीमुळे जे दंगे उत्पन्न झाले त्यामुळे आणि पेंढारी लोकांच्या मोहिमेच्या भीतीमुळे शिवबंदी सैन्यावर १६ लाख रुपयांचा

जास्त खर्च करणे भाग पडले. पुण्याच्या दु:खद शिष्टाईमध्ये सुमारे १८ लाख रुपये खर्च आला. पुढे पुढे फत्तेसिंग रेसिडेंटाशी मोकळेपणाने वागेनासा होऊन आपले हिशेब त्याच्यापासून लपवू लागला व यावेळी मोदीखान्याचा खर्च साडेसहा लाखांवर आला. वरकड खर्च ७ लाखांवर वाढला होता; परंतु हा सर्व दुष्काळाचा आणि वर सांगितलेल्या कारणांचा परिणाम होता. पेशव्यांचा ऱ्हास आणि नंतर गुजरातेमधील काही प्रांतांची देवघेव व दुसरे काही फेरफार झाल्यावर संस्थानचा एकंदर वसूल अजमासे ७४,४०,२९२ रुपये होता.

वसूल आणि खर्च याचेमधील अंतर संस्थानास जेव्हा कमी अनुकूल होऊ लागले तेव्हा कर्ज फेडणे कठीण होऊ लागले आणि व्याजाचा दर फार मोठा असल्यामुळे लोकांच्या कर्जाची रक्कम फुगली. माळव्याच्या मोहिमेने संस्थानाला फारच खर्च आला आणि दुसऱ्या पुष्कळ कारणांमुळे मागल्या सालांत झालेले काटकसरीचे फायदे नाहीसे झाले.

संस्थानचे कर्ज रु. १,९७,६६, २९७.

मि. एल्फिन्स्टन हे मुंबईचे गव्हर्नर सन १८१९ साली झाले आणि ते बडोद्यास माहे एप्रिल सन १८२०मध्ये आले त्यावेळी त्यास असे आढळून आले, की सन १८१९च्या फेब्रुवारी महिन्यात कॅप्टन कार्न्याक यास जरी असे वाटल होते की त्या सालच्या अखेरीस संस्थानचे सर्व कर्ज फिटून काहीतरी शिल्लक राहील, तरी तसे न होता त्याचेऐवजी एक कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज होते. या रकमेपैकी २७ लाखांपेक्षा अधिक रक्कम माळव्याच्या लढाईमुळे झाली. सन १८१७-१८ सालाकरिता सैन्याचा पगार तुंबला होता. त्याचे साडेपंचवीस लाख रुपये होते आणि काठेवाडातील व राजपिंपळयातील पलटणीबद्दल १० लाख होते. खरी गोष्ट अशी होती, की कित्येक खर्च झालेल्या बाबी रेसिडेंटास कधीही दाखविण्यात आल्या नाहीत आणि पलटणीचा पगारही तुंबला होता. याचे थोडेसे कारण असे की, दादाजीने व्याजाचा दर कमी केल्यामुळे पेढीवाले लोकांनी पैसे देण्याचे नाकारिले होते आणि थोडेसे कारण असे की, त्यांचा या कारभाऱ्यावर मुळीच विश्वास नसून ज्या त्या वेळची स्थिती कोणत्या थरास जाईल हे त्यास समजत नव्हते. तेव्हा अशा अडचणींतून पार पडण्याकरिता तीन प्रकारची कर्जे काढण्याचे ठरले. पाहिले अर्ध्या कोटीचे आणि ते दरसाल १२ लक्ष देऊन फेडावयाचे. दुसरे काठेवाडातील कर्जे देण्याकरिता २० लाख काढावयाचे आणि त्याची दरसाल तीन लाखांच्या हप्त्याने फेड करावयाची आणि तिसरे चालू खर्चाकरिता ३० लाखांचे पोतदारी कर्ज काढून ते सगळे दरसाल फेडावयाचे. हा दरसालचा ४५ लाखांच्या कर्जाकडे निरनिराळ्या महालांचा वसूल गहाणासारखा लावून दिला होता. या तिन्ही प्रकारच्या कर्जांना व्याजाचा धाकजीपणा हा अगदी कमी ९ टक्के किंवा सावकाराचा अतिजबर १२ टक्के नसून रीतसर शेकडा साडेदहा टक्के ठरविण्यात आला होता. पहिल्याने थोडीशी का - कू करून सयाजीरावाने पोतदार कर्ज देण्याचे ५० लाख कर्जावरील १२ लाखांचा हप्ता आणि हरिभक्तीचे जे ४२ लाखांचे कर्ज होते त्याचेबद्दल जेवढा हप्ता देता येईल तेवढा म्हणजे ३ लाख आणि माळव्या सैन्याबदद्ल सर जॉन माल्कम याचे १४ लाख रुपये बारा महिन्यांचे आत व्याजासह द्यावयाचे त्याने कबूल केले. असा अंदाज होता, की

वसूलाचे निदान ७१ लाख रुपये उत्पन्न होऊन खर्च ५६ लाख होईल व १५ लाख शिल्लक राहतील. खर्च कमी करण्याकरिता म्हणून आपल्या कारभाऱ्यांच्या नेमणुका एक तृतीयांशाने कमी करण्याचा सयाजीरावांचा उद्देश होता; परंतु तसे करण्यास त्यास परवानगी मिळाली नाही. कारण त्यावेळी सर्व मोठमोठे कारभाऱ्यांस ब्रिटिश सरकारची जामिनकी मिळाली होती आणि त्यामुळे महाराजांच्या विरुद्ध ते प्रकरण काही दिवस तसेच तहकूब राहिले. रसिडेंटाचे ज्यास पाठबळ होते अशा लोकांच्या नेमणुकाही कमी करण्याचा त्यांनी आपल्या कारकिर्दीच्या आरंभी घाट घातला. लढाऊ जहाजाला ही बाब अगदीच नवी होती सर्व खर्च कमी करण्याबद्दल एल्फिन्स्टन साहेबांनी त्यास परवानगी दिली; परंतु त्यांनी स्वतःचे सैन्यातील सैनिक कमी करण्याचे नाकारिले आणि मि. एल्फिन्स्टन यांनी या संबंधाने पुढील शेरा मारिला आहे : सैन्यामध्ये स्वाभाविकपणेच दोष असता व ते नुसत्या सैन्यामध्येच नव्हे तर सर्व संस्थानामध्ये उलथापालथ झाल्याशिवाय जात नाहीत गायकवाड संस्थानात जहागिरी थोड्या असून जहागीरदारांचे उत्पन्न बहुतेक त्यांच्या लष्करी पगारींतून व देणग्या वगैरे इतर बाबींतून असे व या इतर बाबी मोठ्या सरदारांच्या, अश्रितांच्या मोठ्या पगाराबरोबर व संस्थानांतील हाजरीच्या अनियंत्रित पद्धतीमुळे उद्‌भवतात.

युरोपियन अधिकारी नेमले गेल्याशिवाय हाजरीत सुधारणा होणे शक्य नव्हते व हा उपाय लोकांस इतक्यात पसंत होण्यासारखा नव्हता, तेव्हा त्याच्याबद्दल आग्रह न धरता जुना दोष तसाच पूर्णपणे राहू दिला.

खर्च कमी केल्यानंतर सर्व गोष्टी उत्तम प्रकारे चालण्याकरिता सयाजीरावांजवळ चांगला कारभारी असणे अत्यंत जरुरीचे होते आणि अशा मनुष्याची निवड करण्याचा पुढील प्रश्न होता. यासंबंधीचे काय झाले हे सांगण्यापूर्वी, मुख्य ज्या माणसामुळे हल्लीचा प्रसंग आला त्या धाकजीची कारकीर्द आपण शेवटास नेऊ.

धाकजीची दिवाणगिरी काढल्यामुळे सयाजीरावास आनंद झाला, तसेच त्या मनुष्याचे संस्थानावर ओझे न पडावे अशी त्यांची इच्छा होती; परंतु धाकजी उद्धटपणात आणि वाचाळतेत प्रवीण असल्यामुळे त्याने आपल्या स्वार्थाकरिता फार खटपट चालविली. ज्या धंद्यांत याचे कवडीचेही मुद्दल नव्हते ती पोतदारी आपल्याकडे राहावी अशी त्याची फार इच्छा होती. सरतेशेवटी त्याने आपला भाग १ ²/₄ लाखांस विकून टाकिला. नंतर मागे सांगितल्याप्रमाणे मुख्य पेढीवाल्यांपैकी सहाजणांनी आपलेकडे पोतदारी ठेवविली आणि यापुढे पोतदारांनी दरसाल ३० लाख रुपयांची घडामोड करण्याचे ठरवून टाकिले. सालीना ३०००० रुपयांची इनामी त्याचेकडे राहिली. त्याचा या खटाटोपीत फायदा झाला. या दोन्ही गोष्टींमुळे महाराज त्रासले आणि त्यांनी त्याच्यावर मोठमोठ्या रकमांची अफरातफरी केल्याचा पायाशुद्ध असा आरोप आणिला आणि त्यास १ ³/₄ लाख रुपये देण्याचे नाकारिले. त्याच्या लुच्चेगिरीची चांगली खात्री झाल्यावरून मुंबई सरकाराने आपली बहाद्दरी काढून घेतली, तेव्हा त्यांच्याच तोडीचा त्यांचा लुच्चा एजंट उमियाशंकर याचेजवळून घेऊन ७ ³/₄ लाख रुपयांची भरपाई त्या पैशांबद्दल त्याने केली आणि शेवटी त्याची सनदी काढून घेतली. नंतर तो मुंबईस गेला. आपले लोचटपणाचे शिताफीने कोर्ट

ऑफ डायरेक्टरला (कंपनी सरकाराला) आपली इनामी गावे परत देण्याची सयाजीरावास विनंती करण्यास लाविले. (सन १८३५) आणि सरतेशेवटी व्याजसुद्धा परत देण्यास महाराजास लाविले (सन १८४०); परंतु धाकजीला आपले ७$^{३}/_{४}$ लाख रुपये व्याजसुद्धा परत मिळण्याची फार आशा होती आणि त्याचे जुने पुरस्कर्ते मेजर (यावेळी ते सर जेम्स होते.) कार्न्याक हे मुंबईचे गव्हर्नर या नात्याने बडोद्यास यावयाचे असल्यामुळे सयाजीरावास फसविण्याची युक्ती त्याचे डोक्यात आली. त्याने सयाजीरावाचे मनावर असे ठसविले, की माझे स्वाधीन ५ लाख रुपये केल्यास आपण ज्या ज्या काही गोष्टी मिळण्याबद्दल उत्सुक आहात त्या देण्याबद्दल मी सर जेम्स कार्न्याक यांस भीड घालीन. अशी थाप मारल्यावर त्यास ती रक्कम तर मिळालीच; परंतु तेवढी लाच पुरी होणार असेही सांगितल्यावर आणखी १२$^{१}/_{२}$ लाखांचे वचन त्यास मिळाले. सयाजीरावास जे पाहिजे होते ते गव्हर्नर साहेबांनी मुळीच दिले नाही आणि धाकजीनेही सर जेम्स कार्न्याकजवळ त्या गोष्टीसंबंधाने केव्हाच गोष्ट काढली नाही, उलट आपणास पुन्हा नोकरीस ठेवण्याबद्दल महाराज साहेबांस सांगण्यास निर्लज्जपणे पाठीस लागले. आपण फसलो जात आहोत असा सयाजीस संशय येऊन त्यांनी गोपाळराव मैराळाची दोघा गुमास्त्यांनी मुंबईस जाऊन याप्रकरणी चौकशी करावी असे ठरविले. या गुमास्त्यांस त्या महाठकाने लाच देऊन त्यांच्या शिफारशींवर कबूल केलल्या १२$^{१}/_{२}$ लाखांपैकी ५ लाख धाकजीला पाठविण्यात आले. तथापि, काही दिवसांनी सयाजीस आपण फसत आहोत असा पुन्हा संशय आला आणि म्हणून त्याचा मेहुणा बडोद्याचा किल्लेदार याच्या हरिलाल नावाच्या मुनिमास पाठविले. तो धाकजीकडून लाच घेईना तेव्हा कर्जाच्या खोट्या आरोपावरून त्यास काही दिवस तुरुंगात ठेवण्याचे कामी धाकजीला जय आला; परंतु पुढे ती सर्व मुळापासून हकिकत सयाजीस नुसती कळली नाही तर मुंबई सरकारालाही कळली. या हकिकतीमध्ये ज्याने सन १८३७ साली गोराजी पोळ याचा नाश करण्याची मसलत केली होती आणि १८४६च्या सुमारास पैशांच्या मोठमोठ्या रकमा खाऊन आपले शेठ सामळ बेचर १ पेढीवाले यांच्या लहान मुलाचा खून केला, त्या बदमाश बाबा नाफड्याचा याचे मसलतीत साहाय्याचा सुद्धा समावेश होता. धाकजीच्या सर्व इतिहासापैकी एक विशेष मजेची गोष्ट अशी की, सर्व खऱ्या गोष्टी बाहेर पडल्यानंतरही त्याच्याकडे त्याची इनामी गावे त्याचे मरणापर्यंत (सन १८४६) ठेवण्याबद्दल मुंबई सरकारने आग्रह धरिला. तेव्हा मुंबई सरकारचा तो प्रिय होता, यावेळी समाजात काही आश्चर्यकारक नाही ही गोष्ट मुंबई सरकारास भूषणावह नव्हती.

त्याचप्रमाणे सन १८२० साली सयाजीराव चांगला कारभारी असावा असे मि. एल्फिन्स्टन यांस वाटले. सयजीरावास स्वतः निवड करण्याची इच्छा होणे यात काही विशेष नाही; परंतु दुर्दैवेकरून सयाजीरावांनी सर्व हिंदुस्थानातून असा मनुष्य शोधून काढिला की तो पहिल्या गृहस्थास कधीच पसंत पडावयाचा नाही. हा मनुष्य सीताराम होय यास मुंबई सरकाराने शास्त्र्याचे खुनानंतर हद्दपार करविले होते. तरीही सीतारामाची बडोदेदरबारी फार चाह होती आणि १८१६मध्ये आनंदरावाने त्याच्या नेमणुकीत २०,००० रुपयांची भर केली होती; परंतु सयाजीरावाची त्याच्यावर विशेष भक्ती असे ते त्यांचा नेहमी सल्ला घेत असत. सीताराम मरेपर्यंत (सन १८२३) त्यास बडोद्यात ठेवण्याकरिता

सयाजीराव झटत होते; परंतु त्यास कारभाऱ्याचे जागी आणता येत नाही असे म्हणून महाराजास बाह्यतः दुःख दाखवून त्याजागी कोणाचीही नेमणूक झाली तरी आपण बेफिकीर आहोत असे दाखविले व खरोखरीच बाबाजीचा मुलगा विठ्ठलराव भाऊ याची नेमणूक त्याने काट्याने कबूल केली. गोविंदरावांनी गादीवर हक्क सांगितला होता तेव्हा या गृहस्थानी त्यांचा पक्ष घेतला होता हे आपल्याला माहीत आहेच. असो, विठ्ठलरावाची नेमणूक झाली; परंतु त्याने केव्हाच आपला मोठा अधिकार गाजविला नाही, असा थोडक्याच दिवसांनी त्याचेजागी त्याच्या नावाचा विठ्ठलराव दिवाणजी नावाचा माणूस आला किंवा त्याने हलकेहलके त्यास काढून आपण त्याची जागा बळकाविली असेही म्हणता येईल; कारण आरंभापासून यांची व त्यांची कचेरीत सांगड घालण्यात आली होती. विठ्ठलरावाचा भाऊ १८२८मध्ये वारला आणि सयाजीरावाच्या मनात त्याचेविरुद्ध डाव असल्यामुळे त्याचा दत्तक मुलगा भास्करराव याला फार निर्दयपणाने त्याने छळले; कारण तो ब्रिटिश सरकारच्या छत्राखाली होता. बाकी तो मूर्ख व दुष्ट मनुष्य असल्यामुळे त्या छत्रास तो पात्र नव्हता. इतर लोकांप्रमाणेच तो महाराजाचे द्वेषाला आणि वेणीरामाचे सुडाला बळी पडला. बहाद्दरीची पद्धत किती निरुपयोगी होती याचे हे चांगले उदाहरण आहे.

तेव्हा आता विठ्ठलराव दिवाणजी हे कारभारी झाले. वडीच्या लढाईमध्ये त्याने चांगली नोकरी बजाविली आणि काठेवाडात बाबजीचे हस्तक असताना त्याने मल्हारराव गायकवाडाचा पाडाव करून त्यास कैद केले होते. तसेच नंतर बाबाजीचे जागी काम करताना त्याजागी त्याची नेमणूक झाल्यावर त्याने तो सुभ्याचे काम करीत असताना संस्थानाची नोकरी फारच उत्तम तऱ्हेने बजाविली. त्याने संस्थानाची हद्द व संस्थानाचा वसूल बराच वाढविला तथापि एवढी एक गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे, की काठेवाडचे राजावर आपले वर्चस्व बसविण्याकरिता त्याने ज्या काही अन्यायाच्या खटपटी केलेल्या होत्या त्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना कळल्या नाहीत आणि दुसऱ्या प्रकरणात त्याने त्यास साहाय्य दिले असल्यामुळे तो त्यांचा आवडता झाला. काही दिवसांपर्यंत सयाजीराव आपल्या कारभाऱ्यावर फार खूष होते. त्याला जी ६०,००० रुपयांची नेमणूक करून दिली होती, त्यास ब्रिटिश सरकार जामीन राहिले होते आणि त्याच्या दुसऱ्या नेमणुकांची रक्कम ६,५०० रुपयांवर होती; परंतु आपला कारभारी आपलाच नोकर नाही तर रेसिडेंट ज्या काही सूचना करतात त्या तो फार खूशीने कबूल करवितो असा सयाजीरावास पुढे काही दिवसांनी संशय येऊ लागला. तो जितका त्यास पहिल्याने आवडत असे तितका त्याचेबद्दल त्याला द्वेष वाटू लागला. तथापि, विठ्ठलरावाची नेमणूक १,०५,०० रुपये केल्यानंतर तारीख १ एप्रिल, सन १८२७ हा मनाचा ग्रह फिरला.

सयाजीरावाचा त्याचे दिवाणाशी बिघाड का झाला हे निराळ्या भागात सांगण्यात येईल. संध्या मि. एल्फिन्स्टन साहेबांच्या बडोद्याच्या आगमनाने दुसरा आणखी काय परिणाम झाला तिकडे अपण वळू; परंतु त्याचेपूर्वी सयाजीराव आणि त्याचा दिवाण यांचेसंबंधी एका हुशार ब्रिटिश अधिकाऱ्याने थोडेसे लिहून ठेवले आहे, त्याचा सारांश येथे देतो. सयाजीरावाचे अंगात सामर्थ्य असल्यामुळे साधारणतः बडोद्याच्या कारभाराची मुख्य व्यवस्था आपले हातात ठेवण्याची त्यांची इच्छा असे. बाकी निरनिराळ्या प्रवृतींचे सल्लागार येत त्याप्रमाणे त्यांची राजनीती

बदलत असे. किंबहुना सयाजीरावास कारभाऱ्याची नेमणूक आवडत नसे हाच त्यांचा हुशारीचा दाखला आहे; कारण दिवाणाचा त्यांचे संस्थानात उगीच खर्च येतो व तो व्यवहार तुटला होता; कारण महाराजाला खर्चाशिवाय महसूल गोळा करून देण्याचे ब्रिटिश सरकाराने कबूल केले होते. तथापि, या बाबतीतही भांडणे उपस्थित झालीच.

आता फेरबदल काय झाले, त्याचाच तेवढा विचार करावयाचा राहिला. राज्यकारभारामध्ये रेसिडेंटाचे आता कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष अंग नव्हते. तथापि पैशांच्या सर्व व्यवस्थेसंबंधाने त्यास माहिती द्यावी लागे आणि विशिष्ट प्रसंगी त्यांना स्वतःचा सल्ला दयावयाचा असे किंवा त्याचे सरकारने दिलेली कामे कळवावयाची असे. नेटिव्ह एजंटाचे महत्त्व अगदीच कमी करण्यात आले होते. परदेशीय प्रकारणाशिवाय महाराज स्वतंत्र होता आणि ब्रिटिश सरकारच्या संमतीने आपला दिवाण निवडण्याची त्यास मुभा मिळाली होती. एकंदरीत सयाजीरावाची कारकीर्द बऱ्याच भरभराटीने सुरू झाली. कर्ज होते; परंतु ते फेडण्याचा मार्ग सरळ आणि सोपा होता. काही दिवाण व सावकारांना ब्रिटिशांच्यामार्फत वचने दिलेली होती; परंतु ती विशेष बिकट नव्हती. निदान दुसऱ्या गायकवाडाने जी स्वतः दिली होती व पाळली होती त्याच्यामानाने ती काहीच नव्हती. राजा अगदीच स्वतंत्र नव्हता; परंतु तो आपल्या भावापेक्षा व बापापेक्षा पुष्कळ मोकळा होता. एकंदरीत गायकवाडाची आणि ब्रिटिश सरकारची घासाघासी होण्यासारखी स्थाने फारच थोडी होती. तेव्हा सयाजीराव आणि मुंबई सरकार हे परस्परांत कोणत्याही प्रकारची घासाघासी न होऊ देता सलोख्याने राहतील काय किंवा लहान-मोठ्या मतभेदांचे मोठे अवडंबर करून त्याच्यासंबंधाने भांडतील व त्याच्या फलस्वरूप परस्पर दोषारोप करतील? छे! ते अशक्य! पण ते पुढे समजेल.

●●●

प्रकरण १८ वे

करारप्रमाणे सयाजीरावास वागण्यास लावण्याचा सर जॉन माल्कमने कसा प्रयत्न केला आणि त्याच्या राज्याचा पुष्कळ भाग कसा तोडून घेतला?

◘

जरी पुष्कळ मुख्य प्रश्नांसंबंधाचा निकाल सयाजीराव आणि मि. एल्फिन्स्टन यांच्या परस्पर समजुतीने झालेला होता, तरी काही मुद्दे तसेच न ठरता राहिले होते आणि त्यांचा निकाल महाराजांस प्रतिकूल झाल्यामुळे त्यांची मर्जी खप्पा झाली होती. त्यांच्यापैकी काही मुख्य असे होते, की काठेवाडचा जो भाग पेशव्याच्या अमलात होता त्यातील खंडणीचे गायकवाडाचे हक्क मुंबई सरकाराने कबूल केले नाहीत. अहमदाबादच्या बाजूचे खेडा तालुक्यातील व खंबायतच्या नवाबाचे राज्यातील असेच काही त्याचे हक्क मुंबई सरकाराने नाकबूल केले होते. वरील खंडणीची उत्पत्ती कशी झाली हे १४व्या भागात सांगितले आहे आणि त्याचे हल्लीचे उत्पन्न ८व्या परिशिष्टात दिले आहे. स्थलसंकोचामुळे आम्हांस यासंबंधाने फारसे लिहिता येत नाही; परंतु त्यात एवढे सांगण्यासारखे आहे, की गायकवाडाचे मागणे खंबायतच्या नवाबाने नाकारल्यामुळे नवाब मुंबई सरकारच्या छत्राखाली होता तरी त्यास लढाईची भीती दाखविण्याची गायकवाडास परवानगी देणे मुंबई सरकारास भाग पडले. सन १८१४मध्ये नवाबाची सत्ता बळकावून त्याच्या वसुलाचा गायकवाडाने चार वर्षे उपभोग घेतला. याप्रमाणे तीन लाखांचा वसूल जप्त केला; परंतु सन १८२१मध्ये मि. एल्फिन्स्टन यांनी असा निकाल दिला, की सालीना २५,००० रुपयांचा जो गायकवाडांचा हक्क व जप्त केलेली गावे नवाबास परत द्यावी; परंतु पुढील नुकसान व्याजातून भरून निघेल एवढी रक्कम आपलेजवळ ठेवावी. याचेपक्षा चांगल्या सवलती आपल्यास मिळतील अशी गायकवाडांची आशा होती आणि यावेळी गुजरातच्या इतिहासातील उलथापालथ ब्रिटिश सरकाराने केली नसती तर हा कर जरी आजपर्यंत सारा चारच वेळा घेतला होता तरी तो कायमचा झाला असता व प्रत्येक खेपेस नवाबाने हा केवळ जुलूम आहे असा वाद घेतला असता.

ब्रिटिश सरकारचा पश्चिम हिंदुस्थानात बसलेल्या अमलाचा बडोदे संस्थानावर या आणि दुसऱ्या अनेक रीतीने कसा दोन प्रकारचा परिणाम होत होता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. एका बाजूने पेशव्याचा जुलूम बंद झाला आणि काही तहनाम्यांच्या कलमान्वये गायकवाडी गादी कायम झाली. दुसऱ्या बाजूने गायकवाडाची काठेवाड मही, रेवाकाठी आणि शेजारच्या दुसऱ्या मांडलिक संस्थानामध्ये आपली सत्ता वाढविण्याची बंदी झाली. सन १८१८मध्ये पालनपूरचा राजा फत्तेखान हा तरुण होता. त्याचप्रमाणे राधनपूरच्या आणि कच्छचे रण, सिंध आणि मारवाड यांच्या सीमेवर जी लहान-लहान संस्थाने होती त्यांच्या संरक्षाणार्थ एक पॉलिटिकल एजंट नेमण्यात आला. पुढे काही वर्षांनी सन १८२५मध्ये शिंद्याचा पावनगड, पंचमहाल, बरिआ, राजपिंपळा आणि छोटा उदेपूर यांच्यावर एक पॉलिटिकल एजंट नेमण्यात आला आणि त्याला गायकवाड सरकार आणि त्यांची सावळी, संखेडा, तलकवाडा आणि दुसऱ्या काही ठिकाणची मेवासी प्रजा याचेमध्ये मध्यस्थी करण्याचा अधिकार दिला. ब्रिटिश सरकारमध्ये पडण्याचे पूर्वी लहानसहान नफे-तोटे, स्वाऱ्या, खंडणी यांजबद्दल तंटे सारखे सुरू असत; परंतु ते मध्ये पडल्यावर सर्व हक्कांची चौकशी होऊन त्यांचा एकदम सादयंत निकाल झाला आणि हा सर्व क्षणभंगुर प्रकार होता, त्यास एकदम स्थिरता आली. लोकांच्या आशा व महत्त्वाकांक्षा रसातळास जाऊन त्यांची निराशा झाली. त्यांच्या जुन्या सवयी बंद पाडल्यामुळे त्यास हे संकट वाटून नव्या व्यवस्थेपासून जे खरोखर महत्त्वाचे फायदे लक्षात आले नाहीत यात काही आश्चर्य नाही. याचे उदाहरण – राजपिंपळा संस्थानाच्या गादीच्या वारसासंबंधी झालेल्या वादाचे परीक्षण केले म्हणजे लक्षात येईल. त्योवळी संस्थान लुटण्यास गायकवाडास चांगली संधी मिळाली होती. ब्रिटिश सरकाराने मध्यस्थी करून वाद निकालास लावला व गायकवाडाला अटकाव झाला.

आता आपण बडोदे संस्थानाच्या आतील व्यवस्थेकडे वळू. मि. एल्फिन्स्टन हे बडोद्यास येऊन गेल्यावर बऱ्याच वर्षांनी राणी गहिनाबाई वारली. मरेपावेतो तिचे सयाजीरावावर चांगले वजन होते. या वजनाचा उपयोग महाराजांची द्रव्यसंचयाची स्वाभाविक वृत्ती प्रबल करण्याकडे झाला. तो वसुलाचे इजारे देण्याबद्दल व गुन्हेगारांस केलेल्या दंडाची माफी करण्याबद्दलही झाला. महाराजांची पैसे गोळा करण्याची इतकी हाव असे की, तिचेकरिता संस्थानचे पैसे योग्य ठिकाणीही खर्च केलेले नाहीत असे दिसते. महाराजाने जो मार्ग पत्करला होता तो सकृतदर्शनी जरी लबाडीचा दिसतो तरी त्याचा मुख्य उद्देश ब्रिटिश सरकारची ढवळाढवळ व देखरेख, परक्याची जामीनकी व तसेच बाह्य मदतीवर अवलंबून असलेले सावकाराचे वर्चस्व यांचेपासून आपली सुटका करून घेण्याचा असेल, असे असण्याचा संभव आहे. कसेही असो, हल्ली मिळालेले कर्ज वारण्याची दिलेली वचने सयाजीने मुळीच पाळली नाहीत. सन १८२३-२४ सालानंतर एकंदर स्थिती इतकी पंचाइतीची झाली, की महाराजास न रुचण्यासारखा सल्ला देणे रेसिडेंटास भाग पडले हे निर्विवाद आहे. कनर्जापैकी काहींची खासगी तिजोरीतून फेड करावी आणि हे तुम्हांस सहज करता येईल अशी त्यास रेसिडेंटाने शिफारस केली; कारण खासगी तिजोरी जितक्या झपाट्याने भरत चालली होती तितक्याच जलदगतीने राज्याचा पैसा

नाहीसा होत होता. रेसिडेंटाने दिलेला सल्ला पाळण्याचे यावेळी सयाजीने साफ नाकारिले[1]; तरी जवाहिर व वडिलोपार्जित मालमत्ता मिळून महाराजाजवळ ५५ लाख रुपये होते आणि त्याने आजपर्यंत संस्थानापैकी ४४ लाख जमा केले होते. हे सर्वांस विदित होते तेव्हा गहिनाबाईच्या मरणानंतर सन १८२७पर्यंत हमी दिलेले कर्ज फेडण्याला महाराजाने आग्रहाने जो नकार लाविला होता त्याचेविरुद्ध मि. विल्यम्स यांस अधिक वाईट रिपोर्ट करणे भाग पडले. त्याने ता. ३१ मेरोजी जो खलिता पाठविला त्यात संभवित गृहस्थांना आणि मुख्यत्वेकरून संस्थानच्या सावकारांना महालांचे सप्तवार्षिक कौलनामे देण्याचे सयाजीरावाने कबूल केले, असे लिहिले आहे. ही मोठीच सुधारणा झाली असे त्याला वाटले; कारण संस्थानच्या तिजोरीची जी अव्यवस्था झाली होती ती विशेषतः खर्च वाढल्यापेक्षा उत्पन्न कमी झाल्यामुळे झाली होती. दरसाल ज्यांच्या योग्यतेबद्दल व साधनाबद्दल संशय आहे अशा लोकांस महालांचे वार्षिक इजारे दिल्याचा हा तात्कालिक परिणाम होता. हे लोक महालांचा कौल फार कमी दराने घेत असत; परंतु रयत लोकांपासून वाटतील तसे पैसे उकळीत असत आणि महाराजास खासगी नजराणे देऊन त्यांचे पाठबळ विकत घेत असल्यामुळे त्या लोकांचे महाराज चालू देत असत. आता खासगी नजराण्याचा तोटा व सयाजीरावानी पसंत केलेल्या लोकांच्या जागी हमी दिलेल्या संस्थानच्या सावकाराची प्रतिष्ठापना ह्या गोष्टी सयाजीरवाच्या मनास येईनात आणि पुढे ॲक्टिंग रेसिडेंट मि. विलोबी आणि नेटिव्ह एजंट साराभाई यास १८३२मध्ये लॉर्ड क्लेअरने बडतर्फ केले होते असे सयाजीराव म्हणतो. याच्यावर त्यांनी आपल्यावर आणि आपल्या वकिलावर सन १८२७मध्ये वाटेल ते आरोप आणून ते मुंबई सरकारास कळविले असे मोघम आरोप आणिले, त्यावरून त्यांचे मन अतिशय अस्वस्थ झाले होते असे आम्ही अनुमान करितो.

तथापि, त्यांच्या संशयाचा आणि रागाचा परिणाम त्यांच्या कारभाऱ्यावरच फार वाईट रीतीने झाला. तारीख १, माहे एप्रिल सन १८२७ रोजी विठ्ठलराव दिवाणजी महाराजांचे फार प्रीतीतला होता आणि नंतर लवकरच त्यास तो फार कडक रीतीने वागवू लागला, हे आम्ही

---

१. संस्थानची व्यवस्था संस्थानाकडे सोपविल्यावर जी सांपत्तिक दुर्दशा झाली त्याचे आकडे या टिपेतच दिले आहेत.

मि. एल्फिन्स्टनची अशी समजूत होती की, एकंदर कर्ज १,०७,६६,२९७ रु. होते. परंतु पुन्हा बडोद्यास आल्यावर त्यास असे समजले की, २० लाख कर्जाची एक बाब आपणास कळवलीच नाही. आणखी दहा वर्षेपर्यंत हरिभक्तीचे ४० लाख रुपयांचे देणे मुंबईस सरकारास कळले नव्हते आणि सयाजीरावाने ठरलेल्या १५ लाखांऐवजी २५ लाख देणे देऊन टाकले होते; पण सैन्याचा पगार तुंबला होता. तेव्हा १८२०-२१ मध्ये संस्थानचे कर्ज १३२,२७,९८१ होते व राजपिंपळयाच्या स्वारीबद्दल ६,१२,००० रुपयांचे व सैन्याची बाकी चुकविण्याकरिता १५ लाख रुपये अशी दोन कर्जे काढली होती.

मि. एल्फिन्स्टनने असे भविष्यात्मक लिहिले की, काही दिवसांनी मामलेदारांना सयाजीच्या डावपेचाचा अनुभव येईल व त्यांना आपल्या नेमणुकीची शाश्वती न राहून जुलूम करतील आणि आपल्या मामलती राखण्यासाठी सयाजीलाच लाच देऊ लागतील.

(टीप - १ पुढील पानावर)

मागील भागांत सांगितलेच आहे. वर्षाच्या अखेरीस सयाजीरावाने त्यांना बडतर्फ केले आणि त्यांचा पगार वाढविण्याची अथवा सप्तवार्षिक कौलनामे देण्याची आपली मुळीच इच्छा नव्हती; परंतु मि. विलोबीच्या मदतीने विठ्ठलरावाने आपले हितार्थाची परिस्फुटता केली असे प्रसिध्द केले. नंतर सर्व प्रकारची कारस्थाने सुरू झाली आणि पदच्युत झालेल्या कारभाऱ्यास ब्रिटिश सरकारचे पाठबळ असल्यामुळे आपल्यास ठार मारण्याच्या खटपटी चालल्या आहेत, असे तो म्हणू लागला. या कारस्थानाचे परिणाम फारच भयंकर झाले; कारण १८२८मध्ये सयाजीरावाने वेणीराम आदितराम आणि प्रभाकर दीक्षित यास भाऊ पुराणिक म्हणत असत यास आपले सल्ला मसलतगार केले. यांचेपैकी पहिल्याच्या उपदेशाने महाराज त्यांनी कबूल केलेल्या कराराच्या फारच बाहेर गेला आणि त्यांच्या प्रजेपैकी ज्यांना ब्रिटिश सरकारशी हमी मिळालेली होती व तिजवर स्वरक्षणार्थ अवलंबून होते, त्याचेवर फिर्यादी करण्यास त्यांचे मन वळविले. भाऊ पुराणी

१८२५च्या सुमारास माहिती असलेले कर्ज १,३३,८१,३८९ इतके झाले होते. ता. ६ नोव्हेंबर १८२६ मध्ये केलेल्या ठरावाप्रमाणे सर जॉन माल्कमने महाळ तोडून घेतले तेव्हा अनुक्रमे येणेप्रमाणे कर्ज होते -

		रु.	रु.
१.	पाच सावकारांचे जुने १० लाखांचे व नवे मिळून	रु.२२,८०,०८८	रु.३०,७५,३०१
२.	हरिभक्ती व पाच दुसरे असामी यांचे चालू कर्ज	२५,००,००१	{ ७,८१,२५० १७,१०,७५१
३.	पाच सावकारांचे	१२,५०,००१	१२,७५,००१
४.	हरिभक्तीचे	१२,५०,००१	१२,७५,००१
५.	रतनजी मणिकचंदचे	१०,०७,४४१	२,२८,००८ नवीन १०,०७,००१
६.	हरिभक्तीचे सुमारे १५ लाखांचे कर्ज		१५,८८,६५१

नंबर १ देण्यासाठी बडोदे, शिनोर, सुरत अठ्ठाविशी, कडी, पेटलाद आणि विसनगर यांवर सात वर्षांचे वरत दिले होते. नंबर २ वर मनोती व पोतदारी मिळून १२ १/४ टक्के व्याज ठरवले होते. नंबर ३ साठी अमरेली, डभई, संखेडा, विजापूर यांवर वरत दिले होते. नंबर ५ साठी काठेवाडचा वसूल सात वर्षे लावून दिला होता. सर जॉन माल्कमने महाल तोडून घेतले तेव्हा संस्थानचे कर्ज वारण्याचे आपल्यावर घेतले. दरम्यान, लॉर्ड क्लुरच्या संमतीने सयाजीराव व सावकार यांची तोड झाली तेव्हाचे कर्ज :-

हरिभक्ती	रु. १४,६५,१७५
गोपाळराव मैराळ	रु. १९,७८,७९८
माणिकचंद	रु. ४,३३,६८५
	रु. ३८,७७,६५८

नारीसचे जागी मि.जेम्स विलियम्स आला व तो जागेवर असता १८ च्या नोव्हेंबरात मेला. दरम्यान बडोद्यातून रेसिडेंटास काढले असून मि. विलियम्स यास अहमदाबादेस दुसरी कामे करावी लागत.

जुन्या मताचा होता आणि वेणीराम दहा वर्षे आपल्या हुद्यावर होता. तेवढ्या काळात त्याने आपल्या यजमानामधील आणि मुंबई सरकारामधील भांडणे विकोपास नेणाऱ्या पुष्कळ गोष्टी केल्या. त्यास दिवाणाची जागा मिळू दिली हीच मोठी वाईट गोष्ट झाली असे आता वाटते. गोपाळ आत्माराम यास १८२९ साली जोडदिवाण नेमला आणि त्या जागेवर तो सन १८३३पर्यंत होता. त्या साली त्यास वेणीरामाच्या कारस्थानामुळे जावे लागले. गोपाळ आत्मारामाने महाराजास निराळे रीतीने वागण्याचा सल्ला दिला असता; कारण सयाजीरावाचे स्वार्थ साधण्याकरिता कलकत्त्याहून फेरी मारून आल्यानंतर ज्या मनुष्याने त्याची जागा पटकाविली त्याच्या आणि यांच्या आचरणामध्ये फारच मजेचे अंतर होते.

मि. एल्फिन्स्टन ता. २८, माहे नोव्हेंबर सन १८२७पर्यंत मुंबईचा गव्हर्नर होता आणि शेवटपर्यंत त्यांनी या कोमल अंतःकरणाच्या आणि संशयी राजास फारच अदबीने आणि सहिष्णुतेने वागविले. उदाहरणार्थ - विठ्ठलरावाची नेमणूक बंद करण्यास तुम्हास पूर्ण मुभा आहे असे त्याने त्यांस कळविले. पुष्कळ कर्ज होते ते वसुलावर हुंड्या देऊन व वार्षिक कर्ज काढून दोन वर्षांत फेडून टाकण्याची महाराजांची सूचना कबूल केली; परंतु त्याचवेळी त्यांनी त्यास स्पष्ट ताकिद दिली, की संस्थानच्या पैशांच्या अडचणी मोडण्याकरिता एक बरहसाची पद्धत योजिल्यास संस्थान फार धोक्यात येईल व मग वसुलाची व्यवस्था करण्याचे काम मुंबई सरकारास आपल्यावर घ्यावे लागेल; परंतु सन १८२७मध्ये एल्फिन्स्टन जाऊन सर जॉन माल्कम त्याच जागी आला आणि नव्या गर्व्हनराबरोबर नवी पद्धत सुरू झाली. सयाजीरावांचा जो हट्टी स्वभाव होता तो नरम करण्याकरिता फारच कडक उपाय योजणे जरूर आहे, असे माल्कम साहेबांस वाटले आणि त्याची कारकीर्द जर लवकर संपली नसती तर त्याचा उद्देश कदाचित साधलाही असता. त्याचेमागून लार्ड क्लेअर आला आणि माल्कम साहेबांनी अति कडक रीतीने केलेल्या गोष्टी त्यास अगदी नापसंत झाल्या. त्या गोष्टी फिरवून त्याच्यापासून काही फायदा झाला असता तो गमावला आणि त्यातील कडूपणा (कठोरपणा) मात्र शिल्लक राहिला. सर जॉन माल्कम यांचेकडून जबरीने त्या गोष्टी झाल्या होत्या. त्या मन वळवून व सौजन्याने करविण्याचा लार्ड क्लेअर यांनी प्रयत्न केला; परंतु त्यांस फारसे यश आले नाही. हे फार दिवसांचे भांडण निकालास लावण्याकरिता सर जेम्स कार्न्याक या चौथ्या गव्हर्नरची जरूर लागली.

१८२८मध्ये जे महाल पहिल्याने तोडून घेतले त्याची यादी

	रु.
पेटलाद (वसूल)	**५०६७३९**
बहियल,, ...	**८७४५४**
कडी,, ...	**२४९५०१**
डभई ,, ...	**९६४४०**
बहादरपूर } शिनोर ,, ...	**६४२८७**

अमरेली,, ...	**१२२९६५**
शियानगर ,, ...	**३५०१**
खंडण्या	
खेठवाड ,, ...	**१४२६५४**
महिकांठा ,, ...	**११९२१३**
रेवाकांठा ,, ...	**७९८२१**
दुसऱ्या बाबीं ,, ...	**७५१५०**
एकूण ,,...	**१५,४७,७२५**

हमी दिलेल्या सावकाराचे कर्ज एकदम फेडून टाकावे म्हणजे व्याजाची रक्कम फुगणार नाही ही सयाजीरावाची सूचना मि. एल्फिन्स्टन यांनी अमान्य तर केलीच नाही, उलट त्याबद्दल त्याची त्याने स्तुती केली. संस्थानच्या सावकारांनी एकदम पैसे घेण्यास नाकारण्याचे व सप्तवार्षिक कौलनामे करताना ज्या मुदती ठरविलेल्या होत्या तेव्हाच पैसे घेण्याचा आग्रह धरण्याचे काही कारण नसावे. तथापि त्यांनी नाकारिल्यावरून, सयाजीरावाने आपले कर्ज हप्त्याने फेडावे अशी मुंबई सरकारने मागणी केली आणि या मुद्यावरच शेवटी पुढे लवकरच सांगितलेला बिघाड झाला. आणखी सन १८२७ सालच्या अखेरीस सयाजीरावाने हमी दिलेला संस्थानचा पोतदार हरिभक्ती यास सोडून दिले आणि दुसऱ्या पेढ्यांकडून कर्ज काढण्याची व त्याची फेड करण्याकरिता वसूल लावून देण्याची सुरुवात केली; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. सरतेशेवटी सर जॉन माल्कमने त्यांस मागे कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने ज्या दोन जागा मार्गापैकी एक पसंत करण्याचा अधिकार दिला होता त्याच्यापैकी सौम्य होता तो पत्करला. तो मार्ग हा, की त्यांनी सर्व संस्थानची व्यवस्था आपले हातात घेतली नाही, तर त्यांनी ता. २८, माहे मार्च १८२८ रोजी जाहीरनामा काढून त्यात प्रसिद्ध केले, की गायकवाड संस्थानचा काही प्रांत आणि काही उत्पन्नाच्या बाबी काही दिवसपर्यंत तोडून घेण्यात येत आहेत. ब्रिटिश सरकारने ज्या पेढीवाल्यास हमी दिली आहे त्यांच्याशी जे पैशाचे ठराव झाले आहेत ते पूर्ण करण्याच्या उद्देशाने ही जप्ती केली आहे आणि हा उद्देश तडीस गेला म्हणजे मग खर्चाची भरपाई करून घेण्याचा विचार करावयाचा आणि तहाच्या अटी किंवा लोकांना जी वचने व हम्या दिल्या असतील, त्यांचे उल्लंघन पुढे केव्हाही होऊ नये म्हणून पूर्ण जामीनकी घेण्याचा विचार करावा लागेल.

सन १८३०मध्ये जे प्रांत तोडून घेतले त्यांची यादी

		रु.
पेटलाल	...	
बहियल	...	
पट्टण	...	**२,२२,८६२**
विसनगर	...	**५४,५९५**
वडनगर	...	**१३,५१७**
विजापूर	...	**१,००,६४१**

संखेडा	...	१७,८३६
	एकूण	४,०९,४५१

याचवेळी एक मोठी चमत्कारिक गोष्ट करण्यात आली. ज्या लोकांनी सप्तवार्षिक कौलनामे घेतले होते आणि ते बहुतेक संस्थानचे सावकारच होते त्यास ते कौलनामे सोडून देण्याबद्दल गव्हर्नरने हुकूम केला; परंतु त्याचवेळी त्यांना सांगण्यात आले की, यापासून त्यांचे जे नुकसान होईल ते त्यांना भरून देण्यात येईल. सरतेशेवटी त्यास सात लाख रुपये देण्याबददूल लॉर्ड क्लेअर यांनी गायकवाडास जबाबदार धरिले. सर जॉन माल्कम याने वरील महाल जप्त केल्यावर तो तारीख २८, माहे डिसेंबर सन १८२९ रोजी बडोद्यास आला आणि त्याने सयाजीरावास घोडेस्वार जास्त चांगल्या रीतीने ठेवण्यास ब्रिटिश सकरारशी व्यापारासंबंधी तह करण्यास आणि आपले नाणे सुधारण्यास हुकूम केला; परंतु दोन तृतीयांश घोडेस्वारांची अशी स्थिती होती, की सर जॉन माल्कम याचे मनातून ती सुधारण्याचे आले आणि काही दिवसांनी त्यांनी आणखी काही प्रांत तोडून घेतले. याचे कारण असे की, त्यांच्या उत्पन्नातून फौजेस नेमाने पगार देता यावा आणि त्या फौजेस त्यांनी ब्रिटिश अमलदारांच्या देखरेखीखाली ठेवले होते. आता सन १८३०पूर्वी संस्थानचे तीन सावकार म्हणजे खुशालचंद, सामळबेचर आणि मंगळपारख यांचा आणि महाराजांचा काही ठराव होऊन सन १८२८ साली जे प्रांत तोडून घेतले होते, त्यांपैकी काही सोडून देण्यात आले. घोडेस्वारासाठी १०,०३,७४७ रुपये पाहिजे होते, म्हणून पहिल्याने जप्त केलेल्या प्रांतांपैकी पेटलाद आणि बहियल हे प्रांत पुन्हा गायकवाडापासून घेतले आणि त्याचेबरोबर समासांत नोंदलेले प्रांतही घेतले. ही दुसरी जप्ती कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने तारीख ३१, माहे ऑक्टोबर सन १८३२ रोजी नामंजूर केली आणि म्हणून ती फार दिवस टिकली नाही. दरम्यान, दोन्ही सरकारांमधील फूट दिवसेंदिवस वाढत चालली होती आणि ता. १, माहे डिसेंबर सन १८३० रोजी सर विलियम्स यास बडोदे सोडून गुजरातचे पॉलिटिकल कमिशनरचे जागेचा चार्ज घ्यावयास हुकूम झाला. "त्याने अहमदाबादेस राहून तेथून रेसिडेंटाचा सर्व अधिकार चालवावा आणि खंडणी परस्परएकीसंबंधाने जे तह झाले होते ते पूर्णपणे अमलात येत आहेत की नाहीत याचेवर देखरख ठेवावी"[१] असा त्यास हूकूम होता. याचवेळी मुंबईच्या सैन्याची जी उत्तर तुकडी होती तिच्याशी मदतनीस सैन्य (सबसिडिरी फोर्स) मिसळण्यात येऊन तिचे ठाणे अहमदाबादेस केले. मि. विलियम्स हे गव्हर्नरच्या हुकमाप्रमाणे जेव्हा अहमदाबादेस गेले त्यावेळी त्यांनी आपलेबरोबर सयाजीरावाचे जे मोठे सावकार व ज्यांस हमी दिलेली होती त्यास आपले बरोबर नेले. त्यास बडोद्यास राहण्याची कदाचित भीती वाटली असेल; परंतु त्यांच्या जाण्याने त्यांचा धंदा काही वेळपर्यंत अगदी मोडकळीस आला आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये व त्यांचा राजकीय मिलाप होण्याचा संभव फारच कमी होता.

---

१. हा उपाय योजण्याची आपली कारणे सर जॉन माल्कमने लिहिली आहेत. रेसिडेंटाची स्थिती आणि गायकवाडाशी घडोघडी करावी लागणारी बारीक ढवळाढवळ यामुळे

(टीप - १ पुढील पानावर)

हा भाग संपविण्याचेपूर्वी एक गोष्ट सांगितली पाहिजे, की विठ्ठलराव बडतर्फ झाल्यावर मुंबई सरकारने त्यास आपले छत्राखाली घेतले. ब्रिटिश सरकाराने त्यास पुन्हा जास्त हमी दिली. त्यास पेन्शन दिले, जप्त केलेल्या महालांचे त्यास व्यवस्थापक केले. काठेवाडामध्ये जी काही त्यांची जहागिरीची गावे होती त्यांच्या स्वामित्वाची त्यास खात्री दिली आणि शेवटी १८०२ सालच्या तहाने मुंबई सरकारास जो अधिकार मिळाला होता त्याच्यायोगाने सन १८२१ साली ज्या नेमणुकीची त्यास हमी दिली होती ती नेमणूक सन १८३०मध्ये कायम करण्यात आली. त्याची पागा त्यास दिली आणि महाराजांनी दत्तक कबूल करण्याचे जरी नाकारिले होते व नजराणा देण्यात आला नव्हता तरी ब्रिटिश सरकाराने कृष्णरावाचे दत्तकविधान कबूल केले.

●●●

नेटिव्ह एजंट उत्पन्न झाले. त्यांनी ज्यामुळे स्नेहभावात व्यत्यय आला अशी कारस्थाने व गैरसमज ह्यांमध्ये पूर्ण अंग घेतलेले असे. तेव्हा एक उपाय योजला, त्यामुळे काहींना जरूर वाटलेल्या दक्षतेचे कारण राहणार नाही; परंतु ती नसली म्हणजे ज्यामुळे क्षणोक्षणी बळकट तऱ्हेची ढवळाढवळ करावी लागेल, त्या भीतीचे, त्रासाचे व असमाधानाचे बीज राहणार नाही. हे ध्यानात ठेवले पाहिजे, की सर जॉन माल्कम बडोद्यास आला असता गोविंदराव पळालेला त्यास पसंत पडले होते. सयाजीचा मनोभाव पुढील वाक्यावरून ध्यानात येईल. सयाजीच्या वर्तनाचे जबरदस्त; पण चुकीचे कारण असे होते, की विठ्ठलराव ब्रिटिश जामीनकीचे जमीनदार व नेटिव्ह एजंट ह्यांनी रेसिडेन्सीच्या मदतीने गोविंदरावास गादीवर बसविण्याचा कट केला आहे असा ग्रह होता. गुजरात व काठेवाडातही हा सामान्य ग्रह होता.

प्रकरण १९ वे

सयाजीरावाचे झालेल्या ठरावाप्रमाणे वागण्यासाठी मन वळविण्यास अर्ल ऑफ क्लेअरने केलेली खटपट, त्याचे जप्त केलेले प्रांत परत दिले, आणि त्यास अदबीने वागविले या स्थित्यंतराचे परिणाम

मुंबई सरकार आणि सयाजी महाराज यांच्यामध्ये चाललेल्या भांडणामुळे बडोदे दरबारातील काही लोकांच्या मनात दहशत बसली होती. गुजरातचे पॉलिटिकल कमिशनर मि. विलियम्स यांनी ता. १६, माहे फेब्रुवारी सन १८३१ रोजी असा रिपोर्ट केला, की सयाजीरावास स्वतः कैद करण्याचा व त्यांच्या स्नेह्यांस आणि सल्लामसलतगारांस शिक्षा करण्याचा त्यांच्या काही नातलगांनी व त्यांच्या काही बायकांनी सुद्धा आणि इतके करूनही ते शुद्धीवर आले नाही तर त्यांचा मुलगा गणपतराव यास त्याचेबद्दल गादीवर बसवावयाचा बेत केला आहे. हा बेत फसला आणि त्यांच्यापैकी काही पुढाऱ्यास फाशी चढविण्यात आले. तथापि सर जॉन मालकम याने सन १८३१मध्ये हिंदुस्थान सोडिले आणि त्याचेजागी लॉर्ड क्लेअर याची नेमणूक झाली. हे गायकवाडाचे सुदैवच; कारण सर जॉन माल्कम यांनी अगदी जवळ नीती स्वीकारण्याचा लॉर्ड क्लेअर याने निश्चय केला होता.

लॉर्ड क्लेअर बडोद्यास दोन वेळा आला. पहिल्या खेपेला सन १८३१च्या नोव्हेंबर महिन्यात येऊन सहा दिवस राहिला. त्यावेळी त्याचा उद्देश "चांगली समजूत घालण्याचा आणि राजास बहुमानाने व आदर सत्काराने वगविण्याचा आपला स्वतःचा मानस दाखवून दोन्ही सरकारांचे वरिष्ठांमध्ये व्यक्तीशः एकोपा करण्याचा" होता. दुसऱ्या खेपला तो तारीख २२, माहे मार्चपासून तारीख ६, माहे एप्रिल सन १८३२पर्यंत तेथे राहिला आणि बहुतेक वादग्रस्त मुद्यांचा निकाल लावला.

लॉर्ड क्लेअर पहिल्याने आला त्यावेळी महाराज हमी दिलेल्या सावकारांचे कर्ज एकदम देऊन टाकण्यास तयार आहेत आणि ते लोक बडोद्याचे पेढीवाले असल्यामुळे राजाशी काही तरी तडजोड करण्यास आणि आपले घरी येऊन धंदा सुरू करण्यास फार उत्सुक आहेत, असे त्यास आढळून आले. उदाहणर्थ : त्या लोकांपैकी हरिभक्ती याचे बडोद्याच्या इतर लोकांकडून वीस-तीस लाख रुपये येणे होते आणि जापर्यंत तो बाहेरगावी होता तोपर्यंत त्यापैकी एक कवडीही

वसूल होण्याची त्याला अशा नव्हती. सर जॉन माल्कम यांचा असा आग्रह होता, की सावकाराचे पैसे हप्त्यांनी द्यावे; परंतु असे करण्याची काही जरूर नाही असे लॉर्ड क्लेअर याचे म्हणणे पडले. सयाजीरावांनी एकदम पैस देऊन टाकण्याची जी सूचना केली होती ती मि. एल्फिन्स्टन यास नापसंत नव्हती, मात्र त्याकरिता नवे जास्त कर्ज करू नये अशी त्याची शर्त होती. आता मुंबईच्या गव्हर्नरचे असे मत पडले की, कर्जाची फेड खुशाल होऊ द्यावी जामीनकी दिलेल्या सावकारांस संस्थनाशी तडजोड करण्यास परवानगी द्यावी आणि सावकार लोक संतुष्ट झाले अशी एकदा खात्री झाली म्हणजे त्याबाबतीत जास्त चौकशी करण्याची मुंबई सरकारास जरूर नाही. येणेप्रमाणे इतके दिवस चाललेल्या भांडणाचा शेवट झाला. याचेपूर्वी तीन सावकारांची व्यवस्था झालीच होती आणि तारीख ९, माहे एप्रिल सन १८३२ रोजी हरिभक्ती, गोपाळराव मैराळ, रतनजी कानदास आणि रतनजी माणिकचंद यांनी आमचे काम झाले असे उघड सांगितले आणि करारनामे, खतपत्रे फाडून टाकली. कर्जाची रक्कम ३८,७७,६५९ रुपये होती; पण वास्तविक पैसे किती दिले याची गव्हर्नरने चौकशी केली नाही, सयाजीरावाने आपल्या खाजगी तिजोरीतून २५ लाख रुपये दिले एवढी गोष्ट मात्र पक्की करून घेतली.[१]

एक दोन वर्षांनंतर "बडोद्याच्या पेढीवाल्यांना पैसे दिले हे उगीच आहे, ज्यांना ब्रिटिशांची जामिनकी होती, त्यांना गायकवाडावर विश्वास ठेवणे हितावह वाटले." असे कर्नल औट्राम याला चौकशीअंती कळले. परंतु लॉर्ड क्लेअरने याबाबतीच्या ह्या बाजूकडे लक्ष न देता ब्रिटिशांच्या ढवळाढवळीचा निरुपयोगीपणा व त्रास ह्याचा विचार केला. त्याने असे लिहिले आहे :-

---

१. महाराजाच्या खाजगी मत्तेची हकिकत असिस्टंट रेसिडेंट मि. ऑगिल्व्ही सन १८४५ मध्ये अशा प्रकारची देतो :– (१) नझराण्यातून सालीना दोन लाख रुपये उत्पन्न असे. (आणि सप्तवार्षिक इजाऱ्यापूर्वी मि. विल्यम्सच्या म्हणण्याप्रमाणे कदचित चार-पाच लाख रुपयेही असेल.) प्रत्येक इजारदार इजारा मिळाल्यावर १५ पासून ४० हजार रुपये नजराणा देत असे. इजारदारावर काही गुन्हा असल्यास त्याने पैसे दिले की त्याची शिक्षा माफ होत असे. वारसांकडून आलेले नजराणे खाजगी तिजोरीत जमा होत असत व बडोद्यात येणाऱ्या जिनसांवरील जकातीच्या पैशांचीही तीच गत असे. सारांश, जुन्या गायकवाडांच्या संस्थानाच्या पैशांसंबंधाने ज्या युक्त्या असत त्या ह्याला पूर्ण अवगत असत. (२) त्याची खासगी खडी एक लाखाची होती. (३) त्याच्या खासगी गवताच्या जमिनी, जळाऊ लाकडे वगैरे वरील कर आणि सरकारांत जमा झालेली पेन्शने ह्यांतून ४०००० रुपये येत.

शिवाय सयाजी सावकरीही करीत असे. बडोद्यातील गणेश ईश्वरची मुख्य पेढी सन १८२९ मध्ये चालू झाली. त्याच्या राजवाड्यात दोन खाती होती. त्यातून १,२५,००० पैदा होत. शहरात पेढी होती, तिथे ८०००रु. उत्पन्न होत आणि साद्रा, कडी, पेटलाद आणि राजकोट या प्रत्येक शहरात एक-एक पेढी असून दरएकीचे उत्पन्न ५००० रुपये होत असे. याप्रमाणे त्याने आपले खाजगी उत्पन्न पाच लाख केले होते. जे द्रव्य त्याने वाचवले नाही ते आप्ताना व आश्रितांना देण्यात, खेळ-तमाशांत आणि लाच देण्यात व गुप्त नोकरीच्या बाबीत तो खर्च करीत असे.

खासगी तिजोरीतून सयाजीने संस्थानच्या पेढीवाल्यांना कर्जाऊ दिलेल्या कर रकमांबद्दल त्याचे संस्थानाकडून येणे सन १८३२ मध्ये रेसिडेन्सीच्या ठेवीप्रमाणे २५ लाख व संस्थानच्या हिशेबाप्रमाणे ५७ लाख होते.

महालाची जप्ती १८२८च्या मार्च महिन्यात झाली आणि सर्व कर्ज फेडण्यास पाच वर्षं पुरतील असा तेव्हा अंदाज होता; परंतु सन १८३२मध्ये त्याला आणखी पाच वर्षे लागतील असे मि. विलियम्स याची कल्पना होती. तेव्हा या रीतीने या गायकवाडी जिल्ह्यावरील जोड राज्यकारभाराचा शेवट केव्हा लागेल हे आपणास - लॉर्ड क्लेअरला कळत नाही. या प्रांतात वरील कायदेशीर अधिकार गायकवाड सरकारचा आणि वास्तविक अंमलबजावणीचा अधिकार ब्रिटिश सरकारच्या प्रांतात आणि गुन्हेगार लोकांस शिक्षा करण्याची एकास सत्ता नाही व दुसऱ्यास इच्छा नाही. त्यामुळे गुन्हा शिक्षाबाह्य होऊन लोकवर्तन निरर्गल झाल्यामुळे शेवटी लोकनीती लयास जावयाची ही जी योजना मुंबई सरकाराने केली, तीजमुळे जामिनकी घेतलेल्या सावकारांच्या ऋणातून ते मुक्त झाले, आणि तारीख ५, माहे एप्रिल सन १८३२नंतर १५ दिवसांचे आत त्यांनी पेटलाद, डमई, बहादरपूर, शिनोर, कडी, संखेडा, बहियाल, सियानगर आणि वडनगर हे महाल कायदेशीर मालकास परत दिले.

परंतु जमिनकीच्या पेढीवाल्यांस पैसे परत देणे एवढीच काही वादाची बाब नव्हती. ज्यास ब्रिटिश सरकार जामीन नव्हते अशा पुष्कळ लोकांच्या मोठमोठ्या रकमा द्यावयाच्या होत्या; परंतु त्याचा विचार करण्याचे लॉर्ड क्लेअर याने यथायोग्यच नाकारिले. उदाहरणार्थ - सन १८२०मध्ये सयाजीरावाने आपले सर्व कर्जांची यादी आपले पुढे ठेविली. असे मि. एल्फिन्स्टन यास वाटले होते; पण तीत आपले साडेचाळीस लाखांचे घेणे नोंदलेले नव्हते असे हरिभक्ती आता ओरडू लागला. बळवंतराव गायकवाड ११ लाख रुपये मागू लागले आणि ज्याचे सप्तवार्षिक कौलनामे जबरीने रद्द करण्यात आले ते इजारदार ७ लाख मागू लागले. तेव्हा संस्थानच्या दुसऱ्या कर्जाकडे कानाडोळा केला असताही ब्रिटिश सरकारला सुमारे ६१ लाख रुपयांची फेड करावी लागेल असे लॉर्डक्लेअर यास आढळून आले. अशा तऱ्हेने कर्ज एका वर्षात फेडण्याचे सयाजीरावापासून वचन घेऊन क्लेअर साहेब स्वस्थ बसला. याचेशिवाय दुसऱ्या दोन बाबी होत्या, त्यांचा निकाल करण्याची लॉर्ड क्लेअरची खुशी नसल्यामुळे त्याने त्या मेहेरबान कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे पाठवून दिल्या. सयाजीरावाचे असे म्हणणे होते, की विठ्ठलरावास मी काही देणार नाही आणि त्याच्या नेमणुकीचे उत्पन्न १,३५,००० रुपयांवर झाले होते. जप्त केलेल्या महालांतील व्यवस्थेचा खर्च ६८,५०० रुपयांवर होऊन गेला होता आणि सयाजीरावाने या महालांतून आपली शिबंदी परत घेतल्यामुळे ते उघड पडले होते म्हणून तेथे ब्रिटिश फौज पाठविण्यात आली होती व त्याचा खर्च १,२०,००० रुपयांवर झाला होता. यावरून संस्थान ऋणमुक्त झाले नव्हते हे उघड आहे आणि लॉर्ड यांनी जी व्यवस्था केली त्याच्यामध्ये पुष्कळ गोष्टी निकाल न होता राहिल्या होत्या.

आता सांगावयाचे एवढेच राहिले आहे, की ब्रिटिश तिजोरीत मी १० लाख रुपये ठेवतो, आणि कॉंटिजेंट फौजेला जर वेळेवर पैसे मिळाले नाहीत तर ब्रिटिश सरकारानी त्या रकमेतून द्यावे असे सयाजीरावाने आपण होऊन सांगितले. लॉर्ड क्लेअरने ते पैसे घेतले त्याबद्दल व्याज मुळीच द्यावयाचे नव्हते आणि कॉंटिजेंट फौजेची पुढे चांगली व्यवस्था ठेवण्याबद्दलचे वचन घेऊन जप्त केलेल्यांपैकी हिंदुस्थान सरकारने ता. ६ जून, सन १८३२ रोजी आणि कोर्ट ऑफ

डायरेक्टर्सने ता. ६ नोव्हेंबर सन १८३३ रोजी पसंत केले. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने एवढे ही सांगितले, की हे १० लाख रुपये सयाजीरावास परत करावे; परंतु मध्यंतरी दोन्ही सरकारांमध्ये नवी भांडणे सुरू झाल्यामुळे वरील सूचना सन १८४१पर्यंत अमलात आली नाही.

याप्रमाणे मुंबई सरकार आणि सयाजीराव हे बाह्यता चांगले दोस्त बनले. मि विलियम्स हे अद्याप जरी गुजरातचे पॉलिटिकल कमिशनर होते ही जागा रेसिडेंट मि. बॉईड हे सन १८४४मध्ये मरेपर्यंत कमी करण्यात आली नव्हती तरी ते सन १८३५चे अखेर बडोद्यास परत आले. ही स्थलांतराची गोष्ट कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने ता. १३, माहे फेब्रुवारी सन १८३८ रोजी मंजूर केली आणि असे लिहिले, ''मागील चूक सुधारण्याकरिता जे काही जरूर असेल ते सर्व करावे. पॉलिटिकल कमिशनरचे बडोद्याच्या दरबारी राहणे आणि त्याच्या आणि महाराजामध्ये प्रत्यक्ष दळणवळण असणे फार जरुरीचे आहे, असे आम्ही समजतो. आजपर्यंत ज्या गोष्टींत मुंबई सरकारचा हात नव्हता त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा त्यांनी जो निश्चय केला तो मोठ्या शहाणपणाचा होता. महाराजांचे सांपत्तिक व्यवस्थेकडे पाहण्याची चीज होत नाही ही गोष्ट स्पष्टपणे कळून चुकली होती. ज्या लोकांची ब्रिटिश सरकारनेही जामिनकी घेतली होती त्यास होता होईल तो आपापली व्यवस्था लावून घेण्यास सांगण्याचा आता कल झाला आणि नवीन जामिनकी घेण्याचे बंद केले. सयाजीरावाचे काम सुरळीत झाले अणि त्याने जर साधारण दूरदर्शीपणा वापरला असता तर एक दोन वर्षांच्या आत त्याचा आपल्या स्नेह्यांशी खटका उडाला नसता; परंतु लॉर्ड क्लेअर यांच्या सहनशीलतेचा खरोखर काय परिणाम झाला.

सयाजीरावाने कॉंटिजेंटची कोणत्या रीतीने सुधारणा केली हे दुसरीकडे खंडेरावाचे सैन्याबद्दलच्या भागात सांगण्यात येईल; परंतु एका विशेष मुद्याचे चर्वितचर्वण करण्यात अर्थ नाही. लॉर्ड क्लेअर बडोद्यास सन १८३२मध्ये आला, नंतर सर जेम्स कार्न्याक सन १८४१मध्ये आले. यादरम्यानचा काळ सयाजीरावाच्या सर्व कारकिर्दीमध्ये अति अंधकाराचा होय. गोपाळराव आत्मारामाची जागा वेणीरामाने सन १८३३मध्ये पटकाविली हे आम्ही मागील भागांत सांगितलेच आहे. भाऊ अरगडे, बाबा नाफडे, गणेशपंत आणि भाऊ पुराणिक अशा लुच्चे लोकांचे त्यास पाठबळ असल्यामुळे राजावर त्यांचे वजन सन १८३९पर्यंत होते. याचदरम्यान मुंबई सरकारास गुंडाळून ठेवण्यास त्याने आपले धन्यास फार आग्रह केला आणि म्हणून ता. ११, माहे ऑगस्ट सन १८३७ रोजी ''निदान ३०५ प्रकरणामध्ये आमच्या अधिकाऱ्यांनी नुकसान भरून घेण्याकरिता केलेले कर्ज नामंजूर करण्यात आले किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले,'' असा मुंबई सरकारने शेरा लिहून ठेवला म्हणून गुजरातेमधील पोलिस बाबतीसंबंधाने मुंबईच्या हाय कोर्टाने जी काही टीका केली होती ती सर रॉबर्ट ग्रँट यास पसंत पडून दुसऱ्या गोष्टीमध्ये त्या टीकेच्या अनुरोधाने त्याने वर्तन केले. ''गायकवाड सरकारमध्ये आणि आमच्यामध्ये जो वरकरणी सलोखा झाला त्याचा गुजरातेतील वस्तुस्थिती सुधारण्याकडे काही उपयोग झाला नाही. तेव्हा पुढे वाट न पहाता आळसाऐवजी व उदासीनतेऐवजी उत्साह असा संपूर्ण फेरबदल करण्याचा आमचा उद्देश आहे.

सन १८३८ साली फेब्रुवारी महिन्यामध्ये नवसरी परगणा जप्त करण्यात आला आणि दोन वर्षेपर्यंत तो तसाच राहिला.[१] बडोदे संस्थानामध्ये नवसरीचा देसाई मचेरजी करसेटजी यास ब्रिटिश सरकारची अगदी पहिली जामिनकी मिळाली ती वंशपरंपरेची मात्र नव्हती. या मचेरजीच्या एका वंशजाची वंशपरंपरेची मालमत्ता त्याचा हिशेब नक्की होईपर्यंत सयाजीरावाने सन १८२९मध्ये हिसकावून घेतली. त्या माणसाचे तर्फेने मुंबई सरकाराने रदबदली केली आणि एका वर्षाचे आत या प्रकरणाचा निकाल लावितो म्हणून सयाजीरावाने लॉर्ड क्लेअरला वचन दिले; परंतु हे दिलेले वचन पुरे करण्याचे कामी महाराजांनी फारच हयगय केली. महाराजास ताळ्यावर आणण्याकरिता सर जॉन माल्कम यांनी जो मार्ग पत्करला होता त्या मार्गाचे आता पुन्हा अवलंबन केले. नव्या जप्त्यांस सुरुवात झाली.

पेटलादच्या जप्तीची नोंद या भागात जरी करण्यात आली नाही तरी या दंडाचेपूर्वी ज्या प्रसिद्ध २८ ''मागण्या'' करण्यात आल्या होत्या त्याचा उपक्रम गतकालापासून व्हावयाचा असल्यामुळे त्याचा अल्लेख येथे योग्य होईल आणि त्या येथे नोंदल्या असता सयाजीचे कारकीर्दिमध्ये सन १८३२ आणि १८४१ या सालाचेदरम्यान काय गोष्टी झाल्या याची काही कल्पना येईल.

पहिलीचा संबंध एका वाईट प्रकरणाशी आहे. एक वल्लभदास माणिकचंद नावाचा अफूचा अडत्या हा ब्रिटिश सरकारची प्रजा असता पुष्कळ दिवस बडोद्यास रहात असे. त्याने ता. १७, माहे ऑगस्ट सन १८३३ रोजी रेसिडेंटाकडे अशी तक्रार केली, की कारभारी वेणीराम याच्या एका स्नेह्याने आपले भावाविरुद्ध न्यायाधिकारी कोर्टात फिर्याद लाविली असल्यामुळे आपले सोळा नातेवाईक तुरुंगात टाकण्यात आले आहेत. या लोकांस सोडून देण्यास नुसते रेसिडेंटांनीच नव्हे, तर १८३४च्या जुलै महिन्यामध्ये गव्हर्नर जनरल यांनी महाराजांच्या पाठीमागे लकडा लाविला; परंतु ही गोष्ट कबूल करण्याचे महाराजांनी नाकारिले आणि ज्या मनुष्याने अर्ज केला होता त्यास आपल्यावर ओढवलेली अरिष्टे सहन करण्याची शक्ती न राहिल्यामुळे त्याने जीव दिला, असे या प्रकरण्याचे शोचनीय पर्यावसान झाले. या क्षुल्लक माणसाच्या मरणामुळे सयाजीस ताळ्यावर आणण्याकरिता मुंबईचा गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट याने सौम्य उपायांव्यतिरिक्त उपाय योजण्याचा निश्चय केला.

दिवाण वेणीराम आदितराम यास काढून टाकण्याची मुंबई सरकारची सयाजीरावावर पहिली जरी नाही तरी दुसरी मुख्य मागणी होती, म्हणून त्यास ता. २८, माहे नोव्हेंबर सन १८३९ रोजी कामावरून दूर केले आणि त्यास पुन्हा केव्हाही नोकरीत ठेवावयाचे नाही असे महाराजाने मुंबई सरकारास ता. २४, फेब्रुवारी सन १८४० रोजी रीतसर विदित केले. पुढे सन १८४१मध्ये सर जेम्स कार्न्याक जेव्हा बडोद्यास आला आणि वेणीरामाशी कोणत्याही प्रकारचे दळणवळण न ठेवण्याबद्दल महाराजास सांगितले त्यावेळी मी त्याचा द्वेष करतो आणि पुढे कारभारी मुळीच न ठेवण्याची माझी इच्छा आहे असे महाराजांनी सांगितले. ''जोपर्यंत महाराज रेसिडेंटांशी[१] चांगल्या

१. सर जेम्स कार्न्याक येऊन गेल्यावर सन १८४१ च्या फ्रेब्रुवारीच्या पहिलीस जप्ती काढली व १८४५ मध्ये देसाई व गायकवाडांची आपसात समजूत झाली.

रीतीने वागेल, त्याचा सल्ला ऐकेल आणि केलेले ठराव मोडणार नाही तोपावतो" महाराजांची ही विनंती कबूल करण्याचे सर जेम्स याने कबूल केले. हा मुद्दा सयाजीरावाने कबूल केल्यामुळे दिवाणापेक्षा थोडे बऱ्याच तऱ्हेने दुसरे दरबारचे सल्लागार बापू आरगडे, बाबा नाफडे, गणेशपंत आणि भाऊ पुराणिक यांस एकदम काढून टाकण्यात आले नाही; परंतु "ज्या गाष्टीत ब्रिटिश सरकारचा किंवा त्यांच्या जामिकीचा संबंध आहे अशा गोष्टींत त्यांनी हात घालता कामा नये" अशी सयाजीरावास ताकीद दिली.

वेणीरामाने आपल्या कारकिर्दीत जी कृत्ये केली त्यांपैकी एकामुळे एक मागणी उत्पन्न झाली. पुंजाजी झोराजी या मनुष्याने काही गिरास हक्काबद्दल फाजील मागणी केल्यामुळे त्याचे दोन्ही हात तोडण्यात आले होते, त्याबद्दल त्यास काही मोबदला द्यावा असे मागणे होते. तो कारभारी अधिकारामध्ये असताना त्याने केलेल्या कृत्यांचा एवढाच उल्लेख करून आम्ही सध्या त्याची रजा घेतो. ज्या लोकांना ब्रिटिश सरकारची जामिनकी होती त्यांच्याशी त्याचे कसे वर्तन होते त्याचे वर्णन पुढे करू.[२]

---

१. तेरावी मागणी अशी होती की रेसिडेंटाचा मानपान बरोबर ठेवावा आणि त्याला वाटेल त्याजबरोबर अप्रतिबंध, दळणवळण ठेवू द्यावे. चालू तहनामे पाळण्याच्या सामान्य कबुलीने या अटीस त्याची मान्यता आहे असे गृहीत धरीत असत.

२. वेणीरामाच्या अमलात बडोद्याची स्थिति कशी होती याची कल्पना खालील ओळींवरून होईल. उलट अर्जाचा मात्र फारसा विश्वास धरता येत नाही.

सन १८३७ मध्ये १८०५ च्या तहाच्या ९ कलमाच्या व वेणीराम ब्रिटिश रयत आहे ह्या जोरावर त्यास नोकरीवरून दूर करण्याची ब्रिटिश सरकारने सयाजीकडे मागणी केली. महाराज असे म्हणू लागला, की वेणीराम हा २५ वर्षे बडोद्याचा रहिवासी असून वकील हिंमतबहादर या पदवीने मोठ्या हुद्यावर आज दहा वर्षे आपल्या नोकरीत आहे. ब्रिटिश सरकार ही विनंती करण्यापूर्वी आठ महिने वेणीराम एकाएकी काही दिवस बडोद्यातून निघून गेला होता. १८२७ मध्ये नेटिव्ह एजंट साराभाई व विठ्ठलराव दिवाणजी यांनी त्याला दहशत घातली होती व तीतून लॉर्ड क्लेअरने त्याला वाचविला होता. त्याप्रमाणे आता भास्कर विठ्ठलरावाकडून आपल्या जिवाला धोका होईल अशी त्यास भीती असल्यामुळे आपण काशीयात्रेला जाणार असे त्याने उघड केले. त्याने असेही म्हटले की सर्वजनांनी आपण राहावे असा महाराजांकडे अर्ज केल्यामुळे काशीस गेलो नाही. आपल्या हालचालींबद्दल अशा तऱ्हेने जो जाहीरनामा करीत होता त्याच सुमारास मुंबई सरकारकडे एक मोठा उलटअर्ज आला. त्याचा बडोद्यात इतका द्वेष करीत असत की पळून जाणे जास्त सुरक्षित असे त्यास वाटले. दुर्दैवाने त्याला रस्त्यात लुटला तेव्हा त्यास जबरीने परत आणण्यास न्यायाचे स्वरूप देण्यासाठी वेणीराम ज्या अर्जाची घमेंडी मारीत होता तो अर्ज गावातल्या मोठमोठ्या लोकांकडून महाराजाने करविला. तो अर्ज मनापासून झालेला नव्हता; कारण त्याने रतनजी कानदासचे घर लुटून त्याच्या वकिलाला मार देवविला होता व जातीबाहेर करविला होता. त्याने परमूदास आणि लाला मंगळ पारख ह्यांची घरे लुटली होती. गोपाळराव मैराळाचा एजंट व दुसऱ्या सरदारांना त्याने लुटले होते. पुढे गोपाळराव मैराळ आणि हरिभक्ती यांनी त्यास पैसे भरून त्याचे पाठबळ विकत घेतले. तसेच बडोद्याचे नवाबानेही केले होते. त्याचेबद्दल त्यास काठेवाडची सुभेदारी मिळाली. तेथे त्याने जुलूम करून रगड पैसा मिळवला.

बऱ्याच मागण्या काठेवाडातील वस्तुस्थिती बिघडल्यामुळे उद्‌भवल्या. उखामंडळच्या काही वाघेर लोकांनी जामच्या हद्दीत चोऱ्या केल्या होत्या. दुसरीकडे दुसऱ्या एका वाघेर नायकास वाट मारण्याची चटक लागली होती. एक भयंकर खून करण्यात आला होता आणि त्या प्रांतामध्ये जो गायकवाडी कामदार होता त्याने चाचेपणाला फूस दिली होती. दुसऱ्या एका गायकवाडी कामदाराने त्या बेटांतील काही जामिनकीच्या सरदारांवर जुलूम केला होता, काही काठी लोकांची तडजोड झाली नव्हती. आणखी अशा प्रकारच्या गोष्टी होत्या, तेव्हा गायकवाडाच्या ताब्यात जो काठेवाडाचा भाग होता, त्यात चांगली राज्यव्यवस्था करण्याबद्दलची एक मुख्य मागणी होती.

पोलिस व्यवस्थेत दोघांची समान कार्यता असावी आणि गायकवाडाच्या अधिकाऱ्याकडून अतिशय निष्काळजीपणामुळे ज्या पूर्वी गोष्टी घडल्या होत्या त्यांची खातरजमा व्हावी, असेही मागणे होते.

यातील पहिला मुद्दा केव्हाच ठरण्यात आला नाही. गुन्हेगार ब्रिटिश रयत लोकांस गायकवाड सरकारच्या हद्दीत थारा न मिळू देण्याचे उपाय हा सयाजीरावाकडे केलेल्या मागण्याचा एक विषय होता. यावरून त्याकाळी बडोदे संस्थानच्या आत व हद्दीवर प्राण व मत्ता ह्याना किती धास्ती होती हे चांगले उघड होते.

सरतेशेवटी गंगाधरशास्त्री, धाकजी दादाजी आणि नवासारीचे देसाई यांस व दुसऱ्या लोकांस ब्रिटिश सरकारने ज्या जामिनक्या दिल्या होत्या त्या कबूल व कायम करण्यास आणि त्या लोकांचे हक्क पुरे करण्याकरिता ब्रिटिश सरकारने जे उपाय योजिले होते ते कबूल करण्यास गायकवाडास सांगण्यात आले. खेडा किल्ल्याच्या किल्लेदारवर तो किल्ला सर झाल्यावर ब्रिटिश सरकारची जामिनकी मिळालेला सुभानजी पोळ याच्या घराण्याचे हक्कास महाराजांचे बदमाश बाबा नाफडे याच्या लबाडांची पर्वा न करता यावेळी आणि पुढे ब्रिटिशांचे चांगले पाठबळ मिळाले. संखेड्याच्या जहागीरदाराचा मुलगा गोपाळराव गणपतराव गायकवाड यास काही नेमणूक करून देण्यास सयाजीरावास भाग पडले. तो आपला प्रतिपक्षी गोविंदराव याचा भाऊ असल्यामुळे महाराजाने त्यास इतक्या वाईट रीतीने वागविले होते की त्यास भारवाटी घ्यावी लागली होती.

लॉर्ड क्लेअर यांचे व्यवस्थेनंतर बडोदे राज्याची अशी स्थिती होती. सौम्य रीतीने महाराजांस वळणीवर आणण्याचे मुंबई सरकारचे श्रम फुकट गेल्यामुळे सर रॉबर्ट ग्रँट यांचेमागून जो गव्हर्नर आला त्याने पत्करलेला मार्ग विशेष दिसतो आणि त्याच्यायोगाने आपल्यापेक्षा बलाढ्य पक्षाशी सलोखा करण्यास महाराजाने पुष्कळ घाई केली.

●●●

प्रकरण २० वे

सर जेम्स कार्न्याकचे येणे आणि बहादरी पद्धतीची काही माहिती – सयाजीरावांच्या उघड भांडणाचा शेवट

◘

सर जेम्स कर्न्याक बार्ट यास बडोद्याचे दरबाराशी चाललेली भांडणे मोडण्याच्याच हेतूने मुंबईचे गव्हर्नर नेमण्यात आले; कारण त्याचा बडोद्याशी संबंध पुष्कळ दिवसांचा होता व त्याचा तेथील अनुभवही विशेष होता अशी कल्पना होती आणि ती बरोबर होती.

सयाजीराव कोणत्याही प्रकारांनी वळत नाही असे आढळून आल्यावर, ब्रिटिश सरकारच्या मागण्या पूर्ण करण्यास एका महिन्याचा अवधी देण्यात येत आहे अशी महाराजास प्रथम नोटीस देऊन नंतर पेटलादचा जिल्हा जप्त करण्याबद्दल मुंबई सरकारने हिंदुस्थान सरकारास ता. ६ ऑगस्ट सन १८३८ रोजी सूचना केली. नामदार गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांनी ही सूचना ता. ३०, माहे ऑगस्ट सन १८३८ रोजी मंजूर केली. असा हुकूम दिला की, वरील उपयाने गायकवाड जर ताळ्यावर आला नाही तर ''त्याला पदच्युत करावे आणि त्याचा मुलगा होतकरू असल्यास त्याला त्याचेजागी गादीवर बसवावे''. ता. १, माहे नोव्हेंबर सन १८३८ रोजी पेटलाद जप्त करण्यात आले आणि त्याच महिन्याच्या ५ व्या तारखेस जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यात त्याचे कारण असे देण्यात आले की, ''पुष्कळ वर्षेपर्यंत वायफळ वादविवाद करून ब्रिटिश सरकारच्या मागण्या पुऱ्या करण्याकरिता महाराजास एका महिन्याची मुदत देण्यात आली होती. त्याप्रमाणे मागण्या पूर्ण करण्यात आल्या नाहीत म्हणून पेटलाद जिल्हा जप्त करण्यात आला आहे. आणखी दोन महिन्यांचे आत जर त्या मान्य करण्यात आल्या नाहीत तर तो जिल्हा मुळी दंडादाखल घेण्यात येईल. ता. १२ माहे फेब्रुवारी सन १८३९ रोजी हिंदुस्थान सरकारांनी असे जाहीर करविले की, सयाजीरावांकरिता तरी पेटलाद जिल्हा ''निखालस आणि पूर्णपणे खालसा करण्यात आला आहे''.

परंतु ता. २८, माहे नोव्हेंबर सन १८३९ रोजी सयाजीराव रेसिडेन्सीमध्ये आला आणि त्याने मि. सदरलंड याची ''मोठ्या नम्रतेने लवून आणि पदर पसरून रेसिडेंटाची, आपणास आपले छत्राखाली घेण्याची आणि गत गोष्टींबद्दल माफ करण्याची हात जोडून विनंती केली''.

याप्रमाणे फार दिवसांच्या भांडणाचा खरोखर शेवट झाला आणि काही मागण्यांकडे जरी दुर्लक्ष करण्यात आले तरी सन १८४०-४१ सालामध्ये सर्व २८ ''मागण्या'' निदान बहुतेक सर्व पुऱ्या करण्यात आल्या. आपले सरकारने केलेले हुकूम आणि महाराजांनी दिलेली वचने पुरी करून घेण्याचे रेसिडेंट मि. सदरलंड याचे काम जसे समाधान मानण्यासारखे झाले तसेच ते फार कठीणही होते त्यात संशय नाही; पण ते काम अगदी तडीला नेण्यास त्यास सापडले नाही. या भानगडीच्या सात वर्षांत बडोद्यास लागोपाठ तीन रेसिडेंट मरण पावले ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. अनुभवशीर मि. विल्यम्स यांच्यामागून आलेला सदरलंड १८४०च्या जून महिन्यात आटोपला आणि मि. डब्ल्यू एस. बॉइड १८४४च्या ऑगस्ट महिन्यात मेला. हे तिघेही कामदार फार शूर आणि चांगले होते.

यादरम्यान, म्हणजे ता. २६, माहे जानेवारी सन १८४१ रोजी सर जेम्स कार्न्याक व्यवस्था करण्याकरिता बडोद्यास आला. आणि ता. ८ फेब्रुवारीच्या आत त्याची या खेपेची सर्व व्यवस्था चांगल्या रीतीने पुरी झाली. पेटलाद आणि नवसरी या नवीन जप्त कलेल्या जिल्ह्यांतील रयत लोकांवर जुलूम करावयाचा नाही असे महाराजापासून वचन घेतल्यावर सर जेम्स कार्न्याक यांनी या जिल्ह्यावरील जप्ती उठविण्याचा आणि ता. १, माहे फेब्रुवारी सन १८४१ रोजी काठेवाड, मही आणि रेवाकाठ यांचेमधील गायकवाडाचे खंडणीवरील जप्ती उठविण्याचा हुकूम सोडला. कॉंटिजेंटला वेळेवर पगार मिळण्याकरिता जामिनकी म्हणून ब्रिटिश तिजोरीत जे दहा लाख रुपये ठेवण्यात आले होते, १८३२मध्ये तेही सयाजीरावास परत दिले; परंतु लष्करावरील भागांत सांगितल्याप्रमाणे कॉंटिजेंट फौज वाईट स्थितीत असल्यामुळे सयाजीरावास शिक्षा म्हणून सन १८३९च्या मार्च महिन्यात गुजरातेत बिनकवायती घोडेस्वार ठेवण्यात आले होते. ते कमी केले नाहीत आणि आता पेटलाद परत दिल्यामुळे व त्या घोडेस्वारांचा खर्च त्या जिल्ह्याचे उत्पन्नातून चालत असल्यामुळे महाराजाने त्या खर्चाकरिता सालीना तीन लाख रुपये देण्याचे कबूल केले. या लष्करी खर्चाच्या ओझ्यापासून आपली सूटका करून घेण्याची त्याची खरोखर फार इच्छा होती. सर जेम्स बडोद्यास आला होता तेव्हा व त्यानंतर तो कर माफ करण्याबद्दल त्याने फार विनवण्या केल्या, कारण तो दुर्लौकिक समजे; परंतु सयाजीरावाचा दुसरा मुलगा खंडेराव गादीवर बसेपर्यंत बडोद्याचे महाराजास हा कर द्यावा लागत असे.

सर जेम्स कर्न्याक यांनी केलेल्या व्यवस्थेचे जर पूर्ण विवेचन करावयाचे तर मुंबई सरकाराने ज्या २८ मागण्या केल्या त्याबरोबर महाराजाने ज्या ३६ उलटमागण्या केल्या होत्या त्यांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांचा विचार करण्याबद्दल गव्हर्नर साहेबाने वचन दिले होते. या व्यवस्थेच्या संधीला दुसरे आणखी जे काही त्रासदायक मुद्दे होते त्यांचा निकाल करण्यात आला. आजपर्यंतची अशी वहिवाट होती, की बडोद्यास ज्या गणपतीच्या आणि दसऱ्यास स्वाऱ्या निघत त्या स्वाऱ्यांतून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आणि सैन्यांनी हजर असले पाहिजे; परंतु आता असे ठरविण्यात आले, की ब्रिटिश ऑफिसरांना आणि लष्करी शिपायांना धार्मिक स्वाऱ्यांतून हजर राहणे त्यांच्या वर्तनक्रमाला अप्रशस्त आहे, म्हणून याचेपुढे ब्रिटिश ऑफिसरांनी व सैन्यांनी एका ठरविलेल्या ठिकाणी जमून तेथून फक्त महाराजास नेहमीची सलामी द्यावी. याचा महाराजास राग आला

आणि रेसिडेंटाने महाराजापासून आहेर किंवा पोषाखाच्या देणग्या घेऊ नयेत व आपणही महाराजास स्नेहाखातर काही नजराणे देऊ नयेत असेही ठरवून टाकले.

दुसऱ्या एका नाहीशा होत चाललेल्या पद्धतीसही जबर धक्का बसला; परंतु ते सुधारणेचे द्योतक होते. मि. सदरलंड रेसिडेंट असता त्याने एका रत्नागिरीच्या ब्राह्मणाची बायको सती गेल्याचे एकले. त्यांनी ती गोष्ट स्वतःचे सरकाराच्या व सयाजीरावाच्या नजरेस आणली आणि सती जाण्याचे कामी मदत करणे कायद्याने गुन्हा आहे असे जाहिरनाम्याचे द्वारे प्रसिद्ध करण्याचे महाराजांनी ता. १३, माहे एप्रिल सन १८४० रोजी कबूल केले आणि हे घालून दिलेले उदाहरण रेवाकाठ्याचे महाराजाने लागलीच गिरविले. या सुधारणेमागून काही वर्षांनी आणखी एका सुधारणा झाली. कोकी जातीचा ब्रिटिश रयतेपैकी एक मनुष्य बडोद्याच्या कँपमध्ये राहत असे. त्याने आपली सहा-सात वर्षांची मुलगी आपल्या बायकोच्या अनुमतीशिवाय आपल्या जातीतील एका मनुष्यास विकली आणि आलेला पैसा उधळून टाकिला. असेच एक दुसरे उदाहरण झाले आणि नंतर चळवळ सुरू झाली. हिंदूंची मुले मुसलमानास विकू नयेत व असल्यातऱ्हेची कोणतीही विक्री हुजूरच्या प्रत्यक्ष हुकमाशिवाय होऊ नये असे त्या चळवळीमुळे ठरविण्यात आले. "ता. २६ जून १८२७चा नियम १४ पाहा" डायरेक्टरच्या हाय कोर्टाने जिल्हा अधिकाऱ्यास ता. २४, माहे मे सन १८१३ रोजी असे फर्माविले की त्यांनी आपल्या आश्रयास राहिलेल्या गुलामास व बायकांस त्यांचेवर हक्क सांगणारांचे स्वाधीन करण्याचे नाकारावे व त्या हक्कदारास सिव्हिल कोर्टाकडे दाद मागण्यास सांगावे. याप्रमाणे या सौम्य गुलामांच्या व्यापारावर दाब व देखरेख ठेवण्यात आली. तथापि एवढे येथे कबूल केले पाहिजे, की बडोद्यास गुलाम म्हणून जी मुले विकण्यात येत असत त्यांस चांगल्या रीतीने वागविण्यात येत असे आणि जन्मभर घरनोकराची जागा मिळत असे.

सयाजी आणि मुंबई सरकार यांचेमध्ये पुष्कळ दिवस चाललेल्या भांडणाची कशी व्यवस्था लागली त्याचे आम्ही आतापर्यंत वर्णन केले, आता या दोन पक्षांमधील चुरशीच्या खऱ्या कारणाचे बारीक रीतीने विवेचन करू. गायकवाडाच्या जुलमापासून सुरक्षित राहण्याकरिता ज्या गायकवाडी लोकांस ब्रिटिश सरकारशी जामिनकी मिळाली हाती त्या लोकांसंबंधी महाराजांची निष्ठूरपणाची वर्तणूक मुंबई सरकारच्या मनाला पुष्कळ दिवस फार टोचत होती. सयाजीच्या प्रजेपैकी वजनदार लोकांस ब्रिटिश सरकारची जामिनकी मिळाली असल्यामुळे अधिकारांची परवा न करण्यास त्यास फूस मिळे. ही गोष्ट आज वीस वर्षे त्याला सहन होत नव्हती. म्हणून त्याच्या उलट मागण्यांपैकी २५वी फार निकडीची होती. ती मागणी अशी होती की, "ज्या लोकांस जामिनकी मिळाली असेल त्यास सरकारचा हुकूम मानण्यास आणि स्वतःचे कर्तव्य बजाविण्यास सक्त हुकूम झाला पाहिजे" पुन्हा सर जेम्स कार्न्याक याने त्या जामिनक्या पाळण्याची जेव्हा निकड लाविली तेव्हा महाराजाने उलट अशी विनंती केली की, "मला आदर सत्काराने वागविण्यास या लोकांस भाग पाडिले पाहिजे." "ज्या लोकांस जामिनकी मिळाली आहे ते लोक आमच्या मध्यस्थीवर हक्क सांगण्यास आपणास अधिकार आहेच असे समजत आणि गायकवाडास

त्यांचा राजा या नात्याने जो मान आणि आज्ञाधारकपणा दाखविण्यास ते बांधलेले होते तो ते दाखवित नसत" असे गव्हर्नर साहेबांनी पुढे कबूल केले आहे. अरब लोकांनी दिलेल्या जामिनक्या आणि गायकवाडांचे पुढारी प्रजाजनलोक यांचेमध्ये मध्यस्थी करण्याचे पुष्कळ प्रसंग कसे मिळाले, एखाद्या अरबी शिपायाने दिलेल्या जामिनकीत आणि बलाढ्य सरकाराने दिलेल्या जामिनकीत जामिनकीचा काळ व विस्तार याबाबतीत किती फरक आहे, प्रथम हा भेद ध्यानात न येता गायकवाड स्वतःचे सोईकरिता तडजोडीच्या आपल्या अधिकारांत दुजोरा होतो. या समजाने आपले प्रजेस ब्रिटिश तक्रार करण्यास कशी परवानगी देत गेले, ही जामिनकी संस्था, नव्या सावकारांना, कारभाऱ्यांना आणि नातेवाइकांना देण्यात आल्याने संस्थानच्या सांपत्तिक व राजकीय बाबींवर कडक देखरेखीत बहाणदारी पद्धत कशी जोडली गेली, या प्रश्नांचा निकाल लागल्यावर किंवा त्याचे स्वरूप बदलल्यावरही या जामिनक्या कशा कायम राहिल्या; बहाणदारी पद्धतीने मिळालेल्या अधिकारांमुळे कित्येक वर्षांपर्यंत जामिनकी मिळालेल्या लोकांस आपला जास्त आसरा देण्यास ब्रिटिश सरकार कसे तयार असे; पुढे एकमेकांमध्ये गुरफटलेल्या अधिकारांमुळे उत्पन्न झालेली अनिष्टे कशी व्यक्त झाली आणि केव्हा-केव्हा गायकवाड व त्यांचे अति हलकट प्रजाजन यांचेमध्ये निकाल देण्याचे कामी किती मोठ्या अडचणी उत्पन्न होत होत्या, सरतेशेवटी आपण दिलेल्या शब्दाचा ब्रिटिश फार बारीक रीतीने विचार करून तो खाली पडत नाही इतकेच बघण्याचे ठेवून त्यांनी या शुद्र लोकांचा संबंध किती लवकर आणि पूर्णपणे तोडून टाकिला, या गोष्टी आम्हास आता इतक्या वर्षांनंतर सहज कळतात.

बहाणदारी पद्धतीवर अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत आणि काही आश्रय दिलेल्या लोकासंबंधाने झालेला पत्रव्यवहार फार मोठा आहे, तेव्हा काही विवक्षित गोष्टींसंबंधी येथे थोडीशीच त्रोटक माहिती देता येईल. अरब लोकांना घालवून देण्याचेपूर्वी दोन किंवा तीनच जामिनक्या होत्या. एक मागे सांगितल्याप्रमाणे नवसारीच्या देसायाला सन १७९३मध्ये दिली होती; दुसरी ता. २९, माहे जुलै सन १८०२ रोजी झालेल्या ठरावान्वये रावजी आप्पाजीला दिली होती आणि तिसरी कडीच्या लढाईनंतर कडीचा जाहागीरदार मल्हारराव यास दिली होती; परंतु तो काठेवाडात पळाला, बंड केले, कैद झाला व हद्दपार झाला तेव्हा ती जामिनकी रद्द झाली. रावजीचीच जामिनकी विचार करण्यासारखी आहे. ती वंशपरंपरेची होती; परंतु मागे सांगितल्याप्रमाणे त्याने सन १८०८मधील त्याच्या भांडखोर वागणुकीमुळे त्याचा दत्तक मुलगा सीताराम याजकडे दिवाणगिरी न ठेवता दिवाणगिरीचा पगार मात्र चालू ठेवला. सीताराम (सन १८२३मध्ये) मेल्यानंतर त्याचा मुलगा नारायण याचेजवळ ६०००० रुपयांच्या नेमणुकीची जामिनकी होती; परंतु त्याच्या मुलाच्या पालकांनी सन १८०२चा बनावट तहनामा दाखवून रेसिडेंटास फसविण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याचा सर्व आश्रय काढून घेतला गेला. सन १८४२ नंतरसुद्धा मि. ऑगिलव्ही आणि सर आ. आरबथनाट यांनी काही गावे त्यांची खासगीत मालकिची आहेत अशा चुकीच्या समजावर त्याचे घराण्याकडे ठेविण्याची मध्यस्थी केली; परंतु ज्याने ब्रिटिश सरकारची मैत्री संपादिली होती त्या रावजीच्या किंवा ज्याने इतक्या खराब गोष्टी केल्या होत्या

त्या सीतारामाच्या घराण्याकरिता जास्त काही करण्यापासून कर्नल औट्राम यांनी सरकारचे मन फिरविले.

तारीख २६, माहे डिसेंबर १८०२ रोजी अरब लोकांना बडोद्यामधून घालवून दिले आणि त्यांनी दिलेल्या जामिनक्या ब्रिटिश सरकारांनी घ्याव्या असा त्यांनी व ज्यांना त्यांचा आश्रय होता त्यांनी स्पष्ट करार करून दिला होता. यामुळे नामदार कंपनीला ढवळाढवळ करण्याचा मोठाच अधिकार मिळाला आणि श्रीमंत लोकांशी त्यांचा संबंध होऊन त्यापासून कंपनीस पुष्कळ फायदा झाला; परंतु तेव्हा गायकवाडांनी तिकडे लक्ष दिले नाही; कारण रेसिडेंटाने लिहिल्याप्रमाणे या अदलाबदलीमुळे सरकारवर दाब ठेवण्याचा सरदारांचा जबरदस्त उपाय नाहिसा झाला." अरब लोकांच्या जामिनक्या दोन तऱ्हेच्या होत्या हेही येथे सांगावे - एक पैसे वेळेवर देण्याबद्दल आणि दुसरी जीव संरक्षणाबद्दल - आणि सरकारने दिलेली वचने जर त्यांनी मोडली तर जामीन राहणारा मनुष्य "रयतेच्या कर्तव्यापासून मुक्त होतो असे होते. आपण दिलेल्या जामिनक्या बळजोरीने अमलात आणण्याकरिता राजा आणि कारभारी यांचे दरबार जमून त्यास कडक अटकेत ठेविल्याची अरबांची पुष्कळ उदाहरणे आहेत."

"अरब लोकांच्या बेबंदशाहीत ही पद्धत जितक्या विस्तृतपणे अमलात होती तितकी ब्रिटिश सरकारने ठेविली नाही. बडोदे सरकारच्या अडचणी दूर करण्याकरिता कर्ज काढावे लागलेल्या कर्जांपुरत्या जामिनक्या अमलात आणल्या गेल्या." याला काही अपवाद होते. "बडोद्यामध्ये आपले विचार अमलात आणण्याकरिता ब्रिटिश सरकारला रावजी व त्याचे आश्रित यांनी जी मदत केली तिचा मोबदला त्यांस दिलेल्या जामिनकी या अपवादापैकी होता." या लोकांनी पाठीमागे ब्रिटिश सरकारची नोकरी उत्तम रीतीने बजाविली असल्यामुळे दुर्दैवेकरून; परंतु साहजिक या लोकांची अशी धारणा होती, की गायकवाडांसंबंधी त्यांचे काही जरी अपराध असले तरी आपल्यास आणि आपल्या वंशजांस ब्रिटिश सरकारचा आसरा मिळेल म्हणून एके ठिकाणी म्हटले आहे ते बरोबर आहे, की "वंशपरंपरेने दिलेल्या जामिनकीपासून जसे नुकसान होते तसे दुसऱ्या कोणत्याही जमिनकीपासून होत नाही; कारण त्या जामिनक्या नुसत्या जानमालाच्याच नसत तर काही विवक्षित घराण्यांकडे वंशपरंपरेने विवक्षित हुद्दे ठेवण्याच्या असत.

मुंबई सरकारने या जामिनक्या ज्यावेळी दिल्या त्यांच्या संबंधाने एवढे सांगणे पुरे आहे, की एक-दोनशिवाय बाकी सर्व १८१९ सालापूर्वी दिल्या होत्या आणि त्यांच्या संस्थानचे राज्य कमिशनने चालले असता व त्या कमिशनवरून रेसिडेंट प्रमुख सभासद असता त्या जामिनक्यांसंबंधी मुळी तक्रारी आल्या नाहीत. सन १८१९ आणि १८२८च्यादरम्यान एकच जामिनकी देण्यात आली आणि ती आनंदरावांच्या दोन अनौरस मुलांस दिली, तथापि सयाजीरावांच्या कारकिर्दीच्या आरंभी या जामिनक्या वंशपरंपरेच्या आहेत अशी ब्रिटिश अधिकाऱ्यांची समज असे आणि महाराजांची या जामिनकीने लोकांना अतिशय छळून त्या अधिकाऱ्यांना चिडविण्याची प्रवृत्ती असे. सन १८२८ मध्ये हिंदुस्थान सरकारचा असा अखेरचा विचार झाला, की "बहादरी वचने अमलात आणणे जितके अडचणीचे आहे

तितकेच तत्त्वदृष्ट्या ती अपवादक आहेत आणि चालू कर्जाबद्दल ज्या जामिनक्या दिल्या आहेत त्यांतून शक्य तितकी लवकर सुटका करून घ्यावयाची आणि अशा तऱ्हेची वचने इतःपर द्यावयाची नाहीत असा एक ठरीव नियम मुंबई सरकारने घालून ठेवला हे ऐकून त्यांस कबूल झाला." सर जेम्स कर्न्याक याने जेव्हा व्यवस्था केली त्यावेळी २० जामिनक्या संपल्या होत्या; परंतु वंशपरंपरेच्या १७ आणि हयातीच्या ९ चालू होत्या. वरच्या जामिनक्या काही घराण्यांचे हक्क, सरकारी जागा, नेमणुका, मालमत्ता, व्यापार, वतने सांभाळण्याबद्दल असून पुढल्या जामिनक्या पेन्शन, नेमणुका वगैरे एका हयातीची तजवीज करण्याबद्दल असत. सन १८४९ मध्ये रेसिडेंट कॅप्टन फ्रेंच याने अशी शिफारस केली, की बहादरी वचनांपैकी पुष्कळ वचने रद्द झाली आहेत असे समजावे आणि शास्त्री आणि माणेकचंद रूपचंद याचेसंबंधाने त्याचे म्हणण्याप्रमाणे झाले. "ब्रिटिश जामिनकी मिळालेली असली म्हणजे शिक्षेची भितीच नाही ही फार अपायकारक समजूत असे आणि धाकजी दादाजी, बाबा नाफडे, बळवंतराव आणि गोविंदराव गायकवाड यांचेपेक्षा वाईट आश्रितांची कल्पना करता येणार नाही." असे त्यांचे म्हणणे होते. त्याप्रमाणे कोर्ट ऑफ डायरेक्टरांनी सन १८५० साली "जीजवर बहादरीचा आवार त्या चांगल्या वर्तणुकीच्या अटीसंबंधाने असावी तितकी दक्षता राखली जात नाही" असा अभिप्राय देऊन सन १८५३मध्ये असा ठराव केला, की "अरब सैन्याच्या अधिकाऱ्यांनी ज्या जामिनक्या दिल्या होत्या त्या जात्याच तुट मुदतीच्या होत्या" याचेच अनुरोधाने औट्राम साहेबांनी पुष्कळ प्रश्नांचा शेवट केला. चालू या मुख्य शब्दाचा अर्थ त्यांनी "सध्या (हयाती) पुरता," वंशपरंपरेने नव्हे असा केला आणि कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने हा अर्थ सन १८५६मध्ये कबूल केला.

आम्ही वर सांगितलेच आहे, की अरब लोकांनी ज्या जामिनक्या दिल्या होत्या व ब्रिटिश सरकारने आपल्या अंगावर लादल्या होत्या, त्या दोन प्रकारच्या होत्या. पहिल्या प्रकारची जामिनकी अशी होती की, संस्थानाने जे कर्जाऊ पैसे काढले असतील ते परत द्यावेत. गायकवाडाने घेतलेल्या मोठमोठ्या पैशांच्या रकमा परत घेण्यासाठी ब्रिटिश सरकार वेळोवेळी कसे जामीन राहिले याचा इतिहास सांगितलाच आहे. तेव्हा त्याची पुनरावृत्ती करण्याची जरूर नाही. सन १८०३मध्ये जामीन मिळालेल्या पेढीवाल्यांचे ५१ लाख रुपये परत द्यावयाचे होते. सन १८०५मध्ये पुष्कळ बाबी कमी केल्यावरही जामिनकीचे कर्ज ७१,२२,००० रु.पर्यंत गेले. यामुळे संस्थानास ज्या अडचणी आल्या त्यांचा विचार मि. एल्फिस्टन, सर जॉन माल्कम, आणि लॉर्ड क्लेअर यांनी केला होता. ज्यांची हकिकत व त्यामुळे उपस्थित झालेल्या कलागती, जप्त्या आणि शेवटच्या व्यवस्था यांची हकिकत दिलीच आहे. आता आपण दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे व्यक्तीच्या संरक्षणाच्या वगैरे जामिनक्यांच्या ठळक मुद्यांचा विचार करू. ब्रिटिश सरकारांनी हे आपले छत्राखाली घेतलेले लोक कोणत्या प्रकारचे होते, त्यांनी गायकवाडास का त्रास दिला आणि आपल्या पालकांस कशा पंचाइती पाडल्या हे समजून घेऊ.

दारूपुऱ्याचा कानदास पटेल आणि बडोद्याचे भाईचंद देसाई यांचेजवळ अरब लोकांची चालू जामिनकी होती. दुसऱ्याच्या जामिनकीचा अर्थ "हयातीपुरता" असा जर मि. विलोग्बी यांस

करण्यास सापडला असता तर त्याची जामिनकी सन १८२७ मध्ये वाईट वर्तणुकीबद्दल त्याने काढून घेतली असती; परंतु त्यास तसे करू दिले नाही. पहिल्याची जामिनकी मि. विल्यम्स यांनी काही चुकीने वंशपरंपरेची करून दिली होती; परंतु सन १८५५मध्ये राजपिंपळा संस्थानापासून दीड लाख रुपये उपटण्याकरिता त्या संस्थानच्या कारभाऱ्यांशी आणि दुसऱ्या काही पेढीवाल्यांशी मसलत केल्याबद्दल गुन्हेगार ठरून त्याने आपला आसरा घालविला. आनंदरावांच्या कारकिर्दीमध्ये खुशालचंद अंबादासच्या घराण्याच्या शारीरिक संरक्षणाची हमी अरब लोकांनी घेतली होती. सन १८४८मध्ये त्या घराण्याच्या मालमत्तेचा दामोदर नावाचा वारस बनावट पुरावा आणल्याबद्दल गुन्हेगार ठरल्यामुळे जमाबाई नावाची जी दुसरी वारस बाई होती तिनेही बनावट कागदपत्रे केली असता ती मालमत्ता तिला देण्यात आली. परंतु दामोदरने पुष्कळ नजराणा देऊन महाराजास आपलेकडे वळवून घेतले असल्यामुळे त्यांनी या फेरबदलीस आक्षेप घेतला आणि अखेरीस दामोदराला फार वाईट तऱ्हेने वागविल्यामुळे व त्याला तुरुंगात टाकल्यामुळे जमाबाईने जामिनकी बहुतेक घालविली; परंतु अरबांनी खरी वंशपरंपरेची जामिनकी बलासाडचे देसाई सुंदरजी यास दिली होती. आणि त्यांनी आपले मरणाचे पूर्वी शंकरजी नावाचा मुलगा दत्तक घेतला. तो मेल्यानंतर बावीस महिन्यांनी त्याच्या बायकोस एक मुलगा झाला आणि त्यास वारस म्हणून तिने पुढे केला. फिर्यादी सुरू झाल्या आणि खुशालचंद अंबादासच्या पेढीने शंकरजीच्या पूर्वीच्या बापास कर्जाऊ पैसे दिले असल्यामुळे मालमत्ता आणि जामिनकी हिसकावून घेतली. पुढे गंगाधरशास्त्र्याच्या हाती तो दस्तऐवज लागला आणि तो रेसिडेंटाने बऱ्याच श्रमाने सयाजीरावांपासून काढून घेतला. शेवटी अरब लोकांना घालवून देतेवेळी सामळ आणि मंगळ पारेख या दोघा सावकारांना तात्पुरत्या जामिनक्या देण्यात आल्या. तथापि, मंगळ पारखाने सन १८०२मध्ये गव्हर्नर मि. डंकन याचेपासून बहुतेक महाराजांचे नकळत ''गायकवाड किंवा इंग्लिश सरकार यांचेपासून कोणत्याही तऱ्हेची अयोग्य मागणी किंवा तोशीस पोहोचू नये म्हणून अहमदाबाद, धोलेरा, सुरत आणि मुंबई या ठिकाणी नामदार कंपनी सरकारकडून वंशपरंपरा मेहेरबानी आणि संरक्षण मिळविल्यामुळे आपण दिलेले वचन पाळण्यास आपण बांधील आहोत असे मुंबई सरकारास वाटले.

दुसऱ्या जामिनक्यांचा अरबांशी काही संबंध नव्हता; परंतु काही गायकवाडांच्या घराण्यांतच त्या दिलेल्या होत्या. कानोजीचा मुलगा दौलतराव गायकवाड यास ब्रिटिशांचा आधार होता आणि त्याच्या बापाने संस्थानचेविरुद्ध बंड केले असताही तो त्याचेकडून काढून घेण्यात आला नाही; परंतु तो थोडासा वेडसर असून त्यास दारू पिण्याची सवय होती. सन १८३२ साली त्याने आपल्या बायकोस वेडाच्या झपाट्यात ठार मारिली. म्हणून त्यास आठ वर्षेपर्यंत बेड्या घालून तुरुंगात टाकले आणि तो सन १८५७ मध्ये मेला. कडी आणि संखेड्याच्या लढाईत मदत केल्यावर आणि धारच्या पवाराजवळ थारा घेतल्यावर मुंकुंदराव आणि मुराररराव गायकवाड यांनी जी राज्यभक्ती दाखविली त्याबद्दल ज्या त्यांना जामिनक्या देण्यात आल्या त्यांचा उल्लेख करण्याची जरुरी नाही. त्याचप्रमाणे महाराज आनंदरावांच्या बायका दाराबाई आणि उमेदकुंवरबाई व त्यांचा अनौरस पुत्र गणपतराव, तसेच फत्तेसिंगाची बायको राधाबाई आणि त्यांचा दत्तक

घेतलेला मुलगा गोविंदराव यास दिलेल्या जामिनक्यांचाही उल्लेख करण्याची जरूरी नाही. ब्रिटिश सरकारने शेवटच्या दोन गृहस्थांस काही काळापर्यंत आसरा दिला एवढीच गोष्ट सयाजीरावास बहादरी पाठबळाचा तिटकारा होता हे समजण्यास पुरे आहे; कारण ते लोक त्यांची गादी आणि त्यांचा जीव घेण्याची मसलत करीत आहे असा त्याचा समज होता.

सुभानजी पोळास मिळालेल्या जामिनकीचा उल्लेख झाला आहे, तेव्हा त्याबद्दल येथे सांगण्याची काही जरूर नाही. तेव्हा आता विश्वासघातकी कारभारी सीताराम याच्या घराण्यास मूर्खपणाने दिलेल्या मदतीच्या हकिकतीला लागूनच आपण दुसऱ्या कारभाऱ्यांना व त्यांच्या घराण्याला दिलेल्या जामिनक्यांकडे वळू. अतिशय बिलंदर धाकजी दादाजी यास मिळालेल्या आश्रयाची हकिकत मागे दिलीच आहे; परंतु या ठिकाणी ती पुन्हा ध्यानात आणावी. बाबाजी आपाजीचा मुलगा व विठ्ठलराव यांचा दत्तक मुलगा भास्करराव[१] याची काय दशा झाली हे मागे सांगितलेच आहे. हा मनुष्य मदत करण्याच्या योग्य नव्हता आणि त्याला जी मदत मिळाली ती त्यास सयाजीराव आणि वेणीराम यांचे कचाट्यातून सोडविण्यापुरती नव्हती हेही दाखविले आहे. एखाद्या मूर्खास त्याच्याच मूर्खपणापासून कोणत्याही सरकारास तारता येणार नाही. ब्रिटिश सरकारने जी अगदी शेवटची जामिनकी दिली ती सर्व मालिकेमध्ये फारच वाईट होती. त्याच्यासंबंधाने दुसरीकडे लिहिले असल्यामुळे येथे विठ्ठलराव दिवाणजी संबंधानेच थोडासा उल्लेख करतो. या गृहस्थास राजद्रोही आणि मसलती असे महाराज समजत असूनही सर जॉन माल्कम यांनी त्याला आपल्या देखरेखीखाली आणि छत्राखाली घेतला आणि महाराजांच्या स्पष्ट इच्छेविरुद्ध त्याला जामिनकी दिली. आता शास्त्र्याचे घराणे राहिले; हे गंगाधरशास्त्र्याचे फार दुर्भागी वंशज होत. ज्या अधिकाऱ्यांनी त्यांचे कार्य हातात घेतले होते ते कॅप्टन कार्न्याकप्रमाणे जामिनकीवर सही करण्याचे विसरले किंवा सर जॉन माल्कम आणि लार्ड क्लेअरप्रमाणे त्याचे अधिकार त्यास मिळण्याचे अगदी वेळीच हा देश सोडून गेले. काही काळापर्यंत त्यांचे हक्क कबूल करण्यात आले होते (१८४०) आणि स्वतः मुंबई सरकारांनी त्यांची दहा वर्षांची बाकी देऊन टाकिली; परंतु सन १८४३मध्ये ब्रिटिश सरकारने आपला आधार थोडासा काढून घेतला. सनद केली ती भलत्याच्याच नावाने केली. म्हणजे सर्व घराण्याच्या नावाने न करिता विवक्षित इसमाच्या नावाने केली. त्याच्या हक्कांची जेव्हा वारंवार चौकशी झाली तेव्हा काही हक्क दिले होते, काही परत घेतले होते, काही पुन्हा दिले होते यामुळे त्यांच्या हक्कांची इतकी काही भानगड होऊन गेली होती, की ब्रिटिश सरकारपासून त्यास मिळालेली मदत बहुतेक कवडीमोलच होती. संस्थानातील दुसऱ्या एका बड्या अधिकाऱ्याचीही हकिकत येथे सांगावी. सन १८२८ मध्ये नारायणराव महादेव मुजुमदार यास मिळालेली जामिनकी त्याने १८५८ मध्ये घालविली; कारण सर आर. शेक्सपिअर याच्या सांगण्याप्रमाणे गायकवाडाशी त्यांची वर्तणूक "बेअदबीची आणि दुराग्रही होती आणि कारभारी लोकांच्याविरुद्ध तो असे." शतकाचे आरंभी अशा कारणाकरिता ही जामिनकी गेली नसती हे सांगण्याची जरुरी नाही.

---

१. भास्करराव अजून हयात असून मुख्य दरकदार आहे.

गायकवाडाचे घराण्यातील काही लोक आणि कारभारी यांचेशिवाय काही पेढीवाले लोकांना ब्रिटिशांच्या जामिनक्या मिळाल्या होत्या. या वर्गापैकी एकाने अतिशय त्रास दिला आणि ती हकिकत बडोद्यातील एका प्रख्यात पेढीसंबंधाची असल्यामुळे येथे देतो. अठराव्या शतकामध्ये विसालाड जातीच्या एका बनियाचे दोन मुलगे हरी आणि भक्ती हे बडोद्याचे आणि पुण्याचे दरबाराशी देवघेवीच्या व्यवहारात फार श्रीमंत झाले. या दोघांस एक बहीण होती आणि तिला नंदलाल, सामळ आणि दुल्लभ असे तीन मुलगे झाले. त्यांचेपैकी दुसरा आपले मामास बडोदे आणि तिसरा पुणे मुक्कामी असे मदत करीत असत. जेव्हा हे दोन्ही मामा मेले, तेव्हा सर्व मालमत्ता आपल्याला मिळण्याची दुल्लभने खटपट केली; परंतु भक्तीच्या बायकोने आपले हक्क शाबूत करून सामळला दत्तक घेतले आणि असा सन १८०३मध्ये तो एकटा वारस झाला. सन १८०९मध्ये हा मेल्यावर याचे बायकोने बेचर सामळला दत्तक घेतले आणि या माणसाला त्या साली आणि पुन्हा १८२०मध्ये जामिनकी मिळाली. तो सन १८४५मध्ये वारला आणि त्याने आपल्या मालमत्तेची व्यवस्था बाबा नाफडे नावाच्या एका लबाड मनुष्याचे स्वाधीन केली. हा मनुष्य धाकजी दादाजीचा साथीदार होता व मुंबई सरकार त्याचा तिरस्कार करीत असत असा मागे उल्लेख आला आहे. तथापि, या घराण्याचा कारभारी म्हणून त्यास जामिनकीच्या फायद्याचा हक्क होता. सन १८४९ साली बेचरची दुसरी बायको जोइतीबाई हिने त्याच्यावर पैसे खाल्ल्याचा आरोप घातला, तेव्हा त्याने उलट दुसऱ्याचे मूल बाळगून ते आपलेच म्हणून आणि पुढे हे मूल मेल्यावर त्याचेजागी दुसरे मूल आणून ते पहिलेच असा बहाणा केल्याचा उलट आरोप तिच्यावर घातला. नंतर त्याने जोइतीबाईला अटकेत ठेवून तिचे मूल चोरून नेले; आणि ते मेले. या खटल्याचा एकतर्फी पंचायतीने निकाल लावला होता. तेव्हा कर्नल औट्राम याने त्याची चौकशी घालविली, तीत त्या बाईस फार अन्याय झाला अशी त्याची पक्की समजूत झाली; परंतु चौकशी चालली असतानाच त्याला प्रकृती बिघल्यामुळे बडोदे सोडून जावे लागले. ते प्रकरण कॅप्टन फ्रेंच यांनी हातात घेतले; पण नाफड्याचे करणे बरोबर आहे असे त्यांचे मनात राहिले. रेसिडेन्सीतील नेटिव्ह एजंट नरसोपंत याने त्यांचे मन वळविले असे कर्नल औट्रामचे म्हणणे आहे. या नरसोपंतावर कर्नल औट्राम यांचा जितका गैरविश्वास होता तितका कॅप्टन फ्रेंच यांचा विश्वास होता व हा बाबा नाफड्याचा स्नेही होता. काही दिवसांनी कर्नल औट्राम हे परत आल्यावर त्यांनी ते प्रकरण पुन्हा उपस्थित केले आणि दुसऱ्या पंचायतनाम्याचा निकाल विरुद्ध असतानाही सन १८५० मध्ये त्यांनी या प्रकरणात अशा काही गोष्टी उघाडकीस आणिल्या की, गायकवाडाने बाबा नाफड्याला सात वर्षांची कैद देऊन १५,५०० रुपये दंड केला. ही गोष्ट सांगण्याचे कारण एवढेच, की गायकवाडाच्या प्रजेला जामिनक्या देण्याने पुष्कळदा कसा विनाकारण त्रास झाला, ज्यास त्या मिळाल्या ते लोक बहुशः कसे त्या योग्यतेचे नव्हते आणि ज्या लोकांस सत्य आणि प्रामाणिकपणा म्हणजे काय हे माहित नव्हते त्यास न्याय देण्यामध्ये हुशार आणि दूरदर्शी अधिकाऱ्यांच्या व्यवहारामध्येही फार चमत्कारिक चुका कशा झाल्या हे स्पष्टपणे कळेल.

संस्थानातून लाचलुचपती आणि कारस्थाने चालत असत. त्याचे मूळ कारण मुंबई सरकारने पुष्कळ दिवस चालू ठेवलेली बहादरी पद्धत होय, असे पुढील भागात आपल्याला कळून येईल. या शोचनीय स्थितीमध्ये लवकर सुधारणा होण्याकरिता बडोद्यावरील राजकीय देखरेख नामदार कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने मुंबई सरकारच्या हातातून काढून हिंदुस्थान सरकारच्या हातात दिली.

●●●

प्रकरण २१ वे

सयाजीरावांच्या कारकिर्दीचा शेवट गणपतरावाची कारकीर्द – खटपट

◘

महाराजाच्या दिवाणाचे जे वजन असे, मग ते बऱ्याकरिता असो किंवा वाईटाकरिता असो त्याबद्दल पुष्कळ लिहिले आहे; परंतु रेसिडेंटाच्या दिवाणाने म्हणजे दरबारच्या नेटिव्ह एजंटाने व रेसिडेंसी ऑफिसामधील लहान-लहान कारकुनांनी काय केले हे सांगावयाचे आहे. महाराज पैशांच्या आणि राजकीय बाबतींत होत असलेल्या ढवळाढवळीच्या उघड उलट होते. याबद्दलही पुष्कळ लिहिण्यात आले आहे; परंतु उघड भांडण बंद झाल्यावर दरबाराला दुसऱ्या ज्या काही युक्त्या योजणे जरूर वाटले त्याच्याबद्दल अजून थोडेसे सांगावयाचे आहे. त्या युक्त्या म्हणजे लाच देणे, बलाढ्य सरकारच्या राज्यकर्त्यांच्या उद्देशांचा गुप्त रीतीने माग ठेवणे, ब्रिटिश सरकारच्यावतीची आणि त्यांच्या आश्रयाखाली उघडपणे जी एकजूट होती, त्याच्याजागी निराळ्या गुप्त मंडळ्या झाल्या त्याबद्दलही सांगावयाचे आहे.

या गोष्टीचा विचार करण्याची ही योग्य जागा आहे; मनात हवे हे नवीन नाही आणि तिच्या उल्लेखाने आपल्या गोष्टींच्या अनुक्रमात काही भंग होत नाही. गंगाधरशास्त्री आणि दावजी हे मोठे महत्त्वाचे वकील (नेटिव्ह एजंट) होते. गुप्तहेर आणि बातम्या आणणाऱ्या लोकांस संस्थान बहुतेक फार जुन्या काळापासून आपले पदरी ठेवित असे. राज्यकारभारामध्ये लाच देणे हे सर्वमान्य हत्यार होते. आम्हांस माहित आहे, की मुंबईहून सेक्रेटरीमधील अतिशय गुप्त बातम्याही सीताराम मिळवित असे. धाकजी दादाजीला पैशांच्यायोगाने गव्हर्नर, गव्हर्नरचे सेक्रेटरी व मोठमोठे अधिकारी लोकांस आपले बाजूचे करून घेता येई असा सयाजीरावाचा समज होता; परंतु सयाजीरावाचे उघडपणे भांडण संपल्यानंतर बडोद्याचे दरबारी भयंकर कारस्थाने चालत असत. सरतेशेवटी सर्व गुजरातेत असा लोकसमज झाला, की प्रत्येक इंग्लिश कामदाराचा काहीतरी बाजारभाव आहे. आणि (इंग्लिश) वरिष्ठ अधिकाऱ्यांची कीर्तीसुद्धा लबाड आणि बदमाश लोकांच्या हातात आहे. खटपटीचा जोर फारच वाढला होता; परंतु सर जेम्स औट्रामचा जोर त्याचेहीपेक्षा मोठा असल्यामुळे त्याने स्वतःचे जिवाकडे न पाहता आणि स्वतःचे साथीदारास

व अधिकाऱ्यांस या संकटाची विस्तृतता किती आहे याची कल्पना नसल्यामुळे उलट असताही, याच्या खटपटीने जोराचा बीमोड करून टाकला.

एकोणिसाव्या प्रकरणाच्या शेवटच्या टीपेत सर जॉन माल्कम यांनी या नेटिव्ह एजंटावर केलेली टीका आहे. त्यामध्ये शेवटी ते म्हणतात की, "याचेपुढे काही वजनदार दिसणाऱ्या हुद्याचे नेटिव्ह नोकर रेसिडेन्सीमध्ये नसावेत. कारकून आणि हिशेब ठेवणारे लोकांपलीकडे दुसरे कोणाची जरुरी नाही, सर्व बातम्या देणारे लोकांचे माहात्म्य कमी केले पाहिजे." हा ठराव खरोखर फारच प्रशंसनीय होता; परंतु दुर्दैवेकरून त्याची अंमलबजावणी झाली नाही. साराभाई नावाच्या नागर ब्राह्मणाचे लोकसमजाप्रमाणे हे वजन होते व त्याची जी खटपट होती त्याची माहिती झाल्यामुळे हा ठराव झाला. सयाजीरावाचा असा समज होता, की आपल्या गादीवर आपल्या मुलास बसविण्याच्या खटपटीत हा विठ्ठलरावास सामील आहे. कर्नल औट्रामचे मत असे होते, की गायकवाडीत आणि ब्रिटिश गुजरातेत सर्व मोठमोठ्या नेटिव्ह लोकांच्या जागांवर यांचे नातेवाईक व जातभाई असल्यामुळे त्याचे ह्यास पाठबळ होते. त्याच्याशी गायकवाड व दरबाराची मसलत असे व या कारणांमुळे त्यांच्या हातात जी मोठी सत्ता होती त्याचा तो फार दुरुपयोग करी.[१]

मुत्सद्दी व दिवाण जेव्हा बडोद्यास आला होता त्यावेळी सारा बोध टाकण्याबद्दल आपण त्याचे मन वळविले, अशी आदितरामाने ऐट मारिली. ही गोष्ट खरी असो किंवा नसो, साराभाईचे वजन त्याच्या घराण्यात कायम राहिले. मि. सदरलंड यांचे राजपुतान्यांहून बडोद्याच्या दरबारी नेमणूक झाली. त्याच सुमारास औट्राम साहेबाची महिकांठ्याचे आसिस्टंट रेसिडेंटाचे जागी

१. गुर्जर ब्राह्मणाच्या ८४ पोटभागांपैकी नागर ब्राह्मण फार उपयोगी व औदिच्याचे पोटभाग ४ व संख्या ही मोठी. शिवोपासक औदिच्यांबद्दल थोडेसे सांगितलेच आहे. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतले १००० ब्राह्मण मूळराजाने गोळा केले. त्यापैकी अर्ध्यांना सिहूर व १०० खेडी दिली व अर्ध्यांना सिद्धपूर व १०० खेडी दिली व एका टोळीला खंबायत व १२ खेडी दिली अशी कथा आहे. बाकी ब्राह्मण मूळराजापेक्षा जुने असून सिहूर हे गुजरातच्या जुन्या सिंहाची राजधानी सिंहपूर असावे.

कर्नल औट्राम हा नागर ब्राह्मणांना भीत असे व त्यांचा द्वेषही करी. त्यांना नागरपासून नाव दिलेले आहे. औट्राम त्यांच्या नावाची उत्पत्ती नाग म्हणजे सर्प या शब्दापासून करी; परंतु त्यांची हुशारी व महत्त्वाकांक्षा यांजबद्दल त्याचे मत चुकीचे नव्हते. जनरल ली ग्रँड जेकब याने त्यांजबद्दल असे लिहिले आहे, "नागर ब्राह्मणांची जात काठेवाडात फार प्रबळ आहे. बडोद्यातून त्यांना हाकलून लावल्यापासून त्यांची संख्या इतर ठिकाणी बरीच वाढली. ते जातिवंत कारस्थानी व राज्यकलेला आसक्त असे होते. त्यांची जात फार चाणाक्ष असून ते आपले हुशारीने व कर्तबगारीने प्रत्येक दरबारात आपला शिरकाव करून घेतात. त्यांच्या स्मार्त व वैष्णव मिळून जो वडनागर नावाचा पोटभाग आहे त्याची त्याबद्दल फारच ख्याती आहे. हे विशाळनगर ब्राह्मणापेक्षा दूर असतात व त्याचे पुढेही असतात. विशाळनगर ब्राह्मण आपली उत्पत्ती १७९२मध्ये गादीवर बसलेला वाघेलाचा पहिला राजा विशाळदेव याच्यापासून सांगतात व साठोद्र व इतर ब्राह्मणही तीच आपली उत्पत्ती सांगतात.

मोध व इतर लहान ब्राह्मण जातीबद्दल लिहिण्यास येथे जागा नाही. शिवाय गायकवाड गुजरातेत आल्यापासून तेथे कोकणस्थ, देशस्थ ब्राह्मणांची संख्या जास्त वाढली हेही सांगण्याची जरुरी नाही व त्यांच्या गावाच्या जातवाल्यांशी त्यांची सामाजिक व धार्मिक जातभाईकी अजून आहे.

नेमणूक झाली. औट्राम सदरलंड साहेबांचा ठरावा मानीत असे. पहाडी बेबंद लोकांची प्रीती त्यांनी मिळविली आणि त्या लोकांचीच एकहुकमी पोलिसी पलटण तयार केली. सन १८३७ मध्ये औट्राम साहेबाने साराभाईचा मेहुणा ब्रिजलाल याचा एक साथीदार रेसिडेंटित कारकून होता. त्यास एका मोठ्या लबाडीबद्दल गुन्हेगार ठरवून नोकरीतून कमी केले; परंतु हाच ब्रिजलाल साराभाईचे जागी आल्यानंतर त्याचेवर कोणताही आरोप औट्राम साहेबास साबित करता आला नाही. हा सदरलंड साहेबांचे कामास पूर्णपणे हरकत आणित असे, म्हणून सन १८३८ मध्ये पॉलिटिकल कमिशनरने खात्याच्या स्थितीची तपासणी करण्याकरिता मि. मॅलेट यांस मुद्दाम पाठविण्यात आले. नागर ब्राह्मण, गायकवाड आणि संस्थानचे सावकार यांची एकजूट असल्यामुळे आणि त्यांचे हातात अधिकार असल्यामुळे मॅलेट साहेबास कोणासही उघड करता आले नाही, परंतु "मोठ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची नावे किती नि गोष्टीपर्यंत उपयोगात आणली होती" याचे त्याने टिपण मात्र करून ठेविले. सन १८३८ मध्ये आनंदराव नावाच्या कारकुनाने लाच घेतल्याची शंका आली; परंतु त्यास पकडता आले नाही. तथापि, नंतर लवकरच त्याचा भाऊ दत्तोपंत हा त्याच गुन्ह्यात येऊन बडतर्फ झाला. पुढे मोतीलाल नावाच्या कारकुनाचीही तीच दशा झाली. मोतीलालचा हा पहिलाच गुन्हा नव्हता आणि त्या लबाड मनुष्याने खोटे अर्ज करून राजपिंपळ्यामधून एका ब्रिटिश ऑफिसराला दूर करविले होते; तथापि इतरांप्रमाणे त्याला फक्त बडतर्फच केले. मुत्सदी व दिवाण यांनी आणखी उघड निर्भर्त्सना काही केली नाही. या बोधानुसार वाईट कृत्याच्या प्रमाणाची मुंबई सरकारास मुळीच काळजी नसल्यामुळे त्या लोकांस शिक्षा करण्यास त्याच्या अपराधाचा भरपूर पुरावा त्यास पाहिजे असे आणि ते ज्या शिक्षा देत, त्या इतक्या बेताच्या असत की त्यांचा दुसऱ्यावर प्रतिबंधक असा परिणाम मुळीच होत नसे. आम्ही पूर्वी सांगितलेच आहे, की सर्व दुष्टाव्याचे घर ब्रिजवाल हा सन १८३७ मध्ये निसटला; परंतु पुढील साली तो दुसऱ्या एका खटल्यात सापडला आणि नेहमीच्या सौम्यरीतीने त्यास ता. २०, माहे सप्टेंबर सन १९३८ रोजी चाकरी सोडण्यास विनंती करण्यात आली. इंग्लिश हेडक्लार्क मि. इव्हान्स हाही त्याचवेळी पुष्कळ कारस्थानांत गुरफटलेला सापडला. परंतु या ज्या गोष्टी बाहेर आल्या यापासून खरा फायदा असा झाला, की साराभाईच्या मेहुण्याचा पाडाव झाला आणि नागर ब्राह्मणांची जूट मोडली.[१] एवढे लक्षात ठेविले पाहिजे, की मागे सांगितल्याप्रमाणे यावेळी गोपाळराव मैराळ आणि धाकजी दादाजी यांचेमार्फत सर जेम्स कार्न्याक यास आणि मोतीलाल आणि भाऊ पुराणिक यांचेमार्फत मि. विलोबी यास लाच देण्याचे सयाजीरावाचे जारी प्रयत्न सुरू होते. याचवेळी वेणीराम आदितराम आणि बाबा नाफडा या दोघांचे बडोद्यास फार वजन होते यांचेपैकी दुसरे गृहस्थ हरिभक्तीच्या घराण्याचे व्यवस्थापक आणि प्रतियजमानच होते. महाराजाने त्याबाबतीत डोळे मिटले होते.

मि. सदरलंड कामावर असताच सन १८३८च्या मे महिन्यामध्ये एकाएकी आणि संशयात्मक रीतीने हरिभक्तीच्या; परंतु डॉ. ऑरनाटच्या सांगण्यात तो सुनबहिरीने ऑट्रामला यापूर्वीच

---

१. पृष्ठ २०७ खालील टीप पहा.

अफगाण लढाईवर जावे लागले नव्हते. सन १८४०च्या ऑगस्ट महिन्यात सुधारणेचे काम मि. क्लाईड यांनी हातात घेतले; परंतु पूर्वीच्या अधिकाऱ्यांपेक्षा त्याने आपल्या कामात कमी प्रोत्साहन किंवा ज्यास्त परिमितता ठेविली. निदान मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स कार्न्याक आणि सर जार्ज ऑर्थर यांचातरी असा समज झाला; कारण त्यांचे मनातून "मागण्यांचा" योग्य शेवट लावावयाचा होता. म्हणून गव्हर्नरला लाच देण्याचा गोपाळरावांचा प्रयत्न जेव्हा सन १८४३ मध्ये उघडकीस आला, तेव्हा महाराजाला व त्यांच्या सल्लागाराला ताकीद आणि शब्दाने समजी देण्याचा रेसिडेंटास हुकूम आला.

मि. बॉईड यांची कारकीर्द काही मोठी नव्हती; कारण सन १८४४च्या ऑगस्ट महिन्यात तो बडोद्यास वारला आणि त्याचेजागी सर रॉबर्ट आरबथनाट याची नेमणूक झाली. तो येईपर्यंत हुशार आसिस्टंट मि. ऑगिलव्ही याजकडे कामाचा ताबा नसून मि. रेमिंग्टन हे काम पाहत असे. यांची मते ऑट्राम साहेबांच्या मतांशी पूर्णपणे जुळत नव्हती. ज्या मनुष्यावर ऑट्राम साहेबांचा फार विश्वास होता, त्या मनुष्यास वस्तुतः यांनी काढून टाकले. हा मनुष्य विनायक मोरेश्वर फडके हा होय. हा बडोद्यास राहत असे; पण तेथील रहिवासी नव्हता. बाजीराव पेशव्यांचे सैन्याचा सेनापती हरी फडके मुत्सदी व दिवाण याचे काही लांबचे नाते होते आणि तिच्या मागणी करण्याकरिता तर्फेने येथे आला होता. फडके बडोद्यास सहा वर्षे राहिला होता आणि याअवधी महाराजांचा त्याचेवर विश्वास बसला; परंतु सन १८३६मध्ये ऑट्राम साहेबांच्या समजुतीप्रमाणे त्यास वेणीराम आदितरामाच्या खटपटीने शहरातून हाकून लावण्यात आले. नंतर दोन वर्षे पुष्कळ बदमाशगिरीची कृत्ये बाहेर काढून आसिस्टंट रेसिडेंटाची त्याने शिफारस मिळविली आणि शेवटी मोतीलाल पुरुषोत्तमाचे जागी त्याची नेमणूक झाली. जप्त केलेल्या पेटलाद जिल्ह्याची व्यवस्था हाच पाहत असे; परंतु मि. रेमिंग्टनचा त्याचेवर विश्वास नव्हता आणि आम्ही वर सांगितल्याप्रमाणे त्याने त्यास सन १८४४ मध्ये बडतर्फ केले.

दरम्यान ता. २१, माहे जुलै सन १८४३ रोजी नेटिव्ह एजंट हरिलाल यास त्याचे लाचलुचपतीचे व्यवहार मि. बाईड यांनी उघडकीस आणल्यामुळे बडतर्फ केले आणि त्याच्या रिकाम्या झालेल्या जागेस दोघांनी अर्ज केले. त्यापैकी एक आता सांगितलेला फडके हा होता, आणि दुसरा नरसोपंत नावाचा एक जुना सरकारी नोकर होता, आणि शेवटी याच माणसाची निवड झाली. हा नरसोपंत, बाबा नाफडे, गणेशपंत, फडणवीस आणि दादोपंत यांचा नातेवाईक तरी होता किंवा त्यांचे जातीचा होता. आपले घराण्याचे हिताकरिता अंध होऊन आणि लाचलुचपतीने वळून हा नवा एजंट (वकील) आपल्या यजमानाचा विश्वासघात करतो असे ऑट्राम साहेबांस वाटले.

सर रॉबर्ट आरबथनाट यांनी रेसिडेंटाचे सर्व काम १८४५पासून एप्रिल सन १८४६पर्यंत केले असता नादुरुस्तीमुळे त्यास नोकरी सोडावी लागली. तर ११ महिनेपर्यंत सुरतचा जज्ज मि. अँड्र्यूझ याने त्याजागी काम केले. त्याच्या दुर्दैवाने बाबा नाफाड्याच्या कागदात अथवा हिशेबात ॲक्टिंग रेसिडेंटाजवळ वजन असलेल्या काही हलकट लोकांस लाच दिल्याची एक बाब ऑट्राम साहेबास सापडली. याबद्दलची मि. अँड्र्यूझ याला काही माहिती होती असे समजण्यास जरी

काही कारण नव्हते तरी आपल्याशी ओळख असलेल्या लोकांवर संशय आल्याची गोष्ट यांचे मनास फार लागली. नंतर जो यास त्रास झाला किंवा श्रम पडले त्यामुळे त्याचे देहावसान झाले.

मि. अँड्र्यूझ याचे रेसिडेंटाचे जागी कर्नल जेम्स ऑट्राम याची सन १८४७च्या मे महिन्यात नेमणूक झाली. यावेळी तो बडोद्यास सुमारे दीड वर्ष राहिला; परंतु काही वेळपर्यंत आपण याचे कारकिर्दीचा विचार एकीकडे ठेऊन सयाजीराव महाराजाचा ता. २८, माहे डिसेंबर सन १८४७ रोजी मृत्यू झाला तिकडे वळू. सर्व गायकवाडांत या विशेष विख्यात गायकवाडाच्या कारकिर्दीसंबंधाने टीकादाखल किंवा दोषादाखल पुष्कळ लिहिले आहे; पण प्रथम एवढे कबूल केले पाहिजे, की इतरांपेक्षा या महाराजाने आपल्या घराण्याची सत्ता वाढविण्यासाठी पुष्कळ गोष्टी केल्या व लोकांचे हृदयांत त्याबद्दल आदर व भक्तिभाव असे. त्याने पत्करलेली नीती चुकीची होती किंवा चुका केल्या असे कबूल न करणारे काही लोक आहेत, हे सर्व संस्थानचे कर्ज फेडण्याकरिता होते. लाचारपणा तर त्यावेळच्या ब्रिटिश सरकारचा संहार करण्याकरिता म्हणून त्याचे करणे जसे बरोबर होते तसे त्याच्या प्रयत्नांना यश येत असे. पुष्कळदा गाव खालसाचे ठराव झाले; पण अखेरीस त्याचे सर्व प्रांत त्यास परत मिळाले आणि "रॉबर्टस् हार्स"करिता त्याला जरी अजून दरसाल तीन लक्ष रुपये द्यावे लागत असत तरी त्याचे त्याला काही ओझे नव्हते. यासाठी बाह्यतः जरी तो शरमल्यासारखे दाखवी तरी आतल्याआत तो हसत असे. खरोखर त्याने आपल्या लष्करावर, सरदारांवर, श्रीमान लोकांवर, कारभाऱ्यांवर आणि राजवाड्यातील प्रत्येक माणसावर आपला दाब चांगला राखिला आणि संस्थानात ढवळाढवळ करण्याचे सोडून देण्यास ब्रिटिश सरकारास हळूहळू लाविले असे काही लोकांचे म्हणणे आहे. बडोदे सरकार व ब्रिटिश सरकार यांचेमध्ये याने जी फूट पाडली तिजमुळे प्रथम स्नेहसंबंधाचा सल्ला जाऊन नंतर संस्थानची व्यवस्था संस्थानाकडे आल्यावर तेथील राज्यव्यवस्था कशी चालली होती याची मुंबई सरकारकडून बारीक चौकशी सुरू होऊन निश्चित प्रतिक्रियाही कशी होऊ लागली याचाही विचार करणे शहाणपणाचे होईल.

सयाजीरावास पाच औरसपुत्र होते; पैकी पहिले चार त्याची पहिली बायको चिमणाबाई हिजपासून झालेले होते आणि तीन अनौरस पुत्र होते. गणपतराव हा उघडच गादीचा वारस झाला. त्याचे वय ३० वर्षांचे होते आणि दुसरा आनंदराव हा दहा वर्षांनी लहान होता. खंडेरावाच्या मागून सयाजीरावाचा थोरला चिरंजीव मल्हारराव गादीवर बसला; कारण खंडेरावास पुत्र नव्हता आणि त्याचे मरणापूर्वीच सयाजीरावाचा तिसरा चिरंजीव आनंदराव हा मरण पावला होता.

प्रत्येक बाबतीत गणपतराव आपल्या वडिलांपासून निराळा होता. एका गोष्टीत तो आपले धाकटे भावापेक्षा बरा होता; कारण तो फार खर्चिक नसे. "तो अशक्त, व्यसनी आणि अशिक्षित आहे, त्याचे आपल्या बापाशी बनत नाही आणि त्यास पदच्युत करण्याबद्दल त्याने कारस्थान केले होते" असे तो राज्यारूढ होण्याचेपूर्वी काही वर्षे मि. ऑगिल्व्ही याने त्याच्यासंबंधाने लिहिले होते; परंतु सन १८५१मध्ये कर्नल ऑट्रामच्या लिहिण्याने ही टीका कमजोर झाली. गणपतराव



गणपतराव गायकवाड (१८४७-५६)

दुर्बल आहे खरा; पण दुर्बुद्ध नाही. फक्त दिवाणाचा त्याच्यावर पगडा फार आहे असे त्याला वाटले.

महाराजांचे अशिक्षणाचा ज्याअर्थी उल्लेख केला आहे, त्याअर्थी हीही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे, की दामाजीच्या वेळेपासून कोणताही गायकवाड पुण्यास जाण्याशिवाय आपल्या मुलखाच्या बाहेर पडला नाही आणि ते आपल्या लहानशा संस्थानातच नेहमी गुरफटलेले असल्यामुळे संकुचित व वक्रबुद्धि, मुत्सदी व दिवसमान फिरले होते त्याला अनुसरून वागण्याचा बोध व्हावा म्हणून स्वराज्याच्या गतीकडे लक्ष देण्यास सांगत. त्याखेरीज आपले राज्याचे पलीकडे काही जग आहे अशी गायकवाडास कल्पनाच नसे. या समय अंतःकरणाच्या महाराजांस काही पुस्तके वाचण्यास कसे लाविले, लंडन शहर कलकत्त्याचे दक्षिणेस कोठेतरी आहे ही त्यांची समजूत कशी घालविली, आगगाडीचे इंजिनचे एक मोठे खळगे त्यांचेकडून कसे विकत घेवविले वगैरे गोष्टी ॲक्टिंग रेसिडेंट कॅप्टन फ्रेंच यांनी लिहून ठेविल्या आहेत. पुढे-पुढे त्यांनी प्रवास केला, नंतर खंडेराव आपले संस्थानच्या इतमामाने राजपुरुष ड्यूक ऑफ एडिंबरो यास भेटण्याकरिता मुंबईस गेले होते; आणि नंतर त्यांचे (खंडेरावाचे) दत्तक चिरंजीव म्हणजे हल्लीचे महाराज सयाजीराव हे मुंबईसच नव्हे तर दिल्ली व हिंदुस्थानातील दुसऱ्या मोठमोठ्या ठिकाणी गेले. खंडेरावाच्या विस्तृत माहितीचे काय परिणाम झाले ते या पुस्तकात दिले आहेत; परंतु सयाजीराव महाराजांचे अधिक उदात्त शिक्षणापासून काय निष्पत्ती होईल याची इतक्यात अटकळ बांधता येत नाही. अगदी अलीकडे गायकवाडांचा एकलकोंडेपणा आपल्या कल्पनेपेक्षा जास्त होता आणि बाहेरच्या लोकांशी त्यांचे जे एकदम दळणवळण सुरू झाले त्याबाबतच्या कारणाचे दिग्दर्शन आता केले. कॅप्टन फ्रेंचने महाराजास एक इंजिनचा नमुना नजर केला आणि त्याच अधिकाऱ्याने गुजरातेमध्ये रेल्वे सुरू करण्याचे कामास पुष्कळ स्वरूप आणले आणि तेव्हापासून या रेल्वेमुळे संस्थानच्या व्यापारात राज्यकारस्थानांत आणि चालीरीतींत परिवर्तन झाले आहे.

सन १८५३मध्ये मुंबई आणि गुजरातमधील प्रदेशाची काही इंजिनिअर लोकांनी तेथे रेल्वेचा रस्ता करण्याच्या उद्देशाने पाहणी करण्याचे सुरू केले. सुरतेस जेव्हा काम सुरू झाले तेव्हा हा रस्ता बडोदे संस्थानातून नेणे जरूरीचे आहे असे आढळून आले आणि गणपतरावाबरोबर पत्रव्यवहार सुरू झाला. तेव्हा खासगी (खालसा नव्हे) जमिनीच्या मालकांना मोबदला देण्याचा आणि आवक-जावकाच्या जकातीचे बडोद्याच्या उत्पन्नात जे नुकसान होईल त्याची व्यवस्था करण्याचा ठराव झाल्यावर सन १८५६मध्ये महाराज साहेबांनी लागेल तितकी जमीन खुशीने दिली. वरील अटी कबूल कराव्या लागल्या हे उघडच आहे; परंतु खासगी जमिनीच्या मालकांना मोबदला देणे जरी शक्य होते व तो दिला तरी आवक-जावकाच्या जकातीपासून संस्थानास होणाऱ्या तोट्याबद्दल मोबदला देण्याची बाब ठरविणे कठीण पडले. आवक जावकाच्या जकातीचा जो तोटा सिद्ध करण्यात येईल त्याचेबद्दल ब्रिटिश सरकारपासून दरसाल मोबदला घेण्याची खंडेरावाने सन १८५९मध्ये कबूल केले. तथापि, रेल्वे सुरू झाल्यामुळे कस्टमच्या जकातीचे उत्पन्न वाढून आणि त्याचेमुळे आगत व निर्गत व्यापाराची भरभराट होऊन बडोदे संस्थानाचा जो (नुकसानीच्या) प्रमाणाने नफा झाला त्याचीही मोजणी करणे रास्त आहे, आणि म्हणून या

दोहोंची सरासरी काढणे फार कठीण होते. हल्लीच्या राज्यकारभाराने आवक-जावकाच्या जकातीबद्दलच्या मोबदल्यावरील आपले सर्व हक्क सोडून दिले आहेत.

यAप्रमाणे, बॉम्बे, बडोदा आणि सेंट्रल इंडिया रेल्वे सुरू झाली (पहिली गाडी सन १८६० मध्ये सुरू झाली); परंतु त्याकरिता संस्थानचा पैसा खर्च झाला नाही व त्या रेल्वेपासून संस्थानास झालेला फायदा प्रत्यक्ष नव्हता. उलट रेल्वेकरिता जेवढी जमीन लागली, तिजवरील आपला अधिकार संस्थानास सोडावा लागला आणि मग साहजिकच त्या रेल्वेच्या हद्दीतील दिवाणी व फौजदारी हक्कही नाहीसे झाले; परंतु अप्रत्यक्ष फायदे पुष्कळ झाले. सन १८७७ मध्ये अहमदाबादपासून राजपुतान्यापर्यंत रेल्वे वाढविण्याचे जेव्हा ब्रिटिश सरकारच्या मनात आले तेव्हा हल्लीच्या राजाने बडोदे संस्थानातील जी जमीन लागली ती ब्रिटिश सरकारला फुकट दिली. या जमिनीवरील राजाच्या मालकी हक्काखेरीज सर्व अधिकार रेल्वे असेपर्यंत सोडून देण्यात आले आणि व्यापारावर कर बसविण्याची सत्ताही सोडून दिली. अहमदाबाद आणि पालनपूर यांच्यामध्ये जो फाटा नेला आहे, तो लहान साचाचा आहे.

मोठी रेल्वे बांधण्याचे कामी ब्रिटिश सरकाराला मदत करून गायकवाड महाराजाने (१८७२-७३) बी.सी.सी. आय. रेल्वेवर डभई आणि मियागाव अथवा कर्जत स्टेशनांच्यादरम्यान वीस मैल जी ट्रामवे होती तेथे आगगाडी केली. हिचा खर्च ३,७३,४०० रु. किंवा दुसऱ्या काही मोजणीप्रमाणे ४,०२,१०९ रु. झाला. या रेल्वेरस्त्याची रुंदी सर्व हिंदुस्थानातील रेल्वेपेक्षा कमी आहे; कारण त्याची रुंदी २१/२ फुटापेक्षा जास्त नाही. सन १८७६-७७ सालामध्येसुद्धा अगदी सढळ प्रमाणावर हिशेब करूनही एकंदर घातलेल्या भांडवलावर शेकडा २.५० टक्क्यांपेक्षा जास्त नफा झाला नाही. ज्या देशामध्ये थोड्या पैशांत रस्ते बांधणे आणि ते दुरुस्त करणे अशक्य आहेत, त्या देशामध्ये व्यापाराला मार्ग काढून देण्यास मुख्य रेल्वेचे फाटे असणे फार उपयोगाचे आहे, अशा समजावर पूर्वेच्या बाजूला बहादरपूर, पश्चिमेच्या बाजूला चांदोड आणि वायव्य दिशेस बडोदे असे डभईशी जोडून देण्यासाठी हे लहान साचाचे फाटे काढण्याचा राजा सर टी. माधवरावांनी ठराव केला आहे. या विस्ताराचे काम पुरे झाले म्हणजे एकंदर लांबी ३५.५ मैल होईल व त्याचा खर्च ६,८३,३९८ रु. होईल असा अजमास आहे. सध्या काम झपाट्याने चालू आहे.

हे अपरिहार्य विषयांतर सोडून आता आपण संस्थानाच्या राजकीय इतिहासाकडे वळू. मि. रेमिंग्टन हे बडोद्यास काम करीत असता त्यांनी फडक्यास बडतर्फ केले. नरसोपंत नेटिव्ह एजंट झाला आणि मि. सदरलंड याचे हाताखाली दुय्यम म्हणून दहा वर्षे काम केलेले कर्नल ऑट्राम रेसिडेंट होऊन आले या सर्व गोष्टी आपण पाहिल्या आहेत. काही काळापर्यंत नरसोपंत कर्नल ऑट्राम यास बरा मनुष्य वाटला; परंतु त्याचा स्नेही बाबा नाफाडे याने गोविंदराव गायकवाडावर जो तीन लाखांचा खोटा दाव केला होता त्याचे संबंधाने काही महत्त्वाचे कागदपत्र त्याने दाबून ठेविल्याचा त्यास संशय आला. नंतर बाबा नाफाडे ज्या गोराजी पोळाच्या मालमत्तेची व्यवस्था किंवा गैरव्यवस्थेकरिता होता त्यास खाड्यात घालण्याचा त्याने दुसऱ्यांदा प्रयत्न केला. आणि एजंट बाबाच्या हातात खेळतो असे पुन्हा ऑट्राम साहेबांस वाटले. म्हणून रेसिडेंटाने फजिती

झालेल्या फडक्याचा पुन्हा एकवार सल्ला घेतला आणि गोराजा पोळा आणि जोइतीबाई शेठाणी यांचे खटले छानून काढण्याचे कामी त्याची मदत घेतली. कर्नल ऑट्राम यांचे मत बरोबर असो किंवा चुकीचे असो, दुसरा खटला चालू असतानाच दुर्दैवेकरून त्यांची प्रकृती नादुरुस्त झाल्यामुळे रेसिडेंटास बडोदे सोडून प्रकृती सुधारण्याकरिता इजिप्तला जावे लागले.

नंतर त्याचे जागी आक्टोबर सन १८४८ पासून ते सन १८५० पावेतो कॅप्टन फ्रेंच याने काम केले आणि कर्नल ऑट्राम याने केलेल्या सर्व गोष्टी त्याने फिरवून टाकल्या. नरसोपंतावर पूर्ण विश्वास टाकला फडक्यास नोकरीवरून दूर करण्याचे कामी गणपतराव महाराजास पूर्णपरवानगी दिली आणि जोइतीबाईचेविरुद्ध बाबा नाफडे जी खटपट करीत होता त्यास मदत केली. एकंदरीत बडोद्यातील पक्षासंबंधाने कर्नल ऑट्राम यांचे जे मत होते त्याच्या अगदी उलट कॅप्टन फ्रेंच यांचे मत होते. महाराजाचे आणि रेसिडेंटाचे मन वळविण्याइतके ज्या लोकांचे यावेळी वजन होते, त्या लोकांचे योग्यतेचा या ठिकाणी विचार करणे वायफळ होईल. त्यांचे मार्ग अगदी वाकडे होते आणि त्यांचे उद्देशही तितकेच स्वार्थदृष्टीचे होते. कर्नल ऑट्राम यांनी आपल्या समकालीन लोकांमध्ये आपले नाव आपल्या शूरपणाबद्दल आणि राजकीय अधिकाऱ्याच्या नात्याने उत्साह आणि साहसाबद्दल गाजवून ठेविले आहे; परंतु कॅप्टन फ्रेंच हे इतर काही लोकांप्रमाणे कर्नल ऑट्राम यांचे जरी मताविरुद्ध होते, तरी तो फार हुशार अधिकारी होता आणि बडोद्यास त्यांचे नाव अद्यापि लोक कृतज्ञतेने आठवित आहेत.[१]

सन १८५०च्या मे महिन्यात कर्नल ऑट्राम हे बद्योडास परत आले आणि नेहमीच्या कडकपणाने बडोद्याच्या लोकांबद्दलचे आणि तेथे चाललेल्या कारस्थानाबद्दलचे आपले मत सिद्ध करून आपला शहाणपणा स्थापित केला. फडक्याजवळ ब्रिटिश सरकारची जामिनकी असूनही त्यास शहरातून घालवून दिल्याबद्दल कॅप्टन फ्रेंच यास ठपका आला. जोइतीबाईविरुद्ध बाबा

---

१ सदर्लंड व ऑट्राम हे दोघेही स्वभावाचे फार चपल व जोरदार. त्यांच्या लुच्चेगिरीचा बीमोड करण्याचा निश्चय व ज्यांच्याशी त्यांना व्यवहार करावा लागे त्यांच्या चमत्कारिक चालीरीतीमुळे ते त्यांचा तिरस्कार करी. दोघे असे व त्यांचे पाठीमागून आलेले लोक चालू दोषांबद्दल जास्त सहनशील असत असे म्हटले तर या दोन्ही वर्गांत कॅप्टन फ्रेंचची गणना होण्यासारखी नव्हती.

तो कर्नल ऑट्रामप्रमाणेच बयाणदारीचा दोष दाखविण्यात तत्पर असे; पण ऑट्राम कुचकामी लोकांची कढ घेण्याच्याविरुद्ध असे व फ्रेंच या पद्धतीने गायकवाडाला येणाऱ्या पायबंदामुळे त्याच्याविरुद्ध असे. सर्व बाबींत सुधारणेच्या मार्गाने महाराज व त्याच्या अनुयायी मंडळीला आपल्याबरोबर नेण्याची त्याची सदैव खटपट. तेव्हा त्याचेच कारकिर्दीत स्वास्थ्य, कारस्थानाचा प्रभाव, सुधारणेचा खरोखर पक्का उद्योग होता व तशी स्थिती यापूर्वीही नव्हती व यानंतरही नाही. थोडेसे शिकण्यास, मुंबईसारख्या ठिकाणी हिंडून येण्यास, रस्ते करण्यास व रस्त्याच्या बाजूने दुतर्फा झाडे लावण्यास त्यानेच महाराजास सांगितले. त्याच्या वेळात छावणी व शहर व्यवस्थितपणे जोडले गेले. पूल व शिराई बांधल्या गेल्या. राजधानी व टंकारिया बंद यांच्यादरम्यान ट्रामवे बांधण्याचा, तसेच तेथे धर्मशाळा बांधण्याचा व तेथून मंडाळापर्यंत रस्ता करण्याचा मसुदा तयार झाला होता. पेटलाद व इतर परगण्यांतील ठेवा कुणब्यांच्या मोठ्या जातीतील बालवधाची चाल मोडण्याबद्दल, त्यांच्यामधील लग्नखर्च कमी करण्याबद्दल आणि त्यांच्यातील भाट चारणादी

(टीप - १ पुढील पानावर)

नाफडे या खटल्याचा निकल पंचामार्फत पहिल्या पक्षकाराचे विरुद्ध दिला होता. त्या खटल्याची पुन्हा तपासणी करून बाबाची हरामखोरी उघडकीस आणली आणि त्याची जामिनकी काढून घेतली. नेटिव्ह एजंट नरसोपंत याची मुद्दाम नेमलेला कमिशनर मि. फ्रिअर याचेपुढे चौकशी झाली आणि सन १८५१च्या जूनपासून ऑक्टोबरपर्यंत स्वस्थपणे चौकशी चालल्यावर सात आरोपांपैकी एक आरोप त्याचेवर लागू झाला. याने ''कर्नल ऑट्राम यास भलते सलते समजावून फसवून सरकारी विश्वासाचा दुरुपयोग केला.'' तथापि, नुसते ''त्यास त्याचे जागेवरून काढून टाकण्यात आले आणि पुन्हा नोकरीच्या कामास त्यास नालायक ठरविले.'' त्याचवेळी दुसऱ्या चार लहान कारकुनांना रेसिडेन्सी कचेरीतील आपल्या नोकऱ्या सोडण्याचा हुकूम झाला.

तारीख ३१, माहे एप्रिल सन १८५१ रोजी कर्नल ऑट्राम याने मुंबई सरकारास खटपटीबद्दलचा रिपोर्ट पाठविला. त्यात लाचलुचपत व अनीतीच्या प्रकारांनी बडोदे संस्थानाचा नाश होत असतानाही ते बंद करण्याकरिता मुंबई सरकारने जास्त कडक उपाय योजिले नाहीत म्हणून त्यास दोष दिला. या रिपोर्टवरून मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड फॉकलंड आणि मेसर्स ब्लेन आणि वेल यांनी रेसिडेंटास बडोदे सोडण्यास सांगितले, म्हणून ता. २१, माहे डिसेंबर सन १८५१ रोजी कर्नल ऑट्राम याने एक महिन्याची रजा घेतली तारीख २० जानेवारी सन १८५२ रोजी मि. जे. एम. डेव्हिस याची नेमणूक झाली. त्याच सालच्या जुलै महिन्यात नामदार कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने रेसिडेंट या नात्याच्या कर्नल ऑट्रामच्या सर्व कारकिर्दीचे सिंहावलोकन केले आणि खटपट रिपोर्टात योग्य मानाचा अभाव असल्याचे सांगून ''पुष्कळ अडचणी असताना ज्या उत्साहाने, उद्योगाने, योग्यतेने आणि यशाने त्यांनी चौकशी कशी चालविली होती'' त्याबद्दल त्यांची स्तुती करून शेवट केला. म्हणून कर्नल ऑट्राम यांची मोठ्या जागेवर नेमणूक होईल अशी त्यांची आज्ञा होती. काही दिवसपर्यंत तो बद्योडास परत आला असे आपल्यास आढळून येईल.

कर्नल ऑट्राम याने एप्रिल महिन्यामध्ये आपला खटपट रिपोर्ट लिहिल्यानंतर नऊ-दहा महिन्यांनी बडोदे आणि हिंदुस्थान सोडिले. दरम्यान, एक-दोन चमत्कारिक गोष्टी घडून आल्या. महाराजाचे भाऊ आणि गादीचे पुढील मालक खंडेराव यास कारभारी भाऊ तांबेकर यांनी लिहिलेल्या आशयाचे एक पत्र सन १८५१च्या सप्टेंबर महिन्यात रेसिडेंटाच्या हातात पडले. त्याच्यामध्ये पुढील भयप्रदर्शक शब्द होते. ''फत्तेसिंग महाराजासंबंधाने ज्या गोष्टी घडल्या, त्या घडवून आणण्याची व्यवस्था चालली आहे; तुम्ही थोडेसे थांबा.'' कारभाऱ्याचाच लेख हा की बाबा फडक्याचे बनावट अशी शंका पडली. याचेमुळे अंतरद्वेष फार वाढला; परंतु महाराजाने फडक्यास एकदा घालवून देऊन पुन्हा बडोद्यास बोलाविले असता आणि सरतेशेवटी त्या हुशार माणसास जमीनदोस्त करण्याचे कामी महाराज भाऊ तांबेकराचे बाजूचा झाला आणि फडक्याचे

भिक्षुकी धंदेवाल्यांना हाकलून देण्याचा नियम झाला. दरबारच्या अनुमतीशिवाय बालकविक्री बंद झाली. चोरीबद्दल भरपाई होऊ लागली व ब्रिटिश प्रांतातील गुन्हेगारांना परत देण्याचे सुरू झाले. त्याचवेळी कॅप्टन फ्रेंचने मुंबई सरकारास समजाविले की त्यांनी गायकवाडाशी मांडेवाळीच्या पद्धतीने वागावे म्हणजे गायकवाडीच्या चिरस्थायितेला घातक अशी त्यांची निरुत्साहता, उदासीनता नाहीशी होऊन तो विश्वास व स्नेह ठेवील, बलिष्ट सत्तेचा उपदेश घेईल, तिचे अनुकरण करील व तिजवर अवलंबून राहील.

संबंधात गणपतरावाने जी वृत्ती पत्करिली होती तिचा पुन्हा विचार करण्यास त्यास कर्नल ऑट्राम याने सांगितल्यावर महाराजाने ती गोष्ट मनापासून नाकारिली. दुसरी चमत्कारिक गोष्टही होती. स्वतःचे अधिकारावर कर्नल ऑट्राम याने पोस्ट ऑफिसात काही पत्रे अडविली आणि ज्या लोकांच्या नावाची ती होती त्यास ती आपल्यासमोर उघडून वाचण्यास सांगितली. त्यावेळी असे बाहेर पडले, की मुंबई कौन्सिलच्या गुप्त गोष्टींची लाच देऊन माहिती मिळविण्याची जी बडोद्याच्या दरबारची पूर्वीची पद्धत होती ती अजूनपर्यंत जोराने चालू होती.

जानेवारी १८५२पासून जून १८५३पर्यंत मि. जे. एम. डेव्हिस रेसिडेंट होता. नंतर तो आजारी पडला आणि त्याचे काम मि. जी. बी. सेटनकार याने जून १८५३पासून मार्च १८९४पर्यंत चालविले.

कर्नल ऑट्रामबद्दलचे नामदार कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचे काय मत झाले होते ते आपण वाचलेच आहे. नंतर असे ठरविण्यात आले की, "मुंबईस कोणाच्यामार्फत किंवा पैसे देऊन बेकायदेशीर वजन खर्च केले म्हणजे सरकाराकडून वाटेल त्या गोष्टी करवून घेण्यात येतात हा जो हिंदुस्थानच्या त्या बाजूचे पुष्कळ लोकांचा समज झालेला आहे असे अलीकडील माहितीवरून दिसते, तरी तो समज घालविण्याकरिता उपाय योजिले पाहिजेत." लार्ड डलहौसी याने ऑट्रामच्या ऐवजी दुसऱ्या कोणासही नेमावे अशा विनंतीपर खलिता गणपतरावाने लिहिला असता त्यासच त्याजागी नेमून व रेसिडेंसीचे ऑफिस साफ करण्यास, नेटिव्ह एजंटाची जागा काढून टाकण्यास व बाबा फडक्यास पुन्हा नेमू नये असे त्यास सांगून कोर्ट ऑफ डायरेक्टरच्या म्हणण्याप्रमाणे केले.

बडोदे संस्थान आणि ब्रिटिश सरकार यांचेमधील संबंधाचा अधिकार घेण्यास लॉर्ड डलहौसी यास हुकूम झाला होता. "बडोदे संस्थानाच्या आणि मुंबई सरकाराच्या प्रांताची मोठी गुंतागुंत आहे, काही संस्थानिक मुंबई सरकारचे मांडलिक आहेत, काही बडोद्याचे मांडलिक आहेत अशा व किरकोळ स्थानिक गोष्टींच्या अडचणी" मुंबई सरकाराने दाखविल्या; पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यावर गव्हर्नर जनरलने असा कडकडीत जबाब दिला, "दोन सरकारांमध्ये जो व्यवहार होतो त्याचेपैकी बहुतेक सगळा गायकवाडी प्रजेपैकी काही लोकांची ब्रिटिश सरकारच्या जामिनकीमुळे जी विशेष स्थिती आहे तिजमुळे उत्पन्न होतो आणि याप्रकारच्या व्यवहारांतूनच या निंदास्पद गोष्टी आणि लाचलुचपतीचे प्रकार व इतर गर्ह्य गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत."

तथापि, पुढे झालेल्या गोष्टींचा विचार करता मुंबई सरकारचे म्हणणे रास्त होते. पुढील भागात येणारा ओखामंडळमध्ये जो दंगा झाला तो मिटविण्याचे कामी जो घोटाळा झाला त्यावरून इंडिया ऑफिसातून मुंबईच्या गव्हर्नरला ता. १७ नोव्हेंबर, सन १८५९ रोजी एक पत्र आले - "तुमच्या सरकारची बडोद्याशी राजकीय संबंध चालविण्याची जी पद्धत आहे ती बरोबर चालत नाही असे महाराणीच्या सरकारास दिसते. हे संबंध साधारण गुजरात प्रांताशी इतक्या निकट तऱ्हेचे आहेत, की ते भूगोलदृष्ट्या तोडता कामा नयेत. मुंबई सरकारच्याच नजरेखाली बडोद्याची राज्यव्यवस्था चालली पाहिजे, आणि ही गोष्ट लक्षात ठेवावी की ज्या विशिष्ट कारणाकरिता बडोदे हिंदुस्थान सरकारच्या देखरेखीखाली देण्यात आले होते ती कारणे

सयाजीराव आणि गणपतराव महाराजांचे मरणाने नाहिशी झाली आहेत." ती कारणे नाहिशी झाली होती की नाही हे आणखी काही वर्षांनी समजणार होते; सध्या एवढे सांगणे पुरे आहे, की रेसिडेंट मेजर वॉलेस यांस सन १८६०, नोव्हेंबर १७ तारखेस याउपर मुंबई सरकारची आज्ञा घेण्याचा हुकूम झाला होता. "कारस्थानाची प्रसिद्ध पद्धत पुन्हा यात न येण्याची खबरदारी घेण्याबद्दल" त्या सरकारास सूचना झाली होती. खंडेरावाच्या आणि गणपतरावाच्यावेळी बडोद्यातील निरनिराळ्या पक्षांची कशी स्थिती होती याची फोड होण्यास हिंदुस्थान सरकारजवळ खंडेरावाने जे बोलून दाखविले ते सांगितले म्हणजे झाले. "हा जो (सरकारमध्ये) फेरबदल झाला तो ऐकून मला वाईट वाटले; कारण भाऊ तांबेकराचे जे स्नेही आहेत, ते आणि त्यांच्यासारखे दुसरे लोक द्वेषामुळे सूड उगवून घेण्यासाठी हल्ली संधीचा उपयोग करून घेण्याची खटपट करतील."

या बोलण्याचा कर्नल ऑट्राम यांची पुन्हा बडोद्यास झालेली नेमणूक आणि नंतर घडून आलेल्या गोष्टी याकडे संबंध पोहोचतो. सर जेम्स कार्न्याक बडोद्यास येऊन गेल्यापासून, कायदेशीर दिवाणाशिवाय राज्य करण्याची सयाजीराव महाराजास जी परवानगी मिळाली होती, त्याचा त्याने पूर्ण उपयोग करून घेतला. काही वर्षे त्याने स्वतःच काम केले. फडणीस कचेरीतील असिस्टंट गणेश सदाशिव ओझे हा महाराजांचा नुसता एक प्रकारचा सेक्रेटरी होता; परंतु आपल्या मरणापर्यंत बापू अरगडे, बाबा नाफडे, गोपाळराव मैराळ, सखाराम पांडुरंग रोडे आणि सर्वांपेक्षा जास्त भाऊ पुराणिक या त्यांच्या विश्वासू मसलतगारांचा उपयोग करून घेतला. त्यांच्या मरणानंतर एका वर्गाने गणपतराव महाराजांनी दिवाणाची जागा पुन्हा उत्पन्न केली, आणि ती विठ्ठल खंडेराव यास दिली. हा गृहस्थ भाऊ तांबेकर या नावाने जास्त प्रसिद्ध आहे. व लोक त्याच अजून चांगले नाव घेतात; परंतु ब्रिटिश सरकारला तो आवडला नाही. कर्नल ऑट्रामशिवाय दुसऱ्या कोणाचीही रेसिडेंटाचे जागी नेमणूक व्हावी म्हणून गणपतराव महाराजांनी हिंदुस्थान सरकारास जो खलिता पाठवला होता, त्याचा तो उत्पादक होता असा समज होता. कर्नल ऑट्राम आपल्यास गादीवरून काढून खंडेरावास बसवील असा गणपतरावाचा याने समज करून दिला असे शोधांती कळते. खंडेरावाचे (त्यास तेव्हा आप्पासाहेब म्हणत असत) त्यांच्या भावाशी चांगले नव्हते नुकतीच त्याने त्यांच्याविरुद्ध (ब्रिटिश) सरकाराकडे लेखी तक्रार केली होती महाराज, त्यांचा बंधू, दिवाण आणि फडके यांचा ज्याच्यात संबंध होता ते पत्राचे प्रकरण सर्वांच्या लक्षात ताजे होते. गणपतराव महाराजास भाऊ तांबेकरास बडतर्फ करण्याबद्दल सांगण्याचा कर्नल ऑट्राम यास आता हुकूम आला होता.

परंतु राजाची आपल्या कारभाऱ्यावर फार भक्ती होती आणि त्यास बडतर्फ करणे म्हणजे स्वतःचा दुर्लौकिक करून घेणे असे त्याला वाटत होते. रेसिडेंट आणि राजाची पहिली मुलाखत तारीख २०, माहे मार्च सन १८५४ रोजी होती; परंतु पुष्कळ दिवस संशयात आणि त्रासात गेल्यावर गणपतराव महाराजाने आपल्या स्नेह्यास शेवटी दूर केले. सयाजीराव आणि धाकजी दादाजी यांचे वेळेपासून तो खंडेराव आणि भाऊ शिंदे व मल्हारराव आणि नानासाहेब खानविलकर यांचेपर्यंत असा तमाशा बडोद्याचे दरबारी कितीवेळा तरी झालेला आहे. नेहमीप्रमाणे ही बडतर्फी नुसती वरपांगी होती. त्याच्या वडिलाचा मसलतगार सखाराम रोडे, त्याचा भाऊ गोविंदराव रोडे

यांची कर्नल ऑट्राम गेल्या खेपेस बडोदे सोडून गेल्यापासून जरी फजिती झाली होती तरी त्यांच्यावर बाह्यतः मेहेरबानी ठेवण्याचे त्याने कबूल केले; परंतु नवीन कारभारी नेमण्याचे त्याने स्पष्टपणे नाकारिले आणि भाऊ तांबेकरास आपला विश्वासू सल्ला मसलतगार म्हणून ठेविला. कर्नल ऑट्राम निकरावर जाण्यास कधीही भीती नसल्यामुळे त्याने महाराजाशी सर्व पत्रव्यवहार बंद केला आणि भाऊ तांबेकर व त्याचे पक्षाचे सर्व लोकांस बडतर्फ केल्याची खात्री करून घेतल्यावर ता. १२ एप्रिलरोजी महाराजाशी स्नेहसंबंधाने वागण्याचे त्याने कबूल केले. याप्रमाणे काही दिवस गेले; नंतर ता. ५ मे सन १८५४ मध्ये लेफ्टनंट कर्नल ऑट्राम यास हल्लीचेपेक्षा जास्त महत्त्वाचे जागी नेण्यात आले. रशियाबरोबरची लढाई अगदी ठेपली होती आणि एडनची मुखत्यारी घेण्यास ऑट्राम साहेबाची योजना झाली. येथे आयुक्त राजकीय व लष्करी अधिकारांची जोड त्याचे एकट्याकडे सोपविण्यात आली. कर्नल ऑट्रामचे मागून मेजर माल्कम याची नेमणूक झाली. त्याने रेसिडेंटाचे काम मे १८५४पासून नोव्हेंबर १८५४पर्यंत केले. नंतर फेब्रुवारी १८५६पासून मार्च १८५७पर्यंत मेजर डेव्हिडसन याने त्या जागी काम केले.

या वर्षामध्ये विशेष महत्त्वाच्या अशा काहीच गोष्टी घडून आल्या नाहीत; आणि ता. १६, माहे नोव्हेंबर सन १८५६ रोजी गणपतराव महाराजांचा काळ झाला.

●●●

प्रकरण २२ वे

खंडेराव महाराज – उखामंडळ

◘

गणपतराव महाराजास वारसपुत्र नसल्यामुळे त्यांच्या पाठीमागे गादीवर त्यांच्या भावांपैकी वडील खंडेराव महाराज हे बसले. हे गणपतराव महाराज किंवा मल्हारराव महाराज यांच्यासारखे नव्हते. "हे फार सशक्त, तीव्रबुद्धीचे, धूर्त, निरीक्षक आणि केव्हा केव्हा स्वेच्छाचारी असे असत. यांनी राज्यकारभाराचा बराच भाग अंगावर घेतला; लोक काय सांगतील ते ऐकून घेण्यास ते नेहमी तयार असत व त्यांचे औदार्य त्यास पुष्कळ गोष्टी करण्यास प्रवृत्त करी." हा शेरा खंडेराव महाराज ज्यावेळी गादीवर बसले त्यावेळी रेसिडेंट साहेबांनी लिहिला आहे; परंतु त्या शेऱ्याचे बरेच स्पष्टीकरण झाले पाहिजे. महाराजाच्या तरतरीतपणाबद्दल व शारीरिक शक्तीबद्दल मुळीच शंका नाही; त्यांना सर्व तऱ्हेचे खेळ आवडत असत व शिकारीचा तर त्यांना फारच नाद असे. परंतु शारीरिक (मर्दानी) व्यायामांत वाटेल तितकी चैन मारणे राजपुरुषास संभवनीय आहे; आणि तेवढ्याकरिता पुष्कळ पैसा खर्च करून मकरपुऱ्यास एक राजवाडा बांधला; तेथून शिकारीकरिता राखिलेल्या हरणांची जागा फार जवळ होती आणि लोकास जरी पुष्कळ अडचणी सोसाव्या लागत तरी ती हरणे फारच काळजीने राखिली जात असत. महाराजसाहेब तीव्रबुद्धीचे होते, त्यांची दृष्टी फार दूरवर पोहोचे आणि त्यांचे निरीक्षणही फार सूक्ष्म होते, हे निसंशय खरे आहे. त्यांची स्मरणशक्ती चांगली होती व दुसरे मानसिक गुण त्यांच्यात पुष्कळ होते असे म्हणता येईल. परंतु मागील महाराजांचे अर्धवट मार्गांची त्यास सवय लागली होती हेही कबूल करावे लागेल. यामुळे सैन्याची पुन्हा व्यवस्था लावणे, जमाबंदीच्या पद्धतीमध्ये व न्याय पद्धतीमध्ये सुधारणा करणे, मोठमोठी लोकोपयोगी कामे सुरू करणे वगैरे गोष्टी करून नवीन तऱ्हेने राज्य करण्याची जी महाराज साहेबांची इच्छा, तिचा उपयोग सुधारणा करण्यापेक्षा त्या सुधारणेची दिशा कोणती असावी हे दाखविण्याकडेच झाला; कारण या सुधारणा कायमच्या उपयोगी पडतील अशा करावयाच्या म्हणजे मुळापासून सर्व तऱ्हेची उलथापालथ करणे जरूर होते. त्याचप्रमाणे दुर्दैवेकरून महाराजांस दोन गोष्टींची उणीव होती, नाहीतर त्यांची कारकीर्द फार

सुखावह झाली असती. त्यांचे दिवाण व सल्लामसलतकार मंत्री अगदी कुचकामाचे लोक होते, आणि त्यांच्यापैकी काही लोक तर वाईट होते आणि महाराजांची स्वतःची आकांक्षा लोकांचे खरोखर चांगले करण्यापेक्षा डौल घालण्याकडे असे. महाराज साहेब फार उदारबुद्धीचे असत ही गोष्ट अगदी खरी आहे. परंतु त्यामुळे पुष्कळदा पैशांची विनाकारण उधळपट्टी होई आणि त्यांनी आपल्या मित्रांना किंवा चाकरांना जरी मोठमोठी बक्षीसे दिली किंवा राजधानीतील लोकांना कबुतराचे लग्न लावून क्षणिक करमणूक केली किंवा अशाच तऱ्हेने पैसा उडविला, तरी त्यांच्या कृत्यांचे शाश्वत परिणाम पाहू गेले असता फार क्षुद्र असत ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे; कारण पुढे असे दिसून येईल की, इतिहासात ज्या गोष्टी नेहमी घडून येतात त्याच गोष्टी गोविंदराव महाराजांच्या कुटुंबात घडून आल्या आहेत. एका मनुष्यास स्वतःच्या दोषाची फळे भोगावी लागली एवढेच नव्हे तर त्याच्या आधी राज्यारूढ होऊन गेलेल्याचे दोषांबद्दलही दंड द्यावा लागला. एखादे राजघराणे जर व्यसनासक्त असेल किंवा एखाद्या पद्धतीत जर काही दोष असतील तर त्या राजघराण्याचे वारस होणे किंवा त्या पद्धतीचे प्रतिनिधी होणे फायदेशीर नाही. मल्हारराव महाराजांनी आपल्या कारकिर्दीस चांगल्या रीतीने सुरुवात केली आणि सुरसागरचा तलाव, हायस्कूल किंवा दुसऱ्या एतद्देशीय पद्धतीच्या शाळा यांची जी त्यांनी तरतूद व काळजी घेतली हे महाराजास फार भूषणास्पद आहे. मल्हारराव महाराजांनी आपल्या भावाच्या कुटुंबाचा व अनुयायींचा फार छळ केला हे खरे; परंतु गोविंदराव महाराज, कनोजी महाराज आणि सयाजीराव महाराज यांनी त्यास कित्ता घालून दिला होता आणि महाराजांत अवगुणही फार होते, तरीपण त्यास पाद्रा येथे जो बंदिवास भोगावा लागला तो फार मोठा व दुःखदायक असा होता. मल्हारराव महाराजांची कृत्ये भरदिवसा धडधडीत लोकांचे डोळ्यादेखत घडून आल्यामुळे फारच भयंकर वाटली; परंतु गायकवाड राजाचे दोष बाहेर काढण्याची ब्रिटिश रेसिडेंट यांची पद्धत नव्हती आणि यापैकी काही कृत्ये पूर्वीच घडलेली होती.

वरील गोष्टी लिहिणे फार जरूर दिसते आणि त्याचे महत्त्व झालेल्या गोष्टींकडे संगतवार रीतीने पाहिले म्हणजे कळून येईल. या गोष्टी आम्ही फार नाखुशीने लिहिल्या आहेत; कारण खंडेराव महाराजांच्या कारकिर्दीचे शेवटले दिवस जरी अविचारीपणाच्या खर्चात, दुष्ट कृत्यांत आणि एकंदर ऱ्हासात गेले, तरी त्यांचे कारकिर्दीचा आरंभ फार चांगला होता व महाराज साहेब सदृढ आणि निष्कपटी असल्यामुळे पुष्कळ लोकांस ते आवडत असत आणि खंडेराव महाराजांच्या कारकिर्दीचा सर्व दोष महाराजांचेच माथी मारण्याचा नाही.

खंडेराव महाराजांच्या पूर्वीच्या कृत्यापैकी काही जरी दुसऱ्या गोष्टी गाळल्या तरी एका कृत्यास महत्त्व देणे फार जरुरीचे आहे. महाराजसाहेब गादीवर बसल्याबरोबर बंगाल प्रांतात (१८५७ सालच्या) बंडास सुरुवात झाली आणि काही दिवस हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्ता कायम राहते किंवा नाही याबद्दल बरीच शंका उत्पन्न झाली होती. अशा संकटसमयी हिंदुस्थानातील सर्व राजेरजवाड्यांपेक्षा गायकवाड सरकारनी इंग्लिश सरकारास फारच उत्सुकतेने आणि राजनिष्ठापूर्वक मदत केली.



खंडेराव गायकवाड (१८५६-१८७०)

सन १८५७ साली कवायती ब्रिटिश सैन्य गुजरातेतून काढल्यामुळे मही आणि रेवाकांठामधल्या बंडखोर लोकांना मोठा दंगा करण्यास संधी आली आहे असे वाटले; परंतु खंडेराव महाराजांनी त्यांच्याजवळ असलेल्या सैन्याच्या मदतीने फार चांगला बंदोबस्त ठेविला. त्यासंबंधाने सर रिचमंड शेक्सपिअर यांनी पुढील उद्गार काढले आहेत. "सैन्य फारच उत्तम रीतीने तयार ठेवण्यात आले होते; त्यांना फारच काम करावे लागले आणि त्याबद्दल त्यांना श्रम व खर्चही फार पडला, आणि ते त्यांनी फारच राजीखुशीने केले." महाराजसाहेब कशा रीतीने उपयोगी पडले आणि त्यांना पुढे सन १८५८साली जे बक्षीस मिळाले त्याचे स्वरूप, हिंदुस्थान सरकाराने जो ठराव प्रसिद्ध केला त्यातील उतारा पुढे दिला आहे त्यावरून लक्षात येईल. "खंडेराव महाराजांनी (ब्रिटिश सरकाराबद्दल) जी अबाधित भक्ती दाखविली व जी सैन्याची मदत दिली- आणि त्या मदतीशिवाय सर्व पश्चिम हिंदुस्थानावरील आमची सत्ता बहुतेक नाहीशी झाली असती- त्याचे मोबदल्यात गुजरात बिनकवायती घोडेस्वाराचे खर्चाकरिता दरसाल जे ३ लाख रुपये घेण्यात येत असत ते माफ केले आहेत आणि महाराज साहेबाच्या गादीवर बसण्यापासून जितके पैसे घेतले असतील तितके परत देण्यात येतील. हा दंड खंडेराव महाराजांचे वडलावर १८३९ साली केला होता व हा त्यांच्यावर मोठा कलंक होता." यात महाराजसाहेबांचा चांगला नफा झाला व शिवाय त्यांच्या विनंतीवरून यास मोराच्या पिसांचा एक मोरचेल नजर करण्यात आला व ता. ११ माहे मार्च सन १८६२ साली त्यास एक सनद देण्यात आली व तीत त्यास दत्तक घेण्याचा अधिकार दिला होता.

हिंदुस्थानामध्ये जे वादळ उठले होते व दंगे चालले होते ते नुसते मही आणि रेवाकांठ्यातच नव्हते तर ते उखामंडळपर्यंत पसरले होते. हे कसे उत्पन्न झाले हे सांगण्याकरिता आपण विषयांतर करू.

उखामंडळ

काठेवाडच्या पश्चिमेच्या टोकास ३० मैल लांबीचा आणि १५ मैल रुंदीचा उखामंडळ नावाचा एक लहानसा तुटक प्रदेश आहे; याचे दक्षिणेस व पश्चिमेस हिंदीमहासागर आहे, उत्तरेस व पूर्वेस कच्छचे आखात आहे आणि पूर्वेच्या खालच्या अर्ध्या भागावर कच्छचे रण आहे.

तेथील हवा फार निरोगी आहे. जमीन खडकाळ असून, तेथे पीक होत नाही. अगदी थोड्या दिवसांपूर्वीपर्यंत तो प्रदेश जंगलांनी आच्छादित होता; त्याच्या किनाऱ्यावर उपसागर व खाड्या आहेत, अशा दूरच्या प्रदेशात धाडशी व राकट लोक आपले वसतिस्थान करून शेकडो वर्षे राहिले यात काही नवल नाही. या लोकांचे शेतकीकडे लक्ष नाही व त्यास फार जागाही नाही; परंतु वाघेर लोकांना लुटारूपणा करण्याची व जहाजे वगैरे फोडण्याची फार सवय लागली होती आणि हे त्यांचे धंदे चालण्यास खाड्या, दऱ्या, गुहा व निबिड रान याची बरीच मदत होत असे.

बाहेर लोक जरी आपल्यास रजपूत म्हणवितात तरी ते उखामंडळातील पूर्वीचे कोळी व खलाशी होत आणि त्यांची जात एका लग्नापासून उत्पन्न झाली, ती याप्रमाणे. पूर्वी एकदा हा प्रांत हादद आणि चावडा रजपुतांचे ताब्यात होता. त्यांच्यामध्ये तंटा उपस्थित होऊन त्यांनी राथोड वाडर यास त्यांच्यामधील तंटा मिटविण्यास बोलाविले. राथोड याने हा निकाल काही

तऱ्हेवाईकच केला; कारण त्याने तो प्रांत आपलेकडेच घेतला. त्याचा मेहुणा कच्छचा जारेजा याने वाघेर जातीतील हलक्या कुळातील एका बाईशी लग्न लाविले आणि त्यांचे एक नवीन कुटुंब बनले. आणि हे माणेक वाघेर आपल्यास रजपूत म्हणवू लागले.

सन १४४६ पर्यंत मुसलमान लोकांनी उखामंडळ काबीज केले नव्हते; परंतु त्या साली महंमदशहा बेगड याने त्या प्रांतावर स्वारी करून जगतच्या देवळाचा विध्वंस केला, मूर्ती फोडून टाकिली आणि तेथे एक मशीद उभारली. लोकांच्या दरिद्रतेमुळे व त्यांच्यात धमक असल्यामुळे शत्रूस त्यांनी बरेच दिवस दाबून धरिले होते; परंतु शेवटी त्यांचा चांचेपणाचा सूड घेण्याकरिता त्यांच्यावर घाला आलाच. संकाडा येथील चांचे लोकांनी समरकंद येथील एका विद्वान मौलवीस लुटून त्याची छळणूक केली आणि या उपद्रवाबद्दल सूड घेण्यासाठी या मोठ्या मुसलमान राजाची स्वारी इतक्या लांबच्या प्रदेशावर झाली.

हळूहळू तेथील मुसलमानी अंमल नाहीसा झाला आणि १७७४ साली राथोड याचा अंमल पुन्हा सुरू झाला. यास नवानगरचे जाम साहेब मेरू खयास याने रणाच्या मागे हांकून लाविले होते आणि याच जाम महाराजांनी पोसित्राचा किल्ला घेण्याकरिता बाबाजी नावाच्या एका मनुष्यास मदत केली होती. याच बाबाजीने त्याचा भाऊ आरामाडाचा सरदार याच्या लहान मुलापासून बेट बळकाविले होते आणि त्याच्यापासून ते देवळाच्या पुजाऱ्यांच्या हाती गेले. सन १८०७ साली ओखामंडळमध्ये सहा सरदार होते. आरमाडाचा वाडेर सरदार, पोसित्रा सरदार, बेट आणि ढिंगेचे सरदार, मुल्लामाणेकचे बायाड ज्यांचे ताब्यात द्वारका होती आणि कच्छचे राव, ज्यांच्याजवळ एक लहानसा किल्ला होता. यापैकी काही सरदारांनी आपले चांचेपणाच्या धंद्याने ब्रिटिश सरकारास आधीच त्रास दिला होता; परंतु सन १८०७ साली बेटच्या सरदाराने तसे न करण्याचे व आपला मार्ग सुधारण्याचे वचन दिले होते. तथापि पोसित्र्याने फारच त्रास दिला आणि सन १८०९ मध्ये नाकेबंदी करून त्याचा बंदोबस्त करावा लागला. त्याचवर्षी सर्व सरदारांनी चाचेपणाचा धंदा सोडून काही खंडणी देण्याचे ब्रिटिश रेसिडेंटास कबूल केले; तथापि, दुसऱ्या वर्षी ते आपले पूर्वीचे धंदे करू लागलेच आणि सन १८१४ साली ठरलेल्या खंडणीच्या एकतृतीयांशाची त्यांनी भरपाई केली, तरी त्यांनी त्रास देण्याचे बंद केले नाही.

हा उपद्रव नाहीसा करण्याचा निश्चय करून थोड्याशा फौजेनिशी ओखामंडळ काबीज करण्याकरिता कर्नल ईस्ट यास तिकडे पाठविले व गायकवाड सरकारच्या थोड्याशा मदतीने त्याने ते काम थोड्या श्रमाने फत्ते केले. सन १८१७ साली ओखमंडळ गायकवाड सरकारास देणगी म्हणून देण्यात आले व हिंदुस्थानातील एक अति पवित्र देवस्थान आपल्या ताब्यात असण्यात त्यास साहजिकच अभिमान वाटला. याचवेळी हे लक्षात ठेविले पाहिजे की, या देणगीचा स्वीकार करताना गायकवाड सरकारनी चांचे सरदारांकडे खंडणीची थकलेली बाकी व तो मुलूख काबीज केल्यापासून लागलेला खर्च देण्याची कबूल केले आणि चांचे लोकांनी व्यापलेल्या अशा त्या प्रदेशाची व्यवस्था करण्याचे आपल्या अंगावर घेतले. तेथील वसुलांत २५००० पासून ४०००० रुपयापर्यंत दरसाल तूट येत असे.

तेथे सन १८१८ साली एक बंड झाले, सन १८२० साली तर मोठेच बंड झाले आणि ते मोडण्याकरिता ब्रिटिश सैन्याची मदत घ्यावी लागली आणि सन १८२५ साली आणखी एक नवीन दंगा झाला. गायकवाड सरकाराकडून आपला तनखा वेळेवर मिळत नाही म्हणून सन १८५७ साली सर्व सरदारांनी तक्रार केली. लेफ्टेनंट बार्टर यांनी त्याबद्दल जरी काही तडजोड केली तरी सन १८५८ सालच्या फेब्रुवारी महिन्यात वसई येथे ते उठले आणि काही अडथळा झाल्याखेरीज बेट आपल्या स्वाधीन करून घेतले. कारण शिवबंदी त्यांच्याच पक्षास मिळाली होती. लेफ्टनंट बार्टन हे पुन्हा उखामंडळला येऊन त्यांनी बेट काबीज करून घेतले व गायकवाड सरकारच्या स्वाधीन केले. कारण त्यांनी जे आपल्या बरोबर थोडेसे सैन्य आणले होते ते परत घेण्याबद्दल व गायकवाड सरकारांनी वाघेर लोकांशी या गोष्टी ठरवाव्यात असा त्यास हुकूम झाला होता.

सन १८५८ सालच्या डिसेंबर महिन्यात याचा निर्णय झाला तोपावेतो वाघेर लोकांनी गायकवाड सरकारच्या सैन्यास वसईच्या दाट झाडीत आश्रय घेऊन बिलकूल जुमानले नव्हते; परंतु हा निकाल अगदीच पोकळ होता; वाघेर लोक महाराजांच्या सैन्यास तुच्छ मानू लागले आणि बंगाल्यांतील फौजेच्या बंडवाल्यांनी ब्रिटिश लोकांवर वरचढ केली असे जेव्हा त्यास कळले तेव्हा ते सन १८५९ साली गायकवाड सरकारच्या विरुद्ध उठून त्यांनी बेट आणि द्वारका हे काबीज केले आणि गायकवाडी अधिकाऱ्यांस काठेवाडात हाकून लाविले.

आपले शिबंदीचे लोक अगदी राजद्रोही नाही, तरी निष्काळजी झालेले पाहून खंडेराव महाराजांनी शहाणपणा करून उखामंडळची व्यवस्था मुंबई सरकारच्या हातात दिली. कंटाळवाण्या मोहिमेस सुरुवात झाली. तारीख ६ ऑक्टोबर रोजी बेट सोडून देण्यात आले. पुष्कळ दिवस वेढा पडल्यानंतर ता. ३१ रोजी द्वारका सोडण्यात आली. नंतर जंगलाकडे मोर्चा फिरविला आणि सरतेशेवटी वाघेर लोकांनी काठेवाडात बरडा पर्वताची जी ओळ आहे त्यावरील आभापुरा टेकडीवर आपले ठाणे दिले. या जागेवरूनही कर्नल हॉर्नर यांनी तारीख १८ डिसेंबर सन १८५९ रोजी त्यांची उठावणी केली आणि लढाईचा शेवट झाला. याचे नंतर द्वारकेस जी एक फौजेची तुकडी होती त्यावर एका ब्रिटिश ऑफिसराची नेमणूक होऊन त्यास वाघेर लोकांवर देखरेख करण्याचा व बडोद्याच्या रेसिडेंटाशी पत्रव्यवहार करण्याचा हुकूम झाला. परंतु जमाबंदी वसूल करण्याचे व राजकीय व्यवस्था करण्याचे काम गायकवाडी कामदारांच्याच हातात ठेविले. दुर्दैवेकरून सन १८६२ साली सरकारांनी राजकीय कारणाकरिता बंदीत ठेवलेले काही वाघेर लोक तुरुंगातून पळाले आणि त्यांनी आपल्या देशास परत येऊन दंग्यास सुरुवात केली. हे दंगे तारीख २९ माहे डिसेंबर सन १८६७ पर्यंत बंद झाले नाहीत; त्याचवेळी मांचेरडा टेकडीवर देव माणेक आणि त्याच्या अनुयायांचा बहुतेक बीमोड झाला किंवा नक्की वेळ सांगावयाची म्हणजे सन १८६८ साली जेव्हा मुल्ला माणेक याच्यावर पोरबंदरचे शिबंदीने घाला घालून रामपुराजवळ त्यास ठार मारिले, त्यावेळी त्याचा बीमोड झाला. गिरच्या जंगलात त्यास ठार मारण्यात आले व सन १८५९ सालच्या बंडात जो पुढारी होता त्या जोद्धा माणेक सरदाराचे हे दोघे पुतणे होते. यांचे त्रासदायक दंगे इतके दिवस टिकले याचे कारण आधी तो प्रदेशच फार

कठीण व ते येथे राहिलेले असल्यामुळे त्याची त्यास पूर्ण माहिती होती; आणखी शिवाय त्यास शूर वाघेरच्या बारभाटीआ लोकांकडून मदत मिळात होती. एवढेच नव्हते, तर आरेण आणि काठेवाड यांचेमध्ये त्यास सर्वांचे पाठबळ असे. आणखी काठेवाड संस्थानिकांचे शिबंदी लोक त्यास तोंड देण्यास भीत किंवा ते त्यास आतून फितूर होते.

या वेळेपर्यंत वाघेर लोकांची संख्या पुष्कळ कमी झाली होती आणि पुन्हा केव्हा ते शांततेचा भंग करतील असा संभव दिसत नाही. गरीब वाघेर लोकांची हळूहळू शेतकी करण्याकडे प्रवृत्ती होत चालल्याची चिन्हे दिसत आहेत आणि तो देश पूर्वीसारखा अरण्यमयही राहिला नाही. वाघेर लोकांमध्ये पुष्कळ उत्तम गुणही होते व तितक्या थोड्या लोकांकरिता इतके कडक उपाय योजावे लागले व जे उपाय योजिले ते शेळपट आणि चिड येण्यासारखे असून मधून ब्रिटिश सैन्याचीही मदत घेतली जावी ही फार दिलगिरीची गोष्ट आहे.

●●●

प्रकरण २३ वे

खंडेराव महाराज (चालू) - सैन्य

▣

याप्रमाणे खंडेराव महाराजांनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभी लढाईच्या बऱ्याच गोष्टी ऐकिल्या व काही प्रत्यक्ष पाहिले. अंतःकरणापासून महाराज साहेब शिपाई बाण्याचे होते आणि म्हणून सैन्यात युरोपियन वगैरे कामदार ठेवून त्यास कवाईत शिकवून आणि सारख्या नेमणुका करून त्यांनी आपले सैन्य सुधारण्याचे प्रयत्न केले यात काही आश्चर्य नाही. त्यांनी या ज्या नवीन गोष्टीस सुरुवात केली, त्याबरोबर जुन्या निरुपयोगी पद्धतीवर हल्ला करावयाचा असता; परंतु वजनदार लोकांची मने दुखविल्याखेरीज ही गोष्ट करणे कठीण होते आणि तसे केल्याशिवाय संस्थानच्या उत्पन्नावर अतोनात भार पडला असता; कारण साहाय्यकारी (सब्सिडीआरी) फौजेकरिता संस्थानाने काही प्रांत तोडून दिले होते, तहनाम्यावरून कंटिंजन्ट फौज ठेवण्यास ते बांधले गेले होते व राजकीय कारणास्तव त्या फौजेत सुधारणा करणे कठीण होते आणि याच्याबरोबर सरदार लोकांचेही पोषण करावयाचे होते आणि ते पूर्वीची वस्तुस्थिती चालविण्यावर अवलंबून होते.

या इतिहासात गायकवाडाचे सैन्याची संक्षिप्त माहिती देणे वाजवी होईल; कारण काही झाले तरी ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की, ज्यावेळी पहिले गायकवाड सोनगडास येऊन राहिले त्यावेळी ते दाभाड्याचे केवळ प्रतिनिधी होते. त्याच्या मुलाने सेनापतीचा अधिकार बळकाविला ही गोष्ट खरी, तथापि, तो मराठ्यांच्या बिनकवायती घोडेस्वारांचा मराठा नायक होता एवढेच. पुढे जे ते महाराजाचे पदवीला चढले ते काही लोकांच्या मदतीने चढले. महाराजांबरोबर या लोकांचाही उदयकाळ आला असेल, हळूहळू त्यास मोठ्या जहांगिरी मिळून ते सरदार व सरकारचे सल्लामसलतगार बनले असतील, असे कोणाला वाटेल; परंतु असे घडले नाही. जसजसा गायकवाडीचा उदय होऊ लागला त्याप्रमाणे सरदार नाहीतसे होऊ लागले आणि आज मितीला तर एकाच सरदाराचे डोके पुढे आहे व शिपाईवर्ग तर अगदीच मागे पडला आहे.

१. सरकारी घोडेस्वार - गायकवाड सरकारच्या सैन्यात पहिला नंबर पागेचे स्वारांना दिला पाहिजे. यात ऐन हुजरात पागा पाहिले आहे. याचे स्वामित्व पूर्वी पिलाजी यांच्याकडे होते आणि म्हणून सातारचे राजे शाहू महाराज यांनी त्यांचे मूळ पुरुषास जरीपटका, निशाण आणि सरकारी नगारा ही जी चिन्हे दिली होती ती याबरोबर असतात. ही पागा गायकवाड सरकारच्या प्रत्यक्ष हुकुमाखाली असते. नंतर अनुक्रमे हुजरात चंदीपागा आणि पातकीपागा या आहेत. सयाजीराव महाराजांनी पहिल्या दोन पागांचे पोटभाग केले आणि त्यांच्यापैकी सात भागांच्या खासपागा केल्या आणि त्या गायकवाड सरकारच्या आप्तांचे ताब्यात व हुकमतीत दिल्या.

२. सरदारांचे घोडेस्वार - दक्षिण महाराष्ट्रातून स्वतःचे घोड्यावर जे शिलेदार लोक गायकवाडाबरोबर आले त्यास शिपाई वर्गात प्राधान्य दिले पाहिजे, आणि त्या सर्वांत पिलाजी आणि दामाजी गायकवाड याचे सहकारी एकोजी आणि नारायणजी पांढरे यांचे वंशजास मुख्यस्थान दिले पाहिजे. यांच्या स्वतःच्या स्वतंत्र पागा आहेत. या लोकास फार मानमरातबीने वागविले जाते व त्यास ठराविक पगार मिळतो. त्याच्यापैकी काही म्हटले म्हणजे पांढरे राजे, घोरपडे राजे, मीरसाहेब आणि जाधव राजे. गायकवाड कुटुंबातील काही माणसाप्रमाणे या राजांना हजिरीची माफी आहे. तीन जे मीर आहेत त्यांचा लढाईत जर घोडा मेला तर त्याबद्दल ठराविक ५०० रुपयांची रक्कम नुकसानी दाखल दिली जाते.

३. परकी फौज - काही काळाने गायकवाडांनी ठाणी काबीज केलेली शहरे व किल्ले यांच्यावर पहारे ठेवण्याकरिता आणि नंतर हरएक कामात मदतीकरिता परकीय लोक फौजेत ठेवण्याची सुरुवात केली. शिवबंदीमध्ये जे पुढारी होते त्यांच्यातील प्रसिद्ध अमिन जमादार, अचाजमादार, राधो रामचंद्र आणि कासम काळे हे होत. खंडेराव महाराजांच्या पूर्वीचे पायदळ सैन्याविषयी लिहिण्यासारखे विशेष काही नाही; कारण गायकवाड घोडे स्वाराशिवाय दुसरे कोणाचाच उपयोग करीत नसत. परंतु एवढे लिहिले पाहिजे की विशेषतः पहाऱ्याचे कामाकरिता जे पायदळ ठेवण्यात आले त्यातील बहुतेक लोक परकीयच होते. एखाद्या ठिकाणास वेढा घालून ते ठिकाण काबीज करण्याची शिताफी मराठ्यास मुळीच साधली नव्हती हे या इतिहासात उदाहरणाने पुष्कळदा दाखविले आहे आणि संस्थानातील सर्व लढाऊ ठाण्यांवर आरबी भाडोत्री लोकांचा ताबा असल्यामुळे किती राजकीय सत्ता त्यांचे हातात आली होती याचाही उल्लेख केला आहे.

४. दुसरे एकोंडी होते. त्यांचे स्वतःचे घोडे असत व त्यास एकेकटेच ठेवण्यात येई. त्यांच्यावर कोणी विशेष नायक नसे. आणखी बारगीर लोक होते व ते हल्ली आहेतही. ते थोड्या पगारावर मिळून पगार मिळणाऱ्या शिपायाचे काम ते करीत असत. ते फार गरीब असल्यामुळे गायकवाडच्या सैन्यामध्ये ते फारच उपयोगाचे असत. शिपाई लोकांना विशेष राजकीय सत्ता केव्हाही मिळाली नाही याचे कारण काय हे सांगतो. पहिल्यापासून त्यास त्याच्या कामाबद्दलचा मोबदला पैशाच्या रूपाने मिळत असे म्हणजे त्यांना पागांतून चांगल्या पगाराच्या जागा किंवा आधिपत्य मिळत असे आणि त्या जागा वंशपरंपरेने चालत. वंशपरंपरेने चालणारी किंवा चाकरीच्या काही अटींवर त्यांना जमीन अशी फारच थोडी देण्यात आली. त्यावेळचे राजास ही स्थिती फार सोयिस्कर पडली आणि राजे साहेबांनी परकीय सैन्य तैनातीत ठेवून आपली फौज मोडण्याचे कबूल केले त्यावेळी मेजर वॉकर यांचे काम तितक्याप्रमाणे सोपे झाले. महाराज साहेबांनी ब्रिटिश सरकाराशी

सलगी केल्याबरोबर शिपायांचा वर्ग वस्तुतः त्यांचे अगदी मुठीस आला. कोणी एखादा सरदार आपल्यापेक्षा ब्रिटिश सरकारची आज्ञा जास्त पाळतो असा सयाजी महाराजांस संशय आल्यास ते त्याचा स्वतःस इजा झाल्याखेरीज नाश करीत असत आणि मुंबई सरकार व त्यांच्यामध्ये कलह उपस्थित होऊन मुंबई सरकार त्यांच्या राज्यव्यवस्थेवर बारीक नजर ठेवितोपर्यंत त्यांनी अशा गोष्टी वारंवार केल्या. सयाजी महाराजांच्या मुलांनीही सरदार लोक अगदी निःसत्त्व होईपर्यंत त्यांचे वाटतील तसे खेळ केले. खरोखर पाहता वर्गाचा ऱ्हास होणे साहजिक व अपरिहार्यच होते; त्यांचे काम संपले; मधूनमधून हल्ले करणाऱ्या ऐवजी शास्त्रीय पद्धतीने लढाई करण्याची सुरुवात झाली; त्यांचे अधिकारी त्यास पगार देतील तोपर्यंत त्यांनी द्यावेत; परंतु तोफखान्यापुढे कवायती पायदळापुढे व आजपर्यंत जी शहरे किंवा जे किल्ले दुर्गम असे समजले जात असत त्यांच्या जय पावलेल्या वेढ्यामध्ये हे बिनकवायती घोडेस्वारांचे पुढारी अगदी निरुपयोगी होत. ब्रिटिश सैन्य आल्या वेळेपासून गायकवाडी घोडेस्वारांचे मोठे काम म्हणजे काही नेणे पोचविणे अथवा पोलिस शिपायाचे काम आणि कोणताही सरदार घोडेस्वार होण्यापलीकडे दुसरे काही शिकला नाही.

तथापि, ब्रिटिश सैन्यास नोकरीत ठेविल्या वेळेपासून येथील शिपाई वर्गाचा ऱ्हास होऊ लागला असे म्हणणे बरोबर होणार नाही. तो ऱ्हास याचे पूर्वीच सुरू झाला होता व राज्यामध्ये जी झोटिंग बादशाई चालली होती त्याचा तो परिणाम होय. पेशव्यांच्या प्रतिस्पर्धी दामाजी हा आपले उद्देश तडीस नेण्याकरिता जरुरीचे वेळी मोठाली सैन्ये गोळा करू शके आणि वसुलापैकी पांचषष्टमांश भाग पुण्यास खंडणी देण्यात व शिपाई लोक ठेवण्याचा खर्च भागविण्यात जाई असे म्हणण्यात कोणत्याही तऱ्हेची अतिशयोक्ती नाही आणि दमाजीने आपले कारकिर्दीचे अखेरपर्यंत सतत लढाया चालविल्या होत्या आणि त्यामुळे त्याची सत्ता पुष्कळ पसरली व लहान लहान संस्थानेही पुष्कळ झाली तथापि त्यांचे मरण समयी बडोदे संस्थानाचा तिसऱ्या वेळी पराभव झाल्यावर त्यास ब्राह्मणपक्षास हार जावे लागले. नंतर गृहकलह उत्पन्न झाल्यामुळे गायकवाडांचे घराण्यास क्षीणता आली आणि गुजरातेत पुण्याच्या दरबारचे व ब्रिटिश सरकारचे मोठे भांडण सुरू झाले. फत्तेसिंगाने गोविंदरावाचे अनुयायी शिल्लक ठेविले नाहीत आणि गोविंदराव ज्यावेळी गादीवर आले तेव्हा त्यांनी आपले लोकांशिवाय इतर सर्वांस हाकून लाविले.

फत्तेसिंगाने आपल्या भावास घालवून दिल्यावर आपली फौज करिता आली तेवढी कमी केली; परंतु काही परकीय लोक फौजेत ठेवण्यात त्याने पहिली घातक चुकी केली. गोविंदरावाने आपली स्थिती जास्त दृढ करण्याकरिता आणखी असे लोक भरले आणि आनंदरावाचा जो परभू दिवाण होता तो राज्यांना असे पक्ष माजले असतानाही या लोकांवरच जास्त भरवसा ठेवू लागला. गोविंदरावाजवळ असे भाडोत्री लोक म्हणजे सुमारे ८००० पायदळ आणि २००० घोडेस्वार होते आणि त्यांच्या करिता त्यास दरमहा दीडलाखापेक्षा जास्त खर्च लागे; परंतु रावजी अप्पाजी यांना १३००० पायदळ व ४००० घोडेस्वार यांच्याबद्दल सुमारे तीन लाख रुपये द्यावे लागत असत किंवा निदान तेवढे देण्याचा त्याच्यावर बोजा होता. या भाडोत्री लोकांत आरव किंवा त्यांचे वंशज, सिंधी, मकराणी आणि हिंदू परदेशी या लोकांचा समावेश होत असे

आणि त्यांचा राज्यव्यवस्थेवर फार अंमल चालत असे हे आम्ही सांगितलेच आहे. यावरून मूळच्या शिपाई लोकांचा किती ऱ्हास झाला होता हे सहजीच लक्षात येईल आणि अंतर्कलहामुळे लढाईचे धाडस करण्याइतके सामर्थ्य राहिले नव्हते. आम्ही वर म्हटलेच आहे की, जरी गायकवाडांना अहमदाबाद शेताचा कौल मिळाला होता व काठेवाडात त्यांना कोणी प्रतिस्पर्धी उरला नाही तरी बाबाजीचे मोहिमेपूर्वी पाच वर्षेपर्यंत तेथून काही उत्पन्न मिळाले नाही. तथापि मराठे शिपाई लोकांचा मुलुखगिरीवर नुसता डोळाच नव्हता तर त्या वरच त्यांचे सर्व चालत असे.

दुसऱ्या एका मुद्द्याचा बारिक रीतीने जरी विचार केला नाही तर त्यासंबंधाने थोडे लिहिले पाहिजे. ज्या मराठे लोकांनी गुजरातेवर हल्ला केला ते लोक फार थोडे होते आणि ते शिक्षण महाराष्ट्रातून आले होते. जोपर्यंत त्यास जय येऊन ते मुलूख काबीज करीत चालले होते तोपर्यंत गायकवाडांना त्याच्या देशातून वाटेल तितक्या शिपाई लोकांचा पुरवठा सहज मिळत असे; परंतु काही दिवसांनी गुजरातेत याची मंदी घडली आणि बहुधा महाराष्ट्रातील लोकांची धाडसी वृत्तीही कमी झाली. नंतर इकडे येणाऱ्या मराठे लोकांची संख्याही कमी झाली. काही प्रांतातून मराठे राज्य करीत आहेत तेथल्याप्रमाणे गायकवाडास ज्यांच्यावर राज्य करावयाचे त्यापैकी बहुतेक लोक लढाऊ नव्हते आणि म्हणून परकीय भाडोत्री लोकांची आराधना करावी लागे. बहुतेक लोक म्हणजे गुजरातेच्या सपाटीवर जे राहणारे लोक तेवढेच समजावयाचे पहाडी लोकांनी, भिल्ल लोकांनी आणि कोळी लोकांनी पूर्वीच्या गायकवाडांस मोगलांना हुसकावून देण्यात मदत केली; परंतु पुढे ते साहजिकच त्यांचे शत्रू बनले. त्यांच्या मनात राजास त्रास द्यावयाचे आल्यावर कडी आणि कनोजीचे जहागीरदारास त्यांची सहज मदत मिळाली. याचप्रमाणे काठेवाडच्या रजपुतांचा कधीही पाडा झाला नाही किंवा त्यांच्याशी स्नेहसंबंधही झाला नाही आणि बडोदे सरकारास जर केव्हाही मदत मदत लागली तर ती त्यांना बाहेरून आणावी लागत असे.

ब्रिटिश सैन्यास पैसे देऊन तैनातीत ठेवावे लागले हा बेबंदशाईचा परिणाम होय हे आम्ही वर म्हटलेच आहे. गोविंदरावाच्या कारकिर्दीत व आनंदरावांच्या कारकिर्दीचे उत्पन्नाचा बराच भाग त्यांच्याकडे खर्च होई. अरब लोकांकरिता सालीना ३६ लाख रुपये लागत; बाबाजीचे नव्या शिवबंदीस १२ लाख; शिलेदार आणि पागा यांना २० लाख; आणि शिवाय १५ लाख रुपयाची खोटी रक्कम तट, किल्ले वगैरेकरिता खर्ची पडत असे. अशी स्थिती निदान मेजर वॉकर हे पहिल्याने बडोद्यास आले त्यावेळी होती आणि त्याच्यापूर्वी काही वर्षे असे बिनधोक म्हणता येईल की, फौजेकरिता होणारा म्हणून दाखविलेला खर्च संस्थानच्या सर्व उत्पन्नापेक्षा जास्त असे. बडोद्याच्या वेढ्यानंतर अरब लोकांची तुकडी कशी मोडली हे पूर्वी सांगितलेच आहे. परंतु सन १८०२-०३ साली लोक कमी करण्यारिता घोडेस्वारांचे थकलेले पैसे कसे देण्यात आले हे अजून सांगावयाचे आहे. १९ लाखांपेक्षा जास्त रुपये ब्रिटिश सरकारचे कर्जाऊ काढिले आणि ब्रिटिश सरकारच्या जामिनकीवर २१ १/२ लाखांपेक्षा जास्त रुपये बडोद्याचे पेढीवाल्यापासून उसने घेतले.

संस्थानची फौज कमी करून फत्तेसिंग महाराजांचे वेळी जेवढी होती तेवढी करण्याचा मेजर वॉकर साहेबांचा हुकूम होता; परंतु असे करण्याची त्यांची खुशी नव्हती व कदाचित तसे

करण्यास ते असमर्थही होते. याचे पहिले कारण असे लष्करी लोकांचे वजन अजून पुष्कळ होते. शिंदे आणि होळकर यांची सैन्ये गुजरातेजवळ आल्यामुळे उत्पन्न झालेली भीती नाहीशी झाल्यावर, माळव्यात जी मोहीम सुरू होती तीत गायकवाडचे सैन्य मदतनीस म्हणून पाठवून काही महत्त्व मिळले अशी आशा होती; परंतु ती व्यर्थ होती. तथापि, इतके लक्षात ठेविले पाहिजे की, गायकवाडी संस्थानावर जर कोणी स्वारी केली असती तर त्याचे संरक्षण करण्यासाठी गायकवाडी घोडेस्वारांचा फारसा उपयोग झाला नसता, त्याचप्रमाणे माळव्यांत पाठविलेली गायकवाडी फौज फजिती पावून परत आली. ज्याचे अन्न खात असत त्यांच्या राज्यव्यवस्थेत अपाय करण्याच्या कामास किंवा महिकांठ्यात मुलुखगिरीचे कामासच तेवढा त्यांचा उपयोग होता.

दुसरे कारण असे की, पाच वर्षांत काठेवाडातील खंडणीचे उत्पन्न मुळीच आले नाही; मध्य हिंदुस्थानात मोठमोठ्या लढाया सुरू असल्यामुळे ब्रिटिश सरकारास एकही शिपाई पाठविता येईना; तेव्हा मेजर वॉकर साहेबांस असे करणे बरे वाटले की, बाबाजीचे घोडेस्वार आहेत ते सर्व राहू द्यावे व त्यात आणखी भरही घालावी म्हणजे संस्थानास पैशाची फार जरूर असल्यामुळे ते वसूल करता येईल आणि ही व्यवस्था ब्रिटिश सरकार कायमची व्यवस्था करीपर्यंत राहू द्यावी.

शेवटले कारण असे की, आणखी लोक काढून टाकण्यापूर्वी जास्त थकलेली बाकी द्यावयाची होती. सन १८०३ आणि १८०४ साली बाबाजीच्या सैन्यास दर साल २७ लाख रुपये खर्च लागला आणि सन १८०७ साली तर याहीपेक्षा जास्त लागला. पहिल्या दोन वर्षांत त्याच्याजवळ ८ तोफा, १०० गोलंदाज, ४० बारख, ४५६ अरब, ६८४ हिंदुस्थानी, ७२०० पायदळ आणि ५२४० घोडेस्वार इतके होते. या घोडेस्वारांपैकी २००० लोक कोणत्याही कामात लायक नाहीत आणि बाकीचे जे लायक म्हणून राहिले त्यांच्यापैकी अर्धेही ऐन लढाईचे प्रसंगी उपयोगी पडणार नाहीत असा रेसिडेंट साहेबांनी रिपोर्ट केला होता. सन १८०७ साली बाबाजीचे सैन्य आणखी जास्त वाढले आणि त्या साली संस्थानास सर्व फौजेचा खर्च ४२,९७,३७२ रुपये झाला असावा असा अजमास कर्नल वॉकर यांनी केला होता.

परंतु सन १८०७-०८ च्या सुमारास ब्रिटिश सरकारास काठेवाडात हात घालून तेथे आपल्यास वाटेल त्याप्रमाणे व्यवस्था करण्यासारखी स्थिती प्राप्त झाली; मुलुखगिरी नामशेषच झाली होती; संस्थानच्या सैन्याने माळव्यांत जी वागणूक ठेविली त्यामुळे कोणत्याही माफीस ते पात्र नव्हते, सुधारणेच्या विरुद्ध येण्यास सितारामास ताकद नव्हती आणि सरतेशेवटी पुष्कळ कर्जाऊ पैसे काढून एकदम संस्थानचे घोडेस्वारांची बाकी धरून सुद्धा जे काही कर्ज म्हणून द्यावयाचे होते ते देऊन टाकिले. घोडेस्वारांची बाकी सन १८०४-०५ पर्यंत ३८ १/२ लाख होती व सन १८०७ साली ती रक्कम ७३,४२,५२८ रुपयांपर्यंत फुगली.

	रु.
शिलेदार	**२०,४०,२१३**
शिबंदी	**७,२०,२३५**
पागा	**६,३९,५७४**
एकूण	**२४,००,०२२**

इसवी सन १८०७-०८ साली मागील सर्व बाक्या फेडून टाकिल्या आणि कर्नल वॉकर साहेबांनी लष्करी खर्च २० लक्ष रुपये कमी केला व सर्व सैन्याचा खर्च २४ लाख रुपये ठेविला. त्यापैकी ५ १/२ लाख रुपये मात्र जइदादच्या रूपाने दिले जात असत. या सर्व खर्चात संस्थानच्या तैनातीत ७९५२ घोडेस्वार आणि ३,६९३ पायदळ ठेवण्यात आले आणि या सैन्यापैकी तीनचतुर्थांश लोकांनी काठेवाड आणि महिकाठ्यात काम केले. मेजर वॉकर यांच्या मनातून हा खर्च कमी करून १२ लाख रुपयांपर्यंत आणून ठेवावयाचा होता; परंतु मार्जिनमध्ये दाखविलेल्या रकमेपेक्षा त्यांना खर्च कमी करता केव्हाच आला नाही. आता याचे पुढे लष्करी खर्च कसा वाढत चालला, शिपाई लोकांचा पगार पुन्हा कसा तुंबत गेला, गायकवाड सरकारला कंटिंजन्ट फोर्स कसा ठेवावा लागला, याचेमुळे भांडण कसे उत्पन्न झाले व त्याबद्दल कशी शिक्षा मिळाली, एकंदरीत पूर्वीचे जे लष्कर वाईट होते व त्यामुळे फार खर्च होत होता, ते अधिक वाईट आणि नाशकारक कसे झाले हे सांगावयाचे आहे.

कर्नल वॉकर यांनी गायकवाडी लष्कर कमी केल्यावर दहा वर्षांनी, पेशवे आणि ब्रिटिश सरकार यांच्यामध्ये तंटा उपस्थित झाला आणि त्यात पेशव्यांचा नाश झाला. बाजीरावाचा पाडाव झाल्यामुळे बडोदे संस्थानास काय काय फायदे झाले होते हे मागील एका भागात सांगितलेच आहे; येथे त्याचे लष्करावर वाईट परिणाम कोणते झाले हे पहावयाचे. मदतनीस (सबसिडिअरी) सैन्यामध्ये आणखी लोक ठेवण्यात आले; तारीख ६ नोव्हेंबर १८१७ रोजी जो तहनामा झाला त्याच्या ८व्या कलमाप्रमाणे "जेथे म्हणून मदतनीस (सबसिडिअरी) सैन्यास काम करावे लागले तेथे त्यास मदत करण्याकरिता ३००० लायक घोडेस्वारांची पलटण" आपल्या खर्चाने ठेवण्यास गायकवाडाने आपल्यास बांधून घेतले होते; माळव्याच्या लढाईत ब्रिटिश सैन्याला गायकवाडच्या फौजेने मदत केली आणि ती फौज जसजशी वाढत गेली त्याप्रमाणे तिचा खर्च वाढत गेला व घोडेस्वारांचा पगार तुंबू दिला.

मागे कंटिंजंट फोर्सबद्दल जो उल्लेख केला आहे त्यासंबंधीचा मजकूर पुढे लिहिण्यात येईल; येथे एवढेच सांगणे जरूर आहे की, सन १८१७ साली मदतनीस (सबसिडिअरी) फौज फार वाढली असल्यामुळे मुंबई सरकाराने फत्तेसिंग महाराजास त्यांचे सैन्य कमी करण्याचा आग्रह केला; परंतु त्यांनी तसे करण्याचे नाकारले. सैन्यातील लोक कमी न करिता सैन्याचा खर्च ४ लाख रुपयांनी कमी करण्याचे त्यांनी कबूल केले; परंतु यावरून त्यांच्या मनातून नुसती वरकरणी सुधारणा करावयाची होती असे दिसते. उलट त्यांनी असे सांगितले की, लष्करी लोकांच्या हक्कास हात लावण्यास आपण मुळीच खुशी नाही आणि अशी गोष्ट करण्यामध्ये पुष्कळ अडचणी उत्पन्न होतील हे मुंबई सरकारनेही कबूल केले. पुढे सयाजीराव महाराजांचेही हेच म्हणणे होते आणि ते कबूल झाले. सन १८१९ साली रेसिडेंट साहेबांनी संस्थानची शोचनीय (अडचणीची) स्थिती पाहून अशी सूचना केली की, लष्कराकरिता संस्थानाचा जो ४२ १/२ लाख रुपयांवर दरसाल खर्च होतो तो सुमारे १६ लक्ष करावा; परंतु कमी केलेल्या लोकांकडून कोणत्याही तऱ्हेचा दंगा होण्याची भीती नाही अशी खात्री करून दिल्याशिवाय या सूचनेस अनुमती देण्याची मुंबई सरकाराने नाकारिले. हा जो लष्करी खर्च वाढला तो थोडासा दिवस पुंडाईचे होते म्हणून वाढला व थोडासा माळव्याच्या लढाईत व सन १८२३ साली मदत

केल्यामुळे वाढला. सन १८१७ च्या तहाप्रमाणे फत्तेसिंग महाराज ब्रिटिश सरकारच्या सलोख्यातील राजास ३००० घोडेस्वारांनिशी (मदतनीस सैन्याबरोबर) मदत करण्यास बांधले गेले होते, आणि एके वेळी त्यांनी ३००० घोडेस्वार जुळविलेही होते; परंतु तितके लोक कधीच ठेवण्यात आले नाहीत आणि सालीना १७ १/२ लाख रुपये खर्च करून १४९१ घोडेस्वार आणि ५२३ पायदळ ठेविले हेच म्हणणे बरोबर होईल. या लोकांचा पगार इतक्या अव्यवस्थित रीतीने देण्यात येत असे की, एकदा सरजॉन माल्कम साहेबास १४ लाख रुपये यास देणे भाग पडले आणि त्यांची एकंदर स्थिती इतकी वाईट होती की, त्या प्रसिद्ध कामदाराने त्यांची सुधारणा करण्याकरिता काही योजना केली होती; परंतु त्या योजनेप्रमाणे गायकवाड सरकारचा आश्रय होता या मुद्द्यावर ब्रिटिश सरकाराने ती नापसंत केली.

पागेचे घोडे	**४३१**
शिलेदार	**७८४**
शिबंदी	**२७६**
एकंदर घोडेस्वार	**१४९१**
एकंदर पायदळ	**५२३**

सन १८२० साली, एल्फिन्स्टन साहेबांस असे आढळून आले की, बडोदे संस्थान बहुतेक ऋणमुक्त झाले म्हणून जी समजूत होती ती चुकीची असून, वास्तविक त्यात ते फार जखडून गेले आहे. त्यावेळी जे कर्ज द्यावयाचे होते त्यापैकी मोठा भाग लष्करी खर्च वाढल्यामुळे झाला होता. कोसासच्या लढाईचा २ लाख रुपये झाला, माळव्यातील लढाईच्या खर्चीकरिता पारख लोकांकडून घेतलेले १३ लाख आणि सर जॉन माल्कम यास १४ लाख द्यावयाचे होते ते निराळेच; काठेवाडातील शिबंदीस पाच वर्षे पगार मिळाला नव्हता व राजपिंपळ्यांतील घोडेस्वारांस ३ वर्षे मिळाला नव्हता; एकंदरीत त्यावेळी संस्थानाला जे १,७०,००,००० रुपये कर्ज होते, त्यांच्यापैकी बहुतेक भाग खर्चामुळे होता.

या कर्जामुळे नंतर ब्रिटिश सरकारास हात घालणे व जात्या करणे भाग पडले; परंतु सन १८२० सालानंतर लागलीच विशेषतः ३००० लोकांच्या कंजिंजन्ट फोर्सची नीट व्यवस्था ठेवण्याबद्दल ताकीद करून सयाजीराव महाराजांस त्यांच्या सैन्याची व्यवस्था करण्यास व त्यास वाटतील तसे त्यांच्या लोकांस पगार देण्यास मुभा देण्याचा मुंबई सरकाराने निश्चय केला, तेव्हा सन १८४५ साली सैन्य किती होते, एवढे नमूद करून सध्या गायकवाड सरकारच्या एकंदर सैन्याचा विचार आपण बाजूस ठेवू. घोडेस्वार गोलंदाज २५, घोडेस्वार (कंटिंजन्ट मिळून) ५४५०, पायदळ (ड्रेसी आणि हत्यारबंद) १७५, बिनकवायती पायदळ (सिंधी, अरब वगैरे) ३४२५, शिबंदी (जे वसूल जमा करीत असत व पोलिसचे काम करीत असत) ३०००, असे एकंदर १२७७५ लोक होते. यावेळी असा समज होता की, बडोदे शहराच्या तटभिंतीचे संरक्षण करण्याकरिता ५०० तोफा होत्या; परंतु त्यांपैकी बहुतेक मोडून गेल्या आहेत, किंवा सर टी. माधवराव यांनी त्या कोणत्या तरी सुरक्षित स्थळी ठेविल्या आहेत. या सैन्याच्या खर्चासंबंधाने पान २३४ पहा.

कंटिंजन्ट फोर्स

वर सांगितलेच आहे की, तारीख ६ नोव्हेंबर सन १८१७ च्या तहनाम्यातील ८० व्या कलमाप्रमाणे मदतनीस (सबसिडिअरी) फौजेस जेथे काम करावे लागेल. तिच्याबरोबर काम करण्यासाठी कंपनी सरकारच्या तैनातीत ठेवण्यास ३००० effective घोडेस्वाराची पलटण आपल्या खर्चाचे ठेवण्यास व ब्रिटिश सरकारच्या फौजेचा जो नायक असेल त्याचे हुकमतीत ती ठेवण्यास गायकवाड सरकारानी आपल्यास बांधून घेतले होते. शिवाय कंटिंजंट फौजेची रचना करण्यासंबंधी ती सज्ज ठेवण्यासंबंधी, त्यांचा नियमितपणाने महिन्याचा पगार, त्यांचे हत्याराची व सरंजामाची व्यवस्था या सर्व बाबीसंबंधाने ब्रिटिश सरकार जो सल्ला देतील आणि ज्या सूचना करतील त्या गायकवाड सरकारच्या दाखवल्याप्रमाणे (रूढीप्रमाणे) महाराज साहेबांनी कबूल कराव्या.

सन १८१७ पासून या वेळेपर्यंत हा करार कधीही अमलात आला नाही हे सर्वांस माहीत आहे आणि पुष्कळ उघड कारणाकरिता हा करार पाळणे संभवनीय नव्हते. मदतनीस (सबसिडिअरी) सेनेला मिळून कंटिंजन्ट फौजेने लढाई करावयाची; परंतु आरंभीच सन १८२१ आणि १८२३ याच्या दरम्यान म्हणजे गायकवाडांचे सैन्य माळव्यातून परत आल्यानंतर त्यास काठेवाड, महिकांठा (हेड-क्वार्टर सादरा) आणि डिसा येथे पाठविण्यात आले व सर्व खंडणी फुकट वसूल करण्याच्या अटीवर जरी सन १८२० सालच्या ठरावावर सर्व मांडलिक संस्थानांची व्यवस्था त्याचे हातातून काढून घेतली होती, तरी सयाजीराव महाराजांस ते सैन्य बडोदे संस्थानात परत आणता आले नाही. कंटिंजन्ट फौज निष्णात करावयाची होती; परंतु युरोपियन कल्पने (धर्ती) प्रमाणे मराठे बिनड्रेसी घोडेस्वारांस कधीच निष्णात करता आले नाही. गायकवाड सरकारावर फार वजन खर्च करून पगार तेवढा नियमितपणाने करता येत असे. परंतु फौजेची रचना, ती सज्ज ठेवणे व त्यांची हत्यारे आणि सरंजाम यासंबंधी कामदारांच्या ज्या सूचना होत त्या ''गायकवाड सरकारच्या दाखल्या''शी जुळत नसत. याशिवाय कंटिंजंटपासून दोन तऱ्हेची कामे घ्यावयाची होती आणि ती एकाच वेळी कधीही करता आली नाहीत. त्यांनी पोलिसचे व वसुलाचे काम करावे, त्याचप्रमाणे इकडून तिकडे निरोप व थोडेसे सामान पोहोचविण्याचे काम करावे; परंतु हे काम करून कंटिंजंट फौज निष्णात होईना. मांडलिक संस्थानामध्ये कंटिंजंट फौजेचा पहिल्या कामात काही उपयोग होत असे; परंतु पहाडी लोकांचा एखादा लहानसा दंगा मोडण्याचे कामी किंवा शत्रूस तोंड देऊन लढण्याचे कामी योग्य अशा लढाऊ लोकांच्या योग्यतेस ती फौज कधीच आली नाही.

कित्येक वर्षे ब्रिटिश ऑफिसरांनी कंटिंजन्ट फौजेमधील दोष दाखविले आहेत. त्यांच्यापैकी काही येथे सांगतो; कारण फार प्राचीन काळापासून गायकवाड सरकारच्या सर्व सैन्यांत त्यांचे वसतिस्थान आहे आणि ते अमक्याकाळी किंवा अमक्या लोकांत सापडतात असे नाही. महाराज सरकारने आपल्या लष्करी सरदारास जहागिरी न देता वंशपरंपरेने नोकऱ्या दिल्या होत्या ही गोष्ट चांगली झाली होती असे आम्ही म्हटलेच आहे. त्यामुळे त्या वर्गाचा पाडाव करून त्यांचे हातातील राजकीय सत्ता तेव्हाच काढून घेता येई; परंतु असे कबूल केले पाहिजे की याच कारणामुळे त्यांच्या लष्करी गुणांचा सहजगत्या ऱ्हास झाला. थोडे करून होईल तितका जास्त

पगार मिळविण्याकडे सरदारांचे लक्ष लागले. त्यांची पागा फार लांब असे आणि तो स्वस्थपणे बडोदे शहरात राही. तो आपले हाताखालील लोकांचा पगार घेईल आणि तो बहुतेक कर्जबाजारी असल्यामुळे त्या पगाराच्या पैशांतील मोठा भाग आपल्या सावकारास देई. तो मेल्यावर त्याचा अधिकार त्याच्या अज्ञान मुलाकडे किंवा बायकोकडे जाई, म्हणजे सर्व काम एखाद्या कारकुनाचे हाती येई ज्याप्रमाणे सरदार, त्याचप्रमाणे ज्यांचे थोडेसे वजन असे. अशा खालच्या लोकांची स्थिती बदली देऊन काम होत असत; जागा कितीही हलकी असली तरी योग्यतेचा विचार न करिता ती बाप मेल्यावर मुलास मिळत असे; पगारांने सावकार आणि कारकून यांची पाती. अधिकारी लोकांची हजिरीपत्रके कशीतरी भरून काढण्यात येत असल्यामुळे शिपाई लोकांसही त्यांच्या तपासणीची भीती वाटत नसे.

कंटिंजन्टचा इतिहास थोडक्यात असा आहे. प्रत्येक साली ब्रिटिश तपासणी अधिकारी नियमित पगाराबद्दल, थोड्या लोकांबद्दल आणि वाईट घोडे व खराब हत्यारे यांबद्दल ओरडत असत. शेवटी सन १८३० साली सरजॉन माल्कम यांस जेव्हा आढळून आले की, कंटिंजंट फौजेपैकी दोन तृतीयांश लोक नेहमी सज्ज ठेवण्याबद्दल आपण केलेली विनंती मान्य केली जात नाही, त्यावेळी त्यांनी सयाजीराव महाराजांचा त्यांच्या सैन्यावरील सर्व अधिकार काढून घेतला आणि सैन्याच्या खर्चाकरिता १३ लाख रुपयांचा मुलूख तोडून घेतला. याबद्दल सूड म्हणून प्रसिद्ध कमालउद्दिनच्या मागून त्याचे जागी आलेला त्याचा मुलगा अमिनउद्दीन याचा सरजॉन माल्कमवर विश्वास असल्यामुळे त्याचे हुकूम कोणी मानू नयेत असा आपल्या प्रजेस सयाजीराव महाराजांनी हुकूम सोडला. या युक्तीने सयाजीराव महाराजांनी कंटिजंटमधले पुष्कळ लोक कमी केले आणि त्यामुळे त्यात दुसरीकडून भरती करावी लागली आणि आपल्या मांडलिक प्रांतातून शिबंदी पोलीस परत आणून किंवा निदान त्यांचा साचलेला ८२००० रुपये पगार थोपवून महाराज साहेबांनी मुंबई सरकारास बरेच अडचणीत आणले. पुढे सरजॉन माल्कम किंवा त्यावेळचे रेसिडेंट यांनी आणखी नवीन मुलूख तोडून घेण्याचा विचार केला आणि त्यावर सयाजी महाराजांनी काठेवाड आणि महिकांठ्यामध्ये १११७ घोडेस्वार आणि ७०९ पायदळ यांची जी (स्पेशल ड्युटीवर) तैनातील फौज होती व जिचा खर्च दरसाल ४ लाखांवर होता ती परत आणली आणि यामुळे मुंबई सरकारास २८० घोडेस्वार आणि ६०० पायदळ जास्त ठेवावे लागले व त्याचा खर्च मुलूखगिरीच्या पैशातून घेत असत.

याच्यानंतर सरजॉन माल्कम यांच्या जागी लार्ड क्लेअर हे आले. महाराज साहेबांस फार कठोरपणाने वागविले असे त्यांना वाटले. याच्यापुढे कंटिंजंट फोर्स चांगल्या रीतीने ठेवण्यात येईल एवढ्या वचनावर ते तृप्त झाले आणि त्यांनी मागे तोडून घेतलेले प्रांत परत दिले. तारीख ६ एप्रिल सन १८३२ रोजी महाराज यांनी ब्रिटिश सरकारच्या तिजोरीत १० लाख रुपये ठेविले व ते पुढील लष्करी लोकांचा पगार तुंबल्यास तो त्या रकमेतून द्यावयाचा या समजुतीवर ठेविले ही गोष्ट खरी; परंतु कंटिजंटची ती पूर्वीची ४ लाख रुपये माफी तुंबली होती ती परत मिळण्याची, किंवा ज्या सरकारांनी व लोकांनी सरजॉन माल्कम यांचा हुकूम पाळण्याचे स्वीकारिले होते त्यास गायकवाडांनी परत बडोद्यास बोलाविल्यावर महाराजांच्या रागापासून त्यास अभय वचन देण्याची हामी घेण्यासारखे लार्ड क्लेअर हे काही बोलले नाहीत व त्यांनी काही केलेली

नाही. ब्रिटिश सरकारानी त्यांच्या सुरक्षितपणाबद्दल ते वचन दिले होते त्यावर त्यांनी विश्वास ठेविल्यामुळे त्यास आता सोसावे लागले. नबाब अमीनउद्दीन यांचे हक्क बुडवून त्यांच्या जागी गणपतराव ढमढेऱ्यांची योजना झाली आणि दुसऱ्या लकडीचे दोन अधिकारी मिरसरफराज अल्ली आणि हमीद जमादार, त्याचप्रमाणे ज्या हुजरात पागेचे फार दिवसांचे अधिपती गणपतराव बाबा यांस बडतर्फ केले आणि भास्करराव विठ्ठल यांची पागा काढून घेतली. दुसरे साधारण लोकांची अशीच स्थिती झाली त्यास बडोद्यास परत येण्यास लावून मुंबई सरकारच्या सांगण्याप्रमाणे वागल्यावर नोकरीतून काढून टाकिले किंवा मोठाले नजराणे देण्यास लाविले. कॉंटिजंटमध्ये जे नवीन लोक ठेविले होते त्यास काढून लाविले आणि याप्रमाणे सयाजी महाराजांचा पूर्ण विजय झाला. लॉर्ड क्लेअर यांनी दाखविलेल्या सौम्यपणानेही महाराज साहेब ताळ्यावर आले नाहीत असे जेव्हा ब्रिटिश सरकारास आढळून आले त्यावेळेस त्यांनी, सन १९३६-४१ यादरम्यान ज्या लोकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला होता, त्यांचे हाल कमी करण्याकरिता काही खटपट केली हे चांगले झाले.

लार्ड क्लेअर यांनी देखरेख गायकवाडच्या स्वाधीन केल्यावर कॉंटिंजंट फौज पुन्हा एकदा नावाची झाली. लोकांचा पगारही नियमित मिळेनासा झाला, तथापि तक्रार करण्याची कोणाची छाती झाली नाही. याप्रमाणे स्थिती अधिकाधिकच बिघडत चालली; शेवटी सन १८१७ चा तहनामा सयाजी महाराज कोणत्याही रीतीने पाळीत नाहीत असे हिंदुस्थान सरकारच्या जेव्हा नजरेस आले, त्यावेळी त्यांनी तारीख ८ माहे मार्च सन १८३९ असा हुकूम फर्माविला की, बिन कवायती (इरेग्युलर) घोडेस्वारांची एक पलटण उभी करावी व तीस ''गुजरात बिन कवायती घोडेस्वारांची पलटण'' (गुजरात इरेग्युलर कॅलव्हरी) असे नाव द्यावे; तिच्यामध्ये १८१२ लोक असावेत व तिच्यावर ब्रिटिश सरकारचा सेनापती आणि नायब सेनापती असून ती स्वतंत्र रेसिडेंटाच्या ताब्यात द्यावी व तिचे अहमदाबाद येथे मुख्य ठाणे असावे. सन १८४१ साली पेटलाद गायकवाड सरकारास परत देण्यात आले व महाराजांनी दरसाल घोडेस्वारांच्या खर्चाकरिता ३ लाख रुपये देण्याचे कबूल केले. ही झालेली अप्रतिष्ठा व पडलेला खर्च, आम्ही वर सांगितल्याप्रमाणे, खंडेराव महाराजांच्या कारकिर्दीपर्यंत म्हणजे बिनकवायती घोडेस्वारांची पलटण (इरेग्युलर हॉर्स) झाल्यावर एकोणीस वर्षांनी नाहीशी झाली. याप्रमाणे सयाजी महाराजांस शासन झाल्यावर कंटिंजंट फौजेचे इतके महत्त्व राहिले नाही. सन १८४० साली त्या फौजेमध्ये १५०० घोडेस्वारांपेक्षा जास्त सयाजी महाराजांपासून मागितले नाहीत; परंतु त्यासाली जर जेम्स कार्न्याक यांनी पहिलेच प्रथम असा पक्का ठराव करून घेतला की, सन १८१७ च्या तहनाम्याप्रमाणे मदतनीस (सबसिडिअरी) सैन्याबरोबर काम करण्याकरिता नव्हे, तर ''मांडलिक महालात काम करण्याकरिता'' त्या लोकांस ठेविले पाहिजे. त्या फौजमध्ये १५०० लोक पाहिजेत किंवा ३००० लोक पाहिजेत, याची सयाजीराव महाराजांना मुळीच पर्वा नव्हती; त्यांच्या प्रजेपैकी जो लष्करी वर्ग होता त्यांचे पोषण त्यास करावयाचे होते आणि तो वर्ग त्यास कमी करता येईना. कदाचित महाराज साहेबांना असेही वाटले असेल की, सर्व कंटिंजन्ट त्यांनी ठेविला म्हणजे गुजरात बिनकवायती घोडेस्वारासंबंधी जो ठराव झाला आहे तो फिरेल, म्हणून कंटिंजंटमध्ये ३००० घोडेस्वार ठेवण्यात आले व पूर्वीप्रमाणे महालातून त्यांनी पोलीसचे व

नेण्या-आणण्याचे काम चांगले केले; परंतु जेव्हा खंडेराव महाराज गादीवर आले त्यावेळी त्यांनी कंटिंजंटमधील लोक कमी करून ते १५०० ठेवण्यासंबंधाने विचार करून लागले व त्याचे ब्रिटिश अधिकाऱ्यांना फार आश्चर्य वाटले. बंडाचे सालापर्यंत ते वरील गोष्टीचा विचार करीत होते; पण तेव्हापासून लोक कमी करण्यासंबंधाने ते एक शब्दही बोलले नाहीत, उलटे जेव्हा सर्व कवायती फौज उत्तर हिंदुस्थानात नेली आणि गुजरातेतील रानटी लोक दंगा करण्यास संधी पहात होते, त्यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांना शांतता ठेवण्याचे कामी मदत करण्यास आपल्या सैन्यास प्रोत्साहन करीत होते. नंतर एका वर्षाने "गुजरात बिनकवायती घोडेस्वाराची पलटण" मोडण्यात आली आणि सर जेम्स कार्न्याक यांनी ज्या अटी घातल्या होत्या त्या बरहुकूम ३००० घोडेस्वारांची कंटिंजन्ट फौज ठेवण्याचे व त्यात काही कमी न करण्याची खंडेराव महाराजांनी वचन दिले.

गणपतराव महाराजांच्या कारकिर्दीत ब्रिटिश सरकारच्या तपासणी अधिकाऱ्यांस कंटिंजन्ट फौजेसंबंधाने कुरकुर करण्यास फारशी जागा मिळाली नाही. सन १८६३-६४ साली कंटिंजन्ट फौज फारच बिघडली आणि काठेवाड व उखामंडलमध्ये जेव्हा दंगे सुरू झाले त्यावेळी ते लोक लष्करी व पोलीसच्या अशा दोन्ही कामास नालायक आहेत असे आढळून आले.

यावेळपासून तो खंडेराव महाराजांच्या मरणापर्यंत सुधारणा करण्याबद्दल मुंबई सरकारचा सारखा तगादा होता आणि गायकवाड सरकारही उलट जाब देत होते की, फौज आपल्या कामात जर निष्णात व्हावयास पाहिजे तर तीस इतर परस्युटंट काम करण्यास पडू नये. मुंबई सरकारने असेही सांगितले की, सर्व लोक कमी करून ५०० निष्णात घोडेस्वार ठेविले तरी नको आहे; परंतु खंडेरावांनी सांगितले की, सैन्य कमी करणे म्हणजे एकंदर लष्करी वर्गाच्या उमेदीस ते अपायकारक होईल. जेव्हा मल्हारराव महाराज गादीवर बसले तेव्हाही कंटिंजंटमध्ये काही सुधारणा झाली नाही. आणि सन १८७३ साली हिंदुस्थान सरकारने जे प्रतिनिधी नेमिले त्याने वर सांगितलेल्या कारणावरून कंटिंजन्ट फौजेविषयी आपली नापसंती दाखविली; परंतु मल्हारराव महाराजांनीही खंडेराव महाराजांच्या तक्रारी पुढे आणल्या आणि ज्या गोष्टींनी गायकवाड सरकारची हुकूमत, आश्रय किंवा सत्ता कमी होईल, त्याचप्रमाणे सरदार लोकांचा आश्रय कमी होईल अशा गोष्टी करण्यास लॉर्ड क्लेअर किती नाखूश होते हेही महाराजांस दाखविले. याप्रमाणे सद्यःस्थिती आहे.

कवायती पायदळ

सयाजीराव महाराजांच्या कारकिर्दीत अँग्लो-इंडियन मि. डन्बार यांच्या हाताखाली काही थोडेसे हत्यारबंद व ड्रेमी सोल्जर होते हे आम्ही वर सांगितलेच आहे. या भागाचे आरंभी आम्ही ज्या सुधारणेचा उल्लेख केला आहे ती साधारण सन १८५८ सालातील होय. महिकांठ्यात कोळी लोकांची पलटण उभारण्याचे कामी कर्नल औट्राम यांस फारच चांगला जय आला आणि त्याच धर्तीवर उखामंडलमधील वाघेर लोकांस वाईट मार्गातून पराङ्मुख करण्याकरिता त्यांची एक पलटण उभारली. (तारीख २१ फेब्रुवारी सन १८६१) परंतु लोक कवायतीस कबूल होईनात आणि थोड्याच महिन्यांत ते आपल्या देशास परत गेले (डिसेंबर सन १८६२) आणि त्यांच्याजागी सिंधी आणि बलुची हे लोक ठेवण्यात आले.

जे मराठे आणि रजपूत लोक तेथे येऊन राहिले होते, त्यांनाही नंतर या पलटणीत शिरण्यास परवानगी मिळाली आणि सन १८६५ सालापासून यास उखामंडळ पलटण (फोर्स असे म्हणण्याचा प्रघात पडला. ज्यावेळी (सन १८६१) उखामंडळ पलटण पहिल्याने उभारण्यात आली, त्याचवेळी अमरेली येथे तद्देशीय लोकांची एक पलटण उभारण्यात आली आणि दोन्ही युरोपियन अंमलदारांच्या हाताखाली देऊन त्यास बडोद्याच्या रेसिडेंटाकडून हुकूम मिळत असत. या दुसऱ्या पलटणीस घरी पलटण अथवा अमरेली महालातील पलटण असे म्हणतात आणि गायकवाड सरकारच्या कवायती सैन्यापैकी ती चौथी पलटण आहे. सन १८६४ साली जेव्हा वाघेर लोकांचे बंड झाले तेव्हा ती पलटण अमरेली येथे पाठविण्यात आली आणि तेव्हापासून तिचा नेहमीचा मुक्काम तेथेच आहे. सन १८७० साली खंडेराव महाराजांच्या कवायती फौजेमध्ये (चौथ्या पलटणीचे लोक वजा जाता) २७०१ लोक होते व त्यांच्यावर एक जनरल, दोन कर्नल, एक बिग्रेडिअस मेजर, मेजर्स, कॅप्टन्स वगैरे अधिकारी होते. बंदुका, तोफा व दुसरी लहान हत्यारे सर्व बडोद्यास तयार करीत.

	लोक
सिल्व्हर गन बॅटरी	**१६६**
फोर्स आर्टिलरी	**२१२**
रिसाला	**१९६**
२री बॅटरी १	**७१**
हायलंडर्सची[१] १ पलटण	**५९४**
दुसरी पलटण	**५९४**
तिसरी पलटण	**५९४**
	२४२७

खंडेराव महाराजांनी तर काही आर्मस्ट्रांग बंदुकाही विकत घेतल्या होत्या; परंतु ब्रिटिश सरकारांनी त्या त्यांच्यापासून परत विकत घेतल्या.

खंडेराव महाराज हे अंतःकरणापासून शिपाईबाण्याचे होते हे आम्ही वर सांगितलेच आहे. त्यांनी फौज ठेवण्याचे म्हणजे जे आपल्या अंमलदाराचे हुकूम ऐकतील असे लोक एकत्र जुळविण्याचा खरा प्रयत्न केला. ब्रिटिश अगर हाफ-कास्ट अंमलदारांस आपल्या नोकरीत ठेवून लष्करी कामांत जरूर पडेल त्याप्रमाणे हुकूम सोडण्याचा अधिकारही त्यास देण्याचे त्यांनी धाडस केले. परंतु मल्हारराव महाराजांनी कवायती फौजेची काळजी कमी घेतली आणि म्हणून त्यांच्या कारकिर्दीत कारकून पेशाचे लोकांचे वजन फार वाढले आणि त्याच प्रमाणाने संस्थानच्या लष्करी लोकांचे तेज कमी झाले. ब्रिटिश सरकारच्या अंमलाखाली असलेल्या संस्थानांतून लष्करी लोकांना पाहऱ्याचे व पोलिसचे काम माहीत असले म्हणजे त्या संस्थानांचे भागते. ही कल्पना करणे जितके सोपे आहे तितकेच बडोद्यामध्ये संस्थानच्या फौजेपासून सार्वभौम सरकारास कोणत्याही प्रकारची भीती बाळगण्याचे कारण आहे याची कल्पना करणे कठीण आहे.

---

१. पोषाख हायलंडरासारखा असे, तफावत इतकाच की, पायांवर तंग पायजमे असे. हल्लीच्या आमदानीत हा पोषाख सोडून दिला आहे.

ज्यायोगाने नवीन तयार केलेले पोलीस बळास जास्त बळकटी येईल व पद्धतशीर वळण लागेल अशी एखादी सुधारणा ज्यास स्वतःचीच घमेंड बाळगावयाची अशा शिवाय इतर सर्वांस पसंत पडणारच मग तीपासून निरुपयोगी फौजेस धक्का पोचला तरी हरकत नाही.[१]

तारीख १ जानेवारी सन १८७९ रोजी बडोदे संस्थानातील फौजेची संख्या दाखविणारे पत्रक :-

१. तोफखाना - तोफा. चालू तोफा ३४ असल्याचे समजते, त्याशिवाय २ सोन्याच्या व २ चांदीच्या तोफा व गुलाल उडविण्याच्या २२ खेळावयाच्या तोफा आहेत आणि जिंगाल अथवा उंटावरील चालू तोफा ६० आहेत, त्या कामाच्या आहेत.

		एकंदर
२.	सामुग्री - १५४ गोलंदाज,	
	(१) ७१ घोडे व ५४ बैल.	१५४
३.	घोडेस्वार	-
	२४७ घोडे (१)	
	२२ स्वार बँडवाले (१) २४९	
	शिलेदार २९४३ घोडे (२) २९४३	
	फालतू १६६३ घोडे, ६९८ पोलीस - २३६१	५५७३
४.	पायदळ -	
	नेहमीचे ३०७८ (१) ३०७८.	
	फालतू, तहशील २०२०,	
	पोलीस ४६९७ ६७१७	९७९५
		१५५२२

तोफखाना व नेहमीचे लोक (१) यांचा संस्थानला खर्च सुमारे ७ लाख होता.

फालतू घोडेस्वाराचा (२) खर्च २५ लाखांचा असे त्यापैकी १० लाख कंटिंजंटबद्दल असून बराच भाग सरदारच्या नेमणुकीत जातो.

●●●

१. व्यवस्थित पोलीस मराठ्यांनी कधीच ठेवले नाही. शांतता ठेवण्याचे व मॅजिस्ट्रेटचे हुकूम अमलात आणण्याचे काम सैन्याकडूनच करवले जात असे; पण ही पद्धत फार दिवस राहणार नाही. संस्थानात पोलिसचे काम सैन्याकडून केले जाते असे म्हणतात; परंतु बडोद्याबद्दल तसे म्हणता येत नाही. विशेष दंगा वगैरे झाल्यास गायकवाडला ब्रिटिश सैन्य बोलावण्याचा हक्क आहे.

कवायती फौज करण्याचे काम सोपे नाही. पुष्कळ काळ व पैसा खर्चल्याशिवाय ते होणे नाही; पण त्याचा दुसरीकडे उपयोग करणे जास्त इष्ट आहे. ते काम शिवाय असे आहे की, त्याला थोडासा व्यत्यय आला तरी त्याची किंमत कमी होते. शिवाय काही हेतू असल्याशिवाय या कामाकडे सारखे लक्ष्य कोण लावतो? व तसा हेतू आला उरला नाही व राजाच्या उत्साहात कमतरता आल्यास दुसरे कोणी सैन्य कायम ठेवण्यास तयार नाही.

प्रकरण २४ वे

खंडेराव महाराज (चालू) - न्यायव्यवस्था

◘

बडोदे संस्थानामध्ये कोणत्या पद्धतीवर न्याय मिळत असे या प्रश्नाचा विचार आम्ही या कारकिर्दीत थोडक्यात करणार आहोत; कारण असे की गणपतराव महाराज, खंडेराव महाराज आणि मल्हारराव महाराज या तिघांच्याही कारकिर्दीत जुनी पद्धत मोडून तिचे जागी आधुनिक समाजाच्या सोयीस अनुसरून अशी दुसरी चांगली एखादी पद्धत घालण्याचे चालू होते.

आरंभी या गोष्टी लक्षात ठेविल्या पाहिजे की, गायकवाडांचा बडोद्यामध्ये प्रवेश होऊन, सगळी दीडशे वर्षेच झाली होती. अहमदाबाद घेतल्यापासून आणि मोगल पादशाहीचा नायनाट झाल्यापासून एकशेतीस वर्षेच झाली होती. गुजरातचे राजधानीचा पाडाव झाल्यापासून दहा वर्षेपर्यंत बाबी घराण्यांचा निर्मूळ नाश झाला नव्हता आणि सुरत, भडोच आणि खंबायत यांच्यावर पूर्ण अंमल कधीही बसलेला नव्हता. बाबी घराण्यास जिंकल्या वेळेपासून तो ब्रिटिश सरकाराशी सख्य होईपर्यंत आपापसातील कलहामुळे गायकवाडी घराण्यात नेहमी फाटाफूट असे आणि त्यांच्या चढतीऐवजी उतरत्या कळेचीच चिन्हे दिसत. गायकवाडांने मधूनमधून जय मिळवलेले आहेत आणि गुजरातेतील ज्या भागांवर त्यांनी स्वाऱ्या केल्या त्यापैकी काहींवर त्यांचा पूर्ण अंमल व अधिकार होता आणि काहींवर सैन्य पाठवून जरबेने खंडणी गोळा करण्यापुरताच ताबा असे. तेव्हा मोठमोठ्या शहरांभोवती आणि सपाटीवर जो त्यांचा अंमल होता त्यामानाने रानटी प्रदेशावर तो बराच कमी होता यात काही आश्चर्य नाही. आणि म्हणून त्यास ज्या तऱ्हेची न्यायपद्धती सुरू करावयाची होती ती दुसऱ्या प्रकारचे प्रदेशापेक्षा पहिल्या प्रकारचे ठिकाणी अधिक खात्रीने सुरू करता आली.

मराठे लोक खंडणी घेण्याकरिता पहिल्याने गुजरातेत आले आणि मुख्यत्वे करून लूट मिळविण्याचे आशेने त्यांनी लढाया केल्या. नंतर पुढे ते काही जमिनीचे मालक होऊन राहिले, तथापि कर किंवा खंडणी मिळविण्याची त्यांची उत्कंट इच्छा तशीच कायम राहिली. त्यांना ज्या कायदेकानुनांची सवय झालेली होती ते कायदेकानून लिहिलेले नव्हते; धर्मसंबंधी विधीवर त्यांची

रचना असून ते साधे होते, गुन्हेगारास जी शिक्षा होई ती मुख्यत्वेकरून दंडाची असे; नवीन बनत असलेल्या समाजात साधारण अशीच स्थिती असते. दंडाची शिक्षा करण्याची पद्धत त्यांस उत्तम दिसावी, न्याय देणे म्हणजे कायद्याचा धंदा आहे व तेवढेच त्याचे महत्त्व आहे; आणि देणारे लोक अशा अवघड कामात प्रावीण्य मिळविलेले असून ज्यांनी रयत लोकांपासून जमिनीचा वसूल गोळा करण्याचा हक्क विकत घेतला आहे असे असावेत असे त्यांना वाटणे यात काही आश्चर्य नाही तेव्हा सारांश गायकवाडांनी न्यायपद्धतीत फरक किंवा सुधारणा थोडीच केली यात काही आश्चर्य नाही.

गुजरातेत मराठ्यांचा अंमल पूर्ण नव्हता हे चांगले समजण्याकरिता प्रांरभी हे सांगितले पाहिजे की, मराठ्यांनी त्या देशाचे दोन भाग केले होते. एकास ते रास्ती किंवा शांतिप्रिय म्हणत व दुसऱ्यास मेवासी किंवा कलहप्रिय म्हणत. पहिल्या वर्गांमध्ये न्यायाधीशाचे ठराव प्रमाणभूत आणि कायद्याप्रमाणे मानीत आणि दुसऱ्यामध्ये न्याय देणेच दुरापास्त होते. मेवासी देशाचे आणि मराठ्यांची स्वारी झाल्यावर जे काय काय फेरबदल झाले त्याचे वर्णन देताना अमृतलाल लिहितो, ‘‘निरनिराळया ठिकाणी ठाणी व पलटणी ठेवून मोगलाई अधिकार कायम राखण्यात आला होता, तरी त्या देशाच्या सर्व भागांतून ठिकठिकाणी मूळचे राजे, रजपूत, कोळी, गिराशी यांची आपापली मालकी असे आणि त्या सर्वांस जमीनदार हे नाव असे.’’ मराठ्यांच्या अमलाखाली या जमीनदारांची स्वतंत्रता कमी झाली नाही; उलट मोगल लोकांची सत्ता ज्यावेळी कमी कमी होऊ लागली त्या धामधुमीच्या वेळी ते पूर्वीपेक्षा अधिक प्रबळ आणि कलहप्रिय झाले, बाकी नवीन मालकांच्या दिवसेंदिवस वाढत्या ओझ्याखाली ते हळूहळू चेपले गेले. पहिल्या रेसिडेंटाचे असिस्टंट मि. डिगल यांनी सन १८०४ साली लिहिले आहे. ‘‘रयत लोक फार शांत व गरीब आहेत आणि सर्व न्यायाच्या कामगिऱ्या त्यांचेवर सहज बजावित येतात.’’ परंतु याचवर्षी मेजर वाकर यांनी असे लिहिले आहे की, ‘‘मराठे, गिराशी आणि कोळी यांच्याबरोबर नेहमी लढत असतात असे म्हटल्यास चालेल आणि त्यांची रैयतेमध्ये गणना नाही, (भिल्लसुद्धा धरून) यांच्यापैकी बहुतेकांचा धंदा चोरीचा आहे आणि साजगी व सार्वजनिक मालमत्ता लुटण्याची ते एकी संधी दवडीत नाही.’’ मेजर वाकर आणि मि. डिगल यांनी या लोकासंबंधाने जे लिहून ठेविले आहे त्याचा गोषवारा दिला म्हणजे मराठ्यांची न्यायपद्धती ज्यांच्यापर्यंत पोहोचली नाही अशा या रानटी लोकांचे चित्र पूर्ण होईल ते सर्व लोक एके ठिकाणी राहत नसत; त्याचे लहान लहान समुदाय सर्वभर पसरले होते व ते केव्हा केव्हा कोट बांधलेल्या स्वतःचे खेड्यात राहत आणि केव्हा केव्हा इतर रहिवाशांत मिसळून राहत; परंतु हत्यारे बाळगण्याचा आपला हक्क आहे असे ते सर्वजण समजत. आपले दुःख परिहारार्थ त्यांना सरकारची अपेक्षा नसते आणि न्यायाचे जे मुद्दे असतील त्यांचा निकाल आपले खुशीस वाटले त्याप्रमाणे ते करीत व ते निकाल बहुतेक तडजोडीचे नसून जुलमाचे असत. दिवाणी कामांचा न्याय मुख्य गिराशियाच्या खुशीवर अवलंबून असे व त्याचे नियम पद्धतीचे स्वरूप नव्हते. त्यांच्या समुदायापैकी जर एखाद्याने गुन्हा केला (आणि त्यांच्यात खून वारंवार होत असत) जर तो आपल्या नायकास शरण जात असे, आणि म्हणून नेहमी असे होत असे की, न्याय मिळाला नाही म्हणजे एका खुनाचा सूड

उगविण्याकरिता दुसरा खून होत असे. त्या नायकाने गुन्हेगारास जर शिक्षा केली तर बहुशः ती गुन्ह्याचे प्रमाणात नाही अशा दंडाची असावयाची. भाट किंवा चारण यास दिलेले वचन साधारणतः अवश्य पाळले जाई आणि गिराशीसुद्धा केव्हा केव्हा आपल्या तक्रारींचा निकाल पंचाकडे सोपवीत; या पद्धतीविषयी जास्त मजकूर पुढे लिहिण्यात येईल.

रास्ती महालामध्ये मराठ्यांचा अंमल चालत असे आणि तेथे न्याय कोणत्या रीतीने मिळत असे इकडे आपण आता वळू. या महालांचा प्रदेश विस्तार दिवसेंदिवस पण अधूनमधून वाढत असून त्याचेवर अंमलही कायम होत होता.

पहिल्याने ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की, गायकवाड सरकार कोणत्याही स्पष्ट व निश्चित कायद्याने बांधलेले नव्हते; तथापि देशाचे जे काही रीतिरिवाज होते त्यांचा त्यांना दाब असे व ते त्यास पाळावे लागत. मेजर वॉकर यांनी असे लिहिले आहे की, ''गुजरातेमध्ये निरनिराळ्या जातींच्या लिखित कायद्याप्रमाणे न्याय दिला जात नाही, तर ज्याच्या हातामध्ये स्थानिक अधिकार असे. त्याच्या खुशीप्रमाणे तो देण्यात येतो.'' तथापि असे म्हणण्यास काही हरकत नाही की मालमत्तेच्या दाव्यासंबंधात मग दाव्याचे पक्षकार सरकार आणि लोक असोत किंवा परस्पर लोक असोत, निकाल पक्षकारांच्या धर्मानुरोधाने हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे किंवा मुसलमानी शास्त्राप्रमाणे व्हावयास पाहिजे असे; परंतु दंगाधोपा चोरी किंवा खून अशा फौजदारी खटल्यामध्ये सरकारचा जसा हुकूम होईल त्याप्रमाणे शिक्षा व्हावयाची या दोन्ही विधानांमध्ये जो फरक दिसतो त्याचे स्पष्टीकरण करण्याचे काही विशेष प्रयोजन नाही; कारण दुसऱ्या विधानात जी पद्धत इष्ट असे समजत असे तिचा उल्लेख आहे व पहिले विधान बहुशः जी पद्धत चालू अमलात असे तिचा उल्लेख आहे.

जिल्ह्यामधून दिवाणी व फौजदारी खटल्यांचा न्याय करण्याचा अधिकार जमाबंदी वसुलाच्या इजारदाराच्या हाती असे तो मनुष्य मोठा असे आणि त्याने सरकारचे ठराविक पैसे भरले म्हणजे त्याचे जिल्ह्यात त्याला तेवढा वेळपर्यंत पूर्ण अधिकार असे आणि कित्येक वेळा तो आपले हाताखाली फौजफाटा ठेवी व त्याचे ताब्यात किल्ले व तटबंदीच्या जागा असत. मेजर वॉकरनी असे लिहिले आहे की, ''ज्या बाबींत त्रास होऊन फायद्याचा भाग नसे, तीत तो हयगय करी व त्यामुळे लोक हवालदिल व असंतुष्ट असत.

सरकारात पैसे भरावे लागत ते सव्याज पुन्हा पैदा करण्याचा त्याचा प्रयत्न असे; परंतु काही दिवस आपल्या प्रांताचा अधिकार मिळाला आहे तेथील व्यवस्था नीट ठेवण्याचा त्याचा मुख्यार्थ नसे; परंतु सर्व जमाबंदीची पद्धत मक्तेदारीच्या पायावर बसविलेली असल्यामुळे हे लक्षात येईल की, न्याय पद्धत जितकी सदोष होती तितकीच ती सुधारणेही कठीण होते, खंडेरावांनी पहिले प्रथम इजारदारीची पद्धत बदलून टाकून न्यायपद्धतीमध्ये सुधारणा करण्यास तोंड खुल्ले केले; परंतु या सुधारणेच्या अभावी दुसऱ्या चांगल्या गोष्टीप्रमाणे न्यायाचा चांगला अंमल हे मक्तेदारांची योग्य निवड करण्यावर अवलंबून असे.

दिवाणी खटल्यामध्ये पंच लोक निवाडा करून जी रक्कम देण्याचे ठरवितील त्यांच्या एक चतुर्थांशावर कमावीसदाराचा नेहमी हक्क असे आणि ती सर्व रक्कम तो स्वतः घेत असे आणि

त्याच्या तर्फेने निकाल होईल तो या एकचतुर्थांश भागाबद्दल जबाबदार असे. या खटल्याचे निकालापासून जी प्राप्ती झाली असे ती कमावीसदाराचा गुमास्ता आपले रोजनिशीत टिपीत असे व त्यापलीकडे त्या मुकदम्यासंबंधाने काही लेख नसे. कमावीसदार आपल्या जिल्ह्यांतून क्वचितच राहत असल्यामुळे तो नेहमी आपले कामावर एक कारकून नेमीत असे.

अशा तऱ्हेची ही सदोष आणि भारी खर्चाची न्यायाची व्यवस्था असल्यामुळे, जमीन जुमला, कर्ज किंवा ज्ञानी संबंधाने दिवाणी खटले लोक कमावीसदाराकडे बहुशः आणित नसत. कोर्टाच्या बाहेर कोणीतरी मध्यस्थामार्फत तोडून घेत, यात काही आश्चर्य नाही. पंचायत पद्धतीने लोकांस आपले खटले थोडक्या पैशात आणि साध्या रीतीने मिटविता येत.

फौजदारी खटल्यामध्ये कमावीसदार हाच न्यायाधीश असे; परंतु या कामात त्यांचे अधिकार मर्यादित होते कारण त्याने दंडामध्ये जर अतिरेक केला तर त्यास सरकारापुढे जबाब द्यावा लागे, आणि त्यास देहदंड करण्याचा अधिकार नसे. जुलुमाच्या खटल्यामध्ये रयत लोकांना मक्तेवाल्याचा विरुद्ध सरकाराकडे तक्रार करता येई आणि केव्हा केव्हा त्यांच्या तक्रारी ऐकल्याही जात असत. मराठे लोक फार क्रूर शिक्षा देत नसत; परंतु गुन्हा शोधून काढण्याच्या कामी ते जे कडक उपाय योजीत नेहमीच्या शिक्षा म्हणजे दंड, तुरुंग, केव्हा केव्हा पंगू करणे किंवा देशाबाहेर घालविणे, या असत आणि देहान्त शिक्षा क्वचित देण्यात येई. परंतु बहुतेक गुन्हे पैसे दिले म्हणजे माफ होत असत आणि दंडही एक महसुलाची बाब समजली जात असे. मेजर वॉकर यांच्यावेळी दिवाणी खटल्यामध्ये जो पक्षकार हारेल त्यास पुढील सहा तऱ्हांच्या जामीनकीपैकी एका तऱ्हेचा जामीन द्यावा लागत असे. १ला. फैल जामीन अथवा चालू जामीन म्हणजे चांगल्या वर्तणुकीकरिता जामिन; २ रा हाजीर जामिन म्हणजे स्वतः हजर राहण्याकरिता जामीन; ३रा. महाल जामीन म्हणजे पैसा, जामीन जुमला किंवा जमाबंदी करता जामीन; ४ था. लीला जामीन म्हणजे चांगल्या वागणुकीबद्दलचा नेहमीचा जामीन, ही जामीनकी पहिल्यापेक्षा अधिक कडक असे; ५ वा. अडजामीन म्हणजे जोडजामीनकी; आणि ६ वा. भाट जातीच्या एका इसमास गुन्हेगाराने कबूल केलेला करार तडीस नेण्याबद्दल, त्यांच्या वागणुकीबद्दल किंवा दुसऱ्या हमी पाळण्याबद्दल जामीनकी द्यावी लागत असे. या जामीनक्या विशेष विस्ताराने दिल्या आहेत, याचे कारण त्यांचा संस्थानच्या इतिहासाच्या काही भागाशी, अरबांनी दिलेल्या व ब्रिटिशांनी अंगावर घेतलेल्या बयानदारीशी व काठेवाडच्या राज्याबरोबर झालेल्या करार मदारांशी बराच संबंध आहे.

या न्यायपद्धतीत पद्धत हे नाव दिलेच तर त्यांचे शिरस्थानी कोणास जबाबदार नसणारा राजा असे. त्यांच्या पुढे देहांत शिक्षेचे खटले सादर होत व त्याच्याकडे कोणत्याही प्रकरणासंबंधाने शेवटला अर्ज करता येई व तो आपल्यास मदतनीस म्हणून वाटेल ते लोक पसंत करी.

या शतकाचे आरंभापर्यंत लोकांस न्याय कोणत्या पद्धतीवर मिळे ते थोडक्यात सांगितले. नंतर सुमारे वीस वर्षेपर्यंत संस्थानचा राज्यकारभार कमिशनमार्फत चालला होता आणि त्या कमिशनमध्ये ब्रिटिश रेसिडेंट हा अग्रगण्य सभासद असे. तेव्हा वरील न्याय पद्धत सुधारण्याकरिता कर्नल वॉकर आणि मेजर कार्न्याक यांनी काय गोष्टी केल्या. यांच्या मते असे की, सुधारणा करण्याचा काळ अजून आलेला नाही आणि म्हणून त्याने फक्त न्याय देण्याचे कामी जास्त लक्ष

देण्याची किती जरुरी आहे हे राज्यकारी पुरुषांचे मनांवर बिंबवून पंचायत पद्धतीस उत्तेजन दिले. मेजर कार्न्याकने याकामी थोडी धिटाई केली आणि तसे करण्यात त्यांचा हेतू काय होता, याचा विचार करण्यासारखे आहे. त्यांचा असा समज होता की पंचायतनाम्याने न्याय देण्याची जी पद्धत आहे ती त्या समाजाचे हक्क लेखी कायद्याने न ठरता असंख्य स्थानिक वहिवाटाने ठरले जात अशा मोठ्या आणि सुधारलेल्या समाजांत न्यायदृष्ट्या चालवयाची नाही म्हणून कोर्टे स्थापावी व त्यांस काही इष्ट अधिकार द्यावे आणि त्यांनी दिलेले निकाल दाखले पाडण्याकरिता नोंदवून ठेवावे. त्यांचे म्हणणे असे होते की, पंचायती ज्युरी नव्हे. पंच शपथेने बांधलेले नाही व त्यांचा कायद्यांच्या मुद्द्यांवरील निकालावर सुव्यवस्थित न्याय कोर्टाची फेरतपासणी नाही. त्यांनी खोटा निकाल दिला तर त्यांच्यावर कोणाचाही दोष नसे; शिवाय त्यांनी दिलेला निकाल कर गोळा करण्याच्या फुरसतीवर आणि सोयीवर अवलंबून राही. या कारणास्तव मेजर कार्न्याक यांनी असे लिहिले की, ''सरकारच्या मध्यस्थींशिवाय परस्पराच्या समजुतीने पक्षकारांनी आपला वाद पंचाकडे टाकला असे क्वचित होई.'' म्हणजे कर्नल वॉकरच्या उलट याला पंचायतीची कमावीसदाराच्या न्यायपद्धतीशी सांगड घालण्याची अगदीच आशा नव्हती. बडोद्यास कोतवालाची कचेरी म्हणून असे, त्या कचेरीतून जड फौजेदारी कामाशिवाय इतर सर्व कामे काढून ती एका मुख्य कोर्टास द्यावी, असे मेजर कार्न्याक यांनी सुचविले. कोतवाल कचेरी फौजदारी कोर्ट असल्यामुळे न्यायाधीश कोर्टाच्या ताब्यात असावे. या मुख्य कोर्टास रेसिडेंटाने फौजदारी व दिवाणीचे पूर्ण अधिकार द्यावे आणि त्या कोर्टाचे हुकुमाने पाळण्यात सरदार लोकांना अपमान वाटू नये म्हणून त्या कोर्टाचे वरिष्ठचे जागी गायकवाडांच्या कुटुंबापैकी एकास नेमण्यात यावे. फत्तेसिंग महाराजांच्या रेसिडेंसीमध्ये (स. १८६६) हे न्यायाधीश कोर्ट अमलात आले. मधून मधून त्याची नावे पुष्कळ बदलली व त्यात पुष्कळ फेरबदलही झाले; परंतु ते अजून चालू आहे आणि त्यांच्यापासूनच सर्व सुधारणा झाल्या.

संस्थानच्या न्यायपद्धतीवर मेजर कार्न्याक यांनी जो रिपोर्ट केला आहे, त्यांच्यातील एक वाक्य संबंध येथे देण्यासारखे आहे; कारण त्यांच्यातील खरेपणा वारंवार स्पष्ट झालेला आहे आणि त्याचे महत्त्व अजून कायम आहे. गायकवाडाचे कुटुंबापैकी एका गृहस्थास मुख्य कोर्टाचा अधिपती नेमिल्यामुळे महत्त्वाचे फौजदारी व इतर खटले महाराजाकडे नेण्याची जरुरी नाहीशी व्हावी हा रेसिडेन्टाचा उद्देश होता. नाहीतर आजपर्यंत हे खटले महाराजाकडे जात व त्याच्या निकालांत त्याच्या आवडत्या मंडळीचे किंवा दिवाणाचे अंग असे. रेसिडेन्टाने असे लिहिले आहे की, ''महाराज आपले राजधानीतून नेहमी बाहेर जातो अथवा त्याची काम करण्याची प्रवृत्ती नसते; परंतु या दोन्ही कारणांपेक्षा महाराजांची पदवी राजपदाचे वैभवाला न न्यायाच्या कृपायुक्त अमलाला असे जरूरच आहे की, खुद महाराजाने किंवा त्याच्या मुख्य सल्लागारांनी गुन्हेगाराचा न्याय करणे अथवा त्यास शिक्षा देणे हे करू नये. न्याय पद्धत होता होईल तितकी राजापासून अलिप्त असावी. कारण प्रसंगामुळे मनोविकारास प्रोत्साहन मिळते आणि त्या मनोविकाराप्रमाणे वागण्याचे जर त्याच्या मनात आले तर त्याच्या उन्नत पदामुळे व त्याच्या अमर्याद सत्तेमुळे चांगल्या उपदेशाने किंवा परिणामाच्या भीतीने त्यास आळा पडणे शक्य नाही.''

या स्थापिलेल्या वरिष्ठ कोर्टामध्ये मुख्याधिपत्य सरपंत मोरो काशीनाथ अम्बेकर यांजकडे दिले होते आणि त्यांच्या हाताखाली तिघे पंत म्हणजे न्यायाधीश व हिंदू आणि मुसलमान कायद्याच्या मुद्द्याचे निकालाकरिता एक शास्त्री व एक काजी असे. आरंभी ही नवी पद्धत अप्रिय होती; परंतु लवकरच तो लोकांस आवडू लागली. लवकरच लाचलुचपतीचा काही प्रकार झाल्यामुळे लोक कोर्टात जाणे टाळू लागले; परंतु अपराधी न्यायाधिशांना नोकरीतून दूर केले आणि नवीन ठेवलेल्यांचा पगार वाढविल्यामुळे त्यांची लाच खाण्याची इच्छा कमी झाली व कोर्ट पुन्हा लोकप्रिय झाले. सन १८६९ साली यशवंतराव बापूजी गोडबोले हे सरपंत झाले आणि वर सांगितलेल्या सुधारणा अमलात आल्या. न्यायाधीशी कोर्ट हेच पहिले आणि शेवटले असे. तेथे दिवाणी व फौजदारी सर्व खटले निकालात येत आणि जिल्ह्याच्या वहिवटदाराला अधिकार नसल्यामुळे जी उणीव वाटत होती ती याने भरून काढिली. कोर्टात यावेळी सरपंत आणि तीन पंत असल्यामुळे पंचायतनाम्याचे त्यास स्वरूप होते ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे. सर्व पंत आपली मते निरनिराळी लिहीत असत आणि ती एकत्र करून सरपंच हुजुरात[1] नेत असत. याचे पुढे कायकाय फेरफार झाले हे पाहण्याचे पूर्वी उत्तम तरुण रिजन्ट आणि तितकाच चांगला रेसिडेन्ट यांच्या मध्ये जो एक सतत मतभेद होता त्याचे दिग्दर्शन केले पाहिजे. फौजदारी खटल्यामध्ये जे खुनाचे खटले असत त्यातील अपराध्यास न्यायाधीश (शास्त्राप्रमाणे) देहान्ताची, शरीर छिन्नभिन्न करण्याची, लागोपाठ तुरुंगाची किंवा मोठ्या दंडाची शिक्षा करी आणि त्या शिक्षा रद्द करणे किंवा त्या थोड्याशा अमलात आणणे हे राजाच्या खुशीवर असे. फत्तेसिंग महाराज देहान्त शिक्षा देण्यास फार भीत असत आणि समाजाच्या फायद्याकरिता ही शिक्षा अमलात आणण्याविषयी रेसिडेन्ट साहेब त्यास आग्रह करीत असत. शरीर छिन्नभिन्न करण्यास फत्तेसिंगाची काही हरकत नव्हती; परंतु रेसिडेन्टास ही शिक्षा फार भयंकर वाटे.

संवत १८९० साली न्यायाधीशी कोर्टातील अध्यक्षाची जागा कमी केली आणि सर्व पंत काढून टाकिले. दिवाण वेणीराम आदितराव आणि भाऊ पुराणिक हे शिरस्तेदाराच्या मदतीने खटल्यांचा निकाल करीत. वेणीराम बडतर्फ होईपर्यंत अशी वस्तुस्थिती चालली आणि नंतर एका न्यायाधीशाची कोर्टाच्या शिरोभागी नेमणूक झाली. या अधिकाऱ्यास शास्त्री व काजी लोकांची जरी मदत होती तरी सरपंताच्या हाताखाली पंतांच्या नेमणुकी झाल्या नाहीत आणि गंगाधर शास्त्र्यांनी जो पंचायतनामाच्या नमुना उभारिला होता त्याची पुनरावृत्ती झाली नाही.

---

१. सरपंताची दरमहा नेमणूक ४०० रुपये होती. फिर्यादीचा खर्च ठरलेला असे. ५ पासून १००० रुपयेपर्यंत एका रुपयात आणा, १००० पासून ५००० रुपयांपर्यंत पाच टक्के प पुढे १०००० पर्यंत शेकडा चार टक्के. पुढे ४०००० पर्यंत शेकडा अडीच टक्के खर्च असे. जंगममत्तेच्या फिर्यादीची मुदत वीस वर्षांची होती. गुजरातच्या वहिवाटाचे टिपण करणे जरूर असे. भारी फौजदारी गुन्ह्यांचा हुजुरात दर आठवड्यास रिपोर्ट जात व त्यावर कोर्ट मार्फत हुकूम सुटत. लष्करी लोकांच्या नोकरीच्या किंवा हक्कांच्या तक्रारी खातेनिहाय निकालात येत; परंतु कर्जाच्या फिर्यादी कोर्टा मार्फत निकालात येत. मात्र त्यास प्रथम सरकारची संमती लागे. जमीन वसुलाचे खटले दिवाणापुढे जात. असे नियम १८१४त फत्तेसिंगाने घातले होते.

संवत १८९६ साली सयाजीराव महाराजांनी देवघर कचेरी सुरू केली, तेथे न्यायाधीशी कोर्टाने दिलेला निवाडा ज्यास पसंत नसेल त्याने महाराजांकडे तक्रार न्यावी. महाराज नजराणा हजर झाल्यावर देवघर कचेरीत त्याच्या खटल्याची पुन्हा चौकशी होण्यास संधी देत. या नवीन पद्धतीपासून होणारे परिणाम ठळक होते तेव्हा त्यांचे स्पष्टीकरण करण्याची जरूर नाही. परंतु सुदैवेकरून लवकरच म्हणजे संवत १९०२ साली, नजराणा दिल्यावर अपील मंजूर करण्याचा देवघर कचेरीचा अधिकार मिळाला होता तो तीजपासून काढून घेण्याचे कामी भाऊ तांबेकर याला यश आले. नंतर न्यायाधीशी कोर्टाला दिवाणी मदतनीस कोर्ट म्हणून त्या देवघर कचेरीचे रूपांतर केले आणि न्यायाधीशी कोर्टाकडे फौजदारी खटल्यांचा अधिकार ठेविला; परंतु या दोन्ही दिवाणी कोर्टावर एक सरन्यायाधीशी कोर्ट त्यानी स्थापिले आणि त्याचे पहिले अध्यक्ष स्वतः झाले.

दरकदार लोक मोठाले पगार खाऊन काम थोडे करीतात असे भाऊ तांबेकर यांस वाटत असे, म्हणून त्यांनी चार वर्षांनी म्हणजे संवत १९०७ साली दरकदार कचेरी नावाचे एक विशिष्ट कोर्ट स्थापिले आणि तेथे सदर न्यायाधीशी कोर्टात जे दिवाणी निवाडे झाले असतील त्याच्यावर अपील व्हावे असे केले. या कोर्टाचे मुख्य अधिकारी भीमाशंकरशास्त्री हे असून त्यांचे मदतनीस मुजुमदार, मुनसी, बापू मैराळशास्त्री, मोतीलाल सामळ पारख आणि नवसरीचे देसाई जमशेटजी हे होते. हे कोर्ट गणपतराव महाराजांचे कारकिर्दीचे अखेरपर्यंत चालले आणि नंतर गणेशपंत ओझ्यांनी असे सुचविले की, दरकदारांनी खटल्याचा निकाल करण्याऐवजी शिरस्तेदारांनी अपिलांची फेरतपासणी करून ती निकालाकरिता महाराजांपुढे सादर करावी. या व्यवस्थेस "विशिष्ट कोर्ट" हेच नाव ठेवण्यात आले होते.

संवत १९१७ साली खंडेराव महाराजांनी एक नवीन फौजदारी कोर्ट स्थापिले आणि भाऊ शिंदे यास त्याचे अध्यक्ष (फौजदारी कामदार) नेमिले. त्या कोर्टात मॅजिस्ट्रेटी आणि फौजदारी अशी दोन्ही कामे चालत आणि त्याचेमुळे न्यायाधीशी कोर्टाचे फौजदारी अधिकार काढून घेण्यात आले. पुढे लवकरच इजारदारी पद्धत मोडल्यावर प्रत्येक महालावर वहिवटदाराची नेमणूक झाली. वहिवटदाराचे हाताखाली जमाबंदी, दिवाणी आणि फौजदारी खटल्याकरिता असे तीन शिरस्तेदार दिले. मॅजिस्ट्रेटी काम आणि फौजदारी खटले याजवर फौजदारी कामाची देखरेख असे; वहिवाटदाराच्या कोर्टातील जमाबंदीची अपिले सरसुभ्याकडे जात असत; ही जागा नवीनच काढली होती आणि तेथे हरिबादादा यांची नेमणूक झाली होती (संवत १९२०). सरतेशेवटी दिवाणी खटल्यांतील अपिले सदर न्यायाधीशाकडे जाऊ लागली आणि सदर न्यायाधीशी कोर्ट आणि "विशिष्ट कोर्ट" याचे जागी सभासदांचे कोर्ट (मेंबर्स कोर्ट) झाल्यावर तिकडे जाऊ लागली. मेंबर्स कोर्टामध्ये माधवराव गंगाधर, सखराम बल्लाळ, नारो वामन आणि आबाशास्त्री हे होते.

यावरून असे दिसेल की, न्यायपद्धतीच्या निरनिराळ्या शाखा करण्याचे आणि सर्वत्र घोटाळा मोडून टाकून व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरू होते. शिवाय भाऊ शिंद्याच्या सूचनेवरून संवत १९२४ साली दिवाणी कोर्टाच्या तीन शाखा करून त्यास कमीजास्त अधिकार देण्यात आले

आणि त्यांच्यावर अपिले मेंबर कोर्टात जात असत. या सर्वांहूनही मोठा प्रयत्न म्हणजे खंडेराव महाराजांनी कायदे एके ठिकाणी करण्याचा प्रयत्न केला तो होय. संवत १९१७ साली (सन १८६१) पहिले सिव्हिल प्रोसीजर कोड तयार झाले; परंतु संवत १९२६ साली (सन १८७०) दुसरे तयार झाले आणि तेच हल्ली अमलात आहे. ते जुन्या सिव्हिल प्रोसीजर[१] कोडावर आणि सन १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन्सच्या अनुरोधाने रचिले होते.[२] रेव्हेन्यू कोड संवत १९२१ (सन १८६५) साली तयार करण्यात आले आणि तेही पुष्कळांशी बांबे रेग्युलेशन्सवर बसविले होते.

संवत १९२८ साली मल्हारराव महाराजांनी वरिष्ठ कोर्ट स्थापिले आणि तेथे दिवाणी, फौजदारी व जमाबंदीची वगैरे सर्व अपिले शेवटच्या निकालाकरिता जात.

हल्लीच्या कारकिर्दीमध्ये झाडून सुधारणा झाली आहे आणि ब्रिटिश सरकारच्या न्याय पद्धतीचा कित्ता होताहोईतो गिरविला जात आहे.

आतापर्यंत आपण नुसत्या मुख्य कोर्टाच्याच घटनेचा विचार केला आणि जिल्हा कोर्टाकडे मुळीच लक्ष दिलेले नाही. त्यांच्यामध्येही वेळोवेळी पुष्कळ फेरफार झाले होते आणि त्यांची पद्धत काय होती हे समजण्यास उत्तम मार्ग म्हटला म्हणजे एखाद्या कलमबंदीचा विचार केला म्हणजे पुरे आहे. आपण संवत १८८३ (सन १८२७) ची कलमबंदी घेऊ म्हणजे त्याचे मागील व पुढील पद्धती काय होत्या याचा अंदाज लागेल. ही कलमबंदी इजारदार अक्षरश; पाळीत नसत

---

१. सिव्हिल (दिवाणी) कोडाची काही कलमे सांगण्यासारखी आहेत. (१) ठरावांची अंमलबजावणी. व्यापाराची किंवा शेतकीची हत्यारे, अंगात घालावयाचे कपडे इत्यादी व ऋणकीच्या व त्याच्या कुटुंबाच्या आश्रयासाठी त्याचे घर किंवा घराचा भाग, शिवाय दोन महिने पुरेल इतके धान्य इतक्या रकमा अंमलबजावणीच्यावेळी विक्री किंवा टांचेपासून मुक्त होत्या. हुकमाप्रमाणे पैसे न देण्याबद्दल कैदेची शिक्षा तीन महिन्यांवर नव्हती. विशिष्ट प्रसंगी देणे २००० वर असेल तर सरकारच्या परवानगीने मात्र जास्त कैद देता येत होती. खालसातील लोक या कलमांची पसंतीच करतील. (२) काळ मुदत, वतन वृत्ती, पूर्वार्जित भत्ता, गहाणाची मुक्तता, स्त्रीधन, ठेवी व पोटगी या बाबतीच्या फिर्यादींना मुदतीचा प्रतिबंध नाही. स्थावरभत्ता हस्तगत करण्यासंबंधच्या फिर्यादीची मुदत २० वर्षे, करारनाम्यांच्या फिर्यादीची मुदत १२ वर्षे व खात्याच्या फिर्यादीची मुदत ६ वर्षे. हुकूमबजावणीची मुदत हक्काच्या स्वरूपान्वये फिर्यादीच्या मुदतीप्रमाणे साधारणपणे आहे. (३) व्याज, लेखी करार काही असला तरी कायदा बारा टक्क्यावर व्याज देववीत नाही व मुद्दलाच्या रकमेपेक्षा जास्त व्याजाची रक्कम कबूल करीत नाही. (४) मुलगे व वारस याजवरील जोखीम. हिंदू मुलगा बापाच्या कर्जाला सव्याज जोखीमदार होतो, मग त्याला बापाची मत्ता असो अगर नसो. त्याचप्रमाणे नातू मुद्दलापुरता जोखीमदार होय. इतर वारसांना वडिलार्जित मत्तेचा भाग मिळकतीप्रमाणे कर्जाचा हिस्सा सोसावा लागे. ही कलमे बहुतेक लोकांना रुचतील अशी आहेत.

२. फौजदारी कायद्याचे मासले - गोवधास देहान्त आहे. व्याभिचारास पाच रुपये दंड, जुलमाला तीस रुपये दंड किंवा सहा महिनेपर्यंत कैद किंवा दोन्हीची शिक्षा आहे. व्याभिचारिणी स्त्रिया दंडास पात्र समजलेल्या आहेत. राजा सर टी माधवरावच्या अमदानीत या कायद्यांत फेरफार झाला आहे. हे व आणखी नवीन शोधांनी फिरत आहे.

आणि सन १८२७ साली ब्रिटिश सरकाराकडून संस्थानास पुष्कळ सूचना आल्या, हे ध्यानात धरले पाहिजे.

दिवाणी खटल्यामध्ये वहिवाटदारास पंचाची मदत मिळत असे. या पंचाचा अध्यक्ष तो स्वतः निवडीत असे; त्या जिल्ह्यातील वंशपरंपरेचे जे अधिकारी असत ते एक सभासद निवडीत; लोक एक सभासद आणि वादी आणि प्रतिवादी प्रत्येकी एकेक निवडीत. साधारण फौजदारी खटल्यामध्ये वहिवटदारास (कमावीसदारास) खटला चालविण्याचा अधिकार असे; विशेष महत्त्वाच्या खटल्यात तो एक हजीर जामीन घेऊन, त्या खटल्याची सरकारांत सुनावणी करीत आणि पंचांची मदत लागे. सर्व खटले बुद्धी आणि धर्म यांच्या अनुरोधाने चालावयाचे आणि पंचांनी जाणून बुजून जर खोटा निकाल दिला, तर पुन्हा नवीन पंच नेमावयाचे आणि अपराधी पंचास दाव्यातील रकमेचा एकदशांश दंड करावयाचा. ही जी दंडाची रक्कम येई ती पांजरापोळाकडे (गुराढोराच्या संरक्षणाप्रीत्यर्थ) खर्च होई.

कोर्टाचे अधिकार काय होते हे सांगण्यापूर्वी संवत १८८१ साली जनरल स्टॅम्प ॲक्ट पसार झाला आणि तो सर्व कोर्टास लागू केला होता हे सांगणे जरूर आहे.

जंगम मालासंबंधी जे खटले असतील, त्यांस गंगाधर शास्त्र्यांनी घातलेली २० वर्षांची मुदत काढून १२ वर्षांनी घातली होती. स्थावर मिळकतीचे जे खटले असत त्यास वेळेची मुदत मुळीच नव्हती; परंतु मध्यस्थीने जर त्यांचा आपसांत निकाला झाला नाही तर वहिवटदार आपला स्वतःचा निकाल दाखल करून तो हुजुरांत पाठवीत असे.

या कलमबंदीप्रमाणे फौजदारी खटल्याचे पुढील भेद केले होतेः- १. चोरी आणि दरोडा, २. मोठी दुखापत; ३. अब्रू नुकसानी.

गुन्हेगार अपराधी ठरला तर त्याला पहिल्या अपराधाबद्दल त्याच्या मालमत्तेचा द्वादशांत दंड, दुसऱ्या अपराधाबद्दल दशांश आणि तिसऱ्या अपराधाबद्दल एकअष्टमांश दंड होत असे आणि गुन्हेगार हा दंड न देण्याइतका जर गरीब असेल तर त्यास वर्षांची किंवा सात वर्षांची कैदेची शिक्षा होऊन त्याचे पायात बेड्या पडत असत. काही गुन्ह्यांची विशेष चौकशी होत असे- उदाहरणार्थ धान्याची चोरी, अब्रुनुकसानी व व्याभिचार, कोणी एकादा शेवटल्या गुन्ह्याबद्दल अपराधी ठरला आणि त्याची ऐपत १०० रुपयांची असली तर त्यास ५ रु. दंड; १००० रुपयांपेक्षा कमी ऐपत असली तर ५० रु. दंड; जर १०००० रु. ऐपत असली तर १०० रु. दंड. व्याभिचाराबद्दल फार दंड म्हणजे ५०० रु. कोठे बंड झाले किंवा दंगा झाला तर त्याचा निकाला लावण्याचा अधिकार वहिवटदाराकडे असे; परंतु गुन्हेगार पकडल्यानंतर त्यांना हुजुरात पाठवावे लागत असत.

●●●

प्रकरण २५ वे

खंडेराव (पुढे चालू) – वसूल आणि जमाबंदी पद्धती

◘

अलिकडील वर्षांमध्ये राजा सर टी. माधवराव यांनी उघडपणे असे लिहून ठेविले आहे की, बडोदे सरकाराजवळ पुष्कळ संचित द्रव्य आहे. कर्ज काढल्याशिवाय सरकारचा खर्च चालण्यासारखी पद्धत घालून दिली आहे आणि बडोदे सरकारचे उत्पन्न काय व खर्च काय हे ज्यास समजणे इष्ट आहे त्यास समजण्यासारखी हिशेबाची पद्धत घालून दिली आहे. हे सर्व इतके नवीन आणि चमत्कारिक आहे की, त्याची व आजपर्यंतच्या संस्थानच्या वसुलाच्या इतिहासाच्या सांगड घालणे फार कठीण आहे. नेहमी कर्जात बुडून राहणे, ज्या अडचणी येतील त्या वारण्याकरिता नवे कर्ज काढून गाडा चालविणे, अशी आजपर्यंतची वहिवाट होती. वारंवार आपल्या कर्जाचे प्रदर्शन करणे, खरी वस्तुस्थिती झाकून ठेवणे ही आजपर्यंत पद्धत असे.[१]

ब्रिटिश कामदारांनी जे वर्णन दिलेले आहे त्याप्रमाणे आम्ही या इतिहासात चाललो आहो; त्यावरून असे दिसते की, या संस्थानास पेशव्यांचे पुष्कळ कर्ज द्यावयाचे होते; ब्रिटिश सरकार जामीन राहिलेल्या पेढीवाल्यांचेही कर्ज देणे होते आणि ब्रिटिश सरकारच्या मध्यस्थीने व मदतीने ते मुळीच कमी झाले नाही आणि पुढे पुष्कळ अडचणी आल्यामुळे संस्थानचे वारंवार दिवाळे वाजण्याची वेळ येत असे. या वर्णनाची दुसरी बाजू आहे; परंतु ती इतकी असंभवनीय दिसते की, ती देण्यासही आम्ही कचरतो. हिंदुस्थानात असे ऋणको आहेत की, आपले कर्ज फेडून टाकण्यास त्यास चांगली ऐपत असली तरी ते मोठमोठ्या व्याजाच्या रकमा भरीत असतात. लोकांनी आपली लपवून ठेवलेली मालमत्ता दाखवावी म्हणून या देशात भयंकर क्रूरतेच्या गोष्टी घडलेल्या आहेत; परंतु याचेहीपेक्षा विशेष गोष्ट ही की लोकांनी कित्येक वेळा दरोडेखोरांपासून आपला द्रव्य संचय लपवून ठेवण्याचे कामी विलक्षण छाती दाखविलेली आहे. ''पहिल्यापासून

१. बडोद्याच्या खर्चाच्या पद्धतीचे वर्णन करण्याकरिता वर्कच्या भाषणांतील उतारा एकदा दिलाच आहे. ''ही अशी पद्धत होती की, तीत जबरी वसूल काढणारा, लुच्चेगिरी खजिनदार, घोटाळा हिशेबनीस, गुप्तपणा लिहिणारा व विसराळूपणा ध्यानात ठेवणारा होता.''

गायकवाड सरकार चांगल्या स्थितीत असून, आपण कर्जात अगदी बुडून गेलो आहो असे लबाडीने पेशव्यास आणि ब्रिटिश सरकारास त्यांनी जर भासविले असते तर त्यात काय आहे. गायकवाड आपल्या स्वतःच्या मताप्रमाणे कसे वागले व आपल्यास एक कोटीपेक्षाही जास्त कर्ज असता मेजर कार्न्याक मुंबई सरकाराला, गायकवाड कर्जमुक्त झाले असे सांगत असता गायकवाड कसे मूग गिळून बसले होते व नंतर आपणास एक कोटीचे कर्ज आहे असे दाखविण्याची कशी तयारी करीत होते हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

त्याचप्रमाणे खाजगी पैशांतून ब्रिटिश सरकार ज्या पेढीवाल्यांना जामीन राहिले होते त्यांचे पैसे देण्यास सयाजीराव महाराज तयार झाले व त्यांनी किती सहज रीतीने त्यांच्याशी तडजोड केली, हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. गायकवाड आणि त्यांचे पेढीवाले यांचा परस्पर काय संबंध होता हे ब्रिटिश सरकाराला केव्हाही समजले नाही. पैशाची जरूर लागेल तसतसे पैसे कर्जाऊ काढणे दिवसेंदिवस जड जाऊ लागले; परंतु ती पद्धत सरकारास पसंत होती; ती बाहेरच्या मनुष्यास समजण्यासारखी नव्हती आणि त्या पद्धतीचा एक फायदा असा होता की, तिच्या योगाने संस्थानातला पैसा संस्थानातच राही. मोठमोठ्या पेढीवाल्यांची भरपाई करण्यात तीस वर्षे गेल्यावर ब्रिटिश सरकाराने मध्यस्थी करण्याची त्रासदायक, खर्चाची आणि अगदी निरुपयोगी पद्धत टाकून देण्याचा निश्चय केल्यावर सयाजीराव महाराजांचे काय कमी झाले? काही सुद्धा नाही. त्यांनी आपल्या कर्जदारांचे पैसे चुकते करून दिले आणि स्वतः हळूहळू मल्हाररावांची तळी उठण्याचे सुमारास संस्थानामध्ये तेच एक पोतदार होऊन बसले. सयाजीराव महाराज हे जितके लोभी होते म्हणून लोकांचा समज होता तितके ते लोभी नव्हते. ते हुषार राजकर्ते होते आणि आपल्या जमाबंदीची विल्हेवाट कशी लावावी यासंबंधी त्यांच्या कल्पना ब्रिटिश राजकर्त्यांच्या कल्पनांशी जमत नसल्या तरी त्या स्पष्ट होत्या आणि त्यापासून त्यांचे व त्यांच्या वंशजांचे जरी नुकसान झाले तरी त्या त्यांनी चांगल्या तऱ्हेने अमलात आणल्या.

पोतदार - थोडक्यात असे आहे; पूर्वीपासून अशी तऱ्हा होती की, गायकवाड सरकारला पैसे द्यावयाचे असले, मग ती रक्कम लहान असो किंवा मोठी असो, म्हणजे ते पेढीवाल्यापासून पैसे उसने घेत. सरकार रोख पैसे कधीही देत नसे; ते पेढीवर हुकूम चिठी देत; पेढीवाल्याला एखाद्या कमावीसदारावर किंवा एखाद्या महालाच्या इजारदारावर सरकार हुंडी, वरत किंवा चिठ्ठी देत आणि त्या हुंडीची तो इजारदार किंवा कमावीसदार आपली खंडणी देतेवेळी भरपाई करीत असे.

याप्रमाणे जे हुंडीवाले सरकारास रोख पैसे देत आणि कमावीसदारापासून आपली भरपाई करून घेत त्यास पोतदार म्हणत. आनंदरावाच्या वेळेपासून हे पोतदार पाच होते आणि सरकारास ज्या एकंदर रकमा लागत त्यापैकी अमक्याने अमका भाग द्यावयाचा असा प्रत्येकाचा हक्क होता. उदाहरणार्थ, आपण १ रुपया घेऊ तर त्यातले ५$^{१}/_{२}$ आणे देण्याचा हरिभक्तीचा हक्क, ५$^{१}/_{२}$ आणे देण्याचा गोपाळराव मैराळांचा हक्क आणि बाकी राहिलेली रक्कम देण्याचा (काठेवाडाचा) रतनजी कानदास, लाला मंगळ आणि सामळबेचर या तिघांचा हक्क. या कर्जावर व्याज या शतकाचे आरंभी १२ आणे होते ते पुढे ६ आण्यांच्यावर आले. सरकार जे पैसे देत

त्याच्यामध्ये दोन तऱ्हा असत. केव्हा सरकारची इच्छा असल्यास सरकार सर्व रक्कम एकदम देई; परंतु केव्हा सर्व रक्कम देत नसे. ही आश्चर्याची गोष्ट आहे, परंतु ती खरी आहे की प्रत्येक कर्जाऊ १०० रुपयांपैकी ३ रु. १२ आणे कापून घेतले जातात आणि या कपातीची व्यवस्था अशी असे की २ रु. पोतदारीबद्दल समजले जात असत, १ रु. ८ आ. व्याजाबद्दल आणि ४ आणे पेढीवाल्याच्या गुमास्त्याचा अगर एजंटाच्या प्राप्तीबद्दल, मग तो हयात असो अगर नसो. हा व्यवहार येथेच संपला नाही, हिशेब नक्की करताना ३ रु. १२ आ. पैकी पोतदार स्वतःकरिता २ रुपये ठेवीत असे आणि सरकारला १ रुपया १२ आणे परत देत; पोतदारास आणखी एक सवड दिली होती आणि ती मनोती घेण्याची. या शब्दाचा साधारण अर्थ असा आहे. अशी चाल आहे की, समजा धनकोने ऋणकोला एक १०० रुपये दिले, तर त्यापैकी तो स्वतःकरिता १ रु. काढून ठेवितो. पोतदाराची मनोती अशीच नसे; तो त्याने १०० रु. दिले म्हणजे सरकारच्या खाती १०१ रु. मांडी. ज्या मनुष्याला पैसे द्यावयाचे असतील त्याला संबंध रक्कम द्यावयाची असल्यास पोतदाराची सकट संबंध रकमेवर सहा आणे मिति आकारून तेवढील रक्कम सरकारच्या नावे मांडून सरकाराकडे तीन आणेप्रमाणे व्याज वळते करावयाचे.

सरकारची हुंडी आणि ज्या मनुष्यास पैसे दिले असतील त्याची पावती पोतदार कमावीसदाराकडे पाठवून देई आणि कमाविसदार पैशाचा सरकारात भरणा करण्यापूर्वी ती खर्च झालेली रक्कम पोतदारास देई.[१] कमावीसदाराचा सरकारात भरणा तिमाही होत असे आणि दरवेळी बहुतेक रक्कमवर सांगितल्याप्रमाणे पोतदाराजवळील वरताची भरपाई करण्यात जाई.

पेढ्या– मागे या इतिहासात आम्ही सांगितलेच आहे की, सयाजीराव महाराजांना कांटिंजंट फौजेला पगार नियमितपणाने द्यावा लागत असे व ब्रिटिश सरकाराने ज्या पेढ्यांना हमी दिली होती त्यांचे पैसे द्यावे लागले. तेव्हा त्यांच्या छातीवर त्यांनी पुष्कळ नव्या पेढ्या स्थापिल्या. त्यापैकी एकीला आपल्या मुलावरून गणेश ईश्वर नाव दिले असून, ती मुख्य होती. या पेढीचे पहिल्याप्रथम मुद्दल ५१/२ लाखांचे होते आणि ती आपली खासगी जिन्दगी आहे असे सयाजी महाराज समजत असत. अशा रीतीने मोठमोठे पेढीवाल्यांनी आजपर्यंत जो सर्व नफ्याचा जो मक्ता घेतला होता त्यात हे पोतदार बनून वाटेकरी झाले. खंडेराव महाराज याचेही पुढे गेले. संवत १९१५ साली त्यांनी कुबुत रुब्बाणी नावाची एक पेढी स्थापिली आणि त्यात २११/२ लाख मुद्दल घातले. त्यांनी ही रक्कम कशी उभारली हे सांगण्यासारखे आहे. गणेश ईश्वरातून ३१/४ लाख काढले; गुजरात बिनकवायती घोडेस्वाराची पलटण जेव्हा मोडली तेव्हा ब्रिटिश सरकाराने पैसे परत केले होते त्यापैकी ७ लाख आणि ५ लाख रुपयांचा नजराणा घेऊन हरिभक्ती यांचे घराण्यात एक मुलगा दत्तक घेण्याची परवानगी दिली. दुसऱ्या न लिहिलेल्या रकमांच्या बाबींपैकी एक मुख्य होती. सं. १९१९ साली महाराज साहेब कडी, पट्टण प्रांतात हिंडावयास गेले, या स्वारीचा खर्च मागविण्याकरिता नवसारी शिवाय इतर महालांवर एक कर बसविला आणि या कराच्या उत्पन्नापैकी ४१/४ लाख रुपये या पेढीत घातले. नवसारीला सुद्धा जेव्हा महाराज साहेब मुंबईस ड्यूक आफ एडिंबरो यास भेटण्यास गेले, त्यावेळी स्वारी नजराणा

१. १८२७ च्या कलमबंदीत मागील सगळया बाकीवर शेकडा नऊ टक्के व्याज द्यावे असे होते.

नावाचा कर द्यावा लागला. पोतदारीपासून या पेढीचे व्याजाचे उत्पन्न चार वर्षांत (संवत १९१५-१९) २३/४ लाख रुपये झाले; या रकमेची मूळ मुद्दलांत भर पडून हलके हलके २ लाखांपासून ५ लाखांपर्यंत उत्पन्न वाढले. मौलअली नावाची पेढी संवत १९१६ साली सुरू केली आणि तिचे मुद्दल २३ लाखांचे होते. चार वर्षांत त्या रकमेचे व्याज २१/२ लाख झाले आणि वरच्याप्रमाणे तितके मुद्दल वाढले; आणि त्याचे पोतदारीचे उत्पन्न २ लाखांपासून ७ किंवा ८ लाखांपर्यंत वाढले. पहिल्या अथवा गणेश ईश्वरच्या पेढीचा पोतदारीचा नफा (भाग) पहिल्याने ११ लाख होता तो शेवटी १४१/२ लाख झाला. याप्रमाणे मल्हारराव महाराज ज्यावेळी गादीवर आले त्यावेळी पूर्वीच्या पोतदारांची त्यांना जरूर नव्हती. वरील पेढ्यांतून त्यांचे काम भागे. सर टी. माधवरावांच्या हाती ज्यावेळी राज्यसूत्रे आली त्यावेळी त्यांनी ही पेढ्यांची पद्धत अगदी काढून टाकिली आणि वरील तीन पेढ्यांत त्यांना जो पैसा सापडला तो त्यांनी मुख्य तिजोरीत ठेविला.[१]

वर ज्या तीन संस्थानच्या (सरकारी) पेढ्या सांगितल्या त्यांच्या तोडीची नाही तरी त्यांच्या खालेखाल महबूब सुमानी नावाची पेढी खंडेराव महाराजांनी स्थापिली. महाल खंडाने देण्याची पद्धत बंद होऊन सरकार स्वतः त्यांची व्यवस्था पाहू लागले तेव्हा त्यांचे जे उत्पन्न येई ते कोणते तरी ठिकाणी ठेवण्याची जरूर पडल्यामुळे ही पेढी स्थापन करावी लागली. त्याच्यावर नव्या सरसुभ्याची देखरेख होती आणि कमावीसदाराच्याप्रमाणे हा कामदार पोतदारांच्या वरताचे पैसे देत असे.

कमावीसदार किंवा इजारदार - कमावीसदार म्हणजे संस्थानच्या वसुलाचा मक्तेदार होय. सरकार आपला वसूल स्वतः गोळा करीत नसे. त्याचा हक्क ते आपल्या सावकारास किंवा त्या हक्कांचा लिलाव होत असताना जो तो विकत घेईल, त्यास मिळत असे. तेव्हा सरकार चांगले किंवा वाईट हे ठरवायचे म्हणजे ते जसे चांगले कमावीसदार किंवा इजारदार पसंत करण्यात काळजी घेतील त्यावरून ठरवावयाचे आहे.

कारण या लोकांची सत्ता फार मोठी असे आणि त्यांच्यावरील देखरेख अगदीच थोडी असे. महालाचा कौलनामा फारच थोड्या वर्षांचा असून व्यवस्था चांगली ठेवण्यास किंवा सुधारण्यास त्यास काहीच उत्तेजन मिळत नसे. व्यापारी दृष्टीने पाहिले म्हणजे ते होता होईल तितका नफा काढीत. तेव्हा पुष्कळ नफा म्हणजे फार जुलूम याचा ते विचार करीत नसत. याबद्दल त्यांना दोषी धरता येणार नाही. या गोष्टीचा विचार आपण थोडा जास्त करू. चांगले सरकार असले आणि त्यास पैशाची टंचाई नसली तरच ते चांगला कमावीसदार निवडू शके, कारण पैशाची ओढाताण असली म्हणजे एखाद्या महालाबद्दल जो जास्त पैसे देण्यास तयार होई त्यासच, त्याच्या प्रामाणिकपणाचा किंवा किमतीचा विचार केल्याशिवाय, मक्ता देण्याची इच्छा होई किंवा एखादा

१. या पुस्तकाच्या शेवटच्या भागात सांगितले आहे की, १८७६-७७ सालात १६८ लाख शिल्लक होती. गेल्या तीन चार वर्षांत ही रक्कम शिलकेत पडली असे समजण्याचे कारण नाही. खरी गोष्ट अशी आहे की, मल्हारराव महाराजांना पदच्युत केले त्यावेळी संस्थानाचे दिवाळे निघाले ही समज होती ती खोटी होती. संस्थान व पेढीवाले याचे हिशेबांची रुजवात झाली तेव्हा संस्थानाचा वर पाया होता हे दृष्टोत्पत्तीस आले.

लोभी राजा असला म्हणजे थोड्या पैशांचा फुकार मंजूर करण्याकरिता तो त्या मक्तेदारापासून खासगी रीतीने लाच घेई आणि त्याच्या कौलनाम्याची मुदत वाढवीत असे व त्याने काही अंदाधुंदी केली तरी तिकडे दुर्लक्ष करी. मक्तेदारापासून लाच घेतल्याच्या योगाने राजा त्याच्या पुष्कळ ताब्यात जाई; म्हणजे धनी आपल्या नोकरास नमून असे. वाईट सरकार असले म्हणजे या मक्त्याचे पद्धतीचे अनिष्ट परिणाम एका प्रकाराने एकदम वाढत. राजा मक्तेवाल्याशी लबाडी करी; कौलनाम्याची मुदत संपण्याचे पूर्वीच महाल आपल्या ताब्यात घेऊन पुन्हा लिलावाला काढीत. अशा भावी भानगडीने आपले नुकसान होऊ नये म्हणून मक्तेदार वाटेल तशी खटपट करीत आणि राजाच्या लबाडीबद्दल ते रयतेचा सूड घेत. मक्तेदाराचा अधिकार फार मोठा असे हे आम्ही वर म्हटलेच आहे; कारण सर्व महाल त्याच्या ताब्यात असे. तो दिवाणी जज्ज असून मॅजिस्ट्रेटही असे; आणि जुन्याकाळी पुष्कळदा त्याच्या अमलात कडेकोड बंदीच्या जागा व ठाणी असत; पोलिसाची व पूर्वी मोठ्या लष्कराची व्यवस्था तोच करी. कर वगैरे गोळा करण्याचे काम उघडच त्याच्या हातात असे आणि कराची रक्कम ठरविणेही त्याचेकडेच असे. बाबाजी अप्पाजीच्या पूर्वी कमावीसदार लोकांवर कोणत्या तऱ्हेची देखरेख होती ते सांगता येत नाही; परंतु मुसलमानी अमलाच्या वेळी जशी एक नियमित तऱ्हेची देखरेख होती तशी यावेळी होती की नाही याबद्दल शंका आहे. रयत लोकांना सरकाराकडे अर्ज करण्याची मुभा असे आणि केव्हा केव्हा अपिले होत असत व त्यांची सुनावणी होत असे ही गोष्ट खरी; परंतु पैशाच्या टंचाईने गांजलेले किंवा निष्काळजी सरकार तिकडे लक्ष देत नसे.

जमिनीवरील कर : जागेच्या अभावामुळे आम्हास या विषयाचा ऊहापोह सविस्तरपणे करता येत नाही. तेव्हा कमावीसदार किंवा इजारदार यांना सोडून तो जे कर गोळा करीत असे तिकडे वळू. बडोदे संस्थानची उत्पन्नाची मुख्य बाबत म्हणजे जमिनीवरील कर आणि त्याची उगराणी बहुशः चार पद्धतीपैकी एका पद्धतीने होत असे. जुन्या काळी भागबटाई पद्धत असे आणि त्याप्रमाणे रयतलोक सर्व धान्य खळ्यावर जमा करीत; नंतर त्याचे भाग करीत, (केव्हा केव्हा धान्याची रोपे असताना शेतातल्या शेतात अजमास होई) आणि कर गोळा करणारा आपला भाग घेई. हा भाग एकतृतीयांशापासून एक द्वितीयांशापर्यंत असे. पावसाळ्यातील पीक उत्तम असे, हिवाळ्यातले मध्यम आणि पाटबंधाऱ्याच्या पाण्याची पीके फारच कमी असत. उगराणी कामदार आपला भाग कोठीत भरून ठेवून त्यास वाटेल त्यावेळी तो विकी; हल्ली त्याची विक्री सरकारी कामदाराकडून होते, जमिनीवरील कर वसूल करण्याची ही भागवटाई पद्धत अजून उखामंडळ आणि कोडीनारमधील काही खेडींशिवाय करून अमरेली प्रांतात व बडोदे सुभ्यांतील काही इनामी गावांत चालू आहे.

होळबंदी नावाची पद्धत हल्लीपेक्षा पूर्वी फार प्रचारात होती आणि ती तिलकवाडा, अंतापूर, विसानपूर आणि नवसारी प्रांतात सोनगडच्या बाजूला भिल्ल लोकांच्या प्रदेशात अजून चालू आहे. या पद्धतीप्रमाणे नांगरावर कर असे, म्हणजे जितके नांगर असतील त्या मानाने कर असावयाचा. एका वर्षामध्ये एक नांगर किंवा दोन बैल अमकी जमीन नांगरतील असे साधारण प्रमाण ठरविलेले असे. जेथे उत्पन्न थोडे अशा संस्थानच्या डोंगराळ व रानटी प्रदेशात होळबंदी पद्धत सुरू होती व आहे.

तिसऱ्या पद्धतीचे नाव नरवा; ती रयतवारी पद्धत असून काही कारणामुळे पेटलाद परगण्यात ती अजून चालू आहे. तो प्रांतर सर जॉन माल्कम यांनी जेव्हा तोडून घेतला होता त्यावेळी या पद्धतीची तपासणी होऊन ती रजिस्टर झाली होती. नरवा पद्धतीप्रमाणे सरकार दरसाल जी रक्कम मुकरर करीत असे ती रक्कम एकदम देण्यास पाटील किंवा भाटेदार (करारपत्रावर सही करणारा) आपल्यावर जबाबदारी घेत असे.[१]

काही गोष्टींमध्ये भागीदारीपद्धत नारवा पद्धतीप्रमाणे आहे. जमीन मोजून धारेबंदी ठरवून टाकावयाची आणि भागदार लोकांस वसुलाबद्दल जोखीमदार धरावयाचे. रयत लोकांशी वाटेल तशा अटी ठरविण्याची त्यांना परवानगी असे.

शेवटली विघोटाई नावाची एक पद्धत असे; परंतु जुन्याकाळी ती क्वचितच उपयोगात आणीत. हल्ली ती पुष्कळ ठिकाणी सुरू आहे. या पद्धतीप्रमाणे जमिनीचे मोजमाप, तिचे ठिकाण व तिचा कस पाहून तिच्यावरच कर आकारित असत.[२]

टेन्युअर (मुदत) - सरकारी किंवा खालसा जमिनीवर कर बसविण्याचे असे मुख्य प्रकार होते.[३] सरकारी जमीन आणि सरकारच्या ताब्यातील नाहीत अशा दुसऱ्या जमिनी यांच्यामध्ये आता आपल्यास भेद केला पाहिजे. संस्थानामधील सर्व जमिनीवर[४] राजाचा अधिकार असा

---

१. नरवादार म्हणजे ज्यांनी खेडी प्रथम स्थापिली, लागवडीला आणली व वसाहत केली व आपसात वाटून घेतली ते होत. त्यावेळची त्यांची रयत म्हणजे निव्वळ त्यांच्या खुशीवर राहणारी कुळे होती. त्याबद्दल बरोबर माहिती नाही; कारण नरवादार व त्याच्या लोकांत सरकार ढवळाढवळ करीत नाही. एका खेड्यात एकाहून जास्त नरवादार असल्यास प्रत्येक आपला सरकारी देण्याचा भाग आपल्या हद्दीच्या मत्तेप्रमाणे न देता खेडे वसले त्यावेळच्या आपल्या भागाच्या हिशेबाने देतो. एखाद्या नरवादाराने आपले सरकारी देणे न दिल्यास त्याचे देणे इतर नरवादार संप करून देऊन टाकतात.

२. बडोद्यात तीस वर्षांचा ठराव नाही. खंडेरावने जमिनीची पाहणी करून १० वर्षांनी जमीनपट्टी ठरवून टाकली. परंतु ही व्यवस्था सरकारानेही मानली नाही व लोकांनीही मानली नाही. कराचे दर फार असल्यामुळे १८७४ - ७५ त फिरवावे लागले. हल्लीचे दर ठरवले आहेत ते कोणत्याही मुदतीचे नाहीत. जमिनीची पाहणी होऊन कर ठरवण्याची पद्धत नवसारीत, मध्यभागात व काही खेडी सोडून उत्तर भागात चालू आहे.

३. दर पिकाप्रमाणे किंवा शेते राखण्याकरता केलेल्या दर उंचवट्याप्रमाणे करपट्टीचे दुसरे प्रकार मुळात सांगितले नाहीत. तसेच मेवासी खेड्याचाही उल्लेख केला नाही. मुख्य पुरुष स्वतंत्र असल्यामुळे सालोसाल तो सरकारास ठराविक रक्कम देऊ करतो व त्याच्या आपल्या लोकांशी व्यवहारात सरकार हात घालीत नाही.

४. आता बडोदे संस्थानच्या कर देणाऱ्या जमिनी सरकारच्या ताब्यातल्या अशा समजला जातात. शेतकरी सरकारच्या खुशीवर जमीन वापरतात व त्यांच्याकडे मालकीचा गंधही नसतो. परंतु नियमित कर देणाऱ्या रयतेशी सरकार ढवळाढवळ करत नाही. किंबहुना नियमित कर रयतेने दिला नसला किंवा देत नसला तरी सरकार जमिनीचा वापर त्याच्यापासून हिसकून घेत नाही. त्यांची अंगमत्तता विकतात, किंवा जंगममत्ता नसल्यास ते हप्त्या-हप्त्याने सरकार धारा देतात. शेतकऱ्याला खासगी कर्जासाठी हुसकून लावलेला जुन्याकाळचा दाखला नाही व जनावरे, खाण्याची सामग्री व हत्यारे दिवाणी सत्तीपासून मुक्त आहेत. किती सुखी शेतकरी हा! त्यास हा फायदा कळेल तर!

जरी साधारण समज असे तरी प्रत्येक खेड्यामध्ये अशा काही जमिनी असत की, त्यांच्यावर सरकारला आपले मालकीचा हक्क चालविता येत नसे.

सरकारी कामगारांना त्यांच्या मेहनतीबद्दल गावकऱ्यांकडून बलुते किंवा काही हक्क (काही एक लागवड करण्याचे) मिळत असत किंवा बलुते आणि हक्क असे दोन्ही मिळत असत. ही जी कामदारांकरिता जमीन राखून ठेवीत असत त्यास पसाइता म्हणत. वजिफा नावाच्या दुसऱ्या काही जमिनी असत; त्या मुसलमान लोकांना मोगलाईत मिळालेला असून त्या मराठ्यांनी त्यांच्याकडे तशाच ठेविल्या होत्या. बारखळी जमिनीमध्ये ब्राह्मण, भाट किंवा दुसऱ्या लोकांना देवादिकाकरिता किंवा दुसऱ्या धर्मादाय कृत्याकरिता दिलेल्या जामिनीचा समावेश होत असे. वाटा नावाच्या जमिनी गिराशिया लोकांच्या ताब्यात असत व त्या लोकांबद्दल येथे काही लिहिण्याची जरुरी नाही. शेवटी आणखी वेचाणिया आणि घराणिया नावाच्या जमिनी असत त्या सरकार पाटलांच्या मार्फत साफ विकून टाकीत किंवा गहाण ठेवीत. अशा प्रकारचे व्यवहार अडचणीच्या वेळी पुरेसे पैसे मिळण्याकरिता मंजूर होत असत. सरकारी जमीन विकण्याचा किंवा ती गहाण टाकण्याचा पाटलाचा हक्क सन १८२७ सालानंतर सरकाराने उघडपणे कबूल केला नव्हता. तेव्हा खंडेराव महाराजांनी बिन सरकारी जमिनीवर जेव्हा एकअष्टमांश इनाम कर बसविला त्याच्यानंतर पाटील लोकांनी ज्या जमिनी विकल्या किंवा गहाण टाकिल्या त्या मान्य केल्या नाहीत. ब्रिटिश सरकाराने घालून दिलेल्या कित्याप्रमाणे खंडेराव महाराजांनी जरी इनाम कर घेतला तरी त्या जमिनी परत घेता येतील असा समज आहे.

जमीन वसुलाची पद्धत-जमाबंदीच्या पद्धतीमध्ये आरंभापासून तो शेवटपर्यंत जे बारीक बारीक फेरबदल झाले ते साद्यंत रीतीने देणे दुरापास्त असल्यामुळे मुख्य मुद्दे दाखविण्याकरिता सन १८२७ साली जी कलमबंदी (त्या साली सयाजीराव महाराजांनी वहिवटदारास दिलेले हुकूम) चालू होती ती देण्याचा आम्ही विचार केला आहे. आम्ही वर जमिनीचे दोन भाग केले आहेत. एक सरकारची जमीन आणि दुसरी ज्या जमिनीवर सरकारचे नियमित हक्क आहेत ती. शिवाय रयतेनी आपणास किती पैसे द्यावयाचे हे त्यांच्याशी ठरविण्यास कमावीसदारास पूर्ण अधिकार होता हेही आम्ही मागे सांगितलेच आहे. सन १८२७ च्या कलमबंदीप्रमाणे खासगी नफ्याच्या नादी लागून सार्वजनिक उत्पन्नाचे नुकसान होऊ नये म्हणून रयत लोकांना सरकारी जमिनीची लागवड पहिल्या प्रथम करावी लागत असे आणि ही लागवडलेली सरकारी जमीन दुसऱ्या सर्व जमिनीपेक्षा निदान दुप्पट असे. एखाद्या खेड्यात सरकारी जमीन इतर जमिनीपेक्षा जर जास्त नसली तर गावकरी लोकांना शेजारच्या खेड्यास जाऊन ते आपले स्वतःच्या जमिनीस हात घालण्याच्या पूर्वी त्या खेड्यातील सरकारी जमीन त्यास लागवड करावी लागत असे. जुन्याकाळी कमावीसदार लोक रयत लोकांना इतक्या वाईट रीतीने वागवीत की, त्यास आपली शेते सोडावी लागत आणि दुसरे उदार शेतकरी त्यास काम देत ते पत्करावे लागे; त्यावेळी हल्लीप्रमाणे लागवडीची जमीनही फार वाढलेली नव्हती म्हणून काम करणारे लोकांची उणीव असे व जमिनीची मातबरी थोडी असे; तेव्हा १८२७ सालच्या कलमबंदीप्रमाणे कमावीसदाराला दुसऱ्या प्रांतातील रयत लोक आपले महालात घेण्याची जरी परवानगी असे, तरी त्यांनी

आपल्या कमावीसदाराची मागली सर्व बाकी फेडल्याशिवाय त्याला तसे करता येत नसे; त्याला आपल्या कारकिर्दीत या परक्या लोकांच्या जमिनीची हमी देत येत असे आणि त्याचे मागून येणारा कमावीसदार त्याने घातलेल्या अटी पाळण्यास बांधलेला नसे.

आता आपण शेतकरी लोकांचा, वंशपरंपरेने कामदार, लष्करी वर्ग आणि काही गोष्टींत सरकार यांच्याशी कसा संबंध होता हे पाहू.

वर सांगितलेच आहे की, शेतकऱ्याला सरकारचे देणे चार हप्त्यांनी द्यावे लागे आणि मागील जी बाकी राहिली असे त्यावर शेकडा ९ टाक्के व्याज आकारले जाई. सरकारने मंजुरी दिली नाही असा काही खर्च आला म्हणजे तो त्याच्याच खिशातून जाई. सार्वजनिक कामे फार नसत व मोठीही नसत; परंतु ती बांधण्याकरिता किंवा त्यांचीच दागडुजी करण्याकरिता रयत लोकांपासून मदत घेण्यास सरकार वहिवटदारास सांगे. खंडेराव महाराजांच्या आमदानीत अशा कामास सरकार रयत लोकांकडून खर्चाकरिता जेवढे पैसे जमत तितके आपण देत. वर्षाच्या अखेर आपल्याकडे किती रकमांचा उपाड झाला आणि आपण आपल्या आमदानीत किती खर्च केला याचा हिशेब वहिवटदार सरकारकडे पाठवी. हे सर्व हिशेब खरे असत असे कोणी समजू नये; कारण आपल्यास नफा फार थोडा झाला असे सरकारास दाखविण्यात प्रत्येक मक्तेवाल्याचा नफा (हेतू) असे. मक्त्याच्या पद्धतीचा ज्यास अनुभव होता अशा एका गृहस्थाच्या सांगण्याप्रमाणे हे लोक उपाड्याच्या रकमेपेक्षा खर्चाची रक्कम जास्त फुगवून सरकारास फसवित असत; कारण रयत लोकांपासून जुलूमाने जर फाजील कर घेतले, तर त्यास तक्रार करण्यास जागा राहून त्यांच्या खऱ्या गोष्टी बाहेर पडतील अशी त्यास धास्ती असे. ते काही असो. ही पद्धत चांगली समजण्याकरिता आम्ही दोन हिशेबांतील जमेच्या आणि खर्चाच्या रकमा नमुन्या दाखल खाली देतो.

संवत १८४३ साली संखेडा महालाच्या मक्तेदाराने पाठविलेला हिशेब

जमिनीच्या करापासून (पट्टी) ५६६१/१/१/२ रु. उत्पन्न झाले. शिवाय जमा, म्हणजे दुसऱ्या मार्गाने आलेले उत्पन्न जे ऐन जमा अथवा जमीन जमेपासून भिन्न असे - १६२०१ रु. ची झाली. या वर्षाची जी शिवाय जमा आहे त्यातील काही बाबी पुढे देण्यात येतील, त्यावरून असे ध्यानात येईल की, अर्थशास्त्रावर जी प्रमाणभूत मानलेली पुस्तके आहेत त्यांच्यामध्ये ज्या साधारण उत्पन्नाच्या बाबी सांगितल्या आहेत त्याच्यापेक्षा अगदी निराळ्या व चमत्कारिक बाबीपासून येथे पैसे काढीत असत. सायर जकात किंवा दस्तुरीचे उत्पन्न ८००० रु., दलाली किंवा व्यापारातील कर १२०० रु., कलालभट्टी वरील कराचे ६७६ रु., मापन म्हणजे वजनांची पारख १०० रु., बांगड्यावाल्यांनी दिलेले ५१ रु., हरी वेरा ४०४ रु., मेवाशी (त्रासदायक किंवा बंडखोर) खेड्यावरील कर ६७७ रु., मुखडी ४०२ रु., शेतातील पीक गोळा करण्याच्या हक्काबद्दल ५४ रु., साल वेरा (उन्हाळ्यातील पिकावर कर) ८३ रु., मोठमोठ्या लोकांना फळफळावळींच्या भेटी पाठविण्याकरिता ११ रु. न्यायकचेऱ्यांतील दंडाची

रक्कम २३०० रु., गवतावरील कर २५ रु., महसुली म्हणजे ज्याच्याकडून पैसे येणे असतील त्याचे घरी त्याच्या खर्चाने घोडेस्वार बसविण्याबद्दलचे उत्पन्न ६० रु., चोथ म्हणजे न्यायाचे कामास लागलेल्या खर्चाची चौथाई, त्याचे उत्पन्न १५० रु. सरकारास ज्यांनी कर्जाऊ पैसे दिलेले होते त्यांची भरपाई करताना काढून घेण्यात आलेले २९ रु. आंब्यावरील कराचे उत्पन्न ९०० रु,. बायकांच्या दुसऱ्या लग्नापासून ३० रु., आणि बिनवारशी (ज्याचेबद्दल मृत्युपत्र झालेले नाही अशा) मालमत्तेपासून १३० रु.

संवत १८९१ सालचा वडनगरचा मक्तेदाराचा हिशेब

जमिनीच्या कराचे उत्पन्न ४१०६२ रु. झाले; शिवाय जमा किंवा दुसऱ्या करांचे उत्पन्न १८९५० रु. प्रत्येक शेतास १ रु. याप्रमाणे जेव्हा सरकारी नोकर रात्रीचे वेळी शेते राखावयास जात त्यास हवालदारी म्हणत. त्याचे उत्पन्न ८८ रु. यात जमा आहे. त्याचप्रमाणे धनोजी नावाच्या चोरांच्या जातीवरील कराची १००० रु. ची बाबत याच्यामध्ये आहे. चोर व खुनी लोकांना गायकवाड सरकारांनी एक राहण्यास जागा करून दिली होती; ती अशा करारावर की त्यांनी गायकवाडी राज्यात त्रास देऊ नये आणि सरकारास सालीना काही एक रक्कम द्यावी आणि संवत १८९१ साली धनोजी लोकांवर चोरी करण्याकरिता महालाच्या बाहेर जाण्याबद्दल प्रत्येक १ रु. कर बसविला, त्याचे उत्पन्न ८५ रु. झाले. कैदी लोकांना तुरुंगातून सोडण्याबद्दल मक्तेदारास १० रु. मिळाले आणि करारपत्र करण्याचेवेळी कौल नजराणा म्हणून २०० रु. मिळाले. त्या साली कंदील पट्ट्याचे उत्पन्न १००० रु. झाले. जुन्या अमदानीत राजास पहिला मुलगा झाला किंवा राजघराण्यात एखादे लग्न झाले किंवा गायकवाडच्या मुलास काही धार्मिक संस्कार केले तर त्या वेळेपुरता एक कर बसविण्याची पद्धत असे; परंतु आता हा कर दर प्रसंगी न घेता कायमचाच करून टाकला आहे.

या दोन महालांच्या या ज्या उत्पन्नाच्या बाबी सांगितल्या त्यांचा खर्च कसा होत असे हे सांगण्यापूर्वी मक्तेवाला आणि वंशपरंपरेचे अधिकारी यांच्यामधील संबंधाचा आणि दुसऱ्या काही मुद्द्याचा आधी विचार करू.

सन १८२७ च्या कलमबंदीप्रमाणे वंशपरंपरेने चालत आलेली जी कामदारांची घराणी असत त्याच्यापैकी उत्तम माणसे देसाई, मुजुमदार, अमिन पाटील आणि पाटील वगैरे अधिकाराकरता कमावीसदाराने निवडून नेमावी. हे जुने गुजरातचे कामदार मक्तेवाल्यास त्याची कामे करण्याच्या किंवा वसूल गोळा करण्याच्या कामी प्रत्यक्ष मदत करीत नसत. परंतु काम करण्यास किंवा जमिनीची लागवड करण्यास, कर देण्यास आणि शांत रीतीने वागण्यास लोकांस लावून अप्रत्यक्ष रीतीने कमावीसदारास मदत करण्याचे त्याचे काम होते. फक्त मुझुमदारास मात्र हिशेब ठेवण्याचे म्हणजे महालाची जमाबंदी लिहिण्याचे काम असे. खरी गोष्ट अशी आहे की, इतर ठिकाणांप्रमाणे बडोदे संस्थानातही सरकारने जुन्या गावकरी पद्धतीत किंवा जिल्ह्याच्या फार जुन्याकाळच्या लोक नियमित राज्यपद्धतीत हात घातला नाही; फक्त एक पैसे गोळा करण्याची व लोकोपयोगी काही कामे करण्याची एक पद्धत त्यास जोडिली. या १८२७ च्या

कलमबंदीप्रमाणे या पिढीजाद कामदारांना किती पैसे दिले याचा तक्ता व त्यांच्या पावत्या मक्तेदारास सरकारात रुजू कराव्या लागत.

मक्तेदार आपले काम कारकून लोकांच्या मदतीने करी. ज्या भागाचा मक्ता घेतला असेल त्याला महाल म्हणत आणि त्याचे भाग पाडलेले असत; या प्रत्येक भागास ठाणे म्हणत आणि प्रत्येक ठाण्यात साधारण दहापासून पंधरा खेड्यांचा समावेश होत असे. उदाहरणार्थ- बडोदे महालात अठरा ठाणी असत. प्रत्येक ठाण्याची व्यवस्था सरकारी कामदाराकडून होत असे आणि त्यास ठाणेदार म्हणत आणि प्रत्येक खेड्यावर एक मेहता असे. पहिल्यास पगार दरमहा २० रुपये आणि दुसऱ्यास १५ रु. मिळे. ठाणेदाराचे काम जमाबंदीच्या वसुलावर देखरेख करण्याचे असे; मेहेत्यास तो वसूल स्वतः गोळा करावा लागे; त्या कामात त्यास वतनदार किंवा पिढीजाद अधिकारी, ज्यास तलाठी म्हणत आणि जो लोकांच्या वतीचा असे, त्याची मदत मिळे व यांचा त्याला धाकही असे. ठाणेदारांनी आपली कामे संवत १९१६ सालापर्यंत केली आणि तेव्हापासून खंडेराव महाराजाची नवीन जमाबंदी आणि पोलिस पद्धती चालू करण्यास आरंभ केला. त्यावेळेपर्यंत ते फौजदारी आणि मुलकी काम करीत असत; परंतु संवत १९१७-१९१८ साली आजपर्यंत दोन तीन कामदारांकडून होत असलेले फौजदारी काम करण्याकरिता एक फौजदार नेमण्यात आला व त्याचे मुलकी काम कमी केले. हे संवत १९२४-२५ सालापर्यंत चालले. नंतर ही दोन्ही कामे पुन्हा एकत्र करण्यात येऊन ठाणेदारावर सोपविण्यात आली. दंड करण्याचा त्यास थोडासा अधिकार देण्यात आला. पुष्कळ खेडी त्याच्या ताब्यात दिली आणि कारकुनाची मदतही मंजूर करण्यात आली.

लष्करी लोकांसारखेच महाली किंवा ठेवणुकी शिबंदीच्या मदतीने जिल्ह्याचे पोलिस काम होत असे; या लोकांस पूर्वी सांगितल्याप्रमाणे महसुलीच्या कामावर पाठविण्यात येत असे. सन १८२७ च्या कलमबंदीप्रमाणे भिल्ल, मेवाशी आणि गिराशी लोकांचे दंगे मोडण्याचे काम वहिवटदारांकडे असे. धरता आल्यास गुन्हेगारास पकडून हुजुरात चौकशीकरिता त्यास पाठवावयाचे; परंतु पोलीस लोकांच्या मदतीने जर त्यास पकडता आले नाही तर सरकार त्यास मदत देत असे. सन १८२७ च्या कलमबंदीप्रमाणे मक्तेदारास त्याच्याजवळ असलेल्या फौजेस शिक्षा करण्याचा अधिकार नव्हता; त्यांच्यापैकी कोणाबद्दल तो असंतुष्ट असला, तर त्याला आपली तक्रार निकालाकरिता सरकाराकडे करावी लागे.

सन १८२७ च्या कलमबंदीप्रमाणे मक्तेवाल्याने गिराशी, भाट आणि ब्राह्मण यांच्या अधिकारांत ढवळाढवळ करावयाची नाही. आणि देवस्थान, असामी नेमणुका, दरकदारांच्या दैती आणि शिबंदीचे पगार बरोबर चुकते केले पाहिजेत. हे सांगितल्यावर आता आपण वरील हिशेबात खर्चाच्या बाबती काय आहेत त्या पाहू.

खर्च

संवत १८४३ साली संखेडा महालाच्या मक्तेवाल्याने कारकुनांचा आणि शिबंदीचा खर्च अनुक्रमे ८०० रु. आणि ७६३ रु. घातला आहे. खेरीज मुशारा अथवा शिवाय रोजी यांचे

मध्ये सरकारी खर्च ७००० रु. आणि दरबार खर्च १३८ रु. येतो. यात त्यांच्या यजमानांना दिलेला नजराणा येतो. मंगळ पारखाला आणि दुसऱ्या काही लोकांना पोषाख दिले त्याला खर्च ६२६ रु. आणि ३० रु. आहेराबद्दल या मुख्य बाबी झाल्या. किरकोळ खर्चाबद्दल ५ रु. ४ आ., धर्मादायाबद्दल २२ रु. देवस्थानाबद्दल २ रु. आणि वर्षासनाबद्दल ३ रु.

संवत १८९१ सालच्या वडनगरच्या खर्चामध्ये धार्मिक आणि धर्मार्थ खर्च त्या पवित्र महालाला शोभेसा फार आहे. १२१ रु. देवस्थानाकरिता; २०० रु. धर्मादाय, ६१४ रु. वर्षासन, ५० रु. धर्मादाय, ५५० रु. श्रावण महिन्यातील अनुष्ठानाप्रीत्यर्थ, २०० रु. भोजन खर्च, १०० रु. शिधा खर्च , १०७५ रु. दरकदारांच्या दैती, आणि ४०० रु. सरकार मुखडी. या उदाहरणात मक्तेवाला वतन किंवा पगार म्हणून ७०० रु. घेई, कारकून खात्याचा खर्च ७०० रु. यापेक्षा आणि अडीनडीचा खर्च ३० रु. पेक्षा जास्त नसे. शिबंदीचा खर्च मात्र २५०० रु. होता. हा भाग वाढेल ही भीती खरी. तथापि, जुन्या पद्धतीप्रमाणे एका वर्षाचे (सं.१८९६) उत्पन्न व खर्च आम्ही देतो म्हणजे त्यामध्ये व आताच्या पद्धतीतील फरक नीट समजेल.

वर्षाअखेर शिल्लक ५,४०,००० रु. होती. एकंदर उत्पन्न ५७,७९,००० रु. होते व कर्ज १,६४,९८,००० रु. केलेले होते.

प्रकरण १५ मध्ये गतवर्षीचे कर्ज फेडण्याची पद्धत सांगितलीच आहे. तेव्हा आता यात आश्चर्य काही उरले नाही की, इतक्या भयंकर रकमेची उत्पन्नात भर पडली होती तरी तितक्याच भयंकर रकमा त्या त्या वर्षाच्या खर्चात पडल्या होत्या. वेडेवाकडे हिशेब व पोतदारी पद्धत मात्र लक्षात ठेवली पाहिजे.

एकंदर कर्ज १,५२,४९,००० फेडण्यात आले, संस्थानचा खर्च ५९,७८,००० रुपये झाले. खर्चाचा तपशील येणे प्रमाणे होयः

१	सैन्य	रु.
	पागा	१०,१६,०००
	शिलेदार	११,७५,०००
	शिबंदी	७,२६,०००
२	विशेष लष्करी खर्च	
	किल्ले	७७,०००
	घोड्याचे सामान	१६,०००
	लढाईत झालेल्या जखमा व गेलेले घोड्यांबद्दल बक्षीस	३३,०००
	कंटिंजंट फोर्सचे सुभे	२७,०००
३	महालांचा राज्यकारभार	८,८४,०००

४	विशेष दिवाणी खर्च इ.	
	वकिलांचा पुण्याचा खर्च	३,०००
	स्टँप ऑफिस	८००
	सावकार खर्च	२,२६,५००
	इजारदारांना परत केलेल्या रकमा	१०,०००
५	दुमाल गाव व इनाम गाव	
	गिराशे	३,९००
६	राज खर्च	
	सरकार खर्च	५६,०००
	राजघराण्याचा घरखर्च	१,५०,०००
	हत्ती, गाड्या, तबेले	५,५९,०००
	मेहेरबानीतली मंडळी व गुप्तमंत्री	२,९६,०००
	शिपाई वगैरे	४,३००
	पेन्शनर व इतर आश्रित	११,०००
	घरचे नोकर	३१,०००
	राजवाड्यातील दूधवाले व भाजीविक्रेते	३१,०००
	राजवाड्यातील खोतखर्च व कापड विकत घेण्यात नुकसान वगैरे	८,०००
	सणवार	३,०००
	शिमग्यातले नाच	१६,०००
	लग्नखर्च	१०,२५०
	तंबू व सतरंजी खाते	१,५००
	धर्मादाय	४४,०००
७	सार्वजनिक कामे, परदेशींच्या भेटी वगैरे फाजील खर्च	२,८६,०००
८	किरकोळ बाबी	११,०००

१८७६-७७ चे उत्पन्न व खर्च बरोबर टिपलेला नाही असे म्हणतात. तथापि, जमीन महसूल ८९,०१,६१५ रु. एकंदर वसूल, १,२४,७८,८०२ रु. होता आणि खर्च वीस लाखांपेक्षा जास्त किमती होता.

वाड्यातील खर्च १६ लाखाने कमी होता. जुन्या हिशेबाच्या मानाने हा खर्च जरी फाजील दिसतो तसी हे ध्यानात ठेवावे की, महाराजांपाशी आता दुसरे उत्पन्नाचे मार्ग होते. खंडेरावाच्या वेळी वाड्याचा खर्च ३० लाखांवर होता.

सैन्याचा खर्च आता ३४,८७,९२४ रुपये आहे.

दिवाणी खर्च फार वाढला आहे. हुजुरात खाते, जमीन महसूल खाते, दिवाणी खाती, न्यायाची खाती, पोलिस व तुरुंग खाती मिळून २३ ½ लाखांपेक्षा कमी खर्च लागत नाही. सार्वजनिक खाते, शिक्षण, औषध खाते आणि म्युनिसिपालिटी मिळून ९ लाखांचा खर्च आहे.

आज पेन्शनर, असामदार, नेमणूकदार यांचा भार ७,३५,५०० रु. आहे आणि धार्मिक अथवा धर्म खात्यांचा खर्च ४,६८,२०० रु. आहे.

शेवटी दुमाल गाव व इनाम गाव खेडी जुन्या हिशेबात खर्चाच्या सदराखाली येत, ते तसे येऊ नये होते. कारण उत्पन्न न होणाऱ्या गावात ती मोडत. इनाम गावे म्हणजे लोकांना अनियंत्रितपणाने बक्षिसादाखल दिलेले गाव होते व दुमालगाव म्हणजे लष्करी अधिकाऱ्यांना लष्कराच्या खर्चाबद्दल दिलेले गाव होते.

●●●

प्रकरण २६ वे

बडोद्याचे नाणे – संस्थानचे काही हक्क – ब्राह्मण – खंडेराव महाराजांच्या कारकिर्दीचा शेवट

या भागामध्ये गायकवाडाच्या हक्कासंबंधाने लिहावयाचे आहे. तहामुळे, भूपृष्ठस्थितिमानामुळे व ब्रिटिश सरकाराशी असलेल्या संबंधामुळे गायकवाडाच्या काही हक्कावर जे परिणाम झाले आहेत त्याजबद्दल थोडीशी या भागात टीका करण्याचा आमचा इरादा आहे.

टांकसाळ आणि नाणे – फार पुरातन काळापासून गायकवाड सरकारने आपले स्वतःचे नाणे पाडलेले आहे. रुप्याच्या नाण्याला नवा शियाशाई (बाबाशाई?) रुपया म्हणतात आणि तांब्याच्या नाण्याला बडोदी (?) पैसा म्हणतात. बडोद्याच्या रुपयामध्ये ब्रिटिश (कलदार) रुपयापेक्षा भेसळ कमी असते; परंतु त्याचे वजन कमी असल्यामुळे कलदार रुपयामध्ये त्याची किंमत १३ आणे ११$^{१}/_{२}$ पै असते, ही किंमत वटावाच्या भावाप्रमाणे कमी जास्ती होते. रुप्याचे १०० रुपये पाडण्याचा भाव ४ आणे आहे अथवा होता आणि हे नाणे सर्व बडोदे संस्थानात आणि मही आणि रेवाकांठ्यात चालत असल्यामुळे सरकारास दरसाल ५० हजार रुपयांचा नफा होत असे.

सर्व बडोदे संस्थानात बाबाशाई रुपया गेल्या वर्षापर्यंत चालत असे, असे म्हणणे जास्त बरोबर होईल. कारण नुकताच असा हुकूम सुटला आहे की, कलदार रुपयाचा कोणी भरणा केल्यास सरकाराने तो कबूल करावा आणि बडोदे संस्थानच्या काही भागात सरकारी नोकरांना पगार कलदार रुपयांत द्यावा. गायकवाड सरकारने आपले नाणे सुधारले तर ते त्यास आपल्या सर्व राज्यात चालविता येईल असे म्हणण्यास काही हरकत नाही.

बाबाशाई नाण्यापासून इतके नुकसान आहे की, ते चालू राहू देणे संभवनीय नाही. टांकसाळ अतिशय ओबडधोबड असून, त्यात यांत्रिक योजना मुळीच नाही. जमिनीत एक मोठा खड्डा खणून त्यास वीस हजार तोळे रुपे राहील एवढे एक मातीचे भांडे ठेविले असते. या भांड्यात रुपे आणि प्रमाणाने पाहिजे तितके तांबे टाकिल्यावर ते मिश्रण पातळ होईपर्यंत त्यास आंच लाविवात आणि त्यास उष्णतेने व आत सवागी टाकून शुद्ध होऊ देतात. नंतर ते पातळ मिश्रण मोठाल्या पळ्यांनी लांब पातळ पोकळ मुशीत ओततात; प्रत्येक मुशीत दहापासून बारा तोळ्यापर्यंत

रुपे असते. काही वेळाने निवाल्या नंतर १०० पासून ५०० तोळ्यापर्यंत या कांबी सोनाराच्या स्वाधीन करतात. तो त्याचे २९ वाल आणि १ गुंज इतक्या वजनाचे लहान लहान तुकडे करितो; नंतर ते साफ करून त्यावर हाताने शिक्के मारतात. असे नाणे वापरण्यापासून काय परिणाम होतात हे सांगणे फार सोपे आहे. नाण्यावरील ठसा कधीही पुरता नसतो आणि तो इतका ओबडधोबड असतो की, तसा बनावट करण्याचे काम फारच सोपे आहे. त्या नाण्यास काही आकार नसतो व भोवताली कंगोरे नसतात आणि म्हणून त्याचे जर तुकडे कापून घेतले तर ते ओळखणे अशक्य असते. हा रुपया इतका जाड असतो की त्याचा आवाज निघत नाही आणि नेहमीच्या वापरण्याने तो झिजतो. रुपया काढला त्यावेळी त्याचे वजन जर कमी असले, तर तितक्या वजनाचा एक तुकडा त्याच्यावर मारतात आणि तो पुढे गळून जाण्याचा पुष्कळ संभव असतो. बाबाशाई आणि कलदार रुपायामधील भाव नेहमी चलित असतो आणि त्यांचे परस्पर प्रमाण साधारणपणे १०० कलदाराला ११२ पासून १२० बाबाशाई असे असते आणि म्हणून जेव्हा रुपये वटवायचे असतील किंवा मोठ्या रकमेचा व्यवहार व्हावयाचा असतो तेव्हा नाणे तपासण्यास व त्यांची किंमत करण्यास सराफाची जरूर लागते आणि त्याबद्दल त्यास मोठा मोबदला द्यावा लागतो.

संस्थानच्या नाण्याशिवाय सर्व संस्थानांत कलदार नाणेही पुष्कळ चालते. नवसारी प्रांतात भडोची नाणे चाले आणि पालनपूर आणि सर्व कडी प्रांतात (देहगाव आणि आंतरसुंभा येथे मात्र अनुक्रमे कलदार आणि बाबाशाई नाणे चालते) शिक्कई नाणे आहे. एका प्रकारच्या नाण्याची किती आवश्यकता आहे हे दाखविण्यास यावरील दोन नाण्यांनी त्रोटक हकीकत दिली म्हणजे पुरे आहे.

मोगल बादशाईच्या उतरत्या काळात भडोच येथील टांकसाळ स्थापण्यात आली. तेथील नबाब बादशहाचा नावाचा ताबेदार होता आणि त्याने सन १७४८ साली ती टांकसाळ सुरू केली असे म्हणतात. त्यावेळी तेथे जे नाणे पाडण्यात येईल ते कामापुरते शुद्ध असे; परंतु पुढे शिद्यांनी भडोच घेतले आणि त्यांच्या अमलामध्ये भेसळीचे प्रमाण फारच वाढले. सन १८६७-६८ सालापर्यंत साधारण १०० भडोची रुपयाची किंमत कलदार ९५ होत असे आणि त्या साली सुरतच्या कलेक्टरने सारख्या भावाने पुष्कळ रुपये खरेदी करून ते मुंबई सरकाराकरिता पाठवून दिले. नवसारी प्रांतामध्ये भडोची रुपाया गेल्यासालापर्यंत चालत असे; परंतु आता व्यापारी लोक ते रुपये फार स्वस्त भावने विकत घेऊन सुरतला दागिने बनविण्याकरिता पाठवून देतात. भडोची रुपाया बंद केल्यामुळे दुष्काळाच्या साली गरीब लोकांचे फार नुकसान झाले; कारण त्यांना बंद केलेले नाणे विकून कलदार रुपये विकत घ्यावे लागले; परंतु भडोच येथील टांकसाळ ते शहर ब्रिटिश सरकारच्या अमलात आल्यापासून बंद आहे आणि त्यामुळे बाजारातील गरज भागविण्याकरिता बनावट रुपये यांचा फार सुकाळ झाला असला पाहिजे. या गोष्टी लक्षात ठेविल्या म्हणजे भडोची नाण्याबद्दल कलदार नाणे चालू केल्यापासून काय फायदे आहेत हे उघड होईल.

शिक्कई रुपये अहमदाबाद व त्याच्या आसपासच्या भागात आतापर्यंत चालू होते; परंतु सन १८५० साली कलेक्टरने ते बंद केले. हे नाणे मोगल बादशाईच्या अमलापासून सुरू झाले हे

उघड आहे आणि गुजरातच्या जुन्या राजधानीमध्ये टांकसाळ या नावाची इमारत अजून आहे; तेथे आता शेठाणी हरकुवरबाई यांची मुलीची शाळा आहे. जुन्याकाळी शिक्कई रुपयाची किंमत सतरा आणे असे; परंतु आता त्याचा भाव जरी नेहमी बदलतो तरी त्याची किंमत कमी येते आणि १०० शिक्कई रुपयाबद्दल ९६ पासून ९९ १/२ पर्यंत कलदार रुपये येतात. लोकांची अशी काही चमत्कारिक समजूत आहे की, साठवून ठेवण्याच्या कामाकरिता शिक्कई रुपये चांगले. कडी प्रांतातील वडनगर आणि विसनगर येथील शिक्कई रुपये इतके वाईट नाहीत आणि त्यास बाहेर चलाई म्हणजे बाहेर गावी चालविण्यास योग्य असे म्हणतात; परंतु पाटण महालातील रुपयाचे ठसे गेलेले आणि तोडलेले सुद्धा आहेत.

इतक्या प्रकारच्या टांकसाळीपासून काय नुकसान होत असे हे सांगण्यास बडोदे संस्थानच्या मागील इतिहासातले एक उदाहरण पुरे आहे. सन १८०९ साली वखत आणि खुशालचंद यांच्या पेढीकडे शिक्कई रुपयांच्या टांकसाळीची चार किंवा पाच वर्षे व्यवस्था होती आणि त्यांनी त्या नाण्याची खरी किंमत फारच कमी केली होती. तथापि, बाजारामध्ये बडोदी शुद्ध रुपयापेक्षा त्याची तेजी होती; याचा परिणाम असा झाला की, व्यापारी लोक बडोद्याचा पैसा विकत घेऊन तो अहमदाबादेस रुपे म्हणून पाठवित आणि त्यामुळे त्यांना शेकडा ११/२ टक्का नफा पडे. याचा बोजा बडोदे सरकारावर इतका पडला की, दीड लाख रुपयांच्या हुंड्या पटेनात आणि लष्कराचा चालू खर्च ४ १/२ टक्के तोटा खाल्याशिवाय भागेना. बडोदे येथील टांकसाळही दोन वर्षे बंद पडली होती. त्यामुळे गायकवाड सरकाराच्यावतीने मुंबई सरकाराजवळ कॅप्टन कार्न्याक यांस नाण्याचे कर्ज मागावे लागले आणि त्याचवेळी संस्थानास पुष्कळ कर्ज असल्यामुळे त्यास २ १/२ लाख रुपयाची रक्कम गोळा करण्यास फार अडचण पडली. भडोची नाण्याच्या विरुद्ध तक्रार करण्याला यावेळी कॅप्टन कार्न्याक यास कारण सापडले आणि बडोदे, अहमदाबाद आणि पेटलाद येथील टांकसाळी फार अव्यवस्थित स्थितीत आहेत असे त्यांनी लिहिले.

ब्राह्मण – हा इतिहास फार त्रोटक आहे आणि ज्याअर्थी तो हल्लीच्या वेळेपर्यंत आणिला आहे त्याअर्थी त्यांच्यात काही मुद्द्याचे दिग्दर्शन अगदी थोडक्यात असणे किंवा काही मुद्दे मुळीच गाळून टाकिणे हे साहजिकच आहे. ज्याप्रमाणे हा देश काबीज केल्याबद्दलचे रिकॉर्डांत काठेवाड शिवायकरून दुसऱ्या मांडलिक संस्थानचा उल्लेख नाही किंवा असला तर फार क्वचित आहे त्याचप्रमाणे महाराज, रेसिडेंट, दिवाण, सरदार, संस्थानचे पेढीवाले आणि जमाबंदीचे मक्तेवाले वगैरे राजकारणी निरनिराळे वर्ग वाचकांपुढे आणण्यात मराठे ब्राह्मणांची सत्ता व त्यांचे वजन याचे मानाने त्यांच्याकडे लक्ष कमी गेल्यास विशेष आश्चर्य नाही. हा मार्ग गाळला आहे हे उघड आहे; परंतु त्यांचे संबंधाने सविस्तरपणे लिहिण्याच्या अडचणी आहेत हेही लपवता येत नाही.

बडोदे संस्थानचा इतिहास सूक्ष्म रीतीने वाचणाऱ्याच्या हे चटकन लक्षात आले असले की, ज्या घराण्याकडून बडोदे सरकाराला आप्पाजी, बाबाजी आप्पाजी, सिताराम आणि दोघे विठ्ठलराव या सारखे बलाढ्य सरदार मिळाले ते दिवाणाचे मोठे घराणे परभू जातीचे होते. त्याचप्रमाणे हेही त्यांचे लक्षात आले असेल की गोविंदारावाचे पुणे मुकामी पुष्कळ दिवस राहाणे

झाल्यावर त्यांनी हे घराणे गुजरातेत आणिले. याचवेळी गायकवाड पुष्कळ दिवस झगडा करून पेशव्यांस शरण गेले; तेव्हा ब्राह्मणाचे वजन फार होते आणि पेशव्याच्या दरबारांतून बडोद्यास पुष्कळ ब्राह्मण सरदारांचा पुरवठा झाला व ब्राह्मण लोकाचे राजकीय वजन तोलून धरण्याकरिता पुष्कळ परभू लोक आणण्याचा गायकवाडांनी प्रयत्न केल्याबद्दलचा पुरावा सापडत नाही; परंतु मराठे ब्राह्मणाच्या विरुद्धपक्षाचे शिरोभागी गायकवाड होते ही गोष्ट लक्षात घेतली आणि त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांनी प्रत्येक पागेत, प्रत्येक किल्ल्यात आणि त्यांचे अमलातील प्रत्येक जिल्ह्यात ब्राह्मणाशेजारी एक परभू लोक ठेवण्याची पद्धत होती हे ध्यानात आणले म्हणजे हे होणे रास्त आहे असे वाटेल; परंतु ब्राह्मण लोकांचे वर्चस्व थोडेसे कमी करण्याकरिता परभू लोकांचा गायकवाडांनी उपयोग केला किंवा ब्राह्मण लोकांच्या हातामध्ये राज्याची सर्व व्यवस्था ठेविली असे आम्ही खात्रीलायक काहीच म्हणणार नाही. मराठे ब्राह्मणाच्या उत्कर्षाचा ज्यांनी अभ्यास केला असेल त्याच्याकडे या प्रश्नाचा विचार करण्याचे सोपवून आम्ही एवढेच विधान करतो की बडोद्याच्या इतिहासाचे उत्तर भागात ब्राह्मणांची सत्ता पुष्कळ होती.

वेणीराम आदितराम यांच्याशिवायकरून कोणत्याही नागर ब्राह्मणास गायकवाडापासून दिवाणगिरीची वस्त्रे मिळाली नाहीत; याचे एक साधे कारण असे दिसते की, मराठे लोक प्रबळ असल्या कारणाने त्यास त्यांची जरूर नव्हती. खिचडी आणि ब्राह्मणी लोकांना शिजविलेला भात वाटीत असत. या दान धर्मादाय कृत्याशिवाय संस्थानच्या इतर धर्मादायची माहिती या इतिहासात येणार नाही; परंतु एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की ज्या रीतीने या धर्माचा विनियोग होतो त्यावरून फक्त मराठे ब्राह्मणासच या धार्मिक नेमणुकीपासून फायदा होतो हे उघड आहे. कारण गुजरती ब्राह्मणांना खिचडी मिळत नाही आणि मोगली राज्य व मुसलमानी धर्म नाहीसा करण्यासाठी गुजरातेच्या हिंदूंनी मराठ्यांना आपल्या देशात पाचारण केले तेव्हा ही वरील गोष्ट ध्यानात धरण्यासारखी आहे.

संस्थानच्या धर्मादायाबद्दल आम्ही येथे फार लिहीत नाही; कारण आमच्या मर्यादेपलीकडे बारीक उहापोह केल्यानेच त्या विस्ताराचे व त्यांच्या राजकीय व धार्मिक हेतूने बरोबर आकलन होणार आहे. परंतु दोन विधाने करण्याचे आम्ही धाडस करतो. बडोदे संस्थानास धर्मराज्य असे नाव आहे. याचे कारण मुख्यत्वेकरून भिक्षुक वर्गाला ज्या अवाढव्य देणग्या गायकवाडाने दिल्या ते आहे; परंतु या जित देश गुजरातेचा पुरातन पवित्र महिमा हेही त्या संज्ञेचे कारण असावे. तथापि या देणग्या पुरातन नसून अलीकडच्या आहेत हेही लक्षात ठेवले पाहिजे. पहिल्या गायकवाडाच्या इच्छा काही असोत; पण देश जिंकण्यासाठी त्यांचा पहिला कलह व पेशव्यांशी टक्कर देऊन राहण्यासाठी त्यांचा दुसरा कलह; यामुळे त्यांची साधने संकुचित झाली. ब्रिटिश अमदानीतील काटकसरीचे धोरण व सयाजीची नियमित खर्चाची प्रवृत्ती या दोन कारणांमुळे फाजील खर्चाला जागा नव्हती; परंतु खंडेराव व मल्हारराव यांना पुष्कळ पैसा खर्चण्याची स्थिती आली आणि त्यांचा बराच पैसा ब्राह्मणांना सधन करण्यात खर्च झालाच व हा कीर्ती मिळविण्याचा एक सोपा मार्ग होता. खंडेरावाचा काही धर्मादाय मुसलामानांप्रीत्यर्थ कसे झाले हे नीटपणे सांगता येत नाही; पण त्यास घरातून काही फूस होती अशी कल्पना करण्यास फारशी हरकत

वाटत नाही. मागल्या दोन महाराजांचे कारकिर्दीत धर्मादायास म्हणण्यासारखी भर पडली नाही असे म्हणणारे लोक आहेत, हे सांगणे रास्त आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की दरवर्षाला एक लाख रुपयांची जास्त रक्कम खर्च होते असे दाखविले जाते; तरी त्याचे कारण असे आहे की, हिशेबाची पद्धत सुधारली आहे व त्यामुळे इजारदारांचा प्रभाव काढून टाकला आहे व संस्थानचा खर्च व जमा वाढलेली आहे.

खिचडीची पद्धत - हिंदू संस्थानांतून ब्राह्मण लोकांस अन्न वाटण्याची रीत सर्वसाधारण आहे. बडोद्यामध्ये ही रीत आरंभापासून सुरू आहे. संवत १८६१ (सन १८०४-०५) मध्ये शिजलेले अन्न वाटण्याची जी पद्धत होती ती बंद करून, प्रत्येक ब्राह्मण याचकारास, मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, मोठा माणूस असो किंवा तान्हे मूल असो, श्रीमंत असो किंवा गरीब असो, दोन भाग तांदूळ आणि एक भाग डाळ याप्रमाणे कोरडी एक शेर (४० तोळे) खिचडी देण्याची पद्धत सुरू झाली. चार सोमवारी आणि प्रत्येक महिन्याच्या दोन एकादशांश दिवशी व बहुतेक उपासाचे दिवशी खिचडीबद्दल दर माणशी एक पैसा देतात. खंडेराव महाराजांनी खिचडी न वाटण्याचे दिवस कमी केले आणि त्यांच्या आणि मल्हारराव महाराजांचे कारकिर्दीत प्रत्येक मनुष्यास जरी जास्त मिळत नसे तरी याचक लोकांची संख्या वाढल्यामुळे व धान्याचाही भाव वाढल्यामुळे एकंदर खर्च वाढला.

संवत १९१६ (सन १६८०-६१) मध्ये खंडेराव महाराजांनी "ग्यारमी" पद्धत सुरू केली. याचे योगाने प्रत्येक मुसलमानास तो पुरुष असो वा स्त्री असो व कितीही वयाचा असो, शिजविलेले ठराविक अन्न मिळत असे आणि सणाचे दिवशी थोडे मांसही मिळत असे. मल्हारराव महाराजांनी मांस वाटण्याची पद्धत बंद केली. हा जो संस्थानचा धर्मादाय होत असे यास दररोजची याचकांची संख्या तीन हजारांपासून दहा हजारांपर्यंत असावी असे आम्ही म्हणतो. या धर्मकृत्याचा फायदा नुसते धष्टपुष्ट पुरुष आणि स्त्रिया ज्यांस चांगला पगार मिळे असे लोक घेत असत आणि आळशी व खाऊन-पिऊन सुखी अशांचे पोट सार्वजनिक खर्चाने भरे. इतकेच नव्हे, तर या धर्मादाय पद्धतीमुळे गायकवाडीच्या राजधानीत निरुपयोगी अशा परकीय लोकांचा फार भरणा होता आणि त्यामुळे शहराच्या नियतीची इयत्ता कमी होते.

खंडेरावांच्या कारकिर्दीचा शेवट - आम्ही वर सांगितलेच आहे की, गणपतराव महाराजांना दिवाण भाऊ तांबेकर यांस कर्नल औट्राम यांच्या सांगण्यावरून सन १८४५ साली कमी करण्यात आले आणि महाराजांचे कारकिर्दीचा तारीख २० माहे नोव्हेंबर सन १८५६ रोजी शेवटी होईपर्यंत त्या जागेवर कोणाचीही नेमणूक झाली नाही. दिवाणाची पदवी रावजी आप्पाजी यांच्या घराण्यात फार दिवस चालू होती आणि "मिनिस्टर" (दिवाणाला) नुसते कारभारी म्हणत. भाऊ तांबेकर निघाल्यावर सयाजी महाराजांचे सल्ला मसलतगार सखारामपंत यांचे बंधू गोविंदराव पांडुरंग रोडे हे राज्यकारभारामध्ये अग्रणी झाले आणि त्यांचे हाताखाली त्यास मदतगार म्हणून गणेश सदाशिव ओझे यांची नेमणूक झाली; या गृहस्थाचा उल्लेख वर झालाच आहे. या दोन्ही गृहस्थास आरंभी कारभारी असे म्हणत असत; परंतु बंडाच्या धामधुमीत या दोघांनी जी कामगिरी बजाविली त्याबद्दल दोघांनाही ता. २८ माहे मार्च सन १८५७ रोजी

दिवाणगिरीच्या सनदा मिळाल्या आणि याप्रमाणे ब्रिटिश सरकाराकडून व खंडेराव महाराजाकडून त्यांचा मानमरातब झाला. ओझे यास सन १८६७ साली मार्च महिन्यात त्यांचे हुद्द्यावरून बडतर्फ केले आणि ता. १० नोव्हेंबर सन १८६७ पावेतो रोडे यांचा अधिकार चालला. त्यादिवशी त्यांनाही बडतर्फ करण्यात आले आणि नंतर लवकरच तारीख १६ माहे जुलै सन १८६८ दिवशी ते मृत्यू पावले. आम्ही वर सांगितलेच आहे की भाऊ तांबेकरामध्ये शिफारस करण्यासारखे पुष्कळ गुण होते; खर्चाच्या कामात ते उडाऊ नसत. गणेशपंत ओझेही स्तुतीस पात्र आहेत; कारण खंडेराव महाराजावर दोष ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असे; परंतु गोविंदराव पांडुरंग रोडे यांचे संबंधाने असे काही म्हणता येत नाही; तथापि खंडेराव महाराजांची कारकीर्द जसजशी होत चालली त्याप्रमाणे त्यांचे दिवाण एकसारखे कमी कमी योग्यतेचे येत चालले आणि भाऊ शिंदे तर मागील सर्व लोकांपेक्षा अज्ञानी, आपमतलबी आणि आपल्या यजमानाचे स्तुतिपाठक होते. यांची दिवाणगिरी कारकीर्द तारीख १७ माहे नोव्हेंबर सन १८६७ पासून तारीख २४ माहे नोव्हेंबर सन १८६९ पर्यंत चालली.

नंतर रेसिडेंटाच्या पश्चात (कर्नल ऑर्थर हे त्यावेळी काम करीत होते) आणि मुंबई सरकारची मंजुरी घेतल्याशिवाय नारायणराव भाऊ शिंदे यांची त्याजागी नेमणूक झाली. तो महाराजांचा फार आवडता नोकर होता; त्याच्या कारकिर्दीबद्दल व ज्या गोष्टी नुकत्याच घडून आल्या आहे त्यांच्याबद्दल आम्ही येथे काही लिहीत नाही. येथे एवढे सांगणे बस आहे की, सन १८६९ साली असिस्टंट रेसिडेंट कॅप्टन सालमन यास लांच दिल्याबद्दलची शाबिती होऊन मुंबई सरकारने त्यास बडतर्फ करण्याबद्दल खंडेराव महाराजांस हुकूम केला. महाराजसाहेबांची त्याच्यावर भावाप्रमाणे भक्ती असल्यामुळे त्यांनी ही गोष्ट करण्यास पुष्कळ आढेवेढे घेतले; परंतु सरतेशेवटी त्यास काढून टाकणे भाग पडले. नंतर निंबाजीराव ढवळे नावाच्या एका अशिक्षित गृहस्थास दिवाणाचे जागी ॲक्टिंग नेमिले. त्यास खरा अधिकार असा काहीच नव्हता आणि अखेरपर्यंत भाऊशिंदे हे महाराजांचे गुप्त मसलतगार होते.

चौदा वर्षे राज्य केल्यानंतर खंडेराव महाराज एकाएकी आणि आपल्या ऐन उमेदीत मकरपुरा येथील राजवाड्यात तारीख २० नोव्हेंबर सन १८७० रोजी स्वर्गवासी झाले. ते मोठे नशीबवान होते. त्यांच्या कारकिर्दीत शेतकी चांगल्या स्थितीत असल्यामुळे प्रजा तृप्त असे; त्यामुळे त्यांच्यावर वाटतील तसे कर बसवून महाराज साहेबांस प्रदर्शन करण्याची आपली मनीषा चांगल्या रीतीने तृप्त करता आली. हे कराचे ओझे फार भयंकर होते हे थोड्याच वर्षांत कळून आले. यांची कारकीर्द सुधारणेची व उत्कर्षाची होती असे कर्नल बार यांनी वर्णन केलेले आहे; परंतु पुढील टीकेवरून या मताचे पुष्टीकरण होत नाही. आम्ही दाखविल्याप्रमाणे सुधारणा करण्याचे प्रयत्न चालले होते; परंतु त्यात कौशल्य आणि पूर्णता नसल्यामुळे त्यांची खरी किंमत फार कमी होईल आणि त्यांच्या कारकिर्दीचा शेवटला भाग असा होता की, कोणाही निःपक्षपाती मनुष्यास त्याच्याबद्दल अभिमान वाटणार नाही.

●●●

प्रकरण २७ वे

मल्हारराव गायकवाड

एखादी व्यक्ती किंवा एखादे सरकार हे एकाएकी केव्हाही व्यसनासक्त होत नाहीत. त्यांचे हातून एखादा मोठा अतर्क्य गुन्हा घडला तर पुढील चौकशीअंती असे दिसून येईल की, न्यायाला भिऊन वागणाऱ्यास केवळ कल्पनेला गम्य अशा नीचपणाच्या खोल कुंडापर्यंत हळूहळू प्रवृत्तीनेच त्याचे अवतरण झालेले होते.

फत्तेसिंग महाराजाने आपला भाऊ गोविंदराव महाराज यांशी लढाई केली म्हणून गोविंदराव महाराज गादीवर बसले, तेव्हा त्यांनी आपले भावाच्या सर्व लोकांस घालवून दिले. कनोजी सत्तावान असता त्याने आपले नातेवाइकांना फार क्रूरपणाने वागविले आणि सयाजी महाराजांस त्यांच्या घराण्यातील ज्या लोकांनी गादीवरून दूर करण्याचा घाट घातला होता त्यांचा निर्दयपणे दुष्टावा करताना त्यांना काहीच वाटले नाही. गायकवाड कुंटुंबातील मंडळी आप्पलपोटेपणाने एकमेकांवर उलटत व भयंकर कृत्ये करीत. सत्ता लोलुपाच्या अधीर लालसेला एकटा गंगाधर शास्त्रीच बळी पडला नाही. फत्तेसिंग महाराजांचे तरुणपणी त्यांच्यावर जसा प्रसंग आला तसा आपल्यावरही येईल अशा अर्थाने त्याच्या दिवाणाच्या त्याच्या भावाला व भावी गादीच्या मालकाला गेलेले पत्र गणपतरावाच्या हातात आले. ते थट्टेचे नव्हते, वाटले तसा उपभोग घेण्याच्या वेडगळ चढाओढीला बरीच वर्षे लागली. हाती असलेला प्रतिबंध कंटाळवाणा झाला होता आणि कित्येकप्रसंगी एखाद्या शहाण्या किंवा निश्चयी रेसिडेंटाच्या कंटाळवाण्या उपदेशापासून सुटका करून घेण्याकरिता काही वाईट उपायांची योजना झाली असल्याचा संभव आहे. कर्नल औट्राम थोड्याशा नुकसानीने आपल्या शत्रूच्या डावपेचांतून सुटला; पण विल्यम्ससारखे दुसरे लोक या दुष्ट खटपटींना बळी पडले. आम्ही असे म्हणतो की, सत्ता मिळविण्याकरिता वाईट साधनांचा उपयोग करण्यात आला; परंतु अशा रीतीने जी सत्ता मिळविली तिचा उपयोग कोणत्या चांगल्या गोष्टीकडे करण्यात आला? आनंदरावाचा अंत झाला तेव्हा त्यांचा जीव जमादारखान्यावर अडकून राहिला होता. सयाजी महाराजांनी खाजगी द्रव्यसंचय पुष्कळ केला,

तो खंडेराव महाराजांनी मोठमोठ्या तमाशांत किंवा आपल्या स्नेहीमंडळीला देण्यात उडवला आणि मल्हारराव महाराजांनी तर अति नीच लोकांमध्ये उधळून टाकला. तथापि, या सर्व कुकर्मांचा दोष राज्यारूढ असलेल्या राजावरच लादता येत नाही. राजा आपल्या कारभाराबद्दल जबाबदार आहे खरा; परंतु गायकवाडांचे शिक्षणच असे असे की ते आपल्या सभोवती अशिक्षित आणि लुटारू लोक जुळवित आणि त्या लोकांचे धोरण सापडले तितका पैसा बुचाडण्याचे असे. नातेवाईक, चाकरनोकर, कारभारी, स्नेही, भटभिक्षुक, लष्करीलोक, कर्जदार, जवाहिरे, खुषमस्करे यांचे दुराचारी मंडळ असे. त्यांच्या दुष्कृत्यांची छाया अजून संस्थानावर आहे. त्याची आठवण झाली की, नवीन अभिश्राप द्यावेत.

साधारणतः एखादे मोठे संकट हळूहळू येत असे; परंतु पुष्कळदा जसा शेवट जवळ येऊ लागतो तसा अधोगतीचा प्रवाह फार झपाट्याने जाऊ लागतो. आणि नशीबाच्या बळीरूप झालेल्या अपराध्याला एका तऱ्हेचे वेड यास मूळ नाशाकडे झपाट्याने लोटीत असते. अशी स्थिती मल्हारराव महाराजांची झाली होती; त्यांची वाईट कृत्ये गतकर्मांचा स्वाभाविक परिणाम होता; कारण ज्या कारणामुळे प्रत्यक्षपणे त्याचा राज्यभ्रंश ओढवला ती कारणे कोन्याकोपऱ्यांतली नव्हती किंवा अनिर्वचनीय नव्हती किंवा ती एखाद्या अकल्प दुर्दैवापासून उत्पन्न झालेली नव्हती.

मल्हारराव महाराज आपले पंचविसावे वर्षी म्हणजे सन १८५७ साली विजापूर जिल्ह्यातील आणि खेडा जिल्ह्यातील ब्रिटिश हद्दीतील कोळी लोकांच्या मदतीने अहमदाबाद लुटण्याच्या प्रयत्नात थोडेबहुत गुरफटले होते. राजधानीच्या उत्तर भागातील लोकांस बंड करण्यास लावून नंतर बडोद्यावर स्वारी करावयाची व खंडेराव महाराजास पदभ्रष्ट करावयाचे असाही त्या खटपटीचा एक भाग होता; परंतु त्यावेळी मल्हारराव महाराजांस शासन करण्यासंबंधी काही उपाय योजिले नाहीत; कारण कोणत्याही रीतीने ते धोक्याचे होण्यास त्याची बुद्धी फार कोती आहे असे दिसले. तथापि सन १८६३ साली त्यांचे भावास चेटूक करून किंवा विष प्रयोगाने किंवा गोळी घालून ठार मारण्याच्या कटात त्यांचे पुन्हा अंग होते. आणि सर आर. शेक्सपीयर यांनी त्यांचा पूर्वी जसा बचाव केला होता त्याप्रमाणे "ते बुद्धीचे फारच कोते आहेत आणि आपल्या कृत्याबद्दल ते उघडपणे जबाबदार नाहीत," या सबबीवर पुन्हा कर्नल वालेसने त्यांचा बचाव केला. खंडेराव महाराजास जे मारेकरी घालावयाचे होते त्यांच्यापैकी मुख्य एक लष्करी शिपाई होता. त्याने पुढे हा सर्व कट फोडला. तो बिछान्यावर पडला असताना त्यास गोळी घालून त्याचा मल्हारराव महाराजांच्या कटांतल्या लोकांचा सूड घेण्याचा बेत होता. परंतु या सूडांतून तो फार मुष्किलीने वाचला. या कटाचा परिणाम असा झाला की मल्हाररावास बडोद्यापासून थोड्या अंतरावर पादरा नावाच्या गावात संस्थानिक कैदी म्हणून अटकेत ठेवण्यात आले. याच ठिकाणी या शतकाचे आरंभी कानोजीस काही वर्षे ठेवण्यात आले होते. याच जागेतून मल्हाररावास राज्यारूढ होण्याकरिता मोकळे करण्यात आले आणि गादीवर बसल्यावर नुकत्या सांगितलेल्या खटपटीत जे लोक होते त्यांस अटकेतून मोकळे करण्याची त्यांनी पहिली गोष्ट केली. ते पादरा मुकामी असताना सन १८६७ साली त्यांच्या काही विश्वासू चाकरांनी खंडेराव महाराजांविरुद्ध एक पुन्हा कारस्थान केले; पण सुदैवाने ते लवकरच उघडकीस आले आणि त्यात जे लोक होते



मल्हारराव गायकवाड (१८७०-७५)

त्यापैकी काही तुरुंगात गेले व काहींची कत्तल झाली. ता. १२ मार्च सन १८६७ साली बडोद्यास हत्तीचे पायाखाली तुडवून प्राण घेण्याचा शेवटचा प्रयोग झाला आणि त्याच प्रसंगी प्राण घेण्याचा या पद्धतीचा प्रयोग याउपर कोणत्याही माणसावर करावयाचा नाही, असे वचन ब्रिटिश सरकारांनी गायकवाडापासून घेतले.

खंडेराव महाराजांचा काळ झाल्यावर कर्नल बार मल्हारराव महाराजांकडे पादरा मुक्कामी गेले (त्यावेळी त्यांचे वय ३३ वर्षांचे होते) आणि त्यास आपल्या राजधानीत एकदर जाण्याबद्दल सांगितले. कैलासवासी झालेल्या महाराजांचे हे एकटेच बंधू हयात होते; परंतु राणी जमनाबाईने ती गरभार आहे असे सांगितल्यामुळे होणारे मूल मुलगा किंवा मुलगी आहे याचा निकाल लागेपर्यंत ब्रिटिश सरकाराने मल्हारराव महाराजांस राज्यारूढ होण्याची तात्पुरती परवानगी दिली (ता. १ डिसेंबर सन १८७०).

मल्हारराव महाराजांनी आरंभी ज्या गोष्टी केल्या त्या कर्नल बार यांना बऱ्या वाटल्या आणि महाराजांनी आरंभी ब्रिटिश सरकाराशी सलोखा करण्याचा प्रयत्न केला असेल हेही संभवनीय आहे. मल्हाररावांनी गोपाळराव मैराळ यांस आपले दिवाण नेमिले. या म्हाताऱ्या गृहस्थामध्ये लोकांस आवडण्यासारखे पुष्कळ गुण असल्यामुळे बडोद्यास तो फार पूज्य होता. आणि म्हणून त्याच्यासंबंधी स्तुतिवाचक दोन शब्द लिहिल्याशिवाय आमच्याने राहवत नाही. त्याने आपले काम एका वर्षापेक्षा जास्त केले नाही आणि वार्धक्यामुळे त्यास जोर धरून काम करिता येईना या गोष्टी खऱ्या; परंतु बहुतेक लोकांचा त्याचेवर विश्वास झाला आणि विशेष आनंदाची गोष्ट ही की, पुष्कळ वर्षांपूर्वीपासून आजपावेतो पुष्कळ वर्षांत जे लोक बडोद्याच्या दिवाणगिरीला किंवा कारभारीपणाला पोहोचले त्याच्यामध्ये या एकट्याच गृहस्थाचा आपले दिवाणगिरीचे काम करीत असताना आणि बदलौकिक न होता नैसर्गिकरीत्या अंत झाला.[१]

१. संस्थानचे पेढीवाले, पोतदार, महाराजांचे विश्वासातील मसलतगार यांच्याबद्दल पुष्कळ लिहिण्यात आले आहे. या तीनही वर्गांचा मासला म्हणून या टिपेच्याद्वारे गोपाळराव मैराळ व त्यांचा उगम याचा थोडास वृत्तांत आम्ही देतो.

मैराळकडून जांबेकर आडनावाच्या कुटुंबातला माणूस व यांचे मूळ पुणे जिल्ह्यात भीमथडी तालुक्यात मुलतान गाव होय. हे बडोद्यास संवत १८४० त आले आणि प्रथम थोडे दिवस फडणवीसच्या घराण्यास चिकटून राहिले. येथे आल्यावर थोडे दिवसांनी दामाजी दक्षिण महाराष्ट्रात स्वारीस गेले त्यांचेबरोबर हेही गेले व तेथे यांनी बरेच द्रव्य संपादन केले; पण या द्रव्याचा त्यास ताठा न येता ते सैन्याबरोबर परत आल्यावर त्यावर ते सावकारी धंदा करून लागले. त्यात धीरता, हुषारी व कर्तव्य तत्परता दाखवून ते लोकांत प्रसिद्धीस आले. इतर कामाबरोबर त्यांनी काही शिलेदार व सरदारांना नोकऱ्या मिळवून दिल्या. त्यांच्या मदतीने त्याची सावकारी फार वाढली. संस्थानच्या कित्येक अडचणीच्या प्रसंगी त्यांनी गायकवाडास मोठमोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या व त्यामुळे गायकवाडाला ते अपरिहार्य झाले. त्यांनी आपल्या प्रामणिकपणाने ब्रिटिशांपासून प्रशंसा मिळवली आणि त्यांची हमी मिळवली. संवत १८७७त त्यांना औरस पुत्र नसल्यामुळे दत्तक घेतला. त्याचे नाव गोपाळराव ठेवले. नंतर संवत १८८१त ते मृत्यू पावले.

(टीप - १ पुढील पानावर)

मल्हारराव जेव्हा सत्ताधीश झाले तेव्हा आपल्यास भोगाव्या लागलेल्या हालांचा सूड घेण्याचा त्यांचा पक्का निश्चय झाला. त्यामुळे जमनाबाईस भीती पडून त्यांनी आपण प्रसूत होईपर्यंत आपल्यास सुरक्षित आश्रय मिळण्याची मागणी केली आणि म्हणून तारीख ५ माहे जुलै सन १८७१ ला ताराबाईचा जन्म होईपर्यंत ब्रिटिश रेसिडेन्सीमध्ये त्यास आश्रय मिळाला. नंतर सहा महिन्यांनी जमनाबाईसाहेबांस गुजरात सोडून जाण्याची परवानगी मिळाली व त्यावेळी गुजरातेस हा आपला शेवटला रामराम होय असे त्यांना वाटले. आपल्यास वाईट रीतीने वागविले जाते हे राणी रमाबाईंचे वाईट वागणुकीबद्दल गाऱ्हाणे बरोबर होते. पूर्वीच्या महाराजांच्या मर्जीतले लोकांस व त्यांचे आश्रित लोकांस फार क्रूरपणाने वागविण्यात येत असे. त्या सर्व लोकांस नोकरीवरून दूर करण्यात आले; याचे कारण मल्हाररावाने असे दिले की, संस्थानास निदान दोन कोटी रुपयांचे कर्ज आहे, अशा रीतीने झाडून लोक काढून टाकल्यामुळे सालीना पुष्कळ शिल्लक राहिली; परंतु या शिलकीचा व्यय लागलीच दुसरीकडे होऊ लागला. परंतु मल्हाररावाचा विशेष दात एका मनुष्यावर होता; हा मनुष्य भाऊ शिंदे होय. हा पूर्वीचे महाराजांचा मोठा स्नेही व सल्लामसलतगार होता आणि त्यानेच त्यास अटकेत ठेवण्याबद्दल फार आग्रह धरिला होता. त्यास तुरुंगात टाकण्यात आले आणि त्यांतून तो जिवंत बाहेर आलाच नाही. मागच्या महाराजांचे दुसरे दोन स्नेही गोविंदराव नाईक आणि रावजी मास्तर यांच्याप्रमाणे यांस तारीख १ माहे मे सन १८७२ रोजी गुप्तपणे क्रूरपणाने विष घालून मारिले असावे अशी कल्पना करण्यास पुष्कळ सबळ आधार आहेत. भाऊ शिंद्याच्या घराण्यातील सर्व द्रव्य जप्त करण्यात आले हे सांगण्याची विशेष जरुरी नाही.

संस्थानास कर्ज आहे ही मल्हाररावांची सबब बरोबर होती; परंतु तिजोरी सुधारण्याकरिता त्यांनी पुढे काहीच केले नाही, सन १८७०-७१ सालाकरिता आकारलेला वसूल

गोपाळराव मैराळ यांचा जन्म नर्मदेच्या काठी भालड येथे संवत १८७०त झाला. त्यांचे दत्तकविधान झाल्यावर हिशेब वगैरे एका मराठी शाळेत त्यास शिकविले. त्यांच्या सभ्य वागणुकीमुळे ते सर्वांना प्रिय झाले; परंतु त्यांची गणपतीवरील भक्ती व श्रद्धा, त्यांची सचोटी व अत्यंत औदार्य यांच्या योगाने त्यांची लोक साधारण मर्त्यजनाहून जास्त योग्यता मानू लागले. सयाजी महाराजांची त्यांच्यावर लवकरच भक्ती बसली व ते त्यांचा नेहमी सल्ला घेऊ लागले. संवत १८८३त त्यांनी सिन्नर, केरळ, दहेगाव, रोंड, ओखामंडळ, नवसारी, अमरेळीचे सुभे असे सर्व महाल एकामागून एक इजाऱ्याने घेतले. या महालांची त्यांचे तिघे बंधू व्यवस्था करीत, त्यांचा उद्योग व पडीत जमिनी लागवडीला आणण्यासाठी त्यांनी केलेला सतत खर्च या दोहींच्या योगाने त्यांचे घराण्यास सयाजी महाराज व त्यांचे तिघे मुलगे यांचा चांगला आश्रय मिळाला. सयाजीच्या वेळी वेणीरामाचे जागी काही दिवस दिवाणगिरीचे काम केले. नंतर ते मल्हाररावचे दिवाण मरेपर्यंत होते. पुढे दिसणाऱ्या संकटामुळे त्यांचा अंत लवकर ओढवला.

त्यांची मुले लहानपणी वारल्यामुळे त्यांनी आपला पुतण्या यशवंतराव यास दत्तक घेतला. यशवंतराव संवत १९३२त एकाएकी आटोपले त्यामुळे पुन्हा दत्तविधान जरूर झाले.

मैराळभाऊच्या वेळी हरिवैजी महीपत व गोपाळराव मैराळाचे वेळी प्रसिद्ध बापूजी अनंत अरगडे गुमास्ता होता.

१,३७,००,००० रुपये होता, आणि लष्करी खर्च, देवस्थान, धर्मादाय व एकंदर संस्थानच्या खात्याचा खर्च मिळून १,१५,००,००० रुपये होता; परंतु त्याचवेळी महाराजांचा खासगी खर्च फारच वाढला होता. सन १८७४ साली जे कमिशन बसविले होते त्यांनी पुढील शेरा लिहिला आहे. ''खंडेरावच्या कारकिर्दीच्या शेवटल्या सहा सात वर्षांत आधीच वाईट असलेल्या राज्यव्यवस्थेचा फार ऱ्हास झाला; पूर्वीपेक्षा महाराजांची कृत्ये फारच स्वेच्छाचारी झाली; रयतेवर पूर्वीचे जे कर होते ते आधीच जड होते याचा विचार न करिता नवीन कर[१] बसविण्यात आले; आणि सरकारी कामदार सरकारच्या पैशाचा वसूल फारच क्रूरतेने आणि बलात्काराने करीत असत.''

परंतु आम्ही वर सांगितलेच आहे की, मल्हाररावाने आपली तिजोरी सुधारण्याचा खरा निश्चय कधीच केला नाही आणि ही वसुलाची बाबत फार महत्त्वाची असल्यामुळे आम्ही खाली विधान साद्यंत देतो. ''युनायटेड स्टेट्स मधील बंडाचेवेळी हिंदुस्थानातील कापसाचा भाव अतिशय वाढला, तो इतका की, १ किंवा १ ½ आणा पौंडाचा भाव १ रुपया झाला. बडोदे संस्थानामध्ये कापूस पिकण्यालायक जमीन पुष्कळ आहे आणि कापसाचा भाव वाढल्यामुळे कापसाची लागवड फार झाली आणि त्या पिकापासून पुष्कळ फायदा झाला. यावेळी शेतकरी लोकांना जास्त कर देण्याचे सामर्थ्य आले होते. सन १८६४ साली जी जमाबंदी झाली त्यावेळी कापसाचा भाव फार येत असल्यामुळे त्याच्या धोरणावर सारा ठरविण्यात आला. संस्थानाचा खर्चही फार अवाढव्य वाढविण्यात आला होता. अमरेलीची लढाई संपल्यानंतर कापसाचा भाव उतरला आणि जमीन महसूल तेवढा कायम राहिला. शेतकरी लोकांना सरकार देणे हळूहळू जड जाऊ लागले आणि ते वसूल करण्याकरिता सरकारचा अंमल कडक होऊ लागला त्यामुळे पुष्कळ चांगली जमीन लोकांना सोडून जावे लागले आणि संवत १९३० साल अखेर ७० किंवा ८० लाख रुपयांची बाकी थकली व त्या वर्षाचा शेवटला हप्ता तर बहुतेक मुळीच वसूल झाला नाही.''

याचा परिणाम उघडच असा झाला की, मल्हारराव इतर बाबींबद्दल सूचना करता त्यातच ''सारा वसूल करण्याची चालू असलेली रानटी पद्धत बंद करून योग्य व नेमस्त सारा वसवून लोक नाखूष न

---

१. एक संस्थानच्या जमिनीवरील एका वर्षाबद्दल धाऱ्यावर दहा टक्क्यांचा कर मकरपुरा येथे राजवाडा बांधण्यासाठी व दुसरा त्याहून लहान सोनेरी हौदा वगैरे बांधण्याबद्दल मकरपुरा राजवाड्याला २० लाख रुपये लागले. मल्हाररावांनी हा खंडेरावाने बांधलेला राजवाडा व रुप्याच्या तोफा पाहून त्यांच्यावर ताण करण्याचे त्यांचे मनात येऊन त्यांनी शक्कल काढली. त्यांनी रुप्याच्या तोफांवरील खंडेरावाचे नाव काढून टाकवून आपले नाव कोरले व सोन्याच्या दोन तोफा त्यांनी करवल्या. नंतर खंडेरावानी बांधलेला राजवाडा मोडून काढण्याची त्यांनी सुरुवात केली; परंतु रेसिडेंटाने या गोष्टीस मना केली आणि आपल्या प्रजेपैकी काहींची जमीन हिरावून घेऊन तिजवर १५ लाख रुपये खर्चून नजरबाग बांधवला. आणखी हे सांगणे इष्ट आहे की, गणपतरावांनी मोतीबाग बांधला. सारांश, प्रत्येक गायकवाडाने आपल्या मागच्या वंशजाने बांधलेली इमारत नापसंत करून आपणासाठी नवीन; पण जास्त गैरसोयीची इमारत बांधवलेली आहे. हल्ली एक नवीन वाडा बांधण्याचे काम चालू आहे. त्याचा खर्च पंधरापासून वीस लाख रुपये होईल.

राहतील अशी तजवीज करण्याबद्दल" उपदेश करावा असे रेसिडेंट साहेबास तारीख २५ माहे जुलै सन १८७४ रोजी लिहून आले. महाराज साहेबांनी हा उपदेश मनास आणला नाही व एकंदर स्थिती सुधारावयाची ते एकीकडे राहून ती अधिक वाईट झाली. शेवटी सर ल्युईस पेली यांनी जेव्हा राज्यसूत्रे आपल्या हातात घेतली तेव्हा एक जाहीरनामा काढला; त्यात असे प्रसिद्ध केले की, जेथे योग्य दिसेल तेथे साऱ्याचा दर कमी करण्यात येईल, संवत १९२३-२७ या पाच वर्षांची बाकी माफ करण्यात येईल आणि पूर्ण चौकशी झाल्याशिवाय संवत १९२८-३० या सालाचा सारा मागण्यात येणार नाही. हे उपाय फार जालिम होते; परंतु लोकांवरचा जुलूम फार असह्य झाल्यामुळे, गावेची गावे ओसाड पडली आणि सर्व संस्थानांमध्ये रयत लोकांनी सरकारच्या मागणीस अप्रत्यक्ष रीतीने हरकत घेण्यास सुरुवात केली होती.

संस्थानचा जमाखर्च किती अव्यवस्थित रीतीने चालला होता, याची पूर्ण कल्पना करावयाची तर एका गोष्टीशिवाय दुसरा मार्ग नाही; ती गोष्टी ही की मल्हारावाची कारकीर्द ज्या साली संपली त्या सालाच्या अखेरीस सर्व प्रकारच्या वसुलाची रक्कम ९४ लक्ष झाली आणि खर्च १७१ लाख झाला. गायकवाडाची खानगी मालमत्ता कोणती आणि संस्थानच्या खर्चाकडे कोणता वसूल लावावयाचा याच्यामधील भेद इतका थोडा होता की, ज्यावेळी मल्हाररावास कैद केले त्यावेळी सरकारी तिजोरीत फक्त थोडेसे हजार रुपये असून, राजवाड्यात लपवून ठेवलेले ४० लाख सापडले आणि पुष्कळ पैसे खासगी रीतीने (चोरून) बाहेर पाठविण्यात आले हेही तेव्हा लक्षात आले.

आता एवढेच सांगावयाचे राहिले आहे की, मल्हाररावांनी आपल्या लहानशा कारकिर्दीत त्यांच्या बंधूने लादलेले जबरदस्त सारे तसेच कायम ठेविले एवढेच नाही, तर पैसे उकळण्याकरिता जुन्या गायकवाडांनी जे निंद्य उपाय योजिले होते ते उपाय योजण्यासही कमी केले नाही. आधीच कराने दडपून गेलेल्या रयत लोकांवर त्यांनी "राज्यारोहरण नजराणा" नावाचा आणखी एक मोठा कर बसविला; तशाच प्रकारचा एक कर वहिवाटदारावर बसविला आणि हे लोक बहुतेक अब्रुदार नसल्यामुळे ते करदारांपासून त्याचे दसपट उकळीत असत आणि या लोकांचे विरुद्ध ज्यांनी जणूकाही लोकांस फसविण्याचा हक्क विकतच घेतला होता, अशा अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रारी ऐकण्यास सरकार खुषी नव्हते.

शेवटी ज्या पेढीवाल्यांनी सरकाराला पुष्कळ दिवस रोख पैसे पुरविले होते त्यांच्याशी आपला संबंध तोडण्यास मल्हाररावानी कमी केले नाही; यात नवीन लोकांशी फायदेशीर व्यवहार सुरू करण्याचा व बेबंद रीतीने इनामदारांना आणि पिढीजात तनखा मिळत असलेल्या लोकांना नागविण्याचा हेतू होता. अशा प्रकारे वागणुकीमुळे साधारण प्रजाजन, सरदार लोक, लष्करी लोक, पेढीवाले आणि श्रीमंत लोक वगैरे त्यांच्याविरुद्ध झाले आणि या सर्व लोकांची ओरड ब्रिटिश सरकारचे कानी गेली.

●●●

प्रकरण २८ वे

मल्हारराव गायकवाडांचा राज्यभ्रंश

एखादा राजा कोणासही जबाबदार नसला तर तो ज्या मुख्य कारभाऱ्यांची निवड करतो त्यावर इतके अवलंबून असते की, मल्हाररावाच्या सभोवताली जे लोक होते त्यांच्यासंबंधी येथे उल्लेख करणे जरूर आहे. मल्हारराव गादीवर बसल्यानंतर एका महिन्याने त्यांनी निंबाजीराव ढवळ्यांना रजा दिली आणि हरिबा गायकवाड माहे मार्च सन १८७१ पर्यंत त्यांचे काम करीत होते; भिकोबा आण्णा हे त्यांना मदतनीस होते. पुढे गोपाळराव मैराळ दिवाण झाले आणि त्यांच्या संबंधाने दोन योग्य शब्द आम्ही मागील भागात लिहिले आहेत. तथापि, महाराजांचे मुख्य खासगी मसलतगार बळवंतराव राहूरकर नावाचे दुसरेच गृहस्थ होते; ते जरी सरळ स्वभावाचे असले तरी जोरदार नव्हते; परंतु पुढे जशी ही कारकीर्द भ्रष्ट होत चालली होती, तसे वरील लोक जाऊन त्यांचे जागी जास्त हीन अब्रूचे लोक येऊ लागले सयाजी नानासाहेब खानविलकर दिवाण आणि बापूजीराव मोहिते सेनापती झाले. हे दोघेही गायकवाड महाराजांचे मेहुणे होते आणि दुसऱ्या गृहस्थाचे जरी फारसे वजन नव्हते तरी पहिल्याच्या हातात फार सत्ता दिली होती आणि तो अशिक्षित आणि लोभी असल्यामुळे त्या सत्तेचा त्याने फार वाईट उपयोग केला. हरिबा गायकवाड रेव्हेन्यू कमिशनर होते आणि ते फार कडक अधिकारी म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या हाताखाली नारायणभाई लल्लूभाई नावाचा ब्रिटिश नोकरीतून हाकलून लावलेला अगदी कुचकामी मनुष्य होता; वसंतरामभाऊ नावाचा महाराजांचा एक बिन काळजाचा अडत्या होता त्यास पेढी कामदार (कंट्रोलर ऑफ बँक्स) नेमण्यात आले आणि दरबारची आणखी मंडळी म्हणजे गोविंदराव मामा, बळवंतराव देव आणि दामोदरपंत अशासारखे लोक होते.

या महत्त्वाच्या गोष्टीचा त्रोटक इतिहास देण्यापूर्वी एक गोष्ट सांगणे जरूर आहे. गायकवाड महाराज स्वतंत्र राजे आहे खरे तथापि ब्रिटिश सरकारचा त्यांच्यावर तहनामान्वये थोडा फार दाब असे. गायकवाड सरकारची वागणूक जर दोषार्ह आणि हानिकारक असली तर ब्रिटिश सरकारने

त्यांच्या राज्यकार्य प्रकरणात कोणत्या वेळी आणि कोठपर्यंत हात घालावा किंवा हात घालता येईल हे येथे सांगता येणार नाही. तथापि एक अतिदुर्बल आणि दुसरे फार बलाढ्य अशा दोन सरकारच्या परस्परसंबंधाचा विचार केला म्हणजे योग्य रीतीने म्हणता येईल की, गायकवाडास उपदेश करण्याचा व त्यांच्यावर दाब ठेवण्याचा अधिकार मल्हारराव गादीवर बसण्यापूर्वी पुष्कळ दिवसांपासून नेमस्तपणे ब्रिटिश सरकार वापरीत आहेत व ही त्यांची सावधगिरीची पद्धत सलोखा ठेवणाऱ्या रेसिडेंटानी बडोद्याचे राजांना समजून सांगितली होती. त्याप्रमाणे सरतेशेवटी वेळ आली आणि मुंबई सरकाराला गायकवाडीत हात घालणे योग्य वाटले आणि सर्व दुष्कृत्ये उघडकीस आणण्याइतका तरतरीत आणि मेहनती अशा एका रेसिडेन्टाची त्यांनी नेमणूक केली.

कर्नल फेअर हे बडोद्यास तारीख १८ माहे मार्च सन १८७३ रोजी आले आणि तारीख २२ रोजी त्यास असे आढळले की, बडोद्यास रस्त्यामध्ये आठ माणसांस चाबुकाने यथास्थित मारिले आणि त्यामुळे काही मेले आणि काही मरण्याच्या पंथात होते. या लोकांनी महाराजाचे एका नोकरास विषप्रयोग केला असा त्यांच्यावर आरोप होता. नंतर काही दिवसांनी अशी बातमी आली की, विजापूर जिल्ह्यातील पाच ठाकुरांनी राज्यारोहण नजराणा देण्याचे नाकबूल करून बंड केले. दुसऱ्या पुष्कळ तक्रारी एकामागून एक येऊ लागल्या आणि नवे रेसिडेन्ट त्या ऐकून घेऊ लागले. सरतेशेवटी या सर्व गोष्टी योग्य ठिकाणी रुजू झाल्यानंतर हिंदुस्थान सरकाराने ब्रिटिश आणि गायकवाडी रयत लोकांच्या तक्रारींची आणि कांटिंजंटच्या स्थितीची चौकशी करण्याकरिता गुजरातेत एक कमिशनर नेमिण्याबद्दल हुकूम दिला. त्या कमिशनमध्ये हिंदुस्थान सरकाराने कर्नल मीड, अध्यक्ष आणि ममताझ उद्दवला नवाज फैज अल्ली यास नेमिले आणि मुंबई सरकारने मि. राव्हेन्स्क्राफ्ट आणि कर्नल एथेरिज यास नेमिले.

या कमिशनची पहिली बैठक बडोद्यास तारीख १० नोव्हेंबर रोजी झाली आणि शेवटली बैठक त्याच ठिकाणी तारीख २४ डिसेंबर १८७३ रोजी झाली; परंतु कमिशनचा रिपोर्ट पुढे दोन महिनेपर्यंत सरकाराकडे पाठविण्यात आला नाही. चौकशी जी चालली होती त्याच्यामध्ये फारच नेमस्तपणा ठेविला होता; गायकवाड सरकारच्या किरकोळ बाबतींत हात घातला नाही आणि सर्व व्यक्तिवाचक तक्रारी राजापुढे दाखल करण्यात आल्या. कमिशनने, ब्रिटिश प्रजेस वाईट तऱ्हेने वागविल्याबद्दलच्या आरोपांतून गायकवाड सरकारास जरी मुक्त केले तरी सामान्य अंदाधुंदीचा कर्नल फेअर यांनी केलेला आरोप त्यांनी शाबीत केला. पूर्वीच्या महाराजांच्या सर्व आश्रित लोकांचे एकत्र विजर्सण, राज्यारोहण (accession) नजराणा, रयत लोकांची वाईट स्थिती, सरकारी किंवा इतर पेढीवाले, खंडेरावांचे आप्त आणि दुसरे पुष्कळ इनामदार यांच्याशी बेबंद वागणूक या सर्व गोष्टींचा पुन्हा उल्लेख करण्याची काही जरुरी नाही. पुष्कळ लोकांवर खासगी रीतीने जुलूम झाला, पुष्कळ संभावित विवाहित आणि अविवाहित बायकास जबरीने लवड्या करण्यात आल्या म्हणजे त्यास गायकवाडच्या घरातील गुलाम बनविल्या किंवा त्यास रांडा बनविण्याकरिता जबरीने काढून नेल्या वगैरे अनेक गोष्टी कमिशनपुढे उघडकीस आल्या.

कमिशनने केलेल्या सूचना पसंत पडून हिंदुस्थान सरकाराने महाराजांचे अधिकारात हात घातला नाही; परंतु त्यास जबाबदार धरले जाईल अशी त्यास ता. २५ माहे जानेवारी सन १८७४ रोजी ताकीद करण्यात आली आणि बडोदे संस्थानच्या राज्यकारामध्ये पूर्ण आणि कायमच्या सुधारणा सतरा महिन्यांच्या आत म्हणजे तारीख ३१ डिसेंबर सन १८७५ पर्यंत करण्यास त्यास बजावले. नंतर महाराज साहेबांस त्यांच्या सभोताली जे मोठे अधिकारी होते त्यांच्यापैकी पुष्कळांस काढून टाकण्यास आणि मुंबई सरकार ज्यांनी शिफारस करतील त्यास दिवाण नेमण्यास विनंती करण्यात आली.

सुधारणा करण्याचा प्रयत्न मनापासून झाला आणि मल्हाररावाचे जुने कारभारी नानासाहेब खानविलकर यास प्रतिनिधीची जागा देऊन त्यांस वर चढविण्याचा मल्हाररावांनी जो प्रयत्न केला तो कर्नल फेअर यांस पसंत पडला नाही (ता. १३ माहेर ऑगस्ट सन १८७४). महाराजांचे विनंतीवरून मि. दादाभाई नवरोजी दुसऱ्या चार पाच गृहस्थांच्या मदतीने राज्यकारभार चालविण्याकरिता बडोद्यास आले होते; परंतु सुधारणा करण्याकरिता त्यास योग्य अधिकार दिले जातील असे कर्नल फेअर यास वाटले नाही. एकंदरीत महाराज आणि रेसिडंट यांचे बरोबर जुळेना आणि शेकडो प्रकरणासंबंधाने रेसिडेन्सीमधून राजवाड्यात स्नेहभाव विरहित लिखाणे जाऊ लागली. सरतेशेवटी कर्नल फेअर यांना तेथून परत बोलावून आणि त्यांच्या जागी मुंबई सरकारच्या हुकमाने वागणारे रेसिडेन्ट न नेमता स्पेशल कमिशनर आणि एजंट टू दी गव्हर्नर जनरल अशा हुद्याने कर्नल सर लुईस फेरी यांस नेमण्याचा हिंदुस्थान सरकारांनी निश्चय केला (ता. २५ माहे नोव्हेंबर सन २८७४).

दरम्यान एका मनुष्याने, महाराज साहेबांची राख लक्ष्मीबाईचा नवरा म्हणून एक इसम १८७४ च्या मार्चमध्ये पुढे आला व तिला आपले स्वाधीन करून घेण्याकरिता रेसिडेंटाकडे त्याने अर्ज केला. या माणसाच्या अर्जाची चौकशी चालली असताना महाराजाने त्या लक्ष्मीबाईंशी ती दोन महिन्यांची गर्भारशी असता लग्न लावले (मे ७). लग्न नवसारीस झाले. रेसिडेंटही तेव्हा तेथेच होते; परंतु सरकारच्या हुकुमावरून त्यांनी लग्नास हजर राहण्याचे नाकारिले. तारीख १६ माहे ऑक्टोबर सन १८७४ रोजी लक्ष्मीबाईस मुलगा झाला; परंतु त्यांचे औरसपणाबद्दल संशय असल्यामुळे सर ल्युईस पेली (हे त्यावेळी बडोदे मुक्कामी होते) यांनी राजपुत्रास जो नेहमी मान देतात तो त्यास दिला नाही.

तारीख २ नोव्हेंबर रोजी मल्हाररावांनी कर्नल फेअर यास बडोद्याहून काढण्याबद्दल हिंदुस्थान सरकारास विनंती केली आणि त्या महिन्याचे २५ वे तारखेस सर ल्युईस पेली यांची महाराजांचे दरबारी ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधीचे जागी नेमणूक झाली. या दोन तारखांचे दरम्यान म्हणजे तारीख ९ नोव्हेंबर रोजी कर्नल फेअर यास आपल्यावर विषप्रयोग झाला असल्याचा संशय आला. काही वेळपर्यंत त्यांचे डोके अतिशय जड झाले होते व त्यास तळमळत होते; आणि रोज सकाळी त्यांना (Pummalo) चे सरबत घेण्याची सवय होती. त्याचा हा परिणाम असावा असे त्यांना हळूहळू वाटू लागले. तारीख ९ रोजी ते थोडेसे सरबत प्याल्यावर थोड्यावेळाने त्यांना एकदम तळमळायास लागले म्हणून ते उठले आणि टंबलरामध्ये जे थोडे सरबत राहिले होते ते

त्यांनी फेकून दिले. टंबलर खाली ठेविल्यावर त्यांना त्याच्या तळाशी थोड्या काळया रंगाचा गाळ जमलेला दिसता व तेच विष असेल असे त्यांना वाटले. तो सांका त्यांनी लागलाच रेसिडेन्सी सर्जन डाक्टर सीवर्ड यांच्याकडून तपासविला आणि त्यांनी असे मत दिले की, त्यामध्ये पांढरेच्या सोमल आणि हिऱ्याची पूड यांचे मिश्रण आहे.

हा चमत्कारिक प्रकार लागलीच मुंबई आणि हिंदुस्थान सरकारास कळविण्यात आला आणि त्या गोष्टीपासून काही जरी शंका उत्पन्न झाल्या असल्या, तरी हिंदुस्थान सरकारांनी आपल्या व्यवस्थेत काही फेरबदल केला नाही. सर ल्युइस पेली हे बडोद्यास आले आणि त्यांना एकंदर सर्व स्थिती फार निकरावर आल्यासारखी दिसली. शेतकरी लोकांवर साऱ्याचा कर अतिशय पडला असल्यामुळे ते अगदी जिवावर उदार झाल्यासारखे दिसले आणि गायकवाड व सरदार यांच्यामध्ये जे तंटे लागले होते त्यामुळे सर्व शांतता मोडण्याची भीती वाटत होती. म्हणून त्यांनी राज्यसूत्रे आपल्या हातात घेतली आणि मि. दादाभाई नौरोजी यांनी मुकाट्याने राजीनामा दिला. डिसेंबर सन १८७४ नंतर रेसिडेन्सीमधील दोन नोकरांच्या जबानीवरून वरील विषप्रयोगासंबंधी माग सापडला. रावजी नावाच्या शिपायांच्या हवालदाराने सरबतात आपण मिश्रण टाकल्याचे कबूल केले; गुन्हा माफ झाल्यावर नरसू जमादाराने सांगितले की, स्वतः मल्हाररावांनी त्यास लाच दिल्यावर तो या कामात पडला आणि विष महाराजांनी स्वतः दिले. या आणि दुसऱ्या पुराव्यावरून ता. १३ माहे जानेवारी १८७५ रोजी हिंदुस्थान सरकाराने एक जाहीरनामा काढला आणि त्यात असे प्रसिद्ध केले की, गायकवाडास कैद केले आहे आणि मल्हाररावांच्या वागणुकीबद्दल चौकशी होऊन त्याचा निकाल लागेपर्यंत महाराणीच्या तर्फेने संस्थानची राज्यव्यवस्था आपण आपल्या हातात घेतली आहे.

हा खटला म्युनिसिपल कायद्याप्रमाणे नव्हता; संस्थानच्या कायद्याप्रमाणे होता. चौकशी कमिशन पुढे चालली. त्यात बंगालचे चीफ जस्टिस सर रिचर्ड कौच हे अध्यक्ष होते; त्यात सर रीचर्ड मीड आणि मि. मेलव्हिल हे दोन युरोपियन सभासद होते; शिंदे सरकार आणि जयपूरचे महाराज हे दोन संस्थानिक होते आणि सर दिनकरराव हे प्रसिद्ध पुरुष होते. हे मंडळ न्याय कोर्ट नसून नुसती कमिटी होती आणि कर्नल फेअर यांस केलेल्या विषप्रयोगामध्ये मल्हाररावांचे किती अंग होते यासंबंधीच्या चार मुद्द्यांची उत्तरे किंवा त्यासंबंधी आपली मते हिंदुस्थान सरकारास कळविण्याचे त्या कमिटीचे काम होते.

कमिशनचे काम तारीख २३ फेब्रुवारीपासून तारीख ३१ मार्च १८७५ पर्यंत चालले. "मल्हाररावांनी तयार केलेल्या लोकांकडून कर्नल फेअर यांस विषप्रयोग करण्याचा प्रयत्न खरोखर झाला" असा चौथा आरोप होता. यासंबंधाने कमिशनच्या इंग्लिश सभासदांचे मत पडले की, असा प्रयत्न झाला. दोन नेटिव्ह सभासदांनी मल्हाररावास दुसऱ्या किरकोळ बाबींबद्दल गुन्हेगार ठरविले (त्या बाबी येथे देण्याची काही जरूर नाही) परंतु मोठ्या महत्त्वाच्या आरोपाबद्दल त्यास निर्दोषी ठरविले. मल्हारराव निरपराधी आहेत या प्रमेयाशी पुराव्यामध्ये पुढे आलेल्या आणि चौकशीमध्ये शाबीत झालेल्या काही मुद्द्यांची एकवाक्यता हिंदुस्थान सरकारास करता येईना. म्हणून त्यांनी तारीख १५ माहे एप्रिल सन १८७५ रोजी सेक्रेटरी ऑफ स्टेटला अशी सूचना

केली की, मल्हाररावास गादीवरून दूर करावे, सर टी. माधवराव यास राज्यकारभार चालविण्यास बोलवावे, बंडाच्या धामधुमीत ज्यांनी आपल्याशी निष्ठा दाखविली त्या खंडेरावाच्या पत्नी जमनाबाई यांनी गायकवाडाच्या घराण्यातील एका मुलास दत्तक घ्यावे आणि त्या दत्तकास एकदम गादीवर बसवावे.

राणी सरकारचा या प्रकरणाचा निराळा अभिप्राय पडला. आरोप शाबीत झाला हे गृहीत धरण्याचे त्यांनी नाकारिले आणि म्हणून कमिशनचा सर्व ऊहापोह बाजूला ठेविला; परंतु पुढे दिलेल्या कारणाकरिता त्यांनी महाराजांना गादीवरून काढून टाकिले. तारीख १९ माहे एप्रिल सन १८७५ रोजी हिंदुस्थान सरकाराने एक जाहीरनामा काढिला, तो असाः "महाराजांवर जो आरोप आणिला होता तो चौकशीअंती खरा ठरला असे इंग्लिश सरकार गृहीत धरीत नाही; परंतु मल्हारराव महाराज गादीवर बसल्यापासून एकंदर बडोद्याचे स्थितीचा, त्यांच्या जगजाहीर वाईट वर्तणुकीचा, संस्थानच्या भयंकर वाईट राज्यकारभाराचा आणि जरुरी अशा सुधारणा करण्याचे कामी त्यांच्या उघड नालायकीचा विचार करून मल्हाररावाला पदच्युत केले आहे," असे त्या जाहीरनाम्यात प्रसिद्ध केले.

याप्रमाणे तारीख २२ माहे एप्रिल सन १८७५ रोजी मल्हाररावाची गुप्तपणे मद्रासला रवानगी केली आणि तेथे ब्रिटिश अंमलदारांच्या देखरेखीखाली त्यांना ठेविले. तेथे त्यास चांगली तैनात करून दिली होती व त्यांच्या कुटुंबातील माणसेही त्यांच्याजवळ राहू दिली होती. चौकशी चालली असताना बडोद्याचे लोकांनी किंवा सैन्यांनी ब्रिटिश सरकारच्या कामास कोणत्याही तऱ्हेचा अडथळा आणला नाही; परंतु महाराज साहेबांस गादीवरून काढल्यानंतर थोड्या दिवसांनी म्हणजे तारीख २८ एप्रिल रोजी मल्हाररावास लक्ष्मीबाईपासून झालेल्या मुलास गादीवर बसविण्यासंबंधी बडोदे शहरात मोठी धामधूम झाली; परंतु सर रीचर्ड मीड यांनी शहर कबजात राखण्याकरिता लष्करातून तोफखाना, पायदळ व घोडेस्वार पाठविल्यानंतर हा दंगा सहज दबला. मल्हाररावाचा राज्यभ्रंश आणि त्यांच्यामागून येणाऱ्याचा उदय यासंबंधाने वाईट वागण्यासारख्या दोन गोष्टी घडून आल्या. गायकवाड कुटुंबातील दोन भावांपैकी एकाने जीव दिला व दुसऱ्याने बंड करण्याचा मुळमुळीत प्रयत्न केला. यांची राज्यारोहणाची अपेक्षा होती; पण त्या अपेक्षेस योग्य हक्क बळ नव्हते. ज्यांनी आत्महत्या केली ते मुरारराव आणि हल्ली काशीस ब्रिटिश सरकारच्या देखरेखीखाली असलेले दुसरे सदाशिवराव हे दोघे गोविंदरावाचे मुलगे होते व गादीवर वारसा नसावा; परंतु रिजेंटच्या खासगी दौलतीवर मालकी असावी या समजुतीवर फत्तेसिंगाच्या बायकोने ज्यास दत्तक घेतले होते तो हा गोविंदराव होय.

●●●

प्रकरण २९ वे

सयाजीराव महाराजांचे राज्यारोहण – राजा सर टी. माधवरावांचा कारभार

◘

ता. २ माहे सन १८७५ रोजी खंडेराव महाराजांच्या पत्नी जमनाबाईसाहेब बडोद्यास परत आल्या आणि दुसरे दिवशी त्यांनी राजवाड्यात प्रवेश केला. ता. २७ माहे मे सन १८७५ रोजी महाराणी जमनाबाईसाहेबांनी हल्लीचे महाराज साहेबास दत्तक घेतलेले आणि त्यास गादीवर बसविण्यात आले. पहिल्या परिशिष्टात जो वंशवृक्ष दिला आहे त्यावरून असे दिसेल की, गायकवाडाचे घराण्याचे मुख्य स्थापक पिलाजी त्यांच्यापर्यंत त्यांचा पूर्ववंश जातो. मल्हाररावांनी यांचे वडील गायकवाडचे घराण्यातील असल्याने कबूल केले होते आणि मुंबई सरकाराने यांचा हक्क कायद्याप्रमाणे ठरविण्याची काळजी घेतली होती वगैरे गोष्टी येथे लिहिण्याची काही जरुरी नाही; पण खानदेशातील एका दुसऱ्या भिकार खेड्यातील एका तेरा वर्षांचा अशिक्षित मुलगा दैवाच्या लहरीसरसा एकाएकी एका महाराजाचा दत्तक पुत्र आणि पुष्कळ धन आणि मोठी सत्ता यांचा मालक बनला ही गोष्ट विलक्षण आहे. सयाजीरावाचे जे नशीब उघडले आहे त्यास ते योग्य होतील की नाही त्याचे अनुमान करता येत नाही आणि जे स्नेही असतील ते राजांच्या होतकरूपणाबद्दल बोलणार नाहीत; परंतु उद्योग, निश्चय, स्वनियमन आणि पापभीरूता असे काही टिकाऊ गुण त्यांच्यामध्ये आहेत आणि त्यांचा कदाचित त्यांच्यावर पगडा बसेल. सयाजीरावाची किंमत काय आहे ही कालगतीने दिसेल. तारीख १ जानेवारी सन १८७७ रोजी दिल्ली येथे भरलेल्या दरबारात त्यास फरजंद-इ-खास-ई-दौलत-ई-इंग्लेशिआ (ब्रिटिश राज्याचा नशीबदार पुत्र) असा किताब मिळाला. तारीख ६ जुलै सन १८७८ रोजी राणीसाहेबांना एक बडा किताब मिळाला.



महाराणी जमनाबाई

तारीख १६ माहे मे सन १८७५ रोजी सर टी. माधवराव के.सी.एस.आय.[१] यांना रिवाजाप्रमाणे प्रधानकीची वस्त्रे देण्यात आली; परंतु याच्यापूर्वी सहा दिवस ते आपल्या नवीन राज्यकारभाराचे कामावर रुजू झाले होते. महाराजसाहेबांना ज्या दिवशी नवीन किताब मिळाला त्याचदिवशी सर टी. माधवराव यांना ब्रिटिश सरकारांनी राजा ही पदवी दिली होती आणि नंतर पुढे संस्थानातील मुख्य अधिकाऱ्यांना खानबहादूर किंवा रावबहादूर या पदव्या मिळाल्या.[२]

आम्ही वर दिलेल्या तारखास घडलेल्या गोष्टींमुळे बडोद्यास खरोखर नवीन सृष्टीच सुरू झाली आहे. भूत आणि भविष्य या दोघांची एका कडीने सांगड झाली आहे; कारण सन १८५७ साली ब्रिटिश सरकाराशी जो राजनिष्ठेने वागला त्या राजाचे बायकोस खंडेराव महाराजांचे नाव व गादी चालविण्यासाठी मुलगा पसंत करण्याचा हक्क मिळाला. जे दत्तविधान झाले त्यातसुद्धा ब्रिटिश सरकारच्या मनात स्नेहाशिवाय दुसरा भाव नव्हता. संस्थानची स्वतंत्रेबद्दल जी कळकळ दिसत होती तिजमुळे मल्हाररावाचा राज्यभ्रंश बघणाऱ्यांना विश्वास व धीर आला; परंतु अशा मोठ्या जागेला ज्यांनी आपली अयोग्यता सिद्ध केली, ज्यांच्या जुलमाने त्यांच्या प्रजेपैकी प्रत्येक जातीचे लोक त्यांचे विरुद्ध झाले होते अशा मनुष्यावर घाव पडला. तथापि संस्थानच्या शिरोमण्यास जरी शिक्षा झाली तरी त्याच्या पतनाबरोबर त्यांची जी राज्य करण्याची दुराचारी पद्धत होती ती बंद करण्याचा विचार होता. या शतकाचे आरंभीचे वर्षांत पैसे देऊन ब्रिटिश सरकारचे सैन्याची कशी मदत घेतली, सुमारे वीस वर्षेपर्यंत राज्यकारभार कमिशनमार्फत कसा चालला होता (या

---

१. सर टी. माधवराव सन १८२८ त तंजोर जिल्ह्यात जन्मले व ते त्रावणकोरच्या एका दिवाणाचे चिरंजीव व दुसऱ्याचे पुतणे होत. ते जातीचे ब्राह्मण. त्यांचे शिक्षण मद्रास युनिव्हर्सिटीत मि. पावेल यांजकडून झाले. नंतर काही काळपर्यंत गणिताचे व पदार्थविज्ञान शास्त्राचे प्रोफेसरचे त्यांनी काम केले. काही काळानंतर त्रावणकोरच्या राजपुत्राचे इंग्रजी शिक्षक झाले. त्यांजपैकी एक आता गादीवर आहे व दुसरा भावी वारस आहे. पुढे असिस्टंट दिवाण होते व नंतर १८५८त दिवाण झाले. त्या जागेवर १४ वर्षे त्यांनी काम केले. या नोकरीबद्दल त्यास के.सी.एस.आय. हा किताब सन १८६६ च्या जून २० ला मिळाला. ते १८६२त नोकरीतून परत गेले. १८७३त होळकरांनी आपले दिवाण होण्यास त्यास पाचारण केले. १८७५ च्या एप्रिल महिन्यात होळकरांच्या संमतीने हिंदुस्थान सरकारने या दिवाणगिरीवर त्यास ठेविले. कलकत्ता रेव्ह्यूत प्रसिद्ध झालेल्या नेटिव्ह मुत्सदी नामक निबंधांत त्यांनी भिक्षुकबद्ध, कर्नाबगुंठित त्रावणकोरच्या संस्थानास आपल्या पायावर कसे उभे केले हे दाखविले आहे आणि बडोदे संस्थान संबंधाने त्या निबंधाची अशी किंमत आहे की, त्यात ज्या तत्त्वाने येथील राज्यव्यवस्था त्यांनी चालविली आहे त्या तत्त्वाच आत निरूपण आहे.

२. पुष्कळ प्रसंगी सयाजीराव, खंडेराव, मल्हारराव यांच्या सल्लागारांची नावे दिली आहेत. आता ज्या लोकांचे सर टी. माधवराव ऋणी आहेत त्यांची नावे न देण्यास काही कारण नाही ती येणेप्रमाणेः-

१. खानबहादूर काजी शहाबुद्दीन (रेव्हेन्यू कमिशनर)

२. खा. ब. पेस्तनजी जहांगीर (सेटलमेन्ट ऑफिसर व मिलिटरी सेक्रेटरी)

३. रावबहादूर विनायकराव जनार्दन (नायब दिवाण)

४. खा. ब. सरशेटजी रुस्तमजी (चिफ जस्टिस)

५. मि. जनार्दन सखाराम गाडगीळ बी.ए., एल.एल.बी.



महाराजा सयाजीराव तिसरे (१८६३-१९३९)

कमिशनमध्ये ब्रिटिश रेसिडेन्ट किंवा त्यांचे एजंट मुख्य सभासद असत), संस्थानच्या बड्या अधिकाऱ्यांवर दाब राखणे किंवा जमाबंदी तपासणे किंवा करडेपणाने अमलात ठेवणे वगैरेचा हक्क ब्रिटिश सरकारलाच आहे असे कसे मानले होते, या गोष्टी आपण वर वाचल्याच आहेत. आजपर्यंत पुष्कळदा सारखी ढवळाढवळ करून जी गोष्ट साध्य झाली नाही ती एका निर्णयात्मक गोष्टीने साध्य करावयाची होती आणि आपल्यापेक्षा सशक्त स्नेहाकडून ठपका मिळू नये अशा रीतीने वागण्यास बडोदे सरकाराला सूचना द्यावयाची होती. त्यांच्यावर तसे वागण्याची सक्ती करावयाची नव्हती. मल्हाररावाऐवजी एका तेरा वर्षांच्या मुलाची कारकीर्द सुरू झाली आणि तो वयात येईपर्यंत त्यांचे घर व्यवस्थित करण्याचे काम एका तरतरीत दिवाणावर सोपविले होते. बाकी हे म्हणणे खरे आहे की, ''एकंदर हिंदुस्थानात जे फेरबदल होत आहेत त्यांच्यावर अवलंबून राहिले पाहिजे. बाकी बडोदे संस्थानात हिंदुस्थानाचा राज्यकारभार कालानुगत नाही. इतर नेटिव्ह संस्थानातील प्रजेस जी स्थिती आली आहे त्या स्थितीप्रत बडोद्यातील लोक एकदा पोहोचले म्हणजे पुरातन काळची राज्यपद्धत येणे शक्य नाही. सुधारणा इतकी सामान्य व स्पष्ट झाली आहे, या सुधारणेस नेटिव्ह राज्याची अनुमती इतकी उघड आहे की, बडोद्याच्या इतिहासाची गती एकदा दुसऱ्या दिशेला वळली म्हणजे तिजला परत फिरण्यास मार्गच राहणार नाही.''

●●●

परिशिष्ट १

बडोदे येथील रेसिडेंटांची यादी

◘

		पासून	पर्यंत
मेजर ए. वाकर		११ जुलै १८०२	१८०९
कॅप्टन जे. रिव्हेट कार्नाक (ॲक्टिंग)		१८०९	...
कर्नल ए. वॉकर		१८१०	१८१०
मेजर जे. रिव्हेट कार्न्याक		१८१०	मे १८२०
मि.सी. नारिस (ॲक्टिंग)		१ जून १८२०	मे १८२१
मि. जे. विलियम्स	डिसेंबर १८३० पासून १८४४ ऑगस्टपर्यंत रेसिडेंट गुजराथचा पोलिटिकल कमिशनर असे.	मे १८२१	नोव्हेंबर १८३७
मि. जे. सदर्लंड		नोव्हेंबर १८२१	जून १८४०
मि. डी. एस बाईड		जून १८४०	जुलै १८४४ (ऑगस्ट)
मि. टी. आजिल्व्ही फर्स्ट असिस्टंट ताब्यात आणि मि. रिमिंग्टन		जुलै १८४४	जुलै १८४५
सर आर. के. आरबथनाट		जुलै १८४५	एप्रिल १८४६
मि. डब्ल्यू ॲंड्रझ (ॲक्टिंग)		एप्रिल १८४६	मे १८४७
कर्नल जे. औट्राम		मे १८४७	ऑक्टोबर १८४८
कॅप्टन पी.टी. फ्रेंच (ॲक्टिंग)		ऑक्टोबर १८४८	मे १८५०
कर्नल जे. औट्राम		मे १८५०	जानेवारी १८५२
मि. जे. एम. डेव्हिस		जानेवारी १८५२	जून १८५३
मि. जी. बी. सेटनकार (ॲक्टिंग)		जून १८५३	मार्च १८५४
कर्नल जे. औट्राम	हिंदुस्थान सरकारच्या खाली	मार्च १८५४	मे १८५४
मेजर डी. ए. मालकम		मे १८५४	नोव्हेंबर १८५५
मेजर सी. डे. विडसन		फेब्रुवारी १८५६	मार्च १८५७
सर आर. शेक्सपिअर		मार्च १८५७	मे १८५९

कर्नल आर. वालेस	ऑगस्ट १८५९	जानेवारी १८६६
कर्नल जे.टी. बार	जानेवारी १८६६	मे १८६७
कर्नल इ.पी. ऑर्थर (ॲक्टिंग)	मे १८६७	नोव्हेंबर १८६७
कर्नल जे.टी. बार	नोव्हेंबर १८६७	एप्रिल १८७२
कर्नल ए.जी. शार्ट (ॲक्टिंग)	एप्रिल १८७२	मार्च १८७३
कर्नल आर. फेअर	मार्च १८७३	डिसेंबर १८७४
सर ल्युई पेली. { गव्हर्नर जनरलचे एजंट आणि स्पेशल कमिशनर }	डिसेंबर १८७४	एप्रिल १८७५
सर आर. मीड	एप्रिल १८७५	नोव्हेंबर १८७५

मि. पी. एस. मेलबिल सी. एस.
आय. गव्हर्नर जनरलचे एजंट. नोव्हेंबर १८७५

●●●

परिशिष्ट २

दिवाणांची यादी

◘

देवाजी ताकपीर आणि माहादाजी गोविंद काकिर्डे संवत १८००.

माधव निंबाजी वणीकर

रामचंद्र बसवंत

बाळाजी यमाजी (त्याचा चुलत भाऊ रामचंद्र पुण्यास दामाजी बरोबर अटकेत असता काम करीत होता)

गोपाळ नाईक तांबेकर

अंताजी नागेश संवत १८३४

रामचंद्र भास्कर संवत १८४४

रावजी आपाजी - डिसेंबर १७९३त गोविंदराव बरोबर आलेला पहिला दिवाण, मृत्यू १८०३ जुलैत.

सिताराम रावजी - त्याचा दत्तक मुलगा- त्याचे पाठीमागूनच दिवाण झाला आणि १८०७ पर्यंत कामावर होता. तो सन १८०७त बडतर्फ झाला तेव्हा दिवाणगिरीची सनद त्याचे व त्याचे कुटुंबाला दिलेली होती. सीतारामाचा मुलगा नारायणराव त्याचा मुलगा गणपतराव १८४१त मरेपर्यंत किताब उत्पन्न त्याचे कुटुंबात चालू होते.

बाबाजी आप्पाजी - रावजीचा भाऊ संवत १८६३ पासून १८६८ पर्यंत कारभारी व खाजगीवाला होता. पुढे फत्तेसिंगला रिजेंटचा अधिकार तरी बाबाजी १८१० नोव्हेंबर २८ तारखेस मरेपर्यंत खाजगीवाल्यांचे काम करीत होता. त्याच्यानंतर त्याचा मुलगा विठ्ठल भाऊ दोन वर्षे खाजगीवाला होता. त्यानंतर त्याचे काम नामशेष राहिले व तेवढेच त्याचा मुलगा भास्करराव विठ्ठल यास देण्यात आले. भास्कर विठ्ठलाची हमी १८५६त नाहीशी झाली.

गंगाधरशास्त्री १८१३ पासून १४ जुलई १८१५त अधिकारावर होता. त्यावेळी त्याचा खून झाला. त्याला मुतालिकाची पदवी होती.

धाकजी दादाजी १२ ऑक्टोबर १८१९पासून जानेवारी १८२० पर्यंत मुख्य दिवाण होता.

विठ्ठलराव भाऊनंतर थोडे दिवस नावाचा दिवाण होता; परंतु विठ्ठलराव भाऊ दिवाणजी त्याला जोड दिला होता व १८२२त तो स्वतंत्र दिवाण झाला. १८२८त तो सयाजीरावकडून बडतर्फ झाला.

गोपाळ आत्माराम देवघर (गोपाळपंतदादा) १८२९-१८३३ पर्यंत कारभारी होता; परंतु त्या अवधीत व १८२८-२९मध्ये वेणीराम आदितराम आणि भाऊ पुराणिक महाराजाचे खासगी मसलतगार होते.

वेणीराम आदितराम १८३३ पासून २८ नोव्हेंबर १८३९ पर्यंत कारभारी होता. त्यावेळी सरजेम्स कार्न्याकच्या विनंतीवरून त्याला कमी करण्यात आले.

यानंतर सयाजीच्या मृत्यूनंतर काही महिने दिवाण असा कोणी नव्हता. या अवधीत फडणवीस खात्यातील असिस्टंट गणेश सदाशिव ओझे महाराजाचे चिटणीसाचे काम करी. बापू अरगडे, बाबा नाफडे, भाऊ पुराणिक, गोपाळराव मैराळ, सखाराम पांडुरंग रोडे (विश्वासाचे मसलतगार) होते.

भाऊ तांबेकर (विठ्ठल खंडेराव) १८४९ पासून १८५४पर्यंत कारभारी होता.

गणेश सदाशिव ओझे आणि गोविंदराव पांडुरंग रोडे, सखारामांचा भाऊ, संयुक्त कारभारी झाले; परंतु रोड्यांचे वर्चस्व जास्त होते. त्यांनी १८५५त काम सुरू केले व सन १८५७ मार्च २८ ला दिवाणगिरीची सनद मिळेपर्यंत कारभारी या नावानेच प्रसिद्ध असत.

भाऊ शिंदे धुरंधरनिधी या किताबाने १८६७ नोव्हेंबर १७ तारखेपासून २४ नोव्हेंबर १८६९ पर्यंत दिवाण होता. त्या साली मुंबई सरकारच्या सांगण्यावरून त्याला कमी केले; पण तो गुप्तपणे सल्लागार होताच.

निंबाजीदादा (ढवळे) मग २५ नोव्हेंबर १८६९ खंडेराव महाराज २८ नोव्हेंबर १८७०त वारल्यावर पंधरा दिवस दिवाणाचे काम करीत होता.

हरिबा दादा नंतर चार महिने दिवाण होता. त्याला मदतीला भिकोबा अण्णा गायकवाड होते.

गोपाळराव मैराळ १८७१ मार्चाच्या २२ला दिवाण झाले आणि १८७२त मरेपर्यंत कामावर होते. चार महिने नायब दिवाण बळवंतराव भिकाजी राहूरकर हे होते.

शिवाजीराव (नानासाहेब) खानवेलकर, महाराजांच्या पहिल्या बायकोचे भाऊ ५ मार्च १८७३ पासून ४ ऑगस्ट १८७४ पर्यंत दिवाण होते. त्याला कमी करण्याबद्दल रेसिडेंटाने सांगितल्यावर त्यास प्रतिनिधी केले.

दादाभाई नौरोजी पुढे ४ ऑगस्ट १८७४ पासून ७ जानेवारी १८७५ पर्यंत दिवाण होते.

राजा सर टी. माधवराव यास १० मे १८७५त दिवाण नेमले. त्यांच्या केव्हा केव्हा गैरहजेरीत खानबहादूर काजी शाबुद्दीन काम करीत असत.

●●●

परिशिष्ट ३

गुजरातची वाटणी होतांना गायकवाडला मिळालेले प्रांत. प्रथम – अमली महालात – म्हणजे पूर्णपणे जिंकलेल्या प्रदेशात – मिळालेले.

◘

१. सुरत अठ्ठाविशीत

परगणा	**स्वराज रु.**	**मोगलाई रु.**	**जमा रु.**	**कु. रुपये**
वसराई	६४०००	०	६४०००	
मांडवी	३०५००	०	३०५००	
तारकेश्वर	६५००	०	६५००	
कामरेज	३००००	१४०००	४४०००	
चौराशी	१०५०००	३२५००	१३४५००	
भुलेश्वर	६००००	२५०००	८९०००	
कडोद	५००	०	५००	
टेंबे	०	५००	५००	
तालडी	६६५००	६०००	७२५००	
मरोळी	४००००	२५००	४२५००	
गुली	५००००	९०००	५९०००	
नवसारी	१५०००	२०००	१७०००	
गणदेवी	४६५००	१८५००	६५०००	
बिसनपूर	१२०००	०	१२०००	
मोहे	३६०००	५०००	४१०००	
अनावळ	३०००	०	३०००	
खंडोळ	३०००	०	३०००	
पटे महले	६०००	०	६०००	

म्हस्रत	३०००	०	३०००	
राजपिपळा (पाच जिल्हे)	७००००	०	७००००	
एकंदर	**६४७५००**	**११५०००**	**७६२५००**	

२. पाच जिल्ह्यांतील जकात

पंचमहाल तापीचे उत्तरेस	३३०००
सदर व्योरी (व्यारा) तून	१२०००
एकूण	४५०००

३. रेव्याच्या उत्तरेकडील आणि महीच्या दक्षिणेकडील प्रांतात बंदर जकात धरून.

बडोदे	५,००,०००
भडोच	२,२५,०००
कोरळ बंदर	४०,०००
वाघोरी	२५,०००
संखेडा	२५,०००
एकूण	८,१५,०००

४. महीच्या उत्तरेस राजनिष्ठ महालात (रास्ती महाल) बंदर जकात धरून दसक्रोई परगणा

अथवा अहमदाबादची हवेली. अर्धे शहर खेरीज	१,००,०००
ठाणे धरून अर्धा पेटलाद परगणा	३,००,०००
धोळका	२,५०,०००
मातर	५०,०००
नडियाद	७५,०००
उमराठ धरून मोघे	७५०००
एकूण	८,५०,०००
एकूण जमा	२४,७२,५००

तूर्त गायकवाडी ताब्यांचा विचार ठेवून देऊन पेशव्याचा अर्धा हिस्सा काय होता ते बघू.

१. सुरत अठ्ठाविशीत त्यास हंसोट अंक्लेश्वर, ओरपाड, सरमुरण, सुपे, परचोळी, बलेसर, भुतवीर, पनेरा, वस्पे, बोहारी, बार्डोली, बलसाड आणि स्वराज्याइतकी बंदर जकात मिळून ८,१५,५०० मोगलाई ८८,२०० एकूण	९,०३,७००

२.	मही व रेवाकांठ्याच्या दरम्यान डभई, डेसबोरा, जंबुसर, सावळी, अमोद, बहादूर	७,१५,०००
३.	महीच्या उत्तरेस रास्ती महालात अर्धे दसक्रोई, अहमदाबाद, बोरसद, धंधुका, खंबायतच्या बंदर जकातीचा हिस्सा, धामणी, महमदाबाद, विरमगाव.	८,५०,०००
	पेशव्या एकूण जमा	२४,६८,७००

सतरा खेडी मिळून स्वराज्याचे ७७,०५१, मोगलाई ३८६७ एकंदर ८०९१८ रु. या वाटणीत धरलेले नव्हते.

द्वितीय अमळी महालात गायकवाड कुटुंबाच्या पोटगीसाठी खालील प्रदेश ३,००,५०० रु. किमतीचा निराळा काढून ठेवला होता. याचे कारण उपलब्ध नाही.

सुरत अठ्ठाविशी

परगण्याचे नाव	स्वराज रु.	मोगलाई रु.	जमा रु.
ब्योरी (व्यारा)	११०००	०	११०००
टेंबे	३१०००	९०००	४००००
कडोड	२९०००	१०००	३००००
मोटे	९०००	१०००	१००००
कासे	३५००	०	३५००
राणेर	१००००	०	१००००
चिखली	५१५००	१५५००	६७०००
वोमवार	११०००	०	११०००
धामोरी	३०००	०	३०००
वरिआव	१६५००	८५००	२५०००
एकंदर	१७५५००	३५०००	२१०५००
नर्मदा आणि महीच्या दरम्यान			
सिनोर			८५०००
तिलकवाडा			५०००
			९००००
		एकूण	३००५००

जिंकलेल्या भागाच्या वाटणीत गायकवाडच्या हिश्शाचे अवलोकन केले. मुळात सांगितले आहे की, पेशव्यांच्या वाटेस आले त्यापेक्षा जास्त किमतीचे प्रदेश गायकवाडने आपणाकरिता निवडून

घेतले, व याचे कारणही सांगितलेच आहे की, गायकवाडला पेशव्यापेक्षा गुजरातची माहिती जास्त असे. परंतु पुष्कळ लोकांचे असे मत नाही. मराठ्यांना लुटलेल्या प्रदेशांची किंमत बरोबर लवकर कळत नसे. परंतु गायकवाड येथला जुना, त्यामुळे गुजरातेतील जुन्या पिढीजाद नोकरांची, पाटील वगैरेची त्याची दोस्ती असे व ते त्याला या बाबतीत सल्ला देत.

मागे पेशवा व गायकवाड त्यांच्यादरम्यान झालेला विचार सांगितलाच आहे की, पेशव्यांनी मोगलांकडून हिसकून घेतलेला गुजरातचा प्रांत दोघांनी वाटून घ्यावा व दोघांनी मिळून न जिंकलेल्या भागांतून मुसलमानांना हाकलून लावावे; जिंकल्यावर जमीन दोघांनी सारखी वाटून घ्यावी.

जबरीने कब्जात ठेवलेल्या महालांपैकी गायकवाडचा वाटा येणेप्रमाणे होता.

अर्धे शहर सुरत
अर्धे शहर अहमदाबाद
परगणा कपडवंज
परगणा बहाफेल
परगणा धारासण
परगणा अहमदनगर
परगणा छाला
परगणा विदूर
परगणा कडी
परगणा खेराळू
परगणा विजापूर } बाबींचा
परगणा राजणपूर
समाजपूर

बाबी महालाच्या वाटणीत पुढे फेरफार झाला हे आम्हास अवगत आहे. अहमदाबाद शरण झाल्यावर बाबीचे महाल त्यांच्याकडे शपथेवर राहू दिले; परंतु दामाजी लवकरच त्यांच्याशी लढाईस उभा राहिला. आणि पानिपतच्या मराठ्यांवरील अनार्थानंतर मुसलमान व बाबी एक होऊन गुजरातेत मराठ्यांना हिसकावून लावण्याची खटपट करू लागले. याचा शेवट असा झाला की, नऊ महालांतून बाबी जहागीरदारांना हाकलून लावले. फक्त राधनपूर त्याजकडे राहिले. काहीचे मत नऊ महाल येणेप्रमाणे वाटले गेले. गायकवाडचे खेराळू, विजापूर, राजनपूर, आणि समाजपूरबद्दल धमणी व मौजपूर आले. पेशव्याकडे पाटण, वडनगर विसाळनगर व सिधपूर गेले. पुढे पेशव्यांनी या नऊ महालांची गायकवाडला सरंजामासाठी सनद करून दिली. त्याबद्दल गायकवाडने त्यास दर वर्षास एक लाख रुपये द्यावयाचे ठरलेले, त्याप्रमाणे गायकवाडने एकदा एक लाख रुपये दिले व पुन्हा एकदा २५०००च दिले आणि पैसे न देण्याचे कारण त्याने असे प्रपादले की, हे जिल्हे ताब्यात ठेवण्याच्या व त्यातील बंडखोर लोकांना जबरेत ठेवण्याच्या अडचणीमुळे त्याबद्दल पैसे देताच येत नाही व अखेरीला हा मुद्दा त्याने तडीस नेला.

अजून न जिंकलेल्या महालांची अशी व्यवस्था ठरली होती की, गायकवाड व पेशवा या दोघांच्या सैन्यांनी मिळून मुसलमानांना हाकलून द्यावयाचे; दोघांच्या सैन्यांच्या मानाने न जिंकलेल्या प्रांताची खंडणी वाटून घ्यावयाची व जिंकलेले प्रांत समसमान वाटून घ्यावयाचे.

न जिंकलेले महाल येणेप्रमाणे :

तालुका मोहोर

तालुका गोलवड

सरकार सोराठ जुनागडसहित व टांकसाळ आणि ६२ महाल धरून

तालुका इस्मालनगर अथवा नवानगर

तालुका सुरै राजवाड

तालुका कच्छभूज आणि सिंधुसागर आणि नगरथवा

तालुका यतवाडा सतलपूर

तालुका श्री द्वारका

तालुका दांता

प्रांताच्या वाटणीशिवाय, सोराठ, हलार, गोहेलवाड, काठेवाड, मध्ये मुलुखगिरी मोहिमी पाठविण्याच्या हक्काची वाटणी होती. गायकवाडचे प्रांत येणेप्रमाणे होतेः

परगणा	**किंमत रु.**
मोर्वी व मालिया	४३०००
अबारोण	५०००
धरोळ	१७२५०
बाडिपान व जाडिया	१६२५
बालंबे	१६००
लबीबपूर लुलुचपूर	१०००
भानवड आणि मागोळ	१३५००
धानोळी आणि खडपूर	५००
गव्हाण	५००
गोळा	६५०
रावळ	७५०
मिपानी बंदर	६७५
बर्डा राणपूर	७५००
अमरोळी	३००००
बालसर	३०००
कंसारी	४३००
धराळी	२०००
अबिंक	७५००
दौलताबाद	५००

विराळ आणि पट्टण	२०,०००
कोडिनार मुटा बंदर	१२,०००
सालजा माय बंदर	१०,०००
मोहा	१,०००
वपटाल	...
खतवाडा	२००
डागर	२००
धातरवाडा	२००
राण गोविंद	२००
मलिकपूर	१००
नगसरी	१,०००
गाडिया घरपालिठाणा, मांडवी, सट्जगड	३२,५००
केलियन	२०,०००
छाबाद अथवा दामनगर	५,०००
कोठी	२,०००
हस्तनी चौक	४,०००
बुख	४,४००
जुनागढ (१/२)	१०,०००
घराणी	३०,०००
मणेला	१५,०००
काला	५०००
	एकंदर २,५५,३००

या ३७ महालांखेरीज गायकवाड व पेशवा या उभयतांच्या ताब्यात (१) श्रीजगत द्वारका बंदर; (२) सगर, हमसाल, दंडफुराई, फौजदारी कोतवाली वगैरे त्या कसब्याची यांसकट जुनागडचे शहर; (३) देव बंदर होती.

●●●

परिशिष्ट ४

जे जिल्हे गायकवाडला प्रथम देण्यात येऊन मागून वाटणी गायकवाडच्याच फार फायद्याची झाली या सबबीवर त्याजकडून पेशव्याने काढून घेतले ते येणे प्रमाणे

⧈

	मोगलाई		एकंदर
	रु.	रु.	रु.
तेलडी	६६,५००	६०००	७२,५००
मरोळी	४०,०००	२५,००	४२,५००
गुले	५०,०००	९०,००	५९,०००
बिसनपूर	१२,०००	०	१२,०००
मोहे	३६,०००	५,०००	४१,०००
वाघोरी (?)	२५,०००	०	२५,०००

हे जिल्हे २,५४,००० रुपये किमतीचे आहेत. असा सामान्य ग्रह आहे. वरच्या बेरजेप्रमाणे २,५२,००० नाहीत. हा फरक समजत नाही.

बाळाजी बाजीराव पेशव्याने सही केलेल्या व एच.एच. रघुनाथरावच्या हातच्या यादी “हे प्रांत माझ्या वाटणीचे गायकवाडाकडून परत द्यावयाचे” असे लिहिलेले आहे. असे असेल की, गायकवाडाने यापुढे प्रांत स्वतःसाठी जिंकावे या शर्तीवर त्याने रघुनाथरावास हे देऊन टाकले. हे प्रांत पेशव्याकडे खालसा झाल्यावर त्यांचा पूर्वीच्या देणगीने होणारा फायदा होऊ दिला गेला नसेल. मुळात सांगितल्याप्रमाणे हे प्रांत नंतर दमाजीस देण्यात आले व त्यांजबद्दल त्याने पेशव्यास सालीना २,५४,००० जास्त खंडणी द्यावी असे ठरले.

सहा महाल गायकवाडास पेशव्याने परत दिल्यावर पेशव्याने सातारारांग व डभई, पस्रे व उमरण ही तीन खेडी दरबार खर्चासाठी राखून ठेवली.

●●●

परिशिष्ट ५

गोविंदरावाच्या कारकिर्दीपर्यंत गायकवाडाने पेशव्यास दिलेल्या व द्यावयाच्या खंडणी व नजराणे

◘

१. खंडणीबाबत येणे दामाजीकडून	...	२६,२५,०००
गोविंदरावाकडून	...	२३,३७,०००
फत्तेसिंगकडून	...	३८,८७,००२
मानाजीकडून	...	२३,३७,०००
गोविंदरावाकडून	...	५४,५३,०००
	एकूण	१,६६,३९,००२
२. लष्करी नोकरी न करण्याबद्दल द्यावयाच्या		
रकमेपैकी येणे सयाजीरावाकडून	...	६,७५,०००
फत्तेसिंगकडून	...	११,१२,५००
मानाजीकडून	...	१३,५,००००
गोविंदरावकडून	...	४७,५०,०००
किरकोळ	...	२५,०००
	एकंदर	७८,६२,५००
सेनाखासखेलच्या जागेबद्दल नजराण्या दाखल		
बाकी येणे गोविंदरावकडून	...	१७,५०,००१
फत्तेसिंगकडून	...	५,००,०००
मानाजीकडून	...	३३,१३,००१
गोविंदरावकडून	...	५६,३८,००१
	एकंदर	१,१२,०१,००३
बिन सदराची रक्कम	...	४२,७४,४२९
पेढीवाले वगैरेकडे	...	१,५०,०००

बाबी महालांबद्दल	...	१,२५,०००
एकंदर-बाद बाबी जाऊन बाकी		४,०२,५१,९३४
खालील रकमा दिल्या		
सुमारे सन १७७०त दामाजीने	...	३६,९५,१३६
सुमारे सन १७७०त दामाजीने	...	१०,५०,०००
सुमारे सन १७७०त गोविंदरावने	...	१८,००,०००
सुमारे सन १७७१त गोविंदरावने	...	२५,००,०००
सुमारे सन १७७२त गोविंदरावने	...	१४,००,०००
सुमारे सन १७७३ सयाजीरावने	...	१४,८५,८८४
सुमारे सन १७७८त फत्तेसिंगाने	...	६,००,००१
सुमारे सन १७७९त फत्तेसिंगाने	...	१०,५०,०००
सुमारे सन १७८२त फत्तेसिंगाने	...	४,००,००१
सुमारे सन १७८८त फत्तेसिंगाने	...	२८,७९,०००
सुमारे सन १७९१ते मानाजीने	...	५,००,००१
सुमारे सन १७९५-८त गोविंदरावने	...	७८,३३,२१२

इतर काही बारीक रकमा मिळून एकंदर रुपये २,९६,९८,६४४ गायकवाडने दिले. खालील रकमा पेशव्याने माफ केल्या.

	रुपये
फत्तेसिंगास	५,७०,५००
गोविंदरावास	६०,००,०००
एकंदर	६५,७०,५००

तेव्हा इ.स. १७९८च्या निकालानंतर पेशव्याची गोविंदरावाकडे शिल्लक बाकी रु. ३९,८२,७८९ होते. यानंतर गायकवाडने पेशव्यास काही दिले नाही. पुन्हा तडजोड करण्यासाठी बरीच खटपट झाली; परंतु तिचा काही उपयोग झाला नाही. शेवटी हक्काबद्दल मिळून वार्षिक काही रक्कम घेण्यास पेशवा कबूल झाल्यावर लवकरच पदच्युत झाला, त्यामुळे स्वाभाविकच त्याचे व गायकवाडचे संबंध सर्व लयास गेले.

●●●

परिशिष्ट ६

पेशव्यांचे गायकवाडाकडून येणे – रकमांची विल्हेवारी

◘

इ.स. १७९८त झालेल्या हिशेबाची बाकी (परिशिष्ट ६) रुपये	३९,८२,७८९
देगण्याबद्दल	७,७९,०००
३००० सैन्याच्या खर्चाबाबत	६,७५,०००
	१४,५४,०००

टीप :- या रकमा दहा वर्षे चढत होत्या म्हणून	१,४५,४०,०००
दामाजी गायकवाडने बाबींचा प्रदेश जिंकला तो अशा अटीवर की, अर्धा स्वतःसाठी ठेवून अर्धा पेशव्यास द्यावा. सरकारतर्फे एका कारकुनाने हा निकाल करावा; विभागाची नोंद घ्यावी व ठिकाणे १७४०त द्यावी व या सालपूर्वीची बाकी माफ व्हावी. हे कधी पार पडले नाही (पहा परिशिष्ट ४). १७७१त गायकवाडने एक लाख रुपये दिले व पुढील वर्षी २५,००० द्यावयाचे केले. हा ठराव १७६५त झाला; परंतु तो अमलात कधी आला नाही. त्यामुळे दरसाल १ लाख रुपये प्रमाणे ३७ वर्षांची बाकी	३७,००,०००

१७९४त सेनाखासखेल समशेरबहादर व काही जमिनी गोविंदराव गायकवाडास देण्यात आल्या, त्याजबद्दल ५६,३८,००१ रुपये पोचते झाले. तो मेला व तेच मान व जमिनी त्याचे मुलास दिले त्याबद्दल त्याचेकडून येणे	५,६३,८०,००१
एकूण	२,७८,६०,७९०

१७९६ साली असे ठरले की, ३००० घोडेस्वार दिमतीस द्यावे व लागल्यास ४००० द्यावे. गायकवाडचे एक आप्त दरबारात राहावा आणि सैन्य केव्हाही तयार असावे किंवा याचे मोबदला काही रक्कम द्यावी.

अहमदाबाद दोन अमलाखाली आहे; पण माधवरावाच्या वेळची व्यवस्था चालू आहे. काही फरक झाला असल्यास तो काढून टाकावा.

तुम्ही १७९२त सरकारात ३ उत्तम हत्ती व घोडे देण्याचे कबूल केले; पण त्याप्रमाणे अंमल झाला नाही. तरी तो करण्यास चुकू नये. १७९३त आमच्या मध्यस्थीने तुम्ही एक लाखाची रक्कम कर्जी काढली त्याबद्दल आमचा हवाला आहे. तुमच्यावर पाठवलेल्या हुंडी चिठ्ठ्या स्वीकारण्याचे तुम्ही कबुलत केली; परंतु तसे आपण केले नाही. तरी आता तसे करावे व व्याज भरावे.

एक लाख रुपयाचे जडाव नजर करण्यास आपण बांधलेले आहा. पण आपण ते केले नाही, तरी करावे व माधवरावचे वेळी झालेले करार पाळावे.

बाळाजी नाईक भोरा सावकाराचे तुम्ही देणे आहा व त्याबद्दल सरकारचा हवाला आहे. ही रक्कम सालीना एक लाख रुपयेप्रमाणे निकाला आणावी व माधवराव व त्यांचे कुटुंबास असे वागवावे की, त्याच्या फिर्यादी सरकारास न याव्या.

याशिवाय ठरावाप्रमाणे तुम्ही कबूल केलेली रक्कम रुपये	७८,३३,२१२
परंतु चुकती केलेली रक्कम	२८,१३,३०५
बाकी येणे शिल्लक	५०,१९,८८७
याचा निकाल करावा.	

संदी परगण्यात राणी खेडे आपल्याकडे तेरा वर्षे आहे. त्याची किंमत सालीना २००० रुपये आहे. ही रक्कम भरून खेडे कमावीसदाराचे स्वाधीन करावे.	२०००
	२६,०००
	५०,४५,८८७

जेथे जेथे खेड्यावरील सारा वसूल झाला तेथील रक्कम परत पाठवून द्यावी.

होळकरच्या स्वारीने कित्येक कागद नाहीसे झालेले आहेत किंवा सापडत नाही, त्यामुळे हिशेब बरोबर करता येत नाहीत; परंतु कागद सापडतील तसतसे नवीन रकमा कळवीत जाऊ.

१७९६त हुंड्या आपले नावावर पाठवल्या त्याचा हिशेब पाठवावा.

फत्तेसिंग बडोद्याचे रिजेंट याने आपले पेशव्यांकडून येणे दाखवले.

१. आमच्याकडून भडोच अन्यायाने घेतले गेले. जर भडोचचा वसूल साडेआठ नऊ लाख रुपये धरला व गायकवाडचा त्यातील भाग २/३ आहे असे धरले तर रक्कम अडीच कोटी होईल.
२. पेशव्यांच्या विनंतीवरून आबा शालूकराबरोबर आम्ही लढाई केली. लढाईचा खर्च १,६५,००० रुपये झाला.

दुसरे बारीक सारीक हक्क होते, त्याचा येथे निर्देश करण्याची जरूर नाही.

●●●

परिशिष्ट ७

बडोदे सरकारास येणाऱ्या खंडण्या.

शेजारच्या संस्थानांतून येणाऱ्या खंडणीची ही यादी जवळजवळ बिनचूक आहे.

नंबर	नाव	खेड्यांची संख्या	घांसदाणा	जमाबंदी	एकंदर रक्कम	टीप
			महिकांठा			
१	जिल्हा वाट्क	९	८६७९	०	८६७९	सर्वत्र गणती रुपयांत केलेली आहे.
२	परगणा बहियल	२३	७०९४×	२९०२६×	३६१२०	
३	जिल्हा साबरकांठा	१२	८७×	८९०२	२८८८९	
४	जिल्हा रेवर	४	६९८७×	०	६९८७	
५	जिल्हा नहाणी मारवाड	११	३९८१९×	०	३९८१९	
६	जिल्हा कटोसन	१८	५५६४×	३९८२×	९५४६	
			७९४५२	४१९११×	१३००४२	
७	जिल्हा पालनपूर	२६	४१८०× }	१६०४×	५५७८४	७ पोलिटिकल सुपरिटेंडेंटने जमा केलेले
			५०००० }			
८	ठास्रा पंचमहाल	०	८१७४	०	८१७४	८ खेड्याच्या कलेक्टरने जमा केलेले

नंबर	नाव	खेड्यांची संख्या	घांसदाणा	जमाबंदी	एकंदर रक्कम	टीप
९	सनोदा आणि प्रांतिज	०	६५५४×	०	६५५४	९ अहमदाबादच्या कलेक्टरने जमा केलेले
			९०१८७× +६६८५३	४३५१५×	२००५५६+	
			× ही खूण म्हणजे बाकीच्या रकमा बा.	कलदार नाणे बाबाशाईच्या होत	+या जमेत कलदार व बाबाशाई नाणे येते	
			रेवा	कांठा		
१	तिलकवाडा परगणा	२०	१४३९६	०	१४३९६	
२	संखेडा	१७	५२०८	०	५२०८	
३	सावळी	२२	२७७१५	०	२७७१५	
४	मादरवा	१	११८७६	०	११८७६	
५	डभई	३	१५०३	०	१५०३	

नंबर	नाव	खेड्यांची संख्या	घांसदाणा	जमाबंदी	एकंदर रक्कम	टीप
६	शिनोर	३	८५३	०	८५३	
७	चांडोद	१	१००१	०	१००१	
८	वडनवाटा	१	६१	०	६१	
९	राजपिपळा	१	६५००१	०	६५००१	
१०	छोटा उदेपर	१	१०५००	०	१०५००	
११	उमेटा	१	५०००	०	५०००	
१२	लुनावाडा	१	६५०१	०	६५०१	
१३	महिकांठ्याचे तीन तालुके	३	३४२७	०	३४२७	
१४	जिल्हा खेडा बालाशिनोर	१	४००१	०	४००१	
			१५७०४३	०	१५७०४३	
			काठे	वाड		
१	जालावाढ	१	३८२	०	३८२	
२	काठेवाड	२१	२७०२१	०	२७०२१	एकूण जमा रु.६,४३९६२
३	मचू कांठा	२	५०३९०	०	५०३९०	मध्ये काही कलदार

नंबर	नाव	खेड्यांची संख्या	घांसदाणा	जमाबंदी	एकंदर रक्कम	टीप
४	हलर	५	१३८७३५	०	१३८७३५	रुपये आहेत. म्हणून सन १८७६-७७ च्या अडमिनिस्ट्रेशन रिपोर्टात एकूण रकम रु. ६६०२५९ दिलेली आहे.
५	सोराठ	१	४२२१०	०	४२२१०	
६	खेरडा	१	७१९६	०	७१९६	
७	गोहेलवड	२५	३९५७७	०	३९५७७	
८	उंद सुरवेया	२३	९५३४	०	९५३४	
९	बाबरिया वाड	१	२९५६	०	२९५६	
			३१३००१	०	३१३००१	
	ह्यातून वजा करावयाचे					
१	अमरेळीतून पाठवलेली रक्कम	०	२०११९	०	२०११९	
२	मालीयाला पाठवलेली	०	१५१८	०	१५१८	
३	खर्चाकरिता परत घेतलेली	०	५०००	०	५०००	
	नक्की रकम काठेवाड		२,८६,३६३	०	२,८६,३६३	

परिशिष्ट ८

जमीन महसुलाकरिता प्रांतिक भागाचा फेरबदल. चार मुख्य प्रांत आहेत दर एकास एक सुभा आहे. दर सुभ्याच्या हाताखाली १० नायबसुभे आहेत. त्याच्या हातात पोटभाग आहेत. एकंदर ३१ तालुके अगर महाल आहेत व प्रत्येक महालाला एक तहसीलदार आहे. १० एवढे मोठे आहेत की त्याचे पोट तालुके आहेत. दर पोट तालुक्यास एक नायब तहसीलदार आहे. या यादीत प्रथम जुने विभाग व त्यातील खालसा किंवा तोडलेली खेडी (३७०६$^{१}/_{२}$) व त्याचा महसूल दिलेला आहे. नंतर पुन्हा केलेले विभाग दिलेले आहेत.

नंबर	जुने तालुके	प्रत्येक तालुक्यातील खेडी			महसूल	नंबर	नवीन तालुके	प्रत्येक तालुक्यातील खालसा व तोडून घेतलेली खेडी	महसूल
		खालसा	तोडलेले	एकंदर					
	उत्तर प्रांत								
१	देहगाव	१२१	५	१२६	३१९७५३	१	देहगाव पोट तालुका अतरसुंभ	१७२	४०४२००
२	अतरसुंभ	४४	२९	७३	६७१८३	२	कडी	११९	३६४९००
३	कडी	२९४	१०	३०४	१५३५९५	३	कलोल	८८	२७२५००
४	पाटण	४८१	५७	५३८	१४०२०९६	४	पट्टण पोट तालुका हरिज	२७५	५०९९१७
५	घडनगर	२५	०	२५	११८२७५	५	वडावळी	१३०	३४४२००

नंबर	जुने तालुके	प्रत्येक तालुक्यातील खेडी			महसूल	नंबर	नवीन तालुके	प्रत्येक तालुक्यातील खालसा व तोडून घेतलेली खेडी	महसूल
		खालसा	ताडलेले	एकंदर					
६	विसनगर	३३	२	३५	३६४७६९	६	सिद्धपूर	९९	४००४००
७	खैराळू	७६	१	७७	१८५१९१	७	विसनगर	६५	४७५३००
८	विजापूर	६९	५	७४	२४५९८५	८	खेराळू पोट तालुका वडनगर	११०	२८९७००
		११४३	१०९	१२५२	३६५६८४७	९	मेसाणा	८५	२६९३००
						१०	विजापूर	१०९	३६५४००
								१२५२	३६५६८४७
	मध्य प्रांत								
१	बडोदे	१७३	८४	२५७	१२७००८९	१	बडोदे	१२३	५८१२६०
२	दुमाला	५८	२६	८४	१८५६१६	२	चोरंदा	८८	७५४१९०
३	खानगी	७२	४	७६	३७८१२७	३	जरोद	११२	२३३१७८
४	पेटलाद	९९ १/२	७	१०६ १/२	९२०२३२	४	पेटलाद, पोट तालुका शिसवा	१०७ १/२	९५८३१०

नंबर	जुने तालुके	प्रत्येक तालुक्यातील खेडी			महसूल	नंबर	नवीन तालुके	प्रत्येक तालुक्यातील खालसा व तोडून घेतलेली खेडी	महसूल
		खालसा	ताडलेले	एकंदर					
५	सावळी	४४	४	४८	९७०५२	६	डभई	७४	३९८७११
६	पाद्रा	६	१	७	७२३१८	७	सिनोर	५१	३९५३७२
७	डभोई	६९	१२	८१	४७५१३६	८	संखेडा पोट तालुका तिळकवाडा	४०१	२९१४५५
८	सिनोर	३५	४	३९	२७८५३३				
९	संखेडा	२०९	०	२०९	१७८९५६				
१०	बहादरपूर	३४	०	३४	४९००२			१०१६ १/२	४०७०४९१
११	वासना	१५	०	१५	३९८९०				
१२	तिलकवाडा	३८	०	३८	४३६०७				
१३	चांदोड	०	१	१	५५७७				
१४	कोरळ	१८	३	२१	९६२९४				
		८७३ १/२	१४३	१०१६ १/२	४०७०४९१				

नंबर	जुने तालुके	प्रत्येक तालुक्यातील खेडी			महसूल	नंबर	नवीन तालुके	प्रत्येक तालुक्यातील खालसा व तोडून घेतलेली खेडी	महसूल
		खालसा	ताडलेले	एकंदर					
	दक्षिण प्रांत								
१	मरोळी }	२४	०	२४	१०७९४१	१	नवसारी	६६	३६५२९३
२	तिलाडी }	३४	३	३७	२०२२३४	२	गणदेवी	२९	१६७६९१
३	नवसारी	५	०	५	५५११८	३	पळसाणा	७९	२४९३७६
४	वणदेवी	२७	२	२१	१६७६९१	४	कामरेज	७३	२२४९८६
५	बलेसार	७०	९	७९	२४९३१६	५	वैळाशा, पोट तालुका वाकळ.	१२९	३२७९५८
६	टिंबा }	६९	४	७३	२२४३८६	६	महुवा	७७	१३५५२६
७	कामरेज }		७				अंतापूर	१५७	१७२२०७
८	वसराई }	१०२	२	१०४	२०८९९१	८	सोनगड पोट तालुका वाजपूर	५१७	११४६१८
९	वरियाव }	१	०	१	२९८१४			११२७	१७५७६२६
१०	कठोर }	२४	०	२४	८९१८३				
११	महुवा }	४९	२	५१	८३९५०				
१२	वालवाडा }	१५	०	१५	२४८४५				

नंबर	जुने तालुके	प्रत्येक तालुक्यातील खेडी			महसूल	नंबर	नवीन तालुके	प्रत्येक तालुक्यातील खालसा व तोडून घेतलेली खेडी	महसूल
		खालसा	ताडलेले	एकंदर					
१३	व्यारा }	५४	३	५७	८७९५६				
१४	अंतापूर }	९६	४	१००	८४२५१				
१५	कोस अनावळ	११	०	११	२६७३१				
१६	सोनगड	४००	३७	४३७	८६८०९				
१७	किले	८०	०	८०	२७८१०				
		१०६१	६६	११२७	१७५७६२६				
	अमरेळी								
१	अमरेळी	६५	५	७०	४९६११०	१	अमरेळी पोट तालुका भीमकटा	७०	४९६११०
२	ओखामंडळ	४९	४	५३	१०५१४३	२	दामनगर पोट तालुका सियानगर	३८	२१०८३४
३	कोडिनार	५९	१२	७१	१८७७३०	३	धारी	७९	२५११४६
४	धारी	७०	९	७९	२५११४६	४	कोडिनार	७१	१८७७३०
५	दामनगर	२६	०	२६	१९४८३९	५	ओखामंडळ पोट तालुका बेट	५३	१०५१४३
६	सियानगर	११	१	१२	१५९९५				
		२८०	३१	३११	१२५०९६३			३११	१२५०९६३

परिशिष्ट ९

कोडिनार

⊡

१८७३च्या कलमबंदीच्या भाषांतरातील उतारे.

संस्थान जुनागडचे नबाब बहादूर खानबाबी यांच्या संबंधाने विठ्ठलराव दिवाणजी व ऑनरेबल कंपनीतर्फे कॅप्टन माकमर्डो यांच्यामार्फत केलेल्या व्यवस्थेची यादी मिती मार्गशीर्ष वद्य १३ संवत १८६९.


१. (सोमनाथचे देऊळ गायकवाडास दिले) प्रभासपट्टण किल्ला हिंदूधर्माचे स्थान आहे. म्हणून याठिकाणी, यावेळेपासून धर्मभ्रष्टता होणार नाही. पशुवध होणार नाही. हिंदू यात्रेकरूवरील कर काढून टाकला जाईल. गायकवाडचा एक मेहता पाटण येथे राहील व देवस्थानचे व नदीचे पावित्र्य भ्रष्ट होणार नाही अशी चौकशी ठेवील.

२. (जुनागडने कोडिनारचा आपल्या नावचा भाग दिला). कोडिनारच्या परगण्यात दोन सरकार म्हणजे गायकवाडाचा अमल व जुनागडचा भाग असल्यामुळे रयत लोक येथे कायमचे राहिनात व व्यापारी व्यापार काम करीतात. या कारणासाठी जुनागडचा वाटा गायकवाडास द्यावा. अमदाबादला हुंडी पटवून दिला जाणाऱ्या गनिम विऱ्यांतून जमाबंदी पत्रकात सालोसाल कोडिनारच्या परगण्याबद्दल आठ हजार रुपये जमा व्हावे.

●●●

परिशिष्ट १०

बडोदा राजे गायकवाड यांचा वंशवृक्ष (१)



बडोदा राजे गायकवाड यांचा वंशवृक्ष
महाराजा सयाजीराव यांच्यापासून

सयाजीराव गायकवाड

जन्म : ११ मार्च १८६३

दत्तक : २७ मे १८७५
व राज्यारोहण.
मृत्यू : ६ फेब्रुवारी, १९३९
- महाराणी चिमणाबाई पहिल्या
विवाह ६ जाने. १८८०
जन्म : १३ जुलै १८६४
निधन : ७ मे १८८५
- महाराणी चिमणाबाई (दुसऱ्या)
जन्म : १६ नोव्हेंबर १८७१
विवाह २८ डिसेंबर १८८५
मृत्यू : १९६३

फत्तेसिंहराव
जन्म : ३ ऑगस्ट १८८३
मृ. : १४ सप्टेंबर १९०८
विवाह :
पद्मावती
४ फेब्रुवारी १९०४
मृत्यू : १०.११.१९०४

जयसिंहराव
१२ मे १८८८
विवाह :
पुतळाबाई
ऊर्फ शकुंतला
२७.२.१९१३
मृत्यू : २३.८.२३

शिवाजीराव
३१ जुलै १८९०
मृत्यू : २४.११.१९
विवाह :
कमलादेवी
१९.१२.१९१३

इंदिराराजे
२ मार्च १८९२
विवाह :
जितेंद्र नारायण
२५.८.१९१३
जावई कुचबिहारी
मृत्यू : २०.१२.२२

धैर्यशीलराव
३१ ऑगस्ट १८९३
विवाह :
विमलादेवी
१६ मार्च २२

(फत्तेसिंहराव यांची अपत्ये)

प्रतापसिंह
जन्म : २९ जून १९०८
विवाह : ४.१.१९
शांतादेवी

इंदुमती
राजाराम
विवाह : १.४.१८

लक्ष्मीदेवी : सावंतवाडी
विवाह : ३०.४.२२

(प्रतापसिंह यांची अपत्ये)

फत्तेसिंहराव
जन्म : २.४.३०

रणजितसिंह
समरजीतसिंह

संग्रामसिंह
प्रतापसिंह

मृणालिनीदेवी

सरलाराजे

वसुंधराराजे

●●●

स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्थानात अनेक लहानमोठे संस्थानिक राजे होते. ब्रिटिश सत्तेपुढे मांडलिकत्व सिद्ध करण्यासाठी त्यांची चढाओढ लागलेली असे. अशात आयुष्यभर ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक स्वाभिमानी राजा होते.

शेतकऱ्याचा मुलगा ते बडोद्याच्या राजगादीवर विराजमान होणे हा त्यांचा राजपदाचा प्रवास थक्क करणारा आहे. सयाजीराव या किशोरवयीन राजात प्रशासनाचे विविध पैलू पाडून लोककल्याणकारी राजा घडविण्याचे काम केले गुरुवर्य एफ.ए.एच. इलियट सरांनी. विदर्भ प्रांतात शिक्षण संचालक असलेल्या या आय.सी.एस. अधिकाऱ्याने या हिऱ्यास उत्तम प्रशासन, ज्ञानात्म प्रबोधनाची निकड आणि जनसेवेतच मोक्ष आहे, हे त्यांच्या मनावर बिंबविले. ब्रिटिश आणि बडोद्याच्या मूळ कराराने दोन्ही एक दुसऱ्याचे मित्र आहेत. याचा अर्थ बडोदा राज्य मांडलिक नसून सार्वभौम आहे, हे दाखवून दिले.

या इलियट सरांनी १८७९ साली The Ruler's of Baroda हा इंग्रजी ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचा 'बडोद्याचे राज्यकर्ते' हा मराठी अनुवाद आहे. बडोदे आणि बडोद्यातील राज्यकर्त्यांचा हा तसा पहिलावहिला इतिहास म्हणता येईल. महाराजा सयाजीराव गायकवाड यांची नंतर मान्यवरांनी लिहिलेली लहान-मोठी सतरा इंग्रजी-मराठी चरित्रे प्रकाशित झाली. तरीही शेतकऱ्याचा मुलगा ते एक प्रज्ञावंत राजा अशी जडणघडण झालेल्या राजाच्या या चरित्रांचा समावेश या खंडात केला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ